१४३-अ

एम. ए. भाग १

इतिहास अभ्यासपत्रिका क्र. २

(पर्याय - अ)

# भारतीय राष्ट्रीय चळवळ
# (१८५८-१९४७)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. कविता लघाटे**
प्राध्यापक आणि संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रा.अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा.अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. बी. डी. शिंदे**, इतिहास विभाग प्रमुख
महात्मा फुले, कला व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, रायगड

**संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**, सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक**

**प्राचार्य व्ही. एस. जाधव**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा

**डॉ. एस. पी. शिंदे**
इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा,

**डॉ. डी. बी. मासाळ**
इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा,

**प्राचार्य डॉ. विजयकुमार नलावडे**
शरदचंद्र पवार महाविद्यालय, जि. सातारा,

**डॉ. आर. पी. भामरे**, सहयोगी प्राध्यापक, लोकनेते
व्यंकटरावहीरे महाविद्यालय, पंचवटी, नाशिक - ३

**डॉ. टि. बी. राजदेव**
इतिहास विभाग
एस. पी. पी. टी. महाविद्यालय, अहमदनगर

**डॉ. व्हि. एल. कदम**, इतिहास विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

**प्राचार्य एस. एन. गेजने**, इतिहास विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, मेढा ता. जाबेंली, जि. सातारा

**प्राचार्य (श्रीमती) यु. व्ही. नलावडे**, इतिहास विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा, जि. सातारा

**पुनर्मुद्रण ऑगस्ट २०१९, एम.ए.भाग १ - इतिहास पेपर क्र.२ (पर्याय-अ)**
**भारतीय राष्ट्रीय चळवळ (१८५८-१९४७)**

**प्रकाशक** : प्राध्यापक आणि संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई - ४०० ०९८

**अक्षर जुळवणी** : **७स्किल्स**
गाळा नं.२, जे. एम.नगर कॉम्प्लेक्स कॉ. हौ.सो.लि.,
पंडित दीनदयाल रोड, आनंद नगर, डोंबिवल (प.),
ठाणे - ४२१ २०२.

**छपाई** :

# अनुक्रमणिका


| क्रमांक | पाठाचे शिर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | भारतीय राष्ट्रीय चळवळीचे इतिहासलेखन भाग-१ | डॉ. कदम व्हि.एल. | ०१ |
| २. | भारतीय राष्ट्रीय चळवळीचे इतिहासलेखन भाग-२ | प्रा. गेजगे एस.एम. | १४ |
| ३. | १८५७ चा उठावाचे परिणाम - | प्रा. सौ. नलावडे एस. व्ही. | २६ |
| ४. | शेतकरी आणि आदिवासी चळव | प्रा. सौ. नलावडे एस. व्ही. | ४३ |
| ५. | शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी | प्रा. जाधव व्ही. एस. | ६० |
| ६. | आर्थिक राष्ट्रवादाचा उदय | प्रा. जाधव व्ही. एस. | ७५ |
| ७. | राष्ट्रवादाचा उदय व भारतीय क्रॉंग्रसची स्थापना | प्राचार्य नलावडे व्ही. एन. | ९२ |
| ८. | क्रांतीकारी राष्ट्रवादी चळवळ | प्राचार्य नलावडे व्ही. एन. | १२१ |
| ९. | साम्प्रदायिकतेचा उदय | प्रा. गेजगे एस. एम. | १३५ |
| १०. | म. गांधीजींचे जन आंदोलन - भाग १ | डॉ. शिंदे एस. पी. | १६१ |
| ११. | म. गांधीजींचे जन आंदोलन - भाग २ | डॉ. शिंदे एस. पी. | १७८ |
| १२. | घटनात्मक विकास - १९१७ ते १९४७ | डॉ. भांबरे आर. पी. | १९९ |
| १३. | पददलित वर्ग - स्त्री चळवळ | डॉ. भांबरे आर. पी. | २२४ |
| १४. | कामगार संघटना - भारतातील डावी चळवळ | डॉ. राजदेव टी. वी. | २४५ |
| १५. | स्वातंत्र्याकडे वाटचाल | डॉ. राजदेव टी. वी. | २६७ |


❖❖❖❖

# संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) | आचार्य जावडेकर | आधुनिक भारत |
| २) | डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर | आधुनिक भारताचा इतिहास, १,२,३ |
| ३) | डॉ. र. म. लोहार | आधुनिक भारताचा इतिहास |
| ४) | ए. आर. देसाई | सोशल बॅकग्राउंड ऑफ इंडियन नॅशनॉलिझम |
| ५) | ग्रोव्हर बी. एल. | अ न्यू लूक ऑन मॉर्डन इंडियन हिस्ट्री |
| ६) | डॉ. एम. व्ही. काळे | भारताचा स्वातंत्र्य संघर्ष |
| ७) | बिपन चंद्र | इंडियन स्ट्रगल फॉर इंडिपेडन्स |
| ८) | डॉ. सुमन वैद्य | आधुनिक भारताचा इतिहास |
| ९) | खुराना के. एल. | मॉर्डन इंडिया |
| १०) | प्रो. ताराचंद्र | हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेन्ट इन इंडिया |
| ११) | ग्रोव्हर बी. एल. | आधुनिक भारताचा इतिहास |
| १२) | डॉ. बी. एन. सरदेसाई, डॉ. व्ही.एन.नलावडे - | आधुनिक भारताचा इतिहास |
| १३) | डॉ. श. गो. कोलारकर | आधुनिक भारत |
| १४) | गुप्त मणिकलाल | भारत का इतिहार |
| १५) | रामचौधरी एस. सी. | हिस्ट्री ऑफ मॉर्डन इंडिया |
| १६) | मुजुमदार आर. सी. | हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेन्ट इन इंडिया |
| १७) | पामदात रजनी | इंडिया टुडे |
| १८) | कुबेर वाना | भारताचा स्वातंत्र लढा १९३०-३४ |
| १९) | इंदूलकर गंगाधर | राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काल-आज आणि उदय |
| २०) | गोडबोले अरविंद | सावरकर विचार दर्शन |
| २१) | राष्ट्रजागरण अभियान २००० | संघगाधा, संघ आणि राजनिती, संघ-मुस्लीम समाज संघ - राष्ट्रीय आंदोलने |
| २२) | गजानन भिडे | आधुनिक भारताना इतिहास |


❖❖❖❖

## Syllabus
## M.A. Part - I Paper - II (Option A)
## Indian National Movement - (1858 - 1947)

1. **Historiography of the Indian Natioal Movement.**
   a) Nationalist School.
   b) Marxist School.
   c) Cambridge School.
   d) Subaltern School.

2. **Rise of Political Consciousness.**
   a) Impact of the Revolt of 1857
   b) Peasants Movement
   c) Tribal Movent.
   d) Among Muslims.

3. **Social and Religious Reform Movements.**
   a) Growth of Western Education and its impact.
   b) Influence of Socio-Religious Movement on the Rise of Indian Nationalism.

4. **Rise of Economic Nationalism.**
   a) British Economy Polities - their Impact.
   b) Drain Theory
   c) Emergence of Indian Capitalists.

5. **Growth of Nationalism.**
   a) Provincial Association and Foundation of Indian National Congress.
   b) Programmes and Policies of Indian National Congress from 1885-1919
   c) Revolutionary Nationalists.

6. **Rose of Communalism**
   a) All India Muslim League
   b) Hindu Mahasabha.
   c) Rashtriya Swayamsevak Sangh

7. **Gandhian Mass Movements.**
   a) Doctrine of Satyagraha and Non Co-operation Movement.
   b) Civil Disobedience Movement.
   c) Quit India Movement.

8. **Constitutional Developments 1917 - 1947**

9. **Emergence of New Forces.**
   a) The Depressed Classes.
   b) Women
   c) Trade Unionism.
   d) Left Movements in India

10. **Towards Independence.**
    a) Indian National Army and Naval Mutiny of 1946.
    b) International Response to the Indian National Movement.
    c) Freedom and Partition.

## BOOKS FOR STUDY

A. K. Majumdar, Advent of Indepedence, Bhartiya Vidya Bhavan, Bombay 1969.

A. R. Desai, Social Background of Indian Nationalism, 5th ed., Popular Prakashan, Bombay 1976.

Amales Tripathi, Extremist Challenge in India Between 1890-1919, Orient Longmans, 1967

Anil Seal, The Emergence of Indian Nationalism : Competition ad Collaboration in the Later Nineteenth Century, Cambridge University Press 1971.

Anita Ganachari, Nationalism and Social Reform in a Colonial Situation Kalpaz Publication, New Delhi, 2005

B.R. Nanda (ed)., Essays in Modern Indian History, Second Impression, Oxford University Press, Delhi, 1983

B. R. Nanda (ed)., Gokhale : The Indian Moderates and the British Raj, Princeton University Press New Jersey, 1977.

Bimal Malhotra, Reform, Reaction and nationalism in Western India, 1885-1907, Himalaya Publishing House, 2000

Bipin Chandra, The rise and Growth of Economic Nationalism in India : Economic Policies of the Indian National Leadership, 1880-1905 People's Publishing House, New Delhi, 1977.

❖❖❖❖

# १

# भारतीय राष्ट्रीय चळवळीचे इतिहासलेखन शास्त्र

## (Historiography of Indian National Movement)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राष्ट्रवादी विचार प्रणाली (National School)

१. अर्थशास्त्रीय दृष्टीकोन

२. वसाहतवादी दृष्टीकोन

१.२.२ मार्क्सवादी विचार प्रणाली (Marxist School)

१. कार्ल मार्क्सचे जीवनचरित्र

२. मार्क्सचा अतिरिक्त श्रममुल्याचा सिध्दांत

३. मार्क्सचा अलगीकरणाचा सिध्दांत

४. मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिध्दांत

५. मार्क्सचे समाजवादासंबंधी विचार

६. मार्क्सचे धर्मसंबंधी विचार

७. मार्क्सच्या सिध्दांतावरील टिका

८. नवमार्क्सवाद

९. मार्क्सवादी दृष्टीकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळ

१.३ सारांश

१.४ प्रकरणावरील प्रश्न

१.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासापासून आपणास -

- भारतीय विचारवंतांचा आधुनिक भारताच्या इतिहासाकडे पाहण्याचा राष्ट्रवादी दृष्टीकोन स्पष्ट करता येईल.
- भारतीय विचारवंतांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन सांगता येईल.

- भारतीय विचारवंतांचा वसाहतवादी दृष्टीकोन विशद करता येईल.
- कार्ल मार्क्स विचारसरणीच्या विचारवंतांचे विविध विचार स्पष्ट करता येतील.
- भारतीय राष्ट्रीय चळवळीकडे मार्क्सवादी विचारवंतांचा पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, विचारवंतांमध्ये इतिहास म्हणजे नुसत्या घटनांची मालिका किंवा सनावळ्या किंवा गतकाळाचा अभ्यास असा गैरसमज असता कामा नये. प्रत्येक घडणारी घटना विशिष्ट परिस्थितीमध्ये घडत असते. त्या घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न इतिहाससंशोधकाला करावा लागतो. हा अर्थ लावत असताना संशोधकाला शास्त्रीय पद्धतीशास्त्राचा आधार घ्यावा लागतो. भारतीय, परकीय इतिहासकार व संशोधकांचे इ.स. १९३० सालापर्यंत आधुनिक भारत या विषयाकडे दूर्लक्ष झाले होते. तथापि, १९३० सालानंतर मात्र संशोधकांनी आधुनिक भारताच्या इतिहासातील विविध विषयांवर संशोधन सुरू केले. या संशोधनामुळे आधुनिक भारताच्या इतिहासातील विविध पैलू समोर येऊ लागले. अनेक वेळा भारतीय संशोधकांचे लिखाण हे प्रतिक्रियेच्या स्वरूपामध्ये होते. ब्रिटिश सरकारचे प्रशासकीय अधिकारी, त्याचप्रमाणे केंब्रिज व ऑक्सफर्ड विद्यापीठातील संशोधकांनी भारतासंबंधी जे लिखाण केले. त्यामध्ये अनेक प्रकारच्या चुका असल्याने भारतीय संशोधकांनी त्या दुरूस्त करण्यासाठी पुन्हा नव्याने लिखानाला सुरूवात केली. या संशोधकांमध्ये के. पी. जयस्वाल, आर. सी. मुजुमदार, एस.एन.सेन, तारांचद, स्वामी दयानंद, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, ईश्वरी प्रसाद आदींचा समावेश केला जातो. या इतिहासकारांनी राष्ट्रवादी दृष्टीकोनातून ब्रिटिश लिखानाला प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतामध्ये इ. स. १९५० नंरतच्या काळात मार्क्सवादी इतिहासलेखनाला चालना मिळाली. याचवेळी भारतात राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा प्रवाह गतिमान झाला, इतिहासकारांना नवनवीन ऐतिहासिक साधने उपलब्ध होऊ लागले. नवनवीन विषय हाताळले जाऊ लागले आणि लेखन अधिक चिकित्सक बनले. या दरम्यान कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी विचारप्रणालीने प्रभावित झालेले काही भारतीय इतिहासकार मार्क्सच्या सिद्धांताच्या आधारे भारतीय इतिहासाचे अध्ययन करू लागले. यामध्ये श्रीपाद अमृत डांगे (From Primitive Communism to Slavery), रजनी पामदत्त (India Today), डॉ. नुरूल हसन, डॉ. रामशरण शर्मा, डॉ. रोमीला थापर, डॉ. हरबन्स मुखिया, डॉ. महमंद हबीब, डॉ. इरफान हबीब, डॉ. बिपिनचंद्र या इतिहासकारांचा समावेश होतो. हे सर्व इतिहासकार पोथीनिष्ठ मार्क्सवादी नाहीत, मार्क्सने लिहलेला प्रत्येक शब्द, मांडलेले प्रत्येक प्रमेय, ते शिरोधार्थ मानतात असे नाही. मार्क्सने प्रतिपादीत केलेला मानवी जीवनाच्या विकासामागील आर्थिक हेतू मुलकतेचा आणि भौतिकवादी विरोध विकासचा सिद्धांत हे मानवी समाजाच्या अध्ययनाचे मौलिक आधार आहेत अशी त्यांची वैचारिक निष्ठा आहे. या भूमिकेतून प्राचीन भारतीय इतिहासापासून आधुनिक भारताच्या इतिहासाचे ते विश्लेषण करतात. या प्रकरणात आपण राष्ट्रवादी व मार्क्सवादी विचारप्रणालीचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ विषय - विवेचन

### १.२.१ राष्ट्रवादी विचारप्रणाली (Nationalist School )

आधुनिक भारताच्या इतिहासातील २०व्या शतकात घडून आलेली महत्त्वपूर्ण चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळ होय. या ऐतिहासिक चळवळीत भारतातील विविध धर्म, जाती पंथातील लोकांनी विस्कळीत असूनही साम्राज्यवादी ब्रिटिश सरकार विरूद्ध लढा दिला. आणि शेवटी इंग्रजांना भारत सोडून जाण्यास भाग पाडले. सुरूवातीपासूनच ब्रिटिशांची अशी धारणा होती की, भारत हे राष्ट्र नाही परंतु या संघटित चळवळीतून भारत हे राष्ट्र आहे हे त्यांना कबुल करावे लागले. युरोपमध्ये भारत ही वसाहत ब्रिटिशांच्या राजमुकुटातील दैदिप्यमान हिरा म्हणून ओळखली जात असे. ही वसाहत ज्या वेळी स्वतंत्र झाली त्यावेळी ज्या साम्राज्यावर कधीही सुर्य मावळत नव्हता. असे दर्पोक्ती करणारे ब्रिटिश साम्राज्य लयाला गेले. भारतामध्ये लोकशाहीचा उदय झाला. या सर्व गोष्टी खरोखरच विचार करावयास लावणाऱ्या आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही चिंतनाचा, मननाचा, विषय आहे. त्यामुळे या चळवळीचा अभ्यास विविध वैचारिक दृष्टीकोनातून केला जाऊ लागला. भारतीय राष्ट्रीय चळवळीचा अभ्यास राष्ट्रवादी विचारसंप्रदायाच्या विचारधारेतून करत असताना आपणास अर्थशास्त्रीय व वसाहतवादी दृष्टीकोनातून ही अभ्यास करणे आवश्यक आहे.

### १) अर्थशास्त्रीय दृष्टीकोन

कोणत्याही काळात साम्राज्यवादामागे आर्थिक फायदा हा उद्देश असतो. प्रत्येक काळातील आर्थिक घटकाचे स्वरूप भिन्न असले तरी हेतू मात्र एकच असतो. ज्यावेळी शेतीप्रधान समाजरचना होती, त्यावेळी भूमी ही साम्राज्यवाढीसाठी महत्त्वाची मानली जात होती. त्यानंतर हळूहळू व्यापार व वाणिज्याला महत्त्व आले. १८व्या शतकात इंग्रजांनी भारतात आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. त्यावेळी भारत हा कृषीप्रधान देश असल्याने शेतीपासून मिळणाऱ्या महसुली उत्पन्न हा ब्रिटिशांचा हेतू होता. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असणाऱ्या भारताचा फायदा करुन घेणे ही त्यांची आर्थिक प्रेरणा होती. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे तेथील औद्योगिकरणाचे पोषण करणे इंग्रजांना आवश्यक होते. त्यासाठी कृषि, उद्योगधंदे, व्यापार, कर आणि चलनविषयक धोरण ब्रिटिश उद्योगधंद्यांना पोषक आणि भारतीय उद्योगधंद्यांना मारक ठरणारे स्विकारले. शेतीच्या व्यापारीकरणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दयनीय झाली. देशी उद्योगधंद्यांचा ऱ्हास सुरू झाला. भारताची स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था मोडकळीस आली. दारिद्र्य आणि बेकारी यामुळे भारतीय जनता त्रस्त झाली. त्यामुळे हा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन भारतीय जनतेमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न अनेक भारतीय विद्वानांनी सुरू केला.

आपल्या भारत देशाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, दरडोई उत्पन्न वाढविणे, बेरोजगारीचे निर्मूलन करणे, शेती, उद्योगधंद्यांचा विकास समतोल आणि शहरी व ग्रामीण विकासाचा समतोल साधणे अत्यंत आवश्यक होते. त्यासाठी आर्थिक समता आणि संपत्तीचे समान वाटप ही गरज होती. परंतु ब्रिटिशांच्या धोरणामुळे हे शक्य होत नव्हते. म्हणून भारतीय विचारवंतांनी अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार मांडण्यास सुरूवात केली. त्यात जि. व्हि जोशी, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, डॉ. रमेश चंद्र दत्त, गोपाळ कृष्ण गोखले यांचा समावेश केला जातो या विचारवंतांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाचे मार्मिकपणे वर्णन केले आहे.

राजाराममोहन रॉय यांनी 'खंडणी' हा शब्द प्रथमतः वापरून भारतीयांच्या आर्थिक शोषणाचे ब्रिटिशांचे धोरण स्पष्ट केले. दादाभाई नौरोजी यांनी 'पॉव्हर्टी ॲन्ड अन ब्रिटिश रूल इन इंडिया' (१९०१) हा ग्रंथ लिहला. यामध्ये ब्रिटिश भारताची लुट कशी करीत आहेत याची आकडेवारी दिली आहे. त्यांच्या हिशेबाप्रमाणे १७ कोटी भारतीयांचे वार्षिक उत्पन्न ३४ कोटी ४० लाख रू. आहे. म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न साधारपणे २० रू. इतके आहे. या ग्रंथात त्यांनी 'भारतीय संपत्तीच्या निःस्सारणाचा सिद्धांत' मांडला. भारतातून दरवर्षी इंग्लंडला वेगवेगळ्या रूपाने ४० दशलक्ष पौंड नेले जातात असा सिद्धांत त्यांनी मांडला. व्यापार, उद्योगधंदे व राजकीय मार्ग या तीन मार्गाने भारतातील संपत्ती इंग्लंडमध्ये नेली जात असल्यामुळे देशात भांडवल निर्मितीही होत नाही. ब्रिटिश राज्यकर्ते भारतीय संपत्तीचे निःस्सरण कोणत्या मार्गाने करतात हे त्यांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

अ) ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतन
ब) ब्रिटिश शासनाचा भारतामधील व इंग्लंडमधील खर्च
क) भारतावर लादलेला युद्धखर्च
ड) भारतातील ब्रिटिश सैन्यावर होणारा खर्च.

ब्रिटिशांनी भारतीय संपत्तीचे शोषण केले त्यामुळे भारताच्या वाट्याला दारिद्र्य आले असे दादाभाई नौरोजीं म्हणतात.

न्या. रानडे यांनी वसाहत वादाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम पाहीला होता. म्हणून त्यांनी अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून चिंतन व लेखन केले. औद्योगिकरणाला त्यांनी अतिशय महत्व दिले. भारतातून जी संपत्ती प्रत्यक्षपणे इंग्लंडमध्ये जात होती त्यास रानड्यांनी 'खंडणी' असे म्हटले आहे. तसेच ब्रिटिशांच्या खर्चाचाही त्यांनी अंदाज काढला आहे. - ''दिड कोट रूपये हिंदुस्थानच्या सरकारी कामाकरीता, विलायतेस माल खरेदी होऊन येतो त्याचा अदमास अर्धा कोट रूपये, जे नोकर लोक विलायतेस आहेत त्यांचा पगार व इस्टाब्लिशमेंटचा खर्च अर्धा कोट रूपये, अडीच कोट लष्करात उमेदवार नवीन ठेवतात त्याचा खर्च व आरमारासंबंधी खर्च,'' अशा प्रकारे भारतातून इंग्लंडकडे त्यांच्या प्रशासन खर्चासाठी विविध मार्गातून संपत्ती जाते हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. शेवटी ते म्हणतात की, ब्रिटिशांचे राज्य भारतात असल्यामुळे प्रत्येक वर्षी १६ कोटी रूपये विलायतेस खंडणी म्हणून पाठवावे लागतात.

डॉ. रमेशचंद्र दत्त यांनी 'Economic History of India' हा ग्रंथ दोन खंडात लिहिला. ब्रिटिश शासक वेगवेगळ्या मार्गानी भारताचे करीत असलेले शोषण व त्यामुळे भारताची होणारी आर्थिक दुःस्थिती हा या ग्रंथाचा मूळ विषय आहे. इंग्लंडमधील कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचे भारतात उत्पादन करणे, भारताला ब्रिटिश मालाची बाजारपेठ बनविणे ही ब्रिटिश वसाहतवादी शासनाची दोन उद्दिष्टे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारताच्या वाढत्या आर्थिक हलाखीचे मूळ कृषीसमस्येत आहे. शेतकऱ्यांना न पेलवणारा कराचा बोजा, जमीनदारांकडून होणारे शोषण व कर्जबाजारीपणा हे कायमधारा पद्धतीतील दुष्परिणाम आहेत असे निर्भिड प्रतिपादन त्यांनी केले. ब्रिटिशांच्या वित्तीय धोरणातील दोषांवर त्यांनी बोट ठेवले. रेल्वे मार्गाच्या विस्तारावर होणाऱ्या अमाप खर्चापेक्षा शेतीला पाणी - पुरवण्याची व्यवस्था सुधारण्यावर अधिक पैसा खर्च करणे निकडीचे आहे. असे मत मांडून

भारताच्या द्रव्यापहरणाचा जो विचार दादाभाई नौरोजींनी मांडला होता. त्या सिद्धांतास दत्तांनी पुष्ठी दिली आहे.

ना. गोपाळ कृष्ण गोखले हे इ.स.१९०२ साली मध्येवर्ती कायदेमंडळावर निवडून गेले. त्यावेळी त्यांनी अर्थसंकल्पावर जी १२ भाषणे केली. त्यावरून तत्कालीन आर्थिक परिस्थिती समजण्यास मदत होते. भारतीय शेती, शेतकऱ्यांची अवस्था, उद्योगधंदे, लष्कर खर्च, करव्यवस्था असे विविध आर्थिक विषय त्यांनी मार्मिकपणे हाताळले. यामध्ये त्यांनी शेतकऱ्यांचे दारिद्र्य या विषयला अधिक महत्त्व दिले.

## २) वसाहतवादी दृष्टीकोन

भारतीय राष्ट्रीय चळवळ समजून घेताना वसाहतवादाचा विचार करणे आवश्यक ठरते. भारत ही ब्रिटिशांची सर्वात मोठी वसाहत होती ती टिकविण्यासाठी ब्रिटिशांनी अनेकाविध मार्गांचा अवलंब केला. भारतात सत्ता दीर्घकाळ प्रस्थापित केली. ब्रिटिशांचा भारतातील वसाहतवाद हा भारतीयांचे सर्व प्रकारचे शोषण करणे व भारत जास्तीत-जास्त कसा अप्रगत राहील या तत्वावर आधारित होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर भारताला ब्रिटिशांनी स्वातंत्र्य दिले. भारतात लोकशाही शासनप्रणालीची सुरूवात झाली. लाला लजपतराय यांच्या मते, 'स्वातंत्र्य महत्वाचे बाकीच्या गोष्टी दुय्यम आहेत.' आर.जी.प्रधान यांच्या मते, ''भारतीय स्वातंत्र्य चळवळीमुळे भारतीय लोकांमध्ये राष्ट्रवादी भावना निर्माण झाली हेच या चळवळीचे फार मोठे यश आहे.'' ॲड्र्युज व मुखर्जी यांच्या मते, ''भारतामध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला, मानवी प्रगतीच्या नवीन दिशा आम्हाला समजल्या, यामधूनच भारतीय राष्ट्राची नव्याने उभारणी होईल.'' विश्वेश्वर प्रसाद यांच्या मते, ''पारतंत्र्य आले तरी आमच्या मधील स्वातंत्र्याची भावना कमी झाली नाही, परकियांविषयी असणारा राग वेळोवेळी झालेल्या बंडातून दिसून येतो.'' काँग्रेसच्या नेमस्त नेत्यांचेही असेच मत होते की, राष्ट्रवाद, स्वातंत्र्याची भावना ही आपल्याला मिळालेली इंग्रजांची देणगी आहे. हे आपल्याला पाश्चात्य शिक्षणामुळे मिळालेले आहे. पण त्याचवेळी इतरांचे असे मत होते की, प्राचीन काळापासून आमच्याकडे राष्ट्रवाद, राजप्रेम या संकल्पना अस्तित्वात होत्या.

ज्यावेळी भारतीय स्वातंत्र्य चळवळीने लढाऊ स्वरूप धारण केले त्यावेळी आणखी एक विचार अत्यंत प्रभावी ठरू लागला. या विचारातूनच भारतीय राष्ट्रीय नेत्यांचे कौतुक करण्याची पद्धत सुरू झाली. शिक्षणाच्या प्रसारामुळे देशात राष्ट्रप्रेम, राष्ट्रवाद व त्यातून स्वातंत्र्य ही संकल्पना पुढे आली. त्याचप्रमाणे सामाजिक व धार्मिक सुधारणांमुळे देशात राष्ट्रीय चळवळीला प्रारंभ झाला. असे राष्ट्रीय प्रवृत्तीच्या इतिहासकारांनी म्हटले आहे. प्रो. बिपिनचंद्रांनी वरील दोन्ही गोष्टींना विरोध केला आहे. त्यांच्या मते, '' लढाऊ राष्ट्राची परिणती ही ब्रिटिशांविरोधी सांस्कृतिक राष्ट्रवाद किंवा धार्मिक राष्ट्रवाद या संकल्पनांमध्ये झाली त्याचप्रमाणे सामाजिक व धार्मिक सुधारणांमुळे चळवळीला अनुकूल असा सिद्धांत मिळाला नाही. किंबहूना अशा चळवळींमध्ये राष्ट्रीय चळवळ सुरू करण्याचे सामर्थ्यच नसते. भारतामध्ये ब्रिटिशांमुळे शिक्षणाचा प्रसार झाला. यासंबंधी बोलावयाचे झाले तर भारतातील सुशिक्षित लोकांनी सरकारी नोकऱ्या स्विकारल्या आणि ब्रिटिश शासनाचे अधिकारी बनून आपल्याला लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न केला. काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकविले पण त्यांनी राष्ट्रीय चळवळीत स्वतःला झोकून दिल्याची उदाहरणे क्वचितच सापडतात. परंतु इंडोनेशिया, चीन या देशामध्ये चाललेल्या राष्ट्रीय चळवळी थोड्या फार प्रमाणात का होईना भारतीय राष्ट्रीय चळवळीला पोषक ठरल्या.''

१९३० ते १९४० या दहा वर्षाच्या काळात भारतात वसाहतवाद विरोधी लिखानाला फार मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. भारतातील राष्ट्रीय चळवळ जोमाने चालविण्यासाठी राष्ट्रीय नेत्यांनी धर्म, जात, वर्ग या सर्व बाबी बाजूला ठेवून सर्व जनतेला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीच्या काळात ही चळवळ फक्त मध्यमवर्गीय लोकांपुरतीच मर्यादित होती. राष्ट्रीय सभेचे नेते प्रामुख्याने वकील, डॉक्टर, व्यापारी या वर्गातील होते, लाला लजपतराय यांनी सुद्धा 'यंग इंडिया' मध्ये ही चळवळ म्हणावी तेवढी व्यापक नाही, तर मर्यादीत आहे, चळवळीचे भवितव्य तिला मिळणाऱ्या सामान्य लोकांच्या पाठींब्यावरच अवलंबून असते असे मान्य केले आहे. याहीपुढे जाऊन त्यांनी नेमस्त पुढाऱ्यांवर अशी टीका केली आहे की, त्यांना सामान्य माणसांपर्यंत ही चळवळ पोहचविता आली नाही. एम. एन. बॅनर्जीनी सुद्धा ही चळवळ मध्यम वर्गियांची व त्यांच्यापुरतीच मर्यादीत होती असे म्हटले आहे. लो. टिकळांनीसुद्धा आपले नेतृत्व हे प्रामुख्याने सुशिक्षित भारतीयांचेच आहे असे मान्य केले आहे. परंतु महात्मा गांधीजींचा ज्यावेळी राजकीय क्षितिजावर उदय झाला त्यावेळी मात्र राष्ट्रीय चळवळीचे स्वरूपच पालटले. पट्टाभि सितारामय्या यांनी असे प्रतिपादन केले आहे की, ''गांधीजींचे नेतृत्व वर्ग, जाती व धर्मातीत होते. गांधीजींनी त्यांच्यापुढे समान राष्ट्रीय हिताचा विचार मांडला, त्यामुळे गरीब-श्रीमंत यांच्या मध्ये स्वातंत्र्याची उर्मी निर्माण झाली.''

डॉ. आर. सी. मुजुमदार यांनी 'हिंदू राष्ट्रवाद' व 'मुस्लिम राष्ट्रवाद' असा स्पष्ट प्रवाह भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये पाहण्याचा प्रयत्न केला. डॉ. मुजुमदार भारतीय समाजातील विशेषतः हिंदू व मुस्लिम गटातील फुट वाढविण्यात ब्रिटिश शासकांचा सिंहाचा वाटा होता, या दोन गटांच्या लोकांचे एका राष्ट्रीय व्यासपीठावर येण्याचे प्रयत्न ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक हाणून पाडले, हे ते मान्य करतात. एवढेच नव्हे तर ब्रिटिशांनी भारताची फाळणी केली यामध्ये त्यांची कुटनीती लपलेली होती हे त्यांनी उदाहरणासह दाखवून दिले. हिंदू व मुस्लिम यांच्यात सांस्कृतिक भेद आहेत. त्यांच्यात सांमजस्य नव्हते, हे सप्रमाण दाखवून दिले आहे. चळवळ काळात राष्ट्रीय नेत्यांनी केलेल्या चुकावरही ते प्रकाश टाकतात. गांधीजींनी धर्म व राजकारणाची सरमिसळ केल्याबद्दल त्यांना दोष देऊन गांधी हे राजकीय संत होते की संतत्व असलेले राजकारणी होते असे खोचक विधान ते करतात. मात्र १९४६ साली गांधीजींनी प्राणपणाने केलेल्या नौखालीतील कामगिरीबद्दल मुजूमदार त्यांचे तोंड भरून कौतुक करतात. अशा प्रकारे ऐतिहासिक सत्यावर खंबीरपणे पाय रोवून केलेल्या स्वातंत्र्य संग्रामावरील त्यांच्या लिखानातून राष्ट्रीय वृत्ती डोकावल्याखेरीज रहात नाही.

डॉ. ताराचंद यांनी 'The Influence of Islam on Indian Culture' आणि 'History of Indian freedom movement' हा चार खंडाचा ग्रंथ लिहला. या ग्रंथातून त्यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीकडे पाहण्याचा राष्ट्रीय दृष्टीकोन स्पष्ट होतो. भारतावरील इस्लाम सत्तेचा प्रभाव स्पष्ट करताना ते असे म्हणतात की, ''भारताची संस्कृती ही केवळ हिंदू संस्कृती नूसन, हिंदू व इस्लामी संस्कृतीच्या समन्वयातून उत्क्रांत झालेली ती एक संपन्न संस्कृती आहे.'' भारताच्या स्वातंत्र्य लढ्यावरील चार खंडात इंग्रजी सत्ता स्थापन होण्यापूर्वीच्या भारतात असलेली आर्थिक परिस्थिती, आत्मनिर्भर ग्रामीण व्यवस्था, उद्योग व व्यापारातील भरभराट या पार्श्वभूमीवर बंगालमध्ये कंपनीची सत्ता स्थापन होताच त्या प्रांतातील रहिवाशांची झालेली दुरावस्था याचे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या पत्रातील उतारे देऊन ते विवेचन करतात. तसेच १९व्या शतकाच्या प्रारंभी होऊ लागलेले राष्ट्रीय प्रबोधन, भारतीय

अस्मितेचे पुनरूज्जीवन, त्यात राष्ट्रीय वृत्तीच्या साहित्यिकांनी व पत्रकारांनी केलेली कामगिरी आणि स्वातंत्र्य संग्रामाला व्यापक प्रवाहातील महत्वाच्या घडामोडी व राष्ट्रीय नेत्यांचे कार्य, जनआंदोलने यांचे ते तपशिलवार वर्णन करतात. डॉ. ताराचंद ब्रिटिशांच्या कुटनीतीवरही प्रकाश टाकतात. मुस्लिम अल्पसंख्यांकांचे बुजगावणे पुढे करून ब्रिटिशांनी आपली सत्ता कायम कशी टिकवली, मुस्लिम जमात वादाची बीजे कशी रोवली व वेळोवेळी त्याला कसे खतपाणी घातले ज्या-ज्या वेळी काँग्रेस व मुस्लिम लींग राष्ट्रीय लढ्यात एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली त्या त्या वेळी ब्रिटिश शासकांनी लीग नेत्यांना अमीषे दाखवून लढ्यात सामील होण्यापासून परावृत्त कसे केले असे अनेक दाखले ते देतात आणि भारताची फाळणी हे ब्रिटिश कूटनीतीचे कटू फळ होते असे साधार प्रस्थापित करतात. अशा प्रकारे ताराचंद यांनी  भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे राष्ट्रवादी दृष्टीकोनातून लिखान केले आहे.

थोडक्यात २० वे शतक भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय दृष्टिकोनाचा विचार करता अतिशय महत्वाचे आहे. या काळात अनेकविध मूल्यांचा स्वीकार करण्यात आला. स्वतंत्र भारताचे दिव्य स्वप्न चळवळीतील नेत्यांनी पाहिले. लोकशाही राज्यव्यवस्था, सर्वांना समान हक्क, सवलती, शोषणमुक्त समाज, सर्वांना जीविताची व चरितार्थाची शाश्वती व राष्ट्र उभारणीमध्ये सर्वांचा सहभाग असे काही मूलभूत सिद्धांत स्वातंत्र्य चळवळीचे आधारस्तंभ होते. ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त झालेल्या भारतात जनतेचे राज्य राहील, व ते शासन सामाजिक, आर्थिक शोषणमुक्त समाज निर्माण करण्याच्या बांधिलकीचे राहील हे स्वातंत्र्य चळवळीचे ध्येय होते हा राष्ट्रवादी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवूनच भारतीयांनी ब्रिटिश साम्राज्यावादाच्या विरोधात लढा दिला आहे.

## १.२.२ मार्क्सवादी विचारप्रणाली (Marxist School)

इ.स. १९५० नंतर भारतामध्ये मार्क्सच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या विचारवंतांनी भारतीय इतिहासाचे लिखान मार्क्सवादी दृष्टीकोनातून करण्यास सुरूवात केली. या तत्ववेत्त्यांनी कार्ल मार्क्सचे तत्वज्ञान जसेच्या तसे स्वीकारले नसले तरी त्याच्या तत्वज्ञानाचा प्रभाव भारतीय इतिहासामध्ये शोधण्याचा निश्चित प्रयत्न केला. भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या मार्क्सवादी विचारप्रणालीनुसार केलेल्या लिखानाची माहीती घेण्याअगोदर आपण मार्क्सच्या तत्वज्ञानाचा आढावा थोडक्यात पुढीलप्रमाणे घेऊ.

### १) कार्ल मार्क्सचे जीवनचरित्र :

मानवी जीवनाच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करून त्यासंबंधी काही मुलभूत सिद्धांत मांडणारे जे तत्ववेत्ते १९व्या शतकात उदयास आले त्यापैकी एक कार्ल मार्क्स होय. ते एक कुशाग्र बुद्धीचे तत्वज्ञ व द्रष्ट शास्त्रज्ञ तर होतोच त्याबरोबरच संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार करणारे व त्यासाठी आवश्यक कृतीचा पुरस्कार करणारे कृतीशील मानवतावादी विचारवंत होतो. कार्लमार्क्सचा जन्म पश्चिम जर्मनीतील ट्रिअर या ठिकाणी ५ मे, १८१८ रोजी एका वकीलाच्या घरात झाला. इ.स.१८३५ ते १८४१ या काळात त्याने बार्लिन आणि बॉन येथे कायद्याचा आणि न्यायशास्त्राचा सुद्धा अभ्यास केला. कोलोन मध्ये निघणाऱ्या एका उदारमतवादी नियतकालिकेचा तो संपादक बनला. तेथेच त्याची एंगल्स या समविचारी व्यक्तीशी मैत्री झाली. फ्रान्स, इंग्लंडमधील मानवतावादी, समाजवादी, प्रागतिक इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ व हेगेल निष्ठांशी त्याचा संपर्क आला. त्यातूनच शास्त्रीय समाजवादी कार्लमार्क्स तयार होऊ लागला. इ.स.१८४८ मध्ये मार्क्स व एंगल्स यांचा 'कम्युनिष्ठ मॅनिफेस्टो'

प्रकाशित झाला. कम्युनिष्ठ मॅनिफेस्टो म्हणजे ‘साम्यवादाचा जाहीरनामा’ होय. हा जाहीरनामा प्रसिद्ध झाला आणि जग बदलण्याची ताकद आपल्यामध्ये आहे असा विश्वास निर्माण करणारी प्रेरणा त्या काळातील अनेक युरोपियन राष्ट्रातील कामगार चळवळींना मिळाली. त्यानंतर पुढे इ.स. १८६७ मध्ये कार्लमार्क्सचा ‘दास कॅपिटल’ हा ग्रंथ प्रकाशित झाला. दास कॅपिटल या ग्रंथात त्याने द्वद्वांत्मक भौतिकवाद, इतिहासाची आर्थिक व्याख्या अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत व वर्ग संघर्ष हे सिद्धांत मांडले. इतिहासाची मीमांसा त्याने आर्थिक दृष्टिकोनातून केली. इतिहास म्हणजे वर्गसंघर्षाची गाथा अशी त्याने इतिहासाची व्याख्या केली आहे. प्रत्येक ऐतिहासिक घटनेच्या मागे आर्थिक कारण असते. आर्थिक कारणावरच समाजाचे स्वरूप व इतर संस्था अवलंबून असतात. आर्थिक उत्पादनाच्या साधनांमध्ये बदल होताच समाजाचे स्वरूप व संस्था बदलतात. थोडक्यात माणूस जे कृत्य करतो त्याच्या मुळाशी आर्थिक स्वार्थाची प्रेरणा असते असे मार्क्स म्हणतो.

## २) मार्क्सचा अतिरिक्त मुल्याचा सिद्धांत

मार्क्सने अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत मांडला. यात त्याने भांडवलदारांकडून मजुरांचे होत असलेल्या शोषणावर प्रकाश टाकला आहे. मजुराला श्रम करावे लागतात व या श्रमातूनच उत्पादनाचे मूल्य ठरते म्हणूनच श्रमाला मूल्य आहे. मजुर श्रम करतात त्या प्रमाणात त्यांची मुल्यशक्ती खर्च होते. त्यासाठी त्याला मजुरी मिळते. परंतु मार्क्सच्या मते, त्याला जी मजुरी मिळते ती त्याच्या श्रमाच्या मानाने कमी दिली जाते. त्यामुळे मजुराला मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा मजूर जे जास्तीचे श्रममुल्य निर्माण करतो त्याला मार्क्स अतिरिक्त मुल्य म्हणतो. मजुर जेवढे जास्त श्रममूल्य निर्माण करील तेवढा मालकाला जास्त फायदा होतो आणि त्याचे भांडवल मूळ रकमेच्या किती तरी पटीने वाढते. यामधूनच भांडवलदारांना नफा मिळतो. मात्र मजुरांची पिळवणूक होते. कारण अतिरिक्त मूल्य वाढविण्यासाठी भांडवलदार अनेक युक्त्या - प्रयुक्त्या करतात. त्यात एकीकडे कामाचे तास वाढविले जातात तर दुसरीकडे मजुरी कमी केली जाते म्हणून मार्क्सने वर्गविरहित समाजाचे तत्वज्ञान मांडले. कामगारांना क्रांतीचा संदेश दिला. जगातील कामगारांनो एक व्हा! ही घोषणा केली. कामगारांनी जर भांडवलदारांच्या विरोधात क्रांती केली तर साम्यवादी समाजरचना निर्माण होईल असे मार्क्स म्हणतो.

## ३) मार्क्सचा अलगीकरणाचा सिद्धांत

भांडवलशाही या संकल्पनेतून मार्क्सला अलगीकरणाची संकल्पना सुचली. अलगीकरण म्हणजे अलिप्तता किंवा दुरावा होय. जगात ज्यावेळी भांडवलशाहीचा विकास झाला त्यावेळी समाजात वर्गनिर्मिती, वर्गसंघर्ष तीव्र होत गेले. त्यामुळेच एक वर्ग दुसऱ्या वर्गापासून दूर जाऊ लागला. अलिप्त होऊ लागला. विशेष म्हणजे हे दोन्ही वर्ग एकमेकांवरच अवलंबून असतात. उदा. समाजामध्ये कोणतेही वर्ग असोत मग सरंजामशाही, गुलामगिरी किंवा भांडवलशाहीमधील भांडवलदार व कामगार असे वर्ग असोत या दोनीही अलग असणाऱ्या वर्गांना एकमेकांची आवश्यकता असते. भांडवलदारांकडे उत्पादनाची साधने त्यावरील मालकी व भांडवल, संपत्ती असते पण ही साधने कार्यान्वीत करण्यासाठी त्याला कामगारांवर अवलंबून रहावे लागते. समाजातील अलगता ही भौतिकतेमुळे वस्तुंवरील मालकीमुळे निर्माण होत असते. असे मार्क्सला या सिद्धांतातून स्पष्ट करावयाचे आहे.

### ४) मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिद्धांत

समाजाच्या विकासासाठी सर्वात प्रभावी शक्ती म्हणजे वर्गसंघर्ष असा मार्क्सचा सिद्धांत आहे. प्राचीन काळी समाजात वर्ग अस्तित्वात नव्हते. मानव समुह करून राहत असल्यामुळे उत्पादनावर सर्वांची समान मालकी होती. आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी निसर्गातील सर्व वस्तुंचे समुहामध्ये समान वाटप केले जात असे. मानवाच्या बौद्धिक प्रगतीतून अनेक प्रकारचे शोध लागले आणि मानव स्वतः वस्तूंचे उत्पादन करू लागला. त्यातून श्रम विभाजनाची गरज निर्माण झाली. वस्तुंच्या वाटपामध्ये अंतर निर्माण झाले. येथूनच खऱ्या अर्थाने वर्गभेदाची सुरूवात झाली. समाजात अनेक वर्ग निर्माण झाले. आधुनिक काळात भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. अतिरिक्त श्रम मूल्याच्या सिद्धांताप्रमाणे भांडवलदार कामगारांची पिळवणूक करतो. त्यासाठी कामगार वर्गाने संघटीत होऊन भांडवलशाही विरोधात व तिला संरक्षण देणाऱ्या सरकार विरोधात क्रांतीसाठी एक व्हावे असे मार्क्स म्हणतो यालाच त्याने वर्ग संघर्ष असे म्हटले आहे.

### ५) मार्क्सचे समाजवादासंबंधी विचार

भौतिकवादी शास्त्रीय विवेचनाच्या आधारे मार्क्सने भविष्याबाबत जो सिद्धांत मांडला त्यास समाजवादाच्या उदयाचा सिद्धांत असे म्हणतात. मजुर वर्ग भांडवलशाही विरूद्ध क्रांती करून उत्पादन पद्धतीचा शेवट करेल व उत्पादनाची साधने व प्रक्रिया आपल्या हाती घेईल त्यावर मजूर वर्गाची हुकूमशाही स्थापन होईल. मात्र ही अवस्था अल्पकालीन असेल ती भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेकडून समाजवादी उत्पादन व्यवस्थेकडे जाण्याची अनिवार्य संक्रमणावस्था आहे अल्पावधीतच ती अवस्था संपून उत्पादन प्रक्रिया समाजाच्या मालकीची होईल. उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया व वितरणाची व्यवस्था समाजाच्या हाती येईल. या व्यवस्थेत समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा पुरविल्या जातील. व्यक्ती ही समाजाची अभिन्न घटक असल्यामुळे ती उत्पादन प्रक्रियेचा अविभाज्य घटक राहील. समाजात उत्पादक व समाजासाठी उत्पादन या प्रक्रियेत खाजगी मालकी व खाजगी नफा या संकल्पना तसेच परस्पर विरोधी हितसंबंधाचे वर्ग उरणार नाहीत. वर्गविहिन समाज अस्तित्वात येईल. मार्क्सच्या या विचारसरणीला एंगल्स शास्त्रीय समाजवाद म्हणतो.

### ६) मार्क्सचे धर्मासंबंधी विचार

धर्म ही अफूची गोळी आहे असा मार्क्सचा आवडता सिद्धांत आहे. समाजाला पिळणारे लोक इतर शोषित वर्गाला धर्माची भीती घालतात, आपला स्वार्थ साधतात. म्हणून धर्म ही अफूची गोळी आहे, असे मार्क्सला वाटते. मार्क्स धर्माला अफूची गोळी असे म्हणून त्याज्य मानतो. याचा अर्थ धर्माच्या मुलतत्वांना तो नाकारतो असा नसून, अनेक शतके धर्माचा उपयोग ज्या अयोग्य प्रकारे केला जात होता, समाजाची स्वतंत्र विचारशक्ती खच्ची केली जात होती, प्रस्थापित व्यवस्था कायम टिकविण्यासाठी धर्मसंस्था धर्माचा गौरवापर करीत होत्या त्याला मार्क्सचा आक्षेप होता.

### ७) मार्क्सच्या सिद्धांतावरील टिका.

मार्क्सने मांडलेल्या विविध प्रकारच्या सिद्धांतावर आधुनिक काळातील विचारवंतांनी पुढील प्रमाणे टिका केलीआहे. मार्क्सने आपला कोणताच सिद्धांत सुत्रबद्ध रितीने मांडण्याचा प्रयत्न केला नाही. वेबरच्या मते, ''मार्क्सचा आर्थिक सिद्धांत अत्यंत संदिग्ध आहे. त्याने अर्थशास्त्राचे कोणतेही निकष न लावताच आपला सिद्धांत मांडला आहे''

मार्क्सने अराज्यवादाचा परिणाम म्हणून समाजवादाचा उदय ही कल्पना मांडली. पण ही कल्पना निव्वळ कल्पनाच राहिली. इसाचा बर्लिनच्या मते, ''मार्क्सला भावी काळात येणाऱ्या फॅसिझम, एकाधिकारशाही, या संकटांची चाहूलही लागली नाही. त्याचे भांडवलशाहीचे निकष १९व्या शतकाच्या काही वर्षापुरतेच सिमीत होते. त्याची खऱ्याखुऱ्या लोकशाहीची व कम्युनिझमची भाकीते खरीही ठरली नाहीत.''

कार्ल पॉपर म्हणतो की, ''मार्क्सने आपले सिद्धांत व वस्तुस्थिती यांची सांगड घालण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. मार्क्सची शास्त्रीय सिद्धांतानुसार केलेली भविष्यवाणी ही संदेह निर्माण करणारी आहे. मार्क्सच्या लिखानामुळे तो समाजाचा शत्रू आहे असा गैरसमज निर्माण झाला.''

प्रो. ॲन्थनी गिडन्स यांच्या मते, ''मार्क्सचे विचार १९व्या शतकाच्या दृष्टीने ठिक होते पण २०व्या शतकाच्या दृष्टीने दोषास्पद आहेत.''

कॉकरने मार्क्सवर अशी टिका केली आहे की, ''मार्क्सचे तत्वज्ञान तर्कशास्त्र व इतिहासाच्या पुराव्यावर आधारीत नाही.''

### ८) नवमार्क्सवाद

मार्क्सच्या विचारांचा आधुनिक दृष्टिकोनातून सध्याच्या परिस्थितीच्या संदर्भातील अभ्यास म्हणजे नवमार्क्सवाद होय. मार्क्सने वर्गसंघर्षाचा सिद्धांत मांडला. इतिहासाचा आर्थिक दृष्टिकोनातून अन्वयार्थ लावला. त्याचाच विचार आधुनिक दृष्टीकोनातून अनेक विचारवंतांनी केला. नवमार्क्सवाद्यांच्यामध्ये अँटिनिओ ग्रामची या इटालियन तत्ववेत्त्याची भूमिका प्रमुख असली तरी या विचार परंपरेमध्ये राईट मिल्स, लुईस कोझर, लुईस हॅरोविटझ या विचारवंतांचा समावेश होतो. मार्क्सच्या विचाराप्रमाणे केवळ वर्गसंघर्षाचा विचार करून चालणार नाही. तर जागतिक, सामाजिक, आर्थिक राजकीय परिस्थिती प्रमाणे ज्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्याबद्दल नवमार्क्सवादी विचार करतात. विकसित देशांमध्ये औद्योगिकरणाच्या परिणामातून निर्माण होणाऱ्या समस्या, सामाजिक संघर्ष, वंशश्रेष्ठत्वाची भावना अशा सारख्या समस्यांचे स्वरूप काय आहे याचा विचार करून त्याच्यावर उपाययोजना काय असाव्यात याचाही विचार नवमार्क्सवादामध्ये येतो. याशिवाय समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करण्याचा आग्रह नवमार्क्सवादी धरतात. स्त्रियांचे प्रश्न, विद्यार्थ्यांचे प्रश्न, युद्धामुळे मानवी जीवनावर होणारे परिणाम, संपूर्ण जगभर वेगवेगळ्या क्षेत्रात निर्माण होणारे प्रश्न या सर्व प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी चळवळ इ.चा विचार नवमार्क्सवादी करतात.

### ९) मार्क्सवादी विचारप्रणालीच्या दृष्टीकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळ

भारतातील राष्ट्रीय चळवळीच्या मार्क्सवादी दृष्टिकोनातून अभ्यासाचा पाया प्रसिद्ध इतिहाससंशोधक रजनी पामदत्त व ए. आर. देसाई यांनी घातला. नंतरच्या काळात अनेक इतिहाससंशोधकांनी त्याचा विकास केला. साम्राज्यवादी विचारप्रणालीच्या उलट मार्क्सवादी इतिहासकार, संशोधक, प्राथमिक विसंगतीची व भारताच्या राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेची दखल घेतात. आणि राष्ट्रवादी विचारप्रवाहाच्या उलट ते भारतीय समाजातील अंतर्विरोधावर बोट ठेवतात. तथापि, काही इतिहासकार उदा. रजनी पामदत्तांसारखे इतिहासकार साम्राज्यवादाचा विरोधातील प्राथमिक विसंगती आणि दुय्यम सामाजिक अंतर्विरोध यांचा मेळ बसवत नाहीत.

साम्राज्यवादाच्या विरोधातील चळवळ वर्गीय किंवा सामाजिक संघर्षाच्या स्वरूपात मांडण्याकडे त्यांचा कल असतो. तो भारतीय राष्ट्रीय चळवळीचा अगदी 'पांढरपेशी चळवळ' असा नसला तरी 'पांढर पेशांची चळवळ' असा विचार करतात. त्यामुळे खुल्या व सर्ववर्ग समावेशक वैशिष्ट्यांकडे त्यांचे लक्ष जात नाही. या इतिहासकारांच्या मते, मध्यम वर्गाने राष्ट्रीय चळवळीत प्रमुख भूमिका पार पाडली. राष्ट्रीय नेतृत्व, मध्यम वर्ग आणि भांडवलदारांचा वर्ग एकच आहे असे मानण्याकडे त्यांचा कल असतो. चळवळीचे प्रकार आणि तिने घेतलेली रणनीतीविषयक माघार किंवा केलेली तडजोड या तत्वांच्या संदर्भात ते चळवळीचे वर्गीय विश्लेषण करतात. काही थोड्या इतिहासकारांचा दृष्टीकोन यापेक्षाही अधिक संकुचित आहे. आर्थिक संपत्ती उभी करण्याच्या ताकदीमुळे राष्ट्रीय राजकारणाला वळण लावण्याची किंवा त्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता निश्चित होत असते. असे इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डस् या ग्रंथात बिपिनचंद्र म्हणतात.

भारतायांची राष्ट्रीय चळवळ ही प्रामुख्याने जनसामान्यांची चळवळ होती. त्यात समाजाच्या खालच्या स्तरातील अनेक गटांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यांच्या प्रचंड प्रमाणावरील सहभागामुळे चळवळीला राष्ट्रीय स्वरूप आले. कोणत्याही चळवळीला वैचारिक नेतृत्व सुशिक्षित मध्यम वर्गातील विचारवंतांकडून मिळते हे ऐतिहासिक सत्य नाकारता येत नाही. त्याप्रमाणेच भारतात घडले हे मात्र तितकेच खरे आहे मात्र या नेतृत्वाने आपल्या गटाचे नव्हे तर सर्वसामान्यांचे प्रश्न उचलून धरले व त्यासाठी संघर्ष केला अशी बिपिनचंद्रांची तात्वीक भूमिका आहे. राष्ट्रवाद तसेच त्याच्याशी निगडीत असलेल्या वसाहतवाद, जमातवाद व राष्ट्रवादाच्या वैचारिक चळवळीच्या गतिमान स्वरूपाचेही ते विश्लेषण करतात. डॉ. बिपिनचंद्र यांच्या प्रसिद्ध लिखानात 'The Rise and Growth of Economic Nationalism',Nationalism and colonialism in Indias' Communism in modern India.' हे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. 'India Struggle for Freedom' या लेखसंग्रहाचे ते संपादक आहेत.

बिपिनचंद्रांनी आपल्या 'Rise and Growth of Economic Nationalism' या ग्रंथात स्वदेशी चळवळीपूर्वीच्या राष्ट्रवादी विचारामागील आर्थिक व वैचारिक प्रेरणांचे विवेचन केले आहे. या काळातील राष्ट्रीय नेत्यांची भूमिका भांडवलवादाला पोषक असल्याचे मत ते व्यक्त करतात. 'Nationalism and colonialism in India' या ग्रंथात ब्रिटिश शासन काळात उदयाला आलेला भारतीय भांडवलदार वर्ग ब्रिटिश सरकारला अनुकूल नव्हता. ब्रिटिशांनी त्यांना प्रोत्साहन न दिल्यामुळे व आर्थिक धोरणात दुय्यम स्थान दिल्यामुळे तो वर्ग असंतुष्ट राहिला त्यामुळे या वर्गाने स्वदेशी चळवळीला पाठिंबा दिला. असे बिपिनचंद्र म्हणतात. 'Communism in India' या ग्रंथात जमातवादाच्या उदयाची व विकासाची ते कारणमीमांसा करतात. जमातवाद वसाहतवादाने जन्माला घातला. समाजातील भिन्न गटातील तणावांना वसाहतवादाने जमातवादाचे विकृत रूप दिले गेले. १९३७ पर्यंत उदारमतवादी असलेल्या जमातवादाने नंतर उग्र रूप धारण करण्यास असुरक्षिततेची भावना व अविवेक कारणीभूत होता आणि वसाहतवादी शासनाचे त्याला भरपूर खतपाणी घातले. तसेच सर्वच मुस्लिम जमातवादी नव्हते असेही ते ठामपणे प्रतिपादन करतात. राष्ट्रवादी लेखकांनी राष्ट्रीय चळवळीतील नेतृत्वावर त्यांच्या कार्यावर भर देऊन लिखान केले. त्यांच्यापेक्षा बिपिनचंद्रांच्या लिखानाचे स्वरूप सर्वस्वी भिन्न आहे. ते राष्ट्रीय चळवळीचे जन आंदोलनाचे रूप आधोरेखित करतात. आणि त्यांच्या वाढत्या सहभागामुळे ही चळवळ अधिकाधिक राष्ट्रव्यापी कशी बनत गेली याचे विवेचन करतात.

## १.३ सारांश

साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतीय इतिहासाची मांडणी पूर्वग्रह दुषित दृष्टिकोनातून केल्यामुळे भारतातील काही मान्यवर इतिहास संशोधकांनी, इतिहासकारांनी राष्ट्रवादी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून वस्तुनिष्ठ पद्धतीने भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन सुरू केले त्यातूनच राष्ट्रवादी विचार प्रणाली उदयास आले. प्रत्येक भारतीय इतिहासकाराने राष्ट्रवादी दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाची मांडणी आपआपल्या दृष्टीने करण्यास सुरूवात केली. राष्ट्रीय दृष्टिकोनातून लिहलेल्या इतिहासाचे मुल्यमापन करीत असताना आपल्याला काही गोष्टी लक्षात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने या भारतीय राष्ट्रीय चळवळीमध्ये असणाऱ्या सर्वच लोकांनाच वसाहतवादी तत्वज्ञानाची झळ पोहचली. याचप्रमाणे या चळवळीची सुरूवात उत्पादनाच्या साधनांची मालकी असणाऱ्यांनी केलेली नव्हती तर नवसुशिक्षित मध्यम वर्गियांनी केली होती हे आपल्या लक्षात येते. या चळवळीत सहभागी असणाऱ्या नवसुशिक्षित तरुण नेत्यांना सरकारी धोरणांचा फारसा फटका बसला नाही म्हणजे एका बाजूला हे नेतेमंडळी वसाहतवादी फळे चाखत होती व वसाहतवादाला विरोध करीत होती. त्यामुळे या नेतृत्वाची माहिती आपल्याला इतिहास, राजकारण, वैचारिक बैठक व बौद्धिक विश्लेषणातून मिळते. म. गांधींनी मध्यम वर्गाने निर्माण केलेली पोकळी शेतकरी कामगार यांच्या सहाय्याने भरून काढली. या चळवळीला विविध वर्गाच्या मागण्यांना तोंड देत साम्राज्यवादाशी झगडावे लागले. ही चळवळ सामाजिक स्वरुपाची नव्हती कारण राज्यकर्ते एत्त देशीय नव्हते किंवा संरजामशाहीही नव्हते परकीय भांडवलशाही राज्यकर्ते होते. त्याचप्रमाणे व्यापक राष्ट्रहितापुढे वर्गा-वर्गामधील समझोता हे या राष्ट्रीय चळवळीचे वैशिष्ट्ये होते. आधुनिक काळात मार्क्सवादी दृष्टीकोनाने संपूर्ण जगात खळबळ माजवून दिली. वर्गसंघर्षाची कल्पना मांडून तळागाळातील समाजापर्यंत पोहचणारा मार्क्स इतिहासविषयक स्वतंत्र दृष्टीकोन मांडतो. याचा प्रभाव भारतातील काही साम्यवादी विचारवंतावर पडला आणि त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पुनर्लेखन मार्क्सवादी दृष्टिकोनातून करण्यास सुरूवात केली. भारतात मार्क्सवादी इतिहासलेखन प्रवाह प्रामुख्याने २०व्या शतकाच्या मध्यंतरी सुरू झाला असला तरी अल्पावधीतच तो एक समृद्ध व प्रगल्भ प्रवाह बनला आहे. अनेक तत्वनिष्ठ परंतु स्वतंत्र बुद्धीच्या विचारवंतांनी या प्रवाहाला व्यापक व समृद्ध बनविले आहे. इतिहास विषयाचा अवाका मांडणी आणि विश्लेषणाचे तंत्र या दृष्टीने परंपरागत इतिहास लेखनाला या प्रवाहाने नवीन दिशा दिली आहे. राजकीय घडामोडीवर तोवर असलेला भर बाजूला सारून या प्रवाहाने आर्थिक व सामाजिक घटकांच्या अध्ययनाचे महत्त्व अधोरेखित केले. घटना अगर व्यक्ती याएवजी दुर्लक्षित समाजगट, भिन्न सामाजिक व आर्थिक व्यवस्थांचा मूलगामी अभ्यास या प्रवाहाला अपेक्षित आहे. या प्रवाहातील इतिहासकारांनी शेती, ग्रामीण व्यवस्था, वर्णव्यवस्था यांचा शास्त्रीय अभ्यास केलेला आढळतो. वैदिक काळ, जैन व बौद्ध धर्म यासारख्या विषयांचा देखील भौतिकवादी दृष्टीकोनातून नवा अन्वयार्थ मार्क्सवादी इतिहासकारांनी लावला आहे. या लिखानाचे स्वरूप निवेदनात्मक अगर वर्णनात्मक नसून विश्लेषणात्मक व चिकित्सक आहे. या लिखानाला बुद्धिवादाचे, तकर्निष्ठेचे अधिष्ठान आहे.

## १.४ विचारप्रणाली प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न :

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) राष्ट्रवादी विचारप्रणाली माहिती लिहा.
२) मार्क्सच्या तत्वज्ञानांची थोडक्यात माहिती लिहा.
३) राष्ट्रवादी दृष्टिकोनातून भारतीय राष्ट्रीय चळवळीचे विवेचन करा.
४) मार्क्सवादी विचार प्रणालीच्या दृष्टिकोनातून भारतीय राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

**टिपा लिहा.**

१. अर्थशास्त्रीय दृष्टिकोन
२. वसाहतवादी दृष्टिकोन
३. मार्क्सचा अतिरिक्त मुल्याचा सिद्धांत

## १.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. बिपिनचंद्र, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डस
२. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान
३. सरदेसाई बी.एन., नलावडे व्ही.एन., आधुनिक भारताचा इतिहास.
४. वैद्य सुमन, कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान
५. पामदत्त रजनी, इंडिया टुडे
६. ग्रोव्हर बी. एल, बेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास
७. प्रभाकर देव, इतिहासलेखन शास्त्र.

❖❖❖❖

# २

# भारतीय राष्ट्रीय चळवळीचे इतिहासलेखन शास्त्र

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषयविवेचन

२.२.१ केंब्रिज विचारप्रणाली (Cambridge School) (साम्राज्यवादी विचारप्रणाली)

१. केंब्रिज संप्रदायाच्या दृष्टीकोनांतील भारतीय राष्ट्रीय चळवळ

२.२.२ सबाल्टर्न विचारप्रणाली (Subaltern School)

१. सबार्ल्टन इतिहासलेखनास प्रारंभ

२. सबार्ल्टन इतिहासलेखकांची तात्वीक बैठक

३. सबार्ल्टन विचारप्रणाली काही प्रमुख इतिहासकार

४. इरफान हबीब यांचा सबार्ल्टन विषयक दृष्टीकोन

२.३ सारांश

२.४ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

२.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासातून आपणास -

- साम्राज्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्ट्ये सांगता येतील.

- केंब्रिज संप्रदायाची विचारप्रणाली स्पष्ट करता येतील.
- केंब्रिज विचारप्रणाली दृष्टिकोनातुन भारतीय राष्ट्रीय चळवळ स्पष्ट करता येईल.
- सबाल्टर्न विचारप्रणाली उदयाची माहिती सांगता येईल.
- सबाल्टर्न इतिहासलेखकांची तात्वीक बैठक सांगता येईल.
- सबाल्टर्न विचारसंप्रदायाच्या दृष्टिकोनातुन भारतीय राष्ट्रीय चळवळ स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

वास्को-दि-गामा या पोर्तुगीज खलाशाने दक्षिण आफ्रीका खंडाच्या टोकाला वळसा घालून भारतात येण्याचा समुद्रमार्ग इ.स. १४९८ साली शोधला. त्यामुळे युरोपातील पोर्तुगीज, डच, स्पॅनिश, फेंच, इंग्रज आदी देशातील लोकांनी मुक्तपणे समुद्रसंचार सुरू केला. यातूनच त्यांची पौर्वात्य देशाबद्दलची जिज्ञासा मोठ्या प्रमाणात वाढली. या लोकांचा भारताप्रमाणेच पूर्वेकडील देशांशी व्यापार संबंध प्रस्थापित होऊन व्यापार गतिमान झाला. या व्यापाराचे रूपांतर व्यापारवादामध्ये झाले. व्यापारवादाचे रूपांतर पूढे वसाहतवादामध्ये झाले. या परकीय लोकांनी आफ्रिका आणि आशिया खंडात आपल्या वसाहतींचे जाळे विणले. ज्या लोंकावर आपण वर्चस्व गाजवित आहोत त्या स्थानिक लोकांचा इतिहास समजून घेण्याची आवश्यकता या साम्राज्यवादी सत्ताधीशांना वाटू लागली. साम्राज्यवादी इतिहास लिहित असताना त्यांनी स्थानिक लोकांच्यातील कमकुवत प्रवृत्ती शोधण्याचा प्रयत्न केला. साम्राज्यवादी दृष्टिकोनातून इतिहास लेखनाची परंपरा १८व्या शतकात मोठ्या प्रमाणात उदयास आली. यामध्ये प्रामुख्याने फ्रेंचांनी इंडो-चायनाचा, डचांनी इंडोनेशियाचा पोर्तुगीजांनी गोव्याचा, तर इंग्रजांनी भारत देशाचा इतिहास लिहिला. इंग्रजांनी भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची जी परंपरा सुरू केली तिला केंब्रिज विचारप्रणाली असे म्हटले जाते. थोडक्यात केंब्रिज विचारप्रणाली ही एक इंग्लंडमधील इतिहासविषयक विचारधारा होय. मूळच्या साम्राज्यवादी विचारप्रणाली एक भाग, किंबहूना साम्राज्यवादी विचारसरणी सुधारून वाढविलेली आवृत्ति असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

युरोपमध्ये आधुनिक युगाच्या प्रारंभापासून म्हणजेच १६व्या शतकात प्रबोधनाची सुरूवात झाली. या काळात माणूस हा विचारांचा केंद्रबिंदू मानला. या काळात समतेचा विचार प्रामुख्याने होऊ लागला. माणसाचे अस्तित्व आणि अस्मिता यांना महत्त्व येत गेले. यापूर्वी राजा, राणी, राजपूत्र, दरबार, सरदार व इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांच्याच कतृत्वाचे पराक्रमाचे वर्णन इतिहासात केले जात असे. परंतु आधुनिक काळामध्ये इतिहास हे सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता पावले. नुसती घटनांची मांडणी म्हणजे इतिहास ही कल्पना मागे पडून लोक इतिहासाचा विचार पुढे आला. इतिहासविषयक नवीन दृष्टीकोन निर्माण झाला यालाच वंचितांचा इतिहास असेही म्हटले जाऊ लागले. हा विचार २०व्या शतकाच्या सुरूवातीला अन्तानिओ ग्रामची या इटालियन तत्ववेत्त्याने प्रथम मांडला. त्यास त्याने सबाल्टर्न असे म्हटले. सबाल्टर्न या संज्ञेने प्रसिद्धीस आलेला इतिहासलेखन प्रवाह भारतात २०व्या शतकाच्या अखेरच्या २० वर्षात प्रचलित झाला या प्रवाहाने परंपरागत लिखानाला छेद देऊन या क्षेत्रात नवीन आव्हाने उभी केली. इतिहासलेखनासाठी नवीन क्षितीजे खुली केली व भारतीय इतिहासलेखनाला नवी दिशा व नवा आयाम देऊन नव्या पर्वाला प्रारंभ केला.

## २.२ विषयक - विवेचन

### २.२.१ केंब्रिज विचारसंप्रदाय (साम्राज्यवादी विचारसंप्रदाय)

केंब्रिज विचारप्रणालिचा उदय साम्राज्यवादी विचारप्रणालिच्या विचारधारेतून झाला आहे. केंब्रिज विचारसंप्रदायातील विचारवंतांवर साम्राज्यवादी तत्ववेत्त्यांचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. म्हणजे आपणास असे म्हणता येईल की, केंब्रिज संप्रदाय ही साम्राज्यवादाची आवृत्ती होय. केंब्रिज विचारप्रणाली दृष्टिकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळीचा अभ्यास करण्यापूर्वी साम्राज्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्टे पहाणे गरजेचे आहे.

**साम्राज्यवादी इतिहास लेखनाची उद्दिष्टे**

साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारत देशाचा इतिहास लिहित असताना पुढील उद्देश आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते.

१. भारतीय संस्कृती अप्रगत; हिन दर्जाची आहे हे दाखविणे.
२. ब्रिटिश शासन प्रगत आहे हे दाखविणे.
३. भारतीय लोकांच्यात न्युनगंडाची भावना निर्माण करणे.
४. भारतीय लोक स्वयंशासनाला लायकच नाहीत असे दर्शविणे.
५. ब्रिटिश राजवट भारतात कायम स्वरूपी राहिली पाहिजे हा उद्देश होता.

जेते लोक स्थानिक लोकांना आपल्यापेक्षा कमी दर्जाचे मानतात या लोकांमध्ये सुधारणा करण्यासाठी आपण येथे आलो आहोत अशी भूमिका जेते लोक घेतात. भारताच्या बाबतीत ब्रिटिशांची मनोधारणा अशीच होती म्हणूनच त्यांनी काळा - गोरा असा भेद निर्माण केला. ब्रिटिशांचे राज्य हे भारताला मिळालेले वरदान आहे. रूडयार्ड किपलिंग सारख्या लेखकाने "White Man's Burden" ही संकल्पना आपल्या साहित्यामधून मांडली. भारतीय लोक ब्रिटिशांपेक्षा दर्जाने कमी आहेत हे दाखविण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यामध्ये हॉटेलवर "Indian and Doges are not allowed" अशा पाट्या लावीत असत. जेम्स मिलसारख्या ब्रिटिश लेखकाने आपल्या इतिहासलेखातून हिंदू-देव-देवता, हिंदू-परंपरा यांची येथेच्छ निंदा केली. मॅक्समूल्लर या विचारवंताने सुद्धा साम्राज्यवादाला शास्त्रीय आधार देण्यासाठी आर्यवंशाचा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, ''ब्रिटिश हे आर्यवंशाचे प्रगत लोक आहेत, प्राचीन काळी भारतामध्ये आर्य लोकांच्या काही टोळ्या आल्या असल्या तरी त्यांच्या विकासाला अनुकूल व पोषक वातावरण तेथे मिळाले नाही. त्यामुळे ते लोक रानटी व अप्रगत राहिले. तो समाज गतिहीन बनला. म्हणून ब्रिटिश लोक सर्वश्रेष्ठ अशा आर्यवंशाचे व प्रगत असल्याने भारतीयांवर राज्य करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे.'' भारतावर राज्य करणे हा ब्रिटिशांचा अधिकार आहे त्यामध्ये काहीही गैर नाही हे दाखविण्यासाठी साम्राज्यवादी लेखकांनी डार्विनने मांडलेल्या मानवी उत्क्रांतीच्या नैसर्गिक सिद्धांताचा वापर केला. म्हणजे बळी तो कानपिळी या म्हणीचा प्रत्यय आपणास या ठिकाणी दिसून येतो. वरील सर्व सिद्धांताचा वापर साम्राज्यवादी इतिहासकारांनी ब्रिटिश राजवटीचा पाया भारतात स्थिर करण्यासाठी केला.

साम्राज्यवादी लेखनाचे प्रामुख्याने दोन-कालखंड पडतात. पहिला कालखंड म्हणजे १८५७ पर्यंतचा व दुसरा म्हणजे १८७० ते १९४० पर्यंतचा होय. १८५७ पर्यतंच्या कालखंडात प्रामुख्याने जेम्स मिल, हेन्री इलियट, एलफिन्स्टन, ग्रँट डफ, जेम्स टॉड सारख्या इतिहासकारांचा समावेश होतो. जेम्स मिलने इ.स.१८१८ मध्ये “History of British India” नावाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ ब्रिटिश साम्राज्यवादाचे बायबल म्हणून ओळखला जातो. जेम्स मिलने या ग्रंथात भारतीय लोकांचे मागासलेपण शोरण्यावर विशेष भर दिला आहे. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन या मुंबई प्रांताच्या गव्हर्नरने इ.स. १८३९ साली ‘History of India’ हा ग्रंथ प्रकाशित केला. त्याने या ग्रंथात भारतीय इतिहासाची विभागणी हिंदू, मुस्लिम आणि ब्रिटिश कालखंडात केली. इतिहासाचा धार्मिक अंगाने अभ्यास करताना भारतामधील हिंदू हे सतत पराभवाच्या छायेतच राहिले. ही साम्राज्यवादी इतिहासकारांची भूमिका राहिली. मुस्लिम राजवटीनंतर इंग्रज राजवट आली. ही राजवट हिंदूच्या कल्याणासाठी निर्माण झालेली आहे असा दृष्टीकोन ठेवूनच या ग्रंथाची मांडणी झाली. हेन्री इलियट व त्याचा सहकारी डाऊसन यांनी भारतातील मुस्लिम शासन काळातील इतिहासाची हस्तलिखिते एकत्र केली आणि ती “History of India as Told by its own Historians.” या मथळ्याखाली आठ खंडात ते साहित्य प्रकाशित केले. ग्रॅट डफने सर्वात प्रथम मराठ्यांचा इतिहास लिहण्याचा प्रयत्न केला तर जेन्स टॉडने राजपुतान्याचा इतिहास आधोरेखित केला. १८५७ पर्यंतच्या साम्राज्यवादी इतिहास लेखकांनी भारत अप्रगत व इंग्लंड प्रगत असा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवूनच इतिहास लिहिला एवढेच नव्हे तर अधः पतित भारतीय समाजाला सुधारण्यासाठी ब्रिटिश अपघाताने भारतात आले. अशी भूमिका या काळातील इतिहासकारांनी घेतली.

१८७० ते १९४० हा कट्टर साम्राज्यवाद टप्पा मानला जातो. या कालखंडामध्ये विल्यम हंटर, हेन्री मेन, जेम्स स्टिफन्स, जॉन स्ट्रॅची जी.बी.मॅलेसन, अल्फ्रेड जायल, जे.टी.व्हीलर आदींचा समावेश होतो. विल्यम हंटर याने “History of Birtish India” या ग्रंथामध्ये इंग्लंडला भारताचा ताबा अपघाताने मिळालेला नसून त्यामागे इंग्लंडचा अनेक वर्षाचा प्रगतीचा इतिहास होता. असे मत त्याने “Rules of India” या ग्रंथात अठ्ठावीस ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास नमूद केला आहे. “The Annals of Rural Bengal” या ग्रंथात ब्रिटिशांच्या आगमना पूर्वीची बंगालमधील दुरावस्था वर्णन केली आहे तर “The Indian Mussalman” या ग्रंथात फोडा आणि झोडा या तत्त्वाचा त्याने पुरस्कार केला आहे. हेन्री मेन याने “Ancient Law” या ग्रंथातून ब्रिटिशांच्या एकतंत्री शासनाचे समर्थन केले आहे. यावरून त्याची साम्राज्यवादी धारणा स्पष्ट होते. जेम्स स्टिफन्स याने आपल्या “Liberty, Eauality and Fraternity” या ग्रंथात भारतावरील ब्रिटिश शासनाचे नैतिकदृष्ट्या समर्थन केले आहे. जे. टि. व्हीलर यांनी ‘History of India form Earliest Times’ या ग्रंथात आर्यांच्या आगमनापासून भारतीयांनी ब्रिटिशांविरूद्ध केलेल्या १८५७ च्या उठावापर्यंतचा इतिहास नमूद करून त्याने भारतीयांचे दोष दाखवून भारतात प्रातिनिधिक शासन लागू करण्याची गरज नाही असे स्पष्टपणे नमूद केले आहे. अल्फ्रेड लायल याने सुद्धा आपल्या “The Rise and Expansion of the British Dominion in India” या ग्रंथात ब्रिटिश सत्तेचे समर्थन केले आहे.

### १) केंब्रिज प्रणालीच्या दृष्टिकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळ

१९६८ नंतर केंब्रिज विचार संप्रदायाचा फार मोठ्या प्रमाणात विकास झाला. गेल्या १५ वर्षामध्ये तर केंब्रिज प्रणाली आधुनिक भारतासंबंधी विचार मांडण्याचा प्रयत्न केला. याविचार धारेमध्ये प्रो. पिटर जे. मार्शल, प्रो. ख्रिस्तोफर बेली, त्यांची पत्नी प्रो. सुझन बेली, प्रो. केनिय जोन्स, प्रो. जॉन एफ रिचर्डस, प्रो. पिअर्सन, प्रो. बर्टनस्टेन, प्रो. फ्रॅंक पर्लिन, प्रो. स्टेवार्ट गार्डन, प्रो. बी. आर. टॉमलिनसन, प्रो. डेव्हीज ल्युडेन, प्रो. पॉल ब्रास, प्रो. रिचर्ड इटने, प्रो. डेव्हीड लो, अनिल सील, जे. ए. गॉलघर, व त्यांचे विद्यार्थी आदी विचारवंतांचा समावेश होतो.

केंब्रिज विचार प्रणाली म्हणून प्रसिद्ध असलेले साम्राज्यवादी विचारधारेचे इतिहासकार, संशोधक, तत्त्वज्ञ भारतामधील आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक व्यवस्था म्हणून वसाहतवादाचे अस्तित्व नाकारतात. त्यांच्या मते, वसाहतवाद ही फक्त परकीय सत्ता होती. भारताच्या राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी वसाहतवाद झुगारून देण्याची गरज होती. याकडे मात्र हे विचारवंत हेतुपूर्वक दूर्लक्ष करतात. थोडक्यात भारतीय राष्ट्रीय चळवळ ही ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या अन्याय, आत्याचारामुळे सुरू झाली होती हे ते नाकारतात. ज्याप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी दोन पोकळ पुतळे आपआपसात हेतुशुन्य व खोटेखोटे युद्ध करतात त्याप्रमाणेच ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरोधातील भारतीयांचा लढा हे एक लुटूपुटीचे युद्ध होते. असे केंब्रिज प्रणालीच्या विद्वानांचे मत आहे. भारत एक राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेत होते ही गोष्ट सुद्धा या विचारसरणीचे विद्वान नाकारतात. जो देश भारत या नावांने ओळखला जातो तो प्रामुख्याने विविध धर्म, जाती, जमाती व हितसंबंधांचे कडबोळे होते असे त्यांना वाटते. भारत या देशाच्या किंवा तेथील लोकांच्या अथवा तेथील सामाजिक वर्गाच्या संकल्पनांभोवती भारतीय राजकारणाची उभारणी झाली आहे. हे या विचारसरणीचे विद्वान विसरून जातात. याउलट भारतात हिंदू मुस्लिम, ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर, आर्य, भद्र लोक (अभिजन) असे विविध गट अस्तित्वात असल्याचा ते दावा करतात. हेच गट राजकिय संघटनेचे खरे आधार आहेत म्हणून जात व धर्म यावर आधारलेले राजकारण प्राथमिक स्वरूपाचे आहे आणि त्यावर आधारलेला राष्ट्रवाद बाह्य देखावा आहे. अनिल सील असे म्हणतात की, ''दुरून त्यांचा जो राजकीय लढा भासतो तो बारकाईने पाहिल्यास आपल्या सामाजिक गटाचे स्थान टिकविण्यासाठी किंवा ते सुधारण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आहेत, राजकीय लढा नव्हे, हे लक्षात येते.''

भारतीय राष्ट्रीय चळवळ ही भारतीय जनतेची चळवळ नव्हती असे साम्राज्यवादी विचारसरणीच्या विद्वानांना वाटते. त्यांच्या मते, ही चळवळ अभिजन वर्गाच्या गरजा व हितसंबंधांचे फलित होते. या गटांनी चळवळीचा वापर आपल्या स्वतःच्या संकूचित हितसंबंधांचे किंवा पारंपारिक रूढ गटांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी केला. अशा प्रकारे अभिजन वर्ग, त्यांच्या गरजा व हितसंबंध, राष्ट्रवादाची कल्पना व चळवळ निर्माण झाली व त्याच तिच्या प्रेरकशक्ती होत्या. राष्ट्रवाद ही एक विचारसरणी आहे या विचारसरणीचा उपयोग अभिजन गटांच्या संकूचित महत्त्वाकांक्षांना वैधानिक स्वरूप देण्यासाठी आणि जनतेचा पाठींबा मिळविण्यासाठी केला. राष्ट्रीय चळवळ ही अभिजन वर्गाच्या हातातील अस्त्र होते. त्याचा वापर त्यांनी सर्वसामान्य जनतेस सुसंघटित करण्यासाठी आणि आपल्याहितसंबंधांचे समाधान करण्यासाठीच केला असे त्यांचे मत आहे. थोडक्यात भारतीय राष्ट्रीय चळवळ म्हणजे फक्त अभिजन वर्गाने आपले स्थान टिकविण्यासाठी चालवलेली धडपड असे केंब्रिज

संप्रदायातील विचारवंतांना वाटते. अनिल सील, गॉलघर आणि त्यांचे विद्यार्थी यांनी हा दृष्टिकोन पुढे विशद केला. डफरीन, कर्झन, चिरोल, या विचारवंतांनी दयाळू ब्रिटिश राजवटीशी संघर्ष करण्यासाठी वैफल्यग्रस्त सुशिक्षित मध्यमवर्गियांनी राष्ट्रवादाचा उपयोग केला. असा युक्तीवाद केला तर ब्रिटिशांच्या कृपेसाठी एका अभिजन गटाने केलेल्या संघर्षाचे प्रतिनिधीत्व राष्ट्रीय चळवळ करते असे मत अनिल सील यांनी व्यक्त केले आहे.

गॉलधर, अनिल सील व त्यांचे विद्यार्थी ज्या अधिष्ठानावर अभिजन गट तयार झाले त्या अधिष्ठानाचाही विचार करतात. हे अभिजन गट आश्रीत - आश्रयदाता संबंधांच्या आधारावर निर्माण झाले. असे अनिल सील म्हणतात. ते पुढे असे म्हणतात की, ज्यावेळी इंग्रजांनी भारतातील स्थानिक लोक व प्रांताकडे प्रशासकीय, आर्थिक व राजकीय सत्ता सुपूर्त केली. त्यावेळी स्थानिक सत्ताधीश राजकारण संघटित करू लागले. त्यांनी त्यासाठी असे आश्रीत - आश्रयदाते मिळविले की, ज्यांच्या हितसंबंधांची राखण ते करतील आणि त्याच्या मोबदल्यात त्यांनी स्थानिक सत्ताधीशांच्या हितसंबंधांचे रक्षण करावे या संबंधातून भारतीय राजकारण अकारास आले. त्यानंतर हळूहळू मोठे नेते पुढे आले. त्यांनी स्थानिक सत्ताधीशांचे राजकारण एकत्र आणण्यासाठी दलालाची भूमिका पार पाडली. पुढे ज्यावेळी संपूर्ण भारतावर ब्रिटिशांची राजवट निर्माण झाली. तेव्हा संपूर्ण भारतात दलाल तयार झाले. आपले कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी या दलालांना कनिष्ठ प्रांतिक दलालांची गरज भासू लागली. आपल्या आश्रीतांना राष्ट्रीय चळवळीत गुंतवून ठेवण्याची आवश्यकताही त्यांना वाटू लागली. अनिल सील यांच्या मते, गांधी, नेहरू व पटेल हे ब्रिटिश साम्राज्यवादाचे प्रमुख राजकीय दलाल होते. या इतिहासकारांच्या मते, ज्या लोकांचे भवितव्य अशा सत्तेच्या दलालीने प्रभावित झाले असे लोक १९१८ नंतरच पुढे आले. थोडक्यात भारतीय राष्ट्रीय चळवळ ही भारतीयांनी साम्राज्यवाद झुगारून स्वतंत्र राज्याच्या स्थापनेसाठी केलेली राष्ट्रीय चळवळ होती असे मानण्यास किंवा या चळवळीची वैधता स्वीकारण्यास केंब्रिज विचारसंप्रदायाचे विचारवंत तयार नाहीत. एवढेच नव्हे तर अनिल सील सारखे इतिहासकार भारतीय इतिहासकारांशी या विषयावर बोलण्यासाठी तयार सुद्धा नसतात.

केंब्रिज विचारप्रणालि राष्ट्रीय चळवळीमधून चारित्र्य, प्रामाणिकपणा, सचोटी, चांगुलपणा आणि निःस्वार्थी बांधिलकी आदी सर्वच गोष्टी वजा केल्या आहेत. त्याचप्रमाणे ही विचारधारा आम कामगार, शेतकरी, कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि स्त्रीया यांची राष्ट्रीय चळवळीतील साम्राज्यवाद विरोधी सुबुद्ध व सक्रीय भूमिका नाकारते. केंब्रिज विचारसरणीमध्ये अनेक संशोधकांची एक फळी निर्माण झाली आहे. त्यांनी नवनवीन संदर्भसाधने गोळा केली फक्त त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारला असता तर अधिक चांगले झाले असते. या विचारवंतांची विचारसरणी पूर्णपणे निर्दोष नाही फक्त त्याची शहानिशा करणे गरजेचे आहे. विनाकारण अंध विरोध नको हे त्यांच्या लक्षात आले पाहिजे.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -१**

१. केंब्रिज विचारप्रणालीचा थोडक्यात आढावा घ्या?

___

___

___

___

___

### २.२.२ सबाल्टर्न विचार संप्रदाय (Subaltern School)

अँटिनिओ ग्रामची या इटालियन तत्ववेत्त्याने सबाल्टर्न हा शब्दप्रयोग सर्वप्रथम वापरला. डिक्शनरी मध्ये सबाल्टर्न या शब्दाचा अर्थ कनिष्ठ दर्जाचे, कमी दर्जाचे, दुय्यम दर्जाचे असा दिला आहे. पहिल्या जागतिक महायुद्धात ग्रामचीने इटलीतील कामगारांच्या संघर्षाचे आयोजन व नेतृत्व केले होते. इटलीतील मुसोलिनीच्या उदयानंतर उदयास आलेल्या हुकुमशाही शासनाव्यवस्थेवर त्याने अनेक अभ्यासपूर्वक लेख लिहिले. एवढेच नव्हे तर त्याने मुसोलिनीची हुकूमशाही राजवट उलथुन टाकण्यासाठी लढ्याचे आयोजन करणे अत्यावश्यक आहे असे त्याने म्हटल्यामुळे त्यास १९२६ साली कारावासाची शिक्षा झाली. शिक्षेच्या काळात ग्रामचीने अनेक महत्त्वपूर्ण नोंदी करून ठेवल्या. पुढे ग्रामचीच्या मृत्युनंतर काही वर्षांनी म्हणजे १९५० नंतर त्याचे लिखान “Selections from political writings” आणि “Selections from prison Notebooks” या शिर्षकाखाली प्रकाशित झाले. यामध्ये त्याने वंचितांच्या इतिहासासंबंधी आपली सबाल्टर्न इतिहासाची संकल्पना मांडली आहे. थोडक्यात सबाल्टर्न म्हणजे वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित समाज गट होय.

ग्रामचीने सबाल्टर्न हा शब्दप्रयोग इटालियन सैन्यातील निम्न स्तरावरील कॅप्टनच्या पदाखाली असणाऱ्या दुय्यम अधिकाऱ्या संदर्भात वापरला आहे. या शब्दाचा ग्रामचीला अभिप्रेत असलेला अर्थ असा की, लष्करी मोहिमांमध्ये प्रत्यक्ष लढण्याचे काम हा दुय्यम अधिकारी करतो. त्याच्या सक्रीय सहभाग खेरीज कोणतीही मोहिम अंमलात येऊ शकत नाही. परंतु लष्करी मोहिमांच्या यशाचे श्रेय मात्र नेहमी लष्करी नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दिले जाते. त्याचप्रमाणे कोणत्याही सामुहिक कार्यात, चळवळीत, उठावात भिन्न समाज गटांचा सहभाग महत्त्वाचा असतो. परंतु या मोलाच्या सहभागाच्या क्षेत्रापासून ते वंचित ठेवले जातात. त्यांच्या कार्याचा साधा उल्लेखही केला जात नाही.

“The German Ideology’ या ग्रंथात The ruling Ideas of every epoch are the ideas of the ruling class, the class which is the ruling material force of society is at the same time its ruling intellectual is the ruling material force of society is at the same time its ruling intellectual force.” असे विधान कार्ल मार्क्स या साम्यवादी तत्ववेत्त्याने केले आहे. या विधानाचा अर्थ असा की, प्रत्येक युगात वर्चस्व गाजविणारे विचार हे प्रामुख्याने सत्ताधारी वर्गाचे विचार असतात. जो वर्ग समाजावर भौतिकदृष्ट्या वर्चस्व गाजवितो तोच वर्ग त्या समाजावर बौद्धिक दृष्ट्याही अधिराज्य गाजवितो. मार्क्सच्या या सिद्धांताचे स्पष्टीकरण करीत असताना ग्रामचीने आपला सुप्रसिद्ध हेजिमनीचा सिद्धांत मांडला. त्यातूनच त्याचा नवमार्क्सवाद दृष्टीस पडतो. अभिजन वर्गाचे वैचारिक प्रतिनिधी, संकल्पनांचे, सामाजिक संबंधांचे एक जाळे तयार करतात यालाच ग्रामची अधिसत्ता, धुरिणत्व अथवा बौद्धिक प्रभुत्व मानतो. सत्ताधीश वर्ग समाजावर दोन मार्गानी वर्चस्व प्रस्थापित करीत असतात. ते मार्ग म्हणजे राजकीय व सांस्कृतिक मार्ग होय. राजकीय मार्गामध्ये प्रामुख्याने आर्थिक व दंडशक्ती मार्फत दमण केले जाते. सांस्कृतिक मार्गामध्ये बौद्धिक, नैतिक संस्थांमार्फत आपले प्रभूत्व सांस्कृतिक जगतात निर्माण करतात. या मार्गाला शहरी समाजाची मान्यता असते. बुद्धीवंतांमध्ये पारंपारिक व सेंद्रीय बुद्धिवंत असे भेद असतात. या दोन वर्गामधील सेंद्रीय

बुद्धीवंतांच्या क्रांतिकारक भूमिकेतून जोर दिला जातो. त्यांच्या मते, वर्ग संघर्ष हा बुद्धिवंतांच्या गटामधील संघर्ष आहे.

### १) सबाल्टर्न इतिहासलेखनास प्रारंभ

दक्षिण आशियाई राष्ट्रामध्ये दुसऱ्या जागतिक महायुद्धापूर्वी अनेक वर्षे वसाहतवादी, साम्राज्यवादी युरोपियन राष्ट्रांचे वर्चस्व होते. या कालखंडात त्या राष्ट्रातील स्थानिक लोकांनी अनेक वेळा परकीय राज्यकर्त्यांविरूद्ध उठाव केले. या उठावात सर्वसामान्य लोकांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. परंतु इतिहास ग्रंथामध्ये त्यांच्या सहभागाचा अथवा कामगिरीचा उल्लेख केला गेला नाही. या उठावांमध्ये ज्या समाजातील, तळागाळातील लोकांनी कार्य केले. त्यांच्या कार्याची माहिती करून घेतल्या खेरीज त्या काळातील इतिहासाचे सर्वांग आकलन अथवा दर्शन होणार नाही. याची जाणीव डॉ. रणजित गुहा यांच्या सारख्या इतिहास संशोधकांना झाली. म्हणूनच त्यांनी “Centre of south Asian Culture studies” या संस्थेची उभारणी केली. डॉ. गुहा यांनी इतिहासाच्या या नविन दृष्टीकोनाबाबत भारतीय इतिहास संशोधकांशी चर्चा केली. इंग्रजांच्या भारतावरील साम्राज्यवादी राजवटीत झालेल्या उठावांचे अथवा चळवळीचे नवीन दृष्टीकोनातून अध्ययन करण्याची गरज प्रतीत झालेले काही इतिहासकार एकत्र आले त्यांनी सामुहिकरित्या जाणीवपूर्वक इतिहास क्षेत्रात नव्या प्रयोगाचे पर्व सुरु केले. १९८२ साली ‘सबल्टर्न स्टडीज’ या शिर्षकाचा डॉ. गुहांनी संपादित केलेला एक लेखसंग्रह प्रकाशित केला. डॉ. रणजित गूहा यांच्या लिखाणामागे ग्रामची या मार्क्सवादी तत्ववेत्त्याची प्रेरणा दिसून येते.

### २) सबाल्टर्न इतिहासलेखकांची तात्त्वीक बैठक

सबाल्टर्न विचारप्रणाली प्रभावित झालेल्या इतिहास संशोधकांनी इतिहासाचे पुनर्लेखन सुरू केले. यामध्ये प्रामुख्याने डॉ. रणजित गुहा, डॉ. शहीद अमीन, डॉ. सूर्यात सरकार, पार्थ चटर्जी, ग्यानेंद्र पांडे, ग्यान प्रकाश, रामचंद्र गुहा, दिपेश चक्रवर्ती, गायत्री चक्रवर्ती, स्पिवाक, बर्नार्ड कोहन, डेव्हीड हार्डीमन, डेव्हीड अर्नाल्ड आदींचा समावेश होतो. सबाल्टर्न इतिहास लेखनामागील वैचारिक बैठक डॉ. रणजित गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या पहिल्या अंकाच्या आठ पानी प्रस्तावनेत विशद केली आहे. सबाल्टर्न विचार प्रणाली इतिहास लेखकांनी आजवरच्या इतिहास लेखनासंबंधी आक्षेप घेतले आहेत. त्यांच्या मते, ‘‘आधुनिक भारताचा इतिहास अभिजन वर्गाने अभिजन वर्गासाठी लिहिला आहे. भारतीय राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व अभिजन वर्गातून पुढे आले आहे. त्यामुळे या वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इतिहासकारांनी त्यांचेच कार्य लिहण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वसामान्य लोकांचा या चळवळीमध्ये सहभाग महत्त्वपूर्ण असला तरी त्यांना इतिहासापासून जाणीवपूर्वक त्यांनी दूर ठेवले. काही इतिहासकारांनी शेतकरी, कामगार, स्त्रिया यांचा चळवळीत सहभाग होता असे म्हटले असले तरी त्यांना स्वतःची विचारशक्ती अथवा अतःप्रेरणा नव्हती असे म्हटले आहे हे खरे नाही. एवढेच नव्हें तर काही भारतीय इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या उभारणीचे क्षेत्र पाश्चात्य विचारांना दिले आहे.’’ थोडक्यात आतापर्यंत लिहिला गेलेला इतिहास एकांगी, पक्षपाती व वास्तवाला सोडून लिहिला आहे. समाजातील खालच्या वर्गातील लोकांना त्यांच्या इतिहासातील वाजवी स्थानापासून दूर्लक्षित ठेवले आहे ही उणीव भरून काढणे हे सबाल्टर्न विचारप्रणालीचे उद्दिष्ट्ये आहे.

अभिजन म्हणजे वर्चस्व गाजविणारा गट होय. या गटाने वंचितांच्या इतिहासातील स्थानाकडे लक्ष दिले नाही. तसे पाहिले तर मोठ्यामोठ्या चळवळींमध्ये अथवा उठावांमध्ये याच लोकांचे योगदान महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांना डोळ्यासमोर ठेवूनच इतिहास लिहिला जावा. वंचित गटांचा इतिहास त्यांच्या कार्यकतृत्वाचा इतिहास नव्हे तर कृतीमधील त्यांची मानसिकता, अंतः प्रेरणा, जीवनपद्धती, रूढ संस्था यांचा विचार करणे आवश्यक आहे. अभिजन वर्ग अशा वर्गावर वर्चस्व गाजवितो. हे इतिहासाने ठामपणे स्पष्ट केले पाहिजे. अभिजन वर्ग आपल्या कार्यपूर्तीसाठी या लोकांचा वापर करतो. कार्य पूर्ण झाल्यावर त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. एवढेच नव्हे तर अभिजन वर्ग त्यांना नैसर्गिक अधिकारांपासून वंचित ठेवतो असे सबाल्टर्न विचारप्रणालीविचारवंतांना वाटते.

### ३) सबाल्टर्न विचारप्रणाली काही प्रमुख इतिहासकार

भारतीय इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील सबाल्टर्न लेखन प्रवाहाचे प्रणेते म्हणून डॉ. रणजित गुहा यांचे नाव सुप्रसिद्ध आहे. त्यांनी 'A Rule of Property for Bengal' या ग्रंथामध्ये बंगालमधीला शेतीवर कायमधारा पद्धतीमुळे झालेले परिणाम विशद केले आहेत. त्याचप्रमाणे कायमधारा पद्धत इंग्रजांनी अंमलात का आणली? याचेही विश्लेषण त्यांनी या ग्रंथात केले आहे. "Elementary Aspects of Peasant Insurgency" या ग्रंथामध्ये गुहांनी सबाल्टर्न दृष्टीकोन विशद केला आहे. "History at the limit of world History" या ग्रंथात त्यांनी आज पर्यंत लिहिल्या गेलेल्या इतिहासातील दोष दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'Dominance without Hegemony' या लेखसंग्रहात त्यांनी वसाहतवादी राष्ट्रातील राज्यशासन आणि वसाहतीतील त्यांचे शासन यातील भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तर 'An Indian Historiography of India' या भाषणसंग्रहात इंग्रज सत्ताधीश भारतीय इतिहासात अध्ययनाकडे का वळले याचे विश्लेषण त्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतात आपले शासन स्थिर करण्यासाठी दमण मार्ग व समंती मिळविण्याचे कोणते मार्ग पत्करले याचे ते विश्लेषण करतात. याच संदर्भात १८५७ च्या राष्ट्रीय उठावात इंग्रजी भाषा आत्मसात केलेल्या भारतीय लोकांचा वर्ग उदासिन व निष्क्रिय राहीला याचेही स्पष्टीकरण ते देतात.

डॉ. शहीद अमीन या सबाल्टर्न संप्रदायाच्या विचारवंताने १९२० ते १९२२ या काळात असहकार चळवळीत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या मनावरील महात्मा गांधीजींच्या प्रभावाचे विश्लेषण केले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी १९२२ सालच्या चौरीचौरा प्रकरणाशी संबंधित असलेल्या वेगवेगळ्या समाज गटांची मनोभूमिका विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. सुमीत सरकार या सबाल्टर्न संप्रदायातील विचारवंतावर मार्क्सवादाचा प्रभाव अधिक होता. त्यांनी प्रामुख्याने भारतीय राष्ट्रीय चळवळीतील सर्वसामान्य लोकांचा समावेश, दुर्लक्षित गटांचा इतिहास, राष्ट्रीय चळवळीतील म. गांधीजींचे नेतृत्व व पाश्चिमात्य वसाहतवादी शासनाचे वर्चस्वाचे स्वरूप या विषयांवर लिखाण केले आहे. 'Modern India' या ग्रंथात ब्रिटिशांचे वर्चस्व भारतात स्थापन होऊ लागल्यापासून झालेल्या सामुहिक उठावांचा त्यांनी तपशील दिला आहे. एवढेच नव्हें तर या उठावामागील प्रेरणांचेही हे विवेचन करतात. भारतामध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या विविध चळवळीतील विविध गटांचा सहभाग, गांधीजींच्या नेतृत्वाचे स्वरूप, मध्यम वर्गियांची भूमिका ते चिकित्सकपणे तपासतात. तसेच शेतकरी व कामगार आंदोलनात राष्ट्रीय काँग्रेसच्या वैचारिक बैठकीवर झालेल्या प्रभावाची ते समीक्षा करतात. 'Writing Social History' या ग्रंथात त्यांनी पाश्चात वसाहतवादी वर्चस्वाचे स्वरूप ते उलगडून दाखवितात. 'Decline of the subaltern in subaltern

studies' या लेखात ते समाजातील वंचित गटाच्या कार्यावर व मानसिकतेवर भर देताना त्यांच्या सामाजिक इतिहासाकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार करतात. 'Beyond Nationalist Frame' या लेखात ते मुलतत्ववादी भूमिकेवर हल्ला चढवितात.

### ४) इरफान हबीब यांचा सबाल्टर्न विषयक दृष्टिकोन

प्रा. इरफान हबीब यांनी रणजित गुहांच्या Subaltern studies बद्दल काही विचार मांडले आहेत. रणजित गुहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी तळागाळातील लोकांचा इतिहास किंवा वंचितांचा इतिहास ही संकल्पना ग्रामचीच्या विधानावर उभी केली आहे. ग्रामची म्हणतो, शेतकरी स्वतःची नवीन विचारसरणी निर्माण करू शकत नाहीत. हबीब यांच्या मते, तळागाळातील लोकांचा वर्ग नसतो तर त्या जाती, जमाती अशा स्वरूपात असतात. त्यांना वर्ग म्हणता येणार नाही. या प्रत्येक गटाचे स्वायत्त, स्वयंभू असे विचार असतात. असे मत ग्राह्य होऊ शकत नाहीत. ग्रामचीच्या हेजिमनी संकल्पनेला अंशतः शस्त्रबळाची आवश्यकता भासतेच. भारता मधील तळागळातील लोकांमध्ये स्वतःच्या विचारपरंपरा असतात असा दावा करणे ऐतिहासिक नाही. इरफान हबीब यांचे पुढील विधान सबाल्टर्न इतिहासाचे मुल्यमापन करण्यास पुरेसे आहे. "The sualbltern scholars are happy narrators of tragedy, It is not their task to look for salvation."

### सबाल्टर्न विचारप्रणाली दृष्टिकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळ

सबाल्टर्न विचारप्रणाली मते, ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीच्या कालखंडातील भारतीय समाजातील मूलभूत विसंगती वसाहतवाद आणि भारतातील जनता यांच्यामध्ये नसून एका बाजूला भारतीय व पाश्चात्य अभिजन वर्ग (सत्ताधारी) आणि दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य लोकांचा वर्ग यांच्यात आहे. साम्राज्यवादाच्या विरोधात भारतामध्ये जो व्यापक संघर्ष सुरू होता त्या मध्ये भारतीय लोक कधीच एक नव्हते. आणि भारतीय राष्ट्रीय चळवळ अशी एखादी गोष्ट अस्तित्वातच नव्हती. असे त्यांचे मत आहे. राष्ट्रीय चळवळी ऐवजी दोन अगदी भिन्न प्रवाह किंवा चळवळी अस्तित्वात होत्या. त्यापैकी एक सर्वसामान्यांच्या वर्गाची साम्राज्यवादाच्या विरोधातील खरीखुरी चळवळ आणि दुसरी अभिजन वर्गाची खोटी चळवळ अभिजन वर्गाचा प्रवाह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिकृत नेतृत्वाखाली वाटचाल करीत होता. अभिजन वर्गातील सत्ता - संघर्ष लपविण्यासाठी एक आवरण म्हणून त्याचा उपयोग होत असे. राष्ट्रीय चळवळीची सामान्यांच्या विचारधारेने केलेली मीमांसा आणि साम्राज्यवादी व नवसाम्राज्यवादी इतिहासकारांनी राष्ट्रीय चळवळीचे केलेले चित्रण यामध्ये एक अस्वस्थ करणारे साम्य आढळते. फरक एवढाच आहे की, नवसाम्राज्यवादी इतिहासलेखन चळवळीचे भाग न पाडता तिची मीमांसा करते. तर सामान्य विचार धारेचे इतिहास लेखन प्रथम चळवळीचे दोन भाग पाडते. आणि त्यानंतर अभिजन वर्गाच्या प्रवाहाची नवसाम्राज्यवादी मीमांसा स्वीकारते. सर्वसामान्य जनतेच्या जहाल प्रवृत्तीची आणि जाणिवेची अनैतिहासिक प्रशंसा तसेच सर्व बुद्धीजीवी, संघटित पक्षनेतृत्व आणि अन्य अभिजन वर्गाची सर्व प्रकारची उपक्रमशीलता आणि कृती याविषयी तेवढीच अनैतिहासिक तुच्छतेची भावना ही या दृष्टिकोनाची खास वैशिष्ट्ये आहेत. परिणामी हा दृष्टिकोन देखील वसाहत वादाच्या विरोधातील भारतीय लोकांच्या प्रत्यक्ष व ऐतिहासिक चळवळीचे वैधता नाकारतो. सर्वसामान्यांच्या जाणिवांच्या आधारे एक नवा इतिहास लिहण्याचे वचन ही नवी विचारधारा देते, परंतु तिने अद्यापि, लोकांच्या जाणीवा स्पष्टपणे दाखविणारी इतिहासातील नवीन साधने शोधून काढली नाहीत. त्यांचे नवे लिखाण त्याच जुन्या अभिजन साधनांवर आधारित आहे असे बिपिनचंद्रांनी 'इंडियन स्ट्रगल फॉर इंडिपेंन्डस' या ग्रंथात म्हटले आहे.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. सबाल्टर्न विचार प्रणागीतील प्रमुख इतिहासकारांच्या योगदानाची चर्चा कर.

## २.३ सारांश

१९६८ नंतर केंब्रिज विचारसंप्रदायाचा फार मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. गेल्या २० वर्षामध्ये या विचारसरणीच्या विचारवंतांनी आधुनिक भारताच्या इतिहासासंबंधी आपली मते मोठ्या प्रमाणात व्यक्त केली आहेत. केंब्रिज संप्रदाय हा सम्राज्यवादी इतिहासकारांनी सुधारून लिहिलेली आवृत्ती असे म्हटले जाते. केंब्रिज संप्रदायाच्या अगोदर साम्राज्यवादी इतिहास संशोधकांनी भारतीय इतिहासाचा अर्थ आपल्या दृष्टिकोनातून लावण्याचा प्रयत्न केला आहे. साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतीय संस्कृती व समाजाला नेहमीच आपल्या लिखाणातून हिन दर्जा दाखविण्याचा प्रयत्न केला. त्याच्याही पुढे जाऊन केंब्रिज संप्रदायाच्या विचारवंतांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीची पूर्वग्रह दुषित अशी मीमांसा करण्याचा प्रयत्न केला. केंब्रिज संप्रदायातील विचारवंतांनी ब्रिटिश राजवटीचे समर्थन केले. भारतात ब्रिटिशांची राजवट अपघाताने आली नाही तर भारतीय लोकांनीच ही राजवट वाढविण्यासाठी ब्रिटिशांना मदत केली असे मत यांनी मांडले. या विचारसरणीतील अनिल सील सारखे इतिहासकार भारतीय इतिहासकारांशी साधे बोलण्यासही तयार नसतात. यावरून त्यांनी वस्तुनिष्ठ पद्धतीने भारतीय इतिहासाचे विवेचन केले नाही हे स्पष्ट होते. या इतिहासकारांनी भारतीय इतिहास लिहिण्यासाठी नवनवीन साधने गोळा केली परंतु त्यांचे स्पष्टीकरण मात्र त्यांनी व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून केले हे मात्र इतिहासाला धरून नाही. भारतीय राष्ट्रीय चळवळ ही भारतीय जनतेची चळवळ नव्हती असे त्यांना वाटते, ही चळवळ म्हणजे एक लुटूपुटीची लढाई होती असे मत त्यांनी मांडले आहे. गांधी, नेहरू, पटेल यासारख्या राष्ट्रीय नेत्यांवर त्यांनी ब्रिटिश सत्तेचे दलाल म्हणून टिका केली हे योग्य नाही. थोडक्यात भारतीय राष्ट्रीय चळवळीतील अनेक चांगल्या गोष्टीकडे या विचारसरणीतील विचारवंतांनी दुर्लक्ष केले आहे.

१९८५ नंतर भारतामध्ये विकसित झालेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे सबाल्टर्न होय. सबाल्टर्न म्हणजे वंचित, किंवा उपेक्षित समाज गट होय. अँटिनिओ ग्रामची या इटालियन तत्ववेत्याने हा विचार प्रथम मांडला. तर डॉ. रणजित गुहा यांनी या विचारसरणीला इतिहासामध्ये स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर कोणत्याही देशाच्या जडणघडणीमध्ये सर्वसामान्य लोकांचा वाटा महत्त्वपूर्ण असतो. कोणतीही चळवळ अथवा विद्रोह यशस्वी करण्यामध्ये याच लोकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. परंतु या वर्गाला मात्र इतिहासात स्थान दिले जात नाही. हा विचार डोळ्यासमोर ठेवूनच या विचारसरणीतील विचारवंतांनी भारतीय इतिहासाचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. आज संपूर्ण जगात हा

इतिहासलेखन प्रकार प्रसिद्ध झाला असला तरी आपल्या देशात महात्मा फुले, डॉ. आंबेडकर या विचारवंतांनी फार पूर्वीपासून वंचित समाज गटाचा इतिहास रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. आज अमेरिकेत सुद्धा वंचितांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. या विचार संप्रदायाचा दोष म्हणजे यातील विचारवंतांनी वंचितांचा इतिहास लिहिण्यासाठी कोणतीही नवीन संदर्भ साधने शोधली नाहीत. त्यांनी जुन्या अभिजन वर्गाच्या संदर्भ साधनांचाच इतिहास लिहिण्यासाठी वापर केला आहे. या विचारप्रणालीतील विद्वानांनी जर इतिहासाचे पुनर्लेखन करण्यासाठी नवीन संदर्भ आणि साधने शोधली तर निश्चितच हा इतिहास प्रकार संपूर्ण जगात लवकरच लोकप्रिय होईल.

## २.४ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१. साम्राज्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्ट्ये सांगून साम्राज्यवादी इतिहासलेखनाची माहिती सांगा.
२. केंब्रिज विचार प्रणालीच्या दृष्टिकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळीचे विवेचन करा.
३. सबाल्टर्न विचार प्रणालीच्या उदयाची माहिती सांगून या विचारसरणीमधील तात्वीक भूमिका विशद करा.
४. सबाल्टर्न विचार प्रणालीच्या दृष्टिकोनातील भारतीय राष्ट्रीय चळवळीचे विवेचन करा.

### लघुत्तरी प्रश्न

१. साम्राज्यवादी इतिहास लेखनाचे कालखंड
२. केंब्रिज विचार प्रणाली
३. अनिल सील
४. अँटिनिओ ग्रामची
५. डॉ. रणजित गुहा
६. सुमीत सरकार
७. सबाल्टर्न दृष्टिकोन व भारतीय राष्ट्रीय चळवळ.

## २.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. बिपिनचंद्र, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंन्डस
२. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान
३. वैद्य सुमन, कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान
४. सरदेसाई बी.एन., नलावडे व्ही. एन, आधुनिक भारताचा इतिहास
५. पामदत्त रजनी, इंडिया टुडे
६. ग्रोव्हर बी. एल., बेल्हेकर एन के. आधुनिक भारताचा इतिहास
७. प्रभाकर देव - इतिहास लेखन शास्त्र
८. जावडेकर श. द. - आधुनिक भारत

❖❖❖❖

# ३

# राजकिय जागृतीचा उदय

## अ) १८५७ चा उठाव व परिणाम

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ १८५७ च्या उठावाची कारणे

१. राजकीय कारणे

२. प्रशासकीय कारणे

३. आर्थिक कारणे

४. धार्मिक कारणे

. ५. लष्करी कारणे

३.२.२ उठावाची सुरुवात

३.२.३ १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कारणे

१. उठाव सर्वव्यापी नव्हता

२. सुयोग्य नेतृत्वाचा अभाव

३. उत्कृष्ठ सेनापतीचा अभाव

४. शिस्तीचा उठाव व शस्त्रांची कमतरता

५. उठाव फक्त शहरी भागांपुरताच मर्यादीत होता

६. नवीन सुधारणांचा इंग्रजांना उपयोग झाला

७. क्रांतीकारकातील परस्पर हेवे दावे

८. आंतरराष्ट्रीय परिस्थितीबाबत - इंग्रज सुदैवी

३.२.४ १८५७ च्या उठावाचे स्वरुप व महत्त्व

३.२.५ १८५७ च्या उठावाचे परिणाम

१. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची राजवट बरखास्त झाली

२. राणीचा जाहीरनामा

३. संस्थांना संबंधीच्या आक्रमक धोरणाचा त्याग

४. हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्यात आली

५. इंग्रजांचे सामाजिक सुधारणा संबंधीचे धोरण बदलले

६. ब्रिटिश राजवटी बद्दल दहशत निर्माण झाली

७. वर्णभेद प्रखर झाला

८. राष्ट्रवादाचा उदय झाला

९. सनदशीर चळवळीचा पाया घातला गेला

३.३ सारांश

३.४ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

३.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- १८५७ चा उठाव हा राजकिय जागृतीमुळे घडून आला का यांचा अभ्यास करता येईल.
- १८५७ च्या उठावात भाग घेणाऱ्या व्याक्तीचा उद्देश वेगवेगळा असला तरी इंग्रजांना हटविणे हे एकमेव उद्दिष्ट्ये होते हे स्पष्ट करता येईल.
- १८५७ चे युध्द इंग्रजाविरुध्द लढलेला पहिला मोठा उठाव होता, ते स्वातंत्र्ययुध्द होते हे सांगता येईल.
- १८५७ चे राजकिय, सामाजिक व आर्थिक परिणाम स्पष्ट करता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

भारताने १८५७ मध्ये ब्रिटीश सत्ते विरुध्द एक महान उठाव घडून आला होता. त्यात ब्रिटीश सत्ता संपते कि काय असे चित्र निर्माण झाले होते. परंतु हा उठाव दडपून टाकण्यात ब्रिटीश सत्ता यशस्वी झाली. १८५७ च्या या संघर्षाबाबत अनेक विद्वानांनी व इतिहासकारांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. हा संघर्ष म्हणजे एक लष्करी उठाव होता. ती केवळ शिपायांची गर्दी होती इथ पासून ते १८५७ चा उठाव म्हणजे एक महान स्वातंत्र्य संग्राम होता. अशी विभीन्न मते व्यक्त केली जातात. ब्रिटीश सत्तेला या देशातून घालवून देण्यासाठी झालेला तो एक महान संग्राम होता. ती निश्चितच केवळ शिपायांची गर्दी नव्हती. आपला भारत देश स्वतंत्र करावा ही आधुनिक राष्ट्रवादी भावना त्यावेळी ब्रिटीशाविरोधी लढणाऱ्या सर्वांच्या मनात कदाचित नसेल परंतु ब्रिटीश लोक या देशात परकीय आहेत. आपण त्यांच्या गुलामगिरीत आहोत. त्यांची अन्यायी व अत्याचारी राजवट या देशातुन गेल्याशिवाय आपण सुखी होणार नाही. अशी संस्थानिका पासून सैनिका पर्यंत सर्वांची इच्छा होती. म्हणून ब्रिटीश लोकांना या देशातून घालवण्यासाठी १८५७ च्या संग्राम घडून आला होता. त्यामध्ये भारतीयांनी अपयश आले. परंतु या घटनेमुळे भारताच्या इतिहासाला एक वेगळे वळण मिळाले. अनेक दूरगामी परिणाम भारताच्या इतिहासावर घडून आले. त्यामुळे १८५७ च्या उठावाची कारणे, स्वरुप व परिणाम याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

### ३.२.१ १८५७ च्या उठावाची कारणे

१८५७ चा उठाव हा एका एकी घडून आलेली घटना नाही. ब्रिटीश सत्तेविरुध्द निरनिराळ्या कारणांनी हळूहळू असंतोष निर्माण होत गेला. हा असंतोष निर्माण होण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली यांची कारणमिमांसा केली तर अनेक राजकिय, सामाजिक, धार्मिक, प्रशासकीय व लष्करी कारणांची मालिकाच उभी राहते. या विविध कारणामुळे ब्रिटीश सत्तेविरुध्द भारतातील संस्थानिक, लष्करातील शिपाई, जमिनदार, प्रशासकिय सेवक, धार्मिक कारणावरुन नाराज असलेले हिंदू - मुस्लीम लोक यांच्यात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. तो प्रकट होण्यासाठी काहीतरी निमीत्तच हवे होते. ते चरबीयुक्त काडतुसाने पुरविले व असंतोषाचा स्फोट झाला. या सर्व कारणांची कारणमिमांसा करणे गरजेचे आहे.

### १) राजकिय कारणे

डलहौसीचे राज्ये खालसा करण्याचे धोरण : लार्ड डलहौसीने साम्राज्यावादी धोरण स्विकारुन कोणत्या ना कोणत्या कारणास्तव हिंदुस्थानातील राज्ये खालसा करून ब्रिटीश साम्राज्यास जोडली.१८४९ साली शिखांचा पराभव करुन पंजाब जिंकला. १८५२ साली ब्रम्हदेशाशी युध्द करुन ब्रम्हदेश ब्रिटीश साम्राज्यास जोडला. अराजकतेच्या नावाखाली अवध संस्थान खालसा केले . सिक्कीम, दार्जिलिंग हे प्रांत १८५६ मध्ये ब्रिटीशानी जिंकून घेतले. ब्रिटीशींना सर्व भारतभर आपले साम्राज्य निर्माण करण्याची आकांक्षा निर्माण झाली होती.

दत्तक वारस नामंजूर या कायद्याखाली डलहौसीने निपुत्रीक राजांचे दत्तक वारस नामंजूर केले व त्यांची राज्ये खालसा करुन ब्रिटीश साम्राज्यास जोडली. त्यामुळे सातारा (१८४८) जैतपूर, संभलपूर (१८५०), उदयपूर (१८५२) नागपूर (१८५३) झाशी (१८५४) इत्यादी संस्थाने खालसा झाली व तेथील संस्थानिक व त्यांची प्रजा अस्वस्थ झाली. राज्ये एकामागून एक खालसा केल्यामुळे त्या राज्यावर अवलंबून असणारे हजारो सैनिक बेकार झाले. निरनिराळ्या उद्योगधंद्यात गुंतलेले लोक बेकार झाले. तैनाती फौजेची पध्दत वेलस्लीने अमलांत आणल्याने अगोदरच देशी सैनिकावर बेकरीची पाळी आली होती. त्यात आणखी भर पडली. या सैनिकात कमालीचा असंतोष वाढला होता.

इंग्रज सरकारने राजे रजवाड्यांना व सरदारांना पदव्या व तनखे इंग्रज सरकारने दिले होते. ते वंशपरंपरागत नसल्याच्या कारणावरुन डलहौसीने बंद केले. पदव्या काढून घेतल्या. लार्ड कॅनिंग अगोदरच मुघल बादशाचे अधिकार काढून घेतल्याने तो नामधारीच होता. त्यामुळे मुस्लीमांना ब्रिटीशांचा राग आला होता. डलहौसीने पेशवे दुसरा बाजीराव मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र नानासाहेब यास निवृत्ती वेतन देण्याचे नाकारल्याने हिंदु लोक नाराज झाले. एकंदरीत डलहौसीच्या या धोरणाने संस्थानिक जहांगिरदार, वतनदार संतप्त झाले होते. या राजे राजवाड्यांनी, संस्थानिकांनी आपल्या अस्तीत्वासाठी इंग्रजाशी संघर्ष करण्याचे ठरविले.

### २. प्रशासकीय कारणे -

संस्थाने खालसा झाल्यामुळे त्यांच्या पदरी असलेले जहांगिरदार, अमीन, सुभेदार, तालुकादार व उच्च अधिकारी यांना आपली प्रतिष्ठा धोक्यात आली आहे असे वाटू लागले. ब्रिटीश प्रशासनात आता आपणास पूर्वीचे स्थान राहणार नाही व पूर्वीची पदे मिळणार नाहीत अशी जाणीव झाली. कारण ब्रिटीश प्रशासनात सर्व उच्च पदे इंग्रजाना देण्यात आली होती. त्यामुळे तो वर्ग असंतुष्ठ झाला होता.

हिंदु जनतेच्या नशिबी गुलामगिरी आलेली होती. त्यांना कोणतेही हक्क व स्वातंत्र्य राहिले नव्हते. राज्य कारभारात त्यांना मोठ्या प्रमाणात भाग घेण्याची संधी मिळत नव्हती. ब्रिटीश प्रशासनात हिंदी लोकांची भरती करण्यात यावी असे १८३३ च्या चार्टर ॲक्ट मध्ये मान्य केले असूनही कंपनी सरकारने त्याची अंमलबजावणी केली नव्हती.

ब्रिटीश लोक हिंदी लोकांना तुच्छतेची वागणूक देवून त्यांना काळे म्हणून हिणवत असत. ब्रिटीश अधिकारी आपल्या हाताखालच्या हिंदी लोकांना उपमर्दकारक व अन्यायी वागणूक देत असत. समाजा पासून फटकुन वागत असत. इंग्लंडच्या पार्लमेंटचा सदस्य सर थॉमस मन्रो त्यासंबंधी म्हणतो

" The foreign conquerors have definitely treated the indians very cruelly" इंग्रजांच्या दुजाभाव वृत्तीमुळे हिंदी लोक त्यांच्यावर नाराज होते.

कंपनीच्या सरकारचा राज्यकारभारही परिणामकारक नव्हता. जिंकलेल्या नवीन प्रांतात तर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. जमिनदारांनाही दत्तक घेण्यास परवानगी नाकारण्यात आली होती. त्यामुळे अशा जमिनदाराच्या इस्टेटी सरकारने सरकारजमा केल्या होत्या. इनाम कमिशन नेमून ब्रिटीश सरकारने १८५७ च्या पूर्वी पाच वर्षाच्या काळात निरनिराळ्या कारणांनी एकट्या मुंबई प्रांतातील २० हजार ईस्टेटी सरकारजमा केल्या होत्या. त्यामुळे हे सर्व जमिनदार नाराज झाले होते.

ब्रिटीशांनी स्विकारलेली महसूल व्यवस्था अन्यायी होती. न्याय पध्दती पक्षपाती होती. हिंदी न्यायाधिशासमोर युरोपियन गुन्हेगारांचा न्याय केला जात नसे. ही वागणूक हिंदी लोकांना अपमाना स्पद वाटत होती. असंतोषाचे हेही एक कारण होते.

### ३. आर्थिक कारणे -

ब्रिटीश ईस्ट - इंडिया कंपनीने हिंदुस्थानात आल्यापासूनच येथील लोकांचे आर्थिक शोषण करण्याचे काम चालविले होते. १८ व्या शतकात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीमुळे युरोपातील उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल अल्प किंमतीत हिंदुस्थानातून जावू लागला व पक्का माल येवू लागला. त्यामुळे येथील उद्योग धंदे बंद पडू लागले. स्थानिक जनतेचा रोजगार बुडाला. शेकडो लोक बेकार झाले व त्यांच्या वाट्याला दारिद्र्य आले.

कंपनी सरकार आपला खर्च भागविण्यासाठी जनतेवर जबर कर लादत असत. शिवाय अफगाणिस्थान, ब्रम्हदेश इत्यादी देशाशी झालेली युध्द खर्च येथील लोकावर कर लादूनच वसूल करीत असे. या निरनिराळ्या करामुळे लोकांच्यात असंतोष वाढलेला होता.

ब्रिटीश सरकारने स्विकारलेली जमिन महसूल विषयक धोरण या देशातील शेतीला अतिशय मारक होते. कॉर्नवालीसने आणलेली कायमधार पध्दती, महालवारी व रयतवारी पध्दती यामुळे सामान्य शेतकरी देशोधडीला लागला होता. तसेच जमीनदारा कडून वेळेवर जमीन महसूल न आणल्यास जमिनी लिलावात काढण्याचा लिलाव कायदा ब्रिटीशांनी लागू केल्यामुळे अनेक जमिनीचे लिलाव झाले व जमिन दारही भूमिहीन झाले.

शेतसारा वसूल करताना तो शेतकरी उत्पादन स्वरुपात (धान्य वस्तुस्वरुपात न घेता) घेण्याऐवजी रोख पैश्याच्या स्वरुपात घेण्याचा आग्रह ब्रिटीश अधिकारी करीत. त्यामुळे शेतकऱ्यांचा छळ होत असे. दुष्काळ, पूर व अवर्षण यासारख्या नैसर्गिक संकटातही या शेतकऱ्यांना सूट न देता सक्तीने शेतसारा वसूल केला जाई. अशा वेळी शेतकऱ्यांची स्थिती दयनीय होत असे.

ब्रिटीश सरकारच्या दृष्टीने भारत ही वसाहत खूप आर्थिक फायद्याची होती. खूप मोठ्या प्रमाणात या देशाचे आर्थिक शोषण चालू होते. त्यामुळे येथील जनता मात्र दिवसे दिवस दरिद्री होत चालली होती. म्हणजे भारत मातेच्या दुधावर इंग्रज पुष्ट बनले. तर तिच्या लेकरांवर मात्र उपासमारीची पाळी आली होती. भारतीय जनतेची आर्थिक दुरावस्था हेही ब्रिटीशविरोधी असंतोषाचे कारण होते.

### ४. धार्मिक कारणे -

भारतातील हिंदु - मुस्लीम समाजातील लोकांना इंग्रज आपणास ख्रिश्चन करावयास निघाले आहेत. असा समज पसरत चालला होता. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे धर्म प्रसाराचे कार्य, ब्रिटीश सरकारचा त्यांना असलेला पाठींबा, ब्रिटीश अधिकाऱ्याचे वर्तन यामुळे इंग्रजाना या देशात सर्वत्र ख्रिश्चन धर्म पसरावयाचा आहे असे लोकांना वाटू लागले होते. तसेच इंग्रजानी केलेल्या सती बंदी, विधवा पुर्नविवाह सारख्या सुधारणामुळे समाजास बळकटी येत गेली.

१८५६ मध्ये Religious Disabilities Act - मंजूर करुन धर्मांतरीत व्यक्तीला वारसा हक्क व मालमत्ता हक्क मिळेल अशी तरतूद केल्याने लोक आणखी संशयीत झाले. इंग्रजी शिक्षणाची सुरवात, मुलींच्या शिक्षणाला पाठींबा, सर्व जातीपातीच्या मुलांना एकत्र शिक्षण, पाश्चात्य विचारसरणीचा प्रसार हे सर्व कर्मठ विचाराच्या हिंदुना व मुस्लीमांना आपल्या संस्कृतीवरील आक्रमण वाटले. आजना उद्या आपला धर्म बुडणार असे या लोकांना वाटू लागले होते. त्यातच ब्रिटीशांनी अनेक हिंदु मंदीराची व मुस्लीम मशिदीची वतने सरकारने काढून घेतल्याने लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. पुरोहित, मौलवी अस्वस्थ झाले. या सर्व लोकांच्या मनांत इंग्रजाबद्दल द्वेष निर्माण झाला.

### ५. लष्करी कारणे :-

१८५७ चा उठाव घडून येण्यास लष्करी कारणे हिकारणीभूत झाली होती. इतर अनेक कारणामुळे इंग्रजविरोधी लोकमत तयार झाले तरी शिपायांनी शस्त्र उचलल्या खेरीज उठावास सुरुवात झाली नव्हती. शिपायांनी शस्त्र उचलण्यासाठी जी लष्करी कारणे कारणीभूत ठरली ती पाहणे ही गरजेचे आहे.

हिंदी शिपायांच्या धार्मिक भावना दुखावल्या होत्या. लष्करामध्ये सर्व उच्च अधिकारी इंग्रज होते. ते हिंदी कनिष्ठ अधिकारी व शिपायांना अपमानास्पद वागणूक देत असत. तसेच त्यांच्या धार्मिक भावनाही दुखावल्या जात. हिंदु शिपायांच्या भरतीवेळी त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य राखले जाईल असे ब्रिटीशांनी आश्वासन दिले होते पण ते पाळले जात नव्हते. शिपायांनी गंध लावू नये-शेंडी राखू नये. लुंगी नेसू नये. यासारखी धर्मविरोधी वाटणारी बंधने लादण्यात आली होती. त्यामुळेच १८०६ मध्ये वेलोरच्या शिपायांनी गोंधळ घातला होता.

गव्हर्नर जनरल कॅनिंगने जनरल सर्व्हिस एन्लिस्टमेंट ॲक्ट पास करुन हिंदी शिपायाना देशात वा देशाबाहेर कोठेही पाठवले जाईल असा आदेश काढला होता. समुद्रपर्यटन करणे, हे हिंदी लोक धर्मबाह्य मानीत असूनही १८५२ साली ब्रम्हदेशाच्या युध्दासाठी शिपायांना समुद्रपर्यटनाची सक्ती करण्यात आली होती. त्यामुळे शिपायांच्या भावना दुखावल्या होत्या. या शिवाय खालील कारणामुळे लष्करात असंतोष निर्मा झाला होता.

**१) वेतन व बढतीतील फरक :-** ब्रिटीश लष्करातील हिंदी शिपायांचे वेतन युरोपियन शिपायांच्या तुलनेत फार कमी होते. तसेच युरोपियन शिपायांना त्वरीत बढती मिळत असे. मात्र हिंदी शिपायांना बढती मिळत नसे. शिवाय ख्रिश्चन धर्म स्विकारलेल्या शिपायांना वेतन, बढती, रजा वैगेरे बाबत अनेक सवलती दिल्या जात असत. ब्रिटीश सरकारची ही हिंदी शिपायाबाबतची पक्षपाती वागणूक असंतोषास कारणीभूत ठरली होती.

**२) इंग्रज शिपायांची संख्या :- ब्**रिटीश लष्करात हिंदी व युरोपियन शिपायांचे प्रमाण ५:१ असे होते. हिंदुस्थानातील युरोपियन सैनिकांची संख्या वाढविण्याची मागणी डल हौसीने केली होती. परंतु ब्रिटीशांना ते जमले नव्हते. हिंदी शिपायांच्या ताब्यातच मोठा दारु गोळा, शस्त्रसाठा होता. बराकपूर व दिनाजपूर हे दोन लष्करीतळ वगळता दिल्ली ते कलकत्ता या भागात इंग्रज शिपायांचा एकही मोठा तळ नव्हता. अशा स्थितीत ब्रिटीशावर मात करता येईल असे हिंदी शिपायांना वाटत होते. तसेच अफगाण युध्द, क्रिमीयन व इराण युध्दातही इंग्रजाना माघार घ्यावी लागली होती. त्यामुळे त्यांच्या अजिंक्यपणास तडा गेला होता. इंग्रजांनाही माघार घ्यावी लागते. त्यांचाही पराभव होवू शकतो. अशी भावना हिंदी शिपायात झाली होती.

**३) बेकार सैनिकांची मानसिकता** :- संस्थाने खालसा केल्याने व तैनाती फौजेची पध्दत लागू झाल्याने हजारो सैनिक बेकार झाले होते. त्यांचे उपजिविकेचे साधनच नष्ठ झाल्याने त्यांच्यात असंतोष पसरला होता. ब्रिटीश सत्ता या देशात आल्यामुळेच आपली ही अवस्था झाली आहे. अशी भावना त्यांच्यात निर्माण झाली होती. अशा बेकारीतूनच ठग व पेंढारी तयार झाले होते. पण इंग्रजांनी त्यांचाही मोड करीत आणला होता. ब्रिटीश सत्तेविरुध्द बंडाचा झेंडा उभारल्यास बेकारी नष्ट होईल. कदाचित सत्ता प्राप्त होईल व बरे दिवस येतील असे त्यांना वाटत होते.

**४) इंग्रजांची शंभरी भरली ही मानसिकता :-** १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजाच्या सत्तेस या देशात सुरुवात झाली होती. १८५७ ला इंग्रजांच्या सत्तेला शंभर वर्षे झाली आहेत. व त्यांची शंभरी भरली आहे अशी मानसिकता जनमानसात पसरली होती. त्यामुळे ब्रिटीश सत्ता नष्ट करण्यास उत्साह लोकात पसरला होता.

**५) तात्कालिक कारण - काडतुस प्रकरण :-** ब्रिटीश सरकारच्या आक्रमण धोरणामुळे व अन्य अनेक कारणामुळे भारतीय सैन्यात असंतोष धुमसत होता. त्याचा फक्त स्फोट व्हावयाचाच बाकी होता. एकाच वेळी सर्वत्र हल्ला झाल्यास इंग्रज शासन कोलमडून पडले असा सर्वाना विश्वास होता. बंडवाल्यांच्या नेत्यांनी गावोगाव चपात्या फिरवून बंडाचा संदेश एकमेकांना पोहचविण्यात आला होता. अशा या तप्त वातावरणात काडतूस प्रकरणाने काडी लावण्याचे काम केले.

त्याकाळी ब्रिटीश सरकार वापरत असलेल्या एनफिल्ड रायफलीच्या काडतुसाला गाईची व डुकराची चरबी लावली जात असे. जानेवारी १८५७ मध्ये बराकपूरच्या छावणीत स्नान करुन पूजेसाठी पाणी घेवून येणाऱ्या ब्राम्हण शिपायाकडे तहानलेल्या एका दलीत शिपायाने पाणी मागीतले. त्या ब्राम्हण शिपायाने जातीचा उल्लेख करुन पाणी देण्यास नकार दिला. यावरुन त्या दलित शिपायाने गाईची व डुकराची चरबी तोंडात घालताना तुमचा धर्म कोठे जातो. अशी उपहासाने विचारणा केली असता ब्राम्हण शिपायाला काडतुसांना चरबी लावतात ही बातमी कळताच त्याने ती छावणीत सांगीतली. ही बातमी वाऱ्यासारखी सर्व छावणीत पसरली. गाय हिंदुना पवित्र व डक्कर मुस्लीमाना निषिध्द असल्याने इंग्रज आपला धर्म बुडविण्यास निघाले आहेत. असा समज होवून सैनिक संतापले व त्यांनी इंग्रजी सत्तेविरुध्द बंडाचे निशाण उभारले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १८५७ च्या उठावाच्या प्रमुख कारणांची चर्चा करा.

**३.२.२ उठावाची सुरुवात :-** चरबीयुक्त काडतुसाची बातमी देशभर पसरली. सैनिकांच्यात असंतोष पसरला होता. त्याचे पडसाद सर्वप्रथम बेहरामपूरच्या छावणीत उमटले. तेथील सैनिकांनी काडतुसांना स्पर्श करण्यास नकार दिल्याने इंग्रज अधिकाऱ्यांना त्या सैनिकावर कारवाई करुन ड्रेस उतरवून सर्वाना कायमचे घरी पाठवले. त्यानंतर बराकपूरच्या १९ रेजीमेंट मधील शिपायांनी काडतुसे वापरण्यास नकार दिला. इंग्रजांनी ती पलटण बरखास्त करुन शिपायांना शिक्षा फरमावल्या. परंतु खरी उठावास सुरुवात झालीती मंगल पांडे या शिपायाने २९ मार्च १८५७ रोजी परेड मैदानावर असलेले वरिष्ठ अधिकारी सार्जंट मेजरवर गोळी झाडून त्यास ठार केले त्याचे सहकारी इंग्रज अधिकाऱ्यांनी मंगल पांडे यास अटक करुन त्याच्यावर राजद्रोहाचा खटला भरला व त्यास ८ एप्रील १८५७ रोजी फाशी दिले. १८५७ च्या उठावातील मंगल पांडे हा पहिला हुतात्मा ठरला.

३ मे १८५७ रोजी लखनौ व ५ मे अयोध्या येथील शिपायांनी काडतूस वापरण्यास नकार दिला तर मीरत छावणीतील शिपायांनी ९ मे ला काडतूसे नाकारली. ब्रिटीशांनी त्या सर्वावर कोर्ट मार्शल खटला भरुन दहा वर्षाची सजा फर्मावली. हे वृत्त छावणीत पसरताच शिपाई बिथरले. दुसऱ्या दिवशी १० मे ला रविवार होता. युरोपिय मंडळी प्रार्थनेसाठी चर्चकडे निघाली होती. त्यावेळी संतापलेल्या शिपायांनी मारो फिरंगी को अशी गर्जना करीत युरोपियन स्त्री - पुरुष - यांच्यावर हल्ला चढविला व सर्वांना कापून काढले. आणि इंग्रजांनी तुरुंगात डांबले त्या आपल्या सहकाऱ्यांची मुक्तता केली.

दुसऱ्या दिवशी ११ मे रोजी बंडवाल्या शिपायांनी आपला मोर्चा चलो दिल्ली अशी घोषणा करुन दिल्लीकडे वळविला व दिल्ली काबिज केली. दिल्लीतील शिपायांनीही त्याना साथ दिली.

शिपायांनी शेवटचा नामधारी मुघल बादशाहा दुसरा बहादुरशाहा यास हिंदुस्थानचा बादशाहा म्हणून घोषीत केले. दिल्लीतील यशाने प्रभावीत होवून इतरत्रही बंडाचे लोण पसरत गेले. १३ मे फिरोजपूर, २० मे अलिगड, ३० मे लखनौ व मथुरा, ४ जून वारणसी - कानपूर, ६ जून अलाहाबाद - झाशी - शिवाय बरेली, बुंदेलखंड इत्यादी ठिकाणी हिंदी शिपायांचा उठाव झाला. पंजाब मधील शीख, हैद्राबाद चा निजाम सालारजंग व ग्वाल्हेरचा शिंदे उठावात सहभागी झाले नाहीत. त्यांनी उलट ब्रिटीशांना सहकार्य केले. हिंदी शिपायांनी ठिकठिकाणी युरोपियन अधिकाऱ्यांची कत्तल केली. ब्रिटीशांनी तुरुंगात डांबलेल्या हिंदी शिपायांची मुक्तता केली. १८५७ च्या उठावात नानासाहेब पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सेनापती तात्या टोपे, बिहारचा राणा कुंवरसिंह, फैजाबादचा मौलवी अहमदुल्ला,अवधची बेगम हजरत महल, बरेलीचा जनरल बरकत खान वकिल अझीमुल्लाखान इत्यादी प्रमुख नेत्यांनी भाग घेतला होता.

जून १८५७ च्या मध्यापर्यंत बहुतेक सर्व उत्तर हिंदुस्थानात उठावाची कारवाई झाली. दक्षिण हिंदुस्थानात सातारा, कोल्हापूर (३१ जूलै) इत्यादी ठिकाणी शिपायांनी उठाव केले. संस्थांनिक, जहागिरदार, वतनदार इत्यादी उठावात सहभागी झाली होती. उठावाला व्यापक स्वरुप प्राप्त झाले होते मात्र काही स्वकियांनी ब्रिटीशांनाच सर्व प्रकारचे सहकार्य केले. उठावाच्या पहिल्या काही काळात इंग्रजांना माघार घ्यावी लागली. परंतु काही काळातच ते सावरले. त्यांनी आपल्याशी निष्ठावान असलेल्या ऐतदेशीय लोकांचा चांगल्या प्रकारे उपयोग करुन घेतला काही इंग्लंडवरुन फौज मागवली व बंडवाल्या शिपायांशी निकराची झुंज दिली. ब्रिटीशांनी शीख पलटणीस दिल्लीवर पाठवून पुन्हा दिल्ली काबीज केली शीख व गुरखा यांच्या नव्या पलटणी उभ्या केल्या. तसेच याच काळात क्रिमियन युध्द व चीनमधील अफूची युध्दे संपुष्टात आल्याने या युध्दांत गुंतलेले इंग्लंडचे १ लक्ष १२ हजार सैनिक हिंदुस्थानात आले. हिंदुस्थानातील ३ लाख १० हजार देशी फौज उभी करण्यात आली. इंग्लंडमधून सैन्य, पैसा व शस्त्रास्त्रे यांचा प्रचंड ओघ सुरु झाला.

दिल्ली जिंकल्या नंतर इंग्रजांनी आपला मोर्चा लखनौकडे वळविला. लखनौत जोरदार धुमचक्री झाली. त्यात हेन्री लॉरेन्स मृत्यू पावला. परंतु जनरल हॅवलॉक व ओटराम यांनी बंडवाल्यांचा पराभव करुन लखनौ जिंकले. कानपूरला नानासाहेब पेशव्यांनी नेतृत्व केले होते. तेथे संपुर्ण युरोपियन सैनिकांची कत्तल करण्यात आली होती. परंतु काही दिवसांनी लार्ड कॅम्पबेल याने कानपूर शहर जिंकून घेतले. झाशीची राणी व तात्या टोपे यांनी इंग्रजांना कडवा प्रतिकार केला. झाशीच्या राणीने लढाईतच मृत्यू पत्करला. तात्या टोपे याने ग्वाल्हेर व काल्पीच्या लढाईत मोठा पराक्रम गाजवला. परंतु इंग्रजानी त्याचा पराभव केला. त्यातुन तात्या टोपे निसटला परंतु मानसिंग या राजपूत राजाच्या फितुरीने सापडला. इंग्रजांनी त्यास फाशी दिले. कानपूरच्या युध्दात पराभव झाल्यानंतर नानासाहेब पेशवे नेपाळात पळून गेले. मुघल बादशाहा बहादुरशहा याचा पराभव झाल्यानंतर इंग्रजांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरुन रंगूनला पाठवले तेथेच त्याचा मृत्यू झाला. फैजाबादचा मौलवी अहमद अली शहा याने आपल्या प्रभावी वक्तृत्त्वाने उत्तर भारतात जागृती घडवून आणली होती. तो १८५८ च्या लढाईत मारला गेला. या उठावात इंग्रजांनी अत्यंत सूड बुध्दीने वर्तन केल्याचे दिसते. हजारो सैनिकांना त्यांनी कंठस्थान घातले. एकट्या अलाहाबादलाच त्यांनी सहा हजार हिंदी सैनिक ठार केले. भारतीय सैनिकांच्या मनात दहशत निर्माण व्हावी अशा प्रकारे त्यांनी सूडची भूमिका घेतली. उठावातील नानासाहब पेशवे, झाशीची राणी - तात्या टोपे, राणा कुवरसिंह, मौलवी अहमदुल्ला यासारख्या नेत्याचा मोड झाल्यानंतर इंग्रजांना उठाव पूर्णपणे मोडून काढण्यास यश आले व अशा प्रकारे १८५७ चा उठाव संपुष्ठात आला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १८५७ च्या उठावाची सुरुवात आणि प्रसाराची थोडक्यात माहिती सांगा.

### ३.२.३ १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कारणे :-

हिंदी शिपायांना या उठावात अपयश आले. प्रारंभीच्या ३ -४ महिन्यात बंडवाल्या शिपायांना चांगले यश मिळाले होते. परंतु नंतर त्यांची पिछेहाट होत गेली व डिसेंबर १८५७ अखेर उठाव दडपण्यात इंग्रजाना पुर्णतः यश आले. हिंदी शिपायांच्या अपयशाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) उठाव सर्वव्यापी नव्हता :-** सामान्य जनतेच्या या उठावाला पांठीबा मिळाला नाही. संस्थानिक, राजेरजवाडे सरदार व जमिनदार या उठावात सामील झाले होते. येथील प्रजा त्यापासून दूर राहिली. तसेच हा उठाव सर्व देशव्यापी नव्हता. उत्तर भारतात व्यापक प्रमाणात उठाव घडून आला. परंतु नर्मदेच्या दक्षिणेकडिल प्रदेशात त्याचा प्रसार झाला नाही. मध्य व पूर्व बंगाल, पंजाब, सिंध राजपुताना हा प्रदेश शांतच होता. देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या १/६ प्रदेशापुरता तो मर्यादीत राहिला. शीख राजे, ग्वाल्हेरचे शिंदे, सालारजंग, नेपाळचा जंगबहादुर इत्यादी मंडळी ब्रिटीशनिष्ठ राहिली. त्यामुळे १८५७ चा उठाव यशस्वी झाला नाही.

**२) राष्ट्रीय नेतृत्वाचा अभाव :-** सर्व देशव्यापी उठावाचे नेतृत्व करील असे नेतृत्व हिंदी शिपायांना लाभले नाही. सर्वाना बरोबर घेवून जाणारा एकही नेता नव्हता. प्रत्येकाचे हितसंबंध वेगवेगळे राहिले गेले. मुस्लीमाचां नेता म्हणून बादशहा बहादुरशहा यास गादीवर बसविले. परंतु तो अतिशय कमकुवत व नामधारी होता. नानासाहेब पेशवे, झाशीची राणी हे त्यांची संस्थाने व पेन्शनसाठी लढले. स्वातंत्र्य - भारत राष्ट्र हि कल्पना त्या काळात एकाही नेत्यात रुजली नव्हती. त्यामुळे उठावात समन्वय राखता आला नाही.

**३) उत्कृष्ठ सेनापतीचा अभाव :-** कोणतीही लढाई, युध्द यशस्वी होण्यासाठी उत्कृष्ठ सेनापतीची गरज असते. असे सेनापती उठाव वाल्याकडे नव्हते. झाशीची राणी स्वतः शूर होती. परंतु सर्वांचे सेनापती पद स्विकारुन ब्रिटीशाविरुध्द लढण्याची तिची कुवत नव्हती. सेनापती तात्या टोपेचे उदाहरण सोडल्यास सर्वत्र विनासेनापती लढाया चालू होत्या. त्यात एक वाक्यता नव्हती. याउलट इंग्रजांकडे निकोलसन, लॉरेन्स बंधु, हॅवलॉक, एडवर्ड नील, ह्युरोज कॅम्बेल इत्यादी कर्तबगार व उत्कृष्ठ सेनानी होते. त्यामुळे इंग्रजानी पहिल्या हल्यातून सावरल्यानंतर त्यांनी नियोजन करुन नियोजनशून्य लढा देणाऱ्या हिंदी शिपायांना पराभूत केले.

**४) शिस्तीचा अभाव व शस्त्रांची कमतरता :-** उठाववाल्या हिंदी शिपायांत कसल्याही प्रकारची शिस्त नव्हती. इंग्रजांना मारावयाचे , येथून घालवावयाचे त्यासाठी त्याच्यावर हल्ला करावयाचा अशा भावनेने सर्वच शिपायांनी दिल्लीत भाऊगर्दी केली. त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते. दिल्ली जिंकल्यावर पुढे काय. असा प्रश्न अनेकांना पडला होता. देशव्यापी लढ्याच्या नियोजनाचा पूर्ण अभाव होता. तसेच शस्त्रांस्त्राची कमतरता ही मोठी होती. हिंदी शिपायांकडे दारुगोळा व शस्त्रास्त्रे यांचे साठे नव्हते किंवा पुरवठा करणारी यंत्रणाही नव्हती. त्यांनी इंग्रजांवर हल्ले करुन त्यांचा जवळील दारुगोळा व शस्त्रास्त्रे बळकावली होती. ती संपल्यावर उठाववाल्या सैनिकांना लढण्यासाठी शस्त्रास्त्रे व दारुगोळा मिळाला नाही. परिणामी त्यांना प्राणास मुकावे लागले किंवा शरणागती पत्करावी लागली.

**५) उठाव फक्त शहरी भागा पुरताच मर्यादीत होता :-** ग्रामीण भागात या उठावाची माहितीही नव्हती. अशा उठावात भाग घेण्याची त्यांची मानसिकताही तयार झाली नव्हती.

**६) नवीन सुधारणांचा इंग्रजाना उपयोग झाला :-** ब्रिटीशांनी या देशात रेल्वे, तारायंत्रे - पोस्ट इत्यादी सुधारणा घडवून दळणवळणाच्या सोई उपलब्ध केल्या होत्या. त्याचा उपयोग इंग्रजांना झाला. टेलीग्रामद्वारे इतरही माहिती कळविण्यात आली. वेगाने दळणवळण करता आले. सुधारित बंदराचा उपयोग झाला.

**७) क्रांतीकारकातील परस्पर हेवे दावे :-** उठावात सहभागी झालेल्या संस्थानिकांच्यात फार मोठ्या प्रमाणावर द्वेष भावना होती. मराठे राजपुताविरुध्द होते. मुघलानी पूर्वी शिखाना छळले होते. त्यामुळे त्यांना मुघल सत्तेचे पुनरुज्जीवन नको होते. परस्परातील द्वेषामुळे सर्व संस्थानिक, जाती जमाती उठावात सहभागी झाल्या नाहीत. काही संस्थानिक उठावात सहभागी झाले तर त्यांच्याशी वैमनस्य असलेल्यांनी इंग्रजांना मदत केली. त्यामुळे उठाव देशव्यापी झालाच नाही. उठावाच्या अपयशाचे विश्लेषण करताना मौ. अबदुल कलम आझाद म्हणतात." The leaders of the revolt were mutually jealous and continuously intriguing against one another. In fact, the personal jealousies were largely responsible for the Indian defeat."

**८) आंतरराष्ट्रीय परिस्थिती बाबत - सुदैवी इंग्रज :-** उठावाच्या वेळी काही बाबतीत इंग्रज सुदैवी ठरलेले आहेत. क्रिमीयन युध्दात त्यांना विजयमिळाल्याने तेथील फौज इंग्रजांनी हिंदुस्थानाकडे वळवली. चीनमधील अफूची युध्दे संपली होती. तसेच ब्रिटनचे पार्शियाशी असलेले युध्दही संपुष्टात आले होते. तेथील सैन्य हिंदुस्थानातील ब्रिटीश फौजेच्या मदतीसाठी आले. त्यामुळे उठावानंतर काही काळाने इंग्रजांना भरपूर सैन्य उपलब्ध झाले. बंडातील शिपायांची मात्र उलट परिस्थिती झाली. प्रारंभीचा उत्साह व आक्रमकता त्यांच्यात राहिली नाही. अचानक झालेल्या उठावामुळे सुरुवातीस गडबडलेले इंग्रज काही अवधीतच सावरले व त्यांनी नियोजनबध्द उठावातील शिपायांनविरुध्द निकराचा लढा दिला. व उठाव मोडून काढला.

त्याच प्रमाणे इंग्रजाचे आरमारी वर्चस्व, बंडवाल्या सैनिकातील तोकडी संपर्क यंत्रणा आणि समन्वयाची कमतरता इत्यादी अनेक कारणामुळे १८५७ च्या उठावात भारतीय शिपायांना अपयश आले.

**३.२.४ १८५७ च्या उठावाचे महत्त्व :-**

१८५७ च्या उठावाला भारताच्या इतिहासात अतिशय महत्त्व आहे. या उठावाचे स्वरुप सांगताना अनेक लेखक, इतिहास कारानी निरनिराळी मते व्यक्त केली आहेत. किशोरचंद्र मिश्रासारखे विचारवंत या उठावास शिपायांचे बंड म्हणतात तर न .र. फाटक शिपाई गर्दी म्हणून या घटनेस संबोधतात. डॉ. आर. सी. मुजूमदार सारखे इतिहासकार या घटनेस १८५७ चे बंड ही राष्ट्रीय चळवळ मुळीच नव्हती असे म्हणतात. भारतीय लेखका प्रमाणे जनरल कॅम्बेल, सर जॉन सिले या सारख्या इंग्रजानी हे केवळ शिपायाचे बंड होते अस उल्लेख केलेला आहे. तर याउलट या उठावास स्वातंत्र्ययुध्द मानणारे लोकही आहेत. इतिहासकार ताराचंद लिहतात. “ for the first time in History of India as a whole became conscious of the antithesis between self and not self between India and alien.” सरदार के. एम. पणिक्कर म्हणतात. “It is true that all leaders of the rebellian came from among the great disposessed, but all were unified in the object they had in view, the expulsion of British and the recovery of national Independece.”

पंडित जवाहरलाल नेहरु आपल्या ‘Discovery of India’ या ग्रंथात या उठावास स्वातंत्र्ययुध्द म्हणतात. “It was much more than a millitary mutiny and it spread rapidly and assumed the character of a popular rebellion and a war of Indian independence.”

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी या उठावास भारतीयांनी ब्रिटीशा विरुध्द केलेले पहिले स्वातंत्र्ययुध्द असे संबोधले आहे.

वरील सर्व मतांचा परामर्श घेतला असता असे दिसुन येते कि ते केवळ शिपायाचे बंड ही नव्हते किंवा शिपाईगर्दी नव्हती. त्यापेक्षा वेगळी भावना या उठावकर्त्याच्या मनात निश्चितच होती. इंग्रज हे आपले शत्रु आहेत. त्यांना या देशातून घालवले पाहिजे. त्यांच्या जाण्याने आपले अनेक प्रश्न सुटणार आहेत. म्हणून इंग्रजांना या देशातून घालवण्यासाठी हा उठाव घडवुन आणलेला आहे. यापूर्वी या देशात अनेक सत्ता संघर्ष झाले आहेत. त्यावेळी कोणत्याच गटाला, जातीला किंवा समाजाला या देशातून परकीय म्हणून हाकलून लावण्याचा प्रयत्न झाला नाही. परंतु १८५७ चा उठाव हा इंग्रजाना या देशातून घालवण्यासाठी, त्यांना नेस्तनाबुत करण्यासाठी झालेला आहे. त्यामुळे ही घटना म्हणजे ब्रिटीशांना या देशातून घालविण्यासाठी काही भारतीयांनी लढले गेलेले हे स्वातंत्र्ययुध्दच होते. म्हणून  इंग्लंडचे तत्कालिन पंतप्रधान डिझरायली या उठावास क्रंातीचे स्वरुप मानताना म्हणतात, हा एक महान संग्राम होता. केवळ काडतूस प्रकरणातून अशा महान क्रांतीचा जन्म होवू शकणार नाही.

उठावात भाग घेणाऱ्या लोकांचे निरनिराळे प्रश्न असतीलही  त्यात काही धार्मिक तर काही आर्थिक तर काही सामाजिक प्रश्न असले तरी या सर्वांना इंग्रज जबाबदार आहेत. त्याची राजवट जबाबदार आहे. ती या देशातून घालवणे आवश्यक आहे असे सर्व उठावकर्त्यांना वाटत होते. इंग्रजाच्या जोखंडातून हा देश मुक्त व्हावा असे सर्वांना वाटत होते. म्हणून ही घटना एक प्रकारे स्वातंत्र्य युध्दच होते.

१८५७ चा उठाव मोडून काढण्यात कंपनी सरकारला यश मिळाले. मात्र या उठावाचे हिंदुस्थानच्या इतिहासावर दूरगामी परिणाम घडून आले. ब्रिटीश राजवट पूर्ण पणे उलथून

पडली नसली तरी ब्रिटीश राजसत्तेला जबरदस्त हादरा देण्याचे काम १८५७ च्या उठावाने केल होते. आपण भारतात सुखानेच राज्य करु शकू हा ब्रिटीशांचा विश्वास ढळला. उठावाच्या काळात ब्रिटीश सत्तेच्या अस्तित्वालाच गंभीर धोका निर्माण झाला होता या सत्याची ब्रिटीश सत्ताधिशांना जाणीव झाली. भारतीयाच्या डोळ्यातल्या अंगाराने ब्रिटीशाची झोप उडाली. त्यामुळे येथून पुढे भारतावरील ब्रिटीश पकड दृढ राहावी अशी तजवीज करणे ब्रिटीश मुत्सद्यांना गरजेचे वाटू लागले. त्यादृष्टीने इथून पुढील काळात ब्रिटीशांचा भारतविषयक धोरणात अमुलाग्र बदल झाला. इंग्लंडमध्ये १८५७ च्या उठावाच्या कारणाबाबत, स्वरुपाबाबत सर्वांगीण ऊहापोह करण्यात आला. त्यापासून काय धडे घ्यावायाचे यावरही व्यापक चर्चा झाली. अशा सखोल विचारमंथनातुन इंग्रजांनी काही मूलगामी निर्णय घेतले. त्यामुळे भारताच्या राजकीय इतिहासात महत्वपूर्ण बदल घडून आले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १८५७ च्या उठावाच्या महत्वाची चर्चा करा.

---

---

---

---

---

### ३.२.५ १८५७ च्या उठावाचे परिणाम

#### १) ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची राजवट बरखास्त झाली :-

सन १८५८ चा कायदा

इ.स. १६०० मध्ये पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी ब्रिटीशांनी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. या कपंनीने व्यापार करता करता हिंदुस्थानावर आपला अमंल प्रस्थापित केला. ब्रिटीश नागरिकांनी जगाच्या पाठीवर कोठेही संपत्ती मिळवली तरी त्यावर ब्रिटीश पार्लमेंटचा हक्क पोहोचतो असा पार्लमेंटचा दावा होता म्हणूनच पार्लमेंटने १७७३ पासूनच कंपनाच्या हिंदुस्थानातील राज्यकारभारावर नियंत्रण घालण्यास सुरुवात केली हे नियंत्रण हळूहळू वाढतच गेले. १८५३ च्या सनदी कायद्यात कपंनीने हिंदुस्थानाचा कारभार इंग्लंडच्या राणीच्या वतीने पहावा असे कलम घालून ब्रिटीश सरकारने भविष्यकाळाच्या धोक्याची जाणीव या अगोदरच कंपनी सरकारला दिली होती. १८५७ च्या उठावामुळे कपंनीची राजवट बरखास्त करण्याची संधी ब्रिटीश सरकारला आयतीच चालून आली. या उठावामुळे कंपनीची हिंदुस्थानावरील पकड दृढ नाही याची जाणीव ब्रिटीश मुत्सद्यांना झाली. हिंदुस्थानची समृध्दी म्हणजे ब्रिटनच्या आर्थिक सुबत्तेचा मुलाधार होता. त्यामुळे हिंदुस्थानसारखी वसाहत ब्रिटीशाच्याच ताब्यात राहावी याकरिता आवश्यक ती उपाययोजना करण्याची गरज ब्रिटनमधील राजकीय पक्षांना वाटू लागली. शिवाय हिंदुस्थानसारख्या विशाल देशाचे शासन एका व्यापारी कंपनीच्या हाती असावे हे अत्यंत चुकीचे आहे असाही सूर इंग्लंडमध्ये उमटू लागला. यामुळे भारताच्या शासनाची सूत्रे कंपनीच्या हातून काढून घेवून ब्रिटीश राज्यसत्तेने स्वतःकडे घ्यावी अशी मागणी ब्रिटीश मुत्सदी करु लागले. त्यानुसार १८५८ साली ब्रिटीश पार्लमेंटंने खास कायदा मंजूर करुन कंपनीची राजवट बरखास्त केली आणि येथून पुढे हिंदुस्थानात इंग्लंडच्या राणीची राजवट सुरु झाल्याचे जाहीर केले.

ऑगस्ट १८५८ मध्ये पास झालेल्या भारताच्या सुशासनाचा कायदा या कायद्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीच्या अंमलाखाली असलेला भारतीय प्रदेश व त्यासंबंधीचे सर्व अधिकार इंग्लंडच्या राणीने स्वतःकडे घेतले असल्याची घोषणा करण्यात आली. याच कायद्यानुसार कंपनीचे संचालक मंडळ व नियंत्रण मंडळ बरखास्त करण्यात आले. व भारताच्या शासनाची जबाबदारी सांभाळण्याकरीता भारतमंत्री व त्यांचे मंडळ यांची निर्मिती करण्यात आली. भारतमंत्री हा ब्रिटीश पार्लमेंटचा व ब्रिटीश मंत्रीमंडळाचा सदस्य होता. भारत मंत्री व भारत मंडळ यांनी आखून दिलेल्या धोरणाची भारतात अमलबजावणी करण्याचे काम ब्रिटीश राज्यसत्तेचा प्रतिनिधी या नात्याने व्हॉइसरॉय करणार होता.

अशा प्रकारे १६०० साली राणी एलिझाबेथच्या कारकीर्दीत स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट १८५८ साली राणी व्हिक्टोरियाच्या कारकीर्दीत झाला.

## २) राणीचा जाहीरनामा

१८५७ च्या उठावातून इंग्रज राज्य कर्त्यांनी अनेक धडे घेतले. उठावामुळे हिंदुस्थानातील असंतोषाची तीव्र जाणीव त्यांना झाली. ज्याच्यावर राज्य करायचे अशा लोकांच्या भावनांचा विचार नकरता राज्य केले तर हिंदुस्थानात फार काळ राहता येणार नाही हे ओळखून हिंदी लोकातील सूडाची भावना नष्ट व्हावी, हिंदुस्थानातील भितीचे वातावरण नष्ट होवून परस्पर सहकार्यचे वातावरण सुरु व्हावे म्हणून ब्रिटीश राणीने व पार्लमेंटने आपले हिंदुस्थानातील राज्य कारभाराचे धोरण स्पष्ट करणारा जाहिरनामा तयार केला. व ब्रिटनच्या राणीच्या नावाने प्रसिध्द केला. तो राणीचा जाहिरनामा या नावाने ओळखला जातो.

ग. ज लॉर्ड कॅनिगंने १ नोव्हे. १८५८ रोजी अलाहाबाद येथे खास दरबार भरवून उपस्थित भारतीया समोर व संस्थानिकासमोर राणीचा जाहिरनामा वाचून दाखविला. भारतीय जनता आणि संस्थानिक यांच्या विषयी पुढील काळात ब्रिटीश शासनाचे धोरण कसे असेल याची रुपरेषा या जाहिरनाम्यात स्पष्ट केली होती. भारतीय संस्थानिक व नबाबांशी ईस्ट इंडिया कंपनीने जे तह व करार केले ते ब्रिटीश सरकार पाळील. संस्थानिकांच्या मिळकती हिरावल्या जाणार नाहीत. ब्रिटीश राज्यसत्तेला भारतात जास्तीच्या प्रादेशिक विस्ताराची इच्छा नाही त्यामुळे संस्थानिकांच्या प्रदेशांवर आक्रमण केले जाणार नाही. कंपनीने चालविलेले दत्तक वारसा नामंजूरीचे व विलीनीकरणाचे धोरण ब्रिटीश सरकार स्विकारणार नाही. संस्थानिकांना दत्तक घेण्याची परवानगी दिली जाईल. तसेच त्यांचे अधिकार, मानमर्यादा व प्रतिष्ठा यांना धक्का लावला जाणारा नाही अशी अभिवचने संस्थानिकांना या जाहिरनाम्याद्वारे दिली गेली.

१८५८ च्या कायद्याने कोट्यावधी भारतीय आता इंग्लंडच्या राणीचे प्रजाजन बनले होते. या भारतीयांनाही जाहिरनाम्यात दिलासा देण्यात आला होता. भारतीय प्रजेच्या कल्याणाचे कर्तव्य नवे सरकार प्रामाणिकपणे बजाविल. त्यांच्या सामाजिक व धार्मिकबाबतीत कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ करणार नाही. सर्वांना पूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्य देण्यात येईल. कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी करताना जनतेच्या भावना व परंपराकडे लक्ष दिले जाईल अशी अभिवचने भारतीय जनतेला देण्यात आली होती. याबरोबरच या जाहिरनाम्यात असेही आश्वासन देण्यात आले की, आमची प्रजा कोणत्याही धर्माची, कोणत्याही जातीची का असेना कोणताही भेदभाव न ठेवता शिक्षण पात्रता प्रामाणिकपणा या आधारावर कोणत्याही पदावर नियुक्त केले जाईल. या आश्वासनाच्या परिपूर्तीसाठी १८६१ मध्ये भारतीय नागरीसेवा

अधिनियम संमत करण्यात आला. त्यानुसार नागरीसेवाकरीता लंडन येथे दरवर्षी स्पर्धापरिक्षा घेण्याची तरतूद करण्यात आली. मात्र या परिक्षेची जी नियमावली होती त्यामुळे फक्त इंग्रजांनाच प्रवेश मिळण्याची शक्यता होती.

याशिवाय देशात शांतता प्रस्थापित झाल्यावर सरकार कडून उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळेल, लोककल्याण्याच्या योजना कार्यान्वित करण्यात येईल, भारतीयांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न केले जातील, अशी अश्वासनेही देण्यात आली. एकूणच राणीच्या जाहिरनाम्यात अत्यंत उदात्त भावना प्रगट करण्यात आली होती. परंतु जाहिरनाम्याद्वारे भारतीयांना दिलेल्या अनेक वचनांची पूर्तता ब्रिटीश राजवटीत नंतरच्या काळात झाली नाही. असे असले तरी उठावातील अत्याचारामुळे जखमी झालेल्या भारतीय मनाला जाहिरनाम्यातील आश्वासनामुळे तात्पुरता का होईना दिलासा मिळाला. शिवाय उठावात भाग घेतलेल्या परंतु भयकंर गुन्हे न केलेल्या लोकांना जाहिरनाम्यात बिनशर्तमाफी घोषित करण्यात आली.

### ३. संस्थानासंबंधीच्या आक्रमक धोरणांचा त्याग :-

१८५७ च्या उठावाच्या काळात भारतीय संस्थानाचे महत्त्व ब्रिटीश मुत्सद्यांच्या लक्षात आले होते. ज्यांची राज्ये खालसा झाली, ज्यांचे तनखे बंद झाले, ज्यांच्या पदव्या काढून घेण्यात आल्या असे अनेक संस्थानिक १८५७ च्या उठावात सामील झाले. त्यांच्यामागे त्यांच्या राज्यातील प्रजाही सहभागी झाली. या संस्थानिकांनी त्यांच्या प्रजेवर चांगली पकड आहे हे इंग्रजांच्या लक्षात आले. तेव्हा हिंदुस्थानावर आपली पकड घट्ट बसविण्यासाठी या संस्थानिकांचा उपयोग करुन घेता येईल हे धूर्त ब्रिटीशांनी ओळखले. उठावाच्या काळात अनेक संस्थानिक अलिप्त राहिले होते. तर काहीनी उठाव मोडून काढण्यासाठी ब्रिटीशांना सक्रिय मदत केली होती. त्यामुळे रशियासारख्या परक्या शत्रूने हिंदुस्थानावर स्वारी केली तर हे संस्थानिक आपणास पुढेमागे सहाय्यकच ठरतील असेही ब्रिटीशांना वाटू लागले. परिणामी संस्थानासंबंधीचे त्यांचे पूर्वीचे आक्रमक धोरण त्यांचे सलोखा प्रस्थापित करण्याच्या हेतूने त्यांच्या स्वार्थाला, काही प्रमाणात का होईना पोषक ठरणारी नीती राणीच्या जाहिरनाम्याद्वारे घोषित करण्यात आली.

ब्रिटीशांच्या या बदलत्या धोरणानुसार आता कोणाही संस्थानिकाचे राज्य विलीन केले जाणार नव्हते त्यांना हवा तो दत्तकवारस निवडता येणार होता शिवाय त्यांचे मानसन्मानही पूर्वीप्रमाणे चालू ठेवण्यात येणार होते. मात्र संस्थानिकांच्या प्रदेशाच्या मानसन्मान व प्रतिष्ठेच्या संरक्षणाची ग्वाही दिली जात असतानाच ब्रिटीश सार्वभौमत्वाचे जू त्यांच्या मानेवर लादले गेले. त्यांच्या लष्करात मोठी कपात करण्यात आली व त्यांच्या परराष्ट्र संबंधावर कडक नियंत्रण ठेवण्यात आले. त्यांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे आश्वासन देण्यात आले असले तरी संस्थानात ब्रिटीश रेसिडेंट नेमून संस्थानिकाच्या कारभारावर बारीक नजर ठेवण्याची तरतूद करण्यात आली होती. एवढेच नव्हे तर त्यांच्या राज्यकारभारात कोणत्याही प्रकारे गोधंळ माजल्यास हस्तक्षेप करण्याचा किंवा संस्थानिकाला बाजूला सारुन कारभार हाती घेण्याचा अधिकारही राखून ठेवण्यात आला होता. असे असले तरी दत्तक वारसा अधिकार हिरावून घेतले जाणार नाही. संस्थाने खालसा केली जाणार नाहीत व अंतर्गत कारभारात मोकळीक मिळेल या आश्वासनामुळे संस्थानिकांना राज्यकारभार करता आला. त्यामुळे इंग्रजांची कृपा संपादन करण्यासाठी संस्थानिक धडपडू लागले १८५७ नंतर अपवादात्मक एखादे संस्थान वगळता बहुतेक संस्थानिक इंग्रजनिष्ठ बनले आणि अगदी १९४७ पर्यंत हे संस्थानिक इंग्रजांशी प्रामाणीक राहिले.

### ४. हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्यात आली

१८५७ च्या उठावाची सुरुवात ब्रिटीश लष्करातील हिंदी सैनिकानीच केली होती. त्यामुळे इंग्रजांनी या लष्कराची पुनर्रचना करण्याचे काम तातडीने हाती घेतले. उठावापूर्वीच्या सैन्यावस्थेत प्रमुख्याने दोन दोष होते. एक तर युरोपियन सैनिकांची संख्या भारतीय सैनिकांच्या तुलनेत फारच कमी होती. दोहोंच्या संख्येचे प्रमाण १:६ असे होते. तर हिंदी पलटणीत उच्चवर्णीय हिंदुंचाच भरणा अधिक होता. दुसरे म्हणजे सैन्याच्या तुकड्या देशातील महत्त्वाच्या ठिकाणी विखुरल्या गेल्या नव्हत्या या दोषाचे निर्मूलन करण्यासाठी व्हाईसरॉय कॅनिगंने लष्कराची पुनर्रचना करण्याचे ठरविले. ब्रिटीश सरकारने १८५८ मध्ये पील कमिशनची नियुक्ती केली होती. त्या कमिशनने केलेल्या शिफारशीनुसार सैन्याची पुनर्रचना करण्यात आली.

लष्करातील हिंदी सैनिकांचे प्रमाण कमी करुन ते ब्रिटीश सैनिकांच्या तुलनेत १:२ असे ठेवण्यात आले. हिंदी सैनिकांच्या ७७ पलटणी बरखास्त करण्यात आल्या व सैनिकांची संख्या २ लक्ष ८४ हजारावरुन १ लक्ष ४० हजारावर आणण्यात आली. हिंदी सैन्यामध्ये संघटन राहू नये यासाठी जात, धर्म, पंथ यावर आधारित पलटणी तयार करण्यात आल्या. शीख गुरखा, पंजाबी, रजपूत, मराठा, अशा पलटणी उभारल्या गेल्या याविषयी पंडित नेहरु म्हणतात. लष्करामध्ये देशातील विविध गटांची अशी काही व्यवस्था करण्यात आली की, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना तयारच होवू नये. इंग्रजांनी या गटांच्या आपल्या जाती - जमातीविषयीच्या निष्ठा वाढीस लावल्या. जनतेपासून लष्कर दूर ठेवण्याचा प्रत्येक प्रयत्न केला. एवढेच काय सैनिकांच्या हाती वर्तमानपत्रही न पडेल अशी व्यवस्था करण्यात आली.

ब्रिटीश सैनिकांची संख्या १८५७ च्या पूर्वी ४०,००० होती ती आता ६५,००० करण्यात आली. बंगाल इलाख्यात ब्रिटीश सैन्य व भारतीय सैन्य यांचे प्रमाण १:२ असावे तर हेच प्रमाण मुंबई मद्रास, इलाख्यात १:३ असावे असे ठरविण्यात आले. हिंदुस्थानातील सर्व महत्त्वाची ठिकाणे इंग्रज फौजेच्या हाती ठेवण्यात आली. लष्करी मोक्याची ठिकाणे, सरकारी खजिने, दारुगोळा व किल्ले यांचे संरक्षण गोऱ्या सैनिकांकडेच सोपवण्यात आले. तोफखाना हा लष्कराचा अत्यंत महत्त्वाचा विभाग असल्याने तो युरोपियन अधिकाऱ्यांच्याच ताब्यात असावा असे निश्चित करण्यात आले. सैन्य आणि तोफखान्यातील उच्च पदे फक्त युरोपियनासाठीच आरक्षित ठेवण्यात आली.

### ५. इंग्रजांचे सामाजिक सुधारणासंबंधीचे धोरण बदलले :-

सतीबंदी, बालविवाह प्रतिबंध, विधवाविवाह संमती अशा अनेक समाज सुधारणा करणारे कायदे खुद्द कंपनी सरकारने पुढाकार घेवून संमत केले. परंतु या सुधारणामुळे आपल्या धर्मावर
व संस्कृतिवर संकट कोसळले आहे असे भारतीयांना वाटू लागले. या सुधारणा करुन ब्रिटीश आपला धर्म बुडविण्याचा प्रयत्न करत आहेत असे हिंदूंना वाटू लागले. तर पाश्चात्य शिक्षणामुळे आपला धर्म बुडेल असे मुस्लिमांना वाटू लागले. परिणामी हिंदु व मुस्लिमांमध्ये असंतोष निर्माण झाला. १८५७च्या उठावाचे हे ही एक कारण होते, त्यामुळे उठावानंतर नव्या राजवटीने असे धोरण ठरविले की, इथून पुढे हिंदी समाजाच्या सुधारणेच्या चळवळीस आपण कायदे करुन प्रोत्साहन द्यायचे नाही.

पर्सिव्हल स्पिअर म्हणतो, सामाजिक सुधारणाशी सुरु असलेला सरकारचा मधुचंद्र संपला आणि सरकारने हिंदी समाजाच्या पारपांरिक समाजव्यवस्थेशी जमवून घ्यायचे ठरविले.

### ६. ब्रिटीश राजवटीबद्दल दहशत निर्माण झाली :-

१८५७ चा उठाव दडपून टाकण्यासाठी ब्रिटीशांनी कठोर मार्गाचा अवलंब केला. उठावाचा मोड करताना ब्रिटीश लष्करी अधिकाऱ्यांनी भारतीय शिपयांना तर ठार केलेच त्याबरोबरच हजारो निरपराध स्त्रीपुरुषांची त्यांनी कत्तल केली. जवळजवळ १ लाख लोकांना फासावर लटकवण्यात आले. गॅरेट म्हणतो इंग्रजांनी भारतीय कैद्यांना न्यायालयासमोर उभे न करताच ठार केले. हा निर्दयतेचा उच्चांक होता. भारतियांना ठार मारण्याचा ब्रिटीशांनी जो मार्ग अवलंबला तो अतिशय हीन दर्जाचा होता. ज्याला फाशी द्यायचे त्याला इंग्रज प्रथम बेदम मारहाण करीत, नंतर त्याच्या शरीरावरील केस उपटत, जवळच कत्तल केलेल्या लोकांचे रक्त सांडलेले असे ते रक्त त्यास जीभेने चाटावयास भाग पाडत. व इतकी विटंबना केल्यावर मग त्यास फासावर लटकविले जाई. इंग्रजांच्या कत्तलीतून वृध्द व बालकेही सुटली नाहीत. याबाबत एक ब्रिटीश अधिकारी म्हणतो. खरे म्हणजे म्हाताऱ्यांनी व मुलाबाळांनी आमचा काहीच गुन्हा केला नव्हता. परंतु दुष्ट बंडवाल्यावर जसा सूड उगविण्यात आला तसा आपल्या छातीवर तान्ही बालके पाजणाऱ्या मातावरही उगविण्यात आला. उठावाचा बीमोड करताना इंग्रजाच्या क्रौर्यास पारावार राहिला नाही. याचा परिणाम हिंदी लोकांच्या मनावर झाला. हिंदी लोकांच्या मनात इंग्रजाबद्दल दहशत व तिरस्कार निर्माण झाला. त्यामुळे ब्रिटीश राज्यकर्ते व भारतीय जनता यांच्यातील दुरावा वाढत गेला.

### ७. वर्णभेद प्रखर झाला :-

१८५७ च्या उठावाचा झालेला एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे या उठावामुळे ब्रिटीश व भारतीय यांच्यातील वंश - वर्णभेद प्रखर झाला. इंग्रजांच्या वंशश्रेष्ठत्वाच्या अंहकाराचे चटके १८५७ पूर्वीही भारतीयांना बसत होते परंतु उठावानंतर भारतीय, आणि युरोपियन यांच्यातील दरी अधिकच वाढली. भारतीयांनी सामर्थ्यसंपन्न ब्रिटीश सत्तेविरुध्द सशस्त्र उठाव करण्याची हिंमत करावी व त्यात शेकडो इंग्रज मारले जावेत हे सर्व ब्रिटीशांना धक्कादायक होते. त्यामुळे भारतीया विरुध्द त्यांची मने संतापाने व द्वेषाने भरुन गेली. ब्रिटीशांनी हिंदुस्थान तलवारीच्या बळावर जिंकून घेतला आहे व तलवारीच्या बळावरच तो टिकवून धरावा लागणार आहे, त्याकरिता भारतीयांना दडपून टाकणे आवश्यक आहे असे बहुसंख्य इंग्रज मुत्सद्यांना वाटू लागले. पंच या इंग्लंडमधील वृत्तपत्राने अर्धी गोरिला व अर्धा निग्रो असे भारतीयांचे व्यंगचित्र दाखवून अशांना इंग्रजासारखी उच्च दर्जाची सत्ताच नियंत्रणाखाली ठेवू शकते असे सूचविले. भारतात इंग्रजांनी एक राज्यकर्त्याची जात निर्माण केली. भारताला सभ्य, सुसंस्कृत बनविणे हे जणू काय ह्या नव्या जातीचे (गोऱ्यांचे) कर्तव्य आहे असा अभास निर्माण करण्यात आला. परिणामी वर्णभेद प्रखर होत जावून राज्यकर्ते व भारतीयामधील अंतर वाढत गेले.

### ८. राष्ट्रवादाचा उदय झाला

१८५७ च्या उठावात भारतीयांच्या पदरी अपयश आले. परकीय सत्ता उलथून टाकण्यात आलेले अपयश, त्यात झालेली मानहानी, उठावाचा बिमोड करताना कटूतेने व ब्रिटीशाबद्दलच्या संतापाने भरुन गेले. ब्रिटीश हे परकीय आहेत, त्यांच्या गुलामगिरीत आपण गेलेलो आहोत याची जाणीव भारतीयांना झाली. याविषयी स्वातंत्र्यवीर सावरकर लिहितात राज्यकर्तानिष्ठा व देशप्रेम यातील फरक जनतेस उमगला व राज्यकर्ताप्रेमाऐवजी देशप्रेमाने त्याची जागा घेतली. भारत सर्वाची मातृभूमी आहे अशी भावना निर्माण झाली. भारतातील प्रत्येक रहिवासी ऐकमेकांना ओळखण्याचा प्रयत्न करु लागला. संस्थानिकांच्या हिताऐवजी देशहिताकडे लक्ष केंद्रित झाले. क्रांतीच्या समाप्ती नंतर पुढील काळात राष्ट्रीय स्वातंत्र्य

चळवळीसाठी १८५७ ची क्रांती दीपस्तंभ ठरली. क्रांतीच्या अपयशामुळे राष्ट्रीयत्वाचे नवे रोपटे लावले गेले. भारत ही आपली मातृभूमी असून तिच्या मुक्ततेसाठी आपण सर्वांनी संघटितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. याबाबतची जाणीव भारतीय समाजाला झाली. यामधूनच भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. राष्ट्रवाद, राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही यासारख्या आधुनिक संकल्पनाची ओळख भारतीयांना पुढील काळात झाली.

**९. सनदशीर चळवळीचा पाया घातला गेला:-**

१८५७ च्या उठावात अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांची कत्तल करण्यात आली. अनेक ठिकाणे उठाववाल्यांनी ताब्यात घेतले, पण ब्रिटीशांच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रापुढे उठाववाल्यांचा निभाव लागला नाही. उठाव दडपला गेला. या अनुभवातून भारतीय विचारवंताना तिच्याविरुध्द सशस्त्र उठाव करणे म्हणजे आत्मघाताला आमंत्रण देणे आहे. सशस्त्र लढ्याने ब्रिटीशाना आपण देशाबाहेर घालवू शकणार नाही याची जाणीव उठाववाल्यांना झाली. यासाठी पाश्चात्य ज्ञान आत्मसात करुन सनदशीर मार्गने ब्रिटीशांना भारताबाहेर घालविता येईल व देश स्वतंत्र करता येईल. हा नवा विचार पुढे आला व या विचारामधून सनदशीर चळवळीने जन्म घेतला.

## ३.४ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

१) १८५७ च्या उठावाची प्रमुख कारणे सांगा.

२) १९५७ चा उठाव ही भारतीयांच्यातील ब्रिटीशाविरुध्द झालेली पहिली जागृती होती या मताशी आपण कितपत सहमत आहात?

३) १८५७ च्या उठावाचे परिणाम स्पष्ट करा.

४) १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कारणमिमांसा करा.

❖❖❖❖

# ४

# शेतकरी आणि आदिवासी चळवळ

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ शेतकरी चळवळ

४.२.१ बंगालमधील नीळ उत्पादनाविरुध्द बंड

४.२.२ बिहारमधील नीळ उत्पादनाविरुध्द बंड

४.२.३ दक्षिणेतील शेतकऱ्यांचे बंड

४.२.४ चंपारण्य सत्याग्रह

४.२.५ खेडा चळवळ

४.२.६ मोपला बंड

४.२.७ मुळशी सत्याग्रह

४.२.८ बार्डोली सत्याग्रह

४.२.९ कृषक संघम

४.२.१० आंध्रप्रदेश शेतकरी चळवळ

४.२.११ पंजाबमधील शेतकरी चळवळ

४.२.१२ पूर्व भारत

४.२.१३ बंगाल

४.२.१४ ओरीसा

४.२.१५ इतर प्रांत

४.२.१६ अखिल भारतीय किसान सभा

४.२.१७ शेतकरी सभा

४.३ आदिवासींच्या चळवळी

४.३.१ संथाळांची चळवळी

४.३.२ कोळी व रांपा जमातीचे उठाव

४.३.३ सरदारी लराई किंवा मुक्ती लराई चळवळ

४.३.४ मुंडा जमातीचा उठाव

४.३.५ गुजराथमधील देवी चळवळ

४.३.६ मीदनापूरमधील आदिवासी चळवळ
४.३.७ माल्दामधील जीतू संथाळची चळवळ
४.३.८ आसाममधील आदिवासी चळवळ
४.४ सारांश
४.५ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न
४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- भारतात ब्रिटिश कालखंडात शेतकरी व आदिवासी जमाती यांच्यावर झालेल्या अन्याय, अत्याचार व दडपशाहीची माहिती मिळेल.
- शेतकरी व आदिवासी जमातींनी अन्यायाच्या प्रतिकारासाठी केलेल्या चळवळीची माहिती मिळेल.
- ब्रिटिश वसाहतीच्या काळात शेतकरी व आदिवासी यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती कशी होती हे लक्षात येईल.
- ब्रिटिश वसाहतवाद्यांनी केलेल्या आर्थिक शोषणाची कल्पना येईल.
- आदिवासी समाजाच्या शांततामय जीवनात ब्रिटिश वसाहतवांद्यांनी हस्तक्षेप करून त्यांची जीवनपद्धती विस्कळीत केली, हे लक्षात येईल.
- शेतकरी व आदिवासी चळवळी मोडून काढण्यासाठी ब्रिटिशांनी केलेल्या हस्तक्षेपाची कल्पना येईल.
- जमीनदार, सावकार, व्यापारी, इ. वसाहतवाद्यांच्या हस्तकांनी शेतकऱ्यांवर केलेल्या अन्यायाची कल्पना येईल.
- शेतकरी व आदिवासी चळवळीचा राष्ट्रवादी चळवळीशी असलेला संबंध लक्षात येईल.
- शेतकरी व आदिवासी चळवळीची वैशिष्ट्ये समजतील.
- शेतकरी व आदिवासी चळवळीचे परिणाम लक्षात येतील.

## ४.१ प्रास्ताविक

ब्रिटिशपूर्व काळात भारतात ग्रामीण भागात शेतकरी स्वतंत्र होता. त्याचे जमीनीवर नितांत प्रेम होते. जमीन विकणे हा प्रकार क्वचितच होत असे. इंग्रजांच्या आगमनानंतर जमीन महसूल पद्धती, जमीन मालकी इत्यादीमध्ये अमूलाग्र बदल घडून आला. जास्तीत जास्त महसूल मिळविण्यासाठी त्यांनी जमीनदार वर्गाला हाताशी धरुन शेतकऱ्यांची पिळवणूक केली. शेतकऱ्यांनी जुलूम जबरदस्ती, अन्याय अत्याचार, पिळवूणक असह्य झाल्यानंतर प्रतिकाराला सुरवात केली. आपल्या हल्ल्याचे लक्ष कोण हा संभ्रम त्यांच्यात निर्माण झाला. मात्र काही काळातच वसाहतवादी परकीय सत्ता हाच आपला खरा शत्रू असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी वसाहतवादाच्या विरोधात चळवळ सुरू केली.

शेतकऱ्याप्रमाणेच आदिवासी जमातीच्या जीवनातही वसाहतवाद्यांनी हस्तक्षेप केल्याने त्यांनीही चळवळ सुरू केली. त्यांचे दैनंदिन जीवन शेती व जंगलावर अवलंबून होते. जंगलविषयक जाचक कायदे व आर्थिक शोषण वसाहतवाद्यांनी केल्याने आदिवासी जमातींनी हिंसक चळवळींना सुरूवात केली. जमीन व जंगलविषयक जाचक कायदे हे समान कारण असल्याने त्यांच्या चळवळीचा पाया व्यापक झाला. हजारो आदिवासी चळवळीत सहभागी झाले. परंपरागत शस्त्रास्त्रे घेवून लढणारे आदिवासी व प्रशिक्षित व सशस्त्र ब्रिटिश सैनिक यांच्या असमान संघर्षात हजारो आदिवासी मरण पावले. शेतकरी व आदिवासी चळवळींनी राष्ट्रवादी चळवळींना व्यापक बनविले.

## ४.२ शेतकरी चळवळ :

भारतात ब्रिटिशांच्या पिळवणूकीने शेतकऱ्यांच्या असंतोषाला जन्म दिला. शेतकऱ्यांनी काही काळ अन्याय सहन केला. परंतु सहनशक्ती संपल्यावर आपल्यावर अन्याय करणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विरोध करण्यास सुरवात केली. १८५८ नंतर राष्ट्रवादाचीही जागृती झाली होती. त्यामुळे राष्ट्रवादी चळवळींची सुरवात झाली. त्यांनी शेतकरी चळवळींना पाठींबा देण्याबरोबर आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न केला.

### ४.२.१ बंगालमधील नीळ उत्पादनाविरूद्ध बंड :

सर्वांना माहीत असलेला शेतकऱ्यांचा पहिला मोठा संघटित उठाव म्हणजे १८५९-६० मध्ये घडून आलेला बंगालमधील नीळ पीकवण्याऱ्या शेतकऱ्यांचा उठाव होय. बंगालमधील नीळ कारखानदार व मळेवाले शेतकऱ्यांना जबरदस्तीने नीळीचे पीक घेण्यास भाग पाडत होते. असे पीक ब्रिटिश कंपनी व व्यापाऱ्यांना कमी दराने विकावे लागत होते. नीळ उत्पादनाने जमीनीचा कस कमी होत असे व कालांतराने जमीनी नापीक होत असत. शेतकऱ्यांनी निळीचे उत्पादन घेण्यास नकार दिल्यास त्यांचा अनेक मार्गांनी छळ केला जात असे. प्रसिद्ध बंगाली लेखक दिनबंधू मित्र यांनी १८६० साली ‘निलदर्पण’ हे नाटक लिहून नीळ उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथांचे चीत्र रंगवले. त्यानंतर शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होवू लागल्या. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांनी नीळ उत्पादन कमी केले तर काहींनी उत्पादन पूर्वपणे बंद केले. बंगालमधील बुद्धिवाद्यांनी आपले बळ शेतकऱ्यांच्या बाजूने उभे केले. त्यामुळे सरकारला चौकशी आयोग नेमून शेतकऱ्यांचे उठाव सौम्य करण्याचा प्रयत्न करावा लागला. परंतु आयोगाने समस्या सुटल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष कायम राहून त्यांचे उठाव होवू लागले. १८६० च्या शेवटी सरकारने एक आदेश काढून शेतकऱ्यांवर नीळीच्या लागवडीची सक्ती केली जाणार नाही. त्याविषयीचे सर्व तंटे कायदेशीर मार्गानेच सोडविले जातील असे स्पष्ट केले.

### ४.२.२ बिहारमधील नीळ उत्पादनाविरूद्ध बंड :

बिहारमधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांनी दरभंगा व चंपारण्य याठिकाणी १८६६-६८ च्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर उठाव घडवून आणले पूर्व बंगालमध्ये शेतकऱ्यांनी १८७०च्या दशकात पुन्हा मोठे उठाव घडवून आणले. सामर्थ्यशाली व अन्यायी प्रवृत्तीच्या जमीनदारांनी आपल्या शेतावर काम करणाऱ्या कुळांवर, शेतकऱ्यांवर दडपशाही करणारे अनेक कायदे केले

होते. शेतकऱ्यांच्या जमीनी लुबाडणे, त्यांचा छळ करणे, बेकायदेशीरपणे त्यांची मालमत्ता जप्त करणे, इत्यादी अनेक मार्गांनी त्यांची पिळवणूक चालवली होती. जमीनीवरील कर मोठ्या प्रमाणात वाढविले होते. शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीवरील ताबा मिळवण्यापासून वंचित ठेवले. प्रत्येक वेळी सरकारी अधिकारी जमिनदारांची बाजू घेत. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळत नव्हता. १८७२ ते १८७६ या काळात शेतकऱ्यांनी कर देण्यास नकार दिला. जमीनदार व त्यांचे गुमास्ते यांच्याविरूद्ध शेतकऱ्यांचे उठाव घडून येवू लागले. सरकारने दडपशाहीचे कायदे करून शेतकऱ्यांची चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. सरकारने शेवटी जमीनदारांच्या दडपशाहीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

### ४.२.३ दक्षिणेतील शेतकऱ्यांचे बंड :

इ.स.१८७५ मध्ये महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांचे उठाव घडून आले. सरकारने महाराष्ट्रात रयतवारी महसूल पद्धत लागू केली होती. त्यामुळे जमीनदार व मध्यस्थांचा त्रास नव्हता. मात्र महसूलाचा दर खूपच मोठा होता. तो महसूल शेती उत्पान्नातून भरणे शक्य नव्हते. त्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. हे सावकार प्रामुख्याने मारवाडी व गुजराथी महाराष्ट्रात बाहेरून आलेले होते. कर्ज देताना ते शेतकऱ्यांबरोबर गहाण व्यवहार करीत असत. ते मोठ्या प्रमाणावर व्याज आकारणी करीत शेतकऱ्यांची सही घेतलेल्या कागदपत्रात परस्पर बदल करून सावकार जमीन आपल्या ताब्यात घेत असत. त्यामुळे शेतकरी व सावकार यांच्यात तणाव निर्माण झाले. अमेरिकेतील यादवी युद्ध संपुष्टात आल्यानंतर कापसाचे वाढलेले भाव कमी झाले. याचवेळी सरकारने शेतसारा वाढविला. त्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली.

सन १८७४ मध्ये शिरूर तालुक्यातील करडे या गावी काळुराम नावाच्या सावकाराने १५०/- रूपये कर्जाच्या वसुलीसाठी बाबासाहेब देशमुख या शेतकऱ्याचे घर जप्त करण्याचे आदेश न्यायालयाकडून मिळविले. गावकऱ्यांच्या विनंतीला न जुमानता घर पाडले. परिणामी सर्व उपऱ्या सावकारांनी आपल्या मागण्या मान्य कराव्यात यासाठी गावातील शेतकऱ्यांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. गावकरी त्यांच्या दुकानातून वस्तू विकत घेईनात व बलुतेदार त्यांना कोणतीही सेवा देत नव्हते. सावकार गावे सोडून तालुक्याकडे निघाले. आशा बहिष्काराची चळवळ लवकरच अहमदनगर, पुणे, सोलापूर व सातारा जिल्ह्यात पसरली. जेव्हा या सामाजिक बहिष्काराचा फारसा परिणाम होईना तेव्हा बहिष्काराचे रूपांतर शेतकऱ्याच्या उठावात झाले. पारनेर तालुक्यात सुपे या गावात शेतकऱ्यांनी १८७५ मध्ये सावकारांच्या घरावर व पेढ्यांवर हल्ले सुरू केले. शेतकऱ्यांनी आपली कागदपत्रे मिळवून त्यांची होळी केली. या मोहिमेचाही प्रसार झाला. आंदोलन दडपण्यासाठी सरकारला लष्कर व पोलीस यांची मदत घ्यावी लागली. सुमारे एक हजार शेतकऱ्यांना कैद केले. हे आंदोलन एवढे जबरदस्त होते की सरकारला शेतकऱ्याविरूद्ध साक्षीदारसुद्धा मिळाले नाहीत. शेवटी सरकारला दक्षिण बंड आयोगाची स्थापना करावी लागली. शेतकरी बंड करण्यास उद्युक्त का झाले याची चौकशी करण्याचे काम आयोगावर सोपविले. सरकारने ॲग्रिकल्पचर रिलीफ ॲक्ट (Agriculture Relief Act) पास केला. त्यानुसार काही प्रमाणात सावकारांपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले.

### ४.२.४ चंपारण्य सत्याग्रह :

काही बिहारी तरुणांनी चंपारण्य येथील शेतकऱ्यावरील अन्यायाकडे १९१६ साली झालेल्या काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनात. या प्रश्नाकडे गांधीजीचे लक्ष वेधले. गांधीजी चंपारण्य येथे मोतीद्दारी या गावी गेले असता सरकारने त्यांना जिल्हाबंदीचा आदेश दिला. तो आदेश मोडला व त्यांनी कैसर-ए-हिंद हे सुवर्णपदक सरकारला परत केले. त्यांनी सरकारला आपण शिक्षा भोगण्यास तयार असल्याचे कळविले.

चंपारण्य जिल्ह्यात नीळीच्या शेतीचे मालक इंग्रज होते ते स्थानिक शेतकऱ्यांवर जुलूम जबरदस्ती करीत होते. निळीची शेती करण्यासाठी जबरदस्ती करत होते. शेतकऱ्यांमध्ये प्रतिकार करण्याची क्षमता नव्हती. गांधीजींनी शेतकऱ्यांसाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यांच्या सत्याग्रहापुढे सरकारला नमते घ्यावे लागले. सरकारने त्यांच्यावरील खटला काढून घेतला. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत त्यांना सुधारणा कराव्या लागल्या.

### ४.२.५ खेडा चळवळ :

कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनानंतर खेडा जिल्ह्यातील दुष्काळाकडे महात्मा गांधीजींनी लक्ष दिले. पाऊस न पडल्याने लोकांची पिके बुडाली होती. तेथील शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतसारा देवू शकत नव्हते. दुष्काळी कायद्यानुसार शेतकऱ्यांना शेतसाऱ्यातून सुट मिळावयास हवी होती. परंतु सरकारने सारा माफ करण्याऐवजी सारा वसुलीबाबत शेतकऱ्यांवर जुलुम करावयास सुरुवात केली. त्यामुळे गांधीजीनी साराबंदीची चळवळ खेडा जिल्ह्यात सुरू केली. शेतकरी सरकारला सारा देणार नाहीत अशा घोषणेने चळवळीला सुरवात झाली. ही चळवळ यशस्वी झाली. याच चळवळीदरम्यान सरदार पटेल व गांधीजी यांचे संबंध निर्माण झाले.

### ४.२.६ मोपला बंड :

आठव्या व नवव्या शतकात केरळमध्ये येवून स्थायिक झालेल्या मुस्लिम शेतकऱ्यांना मोपला असे म्हणत. ते हिंदू जमीनदारांचे पट्टेदार म्हणून काम करीत. १९व्या शतकात जास्त कर, पट्टेदारीबाबत निश्चितता नसणे, इत्यादीबाबत त्यांच्या जमीनदारांबरोबर तक्रारी होत्या. त्यामुळे त्यांनी केरळमध्ये लहान मोठे २२ उठाव घडवून आणले. त्यात मोपल्यांनी हिंदु जमीनदार व अधिकाऱ्यांच्या हत्या केल्या. सरकारने मात्र त्यास धार्मिक दंगली असे नाव दिले. १९२१ मध्ये मोपल्यांनी मोठ्या प्रमाणावर बंडाला सुरवात केली. मोपल्यांच्या नेत्याला पकडण्यासाठी इंग्रज अधिकाऱ्याने तिरूरांगडीच्या मशिदीत प्रवेश केल्याने बंडाला सुरवात झाली. हिंदु सरकारला मदत करतात असा संशय असल्याने हिंदुंच्या विरोधात हिंसाचाराला सुरूवात झाली. बंड शमल्यानंतर हिंसाचाराला बळी पडलेल्या हिंदुंना आर्य समाजाने सर्वतोपरी मदत केली.

### ४.२.७ मुळशी सत्याग्रह :

पुण्याजवळ मुळशी येथे वीजनिर्मीतीसाठी धरण बांधण्यात येणार होते. धरणग्रस्तांना फारच कमी मोबदला देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. त्यामुळे सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रह घडून आला.

### ४.२.८ बार्डोली सत्यागह :

महसूल दराची दर दहा वर्षांनी फेरतपासणी होत असे. त्याप्रमाणे गुजराथमध्ये फेरतपासणी झाली. तेव्हा २५% साऱ्यात वाढ झाली होती. शेतकऱ्यांनी पटेलांची भेट घेतली. पटेलांनी अर्ज, विनंत्या करून पाहिले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे पटेल यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाला सुरवात झाली. सरकारी अधिकाऱ्यांनी दडपशाहीचे धोरण अवलंबिले. शेतकऱ्यांचा अनेक मार्गांनी छळ केला. परंतु शेतकरी डगमगले नाहीत. अखेर पटेल व सरकार यांच्यात तडजोड घडवून आणली. त्यानुसार अत्याचारांच्या चौकशीसाठी एव समिती नेमण्याचे सरकारने मान्य केले.

### ४.२.९ कृषक संघमः

केरळमध्ये समाजवादी काँग्रेस पक्षाच्या प्रयत्नामुळे शेतकरी चळवळ उभारण्यात आली. १९३४ पासून संघटनेच्या बांधणीला सुरवात केली. सरंजामी पट्टी रद्द करावी, जमीन धारणा नुतनीकरण शुल्क रद्द करावे, आगाऊ खंड वसुली रद्द करावी, इत्यादी मागण्यासाठी जमीनदारांकडे मोर्चा काढून आपल्या मागण्या मान्य करून घेत. कर्षक संघमने कुळकायदा दुरूस्तीसाठी आंदोलन करून ६ नोव्हेंबर १९३८ हा दिवस कुळकायदा दुरूस्तीदिन म्हणून पाळण्यात आला. कालीकत जवळ चेवायूर येथे अखिल मलबार कर्षक संघमचे संमेलन घेण्यात आले. पी. कृष्ण. पिल्लाई हे संमेलनाचे अध्यक्ष होते. समेलनात कुळकाद्यात दुरूस्ती करण्यात यावी म्हणून ठराव पास केला गेला होता.

### ४.२.१०आंध्रप्रदेश शेतकरी चळवळ :

आंध्रप्रदेश जमीन महसूलाच्या वाढलेल्या दरामुळे शेतकरी वर्गाने आंदोलन सुरू केले. त्याचबरोबर जमीनदारी पद्धतीविरूद्ध आंदोलनालाही सुरवात झाली. आंध्रप्रदेशात कुळ कायद्याच्या समस्येने सर्व शेतकऱ्यांना एकत्र आणले. आंध्रप्रदेशातील किनारपट्टीवरील शेतकऱ्यांत विशेष जागृती झाली होती. त्याभागात ‘आंध्रप्रदेश रयत संघटना’, ‘आंध्र जमीन रयत संघटना’, ‘भारतीय शेतकरी संस्था’ इत्यादी संघटना स्थापन झाल्या होत्या. त्यांनी सरकारविरूद्ध तसेच जमीनदारांविरूद्ध लढा दिला. १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराने जमीनदार पक्षाच्या उमेदवाराचा पराभव केला. शेतकऱ्यांनी बोब्बिली व मुंगाला येथील जमीनदारांविरूद्ध आंदोलन केले. जमीन कसण्याच्या व मासेमारीच्या प्रश्नावरून कालीपटनम् येथील जमीनदारांविरूद्ध आंदोलन करण्यात आले. १९३८ साली आंध्रप्रदेश शेतकरी परिषदेने काढलेल्या मोर्चात २००० शेतकरी सहभागी झाले होते. सततच्या मोर्चाने शेतकरी वर्गात जागृती घडून आली होती.

### ४.२.११ पंजाबमधील शेतकरी चळवळ :

इ.स. १९३०च्या दरम्यान पंजाबमध्ये किसान सभा स्थापन झाल्या होत्या. त्यामुळे शेतकरी वर्गात जागृती झाली होती. १९३७ मध्ये ‘नौजवान भारत सभा’, ‘कीर्ती किसान काँग्रेस’ व अकाली दलाच्या कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्नांनी शेतकरी वर्गात जागृती घडवून आणली. पंजाबमधील प्रांतीक मंत्रीमंडळात जमीनदारांचे प्राबल्य होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा रोख त्यांच्या दिशेने होता. सरकारने कालव्यावरील करात विलक्षण वाढ केल्याने शेतकरी संघटनांनी मोर्चा काढण्याचे ठरविले. शेतकऱ्यांनी जिल्हा मुख्यालयांवर मोर्चे काढले. लाहोर येथील मोर्चा विशेष प्रभावी ठरला. शेतकऱ्यांनी स्वतः होवून अटक करून घेतली.

मुलतानमध्ये माँटगोमरी जिल्ह्यात अनेक खाजगी संस्थांनी कालवा वसाहती क्षेत्रात सरकारकडून जमीनी खंडाने घेतल्या होत्या त्याठिकाणी बटाईदार जमीनी कसत होते. जमीनदारांनी त्यांच्यावर पूर्वी कायद्याने रद्द केलेले कर लावले. ते देण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांत जागृती करून संप पुकारला. शेतकऱ्यांनी तयार झालेला कापूस तोडण्यास नकार दिला. अखेर जमीनदारांना नमते घ्यावे लागले.

### ४.२.१२ पूर्व भारत :

बिहार : स्वामी सहजानंद सरस्वतींनी बिहार प्रांतात शेतकऱ्यांचे संघटन केले. त्यांचे सहकारी कार्यानंद शर्मा, राहूल सांकृत्यायन पंचानन शर्मा, यदुनंदन शर्मा इत्यादींनी गावोगाव फिरून जागृति केली. त्यासाठी शेतकऱ्यांचे मेळावे, सभा, संमेलने, निदर्शने यांचे आयोजन केले. १९३५ मध्ये किसान सभेने जमीनदारी नष्ट करण्याची घोषणा केली. ती अतिशय लोकप्रिय झाली. १९३८ मध्ये पाटण्यात एक लाख शेतकऱ्यांचा मेळावा घेण्यात आला. त्यात बेकायदेशीर कर रद्द करावेत, कुळांकडून जमीनी परत घेवू नयेत इ. मागण्या करण्यात आल्या. कुळांकडून काढून घेतलेल्या जमीनी परत द्याव्यात या मागणीसाठी रेबोरा येथे झालेले आंदोलन यशस्वी झाल्याने दरभंगा जिल्ह्यात आशा आंदोलनांची सुरवात झाली. सरण जिल्ह्यात चळवळीचे नेतृत्व जमुना कारजी याने केले. या चळवळींनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. याउलट जमीनदारांनी दहशतीच्या मार्गाचा अवलंब केला. पोलीसांनी शेतकऱ्यांना अटक करूनही चळवळ आटोक्यात येईना. शेवटी जमीनदारांना काही सवलती द्याव्या लागल्या.

### ४.२.१३ बंगाल :

बंगालमध्ये जमीनधारणेची शास्वती मिळणे, सरंजामी कर रद्द करणे, इतर करांचे प्रमाण कमी करणे, कर्जमाफी, कर्जात सवलत मिळणे, इत्यादी मागण्यांसाठी शेतकरीवर्ग संघटित झाला. बंकीम मुकर्जी याच्या नेतृत्वाखाली बरद्वान मधील शेतकऱ्यांनी दामोदर कालवा पाणीपट्टीवरून आंदोलन केले. एप्रिल १९३८ मध्ये २४ परगण्यातील शेतकऱ्यांनी कलकत्त्यात आपला मोर्चा नेला व बऱ्याच मागण्या मान्य करून घेतल्या.

इ.स. १९४६ मध्ये बंगालमधील बराईदारांनी ही चळवळ सुरू केली. बंगाल जमीन महसूल आयोगाने (प्लाऊड कमिशन) केलेल्या शिफारशीमुळे बराईदारांनी जमीनदरांना १/२ ऐवजी १/३ उत्पन्न देण्याचे ठरविले. तसेच धान्याचे वाटप होईपर्यंत धान्य जमीनदारांच्या गोदामात न ठेवता आपल्या ताब्यात ठेवण्याचे ठरविले. हजाँग येथिल शेतकऱ्यांनी आपल्याकडून वस्तुरूपात खंड घेण्याऐवजी पैशाच्या स्वरूपात घ्यावा अशी मागणी केली. शेतकरी सभेच्या नेतृत्वाखालील या चळवळीने जमीनदार विरूद्ध कुळे असे स्वरूप धारण केले. त्यातच सुऱ्हावर्दी मंत्रीमंडळाने ''बंगाल बरजदार टेंपररी एमुलेशन बील'' कलकत्ता गॅझेटमध्ये प्रसिद्ध केले. त्यामुळे आपल्या मागण्या मान्य होणार असे दिसताच शेतकऱ्यांनी आपली चळवळ सुरू केली. शेतकरी व जमीनदार यांच्यात संघर्ष होवू लागले. जमीनदार व सरकारच्या दडपशाहीमुळे ही चळवळ १९४७ मध्ये जवळ जवळ संपुष्टात आली.

### ४.२.१४ ओरीसा :

ओरीसातील शेतकरी चळवळीने ओरीसा प्रदेश काँग्रेस समितीकडून शेतकरी जाहीरनामा मंजूर करुन घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले. १९३७ मध्ये आलेल्या मंत्रीमंडळाने

शेतीविषयक कायद्याचा मसूदा मांडला. वेठबिगारी नष्ट करणे, खंडाचे प्रमाण कमी करणे या उद्देशांनी चळवळ चालविण्यात आली. या चळवळीत आदिवासी जमातीही सामिल झाल्या. धनकानाला या संस्थानात मोठ्या दंगली झाल्या. जमीनदारांच्या जुलमामुळे अनेक शेतकऱ्यांनी त्या संस्थानातून स्थलांतर केले.

**४.२.१४ आसाम :**

आसाममधील सुरमा खोऱ्यात खंडबंदीची चळवळ सुमारे सहा महिने सुरू होती. करुणासिंधू रॉय यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी कुळकायद्यात दुरूस्ती करण्यात यावी म्हणून आंदोलन सुरू केले.

**४.२.१५ इतर प्रांत :**

गुजराथमध्ये वेठबिगारीचे (हाळी बांधुआ) निर्मुलन व्हावे यासाठी चळवळ करण्यात आली. त्यात यशही मिळाले. याशिवाय मालगुजारी नष्ट व्हावी, शेतकऱ्यावरील कराचे प्रमाण कमी व्हावे, कर्जवसुली थांबवावी, इत्यादी कारणासाठी शेतकऱ्यांनी नागपूरपर्यंत मोर्चा नेला होता. खेड व सुरतच्या शेतकऱ्यांनी कर भरण्यास नकार दिला. त्यामुळे सरकारच्या रोषास बळी पडावे लागेल म्हणून त्यांनी बडोदा संस्थानात आश्रय घेतला. तरीसुद्धा सरकारने त्यंची मालमत्ता जप्त केली. उत्तर प्रदेशात गांधी-अयर्वीन करार झाल्यानंतरही महसूल बंदी चळवळीचे रूपांतर खंडबंदी चळवळीत झाले. महात्मा गांधीनी एक जाहीरनामा काढून त्यात शेतकऱ्यांनी कायदेशीर खंडाच्या ५०% खंड सरकारी तिजोरीत भरावा असे घोषित केले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. राष्ट्रीय चळवळीत्या कालखंडातील शेतकऱ्यांच्या चळवळींचा आढावा घ्या.

**४.२.१६ अखिल भारतीय किसान सभा :**

सविनय कायदेभंगाच्या चळवळीतून पुढे आलेल्या तरुण वर्गाने शेतकरी संघटना स्थापन करणे व आहेत त्या संघटना मजबूत करणे यावर भर दिला. १९३४ मध्ये समाजवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर डाव्या गटाला कार्य करण्यास वाव मिळाला. त्यातूनच शेतकऱ्यांच्या चळवळीत योग्य समन्वय साधण्यासाठी 'अखिल भारतीय किसान परिषद' स्थापन करण्यात आली. त्यासाठी एन.जी. रंगा व इतर शेतकरी नेत्यांनी पुढाकार घेतला. या परिषदेचे पुढे 'अखिल भारतीय किसान सभेत' रूपांतर झाले. किसान चळवळीचे प्रवर्तक म्हणून एन. जी. रंगा यांना ओळखले जाते. १९३७ नंतर गांधीजीनी ग्रामोद्योगावर भर दिला होता. त्याउद्देशाने फैजपूर येथे १९३८ साली काँग्रेसचे ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन भरविण्यात आले. पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली या अधिवेशनात गांधीजी 'जमीन सरकारची नाही, जमीनदारांचीही नाही तर ती कसणाऱ्यांची आहे' असे आपल्या भाषणात म्हटले.

मुंबई येथील अखिल भारतीय किसानसमीतीच्या बैठकीत किसान जाहिरनामा पूर्णत्वास आला. जाहिरनाम्यावर फैजपूर अधिवेशनाचा प्रभाव जाणवत होता. जमिन महसूल व खंडाचे प्रमाण पन्नास टक्क्यांनी कमी करावे. शेतकऱ्यांवरील कर्ज स्थगित करावे. सरंजामी पट्टी रद्द करावी. कुळांची जमीनधारा संरक्षित करावी. शेतमजूरांना योग्य वेतन मिळावे. किसान संघटनांना अधिकृत मान्यता मिळावी. इत्यादी प्रमुख मागण्या या जाहीरनाम्यात होत्या.

१९३७ साली कॉंग्रेसची मंत्रीमंडळे सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांसंबंधीत कायदे पास केले. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, आर्थिक मंदीच्या काळात शेतकऱ्यांचा जप्त केलेल्या जमीनी त्यांना परत मिळाव्यात व कुळांचे जमीनधारणेचे हक्क कायम रहावेत यासंबंधीचे कायदे पास केले. प्रांत, जिल्हा, तालुका, गाव अशा विविध स्तरावर शेतकरी परिषदा व बैठका होवू लागल्या. आशा परिषदांना भारतीय कॉंग्रेस नेते हजर राहून मार्गदर्शन करीत आणि शेतकरी परिषदांद्वारे राष्ट्रीय जागृती करत.

**४.२.१७ शेतकरी सभा :**

९ एप्रिल १९३९ रोजी अखिल भारतीय किसान सभेचे अधिवेशन गया येथे भरले. अध्यक्षपद नरेंद्रदेव यांनी भूषविले. सुमारे एक लाखापेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. शेकतकऱ्यांच्या मागण्यांकडे कॉंग्रेसने लक्ष द्यावे व शेतकऱ्यांनी कॉंग्रेस ही संघटना आपलीच आहे असे समजावे. लवकरच महायुद्ध सुरू होईल. कॉंग्रेसने देशव्यापी लढा द्यावयाचे ठरवले आहे. अशावेळी शेतकऱ्यांनी कॉंग्रेसला मदत करावी असे ठरवण्यात आले.

३ सप्टेंबर १९३९ रोजी दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे शेतकरी चळवळ थंडावली. सुरवातीला शेतकरी नेते महायुद्धात सरकारच्या विरोधात होते. परंतु हिटलरने रशियावर आक्रमण केल्याने व रशियाने दोस्तांच्या बाजूने भाग घेताच भारतातील साम्यवादी पक्षाने सरकारला पाठींबा दिला. त्यामुळे साम्यावादी शेतकरी नेते साम्यवादी नसलेले शेतकरी नेते यांच्यात दुही निर्माण झाली. पुढे भारत छोडो आंदोलन सुरू झाल्यावर साम्यवादी व राष्ट्रवादी नेते यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे शेतकरी सभेत १९४३ साली विभाजन झाले. त्याचवर्षी बंगालमध्ये दुष्काळ पडला. त्यामुळे दैनंदिन वस्तू महाग  झाल्या. त्यांचा तुटवडा निर्माण झाला. तेव्हा शेतकरी सभेने तो दूर करण्याचा प्रयत्न केला. महायुद्धानंतर सत्तांतराविषयी वाटाघाटी सुरू झाल्या. त्याबरोबर शेतकऱ्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले. जमीनदारी पद्धात नष्ट व्हावी म्हणून मागणी करण्यात येऊ लागली. आंध्रप्रदेश, त्रावणकोर, तेलंगणा इत्यादी ठिकाणी  त्याचे पडसाद उमटू लागले.

सुरवातीला शेतकऱ्यांची चळवळ त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूद्ध होती. या चळवळीत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर असल्याने ही जनसामान्याची चळवळ होती. त्यांचा रोख परदेशी मळेवाले, जमीनदार  व सावकार यांच्या विरूद्ध होता. या चळवळींचा प्रादेशिक विस्तारही मर्यादित होता. दीर्घकालीन सातत्य व संघटन यांचा अभाव होता. अत्यांतिक जुलूम अवाजवी व असामान्य शोषण व पिळवणूक आणि आपली शेती जाण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतरच शेतकरी उठाव करीत असत. जमीनदारी व सावकारी पद्धतीच्या विरोधात त्यांचा लढा नव्हता. तर जमिनीवरून हाकलून लावले जाईल, अवाजवी कर आकारणी व सावकाराची फसवाफसवी यांना त्यांचा प्रखर विरोध होता. अशिक्षित, आडाणी व निःशस्त्र असूनही

शेतकऱ्यांचे असामान्य धैर्य, समर्पण भावना, संघटनांची कुवत, जात व धर्म यांच्या पलीकडे जाणारी ऐक्य भावना इत्यादींची प्रचीती या लढ्यात दिसून आली. शेतकरी चळवळींचा वसाहतवादास विरोध नव्हता. वसाहतवादाची नवी व गुंतागुंतीची प्रक्रिया जाणून घेण्याची त्यांची कुवत नव्हती. त्यासाठी बुद्धीजीवी विचारवंत वर्गाची गरज होती. १९३७ नंतर काँग्रेसने शेतकरी चळवळींना काँग्रेसमध्ये सामावून घेण्याचा व आपल्या चळवळीला पाठींबा मिळवण्याचा प्रयत्न केला. या चळवळींचा प्रादेशिक विस्तार मार्यादित असला तरी वेगवेगळ्या प्रांतात अवलंविण्यात आलेले चळवळीचे मार्ग साधारणतः सारखेच होते. स्वातंत्र्य चळवळीच्या शेवटच्या कालखंडात शेतकरी चळवळ व स्वातंत्र्य चळवळ नेहमी एकमेकींवर आधारित होत्या. शेतकरी चळवळीने राष्ट्रवादी भूमिका स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय जागृती शहरापासून खेड्यापर्यंत जाऊन पोहोचली.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. अखिल भारतीय किसान सभेच्या कार्यावर थोडक्यात चर्चा करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ४.३ आदिवासींच्या चळवळी

बिटिशांची राजवट या देशात स्थापन झाल्यानंतर वसाहतवाद्यांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार आदिवासी समाजानेही केला. आदिवासींच्या चळवळी दोन प्रकारच्या होत्या. एक म्हणजे त्यांचे शोषण करणारे जे वर्ग होते त्यांच्याविरूद्ध चालवलेली चळवळ. त्या वर्गात जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी व ख्रिश्चन मिशनरी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. आदिवासींची दुसरी चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत होती. आदिवासी जमाती, जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार यांना परकीय समजत होत्या. १७६३ पासून आशा उठावांना सुरवात झाली. १८५७ च्या उठावापूर्वी भारतात संन्याशी उठाव (१७६३), चुआर उठाव (१७६८), फकीरांचे बंड (१७७६-१८००), तमार (Tamar) उठाव (१७८९), खेरवारच्या संथाळांची चळवळ (१८३३), हो जमातीचे बंड (१८२०), खासींचा उठाव (१८२४), कुकींचे बंड (१८२६), कोळ्यांचे बंड (१८३१), खोंड जमातीचा उठाव (१८३६), फराईसी व पागलपंथीयांचा उठाव (१८३८), सिंगपो जमातीचा उठाव (आसाम) उमाजी नाईकाचे बंड (१८२६), इत्यादी अनेक उठाव घडून आले होते. इ.स. १८५८ नंतर राष्ट्रवादाची जागृती व प्रसार होवू लागला होता.

### ४.३.१ संथाळांची चळवळ :

संथाळ ही आदिवासी जमात असून बंगाल, बिहार, ओरीसा या राज्यात संथाळांची वस्ती सर्वाधिक होती. सुरवातीला ते गंगेच्या खोऱ्यात रहात होते. नंतर ते छोटा नागपूरच्या

डोंगराळ भागात वस्ती करून राहू लागले. १८व्या शतकाच्या शेवटी जंगले तोडण्यास सुरवात झाल्यामुळे त्यांनी छोटा नागपूर सोडून ईशान्येकडील राजमहाल टेकड्यांकडे वस्ती केली. दमिन-इ-कोई हे त्यांनी आपले केंद्र बनविले. इंग्रजांनी जंगले तोडण्यासाठी व नवीन जमीन लागवडीखाली आणण्यासाठी संथाळांचा उपयोग करून घेतला. इंग्रजांनी त्या भागात जमीनदारी सुरू केली. बरचसे व्यापारी व सावकार त्यांनी त्या भागात आणले. त्यामुळे संथाळांची मोठी पिळवणूक सुरू झाली. संथाळांच्या जमिनी व्यापारी व सावकार यांनी बळकावून त्यांना आपले गुलाम केले. आपल्यावरील अन्याय नाहीसा करण्यासाठी संथाळांनी सुरवातीस सनदशीर मार्गाचा अवलंब केला. पण अधिकारी वर्गाने त्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संथाळ आक्रमक बनले. त्यांनी हिंसक मार्गांचा अवलंब केला.

इ.स. १८५४ च्या सुमारास माझी व परगणाईत हे आदिवासी जमातींचे पुढारी एकत्रित आले. त्यांनी ३० जून १८५५ रोजी भागानिधी येथे एक सभा घेतली. त्यांनी बंडाचा झेंडा उभारून उपरे व त्यांचे वसाहतवादी धनी यांना हाकलून लावण्याचा निर्णय घेतला. संथाळांचे नेते सिदो व कान्हू यांनी आपल्यावर देवाची मर्जी असून आपण स्वतः इंग्रजांशी लढाई करणार असून त्यात इंग्रजांचा पराभव अटळ आहे असे सांगितले. त्यामुळे आठ हजारपेक्षा जास्त संथाळ एकत्र आले.

ढोल व ताशे ही परंपरागत वाद्ये वाजवताच ते एकत्र येत. साधारणपणे दीड ते दोन हजार बंडखोरांची एक अशा तुकड्या तयार करण्यात आल्या. महाजन, जमीनदार, त्यांची घरेदारे, पोलीस ठाणे, रेल्वेमार्ग बांधण्याचे काम, पोस्ट, वाहने इत्यादी कामे डिंकूकडून केल्या जाणाऱ्या शोषणाच्या व वसाहतवादी सत्तेच्या सर्व प्रतिकांवर हे बंडखोर कडाडून हल्ले चढवू लागले. आदिवासी नसलेल्या उपऱ्या परंतु गरीबांनी आदिवासींना मदत केली. गवळी आणि इतरांनी साधानसामग्री आणि सेवा पुरविल्या. लोहांरानी बंडखोरांच्या टोळ्याबरोबर राहून त्यांची शस्त्रास्त्रे सज्ज केली.

सरकारने हा उठाव मोडून काढण्यासाठी सैनिकांच्या तुकड्या पाठवून उठाव व्याप्त प्रदेशात लष्करी कायदा पुकारला. बंडखोरांच्या नेत्यांना पकडण्यासाठी दहा हजार रूपयापर्यंत बक्षिसे जाहीर केली. १५००० पेक्षा जास्त संथाळांना ठार केले. अनेक खेडी उद्ध्वस्त केली. विश्वासघाताने सिदो संथाळास पकडण्यात आले. त्याला १८५५ मध्ये ठार केले. १८६६ मध्ये कान्हू पकडला गेला.

### ४.३.२ कोळी व रांपा जमातींचे उठाव :

इ.स. १८२० नंतर छोटा नागपूर भागातील कोळी जमातीने ब्रिटिशांची सत्ता स्थिरावत असताना उठाव केला. हजारो बंडखोरांना ठार मारल्यावरच ब्रिटिशांची सत्ता या भागात पुन्हा स्थिरावली. आंध्रप्रदेशाच्या किनार पट्टीतील रांपा या डोंगरी आदिवासींनी सरकारच्या पाठींब्याने मनसबदारांनी चालविलेल्या विध्वंसाविरूद्ध व जंगलनिर्बंधांविरूद्ध १८७९ च्या मार्च महिन्यात उठाव केला. बंडखोरांचा बिमोड करण्यासाठी सरकारच्या पायदळाच्या अनेक, घोडदळाची एक आणि खंदक खोदणाऱ्या व सुरूंग पेरणाऱ्या सैनिकांची एक अशा कित्येक पलटणी पाठवाव्या लागल्या. इ.स. १८८०च्या शेवटी उठावाचा शेवट झाला.

### ४.३.३ सरदारी लराई किंवा मुक्ती लराई चळवळ :

छोटानागपूरच्या डोंगराळ भागात ही चळवळ उदयास आली. आपल्या प्रदेशातून ब्रिटिशांनी आणलेल्या जमीनदारांना हाकलून देवून आपले जमिनीवरचे प्राचीन काळापासूनचे परंपरागत हक्क पुन्हा मिळविणे हा या चळवळीचा उद्देश होता. शेतजमीनीशी संबंधित चळवळ, पुनरूज्जीवन चळवळ व राजकीय चळवळ अशा तीन टप्प्यात ही चळवळ आकाराला आली. पहिल्या दोन टप्प्यात जमिनदार आणि त्यांची कुळे यांच्यातील संघर्ष हे वैशिष्ट्ये होते. जमीनदारांनी वाढविलेल्या भाडेपट्ट्याला विरोध करण्यासाठी आदिवासी कुळांनी चळवळ सुरू केली. जमीनदारांनी कर वाढविण्याबरोबर कुळांच्या जमीनी काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कुळे आणि जमीनदार यांच्यात वारंवार संघर्ष होऊ लागला. १८९० पासून सरदारी चळवळीने मिशनरी आणि सरकारी अधिकारी अशा सर्व युरोपीयनांच्या विरोधात संघर्ष सुरू केला. अशा युरोपियनांचा जमीनदारांना पाठींबा होता. आपल्यावरील सर्वप्रकारच्या अन्यायाला ब्रिटांश राजवट कारणीभूत आहे असे आदिवासी लोकांना वाटू लागले. त्यामुळे ब्रिटिश राजवटीचा शेवट केला तर आपणास पूर्वीचे चांगले दिवस परत मिळतील असे त्यांना वाटू लागले. सुरवातीस सनदशीर मार्गाने अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. परंतु अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असत. आपणास सनदशीर मार्गाने न्याय मिळत नाही हे पाहुन त्यांनी हिंसाचाराला सुरवात केली. धनुल्यबाण, भाले यासारख्या परंपरागत शस्त्रांचा वापर करून जमीनदार व अधिकाऱ्यांच्या हत्या घडवून आणल्या. सप्टेंबर १८९२ मध्ये चळवळीतील लोकांनी ठेकेदार, जमीनदार व जर्मन मिशनरी यांना मारण्याचा कट रचला. परंतु त्यांचा कट फसला. कटाच्या अंमलबजावणीसाठी योग्य नेता व नियोजनाचा अभाव होता. त्यानंतर त्यांना बिरसा मुंडाचे नेतृत्व लाभले.

### ४.३.४ मुंडा जमातीचा उठाव :

इ.स.१८९५ ते १९०१ या काळात बिरसा मुंडा याच्या नेतृत्वाखाली मुंडा या वन्य जमातीने उठाव (अलगुलान) केला. जहागीरदार, ठेकेदार, महसूलाचे मक्तेदार, व्यापारी व सावकार यांनी आदिवासींच्या सामाजिक जमीनमालकी पद्धतीवर घाला घातला होता. त्याविरूद्ध हे मुंडा सरदार तीस वर्षे संघर्ष करीत राहिले.

इ.स. १८७४ मध्ये एका गरीब बटाईदार कुटुंबात जन्मलेल्या बिरसाने जर्मन मिशनरी शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले होते. मिशनऱ्यांवर टिका केल्यामुळे त्याला शाळेतून काढून टाकले. या घटनेने तो युरोपीयनांचा कट्टर विरोधक बनला. तो म्हणत असे 'सर्व साहेब व मिशनरी यांची टोपी एकच आहे' १८९५ मध्ये आपणास दैवी साक्षात्कार झाल्याचे त्याने सांगितले. त्याच्याभोवती जमलेल्या हजारो मुंडा सरदारांनी त्याला नवा धार्मिक संदेश देणारा मुक्तिदाता मानले. मुंडा सरदारांच्या प्रभावाखाली या धार्मिक चळवळीने लवकरच शेतीविषयक व राजकीय आंदोलनाचे स्वरूप धारण केले. गावोगावी फिरून व मोठे मेळावे भरवून बिरसाने आपल्या अनुयायांची धार्मिक व राजकीय संघटना उभारली. १८९९च्या नाताळच्या पूर्वसंध्येला त्याने मुंडा राज्य स्थापन करण्यासाठी बंडाचा झेंडा उभारला. ठेकेदार, जहागीरदार, राजे व अंमलदार आणि ख्रिश्चन मिशनरी यांची हत्या करण्यास बंडखोरांना प्रोत्साहन दिले. प्रचलित कलियुगाऐवजी सत्ययुगाची स्थापना झाल्याचा दावा त्याने केला. उपऱ्या डिकूंशी लवकरच लढाई सुरू होईल व त्यांच्या रक्ताने येथील जमीन लाल झेंड्याप्रमाणे लाल होईल असे त्यांने जाहीर केले. बिगर आदिवासी गरीबांना मात्र त्याने त्रास दिला नाही.

मुंडा जमातीच्या मुक्ततेसाठी बिरसाने तलवारी, भाले, कुऱ्हाडी, धनुष्यबाण इत्यादी शस्त्रांनी सज्ज असलेले सहा हजार बंडखोर संघटित केले होते. दुर्दैवाने फेब्रुवारी १९०० मध्ये त्याला अटक झाली. व जून १९०० मध्ये तुरुंगात असतानाच तो मरण पावला. त्याचे बंड फसले. पण बिरसा लोकमानसात एक आख्याखिका बनला.

### ४.३.५ गुजरातमधील देवी चळवळ :

दक्षिण गुजरातमध्ये इ.स.१९२२-२३ च्या दरम्यानं सुरू झालेली देवी चळवळ सुरवातीला सामाजिक चळवळ होती. मांस खाणे, दारू किंवा ताडी पिणे, बकरी किंवा कोंबडी कापणे किंवा विकणे यासारख्या गोष्टीपासून आदिवासी लोकांनी दूर रहावे असा आदेश सालबाई देवीने दिला आहे, असे या चळवळीमध्ये गृहीत धरले होते. दारूपुरवठा करणाऱ्या पारसी आणि जमीनदारांवर बहीष्कार टाकावा. जे लोक देवीचे आदेश मानणार नाहीत त्यांना दुर्दैवाला, कदाचित मृत्युलाही सामोरे जावे लागते असा प्रचारत्यांनी केला. डिसेंबर १९२२ पर्यंत सुरत शहरासह आदिवासी परीसरात ही चळवळ पसरली. आपले शोषण करणाऱ्या वर्गांना या चळवळीने आपले लक्ष बनविले. दारूचा व्यापार करणारे पारसी, सावकार, जमीनदार, मुस्लीम यांच्याबरोबर काम करण्याचे नाकारले. पारसी लोकांची सावली आंगावर पडली तरी आदिवासी आंघोळ करू लागले.

सुरवातीला ही चळवळ धार्मिक किंवा सामाजिक स्वरूपाची असली तरी १९२२ पासून असहकार चळवळीचा भाग बनली. परदेशी कपड्यांची होळी करा व सरकारी शाळांवर बहिष्कार टाका असे आदिवासींनी सांगण्यास सुरवात केली. जलालपूर तालुक्यातील एका ताडी दुकानदाराला दंड म्हणून राष्ट्रीय शाळेला १२० रूपये देणगी द्यावयास लावली. १९२१पासून बार्डोली तालुक्यात गांधीजींच्या कायकर्त्यांनी आदिवासी समाजात कार्य करण्यास सुरवात केली होती. सविनय कायदेभंग चळवळीपूर्वीच गांधीजींनी आदिवासींना आपल्या चळवळीत सामावून घेण्यास सुरवात केली. आदिवासींनी राष्ट्रीय चळवळीला पाठींबा देण्यास सुरवात केली. काही काळात गांधीजीचे नाव देवी चळवळीशी जोडले गेले. त्यानंतर काँग्रेस नेत्यांनी बार्डोलीला भेटी देऊन देवी चळवळीच्या बैठकांना खादी वापरून देवीचा संदेश पसरविण्याचा सल्ला दिला. काँग्रेसने २१ जानेवारी १९२३ रोजी सरदार वल्लभभाई पटेलांच्या अध्यक्षतेखाली कालीपराज परिषद भरविली होती. या परिषदेला २०,००० आदिवासी हजर राहिले. या परिषदेने ताडीची झाडे तोडण्याचा, दारू दुकाने बंद करण्याचा व खादी वापरण्याचा संदेश देणारा ठराव पास केला. त्यानंतरच्या दोन दशकात आदिवासी चळवळीने गांधीजींच्या चळवळीला पाठींबा दिला.

### ४.३.६ मीदनापूरमधील आदिवासी चळवळ (१९१८-१९२४) :

मीदनापूरमधील जंगल महालातील संथाळ, भूमीजी व कुर्मी (महतो) या आदिवासी जमातींनी १७६० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात उठाव केला होता. परंतु ब्रिटिशांनी त्या प्रदेशात आदिवासींच्या जमीन प्रमुखांऐवजी जमिनदारांची नेमणूक केली. १९व्या शतकाच्या शेवटी बाहेरून आलेल्या जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण केले. इतर आदिवासी जमातीप्रमाणेच या प्रदेशातील आदिवासी जमातींचीही जमीनदार, सावकार, व्यापारी, यासारख्या उपऱ्यांकडून पिळवणूक होऊ लागली. आदिवासी जमातीमध्ये या उपऱ्यांबद्दल असंतोष निर्माण झाला.

जंगल महाल आणि शेजारच्या बंकुरा व सिंगभूम पट्ट्यात ब्रिटिशांविरूद्ध आदिवासींनी १९२१ ते १९२३ च्या दरम्यान चळवळ सुरू केली. १९२१ पर्यंत काँग्रेसचा या भागात फारसा संपर्क नव्हता. १९२१ पासून सी. आर. दास यांनी या भागात जागृती सुरू केली. त्यामुळे असहकार चळवळीशी सामांतर चळवळ सुरू झाली. युरोपीयन जमीनदारांनी 'मीदनापूर जमीनदारी कंपनी' स्थापना करून आदिवासींचे शोषण सुरू केले होते. काँग्रेसने जमीनदारी कंपनीविरोधात मोहिम सुरू केली. त्यांच्या जमिनीवर काम करणाऱ्या आदिवासींचा संप घडवून आणला. जमीनदारी कंपनीने न्यायालयात जाण्याचे ठरवले. दरम्यान संपाचे रूपांतर उठावात झाले.

जुलै १९२१ मध्ये २०० संतरत स्त्रियांच्या मोर्चाचे नेतृत्व शैलजानंद सेन यांनी केले. त्यांनी जमीनदारांच्या भाताच्या गाड्या आडविल्या. मे १९२१ मध्ये काँग्रेसने ७०० संथाळांची एक बैठक घेवून दारू पिण्यापासून दूर रहाण्याचे ठरविले. शैलाजानंद व मुरारी मोहन रॉय यांनी आदिवासींना परदेशी मालावर व विशेषतः कपड्यांवर बहीष्कार घालण्याचे आपल्या भाषणातून अवाहन केले. १९२२ मध्ये परदेशी कपड्यावर बहीष्कार घालण्याची मोहिम खूपच प्रसिद्धीस आली. आदिवासींनी काँग्रेसबरोबर आपले चांगले संबंध असल्याचे दाखवून दिले. १९२२ मध्ये चौरीचौरा प्रसंगामुळे गांधीजींनी चळवळ आचनकपणे बंद केली. परिणामी आदिवासींची चळवळ एकाकी पडली व बाहेरच्या संबंधापासून वंचित राहिली.

१५ ते २१मे १९१८ मध्ये मयूरभंजमधील संथाळांनी सरकारच्या विरोधात उठाव केला. आदिवासींची सक्तीने कामगार भरती केली जाणार होती. परंतु संथाळांच्या उठावामुळे सरकारला नोकर भरतीची योजना रद्द करावी लागली. १४ जून १९१८ रोजी संथाळांनी जंगलकायदा, चौकीदारी कर इ. बंधनांच्या विरोधात उठाव केला. संथाळांच्या एकत्रीत प्रयत्नांमुळे सरकारचे सर्व उपाय कुचकामी ठरले. संथाळांनी उठावाची व्याप्ती वाढवून सरकारच्या सर्व प्रकारच्या दडपशाहीतून सुटका करवून घेण्याचा प्रयत्न चालविला. ऑगस्ट १९२२ मध्ये आदिवासींनी जंगलांचा वापर करणे व तलावातून मासेमारी करणे हे आपले पारंपारिक हक्क असल्याचे ठासून सांगितले. पुढे ही चळवळ केवळ 'मीदनापूर जमीनदारी कंपनी' पुरती मर्यादित न राहता, भारतीय जमीनदारांच्या विरोधातही सुरू झाली.

### ४.३.७ माल्दा (Malda) मधील जीतू संथाळची चळवळ :

इ.स. १९२४ ते १९३२ च्या दरम्यान माल्दा जिल्ह्यातील जमीनदारांच्या विरोधात संथाळांनी चळवळ चालू केली. ही चळवळ राष्ट्रीय चळवळीबरोबर गुंफली गेली. जमीनदारांबरोबरच या संघर्षात स्वराज्य पक्षाने कुळांना पाठींबा दिला. त्यामुळे या चळवळीचा नेता जीतू संथाळचा स्वराज्य पक्षाबरोबर घनिष्ट संबंध आला. त्यामुळे या चळवळीला हिंदू जातीयवादाची छटा प्राप्त झाली होती. त्याभागातील आदिवासी समाजात काम करणारे स्वराज्य पक्षाचे कार्यकर्ते काशीश्वर चक्रवर्ती 'संन्याशी बाबा' या नावाने ओळखले जात होते. जीतू संथाळच्या मदतीने त्यांनी संन्याशी दल स्थापन केले. त्यांनी आदिवासींना त्यांची आदिवासी म्हणून असलेली ओळख सोडून दिल्यास हिंदू धर्मात त्यांना चांगला दर्जा देण्याचे आश्वासन दिले.

जीतूने १९२८ मध्ये संथाळांना जमीनदारांच्या पिकाची लूट करण्याच्या सूचना दिल्या. त्याने शेतकऱ्यांना कुळांचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर लुटीच्या खूपच घटना घडू लागल्या. ३ डिसेंबर १९३२ मध्ये जीतूने संथाळाच्या चळवळीचे हिंदुत्ववाद्यांच्या चळवळीत रूपांतर केले. पाडुआ या शहरातील आदीना मस्जीद ताब्यात घेऊन तिचे मंदिरात

रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजवटीचा शेवट होऊन आपले स्वतःचे राज्य निर्माण झाल्याचे घोषित केले. त्याचे स्वराज्य पक्षाशी असलेले संबंध आणि हिंदुत्ववादी चळवळीमुळे माल्दामधील राष्ट्रवादी हिंदुनी त्याला पाठिंबा दिला. या चळवळीने संथाळांना हलाखीच्या अवस्थेत आणून सोडले. या चळवळीच्या अपयशाचा परिणाम म्हणजे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्या, कुळांना त्यांच्या जमीनीवरून हाकलून लावले, जमीनदारांनी जादा दराने कर आकरणी करण्यास सुरवात केली, आदिवासीचे इतरही मार्गांनी शोषण होवू लागले. या सर्व समस्या १९३०च्या दशकात वाढीस लागल्या.

### ओरिसातील आदिवासी आणि राष्ट्रीय चळवळ :

ओरीसा आणि बिहारमधील कटक, पुरी, बालासोर, अंगुल, खोडमाला या ओरीसा विभागात ही चळवळ विस्तारित झाली होती. शेतकऱ्यांसह आदिवासी जमातींनी १९२० व १९३०च्या दशकात राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन कर भरण्यास नकार दिला. फेब्रुवारी १९२२ मध्ये शेतकरी आणि आदिवासींनी जंगलात धाडी घालून जंगल कायदा मोडला. शेतकऱ्यांनी कर भरण्याचे नाकारले. जे कर भरतील त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. मे १९२१ मध्ये सरकारने १४४ कलम पुकारून अनेक आदिवासींना अटक केली. त्यामुळे भुयान आदिवासी संतप्त झाले व त्यांनी सुपरीटेंडेंटच्या बंगल्याला घेराव घातला. मात्र सरकारने अटक केलेल्यांना न सोडता तुरूंगात टाकले. ही चळवळ हळुहळु शांत पुढील काही दिवसात झाली.

अल्लुरी सीताराम यांच्या रांम्पा उठावाने ओरीसातील आदिवासींना जंगल कायद्याविरूद्ध उठाव करण्यास प्रोत्साहित केले. १९२० ते १९३० च्या दरम्यान गुणपूरच्या आदिवासींनी कर न भरण्यासाठी संघर्ष सुरू केला. त्यांनी जंगलविषयक कायदे मोडण्यास सुरवात केली. त्यांना नियंत्रणात आणणे कठीण झाले. खोंड आदिवासींनी सुद्धा कर भरणे बंद केले. त्यांनी पोलीसांवर हल्ले केले. त्यामुळे अनेक जणांना अटक झाली. जमीनदार, सावकार यांची दडपशाही, व शोषण, पिळवणूक आणि दोष पूर्ण जंगल कायदे यामुळे कोरापत आणि गंजम प्रदेशातील आदिवासींनी सविनय कायदेभंग चळवळीला चांगलाच प्रतिसाद दिला.

### ४.३.८ आसाममधील आदिवासी चळवळ :

ब्रिटिशकालीन आसाम प्रांत १८७३ मध्ये आकारास आला. तत्कालीन आसाम प्रांतात आसाम, नागालँड, मेघालय व मिझोराम इ. प्रदेशाचा समावेश होत होता. याप्रदेशावर ब्रिटिशांचे अतिक्रमण होऊ लागल्याने आदिवासींनी विरोध करण्यास सुरवात केली. आसाममधील आदिवासींनी १८५७ च्या उठावापासून प्रेरणा घेतली. १८६० मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात दोन प्रमुख उठाव घडून आले. एक म्हणजे जैंतीया डोंगराळ भागातील व दुसरा नावगाँग (Nowgong) प्रदेशातील उठाव. हे उठाव प्रामुख्याने, करामध्ये वाढ झाल्याने घडून आले होते. वाढविलेल्या करांच्या विरोधात खासी या आदिवासी जमातीने आपल्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली धनुष्य व बाण यांच्या सहाय्याने लढण्यास सुरूवात केली. १८६३ पर्यंत त्यांनी शरणागती स्वीकारली नाही. शेवटी सैन्य पाठवून त्यांना पराभूत केले. १८६० मध्ये नावगाँग जिल्ह्यातील (Poppy) कॉफी उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध संघर्षास सुरवात केली. या संघर्षाचे कारणही वाढविलेला कर हेच होते. तसेच या शेतकऱ्यांना पान आणि सुपारी उत्पादनावरही वाढीव कर घेण्यास सुरवात केली होती. सरकारी अधिकाऱ्यांनी वाढविलेल्या कर गोळा करण्यासाठी बळाचा वापर करण्यास सुरवात केली. नावगाँग प्रदेशातील विशेषतः फुलांगुरी भागातील आदिवासींनी ब्रिटिशांच्या विरोधात जोरदार

चळवळ सुरू केली. त्यांनी जैंतीया डोंगराळ प्रदेशातील आदिवासींच्या उठावापासून प्रेरणा घेतली होती.

आदिवासी प्रदेश ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यात समाविष्ट करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र आर्थिक आणि सामाजिक जीवनपद्धती होती. जमीन आणि जंगल ही त्यांच्या चरीतार्थाचे प्रमुख साधने होती. ब्रिटिशांनी त्यांच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर वसाहतवादी धोरणांचा अवलंब करून आदिवासींची जीवनपद्धती विस्कळीत केली. नवे कायदे जमीनदारी, कारखानदारी, मध्यस्थ, सावकारी इ. सर्व वसाहतवादाचे हस्तक आदिवासी जमातींना आपले शत्रू वाटू लागले. आदिवासी जमातींनी सुरवातीला आशा (डिकू) उपऱ्याविरूद्ध संघर्ष चालू केला. नंतर त्यांच्या चळवळीने वसाहतवादा विरोधी स्वरूप धारण केले. त्यांची चळवळ प्रामुख्याने हिंसक स्वरूपाची होती. जमीनदार, सावकार यासारख्या उपऱ्यांवर हल्ले करून त्यांना ठार करून त्यांची घरेदारे पेटवून दिली. सरकारने शांतता प्रस्थापित करण्याच्या नावाखाली त्यांना गुन्हेगार जाहीर केले. त्यांना तुरूंगात डांबून अनेकांना फासावर लटकविले. या आदिवासी जमातीच्या चळवळी राष्ट्रीय चळवळीशी फारशा सलग्न नसल्या तरी काही ठिकाणी त्या समांतर होत्या.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. तुमच्या अभ्यास कालखंडातील आदिवासी चळवळींचा थोडक्यात आढावा घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.४ सारांश

वसाहतवादी ब्रिटिशांच्या काळात शेतकरी व आदिवासी या असंघटित सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या व ब्रिटिश सरकार व त्यांच्या मध्यस्थांच्या विरोधात उठाव घडवून आणले. शेतकऱ्यांच्या चळवळी सुरवातीस असंघटीत स्वरूपात होत्या. कालांतराने त्या त्या प्रदेशातील शेतकरी एकसारख्या समस्यांमुळे एकत्र आले. महात्मा गांधीजींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरवात केल्यानंतर शेतकरी चळवळ व राष्ट्रीय चळवळ यांचा संबंध येऊ लागला. सविनय कायदेभंग चळवळीनंतर शेतकरी चळवळीला राजकीय स्वरूप येऊ लागले. समाजवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर अखिल भारतीय किसान परिषद स्थापन झाली. त्यामुळे शेतकरी चळवळ राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचली.

आदिवासी चळवळी सुरवातीपासून शेवटपर्यंत आपापल्या भागापुरत्या मर्यादित राहिल्या. त्यांचे दैनंदिन जीवन अवलंबून असलेल्या जमीनपद्धती व जंगले यांच्या वापराच्या पद्धतीत ब्रिटिशांनी बदल घडवून आणला हेच त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होते. आदिवासी जमातींनी आपापल्या जमातीच्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली हिंसक चळवळी केल्या. जमात प्रमुख आपणास दैवी शक्ती प्राप्त झाल्याचे किंवा जादू जादूटोणा येत असल्याचे सांगत.

ब्रिटिशांबरोबर होणाऱ्या संघर्षात आपलाच विजय होणार असे सांगून आपल्या जमातीचा पाठिंबा मिळवत. एका बाजूला धनुष्यबाण, भाले यासारख्या परंपरागत शस्त्रांनी सज्ज आदिवासी व दुसऱ्या बाजूला आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज, प्रशिक्षित ब्रिटीश सैनिक यांच्यातील असमान संघर्षात हजारो आदिवासी मरण पावले.

## ४.५ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न :

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. वसाहतकालीन भारतातील शेतकरी चळवळींची माहिती द्या.
२. वसाहतकालीन भारतातील आदिवासी जमातींनी केलेल्या चळवळींची माहिती द्या.
३. शेतकरी चळवळी व राष्ट्रीय काँग्रेस यांच्या संबंधाची माहिती द्या.

**ब) टिपा लिहा.**

१. बंगालमधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांचे बंड
२. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उठाव
३. मोपला बंड
४. आंध्रप्रदेशातील शेतकरी चळवळ
५. पंजाबमधील शेतकरी चळवळ
६. पूर्व भारतातील शेतकरी चळवळ
७. अखिल भारतीय किसान सभा
८. संथाळांची चळवळ
९. मुक्ती लराई चळवळ
१०. मुंडा जमातीचा उठाव
११. देवी चळवळ
१२. आसाममधील आदिवासी चळवळ

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


- डॉ. बिपीन चंद्रा - भारताचा स्वातंत्र्य लढा
- डॉ. विभा आठल्ये - आधुनिक भारताचा इतिहास
- डॉ. य. दि. फडके - विसाव्या शतकातील महाराष्ट्र
- डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर - आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९८६)
- आचार्य श. द. जावडेकर - आधुनिक भारत
- B. Kuppaswamy - Social Change in India.


❖❖❖❖

# ५

# शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी

# Social of Religious Reform Movements.

**अनुक्रमणिका**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ पाश्चात्य शिक्षणाचा विकास व परिणाम

५.२.१ ब्रिटिश पूर्वकाळातील शिक्षण व्यवस्था

५.२.२ ख्रिस्ती मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य

५.२.३ ब्रिटिश कंपनीच्या राज्यकर्त्यांचे शिक्षण विषयक धोरण

१. लॉर्ड मेकॉलेचा शिक्षण विषयक प्रस्ताव

२. १८४०-१८५४ या काळातील शिक्षणाचा विकास

३. चार्लस वूडचा खलिता

५.२.४ १८५८ नंतरची प्रगती

१. हंटर आयोग व त्याच्या शिफारसी

२. लॉर्ड कर्झन व सॅडलर कमिशन

५.२.५ भारतीय समाजावरील परिणाम

५.३ भारतीय सामाजिक - धार्मिक सुधारणा चळवळी.

१. राजाराम मोहन रॉय आणि ब्राम्हो समाज

अ) धार्मिक कार्य ब) सामाजिक कार्य क) शिक्षण प्रसार

२. प्रार्थना समाज

३. आर्यसमाज

४. रामकृष्ण परमहंस

५. स्वामी विवेकानंद

६. थिऑसॉफिकल सोसायटी

७. सत्यशोधक समाज

५.४ सारांश

५.५ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

## ५.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- भारतात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रबोधनाची पहाट कशी झाली हे समजते.
- एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक दृष्ट्या कसा महत्त्वाचा होता हे समजते.
- भारतात पाश्चात्य शिक्षणाची सुरूवात कशी झाली हे लक्षात येते.
- भारतात पाश्चात्य शिक्षणाचा विकास कसा झाला हे लक्षात येते.
- पाश्चत्य शिक्षणाचे भारतावर काय परिणाम झाले. हे समजते.
- पाश्चत्य शिक्षण व भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी यांचा परस्पर संबंध हे लक्षात येते.
- सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीची व्याप्ती लक्षात येते.
- भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाच्या दृष्टीने सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींचे महत्त्व समजते.

## ५.१ प्रास्ताविक

जगात प्रथम युरोपमध्ये इ.स.च्या सोळाव्या शतकात प्रबोधनाची किंवा पुनरुज्जीवनाची चळवळ सुरु झाली. प्रबोधनाच्या विचारामागे नवजागरणाची कल्पना होती. आपली ओळख, आपली अस्मिता आपल्या स्वत्वाबद्दलचा अभिमान विसरून युरोपियन समाज सुमारे एक हजार वर्षे अवस्थेत होता. त्यास स्वतःची ओळख पटलेली नव्हती. पण सोळाव्या शतकात या निद्रिस्त समाजाची निद्रा भंग पावली. एक हजार वर्षाच्या दीर्घ निद्रावस्थेतून युरोपियन समाज जागा झाला. त्याला आत्मबोध झाला. हा आत्मबोध म्हणजेच युरोपमधील प्रबोधन होय. या प्रबोधनामुळे युरोपमधील धर्मसुधारणा व समाज सुधारणा चळवळी सुरू झाल्या. भारतात प्रबोधनाची चळवळ त्यामानाने खूप उशीरा सुरू झाली. इ.स. १४५३ मध्ये कॉस्टॉटिनोपल शहराचा पाडाव करून जसा तुर्कानी यूरोपियन समाजास धक्का दिला आणि तेथे नव्या परिवर्तनाची सुरुवात झाली. त्याप्रमाणे इंग्रजांनी भारतात इ.स. १८१८ मध्ये मराठ्यांचे साम्राज्य नष्ट करून आपली सत्ता निर्माण केली. त्यामुळे भारतीय समाजाला मोठा धक्का बसला. त्यातूनच भारतीय समाजात आत्मपरिक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. इंग्रजांनी आपल्या सत्तेबरोबर भारतात इंग्रजी शिक्षण सुरू केले. त्यामुळे भारतात प्रबोधनाची सुरूवात झाली. भारतीय प्रबोधनात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद आणि समाजसुधारणा या कल्पना महत्त्वाच्या होत्या. भारतात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या पर्श्वभूमीवर समाजसुधारणा व धर्मसुधारणा चळवळी सुरू झाल्या व भारतीयांनी एका नव्या यूगात प्रवेश केला.

१९व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरू झालेल्या नव्या पाश्चात्य शिक्षण पद्धतीमुळे भारतीय समाजाला एक नवी दिशा मिळाली. पाश्चात्य शिक्षण, इंग्रजी भाषा, वृत्तपत्रे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात जागृती होऊन तो हळूहळू विचारशिल आणि गतिशील बनला. भारतीय समाज हा वर्षानुवर्षे जाती-उपजातीच्या शृंखलेत अडकला होता. अंधश्रद्धा, धर्माचा प्रचंड प्रभाव, कर्मकांडाचे स्तोम, रूढी परंपरा, स्त्री उपेक्षा, शब्द प्रामाण्य व सामाजिक विषमता इत्यादीत अडकून गतिहीन झाला होता. अशा या समाजाला पाश्चात्य शिक्षणामुळे चेतना मिळाली, त्यातूनच भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ सुरू झाली. या चळवळीमुळे भारतीय समाजात वैचारिक जागृती होऊन अंधानुकरण, धर्मश्रद्धा व शब्द प्रामाण्याची जागा बुद्धी प्रामाण्याने घेतली. या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा परिणाम राजकीय चळवळीवर झाला. भारतीय राष्ट्रवादाला या चळवळीमुळे खतपाणी मिळाले. एका बाजूला भारतात ब्रिटिश सत्ता स्थिर होत असताना दूसऱ्या बाजूला सामाजिक व धार्मिक चळवळींचा प्रभाव वाढत गेला. म्हणूनच पाश्चात्य शिक्षणाचा विकासाचा व त्याच्या परिणामांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच सामाजिक व धार्मिक चळवळींचा भारतीय राष्ट्रवादाच्या विकासावर कसा परिणाम झाला हे पहाणेही आवश्यक आहे. म्हणूनच या प्रकरणात पाश्चात्य शिक्षणाचा विकास व धार्मिक व सामाजिक चळवळींचा भारतीय राष्ट्रवादाच्या विकासावरील परिणाम यांची चर्चा केली आहे.

### ५.२.१ पाश्चत्य शिक्षणाचा विकास व त्याचे परिणाम

१९व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात इंग्रजांनी आपली सत्ता स्थिर केली. आपली सत्ता मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रशासनासह अनेक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. भारतातील आपले प्रशासन पहाण्यासाठी त्यांनी हिंदी लोकांना इंग्रजी शिक्षण देऊन त्यांना नोकर म्हणून तयार करावे म्हणून त्यांनी आपल्या शिक्षण पद्धतीचा विकास केला. इंग्रजांनी स्वार्थी हेतूने शिक्षण पद्धतीचा विकास केला हे खरे पण त्या इंग्रजी शिक्षणामुळे आमच्या समाजात आधुनिक दृष्टिकोण, राष्ट्रवाद, यांचा विकास होऊन प्रबोधन सुरू झाले. म्हणून इंग्रजी शिक्षणाचा विकास कसा झाला हे पहाणे आवश्यक आहे.

### ५.२.१ ब्रिटिश पूर्वकाळातील शिक्षण:

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे हे आम्हाला ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दाखवून दिले. ब्रिटिशपूर्वकाळात भारतीय राज्यकर्त्यांनी शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली नव्हती. त्यामुळे खाजगी व मर्यादीत स्वरूपात शिक्षण देणाऱ्या काही पाठशाळा अस्तित्वात होत्या. त्या परंपरागत पद्धतीचे शिक्षण दिले जात होते. शिक्षण समाजातील विशिष्ट वर्गापुरते मर्यादित होते. ब्राह्मण व क्षत्रिय वर्गातील मुलांना शिक्षण मिळत होते. कनिष्ठ वर्गाला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे वर्षानुवर्षे हा समाज शिक्षणापासून दूर राहिला. ब्रिटिशांच्या आगमनानंतर मात्र हे शिक्षणाचे स्वरूप हळूहळू बदलत गेले.

### ५.२.२ ख्रिस्ती मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य :

युरोपियन व्यापारी ज्यावेळी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले त्यावेळी त्यांच्याबरोबर अनेक ख्रिश्चन मिशनरी धर्मप्रसाराचे कार्य करण्यासाठी भारतात आले होते. ख्रिस्तीधर्माचा भारतात प्रसार करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. भारतातील गोरगरिबांना मदत करून तसेच आजारी, दु:खी, अडल्या-नडलेल्यांना मदत करून, त्यांच्याशी सेवानिवृत्तीने वागून प्रथम या लोकांची मने जिंकावयाची व नंतर त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावयास भाग

पाडावयाचे ही त्यांची पद्धत होती. त्यामुळे त्यांनी सर्वप्रथम सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. पोर्तुगिज सर्वप्रथम व्यापारासाठी भारतात आले. त्यांनी व्यापाराबरोबर आपल्याबरोबर आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांना धर्मप्रचार करण्यास प्रोत्साहन दिले व मदतही केली. त्यामुळे ते भारतात अप्रिय ठरले आणि त्यांची सत्ता गोव्यापुरतीच मर्यादित राहिली. म्हणूनच भारतात व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी आपल्या नियंत्रणाखालील प्रदेशांत ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्मप्रसाराच्या कार्यास व इतर सामाजिक व शैक्षणिक कार्यास विरोध केला. त्यामुळे १८०७ मध्ये टेलर या ख्रिस्ति मिशनऱ्यांस इंग्रजांनी मुंबईमध्ये राहाण्यास परवानगी दिली नाही तसेच डॉ. विल्यम कॅरे या मिशनऱ्याला आपले मुद्रणालय कलकत्त्याहून श्रीरामपूरला डॅनिश वसाहतीत हलविणे भाग पडले. मात्र १८१३ च्या सनदी कायद्याने इंग्रजांनी मिशनऱ्यांना भारतात पाश्चात्य ज्ञानाचा व ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी परवांनगी दिली. त्यानंतर अनेक मिशनरी भारतात येऊन आपले काम करू लागले.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतात सर्वप्रथम शिक्षण प्रसारात अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. कलकत्ता शहराच्या उत्तरेस असलेल्या श्रीरामपूर येथील डॅनिश मिशनऱ्यांनी सुरूवातीला फार मोठे कार्य केले. विल्यम कॅरे, त्याचा मुलगा फेलिक्स कॅरे, जॉन माशीमन व त्याची पत्नी यांनी संस्कृत, बंगाली, हिंदी, मराठी अशा भारतीय भाषांचा अभ्यास करून पाश्चात्य ज्ञान भारतीय भाषात उपलब्ध करून दिले. विल्यम वॉर्ड याने मुद्रणालय काढून बायबल हा ग्रंथ बंगाली भाषेत उपलब्ध करून दिला. इंग्रजी भाषेतील अनेक मौल्यवान ग्रंथांची भारतीय भाषात भाषांतरे करून दिली. त्यांनी कलकत्ता, ढाक्का व चित्तगांव इ. ठिकाणी इंग्रजी भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. १८१८ मध्ये श्रीरामपूर येथे बॅप्टीस्ट मिशन कॉलेज सुरू केले. १८१९ मध्ये अमेरिकन मिशनऱ्यांनी कलकत्ता येथे हिंदू मुलीसाठी पहिली शाळा सुरू केली.

महाराष्ट्रात अमेरिकन मिशनने १८१३ पासून शिक्षण प्रसाराचे कार्य सुरू केले होते. गॉर्डन हॉल यानी १८१८ पर्यंत खेतवाडी गिरगाव येथे अनेक शाळा सुरू केल्या होत्या. त्यांनी १८२४ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. १८२९ पर्यंत मुलींना शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या नऊ झाली. श्रीमती ह्यूम यांनी मुलीसाठी वसतिगृह व शाळा सुरू केल्या. डॉ. विल्सन यांनी मुंबईमध्ये मुस्लिमांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. पुढे १८३५ मध्ये मुंबई येथे उच्च शिक्षणासाठी 'सेंट्रल कॉलेज' सुरू केले. त्याचेच पुढे 'विल्सन कॉलेज' मध्ये रूपांतर केले. त्यांनी केलेल्या शिक्षण प्रसाराने विशेषतः कनिष्ठ जातीतील मुलांना व स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली हा महाराष्ट्रातील शिक्षणाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा होय.

### ५.२.२ ब्रिटिश राज्यकर्त्यांचे शिक्षण विषयक धोरण:

इंग्रजांनी भारतात आपली राजकीय सत्ता वाढवित असताना भारतीय लोकांच्या सामाजिक व धार्मिक गोष्टीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे शिक्षणाकडे त्यांनी सुरवातीला दुर्लक्षच केले. मात्र काही इंग्रज अधिकाऱ्यांना भारतातील प्रचलित शिक्षणपद्धतीला प्रोत्साहन देऊन त्याचा आपल्या प्रशासन कार्यासाठी उपयोग करून घ्यावा असे वाटत होते. कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधिश सर विल्यम जोन्स यांनी १७८४ मध्ये कलकत्ता येथे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना करून पाश्चात्य साहित्याचा भारतीयांना परिचय करून देण्याचा प्रयत्न केला. गर्व्हनर जनरल वॉरन हेस्टिंग्जने १७७१ मध्ये प्रतिष्ठित मुस्लीमांच्या मागणीनुसार 'कलकत्ता मदरसा'ची स्थापना केली.

त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे १७८१ मध्ये बनारस येथे जोनाथन डंकन यांनी संस्कृत महाविद्यालय सुरू केले. पण १८१३ पर्यंत इंग्रजांनी भारतातील शिक्षणाचा प्रश्न लोंबकळत ठेवला होता. ग. ज. मिंटो, चार्लस् ग्रँट यांनी कंपनीच्या संचालकांचे भारतातील शिक्षणाच्या संदर्भात मन वळविण्याचा प्रयत्न केला. परिणामी १८१३च्या सनदी कायद्यातील शिक्षणाबाबतच्या तरतुदीनंतरही सुमारे दहा वर्षे कंपनी सरकारने आपले शैक्षणिक धोरण निर्धारित केले नाही.गर्व्हनर जनरल हेस्टिग्जंने १८२३ मध्ये एक लाख रुपये अनुदान कोणत्या शाळांना द्यावे यासाठी जनरल कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन ही समिती नेमली. या कमिटीत १० सदस्य होते. त्यांच्यामध्ये एकमत होत नव्हते. अशा स्थितीत १८३४ मध्ये लॉर्ड मेकॉलेची ग.ज.बेंटिकने कमिटीचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. लॉर्ड मेकॉलेने आपला प्रस्ताव कॉन्सिलपुढे २ फेब्रु.१८३५ रोजी मांडला.

### १. लॉर्ड मेकॉलेचा शिक्षण विषयक प्रस्ताव :

मेकॉलेने पश्चात्य विद्या व इंग्रजी भाषेतून शिक्षणाचे जोरदार समर्थन केले. पाश्चत्य विद्या व इंग्रजी भाषा शिकलेले भारतीय इंग्रजी सत्तेचे समर्थक बनतील. ते केवळ रक्ताने व रंगाने भारतीय राहातील. परंतु त्यांच्या आवडी निवडी, विचारप्रणाली व जीवनमूल्ये ही पाश्चत्यांसारखी राहातील. त्यामुळे इंग्लडमधील वस्तूंना भारतात मागणीही वाढेल व इंग्रजी सत्तेला स्थिरता लाभेल, म्हणून सरकारने इंग्रजी शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे असे मेकॉलचे मत होते. शिक्षणासाठी मंजूर झालेली रक्कम पौर्वात्य शिक्षणावर खर्च केली जाऊ नये असा ठराव त्याने कॉन्सिलपुढे मांडला. गर्व्हनर जनरल लॉर्ड बेंटिकने ७ मार्च १८३५ रोजी मेकॉलेचा ठराव मान्य करून असा आदेश काढला की, ‘भविष्यात कंपनी सरकारने युरोपियन साहित्याच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावा. व त्यासाठी माध्यम म्हणून इंग्रजीचा वापर करावा. थोडक्यात इंग्रज सरकारने भारतातील उच्च वर्गाला इंग्रजी माध्यमातून शिक्षिण देण्याचे ठरविले. परिणामी शिक्षणाचे माध्यम कोणते असावे हा वाद थंडावला.’

### लॉर्ड मेकॉलेचा झिरपण्याचा सिद्धांत -

लॉर्ड मेकॉले योने शिक्षण आणि उच्च ज्ञान हे प्रथम समाजातील वरच्या थराला द्यावे. नंतर हे ज्ञान झिरपत-झिरपत समाजातील दुसऱ्या, तिसऱ्या थराला मिळेल. अशा रितीने उच्च शिक्षण वरपासून झिरपत झिरपत समाजातील शेवटच्या थरापर्यंत पोहोचेल. या विचारालाच लॉर्ड मेकॉलेचा झिरपण्याचा सिद्धांत असे म्हणतात. मेकॉलेच्या या सिद्धांमुळे भारतात उच्चशिक्षण उच्च वर्णीयांना व मध्यम वर्गीयांना मिळू लागले पण बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला. उच्च शिक्षण झिरपत-झिरपत खालच्या थरापर्यंत जाईल असे सांगितले जात होते पण ब्रिटिश सत्तेचा शेवट होईपर्यंत शिक्षण समाजाच्या खालच्या थरापर्यंत पाझरले नाही ही वस्तुस्थिती होती.

### २. १८४० ते १८५४ या काळातील शिक्षणाचा विकास :

१८४२ मध्ये कॉन्सिल ऑफ एज्युकेशनची स्थापना झाली. १८४४ मध्ये इंग्रज राज्यकर्त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांची कंपनी सरकारच्या सेवेत नियुक्ती केली जाईल अशी घोषणा केल्याने इंग्रजी शिक्षणाला आणखी चालना मिळाली. त्यामुळे शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. या काळात कलकत्ता व रूरकी येथे मेडिकल व इंजिनिआरिंग महाविद्यालये सुरू झाली. महाराष्ट्रात गव्हर्नर एलफिन्स्टच्या प्रयत्नामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. १८२४ मध्ये मुंबईमध्ये इंजिनिअरिंग महाविद्यालये, १८४५ मध्ये

मेडिकल कॉलेज तर पुणे येथे १८५४ मध्ये सायन्स, कॉलेजची स्थापना झाली. या काळात बहरामजी मलबारी, जगन्नाथ शंकर शेठ, दादाभाई नौरोजी, महात्मा फुले यानीही शिक्षणक्षेत्रात मोलाचे कार्य केले.

### ३. चार्लस् वूडच्या खलिता (१८५४)

सर चॉर्लस् वुड यांनी १८ जुलै १८५४ ला भारतात शिक्षणविषयक धोरणांची मीमांसा करणारा एक खलिता पाठविला, त्याला वूडचा खलीता असे म्हणतात. याखलित्याला काही जण 'भारतीय शिक्षणाचा मॅग्नाचार्टा' असे म्हणतात. या खलित्याने भारतात आधुनिक शिक्षण पद्धतीचा पाया घातला. या खलित्यातील शंभर परिच्छेदांमध्ये भारतीय शिक्षणपद्धतीची सविस्तर चर्चा केलेली होती. या खलित्यात पुढील महत्त्वाच्या शिफारशी होत्या.

१. शासनाने आपल्या अग्रक्रमाच्या कर्तव्यात शिक्षणाचा समावेश करावा.
२. भारतीय शिक्षण धर्मातीत असावे आणि ते शिक्षण देशी भाषांना प्रोत्साहन देणारे असावे.
३. भारतीय भाषांना पाश्चात्य ज्ञान पोचविण्याचे साधन म्हणून उत्तेजन द्यावे.
४. खाजगी शिक्षण संस्थांना अनुदान देण्याची पद्धत स्वीकारवी.
५. उच्च शिक्षणसंस्थांना नियंत्रित ठेवण्यासाठी लंडन विद्यापिठाच्या धर्तीवर भारतात विद्यापिठांची स्थापना करावी.
६. शिक्षण व्यवस्थेच्या तपासणीसाठी स्वतंत्र खाते सुरू करावे.

लॉर्ड डलहौसीने या खलित्याच्या आधारे शिक्षणाच्या पुनर्रचनेला चालना दिली. बॉर्ड ऑफ एज्युकेशन बरखास्त करून सर्व कामे शिक्षणखात्याकडे सोपविली. या खलित्यामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेत सुसूत्रता निर्माण झाली. मुंबई, मद्रास, आणि कलकत्ता अशी तीन विद्यापिठे अस्तित्वात आली.

### ५.२.४ १८५८ नंतरची शैक्षणिक प्रगती :

इ.स. १८५७ मध्ये भारतात इंग्रजांच्या विरोधात मोठा उठाव झाला. त्यामुळे इंग्रजी प्रशासन थोडेसे बिथरले. उठावामुळे सरकारी तिजोरीवर जो ताण पडलेला होता त्यामुळे राज्यकर्त्यांनी शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले नाही. १८५८ नंतर सचिव मॉनटिथ याने शिक्षण क्षेत्रासाठी अहवाल तयार करून महाविद्यालयांची संख्या वाढविली. १८७१ मध्ये लॉर्ड मेयो याने शिक्षण क्षेत्राकरिता ठराव मांडला आणि प्रत्येक प्रांताना यासाठी ठराविक रक्कम दिली. १८७५ मध्ये अलिगड येथे मुस्लिमासाठी स्वतंत्र्य केंद्र स्थापन करण्यात आले. वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन लाहोर, अलहाबाद, पंजाब व कलकत्ता या ठिकाणी विद्यापीठांची स्थापना झाली. शिक्षण क्षेत्रात आणखी प्रगती करण्यासाठी ग.ज. लॉर्ड रिपन यांनी वुडच्या खलित्याचा स्वीकार केल्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी इ.स.१८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला त्यास हंटर आयोग म्हणतात.

### १. हंटर आयोगाच्या शिफारशी :

२२ सदस्य असलेल्या हंटर आयोगाने १८८२ ते ८३ या काळात विविध प्रांतातील शिक्षण संस्थांना भेटी दिल्या आणि शैक्षणिक प्रगतीची समिक्षा केली. तसेच अनेक प्रस्ताव विचारात घेऊन एक अहवाल सादर केला. त्यामध्ये काही प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे होत्या.

१. खाजगी शिक्षण संस्थांना शासनाने उत्तेजन देऊन त्यांना साहाय्य करावे.
२. महाविद्यालयाना आर्थिक सहाय्य व अनुदान द्यावे.
३. प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थेकडे देऊन त्यावर आपले नियंत्रण ठेवावे.
४. शिक्षण प्रसारांसाठी व्याख्यानमालांचे आयोजन व्हावे.
५. लोक शिक्षणाकडे तसेच मुस्लिम शिक्षणाकडे लक्ष द्यावे.
६. प्रांतिक सरकारांनी आपल्या उत्पन्नापैकी काही भाग दरवर्षी शिक्षणासाठी बाजूला काढून ठेवावा.

**२. लॉर्ड कर्झन व सॅडलर कमिशन :**

१९व्या शतकाच्या अखेरच्या काळात हंटर आयोगाच्या शिफारशीमुळे शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली. लॉर्ड कर्झनच्या काळात इ.स. १९०४ मध्ये विद्यापीठ कायदा अस्तित्वात आला. या कायद्याने उच्चशिक्षणाची पातळी उंचावली. तसेच विद्यापीठांना प्रथमच कायदे व नियम लागू करण्यात आले. इ.स. १९१० मध्ये स्वतंत्र शिक्षण खाते अस्तित्वात आले. इ.स. १९१७ मध्ये लॉर्ड चेम्सफर्ड याने कलकत्ता विद्यापिठासाठी सॅडलर कमिशन नेमले. या कमिशनने विद्यापीठांमधील काही उणीवा स्पष्ट केल्या. १९१९च्या कायद्याने शिक्षणखाते प्रांताकडे सोपविण्यात आले. इ.स.१९२० पर्यंत शिक्षणाचा बराच विकास झाला तसेच अनेक महत्त्वपूर्ण शैक्षणिक व संशोधन संस्था अस्तित्वात आल्या. १९१६ मध्येच महिलांकरिता स्वातंत्र्य विद्यापिठ मुंबईमध्ये स्थापन झाले. शिक्षणामुळे भारतात राष्ट्रवादाला चालना मिळेल अशी भिती इंग्रजांना वाटत होती. म्हणून त्यांनी म्हणावे तेवढे लक्ष शिक्षणाकडे दिले नाही. पण १९२० नंतर भारतीयांनी राष्ट्रीय शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. परिणाम भारतीय समाजजीवनात अमुलाग्रह बदल घडून आला. नविन शिक्षण पद्धतीमुळे महत्त्वाचे परिणाम घडून आले.

**५.२.५ भारतीय समाजावरील महत्त्वाचे परिणाम.**

१. भारतीयांना प्रथमच शिक्षणाची व भौतिक प्रगत पाश्चात्य ज्ञान मिळविण्याची संधी उपलब्ध झाली.
२. भारतातील सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.
३. नव शिक्षित वर्गाने जातिसंस्थेला विरोध करून सामाजिक सुधारणांची मागणी केली.
४. ब्रिटिशांना प्रशासन चालविण्यासाठी आवश्यक असणारा कारकुनी वर्ग उपलब्ध झाला.
५. समाजावर असणारे वरिष्ठ वर्गाचे प्रभुत्व हळूहळू नष्ट झाले.
६. विविध व्यवसायांना गतिशीलता प्राप्त झाली.
७. भारतातील उदारमतवादी चळवळींना चालना मिळाली.
८. पाश्चत्य शिक्षणामुळे भारतात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली.
९. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या विचारांनी प्रभावित झालेल्या समाजसुधारकांनी समाजाची जागृती करणे महत्त्वाचे मानले. त्यातूनच समाज सुधारणा चळवळी सुरू झाल्या.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. भारतातील पाश्चात्य शिक्षणाची थोडक्यात चर्चा करा.

## ५.३.२ धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळ भारतीय राष्ट्रवादाचा उदय

२८ डिसें. १८८५ रोजी राष्ट्रीय काँग्रेस स्थापन झाली ही केवळ योगायोगाने घडून आलेली घटना नव्हती. त्यामागे भारतातील दीर्घकालीन राजकीय परिस्थिती, सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ कारणीभूत झाली होती. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होणे ब्रिटिश व भारतीय दोहोंच्याही फायद्याचे होते. सशस्त्र व सामर्थ्यशाली ब्रिटिशांना केवळ उठाव करून हुसकावून लावणे शक्य नाही, याची जाणीव भारतीयांना झाली होती. ब्रिटिशांच्या अन्यायाविरूद्ध दाद मिळविण्यासाठी भारतातील विविध प्रांतात संघटनात्मक प्रयत्न सुरू झाले होते. १९५७च्या उठावानंतर भारतात सामाजिक व धार्मिक चळवळीमुळे वैचारिक जागृती झाली. त्या वैचारिक जागृतीमुळेच १८८५ मध्ये सर्व जाती-धर्माच्या, वेगवेगळ्या विचारांच्या भारतीय लोकांना एकत्र घेऊन ब्रिटिशांविरूद्ध भारतीय स्वतंत्र लढ्याचे अखेरपर्यंत नेतृत्व करणाऱ्या 'राष्ट्रीय काँग्रेस'चा जन्म झाला. आधुनिक भारताच्या इतिहासात काँग्रेसचा जन्म ही गोष्ट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. १९व्या शतकातील सामाजिक व धार्मिक चळवळीचा तो परिणाम होता. म्हणूनच भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाच्या संदर्भात सामाजिक व धार्मिक चळवळीचे महत्त्व विचारात घेणे आवश्यक आहे.

### १९व्या शतकातील सामाजिक व धार्मिक चळवळींचे कार्य :

भारतात १९व्या शतकाचा पूर्वार्ध हा धार्मिक, सामाजिक त्याचबरोबर राजकीय प्रबोधाचा काळ मानला जातो. त्यापूर्वी अठराव्या शतकात भारतीय समाजात निरक्षरता, धर्मभोळेपणा, मूर्तीपूजा, पुनर्जन्म व दैववादावर विश्वास, रूढी - परंपरांचा प्रभाव, जातिभेद उच्चनीचता इ. अनेक दोष होते. समाजाची धारणा करणारी मूलगामी धर्मतत्वे व नैतिक मुल्यांचा ऱ्हास झाला होता. विकासाची गती खुंटली होती. विवेकवाद, मानवतावाद, विकास, गतिशिलता मागे पडून समाज जीवनावर अज्ञानाचा अंधःकार पसरलेला होता. १९व्या शतकात भारतात सामाजिक व धार्मिक चळवळीमुळे सर्वच क्षेत्रे प्रभावित झाली. एकेश्वरवाद, विश्वबंधुत्व, विवेकवाद, मानवतावाद, ऐहिकता यावर आधारित धर्मविचार पुढे आले. भारतातील अनेक लोकोत्तर व्यक्तींनी समाजसुधारणा चळवळ हाती घेतली. समाज सुधारकांनी मुर्तीपुजा, अनिष्ठ रूढी, परंपरा व पोथीनिष्ठेला विरोध केला व व्यक्तिविकास, समाजविकास आणि राष्ट्रविकास घडवून आणण्यासाठी धडपड सुरू केली. परिणामी भारतात राष्ट्रवादाचा उदय घडून आला. म्हणूनच धार्मिक व सामाजिक चळवळीच्या परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे.

## १) राजा राम मोहन रॉय आणि ब्राह्मोसमाज :

'आधुनिक भारताचे जनक' म्हणून राजा राममोहन रॉय यांचे भारताच्या इतिहासातील स्थान अनन्य साधारण आहे. त्यांनी १८२८ मध्ये लिहिले आहे की - ''हिंदुची प्रचलित धर्मव्यवस्था त्यांच्या राजकीय हितसंबंधाचे हितसंवर्धन करण्यासाठी अपुरी आहे, हे मी खेदपूर्वक नमूद करतो. हिंदूमध्ये असलेल्या जातिभेदामुळे त्यांचे अनेक वर्ग व पोटवर्गात विभाजन झाले असून त्यांची देशभक्तीची भावना हिरावून घेण्यात आली आहे. अनेक प्रकारचे धार्मिक विधि व समारंभ आणि शुद्धीकरणाविषयीचे अनेक नियम यामुळे कोणतेही अवघड कार्य हाती घेण्याची क्षमता त्यांच्यात उरलेली नाही. किमान काही राजकीय लाभ मिळविण्यासाठी आणि सामाजिक हित साधण्यासाठी तरी हिंदूधर्मात काही बदल होणे आवश्यक आहे. असे मला वाटते.''

सर्व भारतीयांनी स्वीकारलेल्या या सुधारणांच्या विचाराची सुरूवात १८२८ मध्ये राजा राम मोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजापासून होते. हिंदूधर्माच्या खऱ्या तत्वांची ओळख भारतीयांना करून देणे व हिंदू समाज व धर्म यात सुधारणा घडवून आणणे; तसेच एकेश्वरवादाचा पुरस्कार करून भारतीयांच्या बुद्धिमतेचा दर्जा उंचावणे हा उद्देश ब्राह्मो समाजाचा होता. धर्मकल्पनेवर जमलेली कोळीष्टके म्हणजे खरा धर्म नसून संपूर्ण मानवजातीचा धर्म एकच आहे हे पटवून देण्याचे कार्य त्यांनी हिरीरीने केले.

### ब्राह्मो समाजाचे कार्य :

ब्राह्मो समाजाने सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात कार्य केले.

### अ) धार्मिक क्षेत्रातील कार्य :

ब्राह्मो समाज एकेश्वरही होता. त्यामुळे हिंदु धर्मात असलेल्या अनिष्ट रूढी, परंपरांचा त्याग करण्याचे कार्य ब्राह्मो समाजाने केले. त्याच बरोबर हिंदू धर्माला बुद्धिनिष्ठ व मानवतावादी बनविण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मण पुरोहितांचे आणि धर्ममार्तंडांचे समाजावर असलेले वर्चस्व नष्ट केले. मूर्तिपूजा, व्रतवैकल्य यांना विरोध केला. धार्मिक सुधारणा हा या चळवळीचा प्रमुख मुद्दा असला तरी ती चळवळ फक्त धर्मापूर्ती मर्यादित नव्हती. मानववाद हे त्यांच्या विचाराचे अधिष्ठान होते. ऐहिक जीवनावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. राजा राममोहन रॉय, अक्षयकुमार दत्त व ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी दैवी शक्तीविषयीच्या कुठल्याच चर्चेस नकार दिला. त्यामुळेच सर्व भारतीय समाज एकत्र येण्यास सुरूवात झाली.

### ब) सामाजिक कार्य :

भारतीय हिंदू समाजात असणाऱ्या विविध अनिष्ट प्रथांना विरोध करून त्यांच्यामध्ये योग्य ते बदल घडवून आणण्याचा प्रयत्न ब्राह्मो समाजाने केला. सती प्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व, पडदा पद्धती या अनिष्ट प्रथांना कडाडून विरोध केला. या समाजाच्या प्रयत्नामुळेच 'सिव्हिल मॅरेज ॲक्ट' हा कायदा ब्रिटिशांनी पास केला. त्याचबरोबर स्त्री-शिक्षण, स्त्री उध्दार आणि जातीव्यवस्था निर्मुलन करण्यासाठी या समाजाने केलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरतात.

**क) शिक्षण प्रसार :**

पारंपारिक शिक्षण पद्धती ऐवजी भारतीय लोकांना पाश्चात्य शिक्षणाची गरज आहे, त्यामुळे भारतीयांनी पाश्चात्य शिक्षण घ्यावे असे ब्राह्मोसमाजाचे म्हणणे होते. भारतीयांनी इंग्रजी, गणित, भौतिक शास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल यासारख्या विषयाचे ज्ञान मिळविले पाहिजे हा हेतू समोर ठेवून त्याप्रमाणे प्रयत्न केले.

**२) प्रार्थना समाज :**

इ.स. १८५७ नंतर भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनात अनेक स्थित्यंतरे होऊ लागली. बहुतेक सर्व विचारवंतांना असे वाटू लागले की हिंदू धर्मातील वाईट प्रथा नष्ट झाल्या पाहिजेत. अशावेळी सन १८६४ मध्ये केशवचंद्र सेन मुंबईत आले. त्यांनी धर्मसुधारणेविषयी व्याख्याने दिली. त्या व्याख्यांनांचा प्रभाव नवविचारवाद्यांवर झाला. परिणामी धर्म सुधारणेचा विचार वाढतच गेला. परिणामी १८६७ मध्ये डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या पुढाकांराने मुंबईमध्ये, प्रार्थना समाजाची स्थापना झाली. प्रार्थना समाज हिंदूधर्माभिमानी होता. परमेश्वर एक असून तो विश्वाचा निर्माता आहे, सत्य, सदाचार व भक्ती हे ईश्वराच्या उपासनेचे मार्ग आहेत. मूर्तिपूजा परमेश्वरास मान्य नाही. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत म्हणून सर्वांनी बंधुत्वाची भावना ठेवावी. ही प्रार्थना समाजाची प्रमुख तत्वे होती. प्रार्थना समाजाने धर्मसुधारणा पेक्षा सामाजिक सुधारणेच्या चळवळीकडे विशेषतः लक्ष दिले. अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, बालविवाहास विरोध इत्यादी क्षेत्रात या समाजाने भरीव कार्य करून अनेक लोकोपयोगी कामे केली. ना. म. जोशी यांनी 'सोशल सर्व्हिस लीग'ची स्थापना केली. न्या. रानडे, डॉ. भांडारकर, वामन आबाजी मोडक, गोपाळ हरी देशमुख इत्यादींनी पंढरपूर येथे अनाथ बालकाश्रम, कामगारासाठी रात्रशाळा, मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ही संस्था स्थापन केली. या संस्थेने अखिल भारतीय पातळीवर अस्पृश्यता निवारणाच्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. देशसेवेसाठी चांगले कार्यकर्ते निर्माण करण्याच्या उद्देशाने नामदार गोखले यांनी 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी' ही संस्था स्थापन केली. महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेली 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' ही संस्था महत्त्वाची ठरली. प्रार्थना समाजामुळे समाजसुधारणा व राष्ट्रीय चळवळ यामध्ये वाहून घेणारी एक नवी पिढी अस्तित्वात आली.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. ब्रम्हो आणि प्रार्थना समाजांच्या कार्याचा आढावा घ्या.

_______________

_______________

_______________

_______________

_______________

### ३) आर्यसमाज :

स्वामी दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये स्थापन केलेल्या आर्यसमाजाने समाजसुधारणा, राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रवादी चळवळ या दृष्टीने बहुमोल कार्य केले. आर्य समाजाची स्थापना जरी मुंबईत झाली असली तरी त्या समाजाचा खरा प्रचार उत्तर भारतातील पंजाब प्रांतात झालेला दिसून येतो.

### १) शुद्धीकरण चळवळ :

आर्य समाजाने केलेल्या कार्यात शुद्धीकरण चळवळ ही अत्यंत मौलिक आहे. हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्यांना स्वधर्मात घेण्याचे कार्य त्यांनी केले. वैदिक धर्माचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत. शुद्धिकरणाने एखाद्या व्यक्तीला परत धर्मात प्रवेश देता येतो. आर्य धर्माचा प्रसार सर्व जगभर करावा यासाठी शुद्धीकरण चळवळ महत्त्वाची ठरली.

### २) शैक्षणिक कार्य :

आर्य समाजाने शिक्षण क्षेत्रात मोलाची कामगिरी केली होती. देशात विविध ठिकाणी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करून धर्ममार्तंडांच्या विळख्यातून बहुजन समाजाला मुक्त करण्याचे काम आर्य समाजाने केले. आर्य समाजाचे प्रचारक लाला हंसराज यांनी लाहोर येथे 'दयानंद अँग्लो वैदिक स्कूल' ही संस्था स्थापन केली. आर्य समाजाने कोल्हापूर, सोलापूर, मुंबई या ठिकाणीही संस्था स्थापन केल्या. इंग्रजी शिक्षणाबरोबरच वैदिक धर्माचे शिक्षण या संस्थातून दिले जात होते.

### ३) सामाजिक व राष्ट्रीय चळवळीचे कार्य :

आर्य समाजाने गरीब व अनाथ विधवा यांच्यासाठी आश्रम उघडले. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आणि अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. आर्य समाजाचे प्रचारक लाला लजपतराय यांनी राजकीय कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स' ही संस्था सुरू केली. आर्य समाजाने लाला हंसराज, पंडित गुरूदत्त, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद यासारखे नेते राष्ट्रीय आंदोलनासाठी दिले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी सर्वप्रथम 'स्वराज्य' हा शब्दप्रयोग व स्वदेशीचा पुरस्कार केला. आर्य समाजामुळे पंजाब प्रांतात राष्ट्रीय आंदोलनाचा जोर वाढत गेला.

### ४) रामकृष्ण परमहंस (१८३६-१८८६)

रामकृष्ण परमहंस यांचे मूळ नाव गदाधर चटर्जी असे होते. वयाच्या ७व्या वर्षापासूनच त्यांनी अध्यात्माच्या मार्गाने राष्ट्रीय चळवळीला हातभार लावला. त्यांनी वेद व उपनिषदातील विचार लोकांच्यापुढे मांडले. आपल्या शिकवणूकीतून व साध्या राहणीतून त्यांनी मानवसेवा केली. सर्वधर्म एकच असून मानवसेवा हीच श्रेष्ठ आहे. प्रत्येक मानव देवाच्या रूपाचा अंश आहे. त्यांची सेवा केल्यास देवाची सेवा केल्यासारखे होईल असे त्यांना वाटत होते. त्यांच्यामुळे बंगालमध्ये लोक सर्वधर्मसमभाव मानून एकत्र आले. रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांनी भारतीय जनतेला राष्ट्रासाठी, देशांसाठी एकत्र येण्याचे आव्हान केले होते.

### ५) स्वामी विवेकानंद (१८६३-१९०२)

स्वामी विवेकानंद यांचे मूळ नाव नरेंद्र दत्त होते. १८८१ मध्ये विवेकानंदाची भेट रामकृष्ण परमहंस यांच्याशी झाली. त्यांनी रामकृष्णांचे शिष्यत्व पत्करले. इ.स. १८८७ मध्ये विवेकानंदांनी 'रामकृष्ण मठाची' स्थापना केली. इ.स.१८९३ साली शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत त्यांनी वेदांची ओळख पाश्चात्यांना करून दिली. त्यांनी वेदातील तत्वज्ञान जगभर लोकप्रिय केले. रामकृष्ण मिशनद्वारे त्यांनी हिंदू समाजातील दारिद्र्य, आळस, धर्मभोळेपणा, कर्मठपणा, अस्पृश्यता हे दोष काढून टाकले पाहिजेत आणि धर्माचरणात मानवसेवेला प्राध्यान्य देऊन स्वाभिमानाची व राष्ट्राभिमानाची ज्योत लोकामध्ये प्रज्वलित केली पाहिजे असा संदेश त्यांनी दिला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय, धार्मिक व सामाजिक चळवळ म्हणून रामकृष्ण मिशनचे कार्य फार मोठे होते. स्वामी विवेकानंदांनी आपल्या 'I am a socialist' या पुस्तकात उच्च वर्णीय व प्रतिष्ठित श्रीमंतांना समाजातील दीन दलितांशी चांगले वागावे असे आवाहन केले. भारतीय संस्कृतीची महानता अखिल जगतात पोहचविण्याचे कार्य रामकृष्ण मिशनने केले. त्यामुळे भारतीयांच्यात खऱ्या अर्थाने राष्ट्राभिमान निर्माण झाला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. आर्यसमाज आणि रामकृष्ण मिशनच्या कार्याची चर्चा करा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

### ५) थिऑसॉफिकल सोसायटी :

'थिऑसाफी' म्हणजे ईश्वर ज्ञानाची प्राप्ती इ.स. १८७५ मध्ये अमेरीकेत मॅडम ब्लाव्हरस्की व कर्नल ऑलकॉट यानी या संप्रदायाची स्थापना केली. इ.स. १८९२ मध्ये या सोसायटीचे केंद्र भारतात मद्रासजवळ अडयार येथे सुरू झाले. या केंद्राने हिंदू धर्मियांच्या प्रबोधनासाठी फार मोठे कार्य केले. संपूर्ण भारतभर धर्मजागृती व राष्ट्रभक्ती निर्माण करणे हा या सोसायटीचा उद्देश होता.

**थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य :**

ॲनी बेझंट या आयरिश स्त्रीने इ.स. १८९३ ला थिऑसॉफिकल सोसायटीचे नेतृत्व स्वीकारले. त्या कृष्णभक्त होत्या. हिंदू धर्मावर त्यांची श्रद्धा होती. भारत हीच माझी खरी जन्मभूमी असे म्हणून त्यांनी थिऑसॉस्फिकल सोसायटीच्या तत्वज्ञानाद्वारे हिंदूस्थानच्या राजकीय व धार्मिक उद्धारासाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांनी त्यासाठी बनारस येथे सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली. त्याचबरोबर त्यांनी Common will, A New India ही वृत्तपत्रे सुरू केली. इ.स. १९१७ च्या राष्ट्रीय सभेच्या त्या अध्यक्ष होत्या. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे सोसायटीने राजकीय क्षेत्रात आपला स्वतःचा एक वेगळा ठसा उमठविला. होमरूल

व स्वदेशी चळवळ ही या सोसायटीच्या कार्याची वैशिष्ट्ये ठरली. त्यामुळे भारतीय जनतेच्या मनामध्ये राजकीय जागृती होण्यास मदत झाली.

### ६) सत्यशोधक समाज :

सामाजिक सुधारणासाठी महत्मा जोतिबा फुले यांनी इ.स. १८७३ मध्ये पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हा या समाजाचा मुख्य उद्देश होता. सार्वजनिक सत्यधर्म व गुलामगिरी या दोन पुस्तकांत सत्यशोधक समाजाविषयी त्यांनी आपले विचार मांडले. सर्व समाज एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही, या विचारांच्या आधारे बहुजन समाजात जागृती घडवून आणणे हेच या समाजाचे मुख्य सुत्र होते.

जोतिबा फुले हे थोर विचारवंत होते. शेतकरी, कष्टकरी, शुद्र समाज हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. म्हणूनच त्यांचे दु:ख व त्यांच्यावर होणारा अन्याय सर्वांना माहीत व्हावा यासाठी त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. शेतकऱ्यांचा आसुड, ब्राह्माणांचे कसब, शिवाजी महाराजांचा पोवाडा, सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामुळे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने राजकीय, सामाजिक व धार्मिक जागृती घडून आली. भारत हा शेतीप्रधान देश आहे. बहुतांशी जनता शेतीवर अवलंबून आहे. परंतु शेतकरी सुखी व समाधानी नव्हता. सावकारांकडून त्याचे शोषण होत होते. अशा शोषित शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यावे, सरकारने त्यासाठी प्रयत्न करावेत, वसतीगृहे काढावीत. प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची सोय करावी अशी मागणी केली. सर्वागिण समतेचा त्यांनी पाया घातला त्यामुळे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने राष्ट्रीय वृत्ती बळावण्यास सुरूवात झाली. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज थिऑसॉफिकल सोसायटी, रामकृष्ण मिशन, सत्यशोधक समाज यासर्व संस्थांनी व चळवळींनी भारतीय समाजातील, धर्मातील दोष दाखवून ते दूर करण्याचे प्रयत्न केले. भारतीय समाजातील मरगळ झटकून त्यास नव्या ध्येयाने प्रेरित केले. आपल्या देशाबद्दल, संस्कृतीबद्दल व समाजाबद्दल लोकांच्या मनामध्ये अभिमान जागृत केला.

### साहित्य व वृत्तपत्रांची कामगिरी :

भारतात एकोणिसाव्या शतकात समाजिक व धार्मिक चळवळ करणाऱ्या अनेक समाजसुधारकांनी, विचारवंतांनी व लेखकांनी फार मोठ्या प्रमाणात लेखन केले होते. अनेक वृत्तपत्रे व नियतकालीकांनी या काळात राष्ट्रयत्वाची भावना जागृत करणे आणि अन्यायाला वाचा फोडून राजकीय जागृती करण्याचे फार मोठे कार्य केले.

लोकहितवादी, न्या. रानडे, महत्मा फुले, राजवाडे, खरे, पारसनीस यांनी भारताचा खरा इतिहास शोधून लिहून काढण्याची कठीण कामगिरी पार पाडली. आणि परकियांनी लिहिलेला भारताचा विकृत इतिहास खोटा ठरविला. बंकिमचंद्राच्या 'आनंदमठ' कादंबरीतील 'वंदे मातरम्' हे गीत तर राष्ट्रवादीचळवळतील प्रेरक गीत ठरले. दादाभाई नौरोजी, चिपळूणकर यांनी इंग्रजी राज्यकर्त्यांनी चालवलेले आर्थिक शोषण जनतेच्या नजरेस आणले. याचवेळी अनेक भारतीय वृत्तपत्रांनीही भारतीय असंतोषाला वाचा फोडली. जनतेला बंडासाठी प्रवृत्त केले. वेळोवेळी सरकारचे अन्यायी धोरण जनतेपर्यंत पोहचवून राष्ट्रीय बाणा जागृत केला. बंगालमधील, हिंदू, पेट्रिअर, बंगाली, इंडियन मिरर, अमृत बझार पत्रिका, मद्रासमधील द हिंदू, मुंबई प्रांतातील ज्ञानप्रकाश, मराठा, केसरी, काळ इ. वृत्तपत्रे याबाबतीत आघाडीवर

होती. या सर्व साहित्य व वृत्तपत्रांनी इंग्रज सरकारवर परखड टीका करून 'स्वातंत्र्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे' अशी प्रभावी राजकीय जागृती केली.

अशा प्रकारे वसाहतवादी सांस्कृतिक आक्रमणाच्या विळख्यात सापडेलेल्या आपल्या संस्कृतीच्या रक्षणाची तीव्रगरज ही सामाजिक व धार्मिक चळवळींची प्रेरणा होती. राष्ट्रीय जाणिवेच्या निर्मितीचा हा एक अंगभूत भाग असल्याने असे प्रयत्न करणे आवश्यक होते. त्यांच्यामुळे भूतकाळाशी सांस्कृतिक - धार्मिक पातळीवर फारकत घेण्यात आली, तसेच नवी दृष्टी आत्मसात करण्यात त्यांचा हातभार लागला. वसाहतवादी संस्कृती व विचारप्रणाली विषयक वर्चस्वाच्या विरोधातील तो एक महत्त्वाचा भाग होता. या दुहेरी संघर्षातून नवी माणसे, नवी कुटुंबे व नवा समाज यांची संस्कृती उदयास आली. तिने एकदिलाने राष्ट्रीय आंदोलनास हातभार लावला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सामाजिक व धार्मिक चळवळीमुळे भारतीय राष्ट्रवादाला खऱ्या अर्थाने उधान आले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. थिऑसॉफिकल सोसायटी आणि सत्यशोधक समाजाच्या कार्याची थोडक्यात चर्चा करा.

---

---

---

---

---

## ५.४ सारांश :

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य शिक्षणाने प्रभावित झालेली एक पिढी भारतात उदयास आली. या पिढीमध्ये प्रामुख्याने दोन वर्ग होते. एक वर्ग भारतीय समाज, चालीरीती, संस्कृती तुच्छ मानून इंग्रजांचे अंधानुकरण करत होता तर दुसरा वर्ग भारतीय संस्कृतीची महानता जाणत होता. भारतीयांच्यातील दोष दूर करण्यासाठी पाश्चात्यांचे अनुकरण करण्याची गरज नाही तर आपल्याच संस्कृतीचे पुनरूज्जीवन करुन अनुकरण करण्याची गरज आहे असे त्यांना वाटत होते. म्हणून दुसऱ्या वर्गाने भारतात धार्मिक व सामाजिक पुनरूज्जीवन चळवळी सुरू केल्या. राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची, स्वामी दयानंद सरस्वतींनी आर्यसमाजाची, स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मठाची तर महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. याशिवाय थिऑसॉफिकल सोसायटी, प्रार्थना समाज अशा संस्थाही अस्तित्वात आल्या. या सर्व संस्थांनी व चळवळींनी भारतीय समाजातील, धर्मातील दोष दाखवून ते दूर करण्याचे प्रयत्न केले. भारतीय समाजातील वैचारिक मरगळ दूर करून त्यास नव्या ध्येयाने प्रेरित केले. आपल्या देशाबद्दल, संस्कृतिबद्दल लोकांच्या मनामध्ये त्यांनी अभिमान जागृत केला. सुधारणा चळवळींनी परंपरांचा पूर्णपणे त्याग केला असता तर भारतीय समाजाचे पाश्चातीकरण सहज झाले असते. तथापि पाश्चात्यीकरण

घडवून आणणे हे समाज सुधारकांचे ध्येय नव्हते तर त्यांना वैचारिक दृष्ट्या आधुनिक समाज साकार करावयाचा होता. नवा माणूस व नवा समाज निर्माण करणे हे धार्मिक व सामाजिक चळवळींचे ध्येय होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नवी माणसे, नवी कुटुंबे व नवा समाज अस्तित्वात आल्यामुळे भारतात राष्ट्रवादी चळवळ सुरू झाली हे वास्तव आहे.

## ५.५. प्रश्न

१. भारतात पाश्चत्य शिक्षणाचा कसा विकास झाला हे थोडक्यात लिहा.

२. वसाहतकालीन स्त्री शिक्षणाचा आढावा घ्या.

३. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाच्या दृष्टीने धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळींचे महत्त्व विशद करा.

४. भारतातील एकोणिसाव्या शतकाच्या पुर्वार्धातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घ्या.

५. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींचा आढावा घ्या.

**ब) टिपा लिहा.**

१. वूडचा शिक्षणविषयक खलीता

२. हंटर आयोग

३. सॅडलर आयोग

४. अलिगड चळवळ

५. सत्यशोधक समाज

## ५,६ अधिक वचनासाठी पुस्तके


१) आचार्य जावडेकर - आधुनिक भारत.

२) डॉ. वैद्य सुमन व डॉ. कोठेकर शांता - आधुनिक भारताचा इतिहास. खंड १,२,३.

३) डॉ. लोहार. र. म. - आधुनिक भारताचा इतिहास.

४) देसाई. ए. आर - सोशल बँक ग्रांऊड ऑफ इंडियन नॅशनॅलिझम.


❖❖❖❖

# ६

# आर्थिक राष्ट्रवादाचा उदय

## (Rise of Economic Nationalism)

**अनुक्रमणिका**


६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ ब्रिटिशांचे भारतातील आर्थिक धोरण

६.२.१ उद्योग व व्यापार व भारतीय आर्थिक व्यवस्थेत झालेले बदल

१) भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास

२) भारतीय अर्थ व्यवस्थेचे ग्रामिणीकरण

३) शेतीचे व्यापारीकरण

४) मुक्त व्यापार व जकातीचे धोरण

५) आधुनिक दळणवळण व्यवस्था निर्माण केली.

६.२.२ ब्रिटिश अंमल आणि महसूल व्यवस्था

६.२.३ ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाचे परिणाम

१. शेती धंद्याची वाताहत झाली.

२. जमिनदार व सावकारशाही उदयाला आली.

३. ब्रिटिशांचा फायदा

४. युरोपियनांचा बँकींग व्यवसाय वाढला.

५. भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले.

६. नवे कायदे - न्यायव्यवस्थेमुळे शोषण झाले.

७. दुष्काळात शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली.

८. शेतकऱ्यांचे व आदिवासींचे उठाव

६.२.४ ब्रिटिश वसाहतवादाची आर्थिक समिक्षा

१. वसाहतवादी शोषणाची जाण

२. एकोणीसाव्या शतकातील /बुध्दिवाद्यांचा भ्रमनिरास

३. ब्रिटिश राजवटीचे आर्थिक विश्लेषण

६.३ संपत्ती निःसारणाचा सिद्धांत

६.३.१ संपत्ती निःसारणाची पार्श्वभूमी

१. वसाहतवादी शोषण

२. ब्रिटिश राजवटीची अर्थिक समिक्षा
३. वसाहतवादी शोषणाच्या तीन पद्धती
४. भारतीयांचे दारिद्र्य
५. औद्योगिक विकासाची गरज
६. वसाहतवादी आर्थिक सुधारणा एक शाप
६.३.२ संपत्ती निःसारणाचा सिद्धांत - दादाभाई नौरोजी
६.३.३ रोमेशचंद्र दत्त यांचा संपत्ती निःसारणाचा सिद्धांत
६.४ भारतीय भांडवलदारांचा उदय
१. भांडवलदार वर्गाचा विकास
२. फिक्कीची स्थापना
३. राजकीय शेत्रात फिक्कीचा प्रभाव
४. भांडवलदारांचा साम्राज्यवादाच्या विरोधी लढा
५. मुंबई योजना
६.५ सारांश
६.७ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न :

## ६.० उद्दिष्ट्ये :

- ब्रिटिश वसाहतवादाचे खरे स्वरूप समजते.
- ब्रिटिश सत्तेची आर्थिक वाटचाल कशी होती हे लक्षात येते.
- ब्रिटिश साम्राज्यवादाचे ध्येय काय होते ते समजते.
- ब्रिटिशांनी आपली आर्थिक धोरणे कशी प्रस्थापित केली हे लक्षात येते.
- ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या आर्थिक धोरणाचे भारतीय जीवनावर काय परिणाम झाला हे समजते.
- ब्रिटिशांनी एकोणिसाव्या शतकात भारतीयांची लूट कशी केली हे लक्षात येते.
- दादाभाई नौरोजी व इतर अनेक नेत्यांनी मांडलेला संपत्ती निःसारणाचा सिद्धांत समजतो.
- भारतीयांचा लढा केवळ राजकीय नसून आर्थिक होता हे लक्षात येते.
- भारतीय शेतकऱ्यांची जीवन पद्धती व त्यांनी केलेले उठाव लक्षात येतात.
- शेतकरी व कामगारांचे लढे ही भारतीय राष्ट्रवादाची खरी पार्श्वभूमी होती हे समजते.
- ब्रिटिश राजवटीच्या काळात आर्थिक क्षेत्रात झालेले बदल लक्षात येतात.
- भारतीय भांडवलदारांचा उदय कसा झाला हे लक्षात येते.

## ६.१ प्रास्ताविक :

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून इंग्रजांनी भारतावर १९व्या शतकाच्या सुरूवातीला आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. ब्रिटिशांनी भारतावर टप्प्याटप्प्याने वर्चस्व कसे प्रस्थापित केले. संधी मिळेल त्याप्रमाणे धोरणात कसे बदल केले. भारतीय अर्थव्यवस्थेवर आपली पकड कशी बसविली याचा अभ्यास भारतीय राष्ट्रवादाच्या जाणीवेतून करणे गरजेचे आहे. भारतीय स्वातंत्र्य लढा हा केवळ ब्रिटिश सत्तेविरूद्धचा संघर्ष नसून, वसाहतवाद व साम्राज्यवादाविरूद्धचाही होता हे लक्षात येते. ब्रिटिशांनी भारताबद्दल असे उद्‌गार काढले होते की, 'भारत म्हणजे ब्रिटिश राजमुकुटातील तेजस्वी हिरा' ब्रिटिश साम्राज्याच्या गरजा भागवणारी वसाहत म्हणून इंग्रजांनी भारतीय वसाहतीकडे पाहिले होते. केवळ पैसे मिळविणे, नफा मिळविणे, हा ब्रिटिश सत्तेचा प्रमुख उद्देश होता. लॉर्ड कर्झनने म्हटले होते की - भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा कणा आहे. दूसरी वसाहत आपण गमावली तर आपले फारसे बिघडणार नाही. परंतु भारत ही वसाहत गमावली तर आपल्या साम्राज्याचा सूर्य मावळेल.

भारतातील ब्रिटिश सत्ता ही खऱ्या अर्थाने व्यापारी व वसाहतवादी सत्ता होती. त्यांना या देशातून फक्त संपत्ती हवी होती. त्यामुळे त्यांनी तशा प्रकारची धोरणे अंमलात आणली. इंग्लडमधील औद्योगिकरणाचे संरक्षण करण्यासाठी भारतीय उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला पाहिजे ही त्यांची पहिली भूमिका होती. शेतीतून अधिकाधिक महसूल जमा झाला पाहिजे हा त्यांचा दूसरा हेतू होता. त्यासाठी जकात विषयक धोरण, शेतकऱ्यांचे बद्दलचे धोरण ब्रिटिशांनी त्यांच्या व्यापाराला पूरक व भारतीय अर्थव्यवस्थेला मारक असे ठेवले. त्यामुळे व्यापार, उद्योग व राजकीय वर्चस्व या तिन मार्गांनी भारतातील संपत्तीचे निःसारण इंग्लंडकडे होऊ लागले.

ब्रिटिशांचे भारतातील साम्राज्यवादी स्वरूप पूर्वीच्या साम्राज्यवादापेक्षा भिन्न होते. ब्रिटिशांनी आपल्या मायभूमिच्या हितासाठी भारताचे सर्व प्रकारचे शोषण केले. त्यात आर्थिक शोषणातून भारतीय संपत्तीचा ओघ प्रचंड प्रमाणात ब्रिटिशांमध्ये जाऊ लागला. आयातीपेक्षा निर्यात अधिक असलेला भारत ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे निर्यातीपेक्षा आयात अधिक करू लागला. त्याचे अत्यंत वाईट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाले. म्हणूनच या घटकात ब्रिटिश सत्तेची आर्थिक धोरणे व त्याचा राष्ट्रवादाच्या विकासावर झालेला परिणाम पहाणे गरजेचे आहे.

## ६.२ ब्रिटिशांचे भारतातील आर्थिक धोरण

नैसर्गिक साधन संपत्तीच्या दृष्टीने भारत हा संपन्न देश असल्यामुळे १५व्या शतकापासूनच भारतात यरोपीयन डच, फ्रेंच  व इंग्रज व्यापारासाठी भारतात आले. इंग्रजांनी व्हिकटोरीया राणीकडून भारतात व्यापारासाठी परवानगी मिळविली. त्यामुळे २१५ व्यापारी १५ वर्षाच्या व्यापाराच्या कराराने भारतात आले. त्यांनी भारतात हळूहळू व्यापारी सत्ता निर्माण करण्याच्या दृष्टीने पावले टाकली. इ.स. १७५७ ते १८५७ या काळात त्यांना भारतात सत्ता प्रस्थापित करण्यात यश आले.

### ६.२.१ उद्योग व व्यापार आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल

ब्रिटिशांच्या उद्योग व व्यापार धोरणामुळे १८व्या शतकापासून भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक बदल होत गेले. ब्रिटिश पूर्व काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्ये खेड्याचे आर्थिक स्वावलंबन हे होते. मीठ व लोखंड सोडून खेड्यातील उद्योग खेड्यातील गरजा पूर्ण करू शकत होते. खेड्यात मोठ्या प्रमाणात हस्तोद्योग होते. त्यांचा शेतीशी समन्वय होता. भारतातील हस्तकला संपूर्ण जगभर प्रसिद्ध होती. सुतीकापड, रेशमी कापड, गालीचे, शाली यांना परदेशात खूप मागणी होती. दागिने, भांडी, हस्तीदंताच्या वस्तू, शस्त्रे, जहाजे इत्यादी उद्योग प्रसिद्ध होते. भारतीय नागरी अर्थव्यवस्था त्यामुळे सुदृढ होती. परंतु ब्रिटिशांच्या आगमणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत बदल होत गेले.

### १. भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास :

एकोणिसाव्या शतकात औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लडमध्ये कारखानदारी वाढली होती. विशेषतः कापड उद्योगात उत्पादन खूप वाढले होते. त्यासाठी त्यांना मोठी बापारपेठ आवश्यक होती. इंग्लडमधील इतर कारखानदार व्यापारांना सुद्धा भारतात सवलती हव्या होत्या. म्हणून १८१३ मध्ये ब्रिटिश सरकारने मुक्त व्यापार धोरण सुरू केले. परिणामी इंग्लडमधील यंत्रनिर्मित माल मोठ्याप्रमाणावर भारतात येऊ लागला. भारतीय मालाच्या किंमतीच्या तुलनेत हा माल स्वस्त होता. त्यामुळे भारतीय कुटीर उद्योगांचा ऱ्हास झाला. इ.स. १८५० पर्यंत आपल्या वसाहतीतील उद्योगधंदे विकसित होऊ नयेत, हे तत्व ब्रिटिशांनी समोर ठेवले. त्यामुळे भारतीय विणकर, कारागीर व इतर व्यावसायिक यांचे धंदे बंद पडून उपजीविकेचे साधन नष्ट झाले. ढाका, मुर्शिदाबाद, पाटणा यासारखी व्यवसायासाठी भरभराटीला आलेली शहरे ओस पडली. उद्योग धंद्याचा ऱ्हास झाल्यामुळे शेतीवर भार पडला.

### २. भारतीय अर्थव्यवस्थेचे ग्रामीणीकरण :

नागरी उद्योगधंद्यांच्या ऱ्हास झाल्यामुळे बेकार झालेले लोक खेड्याकडे वळले. त्यामुळे जास्तीत जास्त कच्च्या मालाचे उत्पादन शेतीतून घेणे सुरू झाले. शेतीवर भार पडल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेने नवे वळण घेतले. १७८३ पासून ब्रिटिश सरकारने भारत हा केवळ कच्च्यामालाचा उत्पादक बनावा असा विचार सुरू केला. त्याप्रमाणे १८१३ ते १८३३ चे कायदे निर्माण करण्यात आले. भारतात जाऊन राहण्याची व तेथे संपत्ती विकत घेण्याची परवानगी १८३३च्या चार्टर ॲक्टने दिली. त्यामुळे ब्रिटिश भांडवल आता भारतातील चहा, कॉफी, नीळ, ताग अशा व्यवसायात गुंतविले जाऊ लागले.

### ३. शेतीचे व्यापारीकरण :

बिटिशांच्या आर्थिक धोरणाचे भारतात झालेले बदल म्हणजे शेतीचे व्यापारीकरण, भारतातील स्वयंपूर्ण शेती नष्ट झाली. परिस्थितीनुसार शेतीवर व्यापारी व्यापारीकरण घडवुन आणले शेतीमधून आता पूर्वीप्रमाणे उत्पादने घेणे बंद झाले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा डोळ्यासमोर ठेऊन उत्पादन घेतले जाऊ लागले. कापूस, ताग, शेंगदाणा, तीळ, ऊस, तंबाकू, अफू, नीळ इत्यादिच्या उत्पादनासाठी शेतीचा उपयोग होऊ लागला. किंमतीतील चढ-उतारांचा परिणाम भारतीय शेतीवर होऊ लागला. मंदि आली तर शेतकरी भरडला जाऊ लागला. दुष्काळ पडल्यावर शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागले. शेतीच्या व्यापारीकरणामुळे कृषिक्षेत्राचे मोठे नुकसान झाले.

**४. मुक्तव्यापार व जकातीचे धोरण :**

इ.स. १८१३ पासून ईस्ट इंडिया कंपनीचे भारतीय व्यापारावरील वर्चस्व संपूष्टात आणले. इंग्लडमधील इतर उद्योगपतींना व व्यापाऱ्यांना भारतात मुक्त व्यापार करण्याची परवानगी दिली. त्यामुळे भारतीय बाजारपेठा ब्रिटिश मालाने फुलून गेल्या. इंग्लडच्या मालाची भारतात विक्री वाढविण्यासाठी बिटिश सरकारने जकातीचे धोरण बदलले. इंग्लडमधून भारतात येणाऱ्या मालावर जकात नाममात्र असे. उलट भारतातून इंग्लडमध्ये जाणाऱ्या मालावर जबरदस्त जकात लादली. त्यामुळे भारतीय माल बाहेर पाठविणे अशक्य झाले. परिणामी भारतीय उद्योगधंद्याचा ऱ्हास घडून आला.

**५. आधुनिक दळणवळण व्यवस्था निर्माण केली :**

ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याच्या सुरक्षिततेसाठी व ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेच्या फायद्यासाठी भारतात रल्वे, पोस्ट, रस्ते बंदरांचा विकास, बँका, विमाकंपन्या सुरू केल्या. भारतात रेल्वेची योजना केली तर येथून इंग्लडला कापूस पाठविणे सोपे जाईल म्हणून लॉर्ड डलहौसीने १८५३ मध्ये मुंबई ते ठाणे रेल्वे सुरू केली. त्यानंतर फार मोठे रेल्वेचे जाळे तयार झाले. त्यामुळे भारतात परकीय व्यापारी व उद्योगपतींची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात सुरू झाली. परिणामी ब्रिटिशांची भारतीय अर्थव्यवस्थेवर पकड घट्ट झाली.

**३.२.२ ब्रिटिश अंमल आणि महसूल व्यवस्था :**

ब्रिटिश सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर त्यांनी आपले लक्ष महसूल व्यवस्थेकडे वळविले. शेतसारा हा त्या काळात उत्पान्नाचे मुख्य साधन होते. या शेतसाऱ्यात वाढ करण्यासाठी शेती व्यवस्था बदलणे गरजेचे होते. ब्रिटिशांची कायमधरा पद्धत सुरू होईपर्यंत म्हणजे १७९३ पर्यंत भारतातील ग्रामीण भागात कोणताही बदल झालेला नव्हता. चार्लस मेटकाफ म्हणतो, 'भारतीय खेडी ही छोटी स्वायत गणराज्येच होती. राजकारणी बदलत गेली. सत्ताधारी बदलत गेल. परंतु भारतीय खेडी जशीच्या तशीच राहिली.' इंग्रजांनी ठग, पेंढारी, भिल, कोळी, रामोशी यांचा पूर्ण बंदोबस्त केल्यानंतर नवी कायदा व सुव्यवस्था पद्धती स्थापन केली. इ.स. १७७२ च्या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार वॉरन हेस्टिंग्ज हा बंगालचा गर्व्हनर म्हणून भारतात आला त्याने जमिन महसूल व्यवस्थेत सुधारणा केल्या. क्लाईव्हच्या दुहेरी शासन व्यवस्थेने शेतकऱ्यांवर अन्याय होऊ लागला होता. त्यामध्ये हेस्टिंग्जने सुधारणा केल्या. त्याने पांच वर्षासाठी महसूल ठरवून दिला. महसुलखात्याशी संबंधित सर्व कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी Board of Revenue स्थापन केले. लॉर्ड कॉर्नवालिस १७८६-१७९३ याने उत्तर भारतात कायमधारा पद्धती सुरू केली. त्यातून जमिनदारांचा एक वर्ग उदयास आला. जमिनदारांकडे जमिनीची मालकी आली व जमिनदार व सरकार यांच्यामध्ये दीर्घमुदतीचा करार होऊन १७९३ पासून उत्तर भारतात कायमधारा पद्धती लागू करण्यात आली. या पद्धतीने कंपनीचा फायदा व जमिनदारांचे स्थैर्य प्रस्थापित केले. ब्रिटिशांची सत्ता परमेश्वरी वरदान आहे असे जमिनदारांना वाटू लागले. जमिनदार ब्रिटिश सत्तेचे हस्तक बनले पण या पद्धतीमुळे शेतकरी कंगाल झाले.

**रयतवारी पध्दती :**

दक्षिण भारतात इंग्रजांनी कायमधारा ऐवजी रयतवारी पध्दती लागू केली. मुंबई, मद्रास प्रांतात रयतवारी लागू करणारे इंग्रज अधिकारी ब्रिटिश उदारमतवादाने - विशेषत: बेंथॅमच्या उपयुक्ततावादी विचारांनी प्रभावित झालेले होते. मन्रोने मद्रास प्रांतात व लॉर्ड

एलफिन्स्टनने मुंबई प्रांतात ही पद्धती सुरू केली. प्रिंगल या अधिकाऱ्याच्या मते मुंबई व मद्रास प्रांतातील शेतीव्यवस्थेचे जे सामुहिक स्वरूप आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण समाजाची प्रगती होत नाही. कारण स्वतः मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यास त्या व्यवस्थेत फारसे प्रोत्साहन मिळत नाही. म्हणून शेतकऱ्याच्या वैयक्तिक मालकीवर आधारलेली रयतवारी शेतीव्यवस्था सुरू केली. पाटील, देशमुख यांची शेतकऱ्यांच्या व्यवहारात जो हस्तक्षेप होत असे तो बंद केला.

रयतवारी पध्दतीमुळे शेतीची मालकी शेत करणाऱ्या शेतकऱ्याकडे गेली. त्याला आपली जमिन विकण्याचा अधिकार दिला. त्याच्या जमिनीला भूमापन क्रमांक आणि त्याला मालकीचे कायदपत्रे दिली गेली. शेतसारा पैशाच्या स्वरूपाने देणे बंधनकारक केले. शेतसारा तीस वर्षांनी एकदाच जमिनीची प्रत वगैरेची पहाणी करून ठरविण्यात येईल. सर्व प्रकारच्या जमिनीवर विशेषतः पडिक जमिनीवर सरकारची मालकी असे आणि शेतकऱ्याने शेतसारा जर वेळेवर भरला नाहीतर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला. रयतवारी पद्धतीमुळे भांडवलशाहीतील खाजगी मालमत्तेचे तत्व शेती व्यवसायास लागू करण्यात आल्यामुळे व्यवस्थेत मूलगामी बदल घडवून आले केवळ सारावाढ करून पैसा मिळविणे हा इंग्रजांचा उद्देश असल्यामुळे या व्यवस्थेचा शेतकऱ्यास उपयोग झाला नाही. उलट त्यांची वाताहत झाली.

### ६.२.३ ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाचे परिणाम :

#### १) शेती धंद्याची वाताहत झाली.

ब्रिटिशांनी जास्तीत जास्त महसुल गोळा करण्यासाठी भारतात अनेक प्रकारच्या 'शेतसारा पद्धती लागू केल्या.' या पद्धतीमुळे शेतकऱ्यांची मोठी पिळवणूक झाली. महसूल गोळा व्हावा म्हणून त्यांनी मालमत्तेविषयी नवे कायदे केले. नवे कोर्ट स्थापन केले. न्यायाधिश, वकिल, खरेदी - विक्रीचे नवे नियम केले. या सर्व बदलाचा शेतकऱ्यांना कुठलाच फायदा झाला नाही. मात्र सावकारशाहीचे फावले. १८७७-७८च्या दुष्काळात लाखो शेतकरी मृत्युमुखी पडले. सततच्या रोगराई दुष्काळामुळे शेतीधंद्यांची वाताहत झाली.

#### २. जमिनदारी व सावकारशाही उदयास आली :

कायमधारा पद्धतीमुळे उत्तर भारतात जमिनदारी उदयास आली. सरकारने जमिनदारांशी शेतसाऱ्यासंबंधी करार केल्यामुळे जमिनदार शेतकऱ्याकडून शेतसारा वसुल करू लागले. जमिनदार भ्रष्टाचार करून धनवान झाले. या पद्धतीमुळे कुळांचे अतोनात नुकसान झाले. जमिनदार कुळांना लुबाडत असत त्यांच्याकडून कुळावर अत्याचार होऊ असत. रयतवारी पद्धतीमुळे शेतकरी दरिद्री झाले. त्यांना आपल्या जमिनी विकाव्या लागल्या. सावकारी शेतकऱ्यांची पिळवणूक केल्यामुळे शेतकरी जमिनदोस्त झाला. ब्रिटिशांनी सावकारी कायदे केल्यामुळे सावकरांना संरक्षण मिळाले. सावकारशाही अत्यंत घातक ठरली. जमिनदार व सावकार सरकारचे हस्तक बनले.

#### ३. ब्रिटीशांचा फायदा झाला :

ब्रिटिशांच्या व्यापार व शेतीविषयक धोरणामुळे युरोपियन मळेवाल्यांनी भारतात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. चहा व निळीसारख्या नगदी पिकांचे उत्पादन करून त्यांची निर्यात करू लागले त्यामुळे इंग्लंडला, त्याचा अधिक फायदा झाला. जमिन महसुलातून नफा,

भारतीय बाजारपेठांवर वर्चस्व, लष्करी व राजकीय वर्चस्व यामुळे कंपनीने भारताच्या लुटीचे प्रमाण जास्तीत जास्त वाढविले.

### ४. यूरोपियनांचा बँकींग व्यवसाय वाढला.

यूरोपियनांचा भारतात मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू झाल्यामुळे त्यांची संख्या वाढली, कर्जाची निकड, भांडवलाची सुरक्षितता या कारणांमुळे बँकेची आवश्यकता निर्माण झाली. कलकत्ता येथे १७७०ला 'हिंदूस्थान बँक' स्थापन करण्यात आली. त्यानंतर बेंगॉल बँक, जनरल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बेंगॉल या बँका स्थापन करण्यात आल्या. पुढे ब्रिटिशांनी हा व्यवसाय वाढविला व संपूर्ण देशभर अनेक बँका निर्माण झाल्या. त्यामुळे भारतीयांची प्रचंड लूट झाली.

### ५. भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले :

ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतीय शेतीव्यवस्था जागतिक बाजारपेठेस जोडली गेली. बाजारपेठेत धान्याची उलाढाल करणारे कमिशन एजंटस् आणि आडत दुकानदार तयार झाले. जागतिक बाजारपेठेतील तेजीमंदीचा प्रभाव भारतीय बाजार पेठेवर पडू लागला. त्यामुळे पिक पद्धतीत बदल घडून आला. अमेरिकेतील यादवी युध्दामुळे कापूस पिकविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले गेले. त्यामुळे भारतीय शेतीचे व्यापारीकरण घडवुन आले.

### ६. नवे कायदे व न्यायव्यवस्थेमुळे शोषण झाले :

इंग्रजी राजवटीत नव्या कायद्यामुळे व न्यायव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले व सावकरांचे हात बळकट झाले. त्यामुळे हजारो एकर जमिन सावकारांकडे हस्तांतरीत झाली. सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्यासाठी सिव्हिल कोर्टात शेतकऱ्यावर फिर्यादी केल्या. एकट्या पुणे जिल्ह्यात इ.स. १८६८ पासून १८७३ पर्यंतच्या सहा वर्षात अशा प्रकारच्या खटल्यांची संख्या सुमारे १२००० वरून २८००० पर्यंत वाढली. कोर्टाचे कामकाज तालुक्याच्या ठिकाणी चाले. त्यामुळे वारंवार तारखा लागत. कायद्याची प्रक्रिया शेतकऱ्यांना कळत नसे त्यामुळे त्याला वकिलांना भरमसाठ फी द्यावी लागत असे.

### ७. दुष्काळात शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली :

ब्रिटिश साम्राज्यशाहीने शेतकऱ्यांचे अनेक प्रकारचे शोषण केले. त्यांनी भारतातील देशी उद्योगधंदे व हस्तोद्योग नष्ट केले. आपल्या अधिकाऱ्यांना लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या दिल्या. इंग्रजांनी कालवे, तळी, धरणे याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढले नाही. मात्र शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांची संख्या मात्र वाढली. १८७७-७८ साली मुंबई प्रांताच्या दक्षिण भागात मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळात पाच-सहा लाख लोक तडफडून मरण पावले. पुढील तक्त्यावरून भारतात दुष्काळामुळे मरणाऱ्या लोकांची संख्या आपल्या लक्षात येईल.

| **वर्ष** | **मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या** |
|---|---|
| १८००-२५ | १००००० |
| १८२५-५० | ४०००० |
| १८५०-७५ | ५००००० |
| १८७५-१९०० | १५००००० |

एवढ्या मोठ्या प्रमाणात माणसे मरण्याचे कारण म्हणजे दुष्काळाबरोबरच ब्रिटिशांचे अन्नधान्याच्या निर्यातीचे धोरण हे हो. या काळात अन्नावाचून लाखो माणसे मरत असताना सरकारने मोठ्या प्रमाणात गहूं आणि भात यांची निर्यात केली.निर्यातीचे प्रमाण पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

गव्हाची १८६९ ते ९५ पर्यंतची निर्यात (पौंडामध्ये)

| | |
|---|---|
| १८६९- | २७५४८१ |
| १८७३-७४ - | १७५५९५४ |
| १८८२-८३ - | १४१९३७६३ |
| १८९१-९२ - | ३२७४०००० |

१८७७-७८ च्या दुष्काळात लोकांची क्रयशक्तीच संपुष्टात आली. वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे लाखो माणसे मरण पावली व गुरेढोरे नष्ठ झाली.

**८. शेतकऱ्यांचे व आदिवासीचे उठाव :**

इंग्रजांच्या आर्थिक धोरणावरून शेतकऱ्यांनी व आदिवासींनी त्यांच्याविरूद्ध अनेक सशस्त्र उठाव केले. आदिवासी लोकांच्या जंगलाचा इंग्रजांनी ताबा घेतला होता. फॉरेस्ट खाते निर्मिले होते त्यामुळे आदिवासी निराधार झाले. खानदेशात व इतरत्र भिलांचे बंड झाले. लोकांनी दंगे केले. १८३२ साली ओल्या दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या पुण्यातील शेतकऱ्यांनी दंगे केले. १८५२ साली खानदेशातील शेतकऱ्यांनी सर्व्हे सेटलमेंटच्या विरोधात उठाव केले. खानदेशातील आदिवासी भिलांनी इंग्रजांच्या धोरणा विरोधांत दंगे केले. उत्तर कोकणात १८३९-४६ या काळात कोळ्यानीही बंड केले ते नाणे घाट ताब्यात घेतला. इंग्रजांनी निर्दयपणे मोडून काढले. त्यांच्या अनेक पुढाऱ्यांना फासावर लटकवण्यात आले. नासिक व नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मारवाडी सावकरांची घरे लुटली. त्यांची नाके कापली. पुढे १९३९ मध्ये शेतकऱ्यांच्या पाठिंब्याने धारराव पवारांचे बंड झाले. इस्लामपूरच्या आंधळ्या नरसिंगरावा नेही असेच बंड केले. त्याने अनेक सावकारांना लुटले व जमिनी शेतकऱ्यांना वाटून टाकल्या. पुणे जिल्ह्यात उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली रामोशांनी बंड केले. पण इंग्रजांनी हे सारे उठाव क्रूरपणे चिरडून टाकले. अनेकांना फासावर लटकावले. अव्वल इंग्रजी अमदानीत शेतकऱ्यांवर व आदिवासीवर इंग्रजांनी जे अन्याय केले. त्यामुळे त्यांनी सशस्त्र उठाव केले. हे सर्व उठाव इंग्रजांच्या आर्थिक धोरणाविरूद्ध, जंगलविषयक धोरणाविरूद्ध व सारा आकारणीविरूद्ध होते. १८७३-७४ मध्ये नगर व पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी इंग्रज धार्जिन्या सावकार विरोधात बंड केले. सावकारांची घरे लुटण्यात आली. जमिनीची कागदपत्रे जाळण्यात आली. म्हणून इंग्रजांनी दंग्यांची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने सावकारशाही विरूद्ध काही उपाय योजना सुचविल्या. त्यामुळे हळूहळू उठाव कमी होत गेले, असे असले तरी १७६३-१८५६ या काळात बंगाल व बिहारमध्ये चाळीसहून अधिक मोठे व शेकडो उठाव घडून आले होते.

**६.२.४ ब्रिटिश वसाहतवादाची आर्थिक समिक्षा :**

**१) वसाहतवादी शोषणाची जाण**

भारतीय राष्ट्रीय चळवळीला वसाहतवादी आर्थिक वर्चस्व व शोषण यांची पूर्ण जाण होती आणि जिची पाळेमुळे या जाणीवेत घट्ट रोवली गेली होती. नेमस्त म्हणून ओळखल्या

जाणाऱ्या तिच्या नेत्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून वसाहतवादाची आर्थिक समीक्षा तपशिलवार तयार केली होती. नेमस्त नेत्यांनी केलेली ही समिक्षा हे राष्ट्रीय चळवळीच्या प्रगतीमधील त्यांचे सर्वाधिक महत्त्वाचे योगदान होते. या समीक्षेवर आधारित असलेले विविध मुद्दे नंतर प्रचंड मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले. भाषणे, पत्रके, वृत्तपत्रे, नाटके, नाणी व प्रभातफेऱ्या या माध्यमातून चालविल्या गेलेल्या राष्ट्रीय आंदोलनाचे हे मुद्दे केंद्रबिंदू होते.

**२. एकोणिसाव्या शतकातील बुद्धिवाद्यांचा भ्रमनिरास :**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील बुद्धिजीविनी भारतातील ब्रिटिश राजवटी विषयी फार विधायक दृष्टीकोन बाळगला होता. त्या काळात सर्वाधिक प्रगत असलेला इंग्लंड भारताचे आधुनिकीकरण घडवून आणण्यात मदत करील, अशी त्यांना आशा वाटत होती. परकीय राजवटीतील अनेक राजकीय, मानसिक व आर्थिक दोष त्यांच्या लक्षात आले नव्हते असे नाही; तरीही त्यांनी वसाहतवादी परकीय राजवटीला पाठिंबा दिला; कारण ती राजवट पाश्चात्य धर्तीवर भारताची पुनर्बांधणी करील, असे त्यांना वाटत होते पण तसे केले गेले नाही.

**३. ब्रिटीश राजवटीचे आर्थिक विश्लेषण :**

भारतातील सामाजिक विकासाचे वास्तव आणि या नेमस्त नेत्यांच्या आाशा आकांक्षा यांच्यात मेळ बसत नसल्याचे लक्षात आल्यावर सन १८६० नंतर त्यांचा भ्रमनिरास होऊ लागला. नव्या दिशेने होणारी प्रगती फार संथ गतीने व अडखळत होत होती आणि एकंदरीत संबंध देशाची पिछेहाट होत असून विकास अपूरा आहे, असे त्यांना दिसून आले होते हळूहळू त्यांच्या मनातील ब्रिटिश राजवटीची प्रतिमा काळवंडत गेली. ब्रिटिश राजवट व तिच्या परिणामांचे वास्तव यांची ते सखोल चिकित्सा करू लागले. ब्रिटिश राजवट हा शाप आहे. याची जाणीव भारतीयांना झाली. त्यातूनच भारतीय राष्ट्रवादाला चालना मिळाली.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. इंग्रजांच्या धोरणाचे भारतीय अर्थकारणावरील परीणाम स्पष्ट करा.

## ६.३ संपत्ती निःसारणाचा सिद्धांत :

वसाहतवादी ब्रिटिश राजवट व भारतीय जनता यांच्या हितसंबंधातील मूलभूत विसंगतीची परिणती भारतीयांच्या स्वातंत्र्य चळवळीचा उदय होण्यात झाली किंवा या विसंगतीमधून भारतीय स्वतंत्र्याच्या आंदोलनाचा उदय झाला. अगदी सुरूवातीपासूनच ही

विसंगती भारतीय राष्ट्रीय नेत्यांच्या लक्षात आली. आर्थिक दृष्टीने भारताची पिछेहाट होत आहे आणि भारत विकास न होण्याच्या प्रक्रियेमध्ये सापडला आहे, हे त्यांना स्पष्ट दिसले. यथावकाश त्यांनी वसाहतवादाचे शास्त्रीय विश्लेषण मांडले. खरेतर, एकोणिसाव्या शतकात भारतीय राष्ट्रीय नेत्यांनीच प्रथम वसाहतवादी आर्थिक मिमांसा केली आणि वसाहतवाद व व्यवस्थेच्या गरजा यांच्यातील विरोध त्यांच्या लक्षात आला. भारतीय लोकांचा सामाजिक अनुभव हा वसाहती मधील प्रजाजनांचा अनुभव असल्याचे हितसंबंध लक्षात घेऊन, राष्ट्रीय नेत्यांनी वसाहतवादाच्या विरोधातील एक सुस्पष्ट तत्वप्रणाली तयार केली आणि तिच्या पायावरच राष्ट्रीय चळवळ उभी केली. वसाहतवादाच्या विरोधातील तत्वप्रणाली वसाहत वादाची मिमांसा यांचा बारकाईने विचार संपत्ती निःसारणाच्या सिद्धांतात पहावयास मिळतो. म्हणून त्याची पार्श्वभूमी, सिद्धांत व त्याचे परिणाम यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

### ६.३.१ संपत्ती निःसारण सिद्धांताची पार्श्वभूमी :

#### १. वसाहतवादी शोषण :

वसाहतवाद, वसाहतवादी आर्थिक यंत्रणा व वसाहतवादी सत्ता यांचे भारतातील स्वरूप अत्यंत भयानक असे होते. ब्रिटिश वसाहतवादी संस्कृतीचा भारतावर चोहोबाजूनी हल्ला झालेला होता. त्यामुळे भारतीयांना काळजी वाटणे स्वाभाविक होते. एवढेच नव्हे तर एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीपासूनच वसाहतवादी आर्थिक वर्चस्व व शोषण यांची पूर्ण जाण झाली होती. म्हणूनच नेमस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेत्यांनी वसाहतवादाची आर्थिक समिक्षा करण्यास सुरुवात केली होती. नेमस्त नेत्यांनी केलेली समिक्षा हे राष्ट्रवादी विचाराच्या दृष्टीने पुढे पडलेले एक महत्त्वाचे पाऊल होते.

#### २. ब्रिटिश राजवटीची आर्थिक समिक्षा :

एकोणिसाव्या शतकात भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी प्रथम वसाहत वादाची आर्थिक मिमांसा केली आणि वसाहतवादाचे गुंतागुंतीचे स्वरूप उघड केले. राष्ट्रीय नेत्यांनी वसाहतवादाच्या विरोधातील एक सुस्पष्ट तत्वप्रणाली तयार केली आणि तिच्या पायावरच राष्ट्रीय चळवळ उभी केली

१८७० ते १९०५ या काळात ज्या अनेक भारतीयांनी ब्रिटिश राजवटीचे आर्थिक विश्लेषण सुरू केले त्यात तीन व्यक्ती प्रमुख होत्या. गांधीपूर्व काळात 'भारताचे पितामह' म्हणून ओळखले जाणारे दादाभाई नौरोजी सर्वश्रेष्ठ होते. १८२५ मध्ये जन्मलेले दादाभाई एक यशस्वी व्यावसायिक होते. परंतु त्यांनी आपले सर्व आयुष्य व संपत्ती देशात राष्ट्रीय चळवळ सुरू करण्यात व ती गतिमान करण्यात खर्च केली. महादेव गोविंद रानडे या दादाभाईंना काहीशी समकालीन असलेल्या दुसऱ्या नेतृत्वाने भारतीयांच्या एका पिढीला आधुनिक आणि औद्योगिकरणाचे महत्त्व पटवून दिले. रोमेशचंद्र दत्त या निवृत सनदी अधिकाऱ्याने विसाव्या शतकाच्या सुरूवातीला 'द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथामध्ये त्यांनी १७५७ पासूनच्या वसाहतवादी राजवटीची आर्थिक कामगिरी बारकाईने व तपशीलवार तपासली आहे.

जी. व्ही. जोशी, जी सुब्रमण्यम अय्यर, गोपाळ कृष्ण गोखले, पृथ्वीशचंद्र रे व शेकडो राजकीय कार्यकर्ते आणि पत्रकार यांच्यासह या तिघांनी ब्रिटिशकालीन भारतीय

अर्थव्यवस्थेच्या सर्व पैलूंची आणि वसाहतवादी आर्थिक धोरणांची बारकाईने छाननी केली आहे.

### ८. वसाहतवादी शोषणाच्या तीन पद्धती :

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय चळवळीच्या संस्थापकांनी वसाहतवादी शोषणाच्या तीन पद्धती नीटपणे समजाऊन घेतल्या. एक - कर - आकारणी आणि लुटमार, दोन मुक्त व असमान व्यापार आणि तीन भारतामध्ये ब्रिटिश भांडवलाची गुंतवणूक करून वसाहतवादी राजवट भारतीयांचे शोषण करीत होती. भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लडकडे वळविण्याच्या तत्वावरच वसाहतवादाची समग्र विचारसरणी केंद्रित झाली होती. भारतीय भांडवल व संपत्तीचा ओघ ब्रिटनकडे वळला होता. साम्राज्यवादाचे ते धोरणच होते. देशाच्या विकासात वसाहतवाद ही मुख्य धोंड असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

### ४. भारतीयांचे दारिद्र्य :

दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्र्याचा विशेष अभ्यास केला. भारतीय जनता गरीब असून तिची गरिबी दिवसेंदिवस वाढतच आहे, हे आपले मत ठामपणे मांडून त्यांनी आपली आर्थिक राष्ट्रीय चळवळ सुरू केली. देशाचे सतत चालू असणारे दारिद्र्यीकरण व दमछाक आणि देशाची गोपनीय, हृदय पिळवटून टाकणारी व रक्त शोषणारी परिस्थिती याची भारतीयांना व ब्रिटिशांना जाणीव करून देण्यात त्यांनी आयुष्य वेचले. सार्वजनिक व्यासपीठ व वृत्तपत्रे यामधून त्यांनी भारतीय माणूस उपाशी आहे; अगदी अल्प किंवा अपुऱ्या अन्नावर तो जगात असल्याने अगदी किरकोळ कारणानेही त्याचा मृत्यु होतो, हे त्याने सर्वांच्या दृष्टीस आणले.

हे सर्वकष दारिद्र्य परमेश्वर किंवा निसर्ग यांची अवकृपा आहे किंवा ते अंगभूत व अटळ आहे, असे त्यांना कधीच वाटले नाही. भारतीयांचे दारिद्र्य मानवनिर्मित असल्यामुळे ते कशामुळे आले याचा शोध घेता येईल व ते दूरही करता येईल, असे त्यांचे प्रतिपादन होते. भारतातील दारिद्र्याच्या कारणांचा शोध घेत असताना या राष्ट्रवादांनी वसाहतवादी राज्यकर्ते व वसाहतवादी राजकीय व्यवस्था यामुळे जे घटक व ज्या शक्ती कार्यरत असतात त्यांच्यावर भर दिला.

### ५. औद्योगिक विकासाची गरज :

दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, जी. व्ही. जोशी या सर्व राष्ट्रीय नेत्यांनी दारिद्र्याची समस्या ही भारतीयांची उत्पादनशक्ती व उर्जा वाढविण्याची म्हणजेच देशाच्या आर्थिक विकासाची समस्या आहे हे समजावून सांगितले. त्यांच्या दृष्टीने आर्थिक विकासाचा अर्थ आधुनिक उद्योगांचा जलद विकास असा होता. आधुनिक परिवर्तन करता येईल, याविषयी त्यांच्यामध्ये आधुनिक उद्योग एक महत्त्वाची शक्ती असल्याची जाणीव या सर्वांनाच झाली होती. १८ जाने. १९०२च्या 'बेंगाली' या आपल्या वृत्तपत्रात सुरेंद्रनाथ बॅनर्जी लिहितात - राजकीय हक्कासाठीची चळवळ भारतीयांना काही काळ एकत्र आणू शकेल. पण हे फळ मिळताच हितसंबंधाची समानता संपुष्टात येईल. परंतु भारतीयांचे व्यापारी ऐक्य मात्र एकदा प्रस्थापित झाले की कधीही नष्ट होणार नाही. परिणामी सुरूवातीच्या राष्ट्रवादी नेत्यांनी औद्योगिकीकरणाला मनापासून पाठिंबा दिला आणि परराष्ट्र, व्यापार, रेल्वेमार्ग, जकातकर, देशी व परकीय चलन, वित्त व कामगार आदींशी संबंधित कायद्यांचा औद्योगिकीकरण या सर्वाधिक महत्त्वाच्या मुद्यांच्या आनुषंगानेच विचार केला.

त्याच वेळी बहुतेक सर्व राष्ट्रवादी नेत्यांनी देशाच्या औद्योगिकीकरणाची गरज कितीही मोठी असली तरी ते परकीय भांडवलाने नव्हे तर भारतीय भांडवलानेच भागविली पाहिजे, असे ठामपणे सांगितले होते. परदेशी भांडवल देशी साधन संपत्तीचे शोषण व लूट यांचे प्रतिनिधीत्व करते. हे दादाभाई नौरोजी यांचे विधान प्रसिद्ध आहे. परदेशी भांडवलाच्या साहाय्याने देशाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वर्तमान काळातील किरकोळ फायद्यासाठी आपला संपूर्ण भविष्यकाळच गहाण टाकणे होय.

### ६. वसाहतवादी आर्थिक सुधारणा एक शाप :

देशातील परंपरागत हस्तोउद्योगांचा ऱ्हास अपघाताने घडून आला नव्हता त्याला मुक्त व्यापार, रेल्वेमार्गांची बांधणी कारणीभूत झाली होती. एकोणिसाव्या शतकात देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या स्वरूपात फार मोठा फरक पडला होता. या व्यापाराचे स्वरूप कच्च्या मालाची निर्यात व पक्क्या मालाची आयात असे होते. ब्रिटिशांचे जकातविषयक धोरण ब्रिटिश भांडवलदारांच्या हितसंवर्धनासाठीच राबविले जात होते. श्रीमंत व मध्यमवर्गीय ज्या वस्तू वापरतात त्यांच्यावर आयातकर आकारावा अशी राष्ट्रवादी नेत्यांनी मागणी होती. सरकारी खर्चाचे विश्लेषण करताना दादाभाई नौरोजी यांनी म्हटले होते की - शासकीय खर्च करताना प्रथम ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी गरजा पूर्ण करण्यावर भर दिला जातो त्या तुलनेत विकास व कल्याण कार्यक्रमावर पूरेसा खर्च होत नाही. सैन्यावर होणाऱ्या अफाट खर्चावर त्यांनी टीका केली होती.

### ६.३.२ संपत्ती निःसारणाचा सिद्धांत आणि दादाभाई नौरोजी

संपत्ती निःसारणाचा सिद्धान्त वसाहतवादावरील राष्ट्रवादी टीकेचा केंद्रबिंदू होता. देशातील मुलकी आणि लष्करी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीवेतन, भारत सरकारने घेतलेल्या कर्जावरील व्याज, ब्रिटिश भांडवलदारांचा देशातील नफा आणि होम चार्जेस म्हणजे भारतीय प्रशासनावर इंग्लंडमध्ये होणारा खर्च आदी स्वरूपात भारतीय भांडवल व संपत्तीचा फार मोठा भाग ब्रिटनकडे हस्तांतरित होतो म्हणजे देशातून संपत्तीचे वहन होते. हे राष्ट्रवादी नेत्यांनी दाखवून दिले होते.

दादाभाई नौरोजी यांनी 'संपत्तीच्या निःसारणाचा' किंवा गळतीचा सिद्धान्त (Drain Theory) मांडला ही गोष्ट सर्वमान्य आहे. में १८६७ मध्ये त्यांनी भारतीय संपत्तीचे ब्रिटनकडून अपहार होत असल्याचा आणि ब्रिटन भारताचे रक्तशोषण करीत असल्याचा विचार प्रथम मांडला. पुढे सुमारे पन्नास वर्षे त्यांनी भारतीय संपत्तीच्या निःसारणाविरूद्ध सातत्याने मोहिम चालविली. सर्व प्रकारच्या प्रचार माध्यमातून त्यांनी या विषयावर सतत भर दिला.

दादाभाईच्या मते संपत्तीचे निःसारण हे भारतीयांच्या दारिद्र्याचे मूलगामी कारण होते; तसेच तो ब्रिटिश राजवटीतील मूलभूत दोषही होता. 'आर्थिक नियमांच्या कर्तव्यकठोर अमंलबजावणीमुळे नव्हे तर हृदयशून्यरीत्या भारतीय संपत्ती गिळंकृत करण्याच्या आणि इंग्लडला वाहून नेण्याच्या ब्रिटिश राजवटीच्या धोरणामुळे किंबहुना, अर्थशास्त्रीय नियमांचा विपर्यास्त व निर्दय वापर करून ब्रिटिश शासन या देशाचे रक्त शोषण करीत असल्याने या देशाचा सर्वनाश घडुन आला.

दादाभाई नौरोजी यांनी आपल्या दैनंदिन भाषणातून व लिखाणातून याच मुद्यावर परखडपणे मत मांडले. ब्रिटीशांचा दिसतो तो चेहरा खरा नसून तो त्यांचा मुखवटा आहे. त्याच्या आडून ब्रिटिश राज्यकर्ते आपल्या देशाचे शोषण करीत आहेत. बाह्य जगाला दिसू शकेल किंवा जो पाहिल्यावर ते भयचकित होतील; असा प्रकारचा नरसंहार वा मालमत्तेचा विध्वंस असा उघड अत्याचार या शोषणात नाही एवढेच. सध्याच्या अनिष्ठ व अन्याय खर्चपद्धतीने बिटिश राजवटीत भारतीयांचा फायदा होतो, ही निव्वळ कल्पना आहे; उलट या पद्धतीतून भारतीयांचे रक्त काढले जात आहे आणि हे वास्तव आहे.

भारतीयांचे जीवन व मालमत्ता यांचे ब्रिटिश राजवटीत रक्षण केले जात आहे, या ब्रिटिशांच्या दाव्याविषयी ते लिहितात, भारतात जीवन व मालमत्ता सुरक्षित आहे, ही एक कल्पना आहे. प्रत्यक्षात मात्र असे काहीही नाही. एकाच अर्थाने भारतीयांचे जीवन व मालमत्ता सुरक्षित आहे आणि तो अर्थ म्हणजे आपसातील किंवा देशी संस्थानिकांच्या हिंसाचारापासून ते सुरक्षित आहेत; परंतु इंग्रजांच्या पंज्याखाली त्यांची मालमत्ता आणि जीवनही सुरक्षित नाही. सुरक्षित आहे आणि उत्तमरित्या सुरक्षित आहे ते एवढेच की दरवर्षी तीन ते चार कोटी पौंडांची देशी मालमत्ता फस्त करून ती इंग्लडमध्ये नेण्यास ब्रिटिश पूर्णपणे सुरक्षित आहे! लाखो भारतीयांसाठी जीवन म्हणजे अर्धपोटी किंवा उपाशी राहणे किंवा दुष्काळ व रोगराई हेच होय.''

कायदा व सुव्यवस्था यांच्यापासून होणाऱ्या फायद्याविषयी ते लिहितात - ''एक म्हण आहे की 'पाठीवर मारा, पण पोटावर मारू नका.' देशी संस्थानिकांच्या राज्यात प्रजा आपले उत्पादन आपल्याजवळ ठेवू शकत होती किंवा त्याचा उपभोग घेऊ शकत होती. कधीकधी त्यांच्या पाठीवर फटके बसत. ब्रिटिश राजवटीत मात्र जनतेच्या भोवती शांतता असे, तेथे हिंसा नाही; पण त्यांची मालमत्ता शांतपणे, त्यांना दिसू न देता व कळू न देता हिरावून घेतली जाते. शांततेतच त्यांची उपासमार होते, शांततेतच व शांतपणेच ते मरतात - कायदा व सुव्यवस्था जागच्या जागी अगदी चोख असते!''

### ६.३.२ रोमेशचंद्र दत्त आणि संपत्ती निःसारण सिद्धांत :

दादाभाई नौरोजी यांच्याप्रमाणे इतर राष्ट्रवादी नेते पत्रकार व प्रचारक यांनीही आपली अर्थशास्त्रीय मते मांडली होती. रोमेशचंद्र दत्त यांनी आपल्या 'इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया' या ग्रंथाचा मुख्य विषय संपत्ती निःसारण सिद्धांत (Drain Theory) हाच ठेवला. राजाने जमा केलेला महसूल सूर्याने शोषून घेतलेल्या जमिनीवरील ओलाव्याप्रमाणे असतो, तो सुपिक बनविणाऱ्या रूपात जमिनीला परत करावयाचा असतो. परंतु या देशातून ब्रिटिशांनी शोषला गेलेला ओलावा पावसाच्या रूपात या देशाच्या भूमीवर नव्हे तर दुसऱ्याच देशाच्या भूमीवर पडत आहे. साधन संपत्तीचे इतक्या मोठ्या प्रमाणावर वहन होत राहिले तर पृथ्वीतलावरील कोणताही संपन्न देश दारिद्री होईल.

संपत्तीच्या निःसारण हा सिद्धांत इतक्या सोप्या पद्धतीने मांडण्यात आला होता की, सामान्य शेतकऱ्यानाही तो सहजपणे समजू शकत होता. त्यामुळे राजकीय जागृती घडवून आणण्यास या सिद्धांताचा खूपच उपयोग झाला. दुसऱ्या एखाद्या देशातील रहिवाशांना आरामात

राहता यावे, यासाठी आपल्यावर कर आकारले जातात हा विचार अन्य कोणत्याही विचारापेक्षाही, भारतीयांना अधिक प्रक्षुब्ध करीत होता.

देशाचा आर्थिक विकास घडवून आणला जात आहे याबाबत राष्ट्रवादी नेत्यांनी म्हटले होते की - देश आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे; कारण ब्रिटिश सरकार स्वतःच्या व्यापार, उद्योग व भांडवलाच्या हितासाठीच देशावर राज्य करीत असून देशातील दारिद्रय आणि मागासलेपण हे वसाहतवादी राजवटीचे अपरिहार्य परिणाम आहेत. २८ जाने. १८९६ च्या 'केसरी' च्या अकांत लोकमान्य टिळक लिहितात, ''युरोपियन लोकांना चरण्यासाठी एक कुरण म्हणून हिंदूस्थानचा निश्चितच वापर होत आहे.'' कुंपणच शेत खात असल्यावर उपाय काय करणार किंवा दाद कोणाकडे मागणार ?

संपत्तीचे वहन बंद करा. अशी सोपी घोषणा भरतीयांनी दिली. या घोषणेचा प्रतिवाद करून लोकांचे समाधान करणे परक्या साम्राज्यवादी राजवटीच्या आटोक्याबाहेरचे होते. राष्ट्रीय नेत्यांनी वसाहतवादावर व वसाहतवादी शासनावर केलेल्या टीकेतील सर्व सूत्रे आर्थिक निःसारणाच्या सिद्धान्तात एकत्र आली होती; कारण उद्योगधंदे व शेती यांना अत्यावश्यक असलेल्या उत्पादक भांडवलाचे देशामधून वहन होत असे. निःसारणाचा हा सिद्धांत वसाहतवादी व्यवस्थेच्या सर्वकष, एक संघ व परस्पर संबंधित आर्थिक विश्लेषणाचा एक मानबिंदू होता. या सिद्धांतामुळेच ब्रिटिश राजवटीच्या शोषक स्वरूपाचे विदारक दर्शन घडून आले. भारतातून इंग्लडला होत असलेल्या संपत्तीच्या निःसारणाला आपला प्रमुख टीकाविषय बनवून राष्ट्रीय नेत्यांनी साम्राज्यवादाच्या आर्थिक गाभ्यालाच स्पष्टपणे व निर्भिडपणे हात घातला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. आर्थिक निःसारणाच्या सिध्दांताची थोडक्यात चर्चा करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ६.४ भारतीय भांडवलदारांचा उदय

भारतीय राष्ट्रीय चळवळीत जे वेगवेगळे घटक सहभागी झाले होते. त्यामध्ये अनेक भांडवलदार व्यक्तीही होत्या. इतर अनेकाप्रमाणे त्यांनीही देशासाठी तुरूंगवास भोगला आणि हालअपेष्टाही सहन केल्या. राष्ट्रीय चळवळीशी एकरूप झालेल्या भांडवलदारामध्ये जमनालाल बजाज, वाडीलाल लल्लूभाई मेहता, सॅम्यूएल अॅरॉन, लाला शंकरलाल आदींची नावे विशेषत्वाने घेता येतात. स्वतः कॉंग्रेसचे सभासद न होता ज्या अनेक भांडवलदार व्यक्तींनी राष्ट्रीय चळवळीला आर्थिक अन्य प्रकारचे साहाय्य केले त्यामध्ये अंबालाल साराभाई, जी.डी. बिर्ला आणि वालचंद हिराचंद या व्यक्ती महत्त्वाच्या होत्या. अर्थात अनेक भांडवलदार व

व्यापारी राष्ट्रीय चळवळीपासून दूरही राहिले होते. एवढेच नव्हे तर अनेकांनी राष्ट्रीय चळवळीला सक्रिय विरोधही केला होता. म्हणून भांडवलदार वर्गाने एक राष्ट्रीय घटक म्हणून राष्ट्रीय चळवळी विषयी जे सर्वसाधारण धोरण अवलंबिले होते त्याचे मुल्यमापन केले पाहिजे.

१८व्या शतकात इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक वाढ प्रचंड प्रमाणात झाली. पण भारतात फार उशिरा औद्योगिकीकरणास सुरूवात झाली. पहिल्या महायुद्धाच्या काळात लष्करी दृष्ट्या भारताचा औद्योगिक विकास होणे ब्रिटिशांच्या दृष्टीने आवश्यक ठरले. इ.स. १९१६ मध्ये इंग्रजांनी भारतात इंडस्ट्रियल कमिशन' स्थापन केले. या कमिशनने जुन्या व नव्या उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करावेत अशी शिफारस करण्यात आली. तसेच १९१९ च्या मॉन्टेग्यु चेमस्फोर्ड सुधारणा कायद्याने प्रत्येक प्रांतात 'डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रिज' सुरू करण्यात आले. १९२२ मध्ये राज्य वित्तीय आयोग, १९३३ मध्ये जकात मंडळ स्थापन करण्यात आले. १९२४ मध्ये स्टील इंडस्ट्री ॲक्ट पास करण्यात आला. या सर्व धोरणामधून भारतात उद्योगधंद्याची नव्याने उभारणी सुरू झाली. इ.स. १९१४ ते १९४७ या काळात भारतात भांडवलदार वर्गाचा उदय झाला.

### १. भांडवलदार वर्गाचा विकास :

वसाहतवादी राजवटीच्या जोखडाखाली राहूनही भारतीय भांडवलदार वर्गाने साध्य केलेली प्रगती असाधारण अशी होती. वसाहतवादी राजवटीशी हातमिळवणी करून त्यांनी हे यश मिळविले नव्हते. तर भारतीय भांडवलदारांनी स्वतःच्या भांडवलावर आपला विकास करून घेतला. त्यांनी साम्रज्यवादाच्या अनुनयाचे धोरण कधीही अवलंबिले नाही. १९४४-४५ मध्ये 'मुंबई योजना' तयार करून उत्पादन, वित्त पुरवठा आणि पणन - व्यवस्था या क्षेत्रात सहकारी व्यवस्था लागू करण्याचे समर्थन केले, आणि सर्वकष जमीन सुधारणांचा पुरस्कार केला. पुरूषोत्तमदास ठाकूरदास, जे.आर.डी. टाटा, जी.डी.बिर्ला, अर्देशीर दलाल, श्रीराम, कस्तूरभाई लालभाई, ए.डी.श्रॉफ आणि जॉन मथाई आदी भांडवलदार मुंबई योजनेत सहभागी झाले होते. इ.स. १९२०च्या दशकाच्या सुरूवाती पासूनच जे.डी. बिर्ला आणि पुरूषोत्तम ठाकूरदास यांनी अखिल भारतीय पातळीवर भांडवलदार व उद्योगपतींची संघटना असावी असा प्रयत्न केला होता. थोडक्यात वसाहतवादी राजवटीच्या विरोधात राहून आणि वसाहतवादी राजवटीच्या हितसंबंधाशी सतत संघर्ष करीत राहून भारतीय भांडवलदारांनी आपली प्रगती केली होती हे या ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे.

## २. फिक्कीची स्थापना (FICCI)

इ.स.१९२७ मध्ये भारतीय भांडवलदारांनी अखिल भारतीय स्तरावर 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, या संघटनेची स्थापना केली. भारतातील भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी संघटना म्हणून फिक्की महत्त्वाची ठरली. फिक्कीच्या माध्यमातून भारतीय भांडवलदारांनी अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात साम्राज्यवादी तत्वांना विरोध करण्यास सुरूवात केली.'

### ३. राजकीय क्षेत्रात फिक्कीचा प्रभाव :

आपल्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या आर्थिक मागण्यासाठी संघर्ष करणारी संघटना अशा स्वरूपात फिक्की फार काळ काम करणे शक्य नव्हते. पण राजकारणात आपण प्रभावीरित्या हस्तक्षेप करू शकतो असे भांडवलदारांना वाटू लागले. १९२८ मध्ये सर पुरूषोत्तम दास यांनी सुतोवाच केले की, 'आपली राजनीति आता आपल्या अर्थकारणापेक्षा आपल्याला वेगळी करता येणार नाही' भारतातील व्यापार आणि उद्योग राष्ट्रीय चळवळीशी

निगडीत आहेत. ते राष्ट्रीय चळवळीचा एक अंगभूत घटक आहे. चळवळीबरोबरच भारतीय व्यापार आणि उद्योग यांची वाढ होत राहिल आणि चळवळीच्या सामर्थ्याबरोबरच त्यांचेही सामर्थ्य वाढत जाईल. इ.स.१९३० मध्ये जी.डी. बिर्ला यांनी हाच दृष्टीकोण मांडला होता. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी जे लढा देत आहेत त्यांचे हात बळकट करणे हेच प्रत्येक भारतीय व्यावसायिकाचे कर्तव्य आहे.

**४. भांडवलदारांचा साम्राज्यवादाचा विरोधी लढा :**

भांडवलदार वर्ग साम्राज्यवादाच्या विरोधी होता पण साम्राज्यवादाच्या विरोधातील लढा कोणत्या पद्धतीने लढवावा याविषयी त्या वर्गाची स्वतःची अशी काही मते होती. घटनात्मक मार्ग, वाटाघाटी व चर्चा यांचे ते नेहमी समर्थन करीत असत. सर्वसामान्यांचा सविनय कायदेभंगाचा मार्ग त्यांना मान्य नव्हता. सविनय कायदेभंगाच्या लढ्यातून सामाजिक क्रांती दृष्टीक्षेपात येईल आणि त्यातून भांडवलशाहीच्या आस्तित्वाला धोका संभावेल अशी धास्ती त्यांना वाट होती. मार्च १९३० मध्ये पुरूषोत्तमदास ठाकूरदास यांना लालजी नारनजी लिहितात - अशा क्रांतीमुळे खाजगी मालमत्तेला धोका निर्माण होईल, कायदेशीर अधिकाऱ्यांचा अवमान करण्याची वृत्ती बोकाळेल. भविष्यकाळातील स्वराज्यसरकारलाही या अपप्रवृत्तीचे दुष्परिणाम भोगावे लागतील. म्हणून भांडवलदार वर्ग राष्ट्रीय चळवळीला घटनात्मक चळवळीच्या टप्प्यात आणण्याचा सतत प्रयत्न करीत.

**५. मुंबई योजना :**

जी. डी. बिर्ला यांनी १९३६ मध्ये भांडवलदारांनी अशा राष्ट्रवाद्यांशी हातमिळवणी करावी की जे भांडवलशाहीला अनुकूल आहेत आणि समाजवादाच्या विरोधात आहेत. १९४३ मध्ये जी. एल. मेहता यांनी व्यापक सुधारणा कार्यक्रम तयार करण्याच्या दृष्टिकोणातून युद्धोत्तर आर्थिक विकास समिती स्थापन केली. याच समितीने पुढे मुंबई योजना तयार केली. मुंबई योजनेमध्ये जलद आर्थिक प्रगती आणि साधनसंपत्तीचे न्याय वितरण यांसारख्या बाबींवर गांभीर्याने विचार करण्यात आला होता. अशंतः राष्ट्रीयीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची स्थापना, जमिन सुधारणा, कामगार - कल्याणाच्या योजना यांचे समर्थन करण्यात आले होते. त्यामुळे भारतीय भांडवलदारांचे स्वतंत्र प्रभुत्व प्रस्थापित झाले असे म्हणावे लागले.

## ६.५ सारांश :

भारतीय स्वातंत्र्य लढा हा केवळ ब्रिटिश सत्तेविरूद्धचा संघर्ष नसून, वसाहतवाद, आर्थिक मिळवणूक व साम्राज्यवादाविरूद्धचा तो संघर्ष होता. वसाहतवाद आणि भारतीयांचे हितसंबंध यांच्यातील मध्यवर्ती विसंगतीमधून भारतीय राष्ट्रीय चळवळ उभी राहिली. ब्रिटिश सत्ताधीश आपल्या राजकीय नियंत्रणाच्या आधारे ब्रिटिश अर्थव्यवस्था व समाज यांच्या गरजांना प्राधान्य देऊन भारतीय अर्थव्यवस्था व समाज यांना दुय्यम स्थान देत आहेत, या वसाहतवादाच्या स्वरूपाचे स्पष्ट, शास्त्रशुद्ध व निश्चित आकलन चळवळीच्या नेत्यांना झाले आणि नंतर त्यांनी या आकलनाच्या आधारेच आपली चळवळ उभी केली. सर्वसाधारणपणे देशाची परागती होत असून त्याचा पुरेसा विकास होत नाही, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. या पायावरच त्यांनी आपली भारतीय वास्तवाची समज विकसित केली आणि हळूहळू एक स्पष्ट वसाहतवाद विरोधी विचार प्रणाली विकसित केली.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय नेत्यांनी वसाहतवादी शोषणाच्या तीन पद्धती नीटपणे समजावून घेतल्या. लूटमार कर-आकारणी आणि इंग्रजांना भारतात नोकऱ्या देवून, मुक्त व असमान व्यापाराच्या माध्यमातून व भारतात ब्रिटिश भांडवलाची गुंतवणूक करून वसाहतवादी राजवट भारतीयांचे शोषण करीत होती. भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लडमध्ये वळविण्याच्या तत्वावरच वसाहतवादाची समग्र विचारसरणी केंद्रित झाली होती. इंग्लडमधील औद्योगिकरणाचे संरक्षण करण्यासाठी भारतीय उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला पाहिजे ही त्यांची पहिली भूमिका होती. शेतीतून अधिकाधिक महसूल जमा झाला पाहिजे हा दूसरा हेतू त्यासाठी जकात विषयक धोरण, शेतसाऱ्याबद्दलचे धोरण ब्रिटिशांनी त्यांच्या व्यापाराला पूरक व भारतीय अर्थव्यवस्थेला मारक असे ठेवले. त्यामुळे व्यापार, उद्योग व राजकीय वर्चस्व या तीन मार्गानी भारतातील संपत्तीचे निःसारण इंग्लडमध्ये होऊ लागले.

दादाभाईनी आपल्या भाषणातून व लिखाणातून याच मुद्यावर पुन्हा पुन्हा जोर दिला होता. भारताचे हितकर्ते हा ब्रिटिश शासनाचा खरा चेहरा नसून तो त्यांचा मुखवटा आहे. त्याच्या आडून ब्रिटिश राज्यकर्ते आपल्या देशाचे शोषण करीत आहेत. असे प्रतिपादन त्यांनी केले. आधुनिक वसाहतवादाच्या गुंतागुंतीच्या आर्थिक रचनेत आणि भारतीय जनता व ब्रिटिश राजवट यांच्यातील प्रमुख विसंगतीचे शास्त्रशुद्ध विश्लेषण या मजबूत पायावर त्यांनी आपल्या राष्ट्रवादाची उभारणी केली. भारतीय भांडवलदारांनी एक राष्ट्रीय घटक म्हणून या राष्ट्रीय चळवळीविषयी जे सर्वसाधारण धोरण अवलंबीले होते. त्यामुळे स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला. आपले दिर्घकालीन हितसंबंध कोणते आहेत, हे ओळखण्यात भारतीय भांडवलदारांनी विशेष प्रगल्भता दाखविली. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय चळवळ मध्यमवर्गीय विचारप्रणालीच्या वर्चस्वाखाली का राहिली हे समजते.

## ६.७ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न

प्रश्न १. ब्रिटिश सत्तेची आर्थिक धोरणे व त्याचे परिणाम यांचे टीकात्मक परीक्षण करा.
प्रश्न २. संपती निःसारण सिद्धांताचे भारतीय राष्ट्रवादाच्या संदर्भात मुल्यमापन करा.
प्रश्न ३. भारतीय भांडवलदारांची राष्ट्रवादाच्या उदयातील भूमीका स्पष्ट करा.
प्रश्न ४. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयातील महत्त्वाचे टप्पे सांगा.

## ६.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. भारताचा स्वातंत्र्य संघर्ष - डॉ. एम्. व्ही. काळे के सागर, पब्लीकेशन - पुणे
२. इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स - बिपन चंद्र
३. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. सुमन वैद्य
४. मॉडर्न इंडिया - खुराना के. एल.
५. सोशल बॅकग्राऊंड ऑफ इंडियन नॅशनलिझम् - देसाई ए. आर.


❖❖❖❖

# ७

# राष्ट्रवादाचा उदय व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

## Growth of Nationalism

**अनुक्रमणिका**


७.० उद्दिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२.१ राष्ट्रवादाचा उदय :

७.२.१ राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे

१. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव

२. प्रशासकीय एकता व सुव्यवस्था

३. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव

४. सुधारणावादी चळवळी

५. दळणवळण व संचारसाधनाचा विकास

६. भारतीय वृत्तपत्रे व नियतकालीक

७. भारतीय साहित्य व साहित्यीक

८. पाश्चात्याचे तत्वज्ञान

९. हिंदी जनतेची आर्थिक दुरावस्था

१०. ब्रिटिशाचे वंशद्वेषाचे धोरण

११. क्रांतीकारकांचे कार्य

१२. गव्हर्नर जनरल लिटनची जुलमी राजवट

१३. इलर्बट बिल

७.३ भारतातील राजकीय संस्थाची निर्मिती

१. बंगालमधील राजकीय संघटना

२. मुंबई प्रांतातील राजकीय संघटना

३. मद्रास इलाख्यातील राजकीय संघटना

४. प्रांतीक संघटनाची कामगिरी

७.४ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना :

१. काँग्रेसची ध्येये व उद्दिष्ट्ये

७.५ काँग्रेसचा पहिला कालखंड (मवाळवाद / नेमस्त) १८८५-१९०५

७.५.१ नेमस्ताची विचारसरणी - कार्यपद्धती

७.५.२ राष्ट्रीय काँग्रेसचे कार्य १८८५-१९०५

१. राजकीय, सामाजिक व आर्थिक गाऱ्हाणी मांडली

२. परदेशातील लोकांच्या गाऱ्हाण्याकडे लक्ष

३. प्रशासकीय सुधारणा

४. न्यायविषयक व इतर सुधारणाची मागणी

५. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी केली.

७.५.३ नेमस्त काँग्रेसच्या कार्याचे मुल्यमापन

७.६ राष्ट्रीय काँग्रेसचा द्वितीय कालखंड जहाल राष्ट्रवादाचा उदय १९०५ ते १९१९

जहाल राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे

१.ब्रिटीश सत्तेचे खरे स्वरूप कळाले.

२. ब्रिटिशांनी केलेले आर्थिक शोषण

३. काँग्रेसच्या कामगिरीबद्दल नाराजी

४. सामाजिक व आर्थिक चळवळी

५. नैसर्गिक आपत्ती व सरकारचे जनतेकडे अक्षम्य दुर्लक्ष

६. लॉर्ड कर्झनची जुलमी राजवट

७. बंगालची फाळणी

जहाल राष्ट्रवाद्यांची विचारसरणी व कार्यपद्धती

३. वंगभंग आंदोलन

४. राष्ट्रीय काँग्रेसची भूमिका - सुरत काँग्रेस

५. राष्ट्रीय चळवळीची प्रगती

६. स्वदेशी - बहिष्कार चळवळ

७. लोकमान्य टिळक - त्यांचे राष्ट्रीय चळवळीतील कार्य जहालवादाचे मुल्यमापन

७.७ सारांश

७.८ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न.

## ७.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

- भारतात राष्ट्रवादाचा उदय होण्यास कोणती कारणे कारणीभूत ठरली हे सांगता येईल.
- राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी भारतात कोणत्या राजकीय संस्था उदयास आल्या होत्या हे विषद करता येईल.
- राष्ट्रीय काँग्रेची स्थापना कशी झाली व त्यासाठी पुढाकार कोणी घेतला हे स्पष्ट करता येईल.
- राष्ट्रीय काँग्रेसचा पहिला कालखंड (१८८५-१९०५) या काळातील काँग्रेसची भूमिका व कार्य स्पष्ट करता येईल.

- राष्ट्रीय काँग्रेसचा दुसरा कालखंड (१९०५-१९२०) जहाल काँग्रेस या कालखंडात काँग्रेसचे स्वरूप कसे बदलत गेले हे सांगून तिचे राष्ट्रीय चळवळीतील कार्य सांगता येईल.

## ७.१ भारतीय राष्ट्रवादाचा विकास

'राष्ट्रवाद' या संकल्पनेमध्ये सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे, देशातील जनतेच्या मनांत ऐक्याची भावना व देशप्रेम निर्माण होणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे भावनात्मक ऐक्य ज्यावेळी लोकांमध्ये निर्माण होते; त्यावेळी धर्म, वंश, भाषा इत्यादी घटकांना गौण स्थान असते. अठराव्या शतकापासून या संकल्पनेचा जगाच्या इतिहासात विचार केला जातो 'राष्ट्रवाद ही एक भावना असून ती प्रत्येकाला आपल्या देशावर प्रेम करावयास शिकवते. आधुनिक काळात 'राष्ट्र व राष्ट्रवाद (Nation & Nationalism)' या संकल्पनांचा विकास होत गेला. विशेषतः युरोपमध्ये प्रथम या विचारसरणीचा प्रसार झाला.'

भारतीयांच्या मनांत ही  भारतभूमीबद्दल प्रेम, आत्मीयता होती. परंतु 'एकसंघ भारत' किंवा आम्ही सर्व भारतीय एकाच देशाचे नागरिक आहोत व आपण आपल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधीत राखले पाहिजे हे विचार भरतीयांच्यात रूजले नव्हते. अशा प्रकारची राष्ट्रीयत्वाची जाणीव भारतीयांच्या मनात विविध कारणांनी १९व्या शतकाच्या उत्तरार्धात जागृत झाली. ब्रिटिशांची राजवट भारतात स्थिरावल्यानंतर एकीकडे ब्रिटिशांनी या देशाचे आर्थिक शोषण सुरू केले तर दुसरीकडे पाश्चात्य शिक्षण, ब्रिटिशांचा साम्राज्यवाद - त्यांचा एकछत्री अंमल जुलमी राजवट इ. अनेक कारणांनी या देशात नवजागृतीस सुरुवात केली. येथील बुद्धीवादी लोकांनी राजकीय व सामाजिक प्रबोधन घडवुन आणले. त्यामुळे अनेक राजकीय व सामाजिक चळवळी उदयास आल्या. व भारतात हळूहळू राजकीय संघटन घडून आले आणि त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. सत्ताधाऱ्या विरूद्ध लोक राजकीय संघटना उभारू शकतात ही कल्पनाच मुळी नवीन होती. परंतु राष्ट्रवादाच्या निर्मितीमुळे ही गोष्ट घडून आली. एकेकाळी पाश्चात्य म्हणून गणल्या गेलेल्या या विचारसरणीचा प्रसार भारतीयांच्यातही होऊन त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात आवाज उठविण्यास सुरवात केली.

पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाने भारतात आधुनिक राजकीय विचार विकसित झाले. राष्ट्रवादाची वाढ झाली. त्यामुळे भारतीयांच्या मनात ब्रिटीशांची जुलमी राजवट, त्यांनी सुरू केलेले आर्थिक शोषण व वर्णभेदी धोरण याविषयी असंतोष वाढीस लागला होता. भारतीय लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना विकसित होऊ लागली. त्यामुळे आपल्या काही समस्या सोविण्यासाठी तसेच संघटन घडवून आणून ब्रिटिशसत्तेविरूद्ध लोकमत तयार करण्याकरीता अखिल भारतीय स्वरूपाच्या संघटनेची दिवसेदिवस आवश्यकता वाटू लागली होती. त्यादृष्टीने या देशात राजकीय व सामाजिक जागृती होवू लागली होते. देशाच्या विविध भागात प्रादेशिक स्वरूपाच्या संघटना उदयास येऊ लागल्या होत्या. बंगाल, मुंबई व मद्रास प्रांतात अशा प्रकारच्या संघटना उदयास आल्या होत्या. एकंदरीत देशात राष्ट्रवादी विचाराचे वारे वाहू लागले होते.

### ७.२.१ भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे

भारतीय लोकांच्या मनांत राष्ट्रवादाचा झालेला उदय ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. आपण सर्व भारतीय आहोत. ब्रिटिशांची सत्ता आपल्या देशावर असून आपण पारतंत्र्यात आहोत या सत्तेविरूद्ध स्वातंत्र्यचळवळ उभी करून आपण स्वतंत्र झाले पाहिजे ही राष्ट्रवादाची भावना भारतीयांच्या मनात १९व्या शतकांच्या उत्तरार्धात निर्माण झाली. ही घटना आकस्मितरित्या किंवा एकाएकी घडून आलेली नाही. या राष्ट्रवादाच्या निर्मितीच्या पाठीमागे अनेक कारणे आहेत.

ब्रिटिशांच्या वसाहतवादास भारतीयांकडून सुरवातीपासूनच विरोध होत होता. हा विरोध राजेरजवाडे, संस्थानिक, संस्थानिकांच्या सेवेतून कमी झालेले सैनिक, शेतकरी इत्यादीच्या बंडाळयातून प्रकट होत होता. परंतु हा विरोध असंघटित, स्थानिक स्वरूपाचा व राष्ट्रीयत्वाचा अभाव असलेला होता. त्यामुळे या उठावाला किंवा चळवळीला राष्ट्रीय चळवळ म्हणता येत नव्हते. १९व्या शतकाच शेवटच्या दोन दशकात ही परिस्थिती बदलली. भारतामध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. व याच राष्ट्रीय सभेच्या नेतृत्वाखाली पुढील काळात राष्ट्रीय स्वरूपाची स्वातंत्र्य चळवळ उभी राहिली त्यामागे राष्ट्रवादाचा उदय महत्त्वाचा होता. या राष्ट्रवादाचा उदय होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत झाली होती ती पुढीलप्रमाणे आहेत.

**१. ब्रिटिश साम्राज्यवाद व राजकीय ऐक्य :** ब्रिटिशांचा भारतातील विस्तार हा भारतातील राष्ट्रवादाच्या उदयास कारणीभूत ठरलेला आहे. ब्रिटिशांची सत्ता या देशात प्रस्थापित होण्यापूर्वी भारत राजकीय दृष्ट्या विस्कळीत होता. भारतात अनेक लहान-लहान राज्ये होती. आपले छोटे राज्य म्हणजेच देश अशी संकुचित भावना राज्यकर्ते व लोकांची ही असे मोगल व मराठ्यांनी मोठी साम्राज्ये उभी केली. परंतु संपूर्ण भारत एका सत्तेच्या अमंलाखाली कधीच आला नव्हता. या लहान राज्यातून एक राष्ट्रीयत्वाची भावना कधीच निर्माण झाली नव्हती. ब्रिटिशांनी संपूर्ण भारतात आपले साम्राज्य प्रस्तापित केले. काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत संपूर्ण भारतात पहिल्यांदाच असा एकछत्री अंमलाखाली आला होता. या राजकीय ऐक्यामुळे राष्ट्रवादास पोषक वातावरण निर्माण झाले. भारत हा एक देश आहे. ही ऐक्य भावना भारतीयात निर्माण झाली. या घटनेबद्दल प्रो. मून म्हणतात, “British imperialism in india gave her a political Unity under a third party in spite of the many discordant elements in Indian society.”

**२. प्रशासकीय एकता व सुव्यवस्था :** ब्रिटिशांनी आपल्या प्रादेशिक विस्ताराबरोबरच संपूर्ण भारतात एकच प्रशासन यंत्रणा निर्माण केली. सर्व भारतीयासाठी समान कायदा, समान न्याय यंत्रणा व सुव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे भिन्न भाषिक व भिन्न प्रांतीय एकाच प्रशासकीय सूत्रात बांधले गेले. ब्रिटिश पूर्व काळातील अराजकता संपुष्टात येऊन भारतात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली. ही शांतता व सुव्यवस्था सांस्कृतिक ऐक्याला व विकासाला पोषक ठरली. त्यामुळे या देशात राष्ट्रीयत्वाची भावना विकास होण्यास मदत झाली.

ब्रिटिश इतिहासकार ग्रिफीथ म्हणतो, ‘‘ब्रिटीश शासन काळात भारतीयावर कुशल आणि शक्तीशाली शासनाचा प्रभाव पडला व ज्यावेळी भिन्न-भिन्न क्षेत्रात एकता निर्माण झाली. जाती, धर्म, भाषा व सामाजिक स्थिती यांतील भिन्नत्वामुळे जरी वेगळेपण कायम राहिले तरी एकाच सरकारच्या नियंत्रणामुळे भारतीयांत एक सूत्रता निर्माण होण्यास सुरवात झाली.’’

**३. पाश्चत्य शिक्षणाचा प्रभाव :** या देशात ब्रिटिशांची सत्ता स्थिरावल्या नंतर त्यांनी येथे पाश्चात्य पद्धतीची शिक्षण व्यवस्था सुरू केली. इंग्रजांनी आपल्या प्रशासनाच्या सोईसाठी भारतीयांना इंग्रजी शिक्षण देण्याचे धोरण स्वीकारून इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. या शिक्षणातून येथीलच लिपिक वर्ग मिळावा हा हेतु होता. तो त्यांचा हेतु साध्य झाला परंतु भारतीयांच्या दृष्टीने काही चांगले परिणाम झाले. इंग्रजी भाषेचे ज्ञान भारतीयांना झाल्यावर त्या भाषेतील समृद्ध ज्ञानाची ओळख येथील लोकांना झाली. मिल्टन, शेले, बेंथम मिल, स्पेन्सर, रूसो, हॉल्टेअर यांच्या विचाराची माहिती येथील लोकांना झाली. स्वातंत्र्य समता लोकशाही राष्ट्रवाद व राष्ट्रीयता या विचारांची त्यांना लागण होऊन राष्ट्रीय ऐक्याची भावना त्यांच्यात निर्माण झाली. त्याबद्दल १८६५ मध्ये एडविन अर्नाल्डने लिहले होते की ''भारताला एक राष्ट्र बनिवण्याचे कार्य मोठे मोठे वंश याआधी करू शकले नाहीत किंवा अकबराला आपल्या उदारतेने किंवा टिपूला आपल्या क्रौर्याने जे जमले नाही ते कार्य भारतासाठी रेल्वेने करून दाखविले.'' हे एडविनने केलेले विधान भावी काळात खरे ठरलेले दिसते.

रेल्वेप्रमाणेच डाक व्यवस्था व तारायंत्राने संपूर्ण देशाला जोडण्याचे कार्य केले. या संपर्क साधनानी भारताच्या विभिन्न भागात राहणाऱ्या जनतेला परस्पर संबंध ठेवण्यात मदत केली. त्यामुळे जनतेत एकजिनसीपणा निर्माण झाला.

**४. भारतीय वृत्तपत्रे व नियतकालिके :** इंग्रजांच्या आगमनानंतर भारतात वृत्तपत्राचा उदय झाला. प्रारंभी युरोपियन लोकांनी भारतात छापखाना सुरू केला. कालांतराने भारतीय वृत्तपत्रांचा विकास झाला. १८७५ पर्यंत भारतातील विविध प्रांतातून ३७४ वृत्तपत्रे निघत होती. या वृत्तपत्रांनी ब्रिटिशाकडून भारतीय लोकांवर होणाऱ्या अन्यायास वाचा फोडण्याचे कार्य केले. मुंबई प्रातांत ज्ञानप्रकाश, केसरी, खानदेश, मराठा, तर बंगालमधून हिंदू पेट्रीअट, बंगाली, इंडियन मिरर व अमृतबझार पत्रिका निघे मद्रास मधून 'द हिंदू हे वृत्तपत्र निघे. साम्राज्यवादी ब्रिटिश शासकांनी अनेक बंधने घालूनही या वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या आर्थिक व राजकीय धोरणावर जाहीर टिका करून भारतीयांना जागृत करण्याचे कार्य केले. भारतीय वृत्तपत्रांनी राष्ट्रवादाच्या निर्मितीस पोषक कार्य केले. बंगाल गॅझेट, मुंबई समाचार, चंद्रिका, दर्पण, ज्ञानप्रकाश यासारख्या नियंतकालीकानीही राष्ट्रवादाच्या वाढीस मदत केली.'

**५. भारतीय साहित्य व साहित्यीक :** राष्ट्रवादाच्या वाढीसाठी वृत्तपत्राप्रमाणेच भारतीय साहित्य व साहित्यीक यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. बंगालमध्ये बंकिमचंद्र चटर्जी, दिनबंधु मित्र, रविंद्रनाथ टागोर, ईश्वरचंद्र विद्यासागर, महाराष्ट्रात लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, शि. म. परांजपे इत्यादींनी राष्ट्रप्रेम निर्माण करणारे लिखाण केले. उदा. बंकिमचंद्र चटर्जी यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीतील 'वंदे मातरम्' हे गीत स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील घोषगीत ठरले. तसेच इंग्रजी भाषेतील अनेक ग्रंथाचे भारतीय भाषेत भाषांतरे झाली व भारतीय लोकांच्या वाचनात आली. पाश्चात्य विचारप्रणाली भारतीयांना समजली त्यामुळे भारतात जनजागृतीस मदत झाली.

**६. पाश्चात्याचे तत्वज्ञान :** पाश्चात्य विचारवंताच्या तत्वज्ञानाचा भारतीय जनतेवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम घडून आला. स्पेन्सर मिल, रूसो, व्हॉल्टेअर, मॉंटेस्क्यू, कार्ल मार्क्स या विचारवंताच्या तत्वज्ञानाची ओळख भारतीयांना झाली. रूसोने स्वातंत्र्य व समतेचा, मॉंटेस्क्यूने सत्ताविभाजनाचा, लॉकने प्रतिनिधिक लोकशाहीचा व मार्क्सने समाजवादाचा विचार मांडला. या विचारवंताच्या विचारामुळे फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. अनेक ठिकाणी राजेशाही व सरंजामशाहीचा शेवट होऊन लोकशाहीची स्थापना झाली होती. या घटनांचा

परिणाम भारतीय जनतेवर ही घडवून आला. याबद्दल दादाभाई नौरोजी म्हणतात, ``We learnt new lesson that kings are People and the people, are for their kings."

**७. भारतीय जनतेची आर्थिक दुरावस्था :** ब्रिटिशांनी या देशाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण चालविले होते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था दिवाळखोरीकडे निघाली होती. ब्रिटिशांनी भारतातून कच्चा माल कमी किंमतीत घेऊन इंग्लडला नेला व त्याचा पक्का माल बनवून तो पुन्हा भारतीय बाजारपेठेत विकला. भारतीय उद्योगधंद्यावर त्यांनी जबरदस्त कर बसविले. त्यामुळे इथले धंदे बसले. लोकांच्यावर बेकारीची पाळी आली. या देशातील लोकांचे दारिद्र्य वाढले. थोडक्यात म्हणजे भारत कच्चा मालाचा पुरवठा करणारा व पक्का मालाची विक्री करणारी ब्रिटिशांची बाजारपेठ बनला. ब्रिटिशांनी विविध मार्गांनी कोट्यावधी रूपयांची संपत्ती इंग्लडला नेली. तसेच ब्रिटिश नोकरदारांना प्रचंड पगार दिले. भारतीयांना मात्र कमी पगार दिले जाई. शेती उत्पादनातील घट. वेळोवेळी पडणारे दुष्काळ, उद्योग धंदे बुडाल्या यामुळे येथील जनता शतकानु शतकाची दरिद्री बनली. त्याना कोणी वाली राहिला नाही. त्यामुळे ब्रिटिश सत्तेबद्दल भारतीयांच्यात मोठ्या प्रमाणात असंतोष वाढीस लागला. हेन्री कॉटन व विलीयम हंटर यांच्या मते, 'मोंगलाच्या काळात संपन्न असलेला हा देश १०० वर्षाच्या ब्रिटिशांच्या राजवटीत दारिद्र्याच्या गर्तेत लोटला गेला.' एकंदरीत हिंदुस्थानातील लोकांची ब्रिटिशांनी चालवलेली आर्थिक पिळवणूक, त्यांची अत्याचारी वागणूक इत्यादीमुळे ब्रिटिशाबद्दल भारतीयांच्या मनात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. लॉर्ड सॅलिसबरी या १८७५ साली भारतमंत्री असलेल्या मुत्सद्याने भारताचे अपार रक्त शोषण ब्रिटिश राजवटीने केले असल्याचा निर्वाळा दिला आहे. १८८० साली ग्लॅडस्टनने भारताचे दारिद्र्य हे ब्रिटिश साम्राज्यवादी नितीचा अपरिहार्य परिणाम असल्याची कबुली दिली आहे. थोडक्यात म्हणजे नानाविध मार्गानी वर्षानुवर्षे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी चालविलेले अर्थशोषण जर थांबविले नाही तर देशाचा आर्थिक विनाश अटळ आहे व तो टाळण्यासाठी राजकीय हक्क मिळविणे अत्यावश्यक आहेत हा विचार भारतीयात राष्ट्रवादी भावना निर्माणहोण्यास उपकारक ठरला.

**८. ब्रिटिशांचे वंशद्वेषाचे धोरण :** ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अंगीकारलेले वंशविद्वेषी धोरणही राष्ट्रवादाच्या वाढीस कारणीभूत झालेले दिसते. भारतावर आपला राजकीय प्रभाव प्रस्थापित केल्यापासून ब्रिटिश राज्यकर्ते आपल्या सांस्कृतिक व वर्णश्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवीत असत. सर्व भारतीयांना जरी ते काही प्रतिष्ठीत व उच्च शिक्षित असले तरी सर्वांना हीन व कमी दर्जाचे लेखीत असत. त्यामुळे जेते व जित, राज्यकर्ते व प्रजा यांच्यातील दरी सतत रूंदावत गेली. १८७७ मध्ये डिग्बी नावाचा निरीक्षक लिहितो, ''युरोपियन्स हिंदुस्थानच्या लोकांना वाईट वागणूक देतात आणि एतदेशीयांच्या बरोबरचे त्यांचे वर्तन अनादर व उद्धटपणा दाखविणारे असे.'' प्रवास करताना जर भारतीय व्यक्ती पहिल्या वर्गातून प्रवास करीत असेल तर ब्रिटिश लोक त्यास बाहेर काढीत असत. एखादा गोरा अधिकारी रस्त्याने जात असेल तर त्याला भारतीयांनी नमस्कार करावा असे त्यांना वाटत असे. असा नमस्कार न केल्यास त्या भारतीयाला काही वेळा दंड भरावा लागे. राजा राममोहन रॉय सारख्या व्यक्तींना सुद्धा ही मानहानी सोसावी लागली होती. न्यायदान क्षेत्रातही ब्रिटिश न्यायाधिश पक्षपात करीत असत. गंभीर गुन्हा करूनही इंग्रज गुन्हेगारांना सामान्य शिक्षा देत असत. भारतीयांना मात्र कडक शिक्षा केल्या जात. ब्रिटीश लोक भारतीयांना काळे म्हणून हिणवत असत.

प्रशासनातील नोकऱ्याबाबतही भेदभाव केला जात असे. उच्च पदे शक्यतो भारतीयांना  नाकारली जात असत. लॉर्ड डलहौसी व लार्ड हेस्टींग्ज यांनी भारतीयांच्या कार्यक्षमतेबद्दल जाहीर शंका व्यक्त केली होती. ब्रिटिशांच्या या वंशद्वेषी धोरणामुळे भारतीयांची अस्मीता व स्वाभीमान जागृत झाला होता.

**९. क्रांतीकारकांचे कार्य :** ब्रिटिश राजवटीत त्यांच्या सत्तेविरूद्ध देशात प्रारंभापासूनच निरनिराळ्या ठिकाणी उठाव झाले होते. या सर्वच उठावांच्यामागे राष्ट्रीय वृत्ती असेल असे म्हणता येणार नाही परंतु ब्रिटीशांच्याकडून होणाऱ्या अन्याचा विरूद्ध लढण्याची प्रवृत्ती भारतीयांच्यात होती हे या उठावातून सिद्ध होते. अशा प्रकारचे उठाव भारताच्या निरनिराळ्या भागात घडून आले होते. बंगाल मधील संथाळांचा उठाव, मुंबई प्रांतातील रामोशी कोळी व भिल्ल यांचे उठाव, मद्रासमधील पालेगारांचे उठाव, ओरिसातील खोंडांचा व आसामातील खांसीचा उठाव असे अनेक ठिकाणी उठाव घडून आले होते. महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी तर परकिय इंग्रजांना या देशातून हाकलून लावले पाहिजे अशा राष्ट्रीय भूमिमेकेतून केलेला उठाव महत्त्वाचा होता. या सर्व उठावातून ब्रिटिश सत्तेविरूद्धची चीड, संताप व्यक्त होत होता. ब्रिटीश सत्ते विरूद्ध लढण्याची राष्ट्रवादी भावना त्यातून प्रकट होत होती.

**१०. गव्हर्नर जनरल लिटनची जुलमी राजवट :** सन १८७६ ते १८८० या काळात ग. ज. म्हणून लिटनची नेमणूक करण्यात आली होती. त्यांची जुलमी राजवट भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीस कारणीभूत ठरलेली होती. सन १८७६-७८ या दोन वर्षात देशात दुष्काळ पडून त्यात ५० लाख माणसे मरण पावली. परंतु लिटनने या घटनेकडे पूर्ण दुर्लक्ष केले. दुष्काळ निवारण्याच्या दृष्टीने काहीही योजना आखल्या नाहीत. त्यामुळे लोकांचे खूपच हाल झाले मात्र इकडे दिल्लीत १८७७ साली दरबार भरवून स्वतःच्या वैभवाचे व सामर्थ्याचे प्रदर्शन केले. त्यासाठी लाखो रूपये खर्च केले.

सन १८७८ साली देशी भाषिक वृत्तपत्राची मुस्कटाबी करण्यासाठी 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' पास करून वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध घातले. तसेच त्याच वर्षी 'आर्म्स ॲक्ट' पास करून भारतीयांना परवान्याशिवाय शस्त्र बाळगता येणार नाही हे स्पष्ट केले. इंग्लडमधील स्पर्धा परिक्षेला बसण्याची वयोमर्यादा २१ वरून १९वर आणली त्यामुळे भारतीयांना या परिक्षेला बसणे अवघड झाले. मँचेस्टरहून येणाऱ्या कापडावरील आयातकर (पाच टक्के) बंद केल्याने ते कापड अतिशय स्वस्त दराने मिळू लागल्याने या देशातील कापडधंदा बसला. व या उद्योगधंदातील लोक देशोघडीला लागले. लार्ड लिटनच्या या जाचक व जुलमी कायद्यामुळे लोकांत असंतोष निर्माण झाला. म्हणूनच सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात की, ''लॉर्ड लिटनची राजवट एका अर्थाने वरदानच ठरली. त्यांच्या धोरणामुळेच भारतीय जनता जागृत झाली व राष्ट्रीय आंदोलनात उतरली.''

**११. इल्बर्ट बिल :** लॉर्ड लिटननंतर १८८० मध्ये ग. ज. म्हणून लॉर्ड रिपनची नेमणूक करण्यात आली. त्यांने भारतीय लोकावरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. वांशिक भेदभाव करणारे 'आर्म्सॲक्ट' व 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' रद्द केले. अफगाण युद्धाचा शेवट केला. ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानातील न्यायव्यवस्था पक्षपाती होती. भारतीय न्यायधिशांना युरोपियन गुन्हेगारा संबंधीचा खटला चालविण्यास बंदी होती. हा पक्षपात दूर करण्यासाठी

रिपनने कायदा मंत्री लॉर्ड इलबर्ट यास हा भेदभाव नाहीसा करणारे बिल कायदेमंडळात मांडण्यास सांगितले. ते बील 'इलबर्ट बील' या नावाने प्रसिद्ध आहे. हे बील युरोपियन लोकांना अपमानास्पद वाटले. म्हणून याबिलाविरूद्ध युरोपियन लोकांनी 'डिफेन्स असोशिएशन' स्थापन करून या कायद्याच्या विरोधात व रिपन विरूद्ध चळवळ उभी केली शेवटी ब्रिटिश संसदेने या बिलात बदल केला. या आंदोलनामुळे भारतीयांना तुच्छ लेखण्याची इंग्रजांची वृत्ती उघड झाली. कायदेशीर आंदोलन कसे करावे व त्यासाठी संघटीत होण्याची किती आवश्यकता असते याचे ज्ञान ही भारतीयांना मिळाले. सभा, मोर्चे, निदर्शने यामुळे सरकारवर दबाव आणण्याचे एक नवे शस्त्र या बिलाच्या निमित्ताने भारतीयांना लोकांना समजले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणमिमांसा करा.

## ७.२ भारतातील राजकीय संघटनांची निर्मिती

१९व्या शतकाच्या मध्यापासून भारतात विविध कारणांनी राष्ट्रीय भावनेची जागृती होण्यास सुरूवात झाली होती. त्याचीच परिणीती म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापने अगोदर काही प्रांतीक स्वरूपाच्या संघटना स्थापन झाल्या होत्या. त्या बंगाल, मुंबईप्रांत व मद्रास मध्ये होत्या. या संघटनात प्रामुख्याने वकील पत्रकार, डॉक्टर, प्राध्यापक - शिक्षक इत्यादी सुशिक्षीत मध्यम वर्गीयांचा भरणा होता. त्यांनी ब्रिटीश पार्लमेंटकडे अर्जविनंत्या करून काही मागण्या मान्य करून घेतल्या होत्या. प्रशासनात सुधारणा, भारतीयांचा प्रशासनातील सहभाग वाढविणे व शिक्षणप्रसार घडवून आणणे या बाबत त्या मागण्या होत्या. या राजकीय संघटना बंगाल व मुंबई प्रांतात जास्त सक्रिय होत्या.

### १. बंगालमधील राजकीय संघटना

राजा राममोहन रॉय भारतातील सामाजिक, धार्मिक व राजकीय जागृतीचे व सनदशीर चळवळीचे प्रवर्तक होते. भारतीयांच्या अडिअडचणी सोडविण्यासाठी प्रशासक म्हणून इंग्रजाचे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न करणारे राजा राममोहन रॉय हे पहिले भारतीय होते. त्यांनी प्रेस ॲक्ट व ज्यूरी ॲक्ट कायद्याविरूद्ध त्यांनी जनमत जागृत करून कंपनी सरकारला निवेदन दिले होते. त्यांच्या अनुयायांनीच इ.स. १८३६ मध्ये 'वंगभाषा प्रकाशिका सभा' या राजकीय संस्थेची स्थापना केली होती.

इ.स.१८३७ मध्ये द्वारकानाथ टागोर यांनी जमिनदार वर्गाच्या हित संबंधाच्या रक्षणासाठी 'लँड होल्डर्स असोशिएशन' नावाची संस्था स्थापन केली. या संघटनेची उद्दिष्ट्ये मर्यादित असली तरी त्यांनी प्रश्नांची सरकार दरबारी दाद लावून घेण्यासाठी सनदशीर राजकीय मार्ग अनुसरला होता.

१८३९ मध्ये जॉर्ज थॉम्पसन या इंग्रजाने भारतीय जनतेच्या हितसंबंधाकडे ब्रिटिश सत्तेचे लक्ष वेधण्यासाठी 'ब्रिटीश इंडिया सोसायटी' ही संस्था लंडनला स्थापन केली होती. पुढील काळांत जमिनदार असोशिएशन व ब्रिटीश इंडिया सोसायटी या दोन्ही संघटनांचे विलीनीकरण करून 'ब्रिटिश इंडियन असोशिएशन' नावाची संस्था १८ ऑक्टोबर १८५१ मध्ये स्थापन करण्यात आली. या संघटनने १८५२ साली वरील संस्थेचे संसदेकडे आपल्या तक्रारीचे व मागण्यांचे निवेदन सादर केले होते.

दादाभाई नौरोजी यांनी हिंदुस्थानच्या समस्यांची चर्चा करणे, त्यांची इंग्लडमधील लोकांना माहिती देणे व इंग्लडमधील लोकमतांचा ब्रिटिश सरकारवर दबाव आणून हिंदी लोकांची परिस्थिती सुधारणे या उद्देशाने १८६६ मध्ये ईस्ट इंडिया असोशिएशनची स्थापना केली. या संस्थेच्या अनेक शाखा भारतातील प्रमुख शहरात सुरू करण्यात आल्या होत्या.

बंगालमध्ये दिवसेंदिवस राजकिय जागृती वाढीस लागली होती. १८७० नंतर हे राजकीय परिवर्तन वेगाने घडून येत होते. 'हिंदू पेट्रीअट व अमृतबझार' या पत्रकात काही राजकीय हक्काची मागणी करण्यात आली होती. राजकीय जागृती होण्याच्या दृष्टीनेच अमृत बझार पत्रिकेचे संपादक शिरिषकुमार घोष यांनी 'इंडियन लीग' ही संघटना स्थापन केली होती. पुढील काळात बंगाल मधील युवकांच्यात राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव वाढू लागला. त्यातूनच सुरेंद्रनाथ बॅनर्जी व आनंद मोहन घोष यांच्या नेतृत्वाखाली 'इंडियन लीग ही संघटना विसर्जित करून २६ जुलै १८७६ रोजी 'इंडियन असोसिएशन ऑफ कलकत्ता' ही संस्था स्थापन केली आली. राजकीय प्रश्नावर प्रभावी लोकमत तयार करणे व समान राजकीय समस्या सोडविण्यासाठी लोकांत एकता निर्माण करणे ही दोन उद्दिष्ट्ये या संघटनेसमोर होती. या संघटनेच्या शाखा बंगाल व बंगाल बाहेरच्या काही शहरात स्थापन झाल्या होत्या.'

## २. मुंबई प्रांतातील राजकीय संघटना :

मुंबई प्रांतात १९व्या शतकाच्या मध्यापासूनच राजकीय जागृतीस सुरवात झाली होती.. १८४८ला एल्फिस्टन महाविद्यालयात 'स्टुडंट लिटररी ॲन्ड सायंटिफिक असोशिएशन' या संस्थेची स्थापन झाली होती. त्यामुळे मुंबईतील जागृत लोकांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याचे साधन मिळाले होते. सन १८५२ साली जगन्नाथ शंकरशेठ, डॉ. भाऊ दाजी लाड इत्यादी मंडळींनी 'बॉम्बे असोसिएशन' ची स्थापना केली. या संघटनेने भारतीय लोकांच्या हितासाठी काही हक्क व अधिकाराची मागणी करणारे एक निवेदन ब्रिटिश संसदेला सादर केले होते.

मुंबईप्रमाणेच पुण्यातही राजकीय सक्रियता दिसू येउ लागली होती. श्री. गणेश वासुदेव जोशी यांनी आपले सहकारी कृष्णाजी नूलकर, सदाशिवराव गोवंडे यांच्या मदतीने २ एप्रिल १८७० रोजी 'पुणा सार्वजनिक सभा' स्थापन केली होती. जनता व कंपनी सरकार यांच्यातील दुवा साधन्याचे कार्य या संघटनेने केले होते. न्या. रानडे यांची प्रेरणा ही संस्था हि संघटना स्थापन करण्यास कारणीभूत झाली होती.

लॉर्ड लिटनची प्रतिगामी कारकिर्द व इलबर्ट विधेयकावरील वाद याचा मुंबईच्या राजकीय क्षेत्रावर प्रभाव पडला होता. फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तय्यबजी, न्या. के.टी. तेलंग यांनी इ.स. १८८५ मध्ये 'बॉम्बे प्रेसीडेन्सी असोसिएशन या संघटनेची स्थापना केली. हे

तिघेही मुंबईच्या तीन जमातीचे प्रतिनिधीत्व करीत होते. अर्ज विनंत्या या माध्यमातून संघटनेने कार्य केले होते.

### ३. मद्रास इलाख्यातील राजकीय संघटना

मद्रास प्रांतातही काही राजकीय संस्था स्थापन झाल्या होत्या. बंगालमधील ब्रिटिश इंडियन असोशिएशनची शाखा या स्वरूपात 'मद्रास नेटिव्ह असोशिएशन' या संस्थेची स्थापना झाली होती. या संस्थेने १८५३च्या चार्टर कायद्याच्या आधी ब्रिटिश संसदेला एक निवेदन दिले होते. सन १८५७ नंतर ही संस्था बंद पडली.

सन १८८४ मध्ये रंगय्या नायडू, सुब्बाराव पंतलु सुब्रह्मण्यम अय्यर व एम. वीरराघवाचार्य यांनी 'मद्रास महाजन सभा' स्थापन केली. या संघटनेने जानेवारी १८८५ साली विधिमंडळात भारताच्या प्रतिनिधींचा समावेश करण्याची मागणी केली होती. सत्तेचे विभाजन करण्यात यावे अशा प्रकारच्या मागण्या महाजन सभा करीत असे.

### ४. प्रांतीक संघटनाची कामगिरी

बंगाल, मुंबई व मद्रास या प्रांतात ज्या निरनिराळ्या संघटना स्थापन झाल्या होत्या. त्यांनी हळूहळू जन जागृतीचे कार्य केल्याचे दिसते. या संघटनांनी येथील लोकांची गाऱ्हाणी ब्रिटीश सरकारच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला. त्या मागण्या खालील प्रमाणे होत्या

१. कापसाच्या आयातीवर कर लादण्यात यावा (१८७५)
२. शासकीय उच्चपदात भारतीय लोकांना प्रेवश मिळावा. (१८७९)
३. अफगाण युद्धातून हिंदुस्थानने माघार घ्यावी.
४. शस्त्रबंदी कायदा रद्द करण्यात यावा. (१८७८)
५. देशी वृतपत्रावरील बंदी मागे घ्यावी. (१८७८)
६. आय.सी.एस. या सर्वोच्च सनदी परिक्षेस बसण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांना परवानगी देण्यात यावी व त्यासाठी असलेली वयोमर्यादा वाढविण्यात यावी. इत्यादी अनेक मागण्या या संघटनांनी मांडल्या व त्यांना अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. प्रांतोप्रांती असणाऱ्या संघटना ऐवजी जर देशपातळीवर एकच राजकिय संघटना असेल तर त्यास अधिक व्यापक व विस्तृत स्वरूप प्राप्त होईल असे अनेक भारतीय नेत्यांना वाटू लागले होते.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. प्रांतीय संघटनांच्या कार्याचे मुलमापन करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ७.३ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना (१८८५)

अखिल भारतीय राष्ट्रीय स्वरूपाची एखादी संघटना असावी असे अनेक भारतीयांना वाटत असतानाच निवृत्त ब्रिटिश सनदी अधिकारी सर ॲलन ऑक्टेव्हिएन ह्युम यांनी बजावलेली भूमिका त्या दृष्टीने महत्त्वाची होती. ह्युम हे पंजाबचे माजी ले. गव्हर्नर व गव्हर्नर जनरलचे सेक्रेटरी होते. त्यांना भारतीयांच्यात ब्रिटिशाविरोधी किती असंतोष आहे याची जाणीव होती. १८६५ मधील बंगालच्या नीळ मळे मालकाविरूद्ध भारतीय शेतकऱ्यांनी केलेला संघर्ष, मलबारमधील ब्रिटिश विरोधी बंड, वासुदेव बळवंत फडकेंचा ब्रिटिश विरोधी उठाव इत्यादी घटना ब्रिटिश विरोधी असंतोषाची झलक होती. या असंतोषाचा स्फोट होऊन ब्रिटिशांचे राज्य उद्ध्वस्त होऊ नये अशी त्यांची इच्छा होती. भारतातील संभाव्य विध्वंस टाळण्यासाठी भारतीय सुशिक्षित वर्गाला विधायक कार्याकडे वळविण्याची गरज ह्युमने ओळखली. म्हणून त्यांनी भारतीय लोकांच्या असंतोषास वैध मार्ग उपलब्ध व्हावा. म्हणून भारतीय लोकांची राजकीय संघटना स्थापन करण्याची योजना आखली. १८८२ नंतर त्यांनी तसा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केला होता.

१ मार्च १८८३ रोजी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी, जाहीरपणे आवाहन करून पन्नास निर्भीड व निस्वार्थी युवकांनी सामाजिक प्रश्नावर सहकार्य करण्यासाठी यावे अशी मागणी केली होती. ह्युमच्या या आवाहानाला तरुणांनी प्रतिसाद दिला आणि त्यांच्याच सहकार्याने त्यांनी १८८४ साली 'इंडियन नॅशनल युनियन' या नावाची संघटना स्थापना केली होती 'सामाजिक सुधारणा व देशाची प्रगती सरकारच्या मदतीने, सनदशीर मार्गाने घडवून आणणे' हे या संघटनेचे ध्येय होते. ह्युमच्या विचाराला लॉर्ड नॉर्थब्रुक, जॉनब्राइन व लॉर्ड रिपन यांनी उत्तेजन दिले. ह्युमने व्हाईसरॉय लार्ड डफरीनची भेट घेतली. भारतातील विचारवंतानी एकत्र येवून सुधारणाबाबत विचारविनीमय करावा, चर्चा करावी, ब्रिटिश प्रशासनातील दोष दाखवावेत, थोडक्यात म्हणजे इंग्लडमधील विरोधी पक्षासारखे कार्य करावे अशी इच्छा डफरीनने व्यक्त केली. भारतीय जनतेचा असंतोष एखाद्या संघटनेच्या माध्यमातून व्यक्त करून त्यातील हवा काढून घ्यावी. (Safety Valve) असा डफरीनचा उद्देश होता. म्हणून त्याने ह्युमच्या कार्याला पाठिंबा दर्शविला. ॲलन ह्युमने भारतातील निरनिराळ्या संघटनाना पत्रे पाठवून दि. २२ डिसेंबर १८८५ रोजी पुण्यात अधिवेशन घेतले. त्याचे यजमान पद पुण्याच्या 'सार्वजनिक सभे' कडे होते. परंतु त्याच वेळी पुण्यात कॉलराची साथ सुरू झाल्यामुळे ही सभा मुंबई येथे २८ डिसेंबर १८८५ रोजी गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये झाली. हे अधिवेशन तीन दिवस चालले. या अधिवेशनाचे अध्यक्ष उमेशचंद्र बॅनर्जी हे होते. या अधिवेशनातच अधिकृतपणे 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची' स्थापना झाली. या अधिवेशनात फिरोजशहा मेहता, न्या. तेलंग, दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, लो. टिळक, ना. गोखले, दिनशाँ वाच्छा, नरेंद्रनाथ सेन, गिरिजा भूषण मुखर्जी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आजरकर, रंगय्या नायडू, पंडीत मदन मोहन मालवीय इत्यादी मिळून ७२ प्रतिनिधी होते. या शिवाय ए. ओ. ह्युम, वेडरबर्न हेन्री कॉटन नॉर्टन हे ब्रिटिश अधिकारी ही हजर होते. अशा रीतीने 'राष्ट्रीय काँग्रेसची' स्थापना झाली.

अखिल भारतीय राजकीय संघटना स्थपण्याच्या तयारीत असलेल्या भारतीय नेत्यांनी ह्युमला काँग्रेस स्थापनेत का सहकार्य केले व ह्युमची काँग्रेस स्थापनेतील भूमिका विषद करताना बिपनचंद्र म्हणतात. 'अखिल भारतीय राजकीय संघटना उभारण्यासाठी धडपडत

असलेल्या राजकीय नेत्यांना अशी संघटना हवी होती की जी देशाच्या राजकिय, आर्थिक प्रगतीसाठी झटेल. ते पुढारी मनस्वी राष्ट्रभक्त होते. परकीय सरकारचे हस्तक नव्हते. त्यांनी ह्युमशी सहकार्य केले याचा अर्थ एवढाच की त्यांच्या राजकीय प्रयत्नांना आरंभीच सरकारी रोषाची झळ लागू नये अशी त्यांची इच्छा होती. ह्युमसारखा सेवानिवृत्त सनदी अधिकारी आपल्यात असल्यामुळे सरकार आपल्याविषयी संशय घेणार नाही. अशी त्यांना आशा वाटत होती. ह्युमच्या मनात जर काँग्रेसचा उपयोग 'निरूपद्रवी सोडवाट' म्हणून करावायाचा असेल तर काँग्रेसच्या आद्य संस्थापकानीही ह्युमचा उपयोग 'बीज-निवारक' म्हणून करून घेतला.'

## १. काँग्रेसची ध्येये व उद्दिष्ट्ये

२८ डिसेंबर १८८५ रोजी काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबईला झाले. अधिवेशनाचे अध्यक्ष कलकत्याचे प्रसिध्द बॅरीस्टर उमेशचंद्र बॅनर्जी होते तर ए.ओ.ह्युम सचिव होते. त्यांनी आपल्या भाषणात काँग्रेसची ध्येये व उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली.

१. देशाच्या विविध भागातील राष्ट्रवादी राजकीय कार्यकर्त्यामध्ये मैत्रीसंबंध वाढविण्याचा प्रयत्न करणे.
२. देशातील जातीय, धार्मिक व वांशिक भेदभाव दूर करून देशातील सर्व नागरिकामध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
३. महत्त्वाच्या व निकडीच्या प्रश्नावरील लोकांच्या मागण्या एकत्रित करून त्या सरकारपुढे मांडणे.
४. देशात विविध प्रश्नावर लोकमत तयार करणे व त्याचे संघटन करणे. आपल्या मागण्या सनदशीर मार्गाने शासनापुढे ठेवणे आणि सरकार मान्य करील त्या मागण्यावर समाधान मानणे.
५. इंग्रज लोकांच्या न्यायप्रियतेवर विश्वास ठेवणे. अर्ज, विनंत्या आणि शिष्टमंडळे या मार्गांनी आपल्या मागण्या सरकार पुढे ठेवणे.
६. देशाची आर्थिक पिळवणूक थांबविणे, देशात स्वराज्यसंस्था स्थापन करणे तसेच आफ्रिकेतील भारतीय लोकांना समतेची वागणूक देण्यासाठी प्रयत्न करणे.
७. देशाच्या विकासासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी ब्रिटिश शासनाशी एकनिष्ठ राहून सहकार्य करणे इत्यादी उद्दिष्टे जाहीर करण्यात आली होती.

## २. भारतीय काँग्रेस राष्ट्रीय होती का?

काँग्रेस ही 'राष्ट्रीय' नव्हती कारण तिची स्थापना ॲलन ह्युम या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या पुढाकाराने झाली होती. अशी टिका कांही टिकाकारांनी केलेली होती. परंतु केवळ इंग्रज व्यक्ती या संघटनेच्या स्थापनेत होता म्हणून तिला अराष्ट्रीय संबोधणे योग्य नाही. याबाबत गुरूमुख निहाल सिन्हा म्हणतात. 'ब्रिटिश साम्राज्याचे संरक्षक कवच म्हणून काँग्रेसचा उपयोग करण्याचा उद्देश कदाचित ह्यूम व वेडरबर्न यांच्या मनात असेलही, परंतु दादाभाई नौरोजी उमेशचंद्र बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, दिनशा वांच्छा, न्या. रानडे, लो. टिळक यासारखे नेते इंग्रजाच्या हातातील होती किंवा या नेत्यांच्या मनात ब्रिटिश साम्राज्याचा काँग्रेसपासून संरक्षण करण्याचा विचार होता यावर विश्वास ठेवणे असंभव आहे. काँग्रेस स्थापनेमागे ह्यूम यांचा. ब्रिटिशांनी चालवलेल्या अत्याचारामुळे त्यांचे मन व्यथित होत होते. म्हणून केवळ त्यांच्या सहभागामुळे काँग्रेस अराष्ट्रीय होती असे म्हणणे चूकीचे आहे.जर ते नसते तरी ही अशी संघटना स्थापन करण्यासाठी भारतीय नेत्यांचे प्रयत्न सुरु होते. त्यामुळे काँग्रेस ही राष्ट्रीय होती हे उघड आहे'

प्राथमिक अवस्थेत इंग्रज अधिकाऱ्याबरोबर राज्यकर्त्यांचासुद्धा काँग्रेसला पाठिंबा होता. परंतु पहिल्या चार वर्षात ज्यावेळी काँग्रेसने राजकीय, सामाजिक व आर्थिक गाऱ्हाणी जोरदारपणे मांडावयास सुरुवात केली त्यावेळी इंग्रज राज्यकर्त्यांना काँग्रेसची क्रियाशिलता टोचू लागली. ग. ज. डफरीनने सन १८८८ साली काँग्रेसच्या अधिवेशनला जागा मिळू नये असा प्रयत्न केला. काँग्रेसनेत्यांचा आक्रमकपणा पाहून त्यांच्यावर भाषण बंदी घालता यावी म्हणून भारतीय दंड विधीनियमात दुरूस्ती केली. सरकारी नोकरांना काँग्रेसच्या चळवळीत भाग घेण्यास मनाई केली. यावरून इंग्रजांना काँग्रेसची भिती वाटू लागली होती.

## पहिल्या अधिवेशनातील प्रमुख ठराव

मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात एकूण नऊ ठराव पास झाले. ते पुढील प्रमाणे होते.

१. हिंदुस्थानाच्या समस्यांचा विचार करण्यासाठी रॉयल कमिशन नेमावे. त्यात इंग्रज सदस्याबरोबर भारतीय सदस्यांचाही समावेश करावा.
२. भारतमंत्र्याचे इंडिया कौन्सील रद्द करावे.
३. केंद्रिय व प्रांतीक कायदे मंडळात भारतीय लोकांना जास्त प्रतिनिधीत्व मिळावे. या कायदेमंडळापुढे अंदाजपत्रके मांडण्यात यावीत सभासदांना प्रश्न विचारण्याचा अधिकार असावा.
४. इंडियन सिव्हील सर्व्हिसची (I.C.S.) परीक्षा इंग्लंडप्रमाणे भारतातही घेण्यात यावी व परीक्षेला बसणाऱ्या उमेदवाराच्या वयाची अट तेवीस वर्षापर्यंत वाढविण्यात यावी.
५. व ६. लष्करी खर्च वाढवू नये. जर लष्करी खर्च वाढवावयाचाच असेल तर तो संरक्षक जकाती बसवून वाढवावा.
७. ब्रह्मदेश खालसा करू नये.
८. हे ठराव प्रांतिक राजकीय संघटनेकडे विचार विनीमयासाठी व पास करण्यासाठी पाठविण्यात यावेत.
९. काँग्रेसचे पुढील अधिवेशन २८ डिसेंबर, १८८६ रोजी भरविले जावे.

## स्वअध्यनासाठी प्रश्न.

१. राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येय व उद्दिष्टांची थोडक्यात चर्चा करा.

## ७.४ काँग्रेसचा पहिला कालखंड (१८८५-१९०५)

**(मवाळ राजकारणाचा कालखंड)**

राष्ट्रीय सभेची (काँग्रेसची) स्थापना झाल्यानंतर सुरवातीच्या काळात तिच्यावर दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, उमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी या नेत्याचा प्रभाव होता. हे नेते उदारमतवादी व मवाळ राजकारणावर विश्वास ठेवणारे होते. ब्रिटिश सरकारकडून विविध मागण्या मान्य करून घेण्यासाठी व आपले प्रश्न सोडविण्यासाठी पुन्हा मागणी करणे यासारखे सनदशीर मार्ग स्वीकारले होते. म्हणून त्यांना 'मवाळ' अशी संज्ञा देण्यात आली. ब्रिटिश सत्तेविरूद्ध त्यांनी आक्रमक किंवा हिंसक मार्ग स्वीकारला नाही. या काळातील कार्यपद्धती बद्दल न्या. रानडे यांनी लिहिले होते की 'मवाळ याचा अर्थ अप्राप्य गोष्टींची खोटी आशा धरू नये. आणि जे मिळण्यासारखे आहे ते मिळविण्यासाठी चांगल्या व समझोत्याच्या मार्गांनी समोर जावे.' अशा प्रकारे मवाळ नेते घटनात्मक व सनदशीर मार्गावर विश्वास ठेवणारे होते.

### ३. राष्ट्रीय काँग्रेसची अधिवेशने

काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात असा ठराव पास झाला की प्रत्येक वर्षी डिसेंबरच्या शेवटी अधिवेशन भरविण्यात यावे. दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे १८८६ मध्ये दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनाला ४२६ प्रतिनिधी हजर होते. त्यात २८ मुस्लीम प्रतिनिधी होते. या अधिवेशनात काँग्रेसने राजकीय व्यासपीठ म्हणून कार्य करावे असे ठरले. काँग्रेसचे तिसरे अधिवेशन मद्रासला १८८७ मध्ये कायदेपंडित सर बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. मद्रासच्या गव्हर्नरने काँग्रेस प्रतिनिधीचे स्वागत केले यावेळी ६०७ प्रतिनिधी हजर होते. काँग्रेसची लोकप्रियता वाढू लागली होती. राजकीय जागृती करण्याचे काँग्रेसचे ध्येय हळूहळू फलद्रुप होऊ लागले होते. या अधिवेशनात ह्युम यांनी ब्रिटिश सरकारच्या धोरणावर टिका केली. काँग्रेसच्या या आक्रमक प्रचारामुळे ब्रिटिश राज्यकर्ते नाराज झाले. त्यामुळे चौथे अधिवेशन काहीशा तप्त वातावरणातच अलाहाबाद येथे १८८८ मध्ये भरले. अध्यक्ष स्कॉटिश व्यापारी जार्ज युल होते. या अधिवेशनाला जागा मिळू नये म्हणून सरकारने प्रयत्न केले. व सरकारी नोकरांनी अधिवेशनात भाग घेवू नये असा हुकूम सरकारने काढला. तरी देशाच्या काना कोपऱ्यातून १२४८ प्रतिनिधी हजर राहिले होते. काँग्रेसने सरकारचा सौम्य शब्दात निषेध केला व प्रतिनिधीक लोकशाहीची मागणी केली. अशा तऱ्हेने सरकार व काँग्रेस मधील अंतर हळूहळू वाढत गेले.

पाचवे अधिवेशन १८८९ मध्ये मुंबई येथे वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी ब्रिटिश संसदेचे एक सदस्य चार्लस ब्रॅड यांनी अधिवेशनात भाग घेऊन काँग्रेस नेत्याबरोबर चर्चा केली. कायदेमंडळाच्या सुधारणेबद्दलचा भारतीयांच्या मागण्यांचा ठराव करून १८९० साली तो ब्रिटिश संसदेत सादर केला. त्यामुळेच १८९२च्या कौन्सील कायद्याच्या प्रक्रियेस चालना मिळाली.

काँग्रेसची अधिवेशने प्रत्येक वर्षी होत राहिली. १८९१ चे अधिवेशन कलकत्ता, आणि नागपूराला तर १८९२ चे अधिवेशन लाहोरला झाले. या सर्व अधिवेशनातुन काँग्रेसने

आपल्या मागण्या पुन:पुन्हा मांडल्या. सरकारने मात्र या मागण्याकडे दुर्लक्ष केले. काँग्रेसला जनतेचा पाठिंबा दिवसेंदिवस वाढत असल्याने लोकप्रिय बनत चालली होती.

## ७.४.१ नेमस्ताची विचार सरणी व कार्यपद्धती

पहिल्या कालखंडात (१८८५ ते १९०५) काँग्रेसवर वर्चस्व असलेल्या नेत्यांचा सनदशीर घटनात्मक मार्गावर विश्वास होता. या काळात काँग्रेसची विचार सरणी व कार्यपद्धती पुढीलप्रमाणे होती.

सनदशीर मार्गाने चळवळ - या काळात काँग्रेस नेत्याची विचारसरणी उदारमतवादी होती. राजकीय प्रश्नावर संघटित लोकमत तयार करावे. लोकांच्यात राजकिय जागृती करावी व सनदशीर मार्गाने चळवळ करून आपले प्रश्न सोडवावेत अशी त्यांची मनोवृत्ती होती. ब्रिटिशांच्या न्याय प्रियतेवर त्यांचा विश्वास होता.

### राजकीय सुधारणांची मागणी व मागण्यांचा पुनरूच्चार :

ब्रिटिश सरकार व ब्रिटिश लोकमत आपल्या बाजूस वळवून त्यांच्याकडून काही मागण्या मान्य करून घेणे हे या नेत्यांचे ध्येय होते. १८८५ च्या अधिवेशनात राष्ट्रीय काँग्रेसने ज्या मागण्यांचे निवेदन सरकारला दिले होते. त्या मागण्यांचा सतत पुनरूच्चार त्यांनी केला. इंग्रज हे न्यायप्रिय असून त्यांना अर्ज विनंत्या करीत राहिल्यास आपल्या मागण्या मान्य होतील असे नेमस्त नेत्यांना वाटत होते.

### ब्रिटिश राजसत्तेशी निष्ठा :

काँग्रेसच्या नेमस्त नेत्यांची ब्रिटिश राजसत्तेवर निष्ठा होती. ही निष्ठा त्यांनी वेळोवेळी भरलेल्या काँग्रेस अधिवेशनातुन व्यक्त केली होती. ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणावर, न्यायप्रियतेवर व इंग्लंडच्या लोकशाही तत्व प्रणालीवर त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांची राजवट ही हिन्दी लोकांच्या हिताचीच आहे. काँग्रेसने ब्रिटिश सत्तेविरूद्ध चळवळ न करता फक्त सनदशीर मार्गाने मागण्या करीत राहून ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीचे राष्ट्रीय राजवटीत रूपांतर होण्याची वाट पाहावी ते योग्य वेळी आपणास सत्तेत सहभागी करून घेतील असे त्या नेत्यांना वाटत होते. ब्रिटिशाबद्दल या काळात काँग्रेसच्या नेत्यांचे विचार काय होते हे नामदार गोखले यांच्या भाषणावरून स्पष्ट होते ते म्हणतात, ''भारतात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम फक्त इंग्रज लोकच करू शकतात. आपले सामाजिक व आर्थिक जीवन हे ब्रिटिश शासनावरील निष्ठेवरच अवलंबून आहे. इंग्रजांचे भारतात असणे भारतातील विविध वर्गांना एक राष्ट्र म्हणून विकसित होण्यासाठी आवश्यक आहे. देशासाठी ते एक वरदान आहे.'' सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचीही हीच भूमिका होती. भारतीय लोकांच्यात राजकीय परिपक्वता आल्यानंतर ब्रिटिश लोक क्रमाक्रमाने आपणास राजकीय हक्क देतील असे मवाळांना वाटत होते.

कौन्सील सदस्यात वाढ करणे. निरनिराळे राजकिय हक्क प्राप्त करून घेणे व जनतेत राजकीय जागृती घडवून आणणे हेच या काळात काँग्रेस नेत्यांचे ध्येय होते. स्वराज्य मिळविणे हे या काळात काँग्रेसचे ध्येय नव्हते.

## ७.४.२ मवाळ काँग्रेसचे कार्य (१८८५ ते १९०५)

राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या कालखंडातील कार्याबद्दल विविध मते व्यक्त केली जातात. 'या कालखंडातील काँग्रेस म्हणजे अर्ज विनंत्या करणारी काँग्रेस होती.' इथ पासून ते या काळातील नेत्यांनी स्वीकारलेली भूमिका ही कालानुरूप होती व या काळात काँग्रेसने राजकीय जागृतीचे कार्य केले. असे मूल्यमापन करणारी विधाने केली जातात. त्या काळातील प्रभावी अशी ब्रिटिशांची सत्ता व भारतीय लोकांचे राजकीय मागासलेपण याचा विचार करताना काँग्रेसने. या काळात केलेले कार्य महत्त्वपूर्ण होते.

### १. राजकीय, सामाजिक व आर्थिक गाऱ्हाणी मांडली :

काँग्रेसने या काळात स्वातंत्र्याचे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेवले नव्हते. परंतु इतर अनेक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी रॉयल कमिशन नेमण्याची मागणी केली. येथील जनतेवरील अन्यायी कर रद्द करावेत. आय.सी.एस. सारख्या वरिष्ठ श्रेणीतील स्पर्धा परीक्षा हिंदुस्थानात घ्याव्यात. परीक्षेसाठी उमेदवाराची वयोमर्यादा वाढवावी. स्थानिक स्वराज्य संस्थात भारतीय लोकांचे वाढते सहकार्य घ्यावे, नोकऱ्यांचे हिंदीकरण करा, वांशिक भेदभाव करणारे कायदे रद्द करा. इ. राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. हे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय तरुणास सनदशीर मार्गाने चळवळ करण्यास प्रवृत्त केले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा, धरणे बांधा, कालवे खोदा, सहकारी बँका काढून कमी व्याजात शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करा. उद्योगधंद्यास चालना द्या दुष्काळग्रस्त जनतेला मदत करा. युवकांना नोकऱ्या द्या. औद्योगिक व तांत्रिक शिक्षणात वाढ करा. अशा अनेक मागण्या सरकारकडे केल्या. त्यासाठी व्हाइसरायकडे विनंत्या अर्ज, मागणी पत्रके पाठवली जात असत. काँग्रेस प्रतिनिधीची मंडळे वारंवार राज्यकर्त्यांना भेटत असत. ब्रिटिश सरकारवर दबाव आणला जाई. या सर्व प्रयत्नामुळे काही मागण्या मान्यही झाल्या.

### २. परदेशातील भारतीय लोकांच्या गाऱ्हाण्याकडे लक्ष :

ब्रिटिशांचे साम्राज्य जगभर पसरलेले होते. ब्रिटिश सरकारने इतर देशातील वसाहतीमध्ये काम करण्यासाठी हिंदुस्थानातील मजूर नेले होते. त्यांची संख्या खूप मोठी होती. या भारतीय मजूरांना इंग्रज लोकतुच्छतेची वागणूक देत असत. त्यांना 'काळे'' म्हणून हिणवले जाई. १८९४ मध्ये नाताळ येथील हिंदी मजुरांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला गेला तर १८९७ साली ट्रान्सव्हॉलमधील भारतीय मजुरांना शहराबाहेर राहण्याची सक्ती केली. हा भारतीय मजुरावर एक प्रकारचा अत्याचारच होता. याविरूद्ध काँग्रेसने आवाज उठविला. १८९४च्या अधिवेशात ठराव करून त्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. पुढील अधिवेशनातुनही या प्रश्नाचा पाठपुरावा केला दक्षिण आफ्रिका, मलाया, मॉरिशस, वेस्ट इंडिज इत्यादी देशातून भारतीय मजुरांची स्थिती हलाखीची होती.' ती सुधारण्याचा प्रयत्न केला.

### ३. प्रशासकीय सुधारणा :

प्रशासनातील सर्व उच्च पदे इंग्रजांनाच देवू नयेत. भारतीयांनाही त्यात सहभागी करून घ्यावे. अशी भूमिका काँग्रेसने मांडली. भारतातील युरोपियन अधिकाऱ्यांना प्रचंड वेतन दिले जाते शासनाचा तो खर्च अकारण वाढतो त्या ऐवजी त्याच पात्रतेची भारतीय माणसे कमी वेतनात काम करू शकतात. त्यामुळे वेतनावर होणारा प्रचंड खर्च वाचेल व भारतीय युवकांना नोकऱ्या मिळून त्यांच्यातील नैराश्य संपेल. त्याबद्दल नामदार गोखले म्हणतात, Our adiminstrative and Military talent would gradually disappear, Owing to the sheer disuse.''

सन १८५८च्या कायद्याने कंपनी सरकारचा शेवट होऊन हिंदुस्थानचा कारभार ब्रिटिश संसदेने भारतमंत्र्याकडे सोपविला होता. त्याचा व त्याच्या मदतीसाठी असलेले 'भारत मंडळाचा' पगार भारतीय तिजोरीतून दिला जात असे. त्यावर ३५ लाख रूपये खर्च येत होता. तो भारतमंत्र्याचा पगार ब्रिटिश संसदेने द्यावा. अशा प्रकारचा ठराव काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात पास करण्यात आला होता. पुढील काळातही त्याचा पाठपुरावा केला गेला होता.

**४. न्याय विषयक व इतर सुधारणाची मागणी :**

काँग्रेसमधील राष्ट्रवाद्यांनी न्यायविषयक सुधारणांची मागणी केली. न्यायव्यवस्था व कार्यकारी व्यवस्था एकमेकांपासून स्वतंत्र ठेवल्या पाहिजेत. ज्युरीचे अधिकार कमी करू नयेत. या मागण्या ब्रिटिश सरकारकडे केल्या होत्या.

तसेच सामाजिक प्राथमिक शिक्षण, तांत्रिक व उच्च शिक्षण असे लोक कल्याणकारी कार्यक्रम सरकारने हाती घ्यावेत अशी मागणी त्यांनी केली. वैद्यकिय व आरोग्यविषयक सुविधा लोकांना द्याव्यात. कार्यक्षम व जनकेंद्रित पोलीस व्यवस्था निर्माण करावी, शेतीविषयक सुधारणा कराव्यात, कालवे पाटबंधारे खोदावेत, दुष्काळग्रस्त लोकांना रोजगार द्यावेत. त्यांना मदत करावी. अशा अनेक मागण्या ब्रिटिश सरकारकडे काँग्रेसकडून सतत करण्यात आल्या.

**५. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी केली :**

आद्य राष्ट्रवाद्यांनी भारतीय लोकांच्यात राजकीय जागृती घडवून आणण्यात या काळात यश मिळविले. भारतीय लोक राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक ऋणानुबंधाने एकमेकांशी बांधलेले आहेत आणि ब्रिटिशांची साम्राज्यशाही ही आपणा सर्वांची शत्रु आहे. अशी जाणीव भारतीय जनतेत या काळात निर्माण झाली. लोकांमध्ये एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. त्यामुळे या काळात राष्ट्रवादी चळवळीच्या पायाभरणीचे मोठे कार्य झाले. त्यांना भारतातील आर्थिक समस्येचा संबंध इंग्रजांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाशी जोडला व हे केवळ पारतंत्र्यामुळे घडते असे सांगितले. त्यामुळे राजकारणात हे नेते मवाळ असले तरी वस्तुस्थितीचे राजकीय व आर्थिक स्वरूप कसे विदारक आहे हे त्यांनी दाखवून दिले. लोकांतील राष्ट्रवाद वाढविण्यासाठी त्यांनी हातभार लावला. पुढील काळात जी राष्ट्रीय चळवळ उभी राहिली तिची पायाभरणी याच काळात काँग्रेसने केली.

बिपनचंद्र म्हणतात, ''आद्य राष्ट्रवाद्यांची अपयशे कितीही असली तरी राष्ट्रीय चळवळीच्या वाढीला योग्य असा भक्कम पाया त्यांनी घातला आणि आधुनिक भारताचे निर्माते म्हणून त्यांचे स्थान फार वरचे आहे.''

**वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय :**

१९०१ चे काँग्रेसचे अधिवेशनात आयर्लंडच्या धर्तीवर हिंदुस्थानमध्ये होमरूल चळवळ सुरू करावी अशी सूचना केली होती. पण इंग्रजांच्या न्यायप्रियतेवर विश्वास असणाऱ्या नेमस्तांनी अशा प्रकारच्या चळवळीस विरोध केला. परंतु पुढे कर्झनच्या दडपशाही धोरणामुळे भारतीय तरुणांच्यात संतप्त वातावरण तयार झाले. त्यावेळी काँग्रेसनेही आपल्या धोरणात बदल केला. व १९०५च्या वाराणसी येथे भरलेल्या अधिवेशनात नामदार गोखलेनी अध्यक्षीय भाषणात वसाहतीचे स्वराज्य हे काँग्रेसचे ध्येय राहिल असे जाहीर केले.

### ७.४.३ नेमस्त (मवाळ) काँग्रेसच्या कार्याचे मूल्यमापन :

राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या कालखंडातील कार्यावर अनेक विरोधकांनी टिका केलेली आढळते. 'इंग्रज धार्जिण्या लोकांची प्रगती शून्य, दिखाऊ राष्ट्रभक्तीचा चैतन्यहीन तमाशा 'स्वातंत्र्याची मागणी न करता सवलती मागणारी टोळी' अशा प्रकारची टिका केली जाते किंवा लाला लजपतराय सारखे जहाल नेते 'आपल्या तक्रारी दूर करण्यासाठी व सरकारकडून सवलती मिळविण्यासाठी वीस वर्षे धडपड केल्यावर त्यांच्या हाती भाकरी ऐवजी दगड पडले.' अशा प्रकारची एकांगी टिका केली होती. टिका अल्पप्रमाणात खरी असली तरी ती पूर्णतः योग्य नाही. या काळात काँग्रेस अयशस्वी ठरली असे म्हणता येणार नाही. काँग्रेसने सनदशीर मार्गाने सतत झगडून अनेक सुधारणा मिळविल्या. स्वातंत्र्याची मागणी करणे या काळात काँग्रेसला शक्यच नव्हते. तशी मागणी केली असती तर ब्रिटिशांनी ही संघटनाच चिरडून टाकली असती.

न्या. गोखले म्हणाले होते, 'सरकारच्या पाठीशी केवढी बलाढ्य सत्ता उभी आहे याची तुम्हाला कल्पना नाही. तुम्ही सुचवता तसे कांही काँग्रेसने केले असते तर पाच मिनीटात सरकारने तिला चिरडले असते. म्हणून सर्वनाश होण्यापेक्षा किंवा काहीच न करण्यापेक्षा सावकाश केलेली प्रगती देखील एकूण कार्याच्या दृष्टीने उपकारक ठरते. मवाळ काँग्रेसने तेच केले. इंग्रजी सत्तेचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने त्यांनी काही केले नसले तरी सर्व देशभर देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम व देशासाठी त्याग करण्याची वृत्ती जनतेत निर्माण केली. म्हणून काँग्रेसवर होणारी टिका अयोग्य आहे.'

काँग्रेसच्या स्थापनेपासूनची पहिली ४-५ वर्षे सोडली तर ब्रिटिश सरकारने काँग्रेसच्या विरोधातच भूमिका घेतलेली दिसते. पुढील काळात लार्ड डफरिनने काँग्रेसच्या कार्याची व त्यांच्या नेत्यांची 'A Microscopic Minority of the people' म्हणून चेष्टा केली. तर लार्ड कर्झनने काँग्रेस कशी मोडीत निघेल अशी अपेक्षा बाळगली काँग्रेस ही पुढील काळात राजकीय संघटना होऊन ती आपणास डोईजड होईल यांची जाणीव ब्रिटिशानाही होऊ लागली होती. म्हणून त्यांनी 'फोडा व झोडा' (Divide and Rule) या नितीचा अवलंब केला. व ब्रिटिश राजवटीला पाठिंबा देणाऱ्या सय्यद अहमद खान, बनारसचे राजे शिवप्रसाद इत्यादींना काँग्रेस विरोधात पाठिंबा दिला. त्यामुळे काँग्रेसला ब्रिटिश धार्जिणे म्हणणे चूक आहे.

डॉ. पट्टाभी सीताराम यांच्या मते, भारतीय राजकीय सुधारणा चळवळीच्या अग्रभागी असलेल्या मवाळांनी स्वीकारलेल्या धोरणाबद्दल आपण त्यांना दोष देवू शकत नाही. तेव्हाच्या परिस्थितीत मवाळांचीच धोरणे बरोबर होती. कारण त्यापेक्षा जहाल पावले मवाळांनी उचलली असती तर ब्रिटिशांनी काँग्रेस संघटनेवर बंदीच घातली असती काँग्रेस टिकवून ठेवण्याचे व तिला ब्रिटिश राष्ट्रीय पक्षाचे रूप मिळवुन देण्यात मवाळ गटाचे नेतृत्व उपयुक्त ठरले यात शंका नाही.'

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. मवाळवादी काँग्रेसच्या कामगिरीची थोडक्यात चर्चा करा.

## ७.५ राष्ट्रीय काँग्रेसचा द्वितीय कालखंड (१९०५-१९१९)

### जहाल काँग्रेसचा उदय

काँग्रेसच्या मागण्यांना ब्रिटिश सरकार प्रतिसाद देत नाही याची जाणीव काँग्रेस सदस्यांना होऊ लागली होती. उलट ब्रिटिश सरकारने काँग्रेस विरोधी भूमिका घेऊन राजकीय चळवळी दडपून टाकण्यास सुरवात केली. त्यामुळे काँग्रेस मधील काही ज्येष्ठ नेमस्त नेत्यांच्या मनांत निराशा डोकावू लागली होती. तर तरुण व उत्साही कार्यकर्ते काँग्रेसच्या अधिवेशनात काँग्रेसच्या ध्येय धोरणावर टिका करू लागले होते. अश्विनीकुमार दत्त यांनी 'काँग्रेसचे अधिवेशन म्हणजे केवळ 'तमाशा' आहे. असे काँग्रेसच्या धोरणाबद्दल उद्‌गार काढले व काँग्रेसमध्ये सामान्य जनतेला सहभागी करून घेण्याची आवश्यकता प्रतिपादीली. सुधारणा मागण्यासाठी सरकारची मनधरणी करीत बसलेले नेमस्त नेते लोकांच्या मनातून उतरू लागले, असेही ते म्हणाले होते.

या नेमस्त नेत्यांचे ब्रिटिशधार्जिणे धोरण तरुण युवकानाच आवडत नव्हते असे नव्हे तर इंग्लडमधील समाजवादी नेते हिंडमन सारख्या नेत्यांनीही दादाभाई नौरोजींना लिहिलेल्या पत्रात ते टिका करताना म्हणतात, 'आपल्या समोरील प्रश्नांचा गंभीरपणे विचार करण्याऐवजी भारतीय लोक राणीच्या अभिनंदनाचे मुर्खपणाचे ठराव पास करीत असल्याचे पाहिले कि मला त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटतो. राणीचे अभिनंदन कशासाठी? हिंदुस्थानच्या दोन-तीन पिढ्या नेस्तनाबूत केल्या म्हणून? ही स्थिती अतिशय दयनीय आहे.' परकियांनीही व्यक्त केलेली ही भावना भारतातील तरुणांना अस्वस्थ करणारी होती. काँग्रेसमधील या राष्ट्रवादी युवकांचा ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर विश्वास नव्हता. ब्रिटिशाकडे मागण्या करून काहीच मिळणार नाही. त्या साठी ब्रिटिशांच्या विरोधात राजकीय चळवळ उभी केली पाहिजे. अशी जहाल विचारसरणी असलेले राष्ट्रवादी युवक काँग्रेसमध्ये पुढे आले. त्याचे नेतृत्व बंगालमधील बिपीनचंद्र पाल, महाराष्ट्रातील लो. टिळक व पंजाबमधील लाला लजपतराय यांनी केले. आक्रमक भूमिका घेणाऱ्या राष्ट्रवादी गटाला 'जहाल' (Extremists) असे म्हणाले गेले.

### १. जहाल काँग्रेसच्या उदयाची कारणे :

भारतीय काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्या मागण्यांची व तक्रारींची निवेदने दरवर्षी सरकारकडे पाठवली तरी त्यांची ब्रिटिश सरकार दखल घेत नव्हते. त्यामुळे ब्रिटिशांच्या उदारमतवादावरील अनेकांचा विश्वास उडू लागला होता. इंग्रजांच्याकडे मागण्या करून काहीच उपयोग होत नाही. म्हणून त्यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली पाहिजे असे काँग्रेसमधील अनेकांना वाटत होते. ''हिंदुस्थान हा इंग्रजांनी शस्त्रबळाने जिंकला आहे आणि तो बळानेच ताब्यात ठेवला जाईल.'' या गव्हर्नर जनरल एलिनच्या विधानाने अनेक भारतीयांना धक्का बसला होता. त्यामुळे इंग्रजांचे खरे रूप प्रकट झाले होते. व काँग्रेस सदस्यात जहाल विचारसरणी दिवसेंदिवस वाढू लागली होती. त्याची काही महत्वाची कारणे खालीलप्रमाणे होती.

**१. ब्रिटिश सत्तेचे खरे स्वरूप** : काँग्रेसच्या स्थापनेपासून त्याकाळातील नेमस्त नेत्यांनी ब्रिटिश सरकारकडे निरनिराळ्या मागण्या करून त्या मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु हे इंग्रजांचे राज्य भारतीयांच्या भल्यासाठी नव्हते. तर साम्राज्यवादी - वसाहतवादी

इंग्रजांच्या प्रगतीसाठी होते ते उघड झाले होते. त्यांच्या देशामध्ये लोकशाही शासन होते. जगाच्या पाठीवर त्याचे सर्वत्र साम्राज्य होते. एवढे मोठे साम्राज्य अन्य कोणत्याही देशाचे नव्हते. अशी ही साम्राज्यवादी सत्ता कोणतीही किंमत देवून भारतासारखी वसाहत सहजासहजी सोडणे शक्य नव्हते. त्याची प्रचिती नेमस्त नेत्यांनाही होती. भारतीय जनतेवरील अन्याय अत्याचार हा दिवसेंदिवस वाढतच होता. कॉंग्रेसमधील या नेमस्त नेत्यांच्या अर्जांना, मागण्यांना व त्यांनी केलेल्या ठरावांना काडीचीही किंमत राहिली नव्हती. त्यांचाही ब्रिटिशाबद्दल भ्रमनिरास झाला होता. त्यामुळे कॉंग्रेसमधील जहालवादी गटाचा प्रभाव दिवसेंदिवस वाढू लागला होता.

**२. ब्रिटिशांनी केलेले आर्थिक शोषण :** ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी भारतीयांची व्यापार, उद्योगधंदे व संपत्ती विनीयोग या तीनही क्षेत्रातून आर्थिक पिळवणूक चालवली होती. भारतीय अर्थव्यवस्थेला मोडीत काढणे हे ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाचे सार होते. भारतातून कच्चा माल ब्रिटनला नेणे व पक्का माल भारतात भरमसाठ दराने खपविणे. त्यामुळे भारतातील उद्योगधंदे बंद पडून लोकांची वाताहत झाली होती. दादाभाई नौरोजींनी ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाविरूद्ध टिका केली. ते त्यात म्हणतात की ''ब्रिटिश राजवट म्हणजे चिरंतन, वाढत जाणारे परकिय आक्रमण आहे व ते या देशाचा हळूहळू नाश करीत आहे.'' ब्रिटिशांच्या या आर्थिक धोरणामुळेच त्याच्याविरूद्ध हळूहळू जनमत संतप्त बनत गेले आणि जहाल कॉंग्रेसचा उदय झाला.

**३. कॉंग्रेस बद्दल नाराजी :** कॉंग्रेसने प्रारंभीच्या १५-२० वर्षाच्या काळात केलेल्या कामगिरीवर कॉंग्रेसमधील तरुण वर्ग नाराज होता. शांततामय व घटनात्मक मार्गाने विनंती करून आपल्या पदरात काहीच पडणार नाही याची त्यांना खात्री झाली. लाला लजपतराय यांनी 'भारतीयांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच परिश्रम घेतले पाहिजे असा सल्ला देऊन त्यांनी स्वतः राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यास सुरवात केली.'

१८९२ च्या कायद्याने तरुणाचे समाधान झाले नव्हते. लो. टिळकांनी तर कॉंग्रेसच्या नेमस्त नेत्यांना 'खुशामत खोरांचा मेळावा' आणि कॉंग्रेसच्या अधिवेशनाना 'सुट्टीतील मनोरंजन' (a holiday-recreation) असे म्हटले, 'वर्षातून एक वेळ आम्ही बेडकासारखे ओरडलो तर आम्हाला काहीच मिळणार नाही' अशी टिका त्यांनी केली होती कॉंग्रेसने आता मवाळ मार्ग सोडून ब्रिटिशाविरूद्ध आक्रमक चळवळ उभी केली पाहिजे अशी भूमिका त्यानी घेतली होती.

**३. सामाजिक व धार्मिक चळवळी :** पाश्चात्य शिक्षणाची ओळख झालेल्या अनेक तरुणांनी आपल्या देशात जागृती घडवून आणण्यास सुरवात केली. त्यामुळे अनेक सामाजिक व धार्मिक चळवळी उदयास आल्या. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, ॲनी बेझंट, लो. टिळक इत्यादी मंडळींनी जागृतीचे कार्य सुरू केले होते. ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफीकल सोसायटी या संघटनानी सामाजिक व धार्मिक चळवळी सुरू केल्या होत्या. हे सर्व जहाल नेते हिंदु संस्कृतीचे अभिमानी होते. लो. टिळक यांनी शिवजंयती व गणपती उत्सव सुरू करून लोकांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना वाढविण्याचा प्रयत्न केला. रविंद्रनाथ टागोर, बकिमचंद्र चटर्जी, लो. टिळक इत्यादीच्या साहित्यामुळे भारतीय लोकांच्यात प्रखर राष्ट्रवाद वाढीस लागला.

**४. नैसर्गिक आपत्ती व सरकारचे जनतेकडील दुर्लक्ष** : ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषणामुळे जीवनमान खालावलेल्या भारतीयांवर अनेक नैसर्गिक संकटे आली. त्यावेळी जनतेला मदत करण्याऐवजी ब्रिटिशांनी त्यांची हेळसांड केली. महाराष्ट्रात प्लेगच्या साथीने १ लाख ७३ हजार लोक मृत्यु पावले. सरकारने भरीव स्वरूपाचे मदतकार्य करण्याऐवजी प्लेग निवारण्याच्या नावाखाली लोकांच्या धार्मिक भावना दुखावतील अशी कृत्ये केली. त्यांच्यावर अत्याचार केले. त्याचा सूड घेण्यासाठी दामोदर चापेकर यांनी मि. रॅड व त्याचा सहकारी लेफ्टनंट आयर्स्टव यांचा खून केला. ब्रिटिशांनी चापेकरला फाशी दिले. लो. टिळकांच्यावर चाफेकरला प्रेरणा देणारे म्हणून आरोप ठेवून त्यांना दीड वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा दिली. त्यामुळे तरुण वर्ग संतप्त झाला. सन १८९६ -९७ व १८९९-१९०० मध्ये देशात महाभयंकर दुष्काळ पडला. त्यामध्ये दोन कोटी लोक मरण पावले. दुष्काळ निवारण्यासाठी सरकारने काहीही भरीव कार्य केले नाही. त्यामुळे काँग्रेसमधील नेत्यांना ब्रिटिशाबद्दल चीड निर्माण झाली आणि त्यातूनच जहाल काँग्रेस उदयास आली.

**५. लार्ड कर्झन :** लार्ड कर्झनची कारकिर्द ही भारतीय युवकांच्या राष्ट्रवादास आव्हान देणारी ठरली होती. कर्झन हा कट्टर साम्राज्यवादी वृत्तीचा होता. त्याने भारतात आल्यानंतर दडपशाहीचे धोरण स्वीकारले होते. त्याने अनेक कायदे पास करून भारतीयांची गळचेपी केली. १८९९ चा कालकत्ता कार्पोरेशन अॅक्ट, सरकारी गुप्ततेचा कायदा (वर्तमान पत्रावरील निर्बंध) १९०४ चा विद्यापीठ कायदा इत्यादीमुळे भारतीयांत असंतोष वाढला लार्ड कर्झन भारतीयांना तुच्छ लेखत असे. यांच्या चळवळीला तो हवेचे बुडबुडे असे म्हणत असे. भारतीय लोक इंग्रजाची बरोबरी करू शकत नाहीत. असेही तो म्हणत असे. कलकत्ता पिद्यापीठाच्या पदवीदान समारंभ प्रसंगी त्याने म्हटले की ''भारतीय लोक उच्च पदावरील नियुक्तीसाठी अपात्र असून युरोपियनांनीच उच्च पदे उपभोगिली पाहिजेत. कारण ते भारतीयापेक्षा श्रेष्ठ आहेत.'' कर्झनच्या या भाषणाचा सर्वत्र निषेध करण्यात आला. कर्झनच्या या घमेंडखोर व साम्राज्यवादी वृत्तीमुळे भरतीयांच दिवसेनदिवस असंतोष वाढण्यास मदत झाली.

**६. बंगालची फाळणी (१९०५) :** लार्ड कर्झनने सन १९०५ मध्ये केलेली बंगालची फाळणी ही जहाल राष्ट्रवादाच्या वाढीस अतिशय कारणीभूत ठरली. ब्रिटिश सरकारने ८ कोटी ५० लाख लोकसंख्या असलेल्या बंगालचा (त्यावेळी बंगाल, बिहार, आसाम व ओरिसा या प्रांताचा मिळून बंगाल प्रांत होता.) प्रशासनाच्या सोईसाठी विभाजन करण्याचे ठरविले होते. त्यानुसार बंगालची फाळणी -पूर्व बंगाल आणि आसाम (लोकसंख्या ३ कोटी १० लाख) व उर्वरित पश्चीम बंगाल, बिहार व ओरिसा (लोकसंख्या ५ कोटी ४० लाख) अशा दोन भागात होणार होती. फाळणीसाठी ब्रिटिश सरकारने जाहीर केलेल्या कारणात प्रशासकीय सोय हे कारण काही अंशी खरे असले तरी खरे कारण बंगालमध्ये उदयास आलेल्या राष्ट्रवादास आळा घालणे हेच होते. भारत सरकारचे सचिव रिस्ले याने एका पत्रात म्हटले होते की, ''Our object is to split up and thereby to weaken a solid body of opponents to our rule.''

लार्ड कर्झनने हिंदु व मुस्लीमांमध्ये मतभेद निर्माण होण्यासाठी धार्मिक आधारावर बंगालच्या फाळणीचे कारस्थान आखले होते. त्याचप्रमाणे बंगालची भौगोलिक व भावनिक एकता नष्ट होण्यासाठी व राष्ट्रवाद्यांचे खच्चीकरण करण्यासाठी ही योजना होती. कर्झनचा बंगालची फाळणी करणारा आदेश, १९०५ रोजी निघाला. बंगालची प्रत्यक्ष फाळणी अस्तीत्वात

येणार होती. लार्ड कर्झनने बंगालची फाळणी जाहीर करताच काँग्रेसच्या नेत्यांना धक्काच बसला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, म्हणाले, 'बंगालच्या विभाजनाची घोषणा आमच्यावर बाँबगोळ्याप्रमाणे कोसळली. बंगालच्या फाळणीमुळे ' म्हणजे आमच्या अस्मीतेला हेतुपुरस्पर सरकारने धक्का दिला. या सर्व गोष्टीवरून सिद्ध झाले की, मवाळांच्या मार्गाचा ब्रिटिशांवर काही ही परिणाम होत नव्हता. नेमस्तानी आजपर्यंत सनदशीर मार्गाने चालवलेली चळवळ फोल ठरली होती. या मुळे भारतीयांतील असंतोष पराकोटीला पोहचला. जहालवादाचा उदय होण्यास मदत झाली.

अशा या वातावरणात भारतीयांच्या मनांत जहाल राष्ट्रवाद वाढविण्याचे कार्य महाराष्ट्रात लो. टिळक व त्यांचे अनुयायी, बंगाल मध्ये अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल व त्यांचे सहकारी, पंजाबमध्ये लाल लजपतराय यांनी केले होते.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. जहालवादी काँग्रेसच्या उदयाची कारण मिमांसा द्या

---

---

---

---

---

**२. जहाल काँग्रेसच्या विचारसरणी व कार्यपद्धती :**

जहाल काँग्रेसच्या उदयामुळे भारतीय राजकारणाला नवीन वळण मिळाले. ब्रिटिश सत्ता केवळ अर्ज विनंत्या करून वठणीवर येणार नाही तर त्यासाठी तीव्र आंदोलनाची गरज आहे अशी विचारधारा पुढे आली. काँग्रेस मध्ये जहाल विचारसरणीच्या लोकांची वाढ झाली. हिंदुस्थान हे माझे राष्ट्र असून ती मातृदेवता आहे. तिला ब्रिटिश सत्तेच्या जोखडातून मुक्त करणेसाठी भारतीयांनी या सत्तेविरूद्ध लढा दिला पाहिजे असे लोकांना वाटू लागले. जहाल राष्ट्रवाद्यांनी प्रथमच स्वराज्याची मागणी केली. लो. टिळकांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळणारच'' अशी घोषणा केली. ती जहाल राष्ट्रवाद्यांची राष्ट्रीय घोषणा ठरली. मवाळ राष्ट्रवाद्यांनी ब्रिटिशाकडे वसाहतीच्या स्वराज्याची मागणी केली होती. तर जहाल राष्ट्रवाद्यांनी संपूर्ण स्वराज्य हे आपले अंतिम ध्येय ठरविले होते. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीने एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात प्रवेश केला. देशात प्रथमच ब्रिटिश सत्तेविरूद्ध क्रांतीकारी आंदोलने सुरू झाली. बंगालच्या फाळणीनंतर जहाल राष्ट्रवाद्यास जोर आला.

**३. वंगभंग आंदोलन :**

सर्व भारतीय लोकांचा विरोध असूनही लार्ड कर्झनने बंगालची फाळणी करणारा आदेश २० जुलै, १९०५ रोजी काढला. जो जाहीर होताच फाळणी विरोधात वंगभंग आंदोलन सुरू झाले. भारतीय लोकांत विशेषतः बंगालमध्ये सरकार विरोधी वातावरण तयार झाले. कर्झनने ही फाळणी राष्ट्रीय चळवळीवर आघात करण्यासाठी, हिंदु-मुस्लीमांत फूट पाडण्यासाठी केली होती. त्यामुळे न्या. रानडे, ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादी मवाळ काँग्रेस नेते अस्वस्थ झाले. बंगालच्या नेत्यांनी मात्र काँग्रेसच्या आदेशाची वाट न पाहता

वंगभंग विरोधी आंदोलन सुरू केले. सुरेंद्रनाथांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. फाळणी विरोधी लढा फाळणी रद्द होईपर्यंत चालवायचाच या निर्धारानेच या लढ्याला प्रारंभ झाला. लो. टिळकांनी या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला. स्वराज्य स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या लो. टिळकांच्या चतु:सुत्रीनुसार बंगालमध्ये आंदोलन फाळणी रद्द होईपर्यंत चालू ठेवावयाचे असे ठरले. या चळवळीला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

७ ऑगस्ट, १९०५ रोजी कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्ये फाळणी आंदोलनाचा जाहीर मेळावा घेऊन त्यात परकिय मालावर बहिष्कार घालण्याचे ठरले. फाळणी प्रत्यक्ष अस्तीत्वात येण्याच्या दिवशी म्हणजे १६ ऑक्टोबर १९०५ रोजी 'शोकदीन' पाळण्याचे मेळाव्यात जाहीर करण्यात आले. स्वदेशी व बहिष्काराची चळवळ बंगालमध्ये चांगलीच प्रभावी ठरली. सरकारल वठणीवर आणण्यासाठी त्याचा राजकीय शस्त्र म्हणून वापर झाला. शेवटी सरकारला या चळवळी पुढे नमते घ्यावे लागले व १२ डिसेंबर १९११ रोजी दिल्ली दरबारात ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्ज याने बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली.

## ४. राष्ट्रीय काँग्रेसची भूमिका :

१९०५ सालचे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन वाराणसी येथे गोपाळकृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यात बंगालची फाळणी व कर्झनचे प्रतिगामी धोरण यांचा निषेध करण्यात आला त्याच प्रमाणे वंगभंग विरोध व स्वदेशी - बहिष्कार या चळवळीस पाठिंबा व्यक्त करण्यात आला. या अधिवेशनापासूनच नेमस्त व जहाल विचारसरणीच्या काँग्रेसमध्ये मतभेद होण्यास सुरवात झाली. जहालगटाचे नेते लो. टिळक, लाला लजपतराय, बिपीनचंद्र पाल व अरविंद घोष यांनी वंगभंग विरोधाच्या कारणाने सुरू झालेली बंगालपुरती मर्यादीत न राहता सर्व देशभर पसरली पाहिजे त्याचप्रमाणे स्वदेशी - बहिष्कारापुरती मर्यादित न राहता 'स्वराज्याची' मागणी करणारी राजकिय चळवळ झाली पाहिजे असा आग्रह धरला. यावेळीही काँग्रेसमध्ये नेमस्तांचे प्राबल्य असल्याने त्यांनी या विचारला पाठिंबा दिला नाही. मात्र कर्झनच्या कारकिर्दीवर नामदार गोखले यांनी टिका केली होती.

१९०६ चे काँग्रेस अधिवेशन कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यांनी बंगालच्या फाळणीबद्दल संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. या अधिवेशनात अध्यक्षपदावरून दादाभाईंनी प्रथम उघडपणे 'स्वराज्य' शब्दाचा पुरस्कार केला. एवढेच नव्हे तर या अधिवेशनात राष्ट्रगीत म्हणून 'वंदेमातरम्' प्रथमच गाइले गेले. तरी स्वयंशासन देणारे स्वराज्य हेच राष्ट्रीय काँग्रेसचे ध्येय असल्याचे मान्य करण्यात आले स्वातंत्र्य चळवळीचे तंत्र व मार्ग याबद्दल मात्र जहाल व मवाळ गटात मतभेदाची दरी वाढतच होती. असे असले तरी कोणत्याही परिस्थितीत काँग्रेस जहालवाद्यांच्या हातात जाऊ द्यावयाची नाही असे मवाळ नेत्यांना ठरविले होते.

## सुरत काँग्रेस :

१९०७ चे काँग्रेस अधिवेशन नागपूरला घ्यावयाचे ठरले होते. परंतु महाराष्ट्रात लो. टिळकांचे वर्चस्व असल्याने अधिवेशानात लो. टिळकांचाच प्रभाव राहिल म्हणून नेमस्त नेत्यांनी अधिवेशन सुरतला घेण्याचे ठरविले. सुरत म्हणजे फिरोजशहा मेहता यांचे प्रभावक्षेत्र होते. २७ डिसेंबर १९०७ रोजी अधिवेशनाला सुरूवात झाली. अधिवेशनात मवाळ विरूद्ध जहाल असे तंग वातावरण होते. सुरवातीला काँग्रेसमध्ये फूट पडू नये या भूमिकेतून

तडजोडीची भूमिका घेऊन कलकत्ता अधिवेशनात जहालांनी मांडलेले स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे ठराव सुरत अधिवेशनात नेमस्तानी संमत करत असतील तर नेमस्तांचे इतर ठराव जहालवादी मान्य करतील असे लो. टिळकांनी सुचविले. परंतु लो. टिळक व त्यांच्या अनुयांयाचे काही ऐकावयाचेच नाही असे मवाळांनी ठरवून डॉ. रासबिहारी घोष यांचे नाव अध्यक्ष म्हणून घोषीत केले. व अधिवेशनात एकच गोंधळ सुरू झाला. म्हणून पहिल्या दिवशी अधिवेशन स्थगित ठेवून दुसऱ्या दिवशी अधिवेशन सुरू झाले. यावेळी लो. टिळकांनी बोलण्यास परवानगी मागितली. परंतु नाकारण्यात आली. तरीही लो. टिळक तसेच व्यासपिठावर पोहचले व मंडपात एकच हलकल्लोळ माजला. मारामारी, खुर्च्या फेकणे इत्यादी प्रकार झाले या गोंधळातच बैठक समाप्त झाली उघडरित्या काँग्रेस मध्ये जहालवादी काँग्रेस व मवाळवादी काँग्रेस अशी फूट पडली. पुढील काळात राजकारणावर जहालवादी गटाचा प्रभाव वाढून स्वातंत्र्य चळवळ अधिक व्यापक व आक्रमक बनली.

### ५. राष्ट्रीय चळवळीची प्रगती

१९०५ नंतर राष्ट्रीय चळवळीची सूत्रे जहालवाद्यांच्या हातात गेले होती दिसतात. नेमस्तचे अपयश व वंगभंग चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने केलेल्या जुलमी कारवाया मुळे जहालवाद्यांना पाठिंबा वाढत गेला. ब्रिटिशांनी मात्र स्वातंत्र्य चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. सार्वजनिक ठिकाणी वंदे 'मातरमला बंदी, वृत्तपत्र स्वातंत्र्यावर मर्यादा, आंदोलकांना तुरुंगवास व हद्दपारीच्या शिक्षा, पोलीस व आंदोलन यांच्यातील संघर्ष यामुळे चळवळ नव्या दिशेने निघाली परंतु सरकारी अत्याचार वाढला होता. म्हणून सरकारी यंत्रणा विस्कळीत करण्यासाठी स्वदेशी - बहिष्कारा बरोबरच असहकारचे धोरणही जहालवाद्यांनी स्वीकारले. त्यात सरकारी नोकऱ्याचा राजीनामा द्यावा; विद्यार्थ्यांनी शाळा - कॉलेज सोडावीत - कायदे मंडळ व नगर पालिकेचे राजीनामे द्यावेत. यासारखी आव्हाने जनतेला करण्यात आली थोडक्यात म्हणजे चळवळ अधिक व्यापक करण्यात जहालवादी नेते यशस्वी झाले.'

सुरत अधिवेशनानंतर जहाल पुढारी लो. टिळक, बिपिनचंद्र पाल व लाला लजपतराय यांनी संपूर्ण देशाचा दौरा काढून आपल्या विचारसरणीचा प्रसार केला. त्या काळात लाल-बाल-पाल हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत प्रसिद्ध झाले होते. त्या काळात लो. टिळकांनी घेतलेले कष्ट विशेष उल्लेखनीय होते. ब्रिटिशांनी भारतीयांच्यावर केलेल्या अत्याचारामुळे जनतेत असंतोष होताच अशा वेळी लोकांची अस्मीता जागृत करून ब्रिटिश सत्तेविरूद्ध लढा देण्यासाठी भारतीय जनतेला जागृत करण्याचे काम लो. टिळकांनी केले. म्हणूनच त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणतात. त्यांनी 'स्वराज्य - स्वदेशी - बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हा चळवळीचा मार्ग जनते समोर ठेवला. यालाच जहालांची 'चतुःसूत्री' असे म्हणतात.' लो. टिळकांनी भारतीयांसमोर स्वराज्याचे म्हणजेच स्वातंत्र्याचे ध्येय ठेवले.

### ६. स्वदेशी -बहिष्कार चळवळ

स्वदेशी याचा अर्थ भारतीयांनी आपल्या देशात तयार झालेल्या वस्तुंचा दैनंदिन जीवनात वापर करावा. यासाठी सुरू केलेली चळवळ होती. वाराणसीच्या काँग्रेस अधिवेशनात बंगालच्या फाळणीचा व सरकारने चालविलेल्या दडपशाहीचा तीव्र निषेध केला होता. व बंगालमधील स्वदेशी व बहिष्कार चळवळीला पाठिंबाही दिला होता. लो. टिळकांनी राष्ट्रीय चळवळ या दृष्टीने स्वदेशीकडे पाहिले होते. स्वदेशी - बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तिन्हीचे मूळ ध्येय स्वराज्य मिळविणे हेच असल्याचे त्यानी जाहीर केले होते.

**बहिष्कार :**

बहिष्कार म्हणजे परदेशातून (इंग्लडमधून) येणाऱ्या वस्तुंचा वापर न करता त्यावर बहिष्कार टाकणे. परदेशातून आलेले कापड, साखर, मीठ निरनिराळ्या प्रकारच्या वस्तुचा वापर कोणीही करू नये एवढेच नव्हे तर धोब्यानी परदेशी कपडे धुऊ नयेत. परदेशी वस्तुंच्या एकमेकांस भेट म्हणून देऊ नयेत. अशा स्वरूपाचा कार्यक्रम आखला होता. या चळवळीला लोकांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळून ती तळागाळापर्यंत पोहचली होती. पंजाबमध्ये परदेशी साखरेवर बहिष्कार टाकण्याची चळवळ सुरू कोली होती. रावळपिंढीच्या व्यापाऱ्यानी हो अशीच चळवळ केली होती. दिल्लीला सय्यद हैदर रेझा हे स्वदेशी चळवळीचे प्रवर्तक होते. चिदंबरम पिल्ले यांनी मद्रास प्रांतात स्वेदशी जहाज वाहतूक कंपनी स्थापन केली. तसेच विविध वस्तुच्या निर्मितीसाठी वेगवेगळे उद्योगधंदेही मोठ्या प्रमाणात काढले गेले..

**राष्ट्रीय शिक्षण :**

हे स्वातंत्र्यचळवळीचे प्राण होते. भारतीय युवकांत राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्याचे साधन म्हणून लो. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला होता. 'डॉन' या इंग्रजी पत्राचे संपादक सतीशचंद्र मुखर्जी यांनी १८१८ साली राष्ट्रीय शिक्षणाची योजना तयार केली. लो. टिळकांच्या मते, सरकारी शाळातून राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय वृत्ती निर्माण करणारे शिक्षण दिले जात नव्हते. तेव्हा सामाजिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्था सुरू करून येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण द्यावे असे आवाहन केले गेले. रविंद्रनाथ टागोर यांनी शांतीनिकेतन स्थापन करून राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग आखून दिला. मुंबई व पुण्यात आगरकर, चिपळूणकर, शि. म. परांजपे, श्रीमती केतकर व लो. टिळक यांनी अगोदर पासूनच राष्ट्रीय शिक्षणाला प्रारंभ केला होता. पंजाबमध्ये लाला लजपतराय, गोपाळराम गंगाराम, पंडीत चंद्रिका दत्त, यांनी तर मद्रासमध्ये सुब्रमण्यम अय्यर व पी. आनंदाचार्लू इत्यादीनी वर्गणी गोळा करून राष्ट्रीय शिक्षण संस्था उभ्या केल्या. त्यामुळे राष्ट्रीयवृत्तीचा तरुणवर्ग तयार झाला.

**स्वराज्य :**

स्वराज्य हे लो. टिळकांचे अंतिम ध्येय होते. स्वराज्य म्हणजे आपले भारतियांचे राज्य होय. प्रजेच्या प्रतिनिधीमार्फत चालविले जाणारे राज्य, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी त्यांची घोषणा होती. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा अवलंब करून स्वराज्य मिळवायचे अशी त्यांची योजना होती. त्यांच्या मते स्वराज्य हे धार्मिक दृष्ट्या व नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे. इंग्रजांना इंग्लडमध्ये जे हक्क मिळतात तेच हक्क भारतीयांना भरतात मिळाले पाहिजेत. हिंदुस्थानाचे सरकार हे भारतीय लोकांचेच असले पाहिजे व भारतीयांची प्रगती केवळ स्वराज्यात होऊ शकते असे टिळकांनी जाहीर केले.

लो. टिळकांनी सांगितलेली चतु:सूत्री ही राष्ट्रीय चळवळीची मार्गदर्शक तत्वे बनली होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे जे राजकीय तत्वज्ञान मांडले गेले त्यात चतुः सूत्रीचा अंर्तभाव केला गेला.. म. गांधीजींनी आपल्या राष्ट्रीय चळवळीत स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तत्वांचा वापर केला होता यावरुन ते स्पष्ट होते.

**७. लो. टिळकांचे राष्ट्रीय चळवळीतील कार्य :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महान व क्रियाशील नेते म्हणून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (१८५६-१९२०) यांचे नाव घेतले जाते. स्वातंत्र्यचळवळीतील जहालमतवादी युगाचे ते प्रमुख सूत्रधार होते. म. गांधी त्यांच्याबद्दल म्हणतात की 'टिळकांचा मी शिष्य आहे

असा माझा दावा नाही, टिळकांची प्रखर इच्छाशक्ती, सखोल अभ्यास, प्रखर देशभक्ती त्याग व संघर्षमय जीवन हे गुण वाखाणण्यासारखे होती. जनतेचे ते प्रभावी नेते होते. त्यांनीच आमच्यात स्वातंत्र्याची भावना निर्माण केली. तत्कालीन सरकारचे दोष टिळकाएवढे कोणीच दाखवू शकले नाहीत. त्यांनीच भारतीय जनतेला स्वातंत्र्याचा मार्ग दाखवुन दिला.'

इ.स. १९०५ ते १९२० या कालखंडास जहालमतवादी कालखंड म्हणतात. या काळात जहालमतवादी नेत्यांनी राष्ट्रीय सभा व स्वातंत्र्यचळवळीवर आपला प्रभाव निर्माण केला होता. या काळात स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व लो. टिळक, बिपनचंद्र पाल व लाला लजपतराय यांनी केले. या त्रयमूर्ती इतिहासात लाल-बाल-पाल या नावाने प्रसिद्धीस आल्या होत्या. या कालखंडात स्वातंत्र्य चळवळीवर इतका प्रभाव होता कि या कालखंडास 'टिळक युग' असेही म्हटले जाते. त्यांनी भारतीय जनतेत ब्रिटिश सत्तेविरूद्ध प्रचंड असंतोष निर्माण केला. म्हणनूच लंडन टाइम्सचे प्रतिनिधी व्हेलेंटाइन चिरोल यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे म्हटले आहे.

सार्वजनिक जीवनात ते प्रथमपासूनच सक्रिय होते. सुरवातीला त्यांनी शैक्षणिक कार्यात भाग घेतला. १८८० मध्ये आगरकर व चिपळूणकर यांच्या मदतीने पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' नावांची शाळा काढली. १८८४ मध्ये त्यांनी व आगरकर यांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' स्थापना केली. १८८५ मध्ये फर्ग्युसन कॉलेज काढले. तेथे संस्कृत व गणिताचे अध्यापन केले. १८९० मध्ये सहकाऱ्याशी मतभेद झाल्याने संस्थेचा राजीनाम देऊन बाहेर पडले. त्यानंतर त्यांनी देशकार्यास वाहून घेतले. केसरी व मराठा ही वृत्तपत्रे काढली व त्यातून ब्रिटिश शासनाच्या चुकीच्या धोरणावर टिका केली. त्याबद्दल त्यांना शिक्षाही झाल्या.

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेला ते सभासद म्हणून हजर होते. राष्ट्रीय सभा (काँग्रेस) ही राजकीय संघटना असून हिच्या मार्फतच भारतीय स्वातंत्र्य चळवळ चालवली जावी असे त्यांना वाटत होते. १९०५ ते १९२० या काळात काँग्रेसवर त्यांच्या नेतृत्वांचा प्रभाव होता. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला आक्रमक बनविले. त्यांनी अनेक क्रांतीकारकांना गुप्तपणे मदत केली होती. चापेकर बंधुनी कमिशनर रँड व त्यांचा सहकारी ॲम्हर्स्ट यांचा खून केला. त्यावेळी ब्रिटिशांनी धरपकड सुरू केली म्हणुन लो. टिळकांनी केसरीतून ब्रिटिशावर टिका केली. परीणामी त्यांना दिड वर्षाची कारावासाची शिक्षा झाली. पुढे सन १९०८ साली केसरीतून अशाच प्रकारे टिका केल्याबद्दल सहा वर्षाची कारावसाची शिक्षाही झाली होती.

त्यांनी शिवजयंती व गणेशोत्सव सुरू करून लोकांत जागृती घडवून आणली. स्वातंत्र्य चळवळीस पूरक अशी होमरूळ चळवळ चालवली. लो. टिळकांनी भारतीय जनतेत ब्रिटिश सत्तेबद्दल प्रचंड असंतोष निर्माण करून काँग्रेसची चळवळ आक्रमक बनवली. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे कार्य केले. लोकमान्य टिळकांचा १ ऑगस्ट १९२० रोजी मृत्यू झाला. त्यांच्या कार्याबद्दल ब्रिटिश लेखक श्री ब्लंड म्हणतात, ''Tilak contributed more by his life and character than by his speeches and uniting to making of new nationalism. His selfless patriotism, indomitable courage and fierce determination and above all, the supreme concentration of his life to one great aim; Viz the foundation of his country marked new epoch in the political struggle for Indias freedam.''

**लाला लजपतराय :** (१८६५-१९२८) लाल-बाल-पाल या त्रयमुर्तीतील लाला ते एक होते. त्यांना 'पंजाबचा सिंह' म्हणून ओळखले जात असे कायद्याचा अभ्यास पूर्ण करून त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला होता. स्वामी दयानंदाच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता.

**स्वातंत्र्य चळवळीतील कार्य :**

लाला लजपतराय हे जहालवादी नेते होते. मवाळवादी चळवळीवर त्यांचा विश्वास नव्हता. १८८८ पासून त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. त्यांनी पंजाबमध्ये राजकीय जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. त्यांच्या आवाहनामुळे शेकडो विद्यार्थी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. पंजाब मधील अशांततेस लालाजी कारणीभूत आहेत असे इंग्रजांना वाटत होते. १० मे १९०७ रोजी १८५७ च्या उठावाचा ५०वा स्मृतीदिन होता. त्या दिवशी ब्रिटिशाविरोधी बंड होणार. अशी अफवा पसरली होती. त्याचे निमित्त करून इंग्रजांनी त्यांना विनाचौकशी तुरूंगात टाकले व सहा महिने हद्दपार केले. वंगभंग आदोलनातही त्यांचा मोठा सहभाग होता. १९२० साली गांधीजींनी चालवलेल्या असहकार चळवळीत त्यांनी सहभाग घेतला व संभाबंदी आदेश मोडून त्यांनी सभा घेतली. तेव्हा त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. म. गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतल्यावर मात्र त्यांनी गांधीजीवर टिका केली व स्वराज्य पक्षाच्या स्थापनेत सहभाग घेतला. ते सामाजिक व कामगार विषयक कार्यात सक्रीय होते. कमिशन विरोधी निदर्शनात ते सहभागी झाले त्यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्याने केलेल्या लाठी हल्ल्यात जबर जखमी झाले व पुढे काही दिवसांनी १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मरण पावले.

**बिपनचंद्र पाल** (१८५८-१९३२) बंगाल प्रांतातील जहाल चळवळीचे नेते म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांचे वडील न्यायाधिशाकडे मुन्सिफ होते. आपल्या मुलाने इंग्रजी शिकून चांगले अधिकारी व्हावे असे त्यांना वाटत असे. परंतु बिपनचंद्र विद्यार्थी दशेपासूनच ब्राह्मोसमाजाकडे आकर्षित झाले होते व त्या समाजाचे कार्यही सुरू केले होते. परंतु ही गोष्ट त्यांच्या वडिलांना आवडली नाही. त्यामुळे दोघांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे आर्थिक अडचणींना तोंड देत देत त्यांना शिक्षण पूर्ण करावे लागले. प्रथमपासूनच त्यांनी समाजकार्यात लक्ष घातल्याचे दिसते. ब्राह्मो समाजाचे कार्य केले. विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर आपली पहिली पत्नी वारल्यानंतर त्यांनी एका विधवेशी लग्न केले. राष्ट्रीय शिक्षण प्रसाराचे कार्य केले. त्याकाळात ते नेमस्त विचार सरणीचे होते. परंतु बंगालच्या फाळणीनंतर मात्र हे जहाल विचार सरणीचे बनले. त्यांनी १८८० मध्ये 'परिदर्शक' या नावाचे बंगाली साप्ताहिक काढले. व पुढील काळात त्यांनी 'बंगाल पब्लीसिटी, न्यू इंडिया, इन्डेपेंडेंट इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रे काढून त्यातून जनजागृतीचे कार्य सुरू केले.'

बंगाल प्रांतातील जहालमतवादी गटाचे ते प्रमुख नेते होते. त्यांनी वंगभंग आंदोलनात आपल्या सहकाऱ्यासह सहभाग घेतला. लो. टिळकांच्या स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सुत्रीच्या कार्यक्रमास पाठींबा देऊन सक्रिय सहभाग घेतला. बंगालमधील क्रांतीकारकांचे ते स्फुर्ती स्थान होते. त्यांचा मृत्यु १९३२ मध्ये झाला.

लाल-बाल -पाल यांच्याप्रमाणेच अरविंद घोष यांचे नावही जहाल विचार सरणीचे नेते व प्रखर राष्ट्रवादाचे उदगाते म्हणून नांव घेतले जाते. त्यांनी १९१० पर्यंत जहाल राष्ट्रवादाचा

पुरस्कार करून स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. त्यानंतर मात्र राजकारणातून संन्यास घेऊन पाँडेचरी येथे स्थायिक झाले व कृष्णभक्ती अध्यात्म यात रंगून गेले. १९२० साली त्यांनी योगाश्रम नावाची संस्था काढली. ३ डिसेंबर १९५० रोजी मरण पावले.

अशा तऱ्हेने काँग्रेसला ब्रिटिश सत्ते विरूद्ध अधिक आक्रमक करण्याचे काम जहालमतवादी नेत्यानी विशेषतः लो. टिळकांनी केले. त्यांच्यामुळे राष्ट्रवादी चळवळीला अधिक व्यापक स्वरूप आले होते.

**८. जहाल वादाचे मूल्यमापन**

जहाल वाद्याच्या चळवळीमुळे भारतीय राष्ट्रवाद्यामध्ये नवी आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली. जनतेमध्ये ब्रिटिशाबद्दल असणारी भयाची भावना कमी झाली. लोकांचा राष्ट्रीय चळवळीतील सहभाग वाढला. ब्रिटिशांशी तीव्र संघर्ष केल्याशिवाय ते भारत देश सोडून जाणार नाहीत म्हणून, ब्रिटिशांशी सहकार्याऐवजी व सरकारच्या अन्यायपूर्ण धोरणाला प्रतिकार करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले.

बी.एल. ग्रोवर म्हणतात, ''Thus the Extremists gave new slogans to the Indian Nationalist Movement Non-Co-operation, Passive resistance, Mass agitation self reliance, discipline of suffering etc.The Extremists Transformed patriotism from an academic pastime to service and suffering for the nation.''

भारतीय समाजातील वाढत्या असंतोषाला कृतिशील बनविण्याचे कार्य जहाल गटाने केले. लो. टिळकांनी भारतीय जनतेला 'लढाऊ राष्ट्रवाद' शिकवला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. जहालवादी काँग्रेसच्या कार्याचे मुल्यमापन करा.

## ७.६ सारांश :

भारतात १८५७ च्या उठावानंतर हळूहळू राष्ट्रवादाचा उदय होत गेला. बंगाल, महाराष्ट्र, पंजाब व मद्रास या प्रांतात काही राजकीय संस्था स्थापन झाल्या होत्या. ब्रिटिशांचे भारतीयांचावरील अत्याचार व आर्थिक शोषण दिवसेंदिवस वाढतच होते. त्यामुळे ही ब्रिटिशां विरोधी राजकीय जागृती दिवसेनदिवस वाढत गेली. ब्रिटिश सरकारकडे आपल्या प्रश्नांना न्याय मिळविण्यासाठी व राजकीय मागण्या मान्य करून घेण्यासाठी एखादी देशव्यापी राजकीय

संघटना असावी असे अनेक भारतीय नेत्यांना वाटत होते त्यातूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली.

काँग्रेसवर प्रारंभीच्या काळात नेमस्त नेत्यांचा प्रभाव होता. त्यांना ब्रिटिश सरकार विरूद्ध संघर्षाची भूमिका न घेता अर्ज विनंत्या करून आपल्या काही मागण्या मान्य करून घेतल्या. या काळात काँग्रेसचे धोरण मवाळ होते म्हणून (१८८५-१९०५) या कालखंडातील काँग्रेसला मवाळ काँग्रेस म्हणतात. कालातंराने काँग्रेसमधील लो. टिळक, लाल लजपतराय व बिपीनचंद्र पाल या नेत्यांना काँग्रेसचे ब्रिटिशाबद्दलचे मवाळ धोरण पसंत नव्हते. त्यांनी आपल्या राजकीय मागण्या मान्य करून घेण्यासाठी ब्रिटिशविरोधी संघर्षाची भूमिका घेतली. त्यातूनच मवाळ व जहाल नेत्यातील मतभेद वाढतच गेले व १९०५ नंतर काँग्रेसवर जहाल नेत्यांचे वर्चस्व निर्माण केले.

१९०५ ते १९२० या कालखंडात काँग्रेसच्या नेतृत्वाखालाी भारतीय स्वातंत्र्य चळवळ आक्रमक बनली. लो. टिळकांनी ब्रिटिशाकडे 'वसाहतीच्या स्वराज्याची' मागणी केली. स्वदेशी व बहिष्कार चळवळ सुरू केली. ब्रिटिशांच्या विरोधात खऱ्या अर्थाने या काळात स्वातंत्र्य आंदोलन तीव्र झाले.याच कालखंडास जहालवादी काँग्रेसचा कालखंड म्हणतात.

## ७.७ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न

१. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे सांगा.
२. भारतात राष्ट्रवादवाढीसाठी कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली ?
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना कशी झाली याचा सविस्तर वृंत्तांत सांगा.
४. १८८५ ते १९०५ या कालखंडातील काँग्रेसचे कार्य सांगा.
५. १९०५ ते १९२० या कालखंडातील स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घ्या.

❖❖❖❖

# ८

# क्रांतीकारी राष्ट्रवादी

(Revoluationary Nationalist)

**अनुक्रमणिका**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रास्ताविक
८.२ विषय विवेचन
८.३ क्रांतीकारी विचार सरणीचा उदय
८.४ क्रांतीकारकांचे कार्य
८.५ महाराष्ट्रातील क्रांतीकारक
८.६ बंगालमधील क्रांतीकारी चळवळी
८.७ पंजाबमधील क्रांतीकारी चळवळी
८.८ क्रांतीकारी चळवळीचे दुसरे पर्व
८.९ क्रांतीकारी चळवळीचे मूल्यमापन -
८.१० सारांश
८.११ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये

या घटकांचे अभ्यास केल्यानंतर आपल्याला

- भारतात क्रांतीकारी विचारसरणी उदयास येण्यासाठी कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली हे सांगता येते.
- काँग्रेसच्या स्थापने पूर्वी या देशात ब्रिटिशसत्ते विरूद्ध अनेक क्रांतीकारकांनी उठाव केले होते त्याचे आकलन होते.
- महाराष्ट्रातील क्रांतीकारकांची समग्र माहिती सांगता येते.
- बंगालमधील क्रांतीकारी चळवळीबद्दल माहिती होते.
- पंजाबमधील क्रांतीकारकांनी केलेल्या कार्याची माहिती विषद करता येते.
- क्रांतीकारी चळवळीचे दुसरे पर्व (१९२५-४०) या काळातील क्रांतीकारी संघटनानी केलेल्या चळवळीची माहिती सांगता येते.

## ८.१ प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात क्रांतीकारकांच्या चळवळीस एक विशेष स्थान आहे. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यात या क्रांतीकारी राष्ट्रवाद्यांचाही महत्त्वाचा सहभाग आहे. म. गांधीनी चालवलेल्या असहकार, सत्याग्रह, सविनय कायदेभंग या चळवळी प्रमाणेच क्रांतीकारकांनी केलेल्या कृत्यामुळे ब्रिटिशांच्यात एक प्रकारची दहशत निर्माण केली होती. हे क्रांतीकारक देशभक्त होते. ते प्रखर राष्ट्रवादी होते. देशासाठी प्राणत्याग करण्याची त्यांची तयारी होती. ब्रिटिशांशी तीव्रपणे संघर्ष केल्याशिवाय आपणास स्वातंत्र्य मिळणार नाही. शस्त्राला उत्तर तसेच शस्त्रानेच दिले पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

राष्ट्रीय चळवळीत क्रांतीकारी राष्ट्रवाद्यांचा उदय होण्यास वेगवेगळी परिस्थिती कारणीभूत ठरली त्यामुळे क्रांतीकारी राष्ट्रवादी चळवळीचा उदय झाला. त्यांचा मवाळ व जहालांच्या कार्यपद्धतीवर त्यांचा विश्वास नव्हता. क्रांतीकारकांना अपेक्षित परिणाम लवकर हवे होते. जहालवादी काँग्रेसची चळवळ मोडीत काढणासाठी ब्रिटिशांनी अनेक कायदे केले. देशाविरोधी बैठक कायदा (१९०७) हिन्दी वृत्तपत्र चिथावणी कायदा (१९०८) फौजदारी दुरूस्ती कायदा (१९०८) हिंदी मुद्रण व्यवसाय कायदा (१९१०) असे कायदे पास करून ब्रिटिशांनी भारतीय राष्ट्रवाद्यांना त्रस्त करून सोडले होते. लो. टिळकांच्यावर राजद्रोहाचा खटला भरून त्यांना सहा वर्षाची शिक्षा केली व त्यांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरूंगांत पाठविले होते. अरविंद घोष व बिपीनचंद्र पाल राजकारणातून निवृत्त झाले. या पार्श्वभूमीवर हिंदी स्वातंत्र्य चळवळ बंद पडण्याची वेळ आली होती. अशा परिस्थितीत या क्रांतीकारी राष्ट्रवादी तरुणांनी ब्रिटिशांनी या देशातून निघून जावे म्हणून ब्रिटिशांची शासन यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केला.

भारत देश ही आपली माता असून परकिय सत्तेच्या गुलामगिरीतून तिची सुटका करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते. आपल्या ध्येय पुर्तीसाठी गुप्त क्रांतीकारी संघटना उभारणे, सरकारी कार्यालये, तिजोऱ्या लुटणे, दळणवळणाच्या साधनावर हल्ला करणे. शस्त्रास्त्रे तयार करून इंग्रज अधिकाऱ्यांना ठार करून त्यांच्यात दहशत बसविणे व इंग्रजांना प्रशासन चालविणे अशक्य करणे हे करताना इंग्रजांनी पकडले तर हसतमुखाने देशासाठी मरण स्विकारणे. ही त्यांची कार्यपद्धती होती. सशस्त्र लढा, बलिदान, संघर्ष या मार्गाशिवाय म्हणजेच 'रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळे' अशी त्यांची विचारधारा होती. युगांतर या बंगाली साप्ताहिकामध्ये २२ एप्रिल, १९०६ च्या अंकात क्रांतीकारी चळवळीच्या कार्यक्रमाचे पुढील शब्दात वर्णन केले आहे. ''The remedy lies with the people themselves. The 30 Crores of people inhabiting in India Must raise their 60 crores of hands to stop this curse of oppression. Force must be stopped by force.'' या क्रांतीकारकांना आपल्या चळवळीचे रूपांतर सामुदायिक क्रांतीमध्ये करता आले नाही. त्यांनी आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या आयरिश देशभक्ताप्रमाणे ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हत्या करण्याचा मार्ग स्वीकारला. ब्रिटिशांना इथे राज्य करणे नकोसे करणे व शेवटी ते भारत देश सोडून जातील असे त्यांना वाटत होते. 'युगांतर' या साप्ताहिकात अरविंद घोष यांचे लहान बंधू विरेंद्रकुमार घोष यांनी क्रांतीकारकासाठी तपशिलवार कार्यक्रम जाहिर केला.

१. ब्रिटिश राजवटी विषयी लोकांत द्वेषाची भावना निर्माण करणे.

२. देशभक्ती पर गीते आणि भारतीय इतिहासातील शूरवीर नायकांच्या उज्ज्वल पराक्रमी कृत्यांची महती भारतीय लोकांना सांगून त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणे. त्यामुळे लोक आपल्या संकटे, अडचणी विसरून देशासाठी सर्वस्व अर्पण करण्यास तयार होतील.

३. मोर्चे, मिरवणूका, निदर्शने इत्यादी कार्यक्रम करून ब्रिटिश सरकारचे लक्ष विचलित करणे.

४. तरुणात शिस्त निर्माण करणे, त्यांना शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण देणे. तसेच ही शस्त्रे व दारूगोळा देशातच गुप्तपणे तयार करणे किंवा गरज पडल्यास परदेशातून गुप्तपणे मिळविणे.

५. ब्रिटिश विरोध हा कार्यक्रम राबविण्यासाठी श्रीमंताकडून पैसा मिळविणे किंवा तो न मिळाल्यास दरोडे - लूटमार करून मिळविणे व चळवळ चालविणे. थोडक्यात ब्रिटाशांनी हा देश सोडून जाण्यासाठी लढ्यासाठी जो मार्ग सापडेल तो स्वीकारणे व चळवळ चालू ठेवणे.

क्रांतीकारी राष्ट्रवाद्यांनी स्वीकारलेला मार्ग हा ‘अतिजहाल’ होता पण सर्वांना सामावून घेणारा नव्हता. त्यामुळे त्यांना संघटन करता आले नाही. जास्तीजास्त देशवासियांना त्यांच्या या लढ्यात सहभागी करून घेता आले नाही. त्यामुळे त्यांची ही चळवळ ठराविक तरुणांच्या पुरती मर्यादित राहिली. तरीही या चळवळीचे महत्त्व कमी होत नाही.

## ८.३ क्रांतीकारी राष्ट्रवाद्यांचे कार्य :

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय जनतेच्या मनांत राष्ट्रवादी विचारांची वाढ होत गेली. तसे ब्रिटिशांच्या अन्यायी व अत्याचारी धोरणविरूद्ध त्याचा उद्रेक जागोजागी होऊ लागला होता. आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरूद्ध क्रांतीकारक जीवावर उदार होऊन प्रतिकार करीत असत, क्रांतीकारकांची ही दहशतवादी कृत्ये बंगालच्या फाळणीनंतर मोठ्या प्रमाणात वाढली असली तरी त्याची सुरवात १९व्या शतकाच्या उत्तरार्धातच झाली होती. प्रामुख्याने बंगाल, महाराष्ट्र व पंजाब या प्रांतात दहशतवादी चळवळीचा जोर जास्त होता. या क्रांतीकारी चळवळीचा आढावा घेण्याअगोदर कुका चळवळ व वासुदेव बळवंत फडकेचे बंड यांचा विचार केला पाहिजे काँग्रेसच्या स्थापने अगोदर या दोन्हीही चळवळी घडून आल्या आहेत.

### कुका चळवळ (१८६९ ते १८७२) :

ब्रिटिश सरकारने पंजाब प्रांतात चालविलेल्या दडपशाही विरूद्ध पंडित रामसिंह कुका यांनी सशस्त्र क्रांतीकारकांचे क्रांतीदल उभारून लढा पुकारला. ब्रिटिशांची सत्ता गेल्याखेरीज आपल्या देशाचा विकास होणार नाही, असा प्रचार त्यांनी पंजाब प्रातात सुरू केला होता. ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते. त्याचा सुगावा ब्रिटिश सरकारला अजिबात लागला नव्हता. १८६९ मध्ये सरकारने गो-वधास परवानगी देताच कुका संप्रदाय व ब्रिटिश सरकार यांच्यात सशस्त्र संघर्ष सुरू झाला. कुका यांनी स्वदेशी पंचायत राज्य, न्यायव्यवस्था इत्यादीचा प्रयोग करून ब्रिटिश राज्यव्यवस्था झुगारून देण्याचा प्रयत्न केला. ही

राष्ट्रवादी चळवळ पंजाबी सैनिकांत पसरल्यास ब्रिटिश सत्तेला धोका होईल म्हणून ब्रिटिशांनी ही चळवळ कठोरपणे मोडून काढण्यासाठी पाऊले उचलली. मोठ्या प्रमाणात धरपकड झाली. अनेक कुकांना पकडून तोफेच्या तोंडी दिले. ब्रिटिशांच्या या अत्याचारातून १०-१२ वर्षाची बालकेही सुटली नाहीत. शेवटी पंडीत रामसिंह कुकाही पकडले गेले. त्यांना कडक शिक्षा होऊन ब्रह्मदेशातील कारागृहात टाकण्यात आले. तुरुंगातच इ.स. १८८५ साली या क्रांतीकारकाचे निधन झाले.

## ८.४ महाराष्ट्रातील क्रांतीकारक

महाराष्ट्रातील आद्य क्रांतीकारक म्हणून वासुदेव बळवंत फडके यांचे नाव घेतले जाते. त्याचा जन्म ४ नाव्हेंबर १८४५ रोजी कुलाबा जिल्ह्यातील शिरढोण या गांवी झाला. सुरवातीला रेल्वे खात्यात लिपिक व नंतर लष्करी खात्यात नोकरीला लागले. ब्रिटिश अधिकाऱ्याकडून मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीमुळे वासुदेव बळवंत फडके मध्ये राष्ट्रवादाची प्रखर भावना निर्माण होऊन त्यांनी ब्रिटिश विरोधी सशस्त्र क्रांतीचा निर्णय घेतला १८७६ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळात जनतेचे अतोनात हाल होऊन जनता मृत्युमुखी पडत होती. मात्र ब्रिटिश सरकार निष्क्रीय राहिले होते. कराच्या बोजा मात्र दिवसेंदिवस वाढतच होता. म्हणून त्यांनी पश्चिम महाराष्ट्रीत दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून ब्रिटिश सत्तेच्या दडपशाही व आर्थिक शोषणाविरूद्ध भाषणे देऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

वासुदेव फडके यांनी पुणे - सातारा भागातील रामोशी लोकांचे संघटन करून २१ फेब्रुवारी १८७९ रोजी ब्रिटिश सत्तेविरूद्ध उठाव केला. त्यांनी धनाढ्य शेठ सावकारांच्या घरावर दरोडे घालून हाती आलेले धान्य व पैसा दुष्काळग्रस्त जनतेला वाटत असत. पश्चिम महाराष्ट्रातील सात जिल्ह्यात त्यांनी ब्रिटिश शासनास त्रस्त केले. ब्रिटिश सरकारने वासुदेव बळवंत फडकेस पकडून देणारास चार हजार रूपयाचे बक्षिस जाहीर केले. तर वासुदेव फडकेनी मुंबईचा गव्हर्नर रिचर्ड टेंपल आणि कलेक्टरच्या मस्तकासाठी सरकारी पारितोषिकापेक्षाही मोठी रक्कम जाहीर केली. त्यामुळे ब्रिटिश सरकारने डॅनियन या अधिकाऱ्याची त्यांना पकडण्यासाठी नेमणूक केली. डॅनियनने निजामी फौजाची मदत घेऊन २० जुलै १८७९ रोजी देवरनावडशी येथील देवळात अटक केली. त्याच्या सोबत असलेला गोपाळ मोरेश्वर साठे यांलाही अटक केली. २२ ऑक्टोबर १८७९ रोजी वासुदेव बळवंत वर खटला सुरु त्यांना राजद्रोही ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली व ९ जानेवारी १८८० रोजी एडनच्या तुरूंगात पाठविले गेले. तेथून त्यांनी निसटण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना पुन्हा पकडण्यात आले. त्यांचा तुरूंगात खूप छळ केला त्यातच त्यांचा १७ फेब्रुवारी १८८३ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

### पुण्यातील प्लेग व चाफेकर बंधु :

लो. टिळकांनी महाराष्ट्रात जनजागृती घडवून आणली होती. गणेश उत्सव व शिवजयंती यासारखे उत्सव सार्वजनिकपणे साजरे करून त्यांनी लोकांच्यात संघटन घडवून आणले होते. लोकांच्या राजकीय आशाआकांक्षा वाढीस लागल्या होत्या. ब्रिटीश सरकारच्या दडपशाही धोरणामुळे लोक असंतुष्ट होते. अशातच नैसर्गिक आपत्तीची भर पडली होती सन १८९६-९७ साली महाराष्ट्रात प्लेगची साथ सुरू झाली. सरकारने या साथीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला नाही. साथींचा प्रादुर्भाव व मृत्युंची संख्या वाढतच गेली. पुण्यात प्लेग

कमिशनर म्हणून वॉल्टर चार्ल्स रँड व चार्लस आयर्स्ट हे अधिकारी नेमले गेले होते. हे अधिकारी व त्यांचे सहकारी प्लेग निवारण्याच्या नावाखाली लोकांना त्रास देत होते. हे गोरे शिपाई रोगी शोधण्याच्या नावाखाली  बुटासहित स्वयंपाक घर, देवघरात घुसत असत. घरातील साहित्य बाहेर फेकणे, वस्तु विसकटणे, स्त्रियांनाही हुसकावून बाहेर काढणे, लोकांशी उद्धट पणे वागणे हे प्रकार सर्रास करीत होते. त्यामुळे जनमत प्रक्षुब्ध झाले होते. त्यावेळच्या पुण्यातील वातावरणाविषयी सुधारक पत्रात लिहिले होते. ''इतके दिवस चोरीवरच भागत होते. आता बायकांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. खरोखर आमच्या लोकासारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेही सापडणार नाहीत! अरे... भागुबाई सारखे रडता काय? आडदांडास कायदा शिकवा...''

पुण्यातील काही युवा मंडळी या गोऱ्या अधिकाऱ्यावर संतंप्त झाली होती. चाफेकर बंधु हे त्यापैकीचे होते.  २२ जून १८९७ रोजी गणेश खिंडीतील गव्हर्नरच्या बंगल्यावर राणीच्या हिरक महोत्सवास मि. रँड व आर्यस्ट हजर होते. कार्यक्रमातून माघारी जाताना दामोदर चाफेकर यांनी रँड यास ठार केले. आर्यस्टवरही गोळ्या झाडल्या पण त्यात तो जखमी झाला. त्यानंतर ब्रिटिश सरकारने जंगजंग पछाडूनही रँडच्या वधाचे अपराधी सापडत नव्हते. सरकारने खुनाची माहिती देणारास २० हजार रूपये जाहीर केले. या प्रलोभनास बळी पडून गणेश द्रविड याने चाफेकर बंधुची नावे ब्रिटिशांना सांगितली. त्यामुळे दामोदर चाफेकर यास पकडून १८ एप्रिल १८९८ रोजी फाशी देण्यात आले. फितुरी करणाऱ्या गणेश व रामचंद्र या द्रविड बंधुना वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांनी गोळ्या घालून ठार केले. ब्रिटिश सरकारने वासुदेव व बाळकृष्ण या चाफेकर बंधुंना व महादेव रानडेनां पकडून मे १८९९ मध्ये फाशी दिले.

या काळात ब्रिटिशांच्या दडपशाही धोरणाबद्दल लो. टिळकांनी वृत्तपत्रात लेख लिहला व त्यात म्हटले की ''आजकाल शहरात पसरलेला प्लेग त्याच्या (इंग्रजांच्या) मानवी रूपापेक्षा अधिक भयानक आहे.'' ब्रिटिशाविरूद्ध लेख लिहिला म्हणून लो. टिळकांच्यावर खटला भरण्यात येऊन त्यांना १८ महिन्याची शिक्षा झाली. त्यामुळे क्रांतीकारी आंदोलन आणखी तीव्र झाले.

**स्वातंत्र्यवीर सावरकर व अभिनव भारत :**

स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जवळील भगूर या गावी झाला. विद्यार्थी दशेपासूनच ते राष्ट्रीय वृत्तीचे होते. रँडच्या खुनाबद्दल दामोदर चाफेकरांना फाशी देण्यात आले. या घटनेचा त्यांच्या मनावर खूपच परिणाम झाला. यावेळी त्यांनी प्रभावित गावातील देवीसमोर आपले संपूर्ण जीवन स्वातंत्र्य लढ्यासाठी अर्पण करण्याची शपथ घेतली.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे विद्यार्थी दशेपासूनच क्रांतीकार्याकडे वळले. सन १८९९ मध्ये त्यांनी नाशिक येथे प्रारंभी 'राष्ट्रभक्त समूह' व १९०० मध्ये 'मित्रमेळा' या संघटना स्थापन केल्या. त्यांना या कामी त्रंबकराव म्हसकर व रावजी कृष्ण यांची मदत झाली याच संस्थेतून निर्भय व राष्ट्रभक्त तरुणांची निवड करून १९०४ साली 'अभिनव भारत सोसायटी' ही सशस्त्र क्रांतीकारी संघटना स्थापन झाली. या संघटनेत बाबाराव सावरकर, त्रंबक रघुनाथ, वामन केशव, रामचंद्र केशव, दातार बंधु, नाना वर्तक व त्यांचे बंधु इत्यादी मंडळी होती.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे अभिनव भारत संघटनेचे ध्येय होते. मित्र मेळ्याचे कार्य उघडपणे चालत असे. मात्र अभिनव भारत संघटेचे कार्य गुप्तपणे चालत असे. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करण्याची शपथ अभिनव भारतचा सभासद होतानाच द्यावी लागत असे. शस्त्रास्त्रे खरेदी करून ती चालविण्याचे प्रशिक्षण सभासदांना दिले जात असे सभासदांच्या गुप्त सभा होत असत. लो. टिळकांचा या क्रांतीकारकाशी संबंध आल्याचे दिसते. १९०५ च्या वंगभंग आंदोलनात लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली सावरकरांनी अनेक ठिकाणी विदेशी मालाच्या होळ्या केल्या आणि स्वेदशीचा जोरदार पुरस्कार केला. अभिनव भारतच्या मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक इत्यादी ठिकाणी ३९ शाखा होत्या.

पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांनी शिष्यवृत्ती दिल्यामुळे स्वा. सावरकर १९०६ साली बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला गेले. तेथे शामजी कृष्ण वर्मा यांनी स्थापन केलेले इंडिया हाऊस भारतीय तरुण क्रांतीकारकांचे केंद्र बनले होते सावरकरांनी येथील मादाम कामा, पांडुरंग बापट, मदनलाल धिंग्रा, लाला हरदयाळ, रविशंकर शुक्ल, ग्यानचंद वर्मा इत्यादीशी संबंध जोडून इंडिया हाऊस मध्ये अभिनव भारत संघटनेची शाखा उघडली, सावरकरांनी इंग्लडमध्ये राहूनही आपले क्रांतीकार्य चालूच ठेवले होते.

१९०६ मध्ये सावरकरांनी इटालियन स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी यांच्यावर पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. त्यातून भारतीय तरुणांना स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. तसेच त्यांनी ८ मे १९०८ रोजी इंडिया हाऊस मध्ये 'भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध' या नावाने १८५७ च्या उठावाला पन्नास वर्षे झाली म्हणून महोत्सव साजरा केला व '१८५७ चे स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ लिहून '१८५७ चा उठाव हे शिपायांचे बंड नसून ते भारतीयांचे' पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते, असे ठामपणे सांगितले. त्यामुळे युवकांत एक नवी प्रेरणा निर्माण झाली.

स्वा. सावरकर हे लंडनला गेल्यानंतर महाराष्ट्रात अभिनव भारत संघटनेचे कार्य त्यांचे बंधु गणेश सावरकर पहात होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लंडनमध्ये गुप्तपणे आपले कार्य चालविले होते. पांडुरंग महादेव बापट व हेमचंद्र दास यांना बॉम्ब तयार करण्याचे शिक्षण घेण्यासाठी पॅरिसला पाठवले. ते शिकून आल्यानंतर स्वा. सावरकरांनी काही पिस्तुले, काडतुसे बॉम्ब बनविण्याची माहिती असलेली पुस्तिका इत्यादी घेऊन बापट व दास यांना भारतात रवाना केले. स्वा. सावरकरांच्या या क्रांतीकारी कार्याचा संशय ब्रिटिशांना आल्याने त्यांनी इंडिया हाऊसवर व नाशिक येथील गणेश सावरकर यांच्या हालचालीवर लक्ष ठेवले. त्यावेळी सावरकरांच्या घरी ब्रिटिशविरोधी पत्रके सापडल्याने गणेश सावरकर यांना अटक करुन त्यांच्यावर खटला भरला. परीणामी नाशिकचे मॅजिस्ट्रेट जॅक्सन यांने गणेश सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

**कर्झन वायलीचा वध :**

गणेश सावरकरांना जन्मठेप झाली तरी स्वा. सावरकर व इतर क्रांतीकारकांच्या हालचाली थंडावल्या नाहीत. श्यामजी वर्मा यांच्या इंडिया हाऊसशी निगडीत असलेले क्रांतीकारक मदनलाल धिंग्राने १ जुलै १९०९ रोजी इंपीरियल इन्स्टियूटच्या सभेत, पूर्वी भारतात राहिलेला साम्राज्यवादी अधिकारी कर्झन वायलीवर गोळ्या झाडून त्यास ठार केले. स्वा. सावरकरांनी मदनलालच्या कृत्याचे समर्थन केले. ब्रिटिश सरकारने मदनलाल पकडून १७ ऑगस्ट १९०९ रोजी फाशी दिले.

जॅक्सनचा खून (१९०९) गणेश दामोदर सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आल्यानंतर काही दिवसांनी स्वा. विनायक सावरकरांनी लंडनहून गुप्तपणे पाठवलेली २० पिस्तुले नाशिकला येऊन पोहचली. या पिस्तुलाचा पहिला प्रयोग गणेश सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा देणारे नाशिकचे मॅजिस्ट्रेट जॅक्सन यांच्यावर करण्याचा निर्णय अभिनव भारत संघनेच्या सदस्यांनी घेतला. २१ डिसेंबर १९०९ रोजी नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात जॅक्शन 'शारदा' नाटक पाहण्यासाठी आलेला असताना अनंत लक्ष्मण कान्हेरे या १७ वर्षे वयाच्या तरुण क्रांतीकारकाने जॅक्सनवर सात गोळ्या झाडून त्यास ठार केले. ब्रिटिश सरकारने गुन्ह्याचा कसून शोध करून ३८ जणांना संशयित म्हणून अटक करून खटला भरला. हाच प्रसिद्ध 'नाशिक कट' खटला होय. या खटल्यात अनंत लक्ष्मण कान्हेरे, अण्णा कर्वे व विनायक देशपांडे या तिघांना फाशीची शिक्षा झाली. दुसऱ्या तिघांना जन्मठेपेची व एकास तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाली आणि खटला संपुष्टात आला.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जन्मठेप :**

मदनलाल धिंग्राच्या हौतात्म्यानंतर ब्रिटिश सरकारने लंडनमधील इंडिया हाऊसच्या सभसदांवर सूड उगविण्याचे सत्र चालू केले. श्यामजी वर्मा व वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांच्या ब्रिटिश विद्यापीठांच्या पदव्या काढून घेण्यात आल्या. जॅक्शनच्या हत्येचा संबंध स्वा. विनायक सावरकरांशी जोडण्यात येऊन त्यांना नाशिक खटल्यात गोवण्यात आले व मुंबई सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. १३ मार्च १९१० ला त्यांना लंडन येथे व्हिक्टोरिया स्टेशनवर अटक करण्यात आली. तेथून त्यांना बोटीने भारतात घेऊन येत असताना फ्रान्सच्यामरसेलिज बंदराजवळ बोट थांबली असताना त्यांनी बोटीवरून समुद्रात उडी टाकली. फ्रान्सचा किनारा गाठला. तेथे फ्रान्सच्या पोलीसाकडे संरक्षण मागितले. परंतु त्यांना स्वा. सावरकरांचे बोलणे समजले नाही. तेवढ्यात पाठलाग करणाऱ्या ब्रिटिश पोलिसांनी त्यांना पुन्हा कैद केले व कडेकोट बंदोबस्तात मुंबईला आणले. नाशिकच्या स्टेशन कोर्टापुढे त्यांच्यावर खटला चालवून २२ मार्च १९११ रोजी त्यांना ५० वर्षाची जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यावेळी ताठ मानेने स्वा. सावरकर म्हणाले, '५० वर्षे! आजपासून ५० वर्षानी तुमचे राज्य तरी या देशात राहिल काय?' पुढील काळात स्वा. सावरकरांना शिक्षा भोगण्यासाठी अंदमानला पाठविण्यात आले. एका महान क्रांतीकारकाची देशाच्या स्वातंत्र्यासाठी जन्मठेप सुरू झाली. स्वा. सावरकरांच्या शिक्षेनंतर अभिनव भारतचे कार्य काहीसे थंडावले. स्वा. सावरकर १९२४ पर्यंत ते अंदमानच्या तुरूंगात होते. १९३७ मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतर ते हिंदुमहासेभेचे अध्यक्ष झाले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. महाराष्ट्रातील क्रांतीकारी कारवायांचा थोडक्यात आढावा घ्या.

## ८.६ बंगाल मधील क्रांतीकारी चळवळी

बंगालमध्ये क्रांतीकारकांचे कार्य सुरवातीपासूनच सुरू होते. बंगालची फाळणी झाल्यापासून ती रद्द होईपर्यंत झालेल्या चळवळीतून स्वदेशी बहिष्कार चळवळीने जन्म घेतला. या चळवळीची तीव्रता कमी होताच बंगाली तरुणानी दहशतवादी चळवळीचा आश्रय घेऊन ब्रिटिश विरोधी लढा सुरू केला. अरविंद घोष यांचे बंधु विरेंद्रकुमार घोष व स्वामी विवेकानंद यांचे बंधु भूपेंद्रनाथ दत्त हे बंगाली क्रांतीकारकांचे अग्रणी होते.

१९०५ मध्ये विरेंद्र घोषने 'भवानी मंदीर' नावाची पुस्तीका लिहून क्रांतीकारी कार्याचे संघटन करण्याच्या दृष्टीने विस्तृत माहिती दिली त्यानंतर विरेंद्र घोष व भूपेंद्र दत्त यांनी १९०६ मध्ये युगांतर व संध्या या वृत्तपत्रातून ब्रिटीशांना सशस्त्र प्रतिकार करण्याचा प्रचार सुरू केला. व १९०७ मध्ये त्यांनी अनुशीलन समिती या गुप्त क्रांतीकारी संघटनेची स्थापन केली. या संघटनेच्या बंगालमध्ये ५०० शाखा होत्या. १९०७ ते १९१७ या काळात डाक्का अनुशीलन समितीने ११२ ब्रिटिश धार्जिणे धनिकांच्या घरावर छापे घातले. ६४ अधिकाऱ्यांना ठार केले. १२ बाँब हल्ले केले तीन वेळा रेल्वे गाड्या उडविण्याचे प्रयत्न केले. १९०५ मध्ये बंगालचा गव्हर्नर व पू. बंगालचा ले. गव्हर्नर ह्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला.

गव्हर्नर फ्रेझर याला मारण्यासाठी उल्हासकर दत्त याने बनविलेला बॉम्ब त्याच्या गाडीवर टाकण्यात आला परंतु तो वाचला. पुन्हा काही दिवसांनी फ्रेझर रेल्वे गाडीतून चाललेले असताना त्या गाडीवर बॉम्ब टाकण्यात आला. परंतु त्यातूनही तो वाचला.

या काळात अरविंदबाबु घोष यांचे 'वंदे मातरम' व 'बिपीन चंद्र पाल यांचे न्यू इंडिया' या बंगाली वृत्तपत्रांनी बंगालमध्ये क्रांतीची भावना वाढवण्याचा प्रयत्न केला.

**न्यायाधिश किंग्जफोर्डच्या हत्येचा प्रयत्न :**

ब्रिटिश सरकारने बंगालमधील क्रांतीकारी चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. अनेक युवकांच्यावर खटले भरून कडक शिक्षा ठोठावण्यात आल्या. मुझफ्फर जिल्ह्याचे न्यायाधिश किंग्जफोर्ड यांनी युंगातरचे संपादक व नारायणगढ स्टेशनमधील हमालांना कडक शिक्षा ठोठावल्या सुशील सेन या १५ वर्षाच्या मुलाने कोर्टात 'वंदे मातरम्' म्हटले म्हणून त्यासही शिक्षा केली. किंग्ज फोर्डने छोट्या-छोट्या गुन्ह्यासाठी मोठ्या शिक्षा सुनावल्या होत्या. त्यामुळे क्रांतीकारक त्यांच्यावर चिडून होते. प्रफुल्लचंद्र चाकी व खुदी राम बोस यांनी त्यास मारण्याचे ठरविले व ३० एप्रिल १९०८ रोजी रात्री साडे आठ वाजता किंग्जफोर्डच्या गाडीवर बाँब टाकला. परंतु या गाडीत किंग्ज फोर्ड नव्हता. त्यामुळे तो वाचला. परंतु त्या गाडीतील सरकारी वकिल केनेडीची पत्नी व मुलगी ठार झाले. चाकी व बोस यांना पकडण्यात आले. प्रफुल्लचंद्र चाकीने स्वतःवर गोळी चालवून घेतली तर खुदीरामला फाशी देण्यात आले.

**अलिपूर खटला**ः क्रांतीकारकांच्या हालचाली वाढल्यानंतर सरकारनेही त्यांचा शोध घेणे सुरू केले. बेकायदेशीर शस्त्रसाठा शोधून काढण्यासाठी माणिकतोळा उद्यानात व कलकत्ता येथे छापे टाकले. त्यात कागदपत्रे मिळून अनेक क्रांतीकारकांची नावे सरकारला मिळाली. एकंदर ३६ व्यक्तींना पकडण्यात आले. त्यात अरविंद घोष व वीरेंद्र घोष हे बंधुही होते. त्यांच्यावर

खटला भरण्यात आला. हा खटला 'अलिपूर कटाचा खटला' म्हणून प्रसिद्ध आहे. या खटल्यातील नरेंद्र गोस्वामी हा फितूर होऊन सरकारी साक्षीदार बनला. तेव्हा त्यास अन्य क्रांतीकारकांनी ठार केले. फेब्रुवारी १९०९ मध्ये सरकारी वकिलाला ठार मारण्यात आले. २४ फेब्रुवारी १९१० मध्ये न्यायालयातून बाहेर पडताना पोलीस अधिक्षकाला मारण्यात आले. हा खटला जिल्हा न्यायाधिश मि. बीचक्रॉफ्ट यांच्यापुढे चालला. चित्तरंजन दास यांनी अरविंद बाबूचे वकिल म्हणून काम पाहिले. अरविंदबाबूंची निर्दोष मुक्तता झाली. परंतु विरेंद्र घोष व उल्हासकर दत्त यांना फाशीची शिक्षा दिली गेली होती. पण अपिल केल्यावर फाशी रद्द होऊन जन्मठेप झाली. त्यांना अंदमानला पाठविण्यात आले. सरकारने दडपशाही करून बंगाली क्रांतीकारकांचा मोड केला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. अनुशिलन समिती, खुदीराम आणि प्रफुल चाकी यांच्या क्रांतीकारी कारवायांची थोडक्यात चर्चा करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ८.७ पंजाबमधील क्रांतीकारी चळवळी

महाराष्ट्र, बंगालप्रमाणेच पंजाब प्रांतातही क्रांतीकारी चळवळीचा प्रसार झाला होता. १९०४ मध्ये पंजाब प्रांतात सहारनपूर गुप्त क्रांतीकारी संघटना स्थापन झाली होती. या संघटनेत काही काळाने लाला हरदयाळ, अजितसिंग, अंबाप्रसाद हे क्रांतीकारक सामील झाले होते.

पंजाब सरकारने चिनाव व बारी दुआब कालव्याच्या परिसरात भूमिकर वाढवावा अशी सूचना केली होती. त्याविरूद्ध जनतेत असंतोष निर्माण झाला होता. लाला लजपतराय व सरदार अजितसिंग यांनी ब्रिटिश सरकार विरूद्ध चळवळ सुरू केली होती. सरकारने या नेत्यांना पकडून १८१८ च्या नियम ३ अन्वेय निर्वासित केले. लालचंद फलक व भाई परमानंद यांनाही कारावास सोसावा लागला. लाला हरदयाळ अमेरिकेला गेले व अजितसिंह इराणला गेले.

**क्रांतीकारी रासबिहारी घोस :**

लाला हरदयाळ अमेरिकेला गेल्यानंतर पंजाबच्या चळवळीची जबाबदारी रासबिहारी घोष यांनी स्वीकारली. १९१२ साली ब्रिटिश सरकारने आपली राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला नेली. ग. ज. हार्डिंग्जने हत्तीवरून मिरवणूकीने दिल्लीत प्रवेश करताना चांदनी चौकात त्यांच्यावर रासबिहारी घोष यांनी बॉम्ब टाकला. या हल्ल्यात ग. ज. हार्डिंग वाचले. परंतु ए. डी. सी. ठार झाला. सरकारने रासबिहारी यांना पकडण्यासाठी ७५०० रू. जाहीर केले. परंतु ते सापडले नाहीत. या कटात सामील असल्याचा आरोप करून मास्टर अमीरचंद्र, औधबिहारी,बालमुकुंद, आणि वसंतकुमार यांना फाशी दिले.

१९१५ साली रासबिहारी घोष यांनी ब्रिटिश सरकारविरूद्ध एकाचवेळी उठाव करण्याचे ठरविले. परंतु या उठावातील सदस्य किरपाळसिंग याने फितुर होऊन सरकारला माहिती पुरवली. त्यामुळे ब्रिटिश सरकारने विष्णु पिंगळे, उधमसिंग, मानसिंग, भाई परमानंद बागी, कतरिसिंग जगतासिंग यांना पकडून फाशी दिले. रासबिहारी मात्र निसटले व जपानला निघून गेले. तेथे त्यांनी पुढे 'इंडियन नॅशनल आर्मी' ची स्थापना करून त्याचे प्रमुख पद सुभाषचंद्र बोस यांच्याकडे दिले. पुढे १९४५ मध्ये रासबिहारीचा मृत्यु झाला.

**गदर चळवळ :**

लाला हरदयाळ हे पंजाबमधील महान क्रांतीकारक होते ते १९१३ मध्ये अमेरिकेत गेल्यानंतर त्यांनी विरेंद्रनाथ चटोपाध्याय, बर्कतुल्ला इत्यादीच्या मदतीने सॅनफ्रॅन्सिस्को (अमेरिका) शहरात गदर पक्षाची स्थापना केली. त्याच्या अनेक देशात शाखा होत्या. लाला हरदयाळ व गदर पक्षाने भारतात इंग्रजांच्या विरोधात क्रांती करून भारत स्वतंत्र्य करण्याची योजना आखली होती. परंतु इंग्रज सरकारने अमेरिकन सरकारवर दबाव आणून लाला हरदयाळ यांना अमेरिका सोडणे भाग पडले. तेथून ते जर्मनीस आले बर्लिनमध्ये त्यांनी 'भारत स्वातंत्र्य समिती' स्थापन केली. त्यांच्या विचाराने शेकडो तरुण भारावले होते. त्यात शीख युवकांचा भरणा होता. परदेशातील भारतीयांनी भारत स्वतंत्र्य करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांना वाटे. पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिश सरकारच्या अडचणीचा फायदा घेण्याचे ठरवून विविध मार्गानी तीन हजार क्रांतीकारक भारतात आले. परंतु या कटाची माहिती सरकारला समजली. त्यामुळे ब्रिटिश सरकारने १८९ शीख क्रांतीकारकांना तुरूंगात टाकले. ७०० लोकांना राहत्या गांवी स्थानबद्ध केले व गदर पक्षाविरूद्ध आक्रमक भूमिका घेऊन ही चळवळ दडपून टाकली

ब्रिटिशांची सत्ता उलथून टाकण्यासाठी सर्व देशभर लहान-मोठे गुप्त क्रांतीकारी संघटना व गट काम करीत होते. लॉर्ड कर्झनच्या काळात तर कटांचा सुळसुळात झाला होता. अशा शेकडो क्रांतीकारी तरुणांनी क्रांतीकारी चळवळीत सहभाग घेतला होता. ह्यांची नावे पडद्याआड राहून गेली. १९२० पर्यंत म्हणजे लो. टिळकांच्या मृत्युपर्यंत या चळवळीचा एक टप्पा संपतो. क्रांतीकारी चळवळीचा दुसरा टप्पा १९२० नंतर व असहकार चळवळीच्या अपयशानंतर सुरू होतो.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. रासबिहारी घोष आणि लाला हरदयाल यांच्या क्रंतीकारी कार्याची थोडक्यात माहीती सांगा

## ८.८ क्रांतीकारी चळवळी -दुसरे पर्व

लो. टिळक यांचा सन १९२० मध्ये मृत्यु झाला व भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधी कडे आले. त्यांनी १९२० ते १९४७ या कालखंडात या चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिशाविरोधी लढा देताना सत्य, अहिंसा व सत्याग्रह या मार्गाचा अवलंब केला. ब्रिटिश साम्राज्यशाही विरूद्ध दिलेला तो एक अभूतपूर्व असा लढा होता. परंतु म. गांधीजीचा हा अहिंसक व सत्याग्रहाचा मार्ग अनेक उत्साही व जहाल युवकांना मान्य नव्हता. त्यांच्यामते सशस्त्र क्रांतीशिवाय ब्रिटिशांची राजवट जाणार नाही. रशिया, चीन, आयर्लंड, तुर्कस्थान, इजिप्त इत्यादी देशातील क्रांतीकारी चळवळीने हा तरुण वर्ग भारलेला होता. त्यांनी यापूर्वी स्थापन झालेल्या परंतु कार्य थंडावलेल्या 'युगांतर व अनुशीलन समिती' इत्यादी क्रांतीकारी संघटनाचे पुनरूज्जीवन केले. तसेच म. गांधीजीनी असहकार चळवळ स्थगित केल्यानंतर काँग्रेसमधील अनेक तरुण कार्यकर्ते नाराज होऊन त्यांनी क्रांतीकारी संघटना स्थापन केल्या. पंजाब, दिल्ली, बंगाल, उत्तरप्रदेश हे प्रांत नव्या क्रांतीकारी संघटनांची केंद्रे बनली. योगेशचंद्र चटर्जी, सूर्यसेन, भगतसिंग, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, शिववर्मा, भगवतीचरण व्होरा, जयदेव कपूर आणि जतीनदास इत्यादींचा या क्रांतीकारकामध्ये समावेश होता.

### हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लीकन असोसिएशन (HSRA)

महाराष्ट्र, बंगाल प्रमाणेच उत्तर भारतात १९२० नंतर काही क्रांतीकारी संघटना स्थापन झाल्या होत्या. त्यामध्ये हि. सो. रि. असोसिएशन ही महत्त्वाची संघटना होती. तिची स्थापन सचिंद्रनाथ संन्याल, योगेशचंद्र चटर्जी, रामप्रसाद बिस्मील व चंद्रशेखर आझाद यांनी ऑक्टोबर १९२४ मध्ये कानपूर येथे केली.

सशस्त्र क्रांतीद्वारे हिंदुस्थानातील ब्रिटिश सरकार घालवणे व संघ राज्यात्मक प्रजासत्ताक स्थापन करणे हे एक चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट होते. या संघटनेचे अनेक विभाग सुरू करून चळवळीचे कार्य सुरू झाले होते. रामप्रसाद बिस्मिल यांनी संघटनेच्या कामासाठी सरकारी खजिन्यावर दरोडे घालून पैसा गोळा करावा अशी कल्पना सुचवली होती. त्याचाच एक भाग म्हणून काकोरी दरोडा घालण्यात आला.

### काकोरी दरोडा प्रकरण (ऑगस्ट १९२५)

हिं.सो.रि. असोसिएशनच्या सदस्य क्रांतीकारकांनी सरकारी खजिनावर दरोडे घालण्यास सुरवात केली. त्यामध्ये काकोरी दरोडा प्रकरण ही घटना महत्त्वाची होती. लखनौजवळ असलेल्या काकोरी स्टेशनवर ऑगस्ट १९२५ मध्ये क्रांतीकारकांनी सरकारी खजिना घेऊन जाणारी ८ डाऊन ट्रेन लुटली. ही रक्कम बरीच मोठी होती. या घटनेने ब्रिटिश शासनही हादरले. सरकारने या ट्रेन दरोड्याचा कसोशिने शोध घेतला. २९ क्रांतीकारकांना पकडण्यात आले. कटकारस्थान व लुटीचा आरोप करून त्यांच्यावर खटले भरण्यात आले. त्यापैकी रामप्रसाद बिस्मील, असफकल्लाखान, रोशनलाल व राजेंद्र लाहिरी यांना फाशीची शिक्षा झाली. चौघांना आजन्म हद्दपार करण्यात आले. तर बाकीच्या क्रांतीकारकांना प्रदीर्घ तुरूंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

काकोरी प्रकरणातील क्रांतीकारकांना कठोर शिक्षा फर्मावून त्यांचा कायमचा बंदोबस्त केल्यामुळे हिं.सो.रि. असोसिएशनचे काम थंडावल्यात जमा झाले यास अपवाद फक्त चंद्रशेखर आझाद यांचा होता. काकोरी प्रकरणातील ते एकमेव क्रांतीकारक ब्रिटिश सरकारच्या हाती लागले नव्हते. त्यांनी पुन्हा तीन वर्षांनी आपल्या सहकाऱ्यांना गोळा करून दिल्लीच्या फिरोजशहा कोटला मैदानावर ९ ऑक्टोबर १९२८ रोजी हिं. सो. रि. असोसिएशन या संघटनेचे पुनरूज्जीवन केले. व ब्रिटिश अधिकाऱ्यांना मारून त्यांच्यात दहशत निर्माण करण्याचे कार्य सुरू केले.

## सॉंडर्सचा खून (डिसेंबर १९२९)

क्रांतीकारकाच्या वाढत्या कारवयामुळे ब्रिटिश सरकारनेही दडपशाहीचे धोरण अवलंबिले, सायमन कमिशन भारतात आले त्यावेळी जनतेने जोरदार निदर्शने केली. त्यावेळी लाहोरचा उच्च पोलिस अधिकारी सॅंडर्सने लाठीमार करण्याचा आदेश दिला होता. त्यात अनेक लोक जखमी व कायमचे जायबंदी झाले होते. याच लाठीमारात लाला लजपतराय जबर - जखमी होऊन त्यातच मरण पावले. त्यामुळे भगतसिंग, चंद्रशेखर आझाद व राजगुरू यांना चीड येऊन त्यांनी सॅंडर्सचा लाहोर रेल्वे स्टेशनवर खून केला व क्रांतीकारक भूमिगत झाले.

ब्रिटीश सरकारने क्रांतीकारकांना पकडण्यासाठी निरपराध जनतेचाही छळ सुरू केला. त्यामुळे भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी ८ एप्रिल १९२९ रोजी सेंट्रल असेंब्लीत सार्वजनिक सुरक्षा विधेयक व व्यापार तंटेविषयक विधेयकावर चर्चा चालू असताना असेंब्ली हॉलमध्ये दोन गावठी बॉम्ब टाकले. व पळून न जाता तेथेच थांबले. त्या दोघानाही अटक करण्यात आली. हिं.सो.रि.असोशिएशनच्या अनेक क्रांतीकारकांना पकडण्यात आले, त्यात सुखदेव व राजगुरू व जतिनदास ही होते. तुरूंगात या राजबंधाचा अनन्वीत छळ करण्यात येत होता. तो छळ थांबवण्यात यावा म्हणून जतीन दास यांनी तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. परंतु सरकारने त्याची काहीही दखल घेतली नाही. त्यामुळे उपोषणाच्या ६४व्या दिवशी १२ सप्टेंबर १९२९ रोजी जतीनदासचा मृत्यु झाला. बाकीच्या क्रांतीकारकाच्यावर खटले भरण्यात येऊन भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. ती शिक्षा २३ मार्च १९३१ रोजी अमलात आली. इतर अनेक क्रांतीकारकांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. आपल्या हौतात्म्यामुळे हे क्रांतीकारक भारताच्या इतिहासात अमर झाले. याच खटल्यातील चंद्रशेखर आझाद मात्र ब्रिटिश सरकारला सापडले नव्हते.

**चंद्रशेखर आझादचे बलिदान :** काकोरी केस व लाहोर केस या दोन्ही केस मध्ये चंद्रशेखर आरोपी होते. ते भूमिगत राहून आपले क्रांतीकार्य करीतच होते. ब्रिटिश सरकारने त्यांना फरारी म्हणून घोषित केले होते. १९२० पासून त्यांनी अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हत्तेचे कट रचले होते. लाहोर केसचा बदला घेण्यासाठी म्हणून त्यांनी व्हॉईस रॉयच्या खुनाचा कटही केला होता. परंतु २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद येथे पोलीसाशी झालेल्या चकमकीत चंद्रशेखर आझाद ठार झाले. त्यांच्या बलिदानानंतर उत्तर भारतातील हिं.सो.रि. असोसिएशनचे कार्य बंद पडले.

बंगाल प्रांत क्रांती विरांची जन्मभूमी ठरलेला होता. या ठिकाणी 'अनुशीलन समिती व युगांतर' या संघटना पुन्हा कार्यान्वीत झाल्या होत्या. हेमचंद्र घोष व लीला नाग यांची 'बंगाल व्हॉलंटिअर्स आणि अमिल रॉय यांची' 'श्री संघ' या संघटना उदयास आणल्या होत्या.

त्याचप्रमाणे इतरही अनेक लहान मोठ्या संघटना अस्तीत्वात आल्या होत्या. सूर्यसेन यांनी 'इंडियन रिपब्लिकन आर्मी' या संघटनेची स्थापना करून १९ एप्रिल १९३० रोजी ब्रिटिश सरकार विरूद्ध युद्ध घोषीत केले होते त्यांनी चित्तगावच्या शस्त्र गारावर हल्ला केला व स्वतःच 'हिंदुस्थानचे सरकार' स्थापन केले व त्यांनी ब्रिटिश सरकार विरूद्ध लढा चालू ठेवला. परंतु एका मित्राच्या फितुरीमुळे पकडले गेले ते त्यांना फेब्रुवारी १९३३ मध्ये फाशी देण्यात आले. १९३२ मध्ये बिना दास यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी तेथे आलेल्या गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या. प्रीतीलता वड्डेदार या तरुणीने चित्तगांव मधील रेल्वे इन्स्टिटट्यूटवर हल्ला केला. व स्वतः सापडू नये म्हणून स्वतःवरही गोळी झाडून आत्महत्या केली. कोमीलाच्या डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटला दोन युवतीनी ठार केले होते. अशा प्रकारे बंगालच्या क्रांतीकारी कारवाया मध्ये महिलाही सहभागी झाल्या होत्या. सुर्यसेन यांच्या फाशीनंतर बंगाल मधील क्रांतीकारकांच्या दहशतवादी चळवळीस विराम मिळाला व दुसऱ्या टप्प्यातील क्रांतीकारी चळवळींचा शेवट झाला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. क्रांतीकारी राष्ट्रवाद्यांच्या १९२० नंतरच्या कार्याची थोडक्यात चर्चा करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ८.९ सारांश क्रांतीकारी चळवळीचे मूल्यमापन

भारतात ज्या क्रांतीकारक चळवळी घडून आल्या त्यात भाग घेणाऱ्या क्रांतीकारकांचे राष्ट्रप्रेम, त्याग, निष्ठा व आत्मसमर्पण करण्याची वृत्ती यास भारतीय इतिहासात तोड नाही. या क्रांतीकारी चळवळीचे मूल्यमापन करताना डॉ. अमलेश त्रिपाठी म्हणतात की क्रांतीकारकांनी भारताच्या स्वातंत्र्योतिहासाचे एक रंगतदार व स्फुर्दीदायक प्रकरण घडविले आहे. त्यांच्या योजनातील व कृत्यातील निकराई, धाडस, अविचलीतपणा व मृत्युविषयी बेपर्वाई या गुणांनी त्यांना देशाच्या स्मृतीत अढळ स्थान मिळवून दिले आहे.

क्रांतीकारकांचा सनदशीर मार्गावर अजिबात विश्वास नव्हता म्हणून त्यांनी हिंसक मार्गाचा अवलंब केला होता. या क्रांतीकारकांनी सत्तेला त्रस्त केले. परंतु त्यांच्या चळवळीला यश आले नाही. ही चळवळ व्यापक प्रमाणात वाढली नाही तर अतिजहाल युवकापुरती मर्यादीत राहिली. मध्यम वर्गियांनी व सामान्य जनानी त्यात भाग घेतला नाही. त्यामुळे सरकारला ही चळवळ चिरडून टाकणे शक्य झाले.

दुसरे म्हणजे या क्रांतीकारकाजवळ सूत्रबद्ध व व्यापक स्वरूपाच्या आंदोलनाची योजना नव्हती. सर्वांना बरोबर घेऊन जाईल असे केंद्रवर्ती नेतृत्वही त्यांना मिळाले नाही. त्यामुळे काही क्रांतीकारकांना ब्रिटिश सरकारने कठोर शिक्षा केल्यानंतर या चळवळी क्षीण

झाल्या व चळवळीत सुसुत्रता राहिली नाही. ब्रिटिश सरकारने कठोर कायदे करून, कुणाला फाशी तर काहींना हद्दपार, तर काहींना 'काळेपाणी-जन्मठेप' यासारख्या कठोर शिक्षा करून ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यात काही वेळा सरकारला यश आले. परंतु स्वातंत्र्याने भारवलेले क्रांतीकारक हे पूर्णपणे कधीच नष्ट झाले नाहीत. त्यांनी पुन्हा पुन्हां मातृभूमीला स्वातंत्र्य करण्यासाठी आपले बलिदान दिले.

## ८.१०. प्रकरणावरील प्रश्न

**अ)**

१. महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळीची माहिती सांगा.
२. स्वा. वि. दा. सावरकर यांच्या कार्याची माहिती द्या.
३. बंगाल मधील क्रांतीकारी दहशतवादी चळवळीची माहिती सांगा.
४. पंजाब मधील क्रांतीकारी चळवळीची माहिती द्या.
५. १९२० नंतरच्या क्रांतीकारी चळवळींचा थोडक्यात आढावा घ्या.

**ब)**

१. अभिनव भारत.
२. रासबिहारी घोस.

❖❖❖❖

# १

# साम्प्रदायिकतेचा उदय

**अनुक्रमणिका**


९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ ऑल इंडियन मुस्लिम लीग

९.२.१ मुस्लिम साम्प्रदायिकतेचा उदय

१. ब्रिटिश सत्तेचा उदय-मुस्लिम

२. वहाबी चळवळ

३. मुस्लिम समाजातील जागृती

४. १८९२चा कायदा

५. सिमला शिष्टमंडळ

६. मुस्लिम लीगची स्थापना

**९.२.२ मुस्लिम लीग - कॉँग्रेस संबंध**

१. १९१६ चा लखनौ करार

२. मुस्लिम लीगचा फुटीरतावाद

३. बॅ. जीना यांच्या १४ मागण्या

४. १९३०-४२ या काळातील मुस्लिम लिग

५. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत - मुस्लिम लीग

**९.२.३ मुस्लिम लीगची पाकिस्तानच्या निर्मितीकडे वाटचाल**

९.३ हिंदू महासभा

१. हिंदू महासभेच्या स्थापनेचा उद्देश

२. हिंदू महासभेची वाटचाल

३. स्वातंत्र्यवीर सावरकर - हिंदू महासभा

४. कॉँग्रेस - मुस्लिम लीग आणि हिंदू महासभा

५. हिंदू महासभा - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**९.४ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

९.४.१ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार

९.४.२ संघ स्थापनेचा हेतू, प्रतिज्ञा, कार्यपद्धती

९.४.३ संघ आणि क्रांतीकारक

९.४.४ संघ आणि काँग्रेस

१. काँग्रेस मधील प्रमुख नेते

२. लाहोर अधिवेशन - संघाचा स्वातंत्र्य दिन

३. सविनय कायदेभंग - संघ

४. १९४२ चे आंदोलन - संघ

९.४.५ ब्रिटिश गुप्तहेर खात्याचा अहवाल - संघ

९.४.६ आझाद हिंदसेना - संघ

९.४.७ भारताची फाळणी - संघ

९.४.८ निर्वासित - संघ

९.४.९ मुस्लिम लिगची कारस्थाने - संघ

९.४.१० संस्थानाचे विलिनिकरण आणि संघ

१. जम्मू काश्मीर

२. हैद्राबाद

९.४.११ म. गांधीजीची हत्या - संघ

९.५ सारांश

९.६ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न

## ९.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर -

- भारतातील साम्प्रदायिकतेच्या उदयाची कारणे सांगता येतात.
- मुस्लीम लीगची स्थापना केव्हा व कशी झाली हे सांगता येते.
- मुस्लीम लीगची वाटचाल व भारताची फाळणी या विषयी माहिती सांगता येते.
- हिंदू महासभेची स्थापना उद्देश, वाटचाल व योगदान स्पष्ट करता येते.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना, उद्देश व कार्यपद्धती सांगता येते.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय राजकरण याविषयी माहिती सांगता येते.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान स्पष्ट करता येते.

## ९.१ प्रास्ताविक

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात मुस्लीम साम्प्रदायिकतेचा उदय ही भारतीय इतिहासातील दूरगामी परीणाम घडवून आणणारी घटना होय. भारतावर आठव्या शतकापासून मुस्लिम आक्रमणे होत राहिली आणि मध्ययुगीन कालखंडात तर ते या देशाचे राज्यकर्ते बनले. मुस्लिम राजवटीनंतर ब्रिटिशांचे राज्य स्थिर झाले. परंतु ब्रिटिश सत्ता जसजशी स्थिर होऊ लागली. तसतसा भारतीयांचा त्यांना अधिकाधिक विरोध होऊ लागला. त्यातूनच १८८५ मध्ये

राष्ट्रीय काँग्रेस या अखिल भारतीय संघटनेची स्थापना झाली. सर्वभारतीयांचे, जाती-पंथाचे प्रतिनीधित्व करणारी संघटना असे तिचे स्वरूप होते. म्हणूनच या मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सर्वच सहभागी होतील अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणे सुरूवातीला घडले ही हिंदू आणि मुस्लिम यांचे सुरूवातीचे परस्पर संबंध मित्रत्वाचे होते. दोन्ही जमाती राष्ट्रीय सभेला आपलीमानत असत अशाच स्थितीत सर सय्यद अहमदखान यांच्यासारखे मुस्लिम पुढारी 'राष्ट्रीय सभा म्हणजे हिंदूंची संघटना आहे', म्हणून मुसलमानांनी त्यात सहभागी होऊ नये, असे मत मांडू लागले तरीही सभेच्या प्रारंभीच्या अधिवेशनांना सर बद्रुद्दीन तय्यबजी आणि इतर मुस्लिम हजर राहू लागले मात्र हळूहळू परिस्थिती बदलत गेली. ब्रिटिशांनीही 'फोडा व राज्य करा' या तंत्राचा वापर सुरू केला. राष्ट्रीय आंदोलनात हिंदू व मुसलमानात होत असलले ऐक्य मोडून काढण्यासाठी ब्रिटिशांनी कूट नीतीचा अवलंब केला. त्यांनी बंगाल प्रांताची फाळणी करून मुस्लिम बहुसंख्य असा नवीन पूर्व बंगाल प्रांत अस्तित्वात आणला. शिवाय मुस्लिमांना असे आश्वासन दिले की, मुसलमान राष्ट्रीय सभेपासून दूर राहिले व ब्रिटिशांना साथ दिली तर त्यांना फायदे अनेक मिळत राहतील याच पार्श्वभूमीवर मुस्लिमांनी 'मुस्लिम लीग' हा आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केला. या पक्षाला प्रतिउत्तर देण्यासाठी भारतीय हिंदूंनी हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यासारख्या हिंदुत्ववादी संघटना स्थापन केल्या परंतु मुस्लिम लीगच्या रेट्यापुढे त्या निष्प्रभ ठरल्या. कारण मुस्लिम लीगने मुस्लिमांसाठी पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती घडवुन आणली.

## १.२ ऑल इंडियन मुस्लिम लिग

### मुस्लिम साम्प्रदायिकतेचा उदय

इंग्रजसत्तेपूर्वी भारताय मुसलमानांचे शासन होते. त्यांच्या हातून ब्रिटिशांनी सत्ता काढून घेतली. याचे मनस्वी दुःख मुसलमांना वाटत होते. १८५७च्या उठावात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात सहभागी असल्यामुळे ब्रिटिशांनी मुस्लिमांशी अतिशय कठोर व्यवहार केला. १८५२ ते १८६२ या दशकात उच्च न्यायालयातील मान्यता प्राप्त २४० वकिलांपैकी फक्त एक मुस्लिम होता. त्यामुळे मुसलमानांच्या मनातही ब्रिटिशांविरोधी जबरदस्त असंतोष खदखदत होता. त्यांनी इंग्रजी शिक्षणाकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले. परिणामी सरकारी नोकरीत हिंदूच्या तुलनेत मुस्लिमांची संख्या बरीच कमी झाली. १८७१ मध्ये बंगाल प्रांतात नियुक्त झालेल्या २१४१ कर्मचाऱ्यांपैकी १३३८ युरोपियन, ७११ हिंदू व फक्त ९२ मुसलमान होते. साहजिकच एकेकाळी हिंदूस्तानच्या सत्तेचे वैभव उपभोगलेल्या मुसलमांमध्ये यामुळे वैषम्य निर्माण झाले व त्याचाच परिणाम म्हणून ब्रिटिशांबद्दल त्यांच्यात मुस्लीम साम्प्रदायिकतेस कारणीभूत झालेले खालील प्रमाणे होते त्यांच्यात असंतोष निर्माण झाला.

### २. वहाबी आंदोलन :

१८५७च्या उठावात बहादूरशहा जफरला पुन्हा सम्राट बनविण्याचा प्रयत्न झाल्याने मुसलमानांबद्दल इंग्रजांच्या मनात कटू भावना निर्माण झाली होती. वहाबी आंदोलनाने ती अधिकच तीव्र बनली. मुळ अरबस्थानात स्थापन झालेल्या वहाबी पंथाचा भारतातील उद्देश धर्मसुधारणेचा होता. त्यात बदल होऊन मुस्लिम सत्तेची पुनर्स्थापना करणे, गतवैभव प्राप्त करणे असे उद्दिष्ट बनले. आपल्या विरूद्धचे हे वहाबी आंदोलन ब्रिटिशांनी दडपून टाकले असले तरी त्यातून मुसलमांनाच्या ब्रिटिश सत्तेबद्दलच्या कटुतेच्या भावना दृष्टोत्पत्तीस आल्या होत्या.

### ३. मुस्लिम समाजातील जागृती व अलिगढ चळवळ :

यानंतर मात्र मुस्लिम समाजामध्ये जागृती होऊ लागली. काही मुस्लिम नेते पाश्चिमात्य शिक्षणाचा पुरस्कार करू लागले. त्यामधूनच कलकत्त्याच्या मदरसात इंग्रजी भाषा शिकवली जाऊ लागली. परंतु खऱ्या अर्थाने मुस्लिम समाजातील लोकांना जागृत करण्याचे काम सर सय्यद अहमदखान यांनी केले. स्वतः सर सय्यद अहमदखान यांचे सुरूवातीचे विचार फार वेगळे होते हिंदू व मुस्लिम म्हणजे सुंदर अशा भारतवधुचे नेत्र आहेत. हिंदू व मुस्लिम एक हृदय, एक आत्मा व्हावेत असे मत ते व्यक्त करीत होते. परंतु अलिगढच्या मुस्लिम - ॲग्लो आरिएंटल कॉलेजचे प्राचार्य थिओडर बेक यांच्या विचारांचा प्रभाव पडून सय्यद अहमदखानांचे मतपरिवर्तन झपाट्याने झाले.

भारताला प्रतिनिधीक संस्था देण्याबाबतचे विधेयक १८८९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंट मध्ये आले त्यावेळी त्याविरूद्ध बेक यांनी मुस्लिमांना संघटीत केले. देशाची सत्ता इंग्रजांकडून हिंदूंकडे हस्तांतरीत करणे हा राष्ट्रीय सभेचा उद्देश आहे म्हणून ब्रिटिशांनी व मुस्लिमांनी एकत्र येणे आवश्यक आहे असे विचार बेक मांडत असत. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पडून सर सय्यद अहमदखानने 'राष्ट्रीय सभा ही हिंदू संघटना आहे आणि म्हणून मुस्लिमांनी त्यापासून दूर रहावे असे जाहीर केले. ' हिंदू व मुस्लिम दोघेही राज्यकारभारासाठी लायक नाहीत, असे सर सय्यद अहमदखान यांचे विचार होते. इंग्लंडला जाऊन आल्यावरच त्यांच्यावर पाश्चात्य संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेचा पगडा बसला. म्हणूनच इंग्रजी शिक्षणामुळे मुसलमानांचे मागासलेपण जाईल असे ते म्हणत. इंग्रजी शिक्षणापासून दूर राहिल्यानेच अनेक क्षेत्रात मुसलमान हिंदूंच्या मागे राहिलेत. म्हणूनच मुसलमानांमध्ये इंग्रजीचा, पाश्चात्य संस्कृतीचा, ज्ञानाचा प्रसार व्हावा या उद्देशाने सय्यद अहमदखान यांनी कार्य केले त्यांचे हे कार्य अलिगढ चळवळ म्हणून ओळखले जाते. अलिगढ येथील मुस्लिम विद्यापीठ यातूनच निर्माण झाले.

### ४. १८९२ चा कायदा :

राष्ट्रीय सभेच्या काही मागण्या पूर्ण करण्यासाठी ब्रिटिश शासनाने १८९२चा कायदा करण्याचे जाहीर करताच मुस्लिमांमध्ये खळबळ उडाली. मुसलमानांचीही स्वतंत्र संस्था असावी या कल्पनेचे बीज याचकाळात पेरले गेले. १८९३ मध्ये 'मॉहमेडन ॲग्लो ओरिएंटल डिफेन्स असोसिएशन' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. त्यामागे सर सय्यद अहमदखानांचे प्रयत्न होते. तसेच ब्रिटिशांचे पाठबळही होते. परिणामी हिंदू व मुस्लिमांमधील अंतर वाढण्यास सुरूवात झाली. याच सुमारास लो. टिळकांनी गणेश उत्सव व शिवजयंती उत्सव सुरू केले. आर्य समाजाच्या शुद्धीकरण आंदोलनानेही यावेळी चांगलाच जोर धरला होता.

### ५. सिमला शिष्ट मंडळ (१९०६)

१८९६ च्या सुमारास मुसलमानांच्या असोसिएशनने मागणी केली की, मुस्लिमांसाठी विभक्त मतदारसंघ असावेत. या मागणीच्या पुर्ततेसाठी राजकीय क्षेत्रात मुस्लिमांची वेगळी संस्था असावी हा विचार जोर धरू लागला. विशेषतः लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी करून मुस्लिम बहुसंख्य असा नवीन पूर्व बंगाल प्रांत निर्माण केल्याने इंग्रज आपल्या पाठीशी आहेत असे कळल्याने वरील विचार प्रत्यक्षात येण्यास अनुकूलता निर्माण झाली. एक नवी सुधारणा कायदा येऊ घातला होता. त्यावर मुस्लिमांनी आपले लक्ष केंद्रित केले त्यांनी व्हाईसरॉय लॉर्ड

मिंटो यांची भेट मागितली. त्यानुसार १ ऑक्टो. १९०६ रोजी ३६ सदस्यीय मुस्लिम शिष्टमंडळ प्रिन्स आगाखान यांच्या नेतृत्वाखाली व्हाईसरॉय मिंटो यांना सिमला येथे भेटले. या शिष्ट मंडळाने मुस्लिमांसाठी विभक्त मतदारसंघाची मागणी केली. व्हाईसरॉय मिंटो यांनी या मागणीचे स्वागत केले. व त्याबद्दल सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासन दिले.

### ६. मुस्लिम लीगची स्थापना (१९०६)

खरे तर वरील घटना अत्यंत महत्त्वाची होती या घटनेचे महत्त्व जितके ब्रिटिशांच्या लक्षात आले. तितके राष्ट्रीय सभेच्या लक्षात आले नाही. व्हॉईसरॉय लॉर्ड मिंटो आणि भारतमंत्री मोर्ले यांनी मुस्लिमांची मागणी उचलून धरली. कारण त्यात हिंदू व मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याचा दारूगोळा ठासून भरला होता. मात्र या सर्व घटनाक्रमातून स्वतंत्र संस्थेची कल्पना मुस्लिमांना एकदम पटली राजकीय क्षेत्रातील अशी स्वतंत्र संस्था मुसलमानांच्या हितसंबंधाची जोपासना करील याबद्दल त्यांना विश्वास होता. त्यादृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले ते १९०६ मध्ये पूर्व बंगाल प्रांताची राजधानी ढाक्का येथे मुस्लिम नेत्यांची बैठक भरली. त्यात मुसलमानांचा स्वतंत्र राजकीय पक्ष असावा अशी कल्पना ढाक्क्याचे नवाब सलीमुल्ला यांनी मांडला या ठरावास अकिम अजमलखान यांनी पाठिंबा दिला. ३० डिसेंबर १९०६ रोजी मुस्लिम लीगची स्थापना झाली. ब्रिटिश सरकारबद्दल निष्ठा व्यक्त करून मुस्लिम लीगने मुसलमानांच्या हिताची जोपासना करण्याचे आपले उद्दिष्ट जाहीर केले. राष्ट्रवादी वृत्तपत्रांनी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही पण भारतातील ब्रिटिश धार्जिण्या अशा ॲग्लो-इंडियन वृत्तपत्रांनी मात्र या घटनेचे स्वागत करून 'मुस्लिम लीग म्हणजे लोकप्रिय बनत चाललेल्या राष्ट्रीय सभेवरील उतारा होय.' असे मत व्यक्त केले.

## १.२.२ मुस्लिम लीग आणि काँग्रेसचे संबंध

मुस्लिम समाजाचे हितसंबंधाच्या रक्षणासाठी मुस्लिम लीग या संघटनेची स्थापना केली होती. त्यामुळे राष्ट्रीय सभेला एक प्रतिस्पर्धी निर्माण झाला होता. राष्ट्रीय आंदोलनात फूट पडली हे सर्व खरे असले तरी मुस्लिम लीग व राष्ट्रीय सभा यांचे संबंध एकदम तणावपूर्ण झाले असे म्हणता येत नाही. उलट देशातील व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील बदलत्या राजकारणामुळे लीग व राष्ट्रीय सभा यांच्यात परस्परसामंजस्य निर्माण झाल्याचे आढळून येते. मुस्लिम लीगच्या स्थापनेनंतर १९०७ मधील सुरत येथील राष्ट्रीय सभेचे अधिवेशन ऐतिहासिक ठरले. त्यात नेमस्त आणि जहाल यांच्यात फूट पडली जहालांना जवळ जवळ राष्ट्रीय सभेबाहेर काढण्यात आले. मात्र त्यांनी आपले आंदोलनात्मक कार्य नेटाने सुरू ठेवले. याच काळात लो. टिळक व इतरही जहाल पुढारी तुरूंगात गेल्याने जहालांच्या प्रचारकार्याला तेवढी धार राहिली नाही उलट नेमस्तांचा राष्ट्रीय सभेवर ताबा होता. त्यांनी आपले लक्ष येऊ घातलेल्या सुधारणा कायद्यावर केंद्रित केले. १९०८ च्या अलाहाबादच्या खास अधिवेशनात राष्ट्रीय सभेने साम्राज्यांतर्गत स्वायतत्ता हे ध्येय जाहीर करून स्वदेशी आंदोलन चालविण्याचा निर्णय घेतला.

यानंतर नेमस्तांनी मुस्लिम लीगबरोबर सहकार्याचे प्रयत्न सुरू केले. त्याला यश येऊन १९११च्या जानेवारीत राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींची एक संयुक्त बैठक घेण्यात आली. मात्र या बैठकीतून फारसे काही साध्य होऊ शकले नाही. परंतु याच सुमारास देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे रंग झपाट्याने बदलू लागले. १९११ मध्ये ब्रिटिश सरकारने बंगालची फाळणी रद्द केली. याचवेळी युरोपियन राजकारणात इंग्लंड व तुर्कस्थान

परस्परांचे कट्टर शत्रू बनले. त्यामुळे मुस्लिम लीगचे डोळे उघडू लागले. ब्रिटिशांची एकूण निती घातक आहे आणि त्यावरील उपाय म्हणजे हिंदू - मुस्लिम युती होय ही गोष्ट प्रामुख्याने सुशिक्षित तरुण मुसलमानांना पटू लागली. याच विचारांचा प्रभाव म्हणजे १९१३ मध्ये साम्राज्यांतर्गत स्वायतत्ता हे मुस्लिम लीगचे ध्येय असल्याचे जाहीर करण्यात आले आणि त्यासाठी मुस्लिम लीग इतरांशी सहकार्य करेल असेही घोषित केले गेले याच वर्षी प्रिन्स आगाखान यांनी मुस्लिम लीगच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पुढे लीग राष्ट्रीय सभा संबंधात बदल होऊन आंदोलनात परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण झाले आणि त्याचीच परिणती म्हणजे १९१६ चा प्रसिद्ध लखनौ करार घडुन आला.

**१. १९१६ चा लखनौ करार :**

सन १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. त्यात इंग्लंड व तुर्कस्थान परस्परविरोधी युद्धात उभे राहिले. तुर्कस्थान मुस्लिम राष्ट्र असल्याने व तेथील खलिफा जगातील सर्व मुसलमानांचा प्रमुख धर्मगुरू असल्याने साहजिकच भारतातील मुसलमानांमध्ये ब्रिटिशांविरूद्ध असंतोषाची भावना निर्माण झाली. अबुल कलाम आझाद यांच्या 'अलहिलाल' साप्ताहिकातून तसेच इतरही वर्तमान पत्रांतून ब्रिटिशांवर जबर टिका करण्यात येऊ लागली. यावेळी मुस्लिम लीगची सुत्रे महंमद अली जिना यांच्या हातात आली. १९१४ चे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन मद्रास येथे भरले. अध्यक्ष भुपेंद्रनाथ बसू यांनी हिंदू -मुस्लिम ऐक्याचे आणि युद्धात ब्रिटिशांना सहकार्य देण्याचे आव्हान केले.

हिंदू-मुस्लिम ऐक्य निर्माण होण्याची शक्यता दिसत असतानाच सहा वर्षाच्या कारावासानंतर मंडाले येथून लो. टिळकांची सुटका झाली. १९१४ मध्ये टिळक भारतात परतले. त्यांना पुन्हा राष्ट्रीय सभेत प्रवेश देण्यास नेमस्तांचा विरोध होता. परंतु फेब्रु १९१५ मध्ये गोपाळ कृष्ण गोखले आणि नोव्हेंबर मध्ये फिरोजशहा मेहता मृत्यु पावल्याने नेमस्तांच्या चळवळीची धार बोथट होऊन टिळकांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर नेमस्त आणि जहाल यांच्यात ऐक्य प्रस्तावित झाले. १९१५ च्या मुंबई अधिवेशनात त्या दृष्टिने ॲनी बेझंट यांनी केलेले प्रयत्न महत्त्वपूर्ण व यशस्वी ठरले. राष्ट्रीय सभेत ऐक्याचे वातावरण निर्माण झाल्यावर राष्ट्रीय सभा - लीग ऐक्याच्या दृष्टिने पावले उचलण्यास प्रारंभ झाला. १९१५ साली मुंबई येथे राष्ट्रीय सभा व लीगची अधिवेशने झाली. त्यात राजकिय मागण्यांसाठी एक संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९१६ मध्ये काँग्रेस अधिवेशन लखनौ येथे झाले. त्याचे अध्यक्ष लो.टिळक होते. मुस्लिम लीगनेही लखनौलाच आपले अधिवेशन घेतले आणि बॅ. महंमद अली जीना यांना अध्यक्ष केले. यावेळी राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीगमध्ये ऐतिहासिक असा लखनौ करार होऊन परस्पर ऐक्य प्रस्तापित केले गेले झाले. नुकतेच नेमस्त व जहाल यांच्यात ऐक्य झालेले असतानाच राष्ट्रीय सभा व लीगमध्येही ऐक्य झाल्याने राष्ट्रीय चळवळ पुन्हा एकदा चैतन्यशील बनली. लखनौ करारानुसार लीगने राष्ट्रीय सभेच्या स्वयंशासनाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. तर राष्ट्रीय सभेने लीगची विभक्त मतदार संघाची मागणी मान्य केली. याशिवाय लखनौ करारात उलटपक्षी मान्य केलेल्या प्रमुख तीन गोष्टी पुढीलप्रमाणे होत्या

१) व्हॉईसरॉयच्या कौन्सिलमधील निम्मे सदस्य भारतीय असावेत. केंद्रिय कायदेमंडळात चार/पाच सदस्य निर्वाचित असावेत. त्यापैकी १/३ सदस्य मुसलमानांनी विभक्त

मतदारसंघातून निवडलेले असावेत. हेच प्रमाण प्रांतीय कायदेमंडळात राहावे. प्रांतांना स्वायतत्ता देण्यात यावी.

२) मुसलमानांबाबतचे एखादे विधेयक कायदे मंडळातील ३/४ मुस्लिम सदस्यांना अमान्य असेल तर त्या विधेयकाचा विचार केला जाऊ नये.

३) लोकसंख्येच्या तुलनेत मुस्लिमांना जास्त प्रतिनिधित्व मिळावे. ही लीगची मागणी राष्ट्रीय सभेने मान्य केली. एवढेच नव्हे तर विभिन्न प्रांतातील मुस्लिम प्रतिनिधित्वाचे प्रमाणही निश्चित करण्यात आले उदाहरणार्थ उत्तर प्रदेशात लोकसंख्येत मुस्लिमांचे प्रमाण १४% असले तरी त्यांना ३०% प्रतिनिधित्व देण्याचे ठरले. विभक्त मतदार संघाशिवाय विद्यापीठे व जमीनदारांच्या खास मतदारसंघातून मुसलमानांना निवडणूक लढविता येईल यालाही राष्ट्रीय सभेने मान्यता दिली.

लखनौ कराराचे एकूण स्वरूप पाहता त्यातील मर्म एकदम लक्षात येत नाही. वरवर पाहता राष्ट्रीय सभेने मुस्लिम लीगबरोबर पूर्ण शरणागती पत्करली असे दिसते. विभक्त मतदारसंघाची मागणी मान्य करून तसेच लोकसंख्येपेक्षा जास्त प्रतिनिधित्व मुसलमानांना मिळावे याला पाठिंबा देऊन राष्ट्रीय सभेने मुसलमानांच्या वेगळ्या हितसंबंधांनाच एक प्रकारे मान्यता दिली. परिणामी वेगळेपणाचे मुसलमानांमध्ये भिनलले विष अधिकच पसरले असे मत इतिहासकार डॉ. लाल बहादुर यांनी व्यक्त केले आहे.

### २. मुस्लिम लिगचा फुटीरता वाद :

असहकार आंदोलनाच्या स्थगितीनंतर हिंदू - मुस्लिम यांच्यात जे ऐक्य प्रस्तापित झाले होते ते नष्ट पावले. देशात हिंदू-मुस्लिमांमध्ये जातीय तणाव निर्माण झाला. १९२३ सालच्या अखेरीस एकीकडे मुस्लिमांचे धर्मांतराचे प्रयत्न आणि त्याला प्रतिउत्तर म्हणून दुसरीकडे हिंदुत्ववाद्यांनी सुरू केलेल्या शुद्धी व संघटन या चळवळी असे तणावाचे चित्र निर्माण झाले. १९२३ ते १९२७ या काळात देशात हिंदू - मुस्लिम यांच्यात अनेक ठिकाणी दंगली घडून आल्या. लाहोर येथे या दरम्यान या दंगलीत ४५० लोक मरण पावले तर ५००० लोक जखमी झाले. जातीय तणाव आणि हिंदू-मुस्लिम दंगली यांचा परिणाम म्हणून राष्ट्रीय प्रवृत्तीचे अनेक मुस्लिम नेते साम्प्रदायिक वळणावर गेले १९२५ मध्ये बॅ. जीना व अली बंधू साम्प्रदायिक बनले. दिवसेंदिवस राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातील दुरावा आणखीनच वाढत गेला. १९२३ नंतर मुस्लिम लीगचे नेतृत्व बॅ. जीना यांच्याकडे गेले. त्यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लीगची धोरणे अधिकाधिक प्रतिगामी व संकुचित बनली. १९२७ साली सायमन कमिशनच्या दौऱ्यावर राष्ट्रीय सभेने बहिष्कार टाकला. मुस्लिम लीगमध्ये मात्र या प्रश्नावरून फूट पडली.

### ३. बॅ. जीना यांच्या १४ मागण्या

भारतासाठी घटनेचा सर्वमान्य आराखडा तयार करण्यासाठी १९२८ साली सर्वपक्षीय परिषद घेण्यात आली. त्यात राष्ट्रीय सभेबरोबर मुस्लिम लीगही सामील झाली. सर्वपक्षीय परिषदेने नियुक्त केलेल्या मोतीलाल नेहरू समितीने तयार केलेला घटनेचा आराखडा 'नेहरू रिपोर्ट' या नावाने ओळखला जातो. राष्ट्रीय प्रवृत्तीच्या मुस्लिमांनी नेहरू रिपोर्टला पाठिंबा दिला. परंतु बॅ. जीनांच्या नेतृत्वाखालील गटाने मात्र तो रिपोर्ट नाकारला. बॅ. जीनांनी आपले

१४ मुद्दे पुढे मांडले आणि नेहरू रिपोर्टला संमती देण्यासाठी आपल्या १४ मुद्यांचा स्वीकार करण्याची अट घातली. आपले १४ मुद्दे या मुसलमानांच्या मागण्या आहेत असे त्यांचे मत होते त्या पुढीलप्रमाणे होत्या.

१. भारताची राज्यघटना संघराज्यात्मक असावी.
२. सर्व प्रांतांना स्वायतत्ता द्यावी.
३. प्रांतीय विधीमंडळात अल्पसंख्याकांनाही प्रतिनिधित्व द्यावे.
४. केंद्रिय विधीमंडळात मुस्लिमांचे १/३ प्रतिनिधी असावेत.
५. केंद्रिय व प्रांतात सांप्रदायिकतेवर आधारलेले स्वतंत्र मतदारसंघ असावेत.
६. मुस्लिम बहुसंख्य असलेल्या प्रांतांची पुनर्रचना करू नये.
७. सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य असावे.
८. कोणत्याही समाजाच्या ३/४ लोकांच्या हितसंबंधांना बाधा आणू नये.
९. सिंध हा वेगळा प्रांत म्हणून घोषित करावा.
१०. बलुचिस्थानात अन्य प्रांताप्रमाणेच सुधारणा कराव्यात.
११. सरकारी नोकऱ्यांत मुस्लिमांना राखीव जागा ठेवाव्यात.
१२. प्रत्येक मंत्रीमंडळात किमान ३ मुस्लिम मंत्री असावेत.
१३. मुस्लिम संस्कृती, धर्म, व्यक्तीगत कायदा यांचे संरक्षण करावे.
१४. प्रांतांच्या संमतीशिवाय केंद्रिय कायदेमंडळाने राज्यघटनेत दुरूस्ती करू नये.

बॅ. जीनांच्या या मागण्यांमधून मुस्लिम समाजाचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. राष्ट्रीय सेभेने बॅ. जीनांच्या १४ मागण्यांचा विचार करण्यास नकार दिला. त्यामुळे मुस्लिम लीग राष्ट्रीय सभेपासून दूर गेली.

### ४. १९३० ते १९४२ या काळातील मुस्लिम लीगची वाटचाल :

१९३० साली काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. हा लढा संपूर्ण स्वातंत्र्यासाठी होता. परंतु ही चळवळ सर्व भारतीयांच्या स्वातंत्र्यासाठी नसून अल्पसंख्य मुस्लिमांना बहुसंख्य हिंदूंचे अंकित बनविण्यासाठीच आहे असा कंगावा करून मुस्लिम लीगने या चळवळीस आपला विरोध दर्शविला. त्यामुळे बहुसंख्य मुस्लिम या चळवळीपासून दूर राहिले. आणि इंग्रजांशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्याचे धोरण स्वीकारले. हे आंदोलन चालू असतानाच नोव्हे. १९३० मध्ये पहिली गोलमेज परिषद लंडन येथे घेण्यात आली. काँग्रेसने या परिषदेत भाग न घेता तिच्यावर बहिष्कार टाकला. मात्र मुस्लिम लीगने आपले प्रतिनिधी या परिषदेत पाठविले होते.

स्वतंत्र जातवार मतदारसंघ बहाल करणाऱ्या १९३२ सालच्या निवाड्यास मुस्लिम लीगने मान्यता दिली. १९३२च्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या एकता परिषदेमार्फत जातीय समस्येवर तडजोड करण्यास लीगने नकार दिला.

भारताला दुसऱ्या महायुद्धात ओढण्याच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या निर्णयाचा निषेध म्हणून राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले आणि राष्ट्रीय सभेने ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांशी असहकार पुकारला. मुस्लिम लीगने नेमकी याउलट भूमिका घेतली. राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक मंत्रीमंडळांनी राजीनामे दिल्यानंतर बहुसंख्याकांच्या जुलमी अमलातून मुक्त झाल्याबद्दल २२ डिसेंबर १९३९ हा दिवस 'मुक्ती दिन' म्हणून पाळण्याचा आदेश लीगने

आपल्या अनुयायांना दिला. तसेच मुस्लिमांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या लीगच्या संमतीशिवाय भारताला कोणतीही नवीन घटना दिली जाणार नाही, या अटीवर मुस्लिम लीगने ब्रिटिश राज्यकर्त्यांना युद्धप्रयत्नात सक्रीय सहाय्य करण्याचे कबूल केले.

राष्ट्रीय सभेने ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टॅंक मैदानावर भरलेल्या अधिवेशनात ब्रिटिशांना 'भारत छोडो' असे सांगणारा ठराव बहुमताने संमत केला तर मुस्लिम लीगने त्यास विरोध करणारा पवित्रा घेतला. लीगने ब्रिटिश राज्यकर्त्यांना 'देशाची प्रथम फाळणी करा व निघून जा.' असे सांगणारा ठराव संमत केला.

## ९.४ द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत व मुस्लिम लीग

प्रसिद्ध उर्दू कवि डॉ. महंमद इकबाल हे पाकिस्तानच्या कल्पनेचे जनक मानले जातात. पहिल्या गोलमेज परिषदेवरून प्रतिनिधी परतल्यानंतर १९३१ साली मुस्लिम लीगच्या नेत्यांची अलाहाबाद येथे डॉ. महंमद इकबाल यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. या बैठकीतच त्यांनी सर्वप्रथम पाकिस्तानची कल्पना मांडली. वायव्य भारतात स्वतंत्र राज्य निर्माण करणे हाच भारतातील हिंदू-मुस्लिम पेच प्रसंगावरचा अंतिम तोडगा आहे अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी मांडलेल्या स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राच्या कल्पनेनुसार पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, बलुचिस्तान यांचे एकीकरण करून ब्रिटिश साम्राज्यांतर्गत किंवा साम्राज्याबाहेर स्वतंत्र मुस्लिम राज्य निर्माण करण्याची योजना होती. डॉ. इकबाल यांनी मांडलेल्या कल्पनेतून भारतातील मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्र असावे हा विचार बळावत गेला.

१९३१ साली लंडनमध्ये दुसरी गोलमेज परिषद झाली. त्यात भारताच्या भावी राज्यघटनेचे स्वरूप कसे असावे या मुद्यांवरून हिंदू-मुस्लिम प्रतिनिधींमध्ये मतभेद निर्माण झाले. मुस्लिम प्रतिनिधींनी मुसलमानांसाठी स्वतंत्र राज्याची मागणी केली. तथापि, त्यास हिंदुत्ववादी प्रतिनिधी व म. गांधी यांनी ठाम विरोध केला. हिंदू व मुस्लिम दोघेही भारतीय आहेत तेव्हा त्यांनी अखंड देशात स्वतंत्र मतदारसंघ व खास संरक्षक तरतुदी यांचा आग्रह न धरता एकत्र रहावे असे मत म. गांधी यांनी मांडले दुसऱ्या गोलमेज परिषदेस जमलेल्या प्रतिनिधींना पाकिस्तानच्या निर्मितीची योजना मांडणाऱ्या पत्रकाच्या प्रति देण्यात आल्या. पाकिस्तानच्या कल्पनेने इंग्लडमधील केंब्रिज विद्यापीठात शिकणाऱ्या रहमत अली या तरुण विद्यार्थ्यांच्या मनात प्रथम मुर्त स्वरूप आले, त्यांची पाकिस्तान निर्मितीची योजना मांडणारे पत्रक दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर असेलेल्या प्रतिनिधींना दिले गेले.

वायव्य भारतातील राज्यास रहमत अली यानेच पाकिस्तान हे नाव दिले. पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, काश्मिर, सिंध, बलुचिस्तान यांचे मिळून पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र व्हावे अशी त्याची योजना होती. पाकिस्तान हे नाव पहिल्या चार प्रांतांच्या नावाची इंग्रजी अद्याक्षरे आणि पाचव्या प्रांतांच्या नावातील स्तान ही शेवटची चार अक्षरे (P-Punjab, A-Afganistan, K-Kashmir , I-Sindhh आणि Baluchistan मधील stan) यांचे मिळून बनते.

रहमत अलीचा मूळ सिद्धांत असा होता की, हिंदू व मुसलमान या केवळ दोन जमाती नसून, स्वतंत्र वंश, धर्म, संस्कृती, परंपरा असणारी ती दोन राष्ट्रे आहेत. रहमत अलीच्या दृष्टिकोनातून पाकिस्तानचा पाया बळकट होण्यास मदत झाली. तथापि, १९३८ सालापर्यंत पाकिस्तान ही शाळकरी मुलांची कल्पना मानली जात होती.

१९३५च्या भारतविषयक सुधारणा कायद्यानुसार भारतात १९३७ साली प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूका पार पडल्या. या निवडणूकीत मुस्लिम लीगचा दारूण पराभव झाला. देशाच्या बहुतेक सर्व प्रांतात मुस्लिम लीगला नाकारल्यामुळे भारतात आपल्याला राजकीय भवितव्य नाही. आपल्याला बहुमतवाल्या हिंदूंच्या गुलामगिरीत खितपत पडावे लागणार असे मुस्लिम लीगला वाटू लागले. त्यामुळे मुस्लिम लीगची द्वि-राष्ट्रवादाची भावना उफाळून आली. त्यामुळे १९३८ साली बॅ. जीनांनी असे जाहीर केले की, मुस्लिम प्रांताचे संघराज्य व बिगर मुस्लिम प्रांतांचे संघराज्य असे भारताचे विभाजन करावे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तर पाकिस्तान निर्मितीच्या चळवळीला गती मिळाली. मार्च १९४०च्या लाहोर अधिवेशनात मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या मागणीचा ठराव पास केला.

## १.२.३ मुस्लिम लीगची पाकिस्तानच्या निर्मितीकडे वाटचाल

भारतीय स्वातंत्र्याचा मार्ग खुला करण्यासाठी दुसऱ्या महायुद्धकाळात पाकिस्तानच्या मुस्लिम लीगच्या मागणीबाबत तडजोड करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी राजाजी योजना आणि भुलाभाई देसाई लियाकत अली  खान योजना मांडण्यात आल्या  परंतु बॅ. जीना यांनी या योजना फेटाळून लावल्या. सप्टेंबर १९४४ मध्ये त्यांनी स्वतंत्र, सार्वभौम पाकिस्तान शिवाय आपण कशाचाही स्वीकार करणार नाही, हे स्पष्ट केले.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर इंग्लंडमध्ये सत्तांतर होऊन मजूर पक्षाचे ॲटली हे इंग्लंडचे पंतप्रधान झाले. त्यांनी भारतातील सत्तांतराच्या प्रक्रियेत गती देण्याचे कॅबिनेट मिशन भारतात पाठविले. या कॅबिनेट मिशनने भारतात आल्यानंतर एक योजना प्रसिद्ध केली तिला त्रिमंत्री योजना  असे म्हणतात. या योजनांचा स्वीकार सुरूवातीला भारतातील काही प्रमुख पक्षांनी केला या योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये देशात घटना समितीच्या निवडणुका झाल्या. त्यामध्ये काँग्रेसला २११ तर मुस्लिम लीगला केवळ ७३  जागा मिळाल्या. यामुळे बॅ. जीना निराश झाले. त्यामुळे जीनांनी त्रिमंत्री योजना नाकारली.

पाकिस्तान मिळविण्यासाठी मुस्लीम लीगने प्रत्यक्ष कृतीच्या मार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. १६ ऑगस्ट १९४६ हा प्रत्यक्ष कृतीदिनाचा  दिवस ठरविण्यात आला. प्रत्यक्ष कृती दिना दिवशी व नंतर कलकत्ता येथे दोन दिवस हिंदू-मुस्लिम यांच्यात जातीय दंगली घडून आल्या. या काळात कलकत्त्यात ५००० लोक ठार, १५००० जखमी व १ लाख लोक बेघर झाले. यानंतर २ सप्टेंबर १९४६ या दिवशी पं. जवाहरलाल नेहरू यांनी हंगामी सरकारचे पंतप्रधान म्हणून सुत्रे हाती घेतली. लीगने तो दिवस शोकदिन म्हणून पाळला. मुस्लिम लीगने सुरूवातीला या सरकारमध्ये सामील न होण्याचा निर्णय घेतला होता. सप्टेंबर १९४६ मध्ये देशात मुंबई, अहमदाबाद, नौखोली, टिप्पेरा येथे भीषण दंगली झाल्या. लुटालुट, जाळपोळ, हिंदूंना बाटवणे, हिंदू स्त्रीयांशी जबरदस्तीने विवाह करणे असे प्रकार तेथे मोठ्या प्रमाणावर घडले. या गोष्टीचा बिहारमध्ये सुड घेण्यात आला.

म. गांधींनी दंगलग्रस्त भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी नोव्हेंबर १९४६ ते मार्च १९४७ या काळात दौरा केला. यानंतर मुस्लिम लीगने नेहरूंच्या हंगामी सरकारमध्ये भाग घेण्याचा निर्णय घेतला. परंतु लीगच्या मंत्र्यांनी अडवणुकीची भूमिका स्वीकारून सामुदायिक जबाबदारीच्या तत्वास हारताळ फासला. त्यामुळे हिंदू-मुस्लिम कटुतेत आणखीनच भर पडली.

जून १९४८ पूर्वी ब्रिटिश भारत सोडून जाणार असल्याची घोषणा पंतप्रधान ॲटली यांनी फेब्रुवारी १९४७ मध्ये केली. त्यामुळे मुस्लिम लीगने प्रत्यक्ष कृतीचा मार्ग स्वीकारला. पंजाबमध्ये भीषण दंगली उदभवल्या भारतातील सत्तांतराचे कार्य त्वरेने उरकण्यासाठी ब्रिटिश सरकारने लॉर्ड माऊंटबॅटन यांना भारतात व्हाईसरॉय म्हणून पाठविले त्यांनी मुस्लिम लीग व कॉंग्रेस बरोबर चर्चा करून प्रदीर्घ वाटाघटी केल्या. परंतु बॅ. जीना आपल्या मुळ मागणी पासून अजिबात बाजूला सरले नाहीत. तरीसुद्धा माऊंट बॅटन यांनी भारताच्या फाळणीची योजना तयार केली. या योजनेस ब्रिटिश सरकारची मान्यता घेऊन ३ जून १९४७ साली भारताच्या फाळणीची योजना जाहीर केली. मुस्लिम लीगने ही योजना मान्य केली.

कॉंग्रेसच्या नेत्यांना देशाच्या फाळणीची तरतुद असलेली योजना नाईलाजाने स्वीकारावी लागली. त्यांनी सुरूवातीपासूनच स्वातंत्र्याबरोबरच अखंड भारताचे स्वप्न उराशी बाळगले होते. म. गांधीनी पूर्वी पाकिस्तानच्या कल्पनेस विरोध करताना म्हटले होते. ''माझ्या मृत शरीरावरच पाकिस्तान बनवावा लागेल.'' परंतु पाकिस्तानच्या निर्मितीबाबत बॅ. जीनांनी स्वीकारलेली अव्यवहार्य भूमिका, जातीय दंगलीचा भडकलेला वणवा, हंगामी सरकारच्या कामकाजात वारंवार निर्माण होणारे पेचप्रसंग यामुळे म. गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल इ. कॉंग्रेसच्या नेत्यांनी देशाच्या फाळणीस व पाकिस्तानच्या निर्मितीस परवानगी दिली.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. मुस्लीमलिगचा थोडक्यात आढावा घ्या.

## १.३ हिंदू महासभा

भारतात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाचा दूरगामी परिणाम म्हणजे सांप्रदायिक संघटनांचा उदय व विकास होय या संघटना विशिष्ठ समाजाच्या हितरक्षणासाठी स्थापन झाल्या. अशा या संघटना त्यांच्या नेत्यांच्या वैयक्तिक आकांक्षापूर्ती करीत असताना अप्रत्यक्षपणे ब्रिटिश साम्राज्याला सहाय्यभूत, ठरत होत्या. यामध्ये प्रामुख्याने हिंदू सभा, मुस्लिम लीग, अकालीदल, इ.चा समावेश होतो. या संस्थांनी व संघटनांनी व त्यांच्या प्रमुख नेत्यांनी वेळप्रसंगी आपल्या स्वदेशाच्या हितापेक्षा राजकारण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या आत्मकेंद्री व अलगतेचा फायदा इंग्रजांनी उठविला त्यांच्या सांप्रदियकतेला ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक खतपाणी घातले. परिणामी कळत - नकळतपणे या सांप्रदायामध्ये अलगतपणाची व वेगळेपणाची भावना वाढीस लागली. ब्रिटिशांनी या गोष्टीचा फायदा घेऊन हिंदुस्तानातील आपली कारकीर्द दिर्घकाळापर्यंत वाढवत नेली.

हिंदू महासभेच्या उदयाविषयी माहिती मिळत नाही. इ.स. १९०७ साली अलाहाबाद येथील काही हिंदू नेत्यांनी अखिल भारतीय हिंदू महासभा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. पंजाब हिंदू महासभेचे इ.स.१९०९ साली अमृतसर येथे अधिवेशन आयोजित केले. हिंदू महासभेचे कार्यालय हरिद्वार येथे ठेवण्यात आले आणि महत्त्वाच्या प्रसंगी अधिवेशन घेण्यात यावे असा ठराव करण्यात आला.

### १. हिंदू महासभेच्या स्थापनेचा उद्देश :

हिंदू महासभेची स्थापना करत असताना पं. मदनमोहन मालवीय यांनी पुढील शब्दात त्याचे महत्त्व सांगितले आहे - ''मुसलमान आणि ख्रिश्चन अनेक शतकांपासून आपल्या धर्मप्रसाराचे कार्य करीत आहेत. भारतातील बहुसंख्य मुसलमान धर्मपरिवर्तीत हिंदू आहेत. हे थांबविण्यासाठी एक हिंदू मिशन (प्रचारक संस्था) स्थापन करणे आवश्यक आहे.'' थोडक्यात अनेक शतकांपासून हिंदू धर्मावर एक प्रकारे मुस्लिम, ख्रिश्चन धर्माने घाला घालण्याचा प्रयत्न सुरू केला होता. हिंदू धर्म अवनीतीला चालला होता. हिंदू धर्म या आक्रमणामुळे संपतो की काय ही भिती निर्माण झाली होती. या हिंदू धर्मावरील आक्रमण थोपविण्यासाठी हिंदू महासभा या संघटनेची स्थापना झाली होती. असा निष्कर्ष काढला तरी वावगे ठरणार नाही.

मुस्लिम लीग ही संघटना स्थापन झाल्यानंतर त्यांनी ब्रिटिश सरकारकडे आपल्या हिताच्या अनेक मागण्या मांडल्या यामधील स्थानिक मंडळामध्ये जास्त प्रतिनिधित्व मिळवण्याच्या मुस्लिम लीगच्या मागणीला थोपवून धरण्यासाठी हिंदू संघटनेचे महत्त्व पं. मदनमोहन मालीवयांनी स्पष्ट केले.

सुरूवातीच्या काळात 'शुद्धी व संघटना' ही हिंदू महासभेची उद्दिष्ट्ये होती. शुद्धी व संघटन या चळवळीच्या आर्थिक, सामाजिक उद्देशावरही मालवियांनी भर दिला. राष्ट्रीय सभेचे म्हणजे काँग्रेसचे कार्य प्रामुख्याने राजकीय क्षेत्रात असल्याने तिचे सामाजिक, सांस्कृतिक आणि बिगर राजकीय क्षेत्रात म्हणावे तेवढे कार्य नव्हते म्हणून हिंदू समाजातील बालविवाह, अस्पृश्यता, जातीप्रथा यासारख्या अनिष्ठ प्रथा नष्ट करण्यासाठी हिंदू महासभेचे संघटन करण्यात आले.

हिंदू महासभा ही काँग्रेसची प्रतिस्पर्धी नसून काँग्रेसच्या कार्याला पुरक ठरेल व काँग्रेसला बळकटी आणेल. या दृष्टीने हिंदू महासभेची स्थापना आहे असे मालवीय यांनी स्पष्ट केले होते.

### २. हिंदू महासभेची वाटचाल

मुस्लिम लीगची स्थापना, १९१६चा लखनौ करार, मॉटफर्ड सुधारणा कायदा, खिलापत चळवळ, असहकार चळवळ, मोपल्यांचे बंड या सर्व घडामोडींमुळे भारतातील सांप्रदायिक तणाव वाढीस लागला होता. १९२२ मध्ये मलबार व मुलतानमध्ये जातीय दंगली होऊन मोठ्या प्रमाणात हिंदू लोक मारले गेले होते. मालमत्तेचेही खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे हिंदूंना स्वसंरक्षणासाठी संघटीत करण्याचे प्रयत्न झाले. या दृष्टिनेही हिंदू महासभेची भूमिका महत्त्वपूर्ण वाटत होती. १९२५ पर्यंत हिंदू महासभेची अधिवेशने काँग्रेसच्या मंडपातच होत होती. परंतु १३ डिसेंबर १९२६ साली स्वामी श्रद्धानंदांचा

मुस्लिमांकडून झालेला खून, शुद्धी आणि संघटना ही हिंदू महासभेची स्वीकृत धोरणे जाहीर झाल्यामुळे काँग्रेस आणि हिंदू महासभा यांच्यातील दरी वाढतच गेली. हिंदू राष्ट्रवाद वाढीस लागला. १९२५ साली नागपूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली आणि 'हिंदुस्तान हिंदुओंका' अशा घोषणांचा उदय झाला.

गोलमेज परिषदेतून बाहेर आलेल्या जातीय मतदारसंघाचा वाद, त्याविरूद्ध उठलेले वादळ, त्याला हिंदूमहासभेचा विरोध जातीय मतदारसंघ मान्यही नाही आणि अमान्यही नाही असा काँग्रेसचा ठराव या सर्वांमुळे हिंदू महासभावादी मंडळी काँग्रेसपासून दूर होऊ लागली. डॉ. मुंजे, न. चि. केळकर, भोपटकर ही काँग्रेसची मंडळी हिंदू महासभावादी झाली. डॉ. मुंजे पाटणा (१९२७) न. चि. केळकर हे जबलपूर (१९२८) आणि दिल्ली (१९३२) येथील हिंदू महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. इंग्रजांच्या आश्रयानेच इस्लामी राष्ट्रवादाचे उद्दिष्ट गाठता येईल हे मुसलमानांनी जाणले व मुस्लिम लीगने काँग्रेस बरोबर वैरत्वाचा पवित्रा घेतला अशा रीतीने एकीकडे मुस्लिम जातीयवाद आणि दुसरीकडे हिंदू सांप्रदायिकता यांच्या ताणाताणीत भारतीय धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद सापडला.

### ३. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर आणि हिंदू महासभा

लाला लजपतराय, पं. मदनमोहन मालविय, विजय राहावाचरियर, डॉ. मुंजे, न. चि. केळकर, भाई परमानंद इ. थोर नेत्यांनी हिंदू महासभा वाढविली. १९३७ साली बंधमुक्त झाल्यानंतर विनायक दामोदर सावरकरांनी हिंदू महासभेत प्रवेश केला. तत्पूर्वी ते रत्नागिरी जिल्ह्यात हिंदू सभेचे काम करीत होते. रत्नागिरी हिंदूसभा अखिल भारतीय हिंदू महासभेची एक शाखा असली तरी सावरकरांच्या नेतृत्वाखाली ती अखिल भारतीय हिंदू महासभेला दिशा दाखवित होती. इ.स. १९३७ ते १९४७ ही दहा वर्षे सावरकरांना अखिल भारतीय हिंदू महासभेचे कार्य करण्यास मिळाली. या कालावधीत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सावरकरांनी हिंदू महासभेला अखिल भारतीय स्वरूप दिले. त्या संख्येला विचारधारा दिली. भागानगर व भागालपूर हे दोन लढे यशस्वीपणे लढवून आपण केवळ क्रांतिकार्य व समाजसुधारक कार्यच नव्हे तर राजकीय आंदोलने लढवू शकतो, हे सिद्ध करून दिले. हिंदू समाजात हिंदूत्वाची जाणीव, अखिल हिंदू दृष्टिकोन व आंदोलन उत्पन्न करणे व अखंड हिंदूस्थान राखण्यासाठी भगिरथ प्रयत्न ही आपली जिवित कार्ये सावरकरांनी या दहा वर्षात केली.

त्यावेळी अशी एक समजूत होती की, मुस्लिम लीग, अकालीदल व इतर जातीय संस्थांप्रमाणेच हिंदू महासभा एक होती. आणि तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक उत्थानाचा दावा पोकळ होता. १९३८ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले व त्या पदावर पुढे अनेक वर्षे राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली सभेने एक राजकीय कार्यक्रम जाहीर केला होता. काँग्रेसच्या मुसलमानांना खूष ठेवण्याच्या धोरणामुळे नाराज झालेल्या सावरकरांनी 'हिंदू राष्ट्राची' गर्जना केली. सावरकरांचे असे म्हणणे होते की, या देशात मातृभूमी मागणाऱ्यांचा हा देश आहे, मुसलमान तसेच इतर अल्पसंख्याकांनी अल्पसंख्यांकांसारखेच रहायला हवे. लोकशाहीच्या तत्वानुसार बहूसंख्याकांची भाषा राष्ट्रभाषा असावी असे सावरकरांचे मत होते. अर्थात भारत हिंदूंचा देश असला तरी इतरांना येथे न्याय मिळेल त्यासाठी त्यांनी 'एक व्यक्ती एक मत' या सिद्धांताचा पुरस्कार केला. हिंदू महासभेच्या या नवीन भूमिकेमुळे मुस्लिमांच्यातील जातीवाद आणखीनच वाढीस लागला. हिंदू महासभेच्या हिंदूराष्ट्र या घोषणेमुळे मुस्लिम लीगच्या पाकिस्तान मागणीस आणखी जोर आला.

## ४. काँग्रेस, मुस्लिम लीग आणि हिंदू महासभा

स्वातंत्र्यवीर सावरकरांनंतर हिंदू महासभेचे अध्यक्ष म्हणून श्यामाप्रसाद मुखर्जी यांची निवड करण्यात आली. त्यांनी हिंदू महासभेला व्यापक राष्ट्रीय दृष्टी दिली. परंतु ज्याप्रमाणे मुस्लिम समाजामध्ये मुस्लिम लीग लोकप्रिय झाली. तशी हिंदू समाजामध्ये हिंदू महासभा लोकप्रिय होऊ शकली नाही. याला सर्वात महत्त्वपूर्ण कारण होते ते म्हणजे हिंदू महासभेच्या कितीतरी अगोदर पासून काँग्रेसने भारतातील सर्वच जनजातीचे नेतृत्व केले व स्वातंत्र्य संग्राम चालविला. हिंदूमध्ये एक स्वाभाविक भावना होती की, एक संघटना असताना दुसरी असण्याचे कारण काय? शिवाय मुस्लिम लीगने स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती केल्याने देशातील बहूसंख्य मुसलमान मुस्लिम लीगचे समर्थक बनले. मुस्लिम लीगने केलेल्या पाकिस्तानच्या मागणीला प्रतिरोध म्हणून 'अखंड हिंदूस्थान'चा नारा देऊनही तेवढी लोकप्रियता हिंदू महासभेच्या वाट्याला आली नाही हे हिंदू महासभेचे फार मोठे दुर्दैव आणि अपयश आहे.

## ५. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे संबंध सुरूवातीपासूनच स्नेहाचे होते. ज्यावेळी १९३८ साली अहमदाबादला झालेल्या हिंदू महासभेचे अध्यक्षपद सावकरांना मिळाले. त्यानंतर ते नागपूरला आले. त्यावेळी स्वातंत्र्यवीर सावकररांचे संघात विशेष स्वागत करण्यात आले. लष्करी पद्धतीच्या गणवेशात असलेल्या स्वयंसेवकांनी त्यांना मानवंदना दिली. परंतु पुढे मात्र माधवराव गोळवलकर गुरूजी व सावरकर यांची भेट १२ मे १९५२ रोजी टिळक स्मारक मंदीर पुणे येथे स्वातंत्र्यापूर्वी सावरकरांनी स्थापन केलेल्या 'अभिनव भारत' सांगता समारंभानिमित्ताने झाली. यावेळी गोळवलकर गुरूजींनी सावरकरांविषयी चांगले उद्‌गार काढले. सावरकरांनी आता हिंदूत्त्वाचे कार्य तुम्हालाच पुढे न्यावयाचे आहे. असे म्हणून सत्काराच्या निमित्ताने त्यांना घातलेला हार आणि नारळ गुरूजींच्या हाती दिले. हे अनेक हिंदूसभावाल्यांना आवडले नाही. तुम्ही आपला वारसा गुरूजींच्या हाती देऊन टाकला आणि संघ तर हिंदूसभेस विचारीत नाही. अशी तक्रार नंतर काही हिंदूसभावाद्यांनी सावरकरांकडे केली. यावर सावरकर असे म्हटलेले सांगतात की, 'हिंदूत्वाचे काम आता संघच करीत आहे ही गोष्ट खोटी आहे का?' थोडक्यात दोन्ही संघटनांचे जमले नाही. पुढे स्वयंसेवकांनी स्थापन केलेल्या जनसंघात हिंदू महापरिषद विलीन करण्याचा प्रस्तावही सावरकरांनी नाकारला. पुढे १९६४ साली स्थापन झालेल्या विश्‍व हिंदू परिषदेत मात्र हिंदू महासभेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. हिन्दु महासभेच्या कार्याचा थोडक्यात खुलासा करा.

## ९.४ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला जवळ जवळ ८३ वर्ष पूर्ण झाली आहेत. सामान्यपणे यास आर.एस.एस. असे म्हटले जाते. या तीन शब्दांचा अर्थ असा की - आपले एक राष्ट्र आहे ते म्हणजे भारत, निस्वार्थी भावनेने व स्वयंप्रेरणेने राष्ट्राची सेवा करण्यासाठी कटिबद्ध झालेले लोक म्हणजे स्वयंसेवक, अशा लोकांचे संघटन म्हणजे संघ होय. आज देशात संघाच्या जवळजवळ ४०,००० शाखा आहेत. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रामध्ये संघातर्फे २७,००० पेक्षा जास्त सेवाकार्य चालविली जात आहेत. संघातर्फे देशभर १६,००० विद्यालये चालविली जात आहेत. या विद्यालयात २१ लाखांवर विद्यार्थी प्राथमिक स्तरापासून ते स्थातक स्तरापर्यंत तसेच ९० हजार शिक्षक विद्या दानाचे कार्य करीत शिक्षण घेत आहेत.

### ९.४.१ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक : डॉ. हेडगेवार

डॉ. केशवराव बळीराम हेगडेवार यांनी इ.स. १९२५ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर संघाची स्थापना केली. डॉ. हेडगेवार यांचा जन्म नागपूरच्या भिक्षुक कुळात, हिंदू पंचांगांनुसार सन १८८९ च्या गुढीपाडव्याच्या दिवशी झाला. त्यांचे आई-वडील प्लेगच्या साथीत एकाच दिवशी मरण पावले. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या मोठ्या भावावर पडली. डॉ. हेडगेवारांच्या देशप्रेम प्राथमिक शाळेत राणी व्हिक्टोरिया हिच्या राज्यरोहणास ६० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शाळेत वाटलेली मिठाई त्यांनी फेकून देऊन देशप्रेम व्यक्त केले. नंतर १९०१ साली सातव्या एडवर्डच्या राज्यभिषेकादिनी सर्वत्र रोषणाई आणि आनंदोत्सव चालू असताना अस्वस्थ केशव आपल्या घरातच बसून होता. त्या संबंधात विचारताच त्याने ताडकन म्हटले होते. 'हे तर विदेशाचे राजा-राणी, ते आपले नव्हेत, त्यांच्या समारंभात आपण का म्हणून भाग घ्यावयाचा?' डॉ. हेडगेवार यांनी माध्यमिक शाळेत प्रवेश करताच तेथिल विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यज्योत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न सुरू केला. सन १९०५ च्या 'वंदे मातरम्' च्या आंदोलन काळात त्यांच्या शाळेतही स्वातंत्र्याचा जयघोष सुरू झाला. त्यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकले. मग नागपूर बाहेरच्या एका शाळेतून त्यांनी मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण केली.

डॉ. हेडगेवार ज्याप्रमाणे जन्मजात देशभक्त होते त्याप्रमाणेच ते जहाल क्रांतिकारक सुद्धा होते युगांतर आणि अनुशीलन समिती ने सुरु केलेल्या क्रांतिकारक चळवळींमध्ये त्यांनी डॉ. पांडुरंग खानखोजे, योगी अरविंद, बारेंद्र घोष, जैलाक्यनाथ चक्रवर्ती इ. महान क्रांतिकारकांबरोबर काम केले. १९१५ साली पहिल्या महायुद्धाच्या काळात रासबिहारी बोस आणि सचींद्रनाथ संन्याल यांनी संपूर्ण देशात लष्करी उठावाची योजना आखली होती. त्यात डॉ. हेडगेवार हे मध्यभारत प्रांताचे प्रमुख होते. त्याकाळी सर्व देशभर स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व काँग्रेसकडे होते. त्यातही त्यानी हिरीरीने भाग घेतला. कलकत्ता येथे त्यांनी वैद्यकिय शिक्षण घेऊनही त्यांनी डॉक्टर म्हणून व्यवसाय केला नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी विवाहही केला नाही. म. गांधीजींचे नेतृत्व असलेल्या १९२० व १९३१च्या दोन्ही सत्याग्रहात त्यांनी उडी घेतली. आणि दोन्ही वेळा त्यांनी तुरुंगवास भोगला. वृत्तपत्र चालविणे, राष्ट्रीय उत्सव आणि अभियानात सहभागी होणे हा त्यांचा नित्यक्रम होता. संघस्थापनेनंतर पुढील जवळजवळ १५ वर्षापर्यंत डॉ. हेडगेवार स्वयंसेवक घडविण्याच्या दृष्टिने देशभर प्रवास करीत राहिले. लोकांना भेटून संघकार्य समजावून सांगण्यासाठी ते दिवसभर धावपळ करीत. रात्र रात्र

जागत. त्यांनी आपले शरीर अक्षरशः चंदनासारखे झिजवले आणि १९४०च्या जुनमध्ये राष्ट्रकार्याच्या यज्ञकुंडात जीवनाची पूर्णाहुती दिली.

हिंदूंची प्रबळ संघटना उभारणे हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून डॉ. हेडगेवारांनी संघाची स्थापना केली होती. डॉ. हेडगेवार हे जन्मजात देशभक्त असल्यामुळे आपल्या मातृभूमीची ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता करणे हे त्यांनी आपल्या जीवनाचे आद्य कर्तव्य मानले होते. आज ना उद्या ब्रिटिश पराभूत होतील. व त्यांना देश सोडून जावे लागेल याबाबत त्यांच्या मनात तिळमात्र ही शंका नव्हती. परंतु आपला देश पुन्हा पुन्हा गुलाम होवू नये. यासाठी आपण काय केले पाहिजे याविषयी त्यांचे सतत विचारमंथन सुरू असे. या विचारमंथनातून ते या निष्कर्षापर्यंत पोहचले की, या देशाचे भाग्य आणि भवितव्य हिंदू समाजाशी निगडीत आहे ते म्हणायचे, 'हिंदू दुबळा तर देश दुबळा आणि हिंदू संघटित तर राष्ट्र संघटीत.' आणि त्यांनी पाहिले की, हा हिंदू समाज तर जातपात, भाषा, प्रांत या भेदांनी आणि कालबाह्य रूढींनी पोखरला गेला आहे. त्याला आत्मविस्मृतीची ग्लानी आली आहे. त्यामध्ये राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव आहे. आणि हेच दुर्गण आपल्या अवनीतीचे व गुलामगिरीचे कारण आहेत म्हणून त्यांनी निर्णय घेतला की, या हिंदू समाजाला संघटित करून त्याला सामर्थ्यसंपन्न करावयाचे म्हणून त्या उद्देश प्राप्ती करीता त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांनी त्याकरीता हिंदूंची कार्यक्षम संघटना निर्माण करून हिंदूधर्म, हिंदू समाज व हिंदू संस्कृती चे रक्षण करण्याचे व या समाजाच्या अंगभूत शक्तीद्वारे भारताला पुन्हा वैभवशाली करण्याचे उच्चतम लक्ष्य संघापुढे ठेवले.

या संघातील स्वयंसेवकांना सुरूवातीला लष्करी शिक्षण दिले जात होते. त्यावेळी त्यांना खाकी शर्ट, हाफ पॅन्ट, काळी टोपी आणि संघाचा बॅज एवढा गणवेश वापरावा लागत होता.

**संघप्रतिज्ञा :**

'सर्वशक्तिमान परमेश्वर आणि आपल्या पूर्वजांचे स्मरण करून मी प्रतिज्ञा करतो की, पवित्र हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृतीचे रक्षण करून हिंदू राष्ट्राला स्वतंत्र्य करण्यासाठी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा घटक होत आहे. संघाचे काम मी प्रामाणिकपणे, निःस्वार्थ बुद्धिने आणि तनमनधन पूर्वक करीन आणि या व्रताचे मी आजन्म पालन करीन.'

हे ध्येय डोळ्यासमोर ठेवल्यामुळे आपल्या कार्यपद्धती मध्ये संघाने सुरूवातीपासूनच काही पथ्ये पाळली होती ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. संघ समाजाच्या अंतर्गत एक वेगळा पंथ म्हणून काम करणार नाही.

२. संघ आणि समाज यांच्यात दुरावा येऊ न देणे.

३. संघटनेचे काम वाढवत वाढवत संघाला समाजाशी एकरूप करणे.

४. संघ आणि समाज एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे वाटण्याइतक्या उच्च अवस्थेपर्यंत संघाचे कार्य नेणे.

५. हे कार्य कुणाच्याही विरोधात न करणे.

६. कार्याचा मुलाधार सर्वाप्रती शुद्ध सात्वीक प्रेमभाव ठेवणे.

७. भावात्मक आणि सेवाव्रती भूमिकेतून समाजाचे संघटन करणे.

संघाचे सर्वोच्च अधिकारी म्हणजेच सरसंघचालक होय. आतापर्यंत संघाचे चार सर संघचालक झाले आणि विद्यमान सरसंघचालक श्री सुदर्शनजी हे पाचवे सरसंघचालक आहेत.

### १.४.३ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि क्रांतिकारक

१८८५ साली कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर अर्ज, विनंत्या व सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांचा ब्रिटिश विचारकरीत नाहीत, तर आता शस्त्र हाती घेतले पाहिजे अशा विचारसरणीचा एक गट कॉंग्रेसमध्ये निर्माण झाला व त्यातून क्रांतिकारी चळवळ सुरू झाली. या दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. संघातील संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारलेले असे. १९२६-२७ साली संघाचा विस्तार नागपूर व त्याच्या आसपास होऊ लागला होता. त्यावेळी नागपूर येथे भोसले वेदशाळेत प्रसिद्ध क्रांतिकारक हुतात्मा राजगुरू हे शिकत होते. ते संघाचे स्वयंसेवक झाले याच काळात हुतात्मा भगतसिंग यांनी नागपूर येथे डॉ. हेडगेवार यांची भेट घेतली होती. सायमन कमिशनच्या निषेधार्थ 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन पार्टी'च्या वतीने मोर्चा निघाला. त्याचे नेतृत्व लाला लजपतराय करीत होते. त्यावेळी पोलिसांनी मोर्चावर लाठीहल्ला केला. यात लालाजी जखमी झाले व पुढे त्यातच त्यांचा मृत्यु झाला. १७ फेब्रुवारी १९२८ रोजी भगतसिंग व राजगुरू यांनी सॉडर्स यास गोळ्या घालून ठार केले. त्यावेळी डॉ. हेडगेवार यांनीच क्रांतीकारक सुखदेव यांना उमरेड येथे भैय्याजी दाणी (हे पुढे संघाचे सरकार्यवाह झाले.) यांच्या शेतावरील घरात सुखरूप ठेवण्याची व्यवस्था केली. सायमन कमिशनच्या विरोधात नागपूर येथे जे आंदोलन झाले. त्यातही अनेक स्वयंसेवकांनी भाग घेतला होता.

### १.४.४ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि कॉंग्रेस

#### १. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि कॉंग्रेसमधील प्रमुख नेते

इ.स.१९२८ साली संघाच्या विजयादशमी उत्सवाला सरदार वल्लभभाई पटेल यांचे थोरले बंधू व स्वतंत्र भारताच्या विधीमंडळाचे पहिले अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पुढच्याच वर्षी म्हणजे १९२९ साली महामना पंडित मदनमोहन मालवीय यांनी याच उत्सवाला उपस्थित राहून संघकार्याला आशिर्वाद दिला होता. स्वातंत्र्य चळवळीतील अनेक प्रमुख नेत्यांचे संघाबरोबर स्नेह संबंध होते.

#### २.लाहोर अधिवेशन व संघ शाखांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा.

इ.स. १९२० साली नागपूर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन झाले होते त्यावेळीच डॉ. हेडगेवार यांनी संपूर्ण स्वातंत्र्यासंबंधीचा ठराव पाठविला होता. परंतु तेव्हा तो मंजूर होऊ शकला नाही. त्यानंतर ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथील अधिवेशनात कॉंग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्य हे आपले ध्येय असल्याचा ठराव मंजूर केला आणि २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन म्हणून सर्व देशभर साजरा करण्याचे ठरविले. त्यावेळी डॉ. हेडगेवार यांना अत्यंत आनंद झाला. त्यांनी २६ जानेवारी १९३० रोजी सर्व शाखांवर संध्याकाळी ६ वाजता राष्ट्रध्वजवंदना करण्याचा व स्वातंत्र्यासंबंधी व्याख्याने आयोजित करण्याचा आदेश स्वयंसेवकांना दिला. त्यानुसार संघाच्या सर्व शाखांवर स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम साजरा झाला.

## ३.सविनय कायदेभंग आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

असहकार चळवळीनंतर जवळजवळ आठ वर्षांनी म. गांधींनी ६ एप्रिल १९३० रोजी आपली प्रसिद्ध दांडी यात्रा काढून गुजरातमध्ये दांडी येथे मिठाचा सत्याग्रह केला. या काळात मध्यभारतात संघाचे कार्य चांगलेच बाळसे धरू लागले होते. पण तेथे समुद्र नसल्यामुळे मिठाचा सत्याग्रह करणे शक्य नव्हते, त्यामुळे जंगल सत्याग्रह करण्याचे ठरले. डॉ. हेडगेवार यांनी सरसंघचालक पदाची जबाबदारी डॉ. अ.वि. परांजपे यांच्याकडे सोपविली व अनेक स्वयंसेवकांबरोबर जंगल सत्याग्रहात सहभागी झाले

जंगलसत्याग्रहासाठी यवतमाळ येथे जाताना वाटेत पुसद येथे एका सभेत डॉ. हेडगेवार यांनी स्वातंत्र्य आंदोलनासाठी आपली भूमिका मांडली होती. ते म्हणाले, 'स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ब्रिटिशांच्या बुटांना पॉलिश करण्यापासून तेच बूट त्यांच्या टाळक्यात मारण्यापर्यंत ज्या ज्या मार्गाचा वापर करणे शक्य असेल त्या सर्वांचा अवलंब केला पाहिजे कोणत्याही मार्गाने देश स्वातंत्र झाला पाहिजे एवढेच मला माहीत आहे.'

जंगल सत्याग्रहात डॉ. हेडगेवार यांच्या सोबत श्री अप्पाजी जोशी, दादाराव परमार्थ असे १२ प्रमुख संघकार्यकर्ते सहभागी झाले या सर्वांना ९ महिने सश्रम तुरुंगवासाची शिक्षा झाली. यानंतर संघाचे शारीरिक शिक्षण प्रमुख मार्तंडराव जोग, नागपूर जिल्हा संघचालक अप्पाजी हळदे इ. अनेक संघ नेते व स्वयंसेवकांनी सत्याग्रहात भाग घेतला. सत्याग्रहाच्या वेळी पोलिसांच्या पाशवी मारहाणीपासून सत्याग्रहींचे रक्षण करण्यासाठी १०० संघ स्वयंसेवकांचा एक गट तयार केला. हे सर्वजण प्रत्येक सत्याग्रहाच्या वेळी उपस्थित राहत असत. ८ ऑगस्ट रोजी गढवाल येथे १४४ कलम तोडून मिरवणूक काढण्यात आली त्यावेळी पोलिसांनी केलेल्या लाठीमारात अनेक स्वयंसेवक जखमी झाले होते.

इ.स. १९३१ सालच्या विजयादशमीला डॉ. हेडगेवार तुरुंगात होते. त्या दिवशी सर्व संघशाखांवर एक संदेश वाचून दाखविण्यात आला होता तो असा होता 'माझ्या मना, देशाचे पारतंत्र्य दूर होऊन सर्व समाज स्वावलंबी व बलशाली होईपर्यंत कोणत्याही व्यक्तिगत सुखाची अपेक्षा करण्याचा तुला अधिकार नाही.' जानेवारी१९३२ मध्ये विप्लवीदल या क्रांतिकारकांच संघटनेद्वारे बालाघाट येथे सरकारी खजिना लुटण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी पोलिसांच्या गोळीबारात क्रांतिकारक जनींद्रनाथ आणि त्यांचे अनेक सहकारी हुतात्मा आणि त्यावेळेचे संघाचे अखिल भारतीय सरकार्यवाह बाळाजी हुद्दार यांच्यासह अनेक जणांना अटक करण्यात आली.

१५ डिसेंबर १९३२ रोजी गुप्तहेर विभागाच्या अहवालाच्या आधारे मध्य भारत प्रांतांच्या सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना संघकार्यात भाग घेण्यावर बंदी घालणारा आदेश काढला. पुढे डॉ. हेडगेवार यांच्या मृत्युनंतर ५ ऑगस्ट १९४० रोजीही ब्रिटिश सरकारने भारत सुरक्षा कायद्याच्या ५६ व ५८ कलमांखाली संघातील लष्करी गणवेश व लष्करी प्रशिक्षणावर बंदी घातली.

## ४. १९४२ चे चलेजाव आंदोलन व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

१९४२ साली म. गांधीजींनी इंग्रजांना 'चले जाव' चे आवाहन केले ही चळवळ सुरू होण्याअगोदरच ब्रिटिश सरकारने गांधी, नेहरू यासारख्या प्रमुख पुढाऱ्यांना अटक करून

तुरूंगात डांबले होते मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींनी 'करो या मरो' ही घोषणा दिली. या चळवळीत आपण भाग घेतला पाहिजे असे काही संघाच्या प्रांतप्रचारकांना वाटले होते. या आंदोलनात संघ स्वयंसेवकांनी अनेक ठिकाणी महत्त्वपूर्ण भाग घेतला. विदर्भामध्ये चिमुटआष्टी या भागात संघ स्वयंसेवकांनी समांतर सरकार स्थापन केले. यावेळी पोलिसांनी त्यांच्यावर अमानवी अत्याचार केले. त्यामध्ये १२ पेक्षा जास्त स्वयंसेवकांनी देशासाठी आत्मबलिदान केले. नागपूरजवळ रामटेक येथे तत्कालीन नगर कार्यवाह रमाकांत केशव तथा बाळासाहेब देशपांडे यांना सरकारने फाशीची शिक्षा सुनावली पुढे सर्वच स्वातंत्र्य सैनिकांना सरकारने माफी दिली. त्यात बाळासाहेबांचीही सुटका झाली. त्यांनीच पुढे वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्याची उभारणी केली.

१९४२च्या आंदोलनात देशाच्या कानाकोपऱ्यात स्वयंसेवक संघर्ष करीत होते. दिल्ली, मुजफ्फरनगर लोहमार्ग उद्ध्वस्त करण्यात आला. आग्ऱ्याजवळ बरहन लोहमार्ग ही जाळून टाकण्यात आला. मीरत जिल्ह्यात मवाना तालुका कार्यालयावर स्वयंसेवकांनी राष्ट्रध्वज फडकावला. त्याचवेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात कित्येक जण जखमी झाले होते.

स्वातंत्र्यसैनिकांना मदत करण्याचे कार्यही महत्त्वाचे होते इंग्रज सरकारचे गुप्तहेर तर स्वातंत्र्यसैनिकांच्या मागावर होतेच पण कम्युनिष्ठ पक्षाचे कार्यकर्तेही आपल्या पक्षाच्या आदेशानुसार स्वातंत्र्यसैनिकांना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारला मदत करत होते. या काळात जयप्रकाश नारायण व अरुणा असफअली या नेत्यांना दिल्लीचे संघचालक हंसराज गुप्त यांनी आपल्या घरी आश्रय दिला होता. आणखी एक समाजवादी नेते अच्युतराव पटवर्धन व साने गुरूजी हे पुण्यात. पुण्याचे संघचालक भाऊसाहेब देशमुख यांच्या घरी उतरत असत. पत्री सरकार स्थापन करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांना सातारा जिल्ह्यातील औंधचे संघचालक व ख्यातनाम वैदिक विद्वान पंडित सातवळेकर यांच्या घरी आसरा मिळत असे.

## ९.४.५ ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या अहवालातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (मे, जून १९४३)

संघाची वाटचाल सुनिश्चितपणे देशाच्या स्वातंत्र्याच्या दिशेने कशी होत होती. याची माहिती ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या १९४३च्या अहवालात नोंदविली आहे या अहवालातील काही नोंदी पुढीलप्रमाणे आहेत. संघ कार्याचा वेगाने प्रसार होत आहे. संघाचे अधिकारी शिक्षक वर्ग (ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्प - ओ.टी.सी.) देशात ११ ठिकाणी भरले पुण्यातील वर्गाचा समारोप करताना संघाचे प्रमुख जी गोळवलकर गुरूनी यांनी सांगितले' 'देशासाठी हौतात्म्य पत्करणे हा सर्वोच्च त्याग आहे.' श्री गुरूजी यांनी संत रामदासांचा एक श्लोक उद्घृत केला त्यात म्हटले आहे. 'हिंदूंनी आपल्या धर्मासाठी प्राण अर्पण केले पाहिजेत. पण त्यापूर्वी जास्तीत जास्त शत्रूंना ठार मारले पाहिजे.' या वर्गात स्वयंसेवकांना असे सांगण्यात आले की, त्यांना लष्करी जीवनाचा अनुभव या वर्गात मिळेल आणि लवकरच विदेशी शक्तीबरोबर संघर्ष होणार आहे.

या वर्गामध्ये लढाऊ पणाचे व साहसपूर्ण असे प्रशिक्षण स्वयंसेवकांना देण्यात येते. बलशाही संघटना उभी राहिली की, ब्रिटिशांबरोबर संघर्ष सुरू करण्यात येईल. असेही स्वयंसेवकांना सांगण्यात येते. संघाच्या अन्य नेत्यांचे प्रवास व संघाचे इतर कार्यक्रम यावरही ब्रिटिश सरकारच्या गुप्तहेर विभागाचे लक्ष असे. एक नोंद अशी आहे - '१२ डिसेंबर १९४३

रोजी संघाचे एक प्रमुख अधिकारी नानासाहेब आपटे यांनी जबलपूर येथे गुरूदक्षिणा उत्सवात सांगितले इंग्रज सरकारचे अत्याचार असह्य आहेत. देशाला स्वातंत्र्यासाठी संघर्षाची तयारी ठेवावी लागेल.'

गुप्तहेर विभागाच्या अहवालात संघ स्वयंसेवक व क्रांतिकारक यांच्यातील सहकार्याचाही दाखला सापडतो - 'पुणे येथे संघाच्या शिबीरात व अमरावती येथे राष्ट्र सेविका समितीच्या शिबीरात विनायक दामोदर सावरकर हे उपस्थित होते. उत्तर प्रदेशात बदायून येथे संघ शिबीरात विदेशामध्ये स्वातंत्र्य चळवळ संघटीत करणारे राजा महेंद्र प्रताप यांचे छायाचित्रण लावण्यात आले. या शिबीरातील सर्व कार्यक्रमासंबंधी संपूर्ण गुप्तता पाळण्यात येते.'

### ९.४.६ आझाद हिंद सेना व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

आझाद हिंद सेना निर्माण निर्माण झाल्यानंतर २० सप्टेंबर १९४३ रोजी नागपूर येथे संघाची गोपनीय बैठक झाली. जपानच्या सहकार्याने भारताला स्वतंत्र करण्यासाठी हल्ला झाला तर त्यात संघाने कोणती भूमिका पार पाडावी. याविषयी या बैठकीत चर्चा झाली.

### ९.४.७ भारताची फाळणी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ :

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी काँग्रेस हे सर्व स्वातंत्र्यचळवळीचे मुख्य व्यासपीठ होते. भारताची फाळणी करण्यासाठी व सत्तांतरासाठी ब्रिटिश सरकार, मुस्लिम लीग काँग्रेसबरोबर वाटाघाटी करीत होते. या काळात काँग्रेसचे प्रमुख नेते एवढेच नव्हे तर संपूर्ण देशाचे एकमेव नेते म्हणून म. गांधीजींना मान्यता होती. त्यांनी 'देशाची फाळणी करण्यापूर्वी माझ्या देहाचे तुकडे करा.' अशी घोषणा केली होती. त्याचप्रमाणे संपूर्ण देशाला आग लागली तरी पाकिस्तान अस्तित्वात येणार नाही माझ्या मृतदेहावरच पाकिस्तानची निर्मिती होईल असे आश्वासनही गांधीजींनी भारतीय जनतेला दिले होते. काँग्रेसचे इतर सर्व प्रमुख नेते याच विचारावर ठाम होते. परंतु ब्रिटिश व्हाईसरॉय माऊंट बॅटन यांनी ३ जून १९४७ रोजी देशाच्या फळणीची आणि जून १९४८ पर्यंत सत्तांतर करण्याची योजना जाहीर केली.

काँग्रेस देशाची फाळणी कधीही मान्य करणार नाही असा विश्वास संघासह संपूर्ण भारतीय जनतेला होता. परंतु १४-१५ जून रोजी काँग्रेस कार्यकारी समितीने फाळणीचा प्रस्ताव स्वीकारला. सर्व देशाला आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला. सर्व जनता अवाक व दुःखी कष्टी झाली. पुढे १९६० साली पं. जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेस नेत्यांच्या या प्रमादाची कबुली दिली. ते म्हणाले होते 'वस्तुस्थिती अशी होती की, आम्ही सर्व काँग्रेस नेते चळवळी करून थकून गेलो होतो आमची वयेही झाली होती. अखंड भारताविषयी आम्ही आग्रह धरला असता तर आम्हाला पुन्हा तुरूंगात जावे लागले असते. (द ब्रिटिश राज - लेखक - लिओनाई मोस्ले - पृष्ठ २८५) राममनोहर लोहिया यांनी लिहले आहे.' त्यावेळच्या काँग्रेसी नेत्यांचे अधःपतन झाले होते. त्यांना सत्तेचे आकर्षण वाटू लागले होते. (द गिल्टी मेन ऑफ इंडियाज पार्टीशन - पृष्ठ ३७)

काँग्रेस नेत्यांनी भारताच्या फाळणीचा प्रस्ताव स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा इ.नी. त्याविरोधात आपले प्रयत्न सुरू केले. त्यामुळे फाळणीच्या विरोधात आवाज उठू लागला. फाळणीविरोधी शक्ती संघटित झाली तर भारताचे तुकडे करण्याचा

आपला कावा तडीला जाणार नाही. अशी भिती इंग्रजांना वाटू लागली. यामुळेच ब्रिटिशांनी घाईघाईने सत्तांतर व फाळणी करण्याचे ठरविले. सत्तांतराचा बेत जून १९४८ ऐवजी १० महिने अलिकडेच ओढण्यात आला. व तो त्याप्रमाणे पारही पाडण्यात आला. फाळणीच्या विरोधात आवाज सुसंघटित व समर्थ होण्यापूर्वीच आम्ही फाळणी करून टाकली असे स्वतः माऊँट बॅटन यांनी म्हटले आहे. (ब्रिटीश राज - पृष्ठ ११९) काँग्रेसने फाळणीला मान्यता दिल्यानंतर केवळ साठ दिवसांच्या आतच इंग्रजांनी फाळणीची योजना पूर्णपणे अंमलात आणली आणि भारताला स्वातंत्र्य दिले.

### ९.४.८ निर्वासित आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

भारताच्या फाळणी दरम्यान हिंदू समाजाने प्रचंड विध्वंस पाहिला सुमारे २० लाख लोकांची कत्तल झाली आणि सुमारे २ कोटी लोकांना आपल्या वाडवडिलांची भूमी सोडून परागंदा व्हावे लागले. त्या काळातील विदारक स्थितीचे वर्णन तत्कालीन केंद्रिय मंत्री काकासाहेब गाडगीळ यांनी (गव्हर्नमेंट फ्रॉम इन्साइड) या पुस्तकात केले आहे ते म्हणतात, 'पश्चिम पंजाबमधून शीख आणि हिंदूंची हकालपट्टी करण्यात आली तेथील ६० लाख मुस्लिमेत्तरांपैकी भंगी समाज वगळता उरलेल्या सर्वांना हाकलून देण्यात आले. पाकिस्तानाचे धोरण स्पष्ट होते. सिंधमधून हिंदूंना हाकलून त्यांची संपत्ती लुटावयाची होती पूर्व पाकिस्तानातून ८० लाख हिंदूंना बाहेर काढण्यात आले. पाकिस्तानातील सर्वच्या सर्व शीख व हिंदू निर्वासित होऊन भारतात आले. असंख्य स्त्रियांवर बलात्कार करण्यात आले आणि त्यांचे अपहरण करण्यात आले असंख्य मुले व पुरूष यांची क्रूर हत्या करण्यात आली.' अशा या उत्पातामध्ये संघ स्वयंसेवकांनी आपले प्राण पणाला लावून हिंदूंचे रक्षण केले. इस्लामी जिहादचा त्यांनी धैर्याने प्रतिकार केला. पश्चिम पंजाबमधील हिंदूंना सुरक्षितपणे पूर्व पंजाबमध्ये आणण्यासाठी स्वयंसेवकांनी या काळात अजोड कार्य केले. संघ स्वयंसेवकांच्या या अद्वितीय कामगिरीची प्रशंसा स्वतः सरदार वल्लभभाई पटेल यांनी केली आहे ते म्हणतात, की 'संघाच्या बहाद्दूर स्वयंसेवकांनी असंख्य निष्पाप स्त्रिया व मुले यांचे हिंमतीने संरक्षण केले आणि दुरदुरच्या भागातून त्यांना सुखरूपपणे भारतात आणले हे नाकारता येणार नाही.' ब्राईट यांनी 'गुरूजी गोळवलकर व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या पुस्तकात लिहले आहे की, संघाने या काळात रेडक्रॉसचे कार्य केले. स्वातंत्र्याच्या आगेमागे झालेल्या दंग्यांमध्ये धर्मांध मुसलमानांच्या आक्रमणापासून लोकांचे रक्षण करण्याचे महत्कार्य संघाने केले.

फाळणीमुळे निर्वासित झालेल्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा आदेश संघाचे तत्कालीन सरसंघचालक श्री. गोळवळकर गुरुजी यांनी स्वयंसेवकांना दिला. पंजाब प्रांताचे संघचालक रायबहद्दूर बद्रीदास यांच्या अध्यक्षतेखाली 'पंजाब सहायता समिती' स्थापन करण्यात आली डॉ. गोकुलचंद नारंग हे समितीचे कोषाध्यक्ष होते. या समितीचे मुख्यालय लाहोर येथे होते. याचप्रमाणे पूर्व बंगालमधील निर्वासितांसाठी 'वास्तूहारा समिती' स्थापन करण्यात आली होती.

### ९.४.९ मुस्लिम लीगची कारस्थाने व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय स्वातंत्र्याला नख लावण्यासाठी मुस्लिम लीगने एक महाभयानक कारस्थान रचले होते. दिल्लीत शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जमविण्यात आला. मुस्लिम लीगच्या अनेक कार्यकर्त्यांना घातपाताचे प्रशिक्षण देण्यात आले. अशावेळी राष्ट्रीय स्वयंसेवकांनी आपले प्राण धोक्यात घालून हा कट उघडकीस आणला.

भारतरत्न हा बहूमान सर्वप्रथम मिळविणारे डॉ. भगवानदास यांनी १६ऑक्टोंबर १९४८ रोजी लिहिले आहे - 'मुस्लीम लीगने १० सप्टेंबर १९४७ रोजी दिल्लीत सशस्त्र उठाव करून केंद्रिय मंत्री आणि प्रमुख शासकीय अधिकाऱ्यांच्या हत्येचा कट रचला होता. लाल किल्ल्यावर पाकिस्तानी झेंडा फडकवून हिंदूस्थान ताब्यात घेण्याचा हा कट होता सुदैवाने संघाच्या स्वयंसेवकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून या कटाची माहिती मिळविली. आणि ती नेहरू, पटेलापर्यंत पोहचवली. जर त्यांनी हे साहसपूर्ण कृत्य केले नसते तर सगळा देश पाकिस्तानचा गुलाम झाला असता. दिल्लीत भारत सरकारचे नावनिशाणही उरले नसते लाखो लोकांची कत्तल झाली असती आणि कोट्यावधी हिंदूंना बाटवून मुसलमान केले गेले असते.'

सप्टेंबर १९४६ मध्ये दिल्लीत केंद्रीय विधी मंडळाचे अधिवेशन चालू होते त्यावेळी केंद्रात काँग्रेस आणि  मुस्लिम लीग यांचे संयुक्त सरकार होते. या अधिवेशनाच्या वेळी मुस्लिम लीगच्या गुंडांनी निदर्शने करून काँग्रेस नेत्यांचा अपमान केला. दगडफेकही केली. दुसऱ्या दिवशी मुस्लिम लीगच्या गुंडांना जाग आला आणि त्यांची संख्या आणखी वाढली. काँग्रेस नेते देशबंधू गुप्ता यांनी संघ कार्यालयात जाऊन मदत मागितली. संघाच्या नेत्यांनी हे आव्हान स्वीकारले आणि अगदी अल्पावधीतच शेकडो स्वयंसेवक विधानभवनाच्या दिशेने धावले. त्यांना पाहून मुस्लिम लीगचे गुंड पळून गेले.

१९४६ साली नेहरू सिंधमधील हैद्राबाद येथे गेले. तेथे त्यांची एक जाहीर सभा ठेवण्यात आली होती. यावेळी ही मुस्लीम लीगचे गुंड तेथे गडबड करतील अशी भिती होती. त्या वेळेपर्यंत काँग्रेसने भारताच्या फाळणीचा प्रस्ताव मंजूर केलेला नव्हता. सिंधमध्ये संघकार्याचा बराच विस्तार झाला होता. त्यामुळे नेहरूंच्या सभेत संरक्षणासाठी काँग्रेस नेत्यांनी संघाच्या अधिकाऱ्यांकडे मदत मागितली. यावेळेही असंख्य स्वयंसेवकांच्या सहकार्यामुळेच ही सभा सुरळीतपणे पार पडली.

गांधीजी दिल्लीत भंगी वस्तीत वाल्मिकी मंदिरात रहात होते. तेथे जवळच मुस्लिम लीगचा अड्डा होता. तेथून गांधींजीवर हल्ला होणार असल्याची चिन्हे दिसत होती. गांधीजी पोलिसांचे संरक्षण घेत नसत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. यावेळी गांधीजींचे एक सहकारी कृष्णानायर यांनी दिल्लीचे त्यावेळचे प्रांत प्रचारक वसंतराव ओक यांच्याकडे मदत मागितली. त्यानुसार स्वयंसेवकांनी गांधीजींच्या निवास स्थानाभोवती अहोरात्र पहारा दिला. त्यांच्यामुळेच मुस्लिम लीगच्या गुंडांना गांधीजींवर हल्ला करण्याचा बेत पार पाडता आला नाही.

### ९.४.१० संस्थानांचे विलीनीकरण आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

भारताला स्वातंत्र्य देत असताना इंग्रजांनी कावेबाजपणाने सर्व संस्थांनाना स्वयंनिर्णयाचा अधिकार दिला. भारतात किंवा पाकिस्तानात विलीन व्हावयाचे अथवा स्वतंत्र राहावयाचे असा हा स्वयंनिर्णयाचा अधिकार होता. सर्व संस्थानांनी आपापले निर्णय घेतले परंतु जम्मू-काश्मीर, हैद्राबाद, जुनागढ येथील संस्थानिकांनी मात्र विलीनीकरणाला विरोध दर्शविला.

### १. जम्मू - काश्मीर

जम्मू काश्मीरचे महाराज हरिसिंह हे भारतात विलीन होण्याबाबत चालढकल करीत होते. पूर्वीच्या काळी नेहरूंनी त्यांच्या संस्थानाच्या कामात अनावश्यक हस्तक्षेप केला होता.

त्याचप्रमाणे काश्मीरमध्ये हिंदूप्रजा व खुद्द महाराज हरिसिंह यांच्या विरोधात नेहरूंनी शेख अब्दुल्ला यांना विशेष पाठिंबा दिला होता. ही दोन मुख्य कारेण त्यांना सतत बोचत होती. त्याचप्रमाणे भारत व काश्मीरला जोडणारे मार्ग फाळणीमुळे पाकिस्तानात गेले होते. त्यामुळे काश्मीरचे खोरे बाजूला तुटून एकाकी झाले होते. जम्मू काश्मीरचे भौगोलिक व सांस्कृतिक महत्व लक्षात घेऊन हे संस्थान भारतात विलीन व्हावे यासाठी स्वतः म. गांधी व सरदार पटेल यांनी प्रयत्न केले परंतु महाराज हीरसिंह यांच्या मनातील शंका ते दूर करू शकले नाहीत. शेवटी सरदार पटेलांनी श्री. गोळवलकर गुरूजींकडे मदत मागितली. श्री. गुरूजी तातडीने नागपूरहून दिल्लीला गेले व तेथे सरदार पटेलांची भेट घेऊन १७ ऑक्टोबर १९४७ रोजी श्रीनगरला गेले. भारत सरकारने त्यांच्या प्रवासासाठी विशेष विमानाची व्यवस्था केली होती. १८ ऑक्टोंबरला श्री. गुरूजींनी तेव्हाचे तेथील प्रांतप्रचारक माधवराव मुळे यांच्यासह महाराज हीरसिंह यांची भेट घेतली. यावेळी युवराज कर्णसिंह व संस्थानचे दिवाण मेहरचंद महाजन हे ही उपस्थित होते.

श्री. गुरूजींनी महाराज हरिसिंह यांना सांगितले - 'आपण हिंदूराजे आहात आपण पाकिस्तानात गेला तर आपल्या हिंदू प्रजेवर भीषण संकट येईल. सध्या हिंदुस्थान व काश्मीर यांना जोडणारे रस्ते व लोहमार्ग नसले तरी भावी काळात ती व्यवस्था होवू शकेल. आपण भारतात विलीन होण्यातच जम्मू-काश्मिरचे भले आहे.' श्री. गुरूजींच्या या प्रतिपादनामुळे हीरसिंह यांच्या सर्व शंका दूर झाल्या. आणि काश्मिरमधील हिंदू जनतेतही आत्मविश्वास निर्माण झाला. यामुळे पाकिस्तानी टोळ्यांच्या आक्रमणावेळी संघ स्वयंसेवकांच्या नेतृत्वाखाली काश्मीरमधील हिंदू समाज प्रतिकारासाठी उभा राहिला. तेथील विमानतळाचे रक्षण, भारतीय जवानांना सीमेवर दारूगोळ्याची कुमक पोहचविणे, पाकिस्तानी आक्रमकांचा प्रत्यक्ष प्रतिकार करणे. अशा विविध स्वरूपाचा पराक्रम स्वयंसेवकांनी तेथे गाजविला. त्यासाठी कित्येक स्वयंसेवकांनी बलिदानही केले.

**२. हैद्राबाद :**

हैद्राबाद संस्थान हे निजामी राजवटीखाली होते. महाराष्ट्रातील मराठवाडा, आंध्रप्रदेशातील तेलंगण व कर्नाटकातील काही भाग या संस्थानात होता. संस्थानातील ८५% प्रजा हिंदू होती. पण त्यांच्यावर कट्टर अशा इस्लामी निजामी राजवटीचा वरंवटा फिरत होता. ११ जून १९४७ रोजी निजामाने हैद्राबाद संस्थान स्वतंत्र राहील अशी घोषणा केली. निजामाचे ४० हजार सैन्य, व २ लाख रझाकार यांनी हैद्राबाद संस्थानात हिंदूंवर अनान्वित अत्याचार सुरू केले. निजामाच्या कार्यकारी परिषदेचे एक सदस्य जे.व्ही.जोशी यांनी त्यावेळच्या स्थितीचे वर्णन करताना लिहिले होते. 'परभणी आणि नांदेड जिल्ह्यात सर्वत्र भयानक अत्याचार सुरू आहेत. मी स्वतः विनाशाचे हे तांडव पाहिले. हिंदूंची हत्या केल्यावर त्यांचे डोळे काढण्यात आले. स्त्रियांवर बलात्कार करण्यात आले. आणि हजारो घरांची राखरांगोळी करण्यात आली ही दृश्ये पाहून रडू फुटले.'

हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे. यासाठी मोठा लढा उभारण्यात आला. विविध हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांबरोबरच १० हजार कॉंग्रेस कार्यकर्त्यांना तुरूंगात डांबण्यात आले. कम्युनिष्ठ पक्षाचे कार्यकर्ते मात्र रझाकारांना हिंदूविरूद्ध सहकार्य करीत होते. त्यांना निजामी राजवटीकडून हत्यारे पुरविण्यात येत होती. भारत देशाचा मध्यभाग असलेल्या हैद्राबाद संस्थानाच्या रूपाने एक भयंकर संकट उभे राहत होते. यावर मात करण्यासाठी

मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री प. रविशंकर शुक्ल आणि गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्र यांनी सरदार पटेल यांच्या प्रेरणेने प्रयत्न सुरू केले. भयभीत हिंदूंना दिलासा देण्यासाठी त्यांनी वऱ्हाड प्रांताचे संघाचे संघचालक बापूसाहेब सोहनी यांच्याशी संपर्क साधला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, आर्यसमाज यांनी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या प्रयत्नामुळे हिंदूंना पळवून लावण्यात रझाकार अपयशी ठरले. शेवटी सरदार पटेल यांच्या आदेशानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैन्याने हैद्राबादेत प्रवेश केला. रझाकारांबरोबर झालेल्या संघर्षात भारतीय जवानांनी १,२०० रझाकारांना ठार केले. १० जवानांनाही वीरमरण आले. हिंदू जनतेच्या सहकार्यामुळे केवळ ४८ तासामध्ये लष्करी कारवाई यशस्वी होऊन हैद्राबाद संस्थान भारतात विलीन होण्याचा मार्ग मोकळा झाला.

## ९.४.११ महात्मा गांधीजींची हत्या व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

स्वतंत्र भरतासमोर पहिला दु:खदायक प्रसंग आला तो म. गांधीजींच्या क्रूर हत्येचा दि. ३० जानेवारी १९४८ या दिवशी गांधीजींची हत्या झाली. हत्या करणारा माथेफिरू नथुराम गोडसे पिस्तुलासह पोलिसांना शरण गेला. ज्या अधिकाऱ्यांनी या घटनेचा तपास सुरू केला होता. त्यांना तात्काळ एक गोष्ट समजली की या हत्या प्रकरणात थोडेच लोक सहभागी आहेत. प्राथमिक तपासणीतच आरोप सुद्धा न ठेवता आल्यामुळे सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरूजी यांच्यावरील हत्येचा आरोप ६फेब्रुवारी १९४८ या दिवशी सरकारला मागे घ्यावा लागला. २६ फेब्रुवारीला तपासणीच्या संदर्भात आपली नाराजी व्यक्त करणाऱ्या नेहरूंच्या पत्राला सरदार पटेलांनी उत्तर पाठविले की, 'गांधीजींच्या हत्येच्या संदर्भात चालू असलेल्या कारवाईची मला पूर्ण माहिती आहे. स्पष्टपणे समोर येणारी गोष्ट अशी आहे की स्वयंसेवक संघाचा या घटनेशी काहीही संबंध नाही. (सरदार पटेल पत्र - व्यवहार - खंड ६ संपादक दुर्गादास)'

न्यायमूर्ती आत्माचरण यांच्या विशेष न्यायालयात दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्यात २६ मे रोजी खटल्याची सुनावणी झाली. त्यात आठ आरोपींच्या विरूद्ध आरोपपत्र दाखल केले होते. नथुराम गोडसे, त्यांचे भाऊ गोपाळ गोडसे, नारायण आपटे, विष्णु करकरे, मदनलाल पाहवा, शंकर किस्तैया, दत्ताराम परचुरे आणि विनायक दामोदर सावरकर हे ते आरोपी होते. दिगंबर बडगे हा माफीचा साक्षीदार झाला. १० जानेवारी १०४९ रोजी ११० पानांचा निकाल जाहीर झाला. सावरकरांना सन्मानासह मोकळे केले गेले. नथुराम गोडसे व नारायण आपटे यांना फाशी व अन्य पाच जणांना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली गेली. न्यायमूर्ती आत्माचरण यांनी गांधी हत्येमागे हजारों व्यक्तींचे कारस्थान असल्याचा आरोप पूर्णपणे फेटाळून लावला आणि हा निकाल जाहीर करताना नि:संदिग्ध शब्दात घोषणा केली की या कारस्थानात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मुळीच हात नाही.

पंजाब उच्च न्यायालयामध्ये झालेल्या अपिलाची न्यायमूर्ती भंडारी, अंछूराम आणि जी. डी. खोसला यांच्या त्रि. सदस्यीय खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यांनी परचुरे आणि किस्तैया यांना दोषमुक्त केले. यानंतर नथुराम गोडसे व आपटे या दोन गुन्हेगारांना १५ नोव्हेंबर १९४९ या दिवशी फाशी दिले गेली. विशेष न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या या निर्णयाने स्पष्ट शब्दात संघाला निर्दोष घोषित करण्यात आले.

पुढे १९ वर्षांनी इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यानंतर पुन्हा गांधीहत्येचे प्रकरण त्यांनी बाहेर काढले. १९६६ मध्ये पुन्हा नवीन पद्धतीने न्यायालयीन चौकशी करण्यासाठी आयोग स्थापन करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश टी.एल.कपूर यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. या आरोपाने १०१ जणांच्या साक्षी नोंदविल्या. ४०७ कागदपत्रांच्या पुराव्यांचा अभ्यास केला आणि १९६८ मध्ये आपला अहवाल सादर केला. कपूर आयोगाच्या समोर गांधी हत्येच्या वेळी केंद्रिय गृहसचिव असलेल्या आर.एन.बॅनर्जी यांची सर्वात महत्त्वपूर्ण साक्ष होती. त्यांनी स्पष्टपणे मान्य केले की, गांधीजींना मारणाऱ्या व्यक्ती संघाच्या सदस्य नव्हत्या.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचे परीक्षण करा.

## ९.५ सारांश

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थिर होत गेल्यानंतर १९व्या शतकात मुस्लिमांमध्ये सांप्रदायिकतेचा उदय झाला. परिणती म्हणजे १९४७ साली अखंड भारताचे तुकडे करून झालेली पाकिस्तानची निर्मिती होय. ही घटना भारताच्याच नव्हे तर आशिया खंडाच्या राजकारणावर भावी काळात परिणाम करणारी ठरली आहे. भारतातील या सांप्रदायिकतेच्या विकासाला केवळ हिंदू व मुस्लिम या दोन वर्गातील धार्मिक कारणच होते असे म्हणता येणार नाही तर त्यापेक्षा या देशात ब्रिटिशांच्या पाठिंब्याने खेळले गेलेले जातीय राजकारण जबाबदार होते. इंग्रज लोकांना मुस्लिमही जवळचे नव्हते व हिंदूही जवळचे नव्हते किंवा भारतीय लोकांचे हित साधण्याचे उद्दिष्ठही त्यांच्यापुढे नव्हते त्यांचे उद्दिष्ट फक्त ब्रिटिश साम्राज्यवाद जोपासणे हे होते. भारतातील आपले राज्य राखण्यासाठी ते कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार होते. त्यातीलच एक मार्ग होता तो म्हणजे ‘फोडा, झोडा व राज्य करा.’ हा मार्ग ब्रिटिशांनी भारतातील हिंदू व मुस्लिम यांच्याबाबत वापरला व त्यात ते यशस्वी झाले खरे पण मुस्लिम लीग या मुस्लिमांच्या स्वतंत्र संघटनेची स्थापना ब्रिटिशांच्या प्रेरणेनेच झाली. या मुस्लिम लीगच्या धोरणांना हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध केला. एवढेच नव्हें तर या संघटनांनी हिंदुस्थान हे हिंदूंचे राष्ट्र आहे अशी घोषणा केली. त्यामुळे मुस्लिम लीगच्या पाकिस्तान मागणीला आणखीनच धार चढली. हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या हिंदूत्ववादी संघटनांपेक्षा मुस्लिम लिग आपल्या मागणीपासून तसूभरही मागे सरली नाही त्यामुळेच ब्रिटिशांना भारताची फाळणी करावी लागले आणि या फाळणीला या हिंदूत्वादी संघटनांनी मुकसंमती दिली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

## ९.६ प्रकरणातील महत्त्वाचे प्रश्न

१. मुस्लिम सांप्रदायिकतेच्या उदयाची कारणे सागा.
२. पाकिस्तानच्या निर्मितीस कोणती कारणे कारणीभूत ठरली ते सांगा.
३. द्विराष्ट्र सिद्धांताची टीकालक यांची चर्चा करा.
४. हिंदू महासभेविषयी माहिती लिहा.
५. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

❖❖❖❖

# १०

# म. गांधीजींचे जनआंदोलन

# Gandhian Mass Movement

**अनुक्रमणिका**

१०.० उद्दिष्ट्ये

१०.१ प्रस्तावना

१०.२ म. गांधीजींचे पूर्व चरित्र

१०.३ म. गांधीजींचे तत्त्वज्ञान - सत्याग्रहाचे मार्ग

१. सत्य २. अहिंसा ३. सत्याग्रह

१. असहकार २. सविनय कायदेभंग ३. स्वदेशी ४. बहिष्कार ५. हरताळ

१०.४ म. गांधीजींचे भारतातील सुरूवातीचे कार्य

१. चंपारण्य सत्याग्रह २. अहमदाबादमधील गिरणी कामगार प्रश्न ३. खेडा सत्याग्रह

१०.५ असहकार चळवळ

१०.५.१ असहकार चळवळीची कारणे

१. पहिल्या महायुद्धाचा प्रभाव

२. आर्थिक परिस्थिती

३. दुष्काळ आणि प्लेग

४. महायुद्धासाठी सैन्य व संपत्ती जप्त करण्याचे धोरण

५. जालियन वाला बाग हत्याकांड

६. रौलेट ॲक्ट

९. खिलाफत चळवळ

१०. मॉटेग्यू-चे म्सफोर्ड कायद्यामुळे असंतोष

१०.५.२ ठराव

१. असहकाराचा जाहीरनामा २. कलकत्ता अधिवेशन ३. नागपूर अधिवेशन

१०.५.२ असहकार चळवळीचा ठराव व कार्यक्रम

१०.५.३ असहकार चळवळीची वाटचाल

१०.५.४ असहकार चळवळीचा शेवट

१०.५.५ म. गांधीजींनी असहकार चळवळ मागे का घेतली

१०.५.६ असहकार चळवळीचे महत्त्व

१०.६ सारांश

१०.७ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

## १०.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

- म. गांधीजींच्या पूर्वचरित्राचीमाहिती सांगता येते.
- म. गांधीजींच्या तत्त्वज्ञाना विषयी माहिती घेता येते
- म. गांधीजींचे भारतातील सुरवातीचे कार्य सांगता येते.
- असहकार चळवळीची विविध कारणे सांगता येते.
- असहकार चळवळीची वाटचाल विशद करता येते.
- असहकार चळवळीचे भारताच्या इतिहासातील महत्त्व सांगता येते.
- म. गांधीजींनी असहकार चळवळ मागे का घेतली ते सांगता येते.

## १.१.१ प्रास्ताविक

रविंद्रनाथ टागोर यांनी म. गांधीजींबद्दल असे म्हटले आहे की, 'असाधुतेशी साधुत्वाने कसे झगडावे याची शिकवण देणारा हा एक महामानव होता' भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात गांधींनी ब्रिटिशांविरूद्ध जी लढ्याची पद्धत वापरली, जे योगदान दिले त्याला इतिहासात तोड नाही. १९२० ते १९४७ या प्रदीर्घ कालखंडात त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी या काळात केलेल्या अलौकिक कर्तृत्वामुळे या कालखंडाला 'गांधीयुग' असे संबोधण्यात येते. लो. टिळकांच्या मृत्युनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीजींकडे आले. सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिशांविरूद्ध लढा दिला.

म. गांधीजींचे जीवनचरित्र हेच एक आदर्श तत्त्वज्ञान होते. सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, कणखरपणा, परमसहिष्णुता, विनम्रपणा, आदर्शवाद, व्यवहारचातुर्य, शिस्तप्रिय, दीन दुबळे आणि अस्पृश्यांबद्दलची कळकळ इ. गुण त्यांच्या अंगी होते. शुद्ध चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाची सवय हे त्यांचे अंगभूत गुण होते. सत्य, अहिंसा ही तत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पाया होती.

आधुनिक भारताच्या इतिहासात १९२० हे वर्षे महत्त्वाचे ठरते. या वर्षी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवे वळण लागले. एवढेच नव्हें तर भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर असलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यपद्धतीला नवी दिशा मिळाली. १९२० साली टिळकांच्या मृत्युनंतर काँग्रेसचे नेतृत्व गांधींकडे आले. १९२० पासून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी गांधीजींनी अविरतपणे कार्य केले. भारतात आल्यानंतर सुरूवातीच्या काळात गांधीजींचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. ब्रिटिशांना सहकार्य करून भारताची प्रगती साध्य करता येईल म्हणून सनदशीर मार्ग योग्य आहे, असे त्यांचे मत होते. परंतु त्यांना असहकार चळवळीची घोषणा १९२० साली करावी लागली त्यामुळे भारतात असहकार चळवळ सुरू झाली परंतु चौरीचौरा प्रकरणानंतर त्यांना हि चळवळ थांबवावी लागली.

## १०.२ म. गांधीजींचे पूर्वचरित्र

आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधी (मोहनदास करमचंद गांधी) या राजकीय संतांचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर, १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर या ठिकाणी झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे राजकोट संस्थानचे दिवाण होते. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी माध्यमिक शिक्षण सुरू असताना कस्तुरबा यांच्याशी झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबई विश्वविद्यालयात झाले. १८८८ ते १८९१ या दरम्यान त्यांनी इंग्लंडमध्ये वकीलीचे शिक्षण पूर्ण केले. १८८१ साली ते बॅरिस्टरची पदवी घेऊन भारतात आले. त्यानंतर त्यांनी मुंबई व राजकोट या ठिकाणी वकीलीचा व्यवसाय सुरू केला. या काळात त्यांची मैत्री रामचंद्र रावजी भाई यांच्याशी झाली. भारतीय राजकारणाची ओळख म. गांधींना त्यांच्याकडूनच झाली. म. गांधीजींच्या जीवनावर त्यांच्या तत्त्वज्ञानाचा चांगलाच परिणाम झाला होता.

इ.स. १८९३ साली म. गांधी वकीलीच्या व्यवसायासाठी दक्षिण आफ्रीकेत गेले. तेथे त्यांना अनेक बऱ्या-वाईट गोष्टींना सामोरे जावे लागले. काळा - गोरा वर्णभेद तेथे त्यांना जाणवला. युरोपियन गोऱ्या लोकांनी काळ्या लोकांवर जी वर्णभेदाची निती चालविली होती. त्याविरूद्ध आवाज उठविण्याचा निर्णय म. गांधींनी घेतला. त्यांनी सत्याग्रहाचा वापर सर्वप्रथम दक्षिण आफ्रीकेत केला. दक्षिण आफ्रीकेत गोऱ्या सरकारने काळ्या लोकांवर तसेच भारतीय लोकांवर विविध प्रकारची बंधने लादली होती. या लोकांना मताधिकार नव्हता. तसेच त्यांना राखून ठेवलेल्या विशिष्ट भागातच वास्तव्य करावे लागत होते. भारतीय लोकांनी आपली ओळखपत्रे सतत जवळ बाळगावित असा कायदा होता. या ओळखपत्रांवर गुन्हेगारांप्रमाणे त्यांच्या बोटांचे ठसे घेतले जात असत. तसेच भारतीय लोकांवर जिझिया कर, (पोल टॅक्स) म्हणून वार्षिक ३ पौंड देण्याची सक्ती केली जाई. एवढेच नव्हे तर येथील सरकारने हिंदू, मुस्लिम व पारशी रितीरिवाजानुसार झालेले विवाह अवैद्य ठरविले. त्यामुळे त्यांची मुले अनौरस ठरली गेली. या सर्व अन्यायी व अपमानकारक कायद्याविरूद्ध गांधींनी लढा दिला. त्यांनी आफ्रिकेत १९०६ पासून ब्रिटिशांविरूद्ध चळवळ सुरू केली. त्यांनी तेथे भारतीय लोकांची 'नाताळ इंडियन काँग्रेस' नावाची संघटना स्थापन केली व 'इंडियन ओपिनियन' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. ब्रिटिश सरकारने गांधींची ही चळवळ दडपुन टाकण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी आफ्रीकन सरकारने पोल टॅक्स, ओळखपत्रे, विवाह वैधता कायदा रद्द करणे या गांधींच्या मागण्या मान्य केल्या. गांधीजींच्या सत्याग्रहाला मिळालेला हा पहिला विजय होता.

इ.स. १९१५ साली द. आफ्रीकेतून भारतात परत आल्यानंतर गांधीजी काँग्रेसच्या अधिवेशनाला हजर राहिले. परंतु राजकीय क्षेत्रात सक्रीयरित्या पदार्पण करण्यापूर्वी देशातील परिस्थिती नजरेखालून घाला या त्यांच्या राजकीय गुरुंच्या म्हणजे नामदार गोखल्यांच्या सल्ल्यावरून त्यांनी भारतातील निरनिराळ्या भागांचा दौरा केला. यावेळी त्यांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, भारतातील सर्वात जास्त समाज शहरात नसून खेड्यात आहे. १९१६ साली त्यांनी अहमदाबादला साबरमतीच्या परिसरात एक आश्रम स्थापन केला. व तेच आपल्या कार्याचे प्रमुख केंद्र बनविले.

## १०.३ म. गांधीजींचे सत्याग्रह तत्त्वज्ञान

सत्य व अहिंसा ही तत्त्वे म. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा मुख्य पाया होती.

**१. सत्य**

म. गांधीजींच्या विचारांचा मूलभूत पाया म्हणजे सत्य होय. सत्य म्हणजे खरे होय. सत्य आणि अहिंसा ही तत्त्वे परस्परांना पुरक अशी आहेत. सत्य हे साध्य व अहिंसा हे साधन आहे. सत्य ही मानवी जीवनातील एक आदर्श संकल्पना आहे. सत्याच्या ठिकाणीच परमेश्वराचे अधिष्ठान असते. असे गांधीजी म्हणत असत. समाजात नितिमत्ता निर्माण करण्यासाठी त्यांनी या तत्वाचा वापर केला.

**२. अहिंसा :**

म. गांधीजींच्या जीवनचरित्रात अहिंसा या तत्वास अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. गांधीजींना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य व अहिंसा या दोन गोष्टी महत्त्वपूर्ण वाटत होत्या. कोणत्याही प्राण्याला विचार, उच्चार आणि आचार या तिन्ही गोष्टीने न दुखविणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसा म्हणजे मनुष्याच्या अंतकरणात आणि नैतिक प्रवृत्तीत असलेला तो एक कार्यप्रवण गुण आहे. अहिंसे शिवाय सत्याचा शोध अशक्य आहे. हिंसेला प्रवर्तक यात अहिंसावादी वृत्ती टिकविणे हिच अहिंसावादाची खरी कसोटी आहे. असे गांधीजीं म्हणत असत.

**३. सत्याग्रह**

सत्याग्रह म्हणजे जे सत्य असेल त्याचा आग्रह धरणे होय. सत्याग्रहाला गांधीजींच्या विचारसरणीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. गांधीजींनी द. आफ्रिकेत वर्णभेदाविरूद्ध जेव्हा लढा दिला त्यावेळी त्यांचे कर्मयोगाचे तत्त्वज्ञान सत्याग्रहाच्या रूपाने आकाराला आले. सत्याग्रहाची दोन मुलतत्त्वे म्हणजे सत्य व अहिंसा ही होय. सत्य व अहिंसा या दोघांच्या समन्वयातून जन्माला येणारी तिसरी शक्ती म्हणजे सत्याग्रह होय. अशी गांधीजी सत्याग्रहाची व्याख्या करीत असत. गांधीजींच्या मते, सत्याग्रह व प्रत्यक्ष कृतीच्या सर्वांत प्रभावी मार्ग आहे. इतर सर्व मार्ग नष्ट झाल्यावर या मार्गाचा अवलंब करावा. परिस्थिती कितीही क्षोभजनक असली तरी सत्याग्रही मात्र शांत असतो. सत्याच्या विजयासाठी तो अखंडपणे अहिंसात्मक मार्गाने लढत असतो. गांधीजींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या सत्याग्रह या चळवळीला धर्माचे अधिष्ठान होते. सत्य व अहिंसेच्या सहाय्याने दृष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय. प्रस्थापित कायद्याला उघडपणे किंवा सामुदाईकरित्या भंग करणे हे त्यांच्या कार्यक्रमाचे प्रमुख अंग होते. सत्याग्रही माणसाने सत्याग्रह यशस्वी होण्यासाठी भीती, द्वेष व असत्य यांचा त्याग केला पाहिजे दुष्कर्म करणाऱ्यांची सदसदविवेकबुद्धी जागृत करून सत्यापुढे त्यास नमते घेण्यास भाग पाडणे, सत्य स्वीकारण्यास भाग पाडणे हे सत्याग्रहाचे अंतिम सुत्र आहे.

**४. सत्याग्रहाचे मार्ग**

म. गांधीजींच्या सत्याग्रहाचे मार्ग पुढीलप्रमाणे होते -

**१. असहकार :**

म. गांधीजींकडे स्वातंत्र्य-चळवळीचे ज्यावेळी नेतृत्व आले त्यावेळी त्यांनी सर्वप्रथम ब्रिटिशांविरोधात असहकार या मार्गाचा अवलंब केला. कोणतेही शासन जनतेच्या

सहकार्यावरच चालत असते, जनतेने सहकार्य केले नाही तर कोणतेही शासन चालणार नाही म्हणून ब्रिटिश सरकारला भारतीय जनतेने कोणतेही सहकार्य करू नये अशी भूमिका त्यांनी मांडली. सहकार या तंत्रामागे सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देणे व जी सत्य स्थिती आहे ती स्वीकारावयास लावणे हे मुख्य सुत्र आहे. शासनाने केलेला अन्याय, शोषण व जुलूम नष्ट करण्यासाठी असहकार हे अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. राजकीय क्षेत्रातच नव्हे तर जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात असहकाराच्या मार्गाचा अवलंब करावा असे ते म्हणत. असहकाराचा लढा हा अहिंसक लढा आहे.

### २. सविनय कायदेभंग

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील दुसरा महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे सविनय कायदेभंग होय. सरकारने जर जनतेच्या विरोधात जुलमी व अन्यायी कायदे केले तर त्या कायद्यांचा सविनयपणे भंग करणे योग्य असते. सरकारने केलेले अन्यायी कायदे मोडण्याचा अधिकार जनतेला असतो. मात्र हे करीत असताना अहिंसेचा आधार घेणे आवश्यक असते. सामुदाईकपणे ज्यावेळी कायदेभंग केले जातात त्या ठिकाणी मात्र हिंसा होण्याची शक्यता असते. परंतु ज्यावेळी या चळवळीची पूर्ण माहिती व सवय लोकांना होईल. त्यावेळी मात्र हिंसेवर आपोआप नियंत्रण येईल. जोपर्यंत सरकार अन्यायी व जुलमी कायदे रद्द करीत नाही व आपणास अपेक्षीत न्याय मिळत नाही तोपर्यंत हा लढा चालू ठेवता येतो. या चळवळीत कोणत्याही शस्त्रास्त्रांचा वापर न करता संयम, अहिंसा, विवेक या तत्त्वांच्या आधारे लढा चालविला जातो.

### ३. स्वदेशी :

लो. टिळकांनी आपल्या स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी या तत्त्वाचा वापर केला, असला तरी गांधीजींची ही लोकप्रिय चळवळ होती. गांधीजींची स्वदेशी ही चळवळ राजकीय चळवळीप्रमाणेच सामाजिक व आर्थिक प्रश्नांशी निगडीत होती. भारतातील बहुतांशी समाज खेड्यात राहतो याची गांधींना जाणीव होती. या लोकांचे मागसलेपणा, दारिद्र्य, बेकारी या सर्व गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. खेड्यातील समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी या चळवळीचा त्यांनी उपयोग केला. आपल्या लोकांना रोजगार व स्वस्त दराने वस्तुंचा पुरवठा यामुळे खेड्यातील दारिद्र्यावर उपाययोजना होण्यास मदत होणार होती. त्यासाठी त्यांनी खादी ग्रामोद्योग सुरू करण्यास चालना दिली. स्वंयरोजगारास प्रोत्साहन दिले. सर्व लोकांनी स्वदेशी वस्तुंचा वापर करावा. त्यासाठी खेड्यांमध्ये निरनिराळे उद्योग सुरू व्हावेत अशी त्यांनी स्वदेशीची चळवळ सुरू केली.

### ४. बहिष्कार :

महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीसाठी बहिष्कार या साधनाचासुद्धा वापर केला. ब्रिटिश सरकारला राज्यकारभार करणे अवघड जावे व राज्यकारभाराच्या अपयशातून, असहकारातून ब्रिटिश शासन हतबल होईल व भारतीय लोकांना स्वातंत्र्य देईल असा म. गांधीजींचा विश्वास होता. म्हणून त्यांनी बहिष्काराचे अस्त्र वापरले. १९२० ते १९३० या काळात म. गांधींच्या मार्गदर्शनाखाली भारतीय लोकांनी शासकीय कचेऱ्या, शाळा-महाविद्यालये, न्यायालये, शासकीय कार्यक्रम, कायदेमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, विदेशी वस्त्र आदींवर बहिष्कार टाकला होता. मात्र या बहिष्कार चळवळीतही अहिंसा तत्त्वाचे पालन करावे असे गांधीचे मत होते.

**५. हरताळ:**

हरताल म्हणजे संप होय. याचा अर्थ कामकाजावर बहिष्कार घालून काम बंद पाडणे असा होतो. कामगार, शिक्षक, विद्यार्थी, व्यापारी यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध या तंत्राचा वापर करावा असे गांधीजींनी सुचविले होते. हरताळात कसल्याही प्रकारची हिंसा घडत नाही. तर प्रतिपक्षावर दडपण येते. हरताळामध्ये प्रत्येक व्यक्तीने स्वेच्छेने व उत्फूर्तपणे सर्व प्रकारचे व्यवहार बदं ठेवले पाहिजेत. यामध्ये कसल्याही प्रकारची सक्ती झाली तर हरताळ यशस्वी होत नाही. तसेच हरताळ पुन्हा पुन्हा करावयाचा नसतो कारण त्यामुळे जनजीवन विस्कळीत होते. आणि जनतेचा हरताळास पाठींबा रहात नाही.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म. गांधीजींनी ब्रिटिश सरकार विरोधात याच शस्त्रांचा वापर केला. या तत्त्वाधारेनेच त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. गांधीजींच्या सत्याग्रह तत्वज्ञाचा थोडक्यात आढावा घ्या.

## १०.४ म. गांधीजींचे भारतातील सुरूवातीचे कार्य

महात्मा गांधीजींनी भारतात आल्यानंतर सुमारे दोन वर्षे संपूर्ण भारताचे भ्रमण केले. या दौऱ्यात त्यांना असे दिसून आले की, खरा भारत हा शहरात नसून खेड्यात आढळतो. शहरी समाज हा खरा भारतीय समाज नसून ग्रामीण भागातील शहरातील बकाल वस्त्यातील, प्रतिष्ठित समाजाच्या कक्षेबाहेर राहणारा समाज हाच भारतीय समाज आहे. जवळजवळ ९०% भारतीय जनता मागासलेली व अशिक्षित असल्यामुळे, त्यांच्यात जागृती करावयाची असेल तर प्रथम त्यांचा विश्वास प्राप्त करण्यासाठी व त्यासाठी त्यांच्या जीवनपद्धतीशी समरसच नव्हे तर एकरूप होऊन कार्य करण्याची गरज त्यांना वाटली. त्यामुळेच त्यांनी आपला वेश व जीवनपद्धती बदलली आणि समाज सेवेचे व्रत हाती घेतले.

**१. चंपारण्य सत्याग्रह (१९१७)**

म. गांधीजींनी भारतात सत्याग्रह या शस्त्राचा वापर प्रथम बिहारमधील चंपारण्य या ठिकाणी केला. १९व्या शतकाच्या प्रारंभी युरोपीयन मळेवाल्यांनी चंपारण्य येथील शेतकऱ्यांबरोबर त्यांच्या जमिनीच्या तीन वीसांश क्षेत्रावर निळीची लागवड करण्याची सक्ती करणारे करार केले होते. या करारांना 'तीनकथिया पद्धत' असे म्हटले जाते. युद्धोत्तर काळात निळीचे भाव उतरलेले असतानाही बिहारमधील शेतकऱ्यांवर निळीचे उत्पादन करण्याची सक्ती केली जात होती. या काळात नीळ कामगारांवर केल्या जाणाऱ्या अमानवी अन्यायाचे प्रतिबिंब 'नीलदर्पन' सारख्या साहित्यातून उमटू लागले होते. अशावेळी चंपारण्यामधील

राजकुमार शुक्ला या स्थानिक पुढाऱ्याने गांधीजींची भेट घेऊन हा प्रश्न सोडविण्याची विनंती केली. गांधीजी ज्यावेळी चंपारण्य या ठिकाणी आले त्यावेळी तेथील ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्याने त्यांना चंपारण्य सोडून जाण्याचा आदेश दिला. परंतु गांधीजींनी हा आदेश 'अमान्य' करून खटल्यास तोंड देऊन तुरूंगात जाण्याची तयारी दर्शविली. तेव्हा ब्रिटिश सरकारने गांधीजींसमोर नमते घेऊन शेतकऱ्यांची चौकशी करण्याची परवानगी दिली. ब्रिजकिशोर, राजेंद्र प्रसाद, महादेव देसाई, नरहरी पारिख व जे.बी. कृपलानी या तरुण सहकाऱ्यांना घेऊन त्यांनी सर्व खेड्यांना भेटी दिल्या. त्यांनी एका दिवसात सर्व शेतकऱ्यांकडून निवेदने जमवली. शेवटी ब्रिटिश सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीत गांधीजी हे एक सदस्य होते. या समितीने केलेल्या शिफारसीनुसार चंपारण्यामधील शेतकऱ्यांवरील अन्याय दूर झाला.

### २. अहमदाबादमधील गिरणी कामगारांचा प्रश्नः

अहमदाबाद येथील कापड गिरणी मालक व गिरणी कामगार यांच्यात 'प्लेग बोनस' या प्रकरणावरून वाद निर्माण झाला प्लेगची साथ संपल्यामुळे कामगारांना प्लेग बोनस दिला जाणार नाही अशी भूमिका गिरणी मालकांनी घेतली होती. तर प्लेग बोनस सुरू रहावा अशी भूमिका कामगारांची होती. हा प्रश्न विकोपाला जाऊ नये म्हणून तेथील ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्याने गांधीजींना मध्यस्थी करण्यासाठी विनंती केली. अहमदाबादमधील गिरणी मालक अंबालाल साराभाई गांधीजींचे चांगले मित्र होते. त्यांनी गांधीजींना साबरमती आश्रमासाठी आर्थिक मदतही केली होती. गांधीजींच्या आग्रहाखातर त्यांनी हे प्रकरण लवादाकडे तडजोडीसाठी सोपविण्याचे मान्य केले. परंतु गिरणी कामगारांनी त्या दरम्यान एक छोटासा संप केला म्हणून गिरणी मालकांनी हा समझोता नाकारला. गिरणी मालकांनी प्लेग बोनसच्या वीस टक्के रक्कम कामगारांना देण्याचे मान्य केले. जे कामगार ही रक्कम स्वीकारणार नाहीत त्यांना कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली. गांधीजींच्या सल्ल्यावरून कामगारांनी संप पुकारला. तरीसुद्धा गिरणी मालकांनी कामगारांकडे लक्ष दिले नाही. शेवटी गांधींनी स्वतः उपोषण सुरू केले परिणामी चौथ्या दिवशी गिरणी मालकांनी हे प्रकरण लवादाकडे सोपविण्याची तयारी दर्शविली. कामगारांनीही संप मागे घेतला. पुढे लवादाने कामगारांनी मागणी केलेली ३५% वाढ मंजुर केली.

### ३. खेडा सत्याग्रह (१९१८)

अहमदाबादमधील संप सुरू असतानाच गुजरातमधील खेडा जिल्ह्यात दुष्काळ पडला. तेथील पिके नष्ट झाल्याने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला. तेथील परिस्थिती भयानक असतानाही ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांवर शेतसारा देण्यासाठी सक्ती केली होती. शेतकऱ्यांनी शेतसाऱ्यात सुट मिळावी म्हणून ब्रिटिश सरकारकडे विनंती केली होती. परंतु सरकारने त्यांची दखल घेतली नाही. त्यावेळी गांधीजी व भारत सेवक समाजाचे सभासद विठ्ठलभाई पटेल यांनी शेतकऱ्यांची चौकशी करून त्यांची मागणी योग असल्याचे ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले. परंतु सरकारने या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. अशावेळी गांधीजी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिले. त्यांनी शेतकऱ्यांना शेतसारा भरू नका असा आदेश दिला. खेडा जिल्ह्यातील तरुण वकील सरदार वल्लभभाई पटेल व इंदूलाल याज्ञिक यांनी या चळवळीत गांधीजींना सहकार्य केले. पुढे ब्रिटिश सरकारने या सत्याग्रहाची दखल घेऊन खेडा येथील शेतकऱ्यांना शेतसारा देण्याबाबत सवलत दिली.

अशाप्रकारे निरनिराळ्या प्रश्नांवरून म. गांधींनी ठिकठिकाणी केलेल्या सत्याग्रहाला यश मिळत गेल्याने त्यांच्या भोवती लोकप्रियतेचे वलय निर्माण झाले. त्यामुळे गांधीजींचे नेतृत्व प्रभावी ठरले .

## १०.५ असहकार चळवळ

२०व्या शतकाचे दुसरे दशक हे क्रांतिकारी दशक म्हणून ओळखले जाते. कारण दुसऱ्या दशकाच्या सुरूवातीलाच भारतीय स्वातंत्र्य चळवळीला खऱ्या अर्थाने नवी दिशा मिळाली. १९२० साली लो. टिळकांच्या मृत्युनंतर रिकामे झालेले काँग्रेस संघटनेतील महत्त्वपूर्ण स्थान गांधीजींकडे आले. ज्या वेळी लो. टिळकांचा मृत्यु झाला त्याच वेळी गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय पातळीवर असहकार आंदोलनाला प्रारंभ झाला.

### १०.५.१ असहकार चळवळीची कारणे.

**१. पहिल्या महायुद्धाचा प्रभाव :**

पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रोविल्सन यांनी स्वंयनिर्णयाचे तत्त्व जाहीर केले होते. एवढेच नव्हें तर युद्धात विजय मिळाल्यास जगातील सर्व राष्ट्रांना लोकशाहीच्या दृष्टीने सुरक्षित बनवू असे आश्वासन त्यांनी दिले होते. म्हणून भारतीय लोकांनी या युद्धात ब्रिटिशांना सर्वोतोपरी सहकार्य केले होते. तरीही भारतीयांच्या पदरात काहीही पडले नाही. भारतात ब्रिटिशांबद्दल असंतोषाची लाट उसळली. युद्धानंतर चीन आणि मध्य पूर्वेतील काही देशांमध्ये राष्ट्रवादाचा प्रचार आणि प्रसार झपाट्याने झाला. भारतातही राष्ट्रवादाची मुळे घट्ट होऊ लागली. नेमके याच वेळी महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला एक नवीन दिशा दिली.

**२. आर्थिक परिस्थिती :**

पहिल्या महायुद्धात लाखो रू. खर्च झाले होते. ब्रिटिशांनी युद्ध शस्त्रास्त्रांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली होती. हा खर्च भागविण्यासाठी भारतीय जनतेवरील कर आकारणी वाढविण्यात येऊ लागली. युरोप पेक्षा भारतात मोठ्या प्रमाणात महागाई वाढली. वस्तुंचा तुटवडा भासू लागल्यामुळे दुकानदारांना फार मोठ्या प्रमाणात नफा मिळत होता. असे असतानासुद्धा सरकारने वस्तुंचे भाव निश्चित करण्याकडे अजिबात लक्ष दिले नव्हते. म्हणून जनतेमध्ये सरकारविरूद्ध असंतोषाची लाट निर्माण झाली. डिसें.१९१८ मध्ये मुंबईच्या गिरण्यांमध्ये कामगारांनी संप पुकारले. जाने. १९१९ पर्यंत १ लाख २५ हजार कामगारांनी या संपात सहभाग घेतला. अनेक भुखेलेल्या लोकांनी बाजार लुटले. तरीही ब्रिटिश सरकार ठोस पाऊले उचलत नव्हते.

**३. दुष्काळ आणि प्लेग :**

१९१७ साली पाऊस योग्य प्रमाणात न पडल्यामुळे भारतीय लोकांना दुष्काळाला सामोरे जावे लागले. ब्रिटिश सरकारने दुष्काळग्रस्त लोकांना कसल्याही प्रकारचे सहाय्य केले नाही. यातच प्लेगच्या साथीने व साथीच्या रोगांनी थैमान घातले. यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले. सरकारने प्लेगच्या साथीचे निर्मुलन करण्यासाठी पुरेशी उपाय योजना केली नाही म्हणून भारतीय लोकांच्या मनात ब्रिटिश सरकारबद्दल असंतोषाचा अग्नी धुमसू लागला.

**४. महायुद्धासाठी सैन्य व संपत्ती जमा करण्याचे धोरण :**

सरकारने पहिल्या महायुद्धासाठी संपत्ती आणि लष्करात सैन्य भरती करण्यासाठी जे धोरण राबविले ते चुकीचे होते. लोकांकडून जबरदस्तीने संपत्ती जमा केली जात होती. तर गावोगावी फिरून जबरदस्तीने लोकांना लष्करात भरती केले जात होते. सरकारच्या या धोरणामुळे जनतेत असंतोष पसरला होता. जेव्हा महायुद्ध संपले त्यावेळी अनेक भारतीय अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावरून दूर करण्यात आले. त्यामुळे त्यांना जगणे असह्य झाले. त्यांची पूर्ण खात्री झाली की, ब्रिटिश सरकार हे पूर्णपणे स्वार्थी आहे, कामापुरते लोकांचा वापर करून घेते. त्यांना भारतीय जनतेशी कसलेही देणे-घेणे नाही.

**५. सरकारचे दडपशाही धोरण:**

वरील सर्व कारणांमुळे भारतात जो ब्रिटिशांविरूद्ध असंतोष निर्माण झाला होता तो राजकीय कारणांमुळे आणखीनच वाढला. लॉर्ड चेम्सफर्डच्या काळात भारतामध्ये ज्या काही राष्ट्रीय चळवळी सुरू झाल्या त्या कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने ब्रिटिश सरकारने दडपून टाकल्या. प्रेस ॲक्ट आणि सेडिशन ॲक्ट या कायद्यांच्या माध्यमातून त्यांनी जनतेवर अन्या केला. बंगालमध्ये तर सरकारी अधिकाऱ्यांच्या दडपशाहीमुळे तेथील जनता मेटाकूटीला आली होती. श्रीमती ॲनी बेंझट यांना सरकारने नजरकैद केले तर अली बंधुंच्या विरूद्ध सरकारने केलेल्या कारवाईमुळे जनतेमध्ये आणखीनच असंतोष निर्माण झाला. पंजाबमध्ये सर मायकल ओडवायरने सर्व राजकीय हालचालींना पायबंद घातला. त्याने लो. टिळक व बिपिनचंद्र पाल यांना पंजाबमध्ये प्रवेश नाकारला होता.

**६. रौलेट ॲक्ट :**

भारतातील क्रांतिकारी संघटनांच्या कार्याची माहिती गोळा करण्याच्या आणि त्यांच्या कारवायांना आळा घालण्याच्या उद्देशाने उपाययोजना सुचविण्यासाठी सिडने रौलेक्ट या न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचा निर्णय १९१७ च्या अखेरीस भारत सरकारने घोषित केला होता. एप्रिल १९१८ साली रौलेट समितीने आपला अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला. या अहवालातील शिफारशी नुसार केंद्र सरकारने फेब्रुवारी १९१९ मध्ये दोन विधेयके केंद्रीय विधीमंडळापुढे मांडली. राजद्रोहाच्या गुन्ह्यासाठी अटक करण्यात आलेल्या व्यक्तींवरील खटले चालविण्यासाठी तीन न्यायाधिशांचे खास न्यायपीठ स्थापन केले जावे त्या न्यायपिठात ज्युरी असू नयेत. या न्यायासनाचा निकाल अंतिम मानला जावा तसेच संशयित इसमांना कारण न सांगता अटक करण्याचा व त्यांच्यावर खटला न भरता कितीही दिवस तुरूंगात डांबून ठेवण्याचा अधिकार सरकारला असावा अशा या विधेयकातील दोन तरतुदी होत्या. प्रखर विरोध होत असतानाही १८ मार्चला अनार्किकल ॲन्ड रिव्हॉल्युशनरी क्राईम ॲक्ट (रौलेट अक्ट) हा कायदा पास केला.

हा कायदा पास झाल्यानंतर गांधीजींनी भारताचा गव्हर्नर जनरल चेम्सफर्ड याला २४ लोकांच्या सह्यांचे निवेदन देऊन या कायद्याविरूद्ध अहिंसक लढा करण्याचा निर्णय कळविला. ३० मार्च १९१९ हा अखिल भारतीय सत्याग्रहाचा दिवस ठरला. त्या दिवशी हरताळ पाळून उपवास, निषेध असा कार्यक्रम ठरविण्यात आला. परंतु सर्व देशभर हे निवेदन वेळेत न पोहचल्याने ३० मार्च हा दिवस बदलून ६ एप्रिल हा दिवस निश्चित करण्यात आला. असे असले तरी या दोन्ही दिवशी सर्व देशभर या कायद्याविरूद्ध निषेध नोंदविण्यात आला. दिल्लीमध्ये स्वामी श्रद्धानंद व हकिम अजमल खान यांनी ३० मार्चला मोर्चा काढला त्यावर ब्रिटिश

सरकारने गोळीबार केला. अनेक लोक जखमी झाले. पंजाबमध्ये डॉ. सत्यपाल यांच्या नेतृत्वाखाली तर मुंबईला म. गांधी व सरोजिनी नायडू यांनी ६ एप्रिलला सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

दिल्ली व अमृतसर येथिल लोकांच्या निमंत्रणावरून गांधीजी दिल्लीकडे जात असताना ७ एप्रिलला त्यांना मथुरेजवळ पालवाल स्थानकावर अटक करण्यात आली. नंतर त्यांना पोलिस बंदोबस्तात मुंबईला पाठविण्यात आले. भारतामध्ये ठिकठिकाणी सत्याग्रहाने हिंसक रूप धारण केल्यामुळे गांधीजींनी हा सत्याग्रह मागे घेतला. व तीन दिवसांचे उपोषण केले.

### ७. जालियनवाला बाग हत्याकांड (१३ एप्रिल १९१८) :-

रौलेट ॲक्ट विरूद्ध पंजाबमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. पंजाबमधील सत्याग्रह दडपून टाकण्यासाठी पंजाबचा इंग्रज अधिकारी जनलर डायर याने तेथील नेते डॉ. किचलू व डॉ. सत्यपाल यांना अटक करून तुरूंगात डांबले परिणामी त्यांची सुटका व्हावी म्हणून लोकांनी मोर्चाचे आयोजन केले होते. सरकारने या मोर्चावर गोळीबार केला. त्यात दहा लोक ठार झाले. एवढेच नव्हें तर तेथील लोकांनी क्रोधीत होऊन सरकारी कार्यालयास आगी लावून अनेक इंग्रजांना ठार केले. त्यामुळे जनरल`डायरने १२ एप्रिल, १९१९ रोजी सार्वजनिक मोर्चे, सभा यांना बंदी घालणारे फर्मान काढले. ब्रिटिशांनी यावेळी स्वीकारलेल्या दडपशाहीचा कळस म्हणजे जालियनवाला बागेतील हत्यांकांड होय. काळे कायदे व ब्रिटिशांच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी १३ एप्रिल, १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला बागेत एक सभा बोलविण्यात आली होती. या दिवशी वैशाखी असल्यामुळे शेजारच्या खेडेगावातील अनेक लोक वैशाखी उत्सवात सहभागी होण्यासाठी बागेत आले होते. तसेच अनेक वृद्ध स्त्री -पुरुष, लहान मुले बागेत फिरण्यास आली होती. या बागेला चारही बाजुंनी प्रवेशद्वार होते. निषेधाच्या या सभेला २० हजार लोक उपस्थित होते. हे पाहून ब्रिटिश अधिकारी जनरल डायर याचा राग अनावर झाला. बागेचे तीन दार बंद करुन चौथ्या प्रवेशद्वारावर गाड्या उभ्या करून, कोणतीही पूर्वसूचना न देता निःशस्त्र जमावावर गोळीबार करण्याचा आदेश दिला. या गोळीबारात सरकारी अंदाजानुसार ४०० लोक ठार झाले. तर हजारो लोक जखमी झाले इंग्रजांनी या कृतीने आपल्या पाशवी शक्तीचे जणू प्रदर्शनच घडविले. ब्रिटिशांनी जनरल डायरला शिक्षा न करता नोकरीत बढती दिली.

### ८. हंटर कमिशन :

अमानुष जालियनवाला बाग हत्याकांडाची बातमी देशभर वाऱ्यासारखी पसरली. ब्रिटिश सरकारविरूद्ध सर्व देशभर असंतोषाची लाट निर्माण झाली. भारतीय जनता व काँग्रेसने या घटनेची चौकशी करावी अशी मागणी सरकारकडे केली. मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. रविंद्रनाथ टागोरांसारख्या साहित्यकाने सरकारने दिलेल्या सर या पदवीचा त्याग करून ग. ज. ला हत्याकांडाच्या निषेधाचे पत्र पाठविले. अखेर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारने आक्टो, १९१९ साली लॉर्ड हंटर यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची एक समिती नियुक्त केली. त्यापैकी तीन सदस्य भारतीय होते. त्याअगोदर जून, १९१९ साली काँग्रेसने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. त्यामध्ये मोतीलाल नेहरू, चित्तरंजनदास, अब्बास तय्यबजी, पुजलुल हक, बॅ. जयकर, मोहनदास गांधी यांचा समावेश होता. या समितीने ६०० लोकांच्या जबान्या घेऊन जनरल डायरला

सर्वस्वी जबाबदार ठरवून त्यांच्यावर खटला भरण्याची मागणी सरकारला केली. पण सरकारने याकडे दुर्लक्ष केले.

हंटर कमिशनने २६ मे, १९२० साली आपला अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला. त्याअगोदर सरकारने माफीचा कायदा पास करून जालियनवाला बाग हत्याकांडाशी संबंधित असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांना माफी दिली. परंतु त्याअगोदर त्याचा फार मोठा सत्कार करण्यात आला होता. यावरून ब्रिटिशांची दडपशाही वृत्ती व साम्राज्यवादी अरेरावी दिसून आली. सत्याग्रहाच्या काळात भारतीय नेत्यांना अत्यंत महत्त्वाची व समाधानकारक म्हणजे त्या काळात निर्माण झालेले हिंदू-मुस्लिम ऐक्य होय. ब्रिटिशांचे लाठी हल्ले, गोळीबार, तुरूंगवास, इ. अत्याचाराविरूद्ध ते खांद्याला खांदा लावून सामोरे गेले होते. ब्रिटिशांविरूद्धच्या लढ्यात हे ऐक्य बहूमोल ठरणार हे उघडच होते. त्यादृष्टीने १९१८-१९ मध्ये उद्‌भवलेला खिलाफतीचा प्रश्न गांधीजींना अत्यंत महत्त्वाचा वाटला.

**९. खिलाफत चळवळ :**

१९१४ साली सुरू झालेल्या पहिल्या महायुद्धात तुर्कस्थानने इंग्लंडच्या विरोधात जर्मनीच्या बाजूने युद्धात भाग घेतला होता तुर्कस्थानच्या सम्राटाला जगातील सर्व मुसलमान आपला धर्मगुरू किंवा खलिफा मानत होते. त्यामुळे या युद्ध काळातही खलिफाच्या अधिकारांना किंवा गादीला धक्का लागू नये अशी मुस्लिमांची इच्छा होती. पहिल्या महायुद्धात भारतातील मुस्लिमांचे सहकार्य घेताना तुर्कस्थानच्या साम्राज्याचे विभाजन करणार नाही असे ब्रिटिशांनी आश्वासन दिले होते. परंतु नंतर ते आश्वासन त्यांनी पाळले नाही. त्यांनी तुर्कस्थानच्या साम्राज्याचे विघटन केले. परिणामी भारतीय मुस्लिमांमध्ये ब्रिटिशांविरोधी असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. तुर्कस्थानातील खलिफाची सत्ता पुन्हा मिळवून देण्यासाठी भारतीय मुस्लिमांनी खिलाफत चळवळ सुरू केली. वास्तविक पाहता भारतीय मुस्लिमांचा काहीही संबंध नसताना ही चळवळ सुरू करण्यात आली. महात्मा गांधी हे हिंदू - मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. खिलाफत चळवळीच्या निमित्ताने भारतीय मुस्लिमांमध्ये जो असंतोष निर्माण झाला आहे. त्याचा फायदा घेऊन हिंदू-मुस्लिमांना या राष्ट्रीय चळवळीत एकत्र आणावे अशी म. गांधींजींची भूमिका होती. त्यामुळे त्यांनी मुस्लिमांनी सुरू केलेल्या खिलाफत चळवळीला आपला संपूर्ण पाठींबा जाहीर केला. त्यामुळे अनेक मुस्लिम नेते काँग्रेसजवळ आले.

**१०. मॉटेग्यु-चेम्सफर्ड कायद्यामुळे असंतोषः**

ब्रिटिश सरकारने १९१९ ला मॉटफर्ड सुधारणा कायद्याद्वारे भारतीयांना राजकीय हक्क दिले. परंतु या कायद्याने भ्रमनिराशा केली. द्विदल राज्यपद्धती निर्माण करून जबाबदार राज्यपद्धती देण्याचे घोषित केले. परंतु प्रत्यक्षात याच सुधारणा दिलेल्या नव्हत्याच. तो फक्त देखावा होता. ॲनी बेझंट व लो. टिळकांनी या कायद्यावर टिकास्त्र सोडले.

वरील सर्व कारणांमुळे भारतात ब्रिटिश सरकार बद्दल असंतोष निर्माण झाला होता. म्हणूनच ब्रिटिश सरकारला ठिकाण्यावर आणण्यासाठी म. गांधीजींनी असहकार चळवळ सुरू केली.

### १०.५.२ असहकार चळवळीचा ठराव व कार्यक्रम :

### असहकाराचा जाहीरनामा (१० मार्च, १९२०)

म. गांधीजींनी १० मार्च, १९२० रोजी असहकाराचा पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला. ''आता ब्रिटिशांविरोधात हा एकच मार्ग आपणास उपलब्ध आहे. जेव्हा सहकारामुळे अध:पात व अपमान होत असतो. किंवा आपल्या धार्मिक भावनांना धक्का दिला जातो. तेव्हा असहकार हे आपले कर्तव्य बनते. स्वंयप्रेरित असहकार हीच जनतेच्या भावनेची व असंतोषाची कसोटी असते. असहकाराच्या मार्गावरील प्रत्येक पाऊल अत्यंत विचारपूर्वक टाकावे लागते. अत्यंत प्रखर वातावरणातही आपला आत्मसंयम कायम राहावा यासाठी आपण सावकाश प्रगती केली पाहिजे.'' असे आवाहन करून म. गांधींनी असहकाराचा संपूर्ण कार्यक्रम यामध्ये मांडला.

### २. कलकत्ता अधिवेशन (४ सप्टेंबर, १९२०)

राष्ट्रीय काँग्रेसचे खास अधिवेशन ४ सप्टेंबर, १९२० रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे भरले. या अधिवेशनात म. गांधींनी आपल्या असहकार चळवळीच्या कार्यक्रमाचा आराखडा काँग्रेस सदस्यांपुढे मांडला. मोतीलाल नेहरू, चित्तरंजनदास, बिपिनचंद्र पाल, महंमद अली जीना, लाला लजपतराय, ॲनी बेंझट इ. नेत्यांनी गांधीजींच्या कार्यक्रमावर आक्षेप घेतला. तरीही काँग्रेस सदस्यांनी त्यांचा कार्यक्रम बहुमताने मंजूर केला.

### ३. नागपूर अधिवेशन (८ डिसेंबर, १९२०)

कलकत्ता अधिवेशनानंतर गांधीजींनी संपूर्ण भारत देशाचा दौरा करून असहकार कार्यक्रमाचा प्रसार केला. त्यांनी निराश आणि हताश झालेल्या जनतेमध्ये नवीन चैतन्य निर्माण केले. डिस., १९२० मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन नागपूर या ठिकाणी भरले. या अधिवेशनात लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू व देश बंधू दास या गांधीप्रणित असहकार कार्यक्रमाच्या काही आघाडीच्या विरोधकांनी या कार्यक्रमाचे समर्थन केले. चित्तरंजनदास यांनीच असहकाराचा मुख्य ठराव मांडला. तर ॲनी बेझंट, पंडित मदनमोहन मालवीय, दादासाहेब खोपर्डे व जीना यांनी आपला विरोध कायम ठेवला. त्याचप्रमाणे काँग्रेसच्या ध्येय, धोरणातही बदल झाला. योग्य आणि शांततेच्या मार्गाने भारताला स्वराज्य प्राप्त करून देणे हे काँग्रेसचे ध्येय बनले. डॉ. पट्टाभी सीतारमैय्या यांच्या मते नागपूर अधिवेशनापासून भारतीय इतिहासामध्ये एका नवीन युगाला प्रारंभ झाला. यामुळे देशालाा एक नवीन कार्यक्रम व आंदोलनाची दिशा मिळाली. असहकार चळवळीने देशात एक अभूतपूर्व उत्साह निर्माण केला.

### ४. असहकार चळवळीचा कार्यक्रम

गांधीजींनी काँग्रेसपुढे मांडलेल्या असहकार चळवळीचे स्वरूप दोन प्रकारचे होते. पहिले विधायक तर दुसरे नकारात्मक होते कलकत्ता व नागपूर अधिवेशात काँग्रेसने जो असहकार चळवळीचा कार्यक्रम पास केला होता त्यानुसार या कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

### अ. विधायक स्वरूप

१. स्वदेशी चळवळीला प्राधान्य देणे विशेषत: हातमागाला उत्तेजन देणे.

२. मद्यपान निषेध व जातीप्रथेचे निर्मूलन करणे.

३. हिंदू - मुस्लिम ऐक्य निर्माण करणे.
४. भांडणतंटे सोडविण्यासाठी पंचायतीची स्थापना करणे.
५. लो. टिळकांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक कोटी रूपयांचा निधी स्वराज्य फंड म्हणून गोळा करणे.
५. लोकांना चरखा चालविण्याचे शिक्षण देऊन त्यांनी कातलेल्या सुताचेचे कपडे वापरण्यास प्रवृत्त करणे इ.
६.राष्ट्रीय शैक्षणिक संस्था स्थापन करणे.

**ब. संघर्षात्मक स्वरूप**

१. कायदेमंडळावर व सरकारी न्यायालयावर बहिष्कार टाकणे.
२. सर्व परकीय मालावर बहिष्कार टाकणे.
३. सरकारी व शासकीय अनुदानावर चालणाऱ्या शिक्षण संस्थांवर बहिष्कार टाकणे.
४. कोणताही कर ब्रिटिश सरकारला न देणे.
५. सरकारी नोकऱ्यांचा राजीनामा देणे.
६. ब्रिटिश सरकारने बहाल केलेल्या पदव्या व उपाध्यांचा त्याग करणे. इ.

### १०.५.३ असहकार चळवळीची वाटचाल

गांधीजींच्या नेतृत्वाखाली १९२१ साली असहकार चळवळ सुरू झाली या चळवळीत गांधीजींनी ''अहिंसा'' या तत्वावर जोर दिला. सर्वप्रथम स्वतः त्यांनी ब्रिटिशांनी दिलेल्या कैसर-ए-हिंद या पदवीचा त्याग केला. चळवळ सुरू होताच अनेक विद्यार्थ्यांनी सरकारी शाळांमधून आपली नावे काढून राष्ट्रीय संस्थांच्या शाळेत दाखल केली. शेकडो लोकांनी आपल्या पदव्यांचा त्याग केला. हजारो वकीलांनी आपली वकीली सोडून दिली. या मध्ये बंगालमधील चित्तरंजनदास, उत्तर प्रदेशातील पंडित मोतीलाल नेहरू त्यांचा मुलगा जवाहरलाल नेहरू, पंजाबमधील लाला लजपतराय, गुजरातमधील वल्लभभाई पटेल आणि विठ्ठलभाई पटेल, पुण्यामधील नरसिंह चिंतामणी केळकर, मध्य प्रांतातील डॉ. मुंजे आणि अभ्यंकर, बिहारमधील डॉ. राजेंद्र प्रसाद आणि मद्रासमध्ये राजगोपालाचारी, सत्यमूर्ती आणि टि. प्रकाशन यांचा समावेश होतो. या चळवळींत मुस्लिम नेत्यांनी सुद्धा सक्रीय सहभाग घेतला. यामध्ये अलीबंधू म्हणजे मौलाना मुंहमद अली, आणि शौकत अली, डॉ. अन्सारी, अब्दुल कलाम आझाद इ. प्रमुख होते. अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, गुजरात, बिहार आणि काशी विद्यापीठे बंगालमधील राष्ट्रीय विश्वविद्यालय, टिळक महाविद्यालय इ. प्रमुख राष्ट्रीय शिक्षण संस्थांही स्थापन केल्या गेल्या. परकीय कपड्यांवर बहिष्कार टाकून लोकांनी चरख्यावर सुत कातण्यास सुरूवात केली. मादक पदार्थांविरूद्ध आंदोलन झाले. त्यामुळे सरकारने फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.

फेब्रुवारी १९२१ मध्ये ब्रिटिश युवराज प्रिन्स ऑफ वेल्स याचे भारतात आगमन झाले. म. गांधीजींच्या असहकार चळवळीमुळे भारतातील वातावरण अशांत होते. त्यामुळे भारतात प्रत्येक ठिकाणी त्याचे स्वागत हरताळाने झाले. १७ नोव्हे, १९२१ रोजी युवराज मुंबईत आला. त्या ठिकाणी सुद्धा त्याचे स्वागत हरताळानेच झाले. म्हणूनच एका लेखकाने असे म्हटले आहे की, ''ब्रिटिश राजपुत्र ज्या ज्या ठिकाणी गेला त्याचे स्वागत निर्मनुष्य शहरांनी केले. अनेक परकीय लोकांना त्या दिवशी उपवास पाळावा लागला कारण हॉटेल मधील कामगार सुद्धा हरताळामध्ये सहभागी झाले होते.'' अशाप्रकारे दिवसेंदिवस स्थिती गंभीर बनत चालली होती. कॉंग्रेस आणि सरकारमधील बोलणी गांधीजी आपल्या मुद्याला चिकटून राहिल्यामुळे

यशस्वी होऊ शकली नाहीत. त्याच दरम्यान ब्रिटिशांनी अलीबंधुना अटक केली. गांधीजींनी त्यावेळी ब्रिटिशांना स्पष्टपणे सांगितले की, जोपर्यंत अलीबंधुंची सुटका केली जात नाही तोपर्यंत असहकार चळवळ बंद करण्याचा प्रश्नच येत नाही.

असहकार चळवळीचा फैलाव देशातील सर्व भागात झाला होता. असहकार चळवळीने उग्र रूप धारण केले होते. आसाम बंगालमधील रेल्वे कामगारांनी संप केला होता. मिदनापूर येथे करबंदी आंदोलन चालू होते. दक्षिण भारतातील मालाबार मधील मोपला शेतकऱ्यांनी उठाव केला होता. राजस्थानातील शेतकऱ्यांनी व भटक्या जमातींनी आपले जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न केले. भ्रष्ट महंतांच्या हातून गुरूद्वाराचे नियंत्रण काढून घेण्यासाठी अकाली दलाची चळवळ सुरू झाली होती. याच दरम्यान राष्ट्रीय काँग्रेस स्वयंसेवकांचे पथक एक प्रभावी पोलीस दल म्हणून पुढे आले. गणवेशधारी स्वयंसेवक शिस्तबद्ध संचलन करीत असल्याचे पाहून सरकारला आनंद होणे शक्यच नव्हते. साम्राज्यवादी वर्तमानपत्र ''स्टेटसमॅन'' आणि ''इंग्लिशमॅन'' ओरडून सांगत होते की, कलकत्त्यावर स्वयंसेवकांनी ताबा घेतला आहे. आणि तेथील सरकार नष्ट झाले आहे. तेव्हा स्वयंसेवकांवर तात्काळ कारवाई करावी, अशी या वर्तमानपत्रांची मागणी होती. त्यामुळे सरकारने पूर्ण ताकदीने राष्ट्रीय काँग्रेस स्वयंसेवकांचे पथक नष्ट केले. या पथकाला ब्रिटिश सरकारने बेकायदेशीर म्हणून जाहीर केले. एवढेच नव्हे तर हजारो स्वयंसेवकांना कैद केले.

डिसेंबर अखेर पर्यंत गांधीजी सोडून सर्व काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना सरकारने तुरूंगात डांबून ठेवले. होते. तुरूंगातील लोकांची संख्या २०,००० वर गेली होती. तीच संख्या पुढच्या वर्षी ३०,००० वर गेली. त्यामुळे तुरुंग तुडुंब भरून गेले. परंतु याचा कोणताही दुष्परिणाम चळवळीवर झाला नाही. उलट जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याने सरकार अडचणीत सापडले होते. इंग्रजांना असे वाटत होते की, सार्वजनिक विद्रोहाचा हा आजार शहरातून खेड्यापर्यंत प्रसारीत झाला तर भारतातील इंग्रजांचे राज्य कोणीसुद्धा वाचवू शकणार नाही.

### १०.५.४ चौरीचौरा हत्याकांड व असहकार चळवळीची समाप्ती :

असहकार चळवळीतून निर्माण झालेल्या परिस्थितीवर विचारविनिमय करण्यासाठी डिसें., १९२१ मध्ये अहमदाबाद येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात अहसकार चळवळ तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला. एवढेच नव्हें तर या अधिवेशनात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यास काँग्रेसने मान्यता दिली. सरकारने नागरी स्वातंत्र्यावरचे निर्बंध मागे घेतले नाहीत व राजकीय बंदींची सुटका केली नाही तर आपल्याला सविनय कायदेभंग चळवळ सुरू करणे भाग पडेल अशा अर्थाचे एक पत्र गांधीजींनी व्हाईसरॉय रिडींग यांना लिहले. परंतु व्हाईसरॉयने या पत्राची दखल न घेतल्यामुळे गांधीजींनी सुरत जिल्ह्यातील बार्डोली तालुक्यात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू होईल अशी घोषणा केली. परंतु दुर्दैवाने बार्डोली आंदोलन सहा वर्षे स्थगित करावे लागले. कारण गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा या ठिकाणी ५ फेब्रुवारी, १९२२ रोजी एक दुर्घटना घडली. तेथील जनतेने पोलिसांच्या अत्याचाराला कंटाळून पोलिस स्टेशनला आग लावली. या आगीत एक पोलिस अधिकारी व २२ पोलिस शिपाई मृत्युमुखी पडले. ही बातमी गांधीजींना समजताच त्यांना फार दु:ख झाले. त्याचप्रमाणे या घटनेअगोदर काही ठिकाणी सुद्धा काही दंगली घडून आल्या होत्या. त्यामुळे गांधीजींना असे वाटू लागले की, असहकार चळवळीने आता हिंसात्मक

रूप धारण केले आहे. त्यामुळे त्यांनी चळवळ स्थगित करण्याचा निर्णय घेतला बार्डोली येथे झालेल्या कॉंग्रेस कार्यकारी समितीच्या बैठकीत चळवळ स्थगित करण्याच्या प्रस्तावावर विचार झाला. शेवटी या निर्णयाला कॉंग्रेस कार्यकारी समितीने मान्यता दिली. १२ फेब्रुवारी, १९२२ ला गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केली. या निर्णयामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टिका झाली.

### १०.५.५ गांधीजींनी असहकार चळवळ मागे का घेतली?

गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्यामुळे जनतेला फार वाईट वाटले. तुरूंगामध्ये असणारे मोतीलाल नेहरू व लाला लजपतराय यांनी सुद्धा गांधीजींची निंदा केली. सुभाषचंद्र बोस यांनी असे लिहिले आहे की, ''आम्ही आपली स्थिती इतकी मजबूत केली होती आणि प्रत्येक क्षेत्रात आम्ही इतके पुढे चाललो होतो नेमके याच वेळी राष्ट्रीय संघर्ष थांबविणे खेदजनक होते.'' गांधीजींनी चळवळ स्थगित केल्यामुळे गांधीजींचे अनुयायी सुद्धा त्यांच्या विरोधात गेले होते. गांधीजींनी ही चळवळ का स्थगित केली त्याची अनेक कारणे होती. असहकार चळवळीत सहभागी असलेल्या सर्व प्रमुख नेत्यांना ब्रिटिशांनी तुरूंगात डांबले होते. त्यामुळे जनतेचे नेतृत्व करण्यास कोणीही नेता नव्हता. नेत्यांच्या अनुपस्थितीत जनतेला मार्गक्रमण करणे अवघड झाले होते. परिणामी त्यांच्यात हिंसात्मक प्रवृत्तीचा शिरकाव झाला होता. जनतेकडून हिंसात्मक कारवाया घडून आल्या असत्या तर सरकारने दडपशाहीच्या मार्गाने ही चळवळ मोडून काढली असती. तसे घडले असते तर जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असते. आणि भविष्यात जनता कधीही अशा चळवळीसाठी तयार झाली नसती. म्हणूनच गांधीजींनी ही चळवळ मागे घेतली. चळवळ स्थगित झाल्यानंतर सरकारने गांधीजींना कैद करून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालविला. त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली.

### १०.५.६ असहकार चळवळीचे महत्त्व

चौरीचौरा येथे घडलेल्या घटनेमुळे असहकार चळवळ स्थगित करण्यात आली. त्यामुळे या चळवळीचे उद्दिष्ट सफल होऊ शकले नाही हे खरे असले तरी ही चळवळ पूर्णपणे अपयशी ठरली असेही म्हणता येणार नाही. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात जी आंदोलने झाली त्यामध्ये या चळवळीला एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. कारण भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला एक वेगळी दिशा देण्याचे काम या असहकार चळवळीने केले आहे कारण –

१. असहकार चळवळीने भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त करून दिले. भारताच्या इतिहासात असहकार चळवळीच्या निमित्ताने सर्वप्रथम सर्वसामान्य जनता मोठ्या संखेने स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाली.

२. असहकार चळवळीने भारतीय जनतेला निर्भय बनविले. त्यांना ब्रिटिशांच्या दडशाहीबद्दल किंवा तुरुंगाविषयी कसलीही भीती राहिली नाही. या चळवळीत जवळ-जवळ ३०,००० लोक तुरुंगात गेले होते. त्यांना ब्रिटिश शासनाबद्दल कसलेही भय राहिले नाही.

३. असहकार चळवळीमुळे लोकांना ब्रिटिश सरकार विरूद्ध लढण्यासाठी सत्याग्रह व असहकार हे दोन नवीन मार्ग मिळाले. त्यामुळे या चळवळीत जनता मनापासून व बहुसंख्येने सामील झाली. जनतेमध्ये राष्ट्रवादाची भावना या चळवळीने निर्माण केली.

४. असहकार चळवळीमुळे काँग्रेसच्या स्वरूपामध्ये परिवर्तन झाले सुरूवातीला काँग्रेस ही फक्त सुशिक्षित व उच्चभ्रू लोकांची संघटना होती. भारतात बहुसंस्थेने असणारा निरक्षर कामगार वर्ग, शेतकरी वर्ग सर्व सामान्य जनता काँग्रेसपासून दूर होती. परंतु असहकार चळवळीमुळे ती काँग्रेस जवळ आली व काँग्रेस म्हणजे भारतीय जनतेची प्रातिनिधिक संघटना असे तिचे स्वरूप झाले.

५. असहकार चळवळीमुळे गांधीजी हे सर्वसामान्य लोकांचे नेते म्हणून पुढे आले. एवढेच नव्हे तर बुद्धीजीवी वर्गाने सुद्धा गांधीजींचे नेतृत्व मान्य केले.

६. असहकार चळवळीमुळे ब्रिटिश सरकार कमजोर होत गेले. त्याचप्रमाणे या चळवळीमुळे भारतीय जनतेमध्ये स्वदेशी वस्तुंबद्दल आवड निर्माण झाली परिणामी परकीय मालांवर बहिष्कार टाकण्यात आला. स्वदेशी वस्तुंचा वापर मोठ्या प्रमाणात केला जाऊ लागला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. म. गांधीजीच्या १९२०-२२ मधील असहकार चळवळीचा थोडक्यात खुलासा करा.

## १०.६ सारांश

राजकीय क्षितीजावर म. गांधींचा उदय झाला. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय चळवळ विकास पावू लागली. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी म. गांधींच्या नेतृत्वाखाली तीन मोठी जनआंदोलने झाली. असहकार आंदोलन हे त्यामधील पहिले आंदोलन होय. जालियनवाला बागेतील हत्याकांड, पंजाबात लष्करी कायद्याच्या अंमलात घडलेले अमानुष अत्याचार, हंटर कमिशनचा अन्याय अहवाल, आणि १९१९च्या राजकीय सुधारणांचे निराशाजनक स्वरूप इ. कारणांमुळे म. गांधींच्या नेतृत्वाखाली १९२० सालच्या सप्टेंबर महिन्यात असहकार आंदोलन सुरू झाले. १९२० च्या राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता येथील अधिवेशनात असहकार आंदोलनाचा कार्यक्रम ठराव रूपाने मांडला. काही ज्येष्ठ नेत्यांनी असहकाराच्या कार्यक्रमास विरोध दर्शविला. म. गांधींनी देशभर असहकार आंदोलनाच्या कार्यक्रमाचा प्रचार केला. १९२०च्या डिसेंबर महिन्यात नागपूर अधिवेशनात असहकाराचा ठराव सर्वानुमते संमत झाला.

म. गांधींनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनास एक संघर्षात्मक तर दुसरा विधायक असे दोन पैलू होते. असहकार आंदोलनाचा कार्यक्रम देशापुढे मांडताना गांधीजी म्हणाले,

''अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग योग्य रितीने चोखाळला तर भारतात एका वर्षात स्वराज्य मिळेल.'' असहकार आंदोलनाच्या संघर्षात्मक कार्यक्रमात सरकारमान्य शाळा, महाविद्यालये, विधि मंडळे, कोर्टकचेऱ्या, परदेशी कापड यावरील बहिष्काराला प्रमुख स्थान होते. त्याचप्रमाणे लोकांनी सरकारने दिलेल्या सन्मानदर्शक पदव्या - किताबांचा त्याग करावा आणि सरकारमार्फत भरविलेल्या दरबारात किंवा समारंभात भाग घेऊ नये असे आवाहन त्यात करण्यात आले होते. खादी उत्पादनासाठी गांधीजींनी अनेक ठिकाणी चरखे, हातमाग सुरू करण्याचे आदेश दिले. हिंदू-मुस्लिम ऐक्य, दारूबंदीचा प्रचार, अस्पृश्यता निवारण इ. गोष्टींचा विधायक कार्यक्रमात समावेश होता.

म. गांधीनी स्वातंत्र्याची भावना रूजविण्यासाठी विधायक कार्यक्रमाद्वारे जनतेत जागृती निर्माण केली. तर अन्यायाविरूद्ध लढणारी एक प्रचंड शक्ती उभी करता येईल असे म. गांधींना वाटले होते. या कार्यक्रमातून सर्व देशवासियांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेण्याची गांधीजींची योजना होती. बंगालच्या फाळणीनंतर फोफावलेली स्वदेशीची चळवळ व म. गांधीच्या नेतृत्वाखाली झालेली असहकार चळवळीत विलक्षण साम्य आढळते. लो. टिळकांच्या चतु:सुत्रीचा गांधीजींनी आपल्या असहकार आंदोलनाच्या कार्यक्रमात समावेश केल्याचे दिसून येते. असहकाराच्या कार्यक्रमास देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. सर्व राष्ट्रीय उमेदवारांनी विधिमंडळ निवडणूकीतून माघार घेतली. हजारो तरुण विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजचा त्याग केला. नामांकित कायदेपंडितांनी आपला व्यवसाय सोडला. व चळवळीत उडी घेतली. हिंदू-मुसलमान अभूतपूर्व ऐक्य भावना निर्माण झाली. असहकार आंदोलनाचा कार्यक्रम देशभर शांततेने अंमलात आणला जात असताना आंदोलनाला आवर घालण्यासाठी ब्रिटिश सरकारने दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. त्यातूनच चौरीचौरा हत्याकांड घडून आले. या जनआंदोलनाला हिंसात्मक स्वरूप प्राप्त झाल्यामुळे गांधीजींनी हे आंदोलन मागे घेतले. असहकार चळवळीच्या प्रारंभी डोळ्यासमोर ठेवलेली उद्दिष्टये यशस्वी झाली नसली तरी पुढील काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रत्येक चळवळीला जनआंदोलनाचे स्वरूप मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या चळवळीने केले.

## १०.७ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न :

१. म. गांधीजींचे पूर्वचरित्र सांगून त्यांच्या तत्वज्ञानाविषयी माहिती द्या.
२. असहकार आंदोलनाची पार्श्वभूमी सांगा.
३. असहकार चळवळीची वाटचाल विशद करा.
४. असहकार चळवळीचे महत्व विशद करा.

❖❖❖❖

# ११

# म. गांधीजींचे जनआंदोलन भाग -२

**अनुक्रमणिका**

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ सविनय कायदेभंग चळवळ

११.२.१ सविनय कायदेभंग चळवळीची पार्श्वभूमी

१. सायमन कमिशन

२. नेहरू अहवाल

३. कलकत्ता येथील सर्वपक्षीय परिषद

४. काँग्रेसचे कलकत्ता अधिवेश

५. लॉर्ड आयर्विनची घोषणा

६. काँग्रेसचे लाहोर अधिवेशन

११.२.२ सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम

१. स्वरुप

२. दांडीयात्रा

३. धारासना सत्याग्रह

४. वायव्य सरहद्द प्रांतातील कायदेभंग चळवळ

५. बिहारमधील करबंदी चळवळ

६. गुजरात मधील साराबंदीची चळवळ

७. आदिवासीचा सहभाग

८. महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग

११.२.३ सविनय कायेदभंग चळवळीनंतरच्या घडोमोडी

१. पहिली परिषद

२. गांधी-आयर्विन करार

३. दुसरी गोलमेज परिषद

४. सविनय कायदेभंग चळवळ पुन्हा सुरू

५. १९३२ चा जातीय निवाडाा

६. पुणे करार

७. तिसरी गोलमेज परिषद

११.२.४ सविनय कायदेभंग चळवळीची समाप्ती

११.२.५ सविनय कायदेभंग चळवळीची वैशिष्ट्ये

११.२.६ सविनय कायदेभंग चळवळीचे यशापयश

१. ब्रिटिश सरकारचे कराचे उत्पन्न घटले

२. परदेशी मालाची आयात ९०% ने कमी झाली.

३. ब्रिटिश सरकारची घोषणा

४. ब्रिटिशांच्या दमणनीतीची भीती राहिली नाही

५. चळवळीला राष्ट्रवादी स्वरूप प्राप्त झाले.

११.३ छोडो भारत चळवळीची पाश्र्वभूमी

१. ऑगस्ट घोषणा

२. वैयक्तिक सत्याग्रह

३. क्रिप्स मिशन

४. जनतेची प्रतिक्रिया

५. ब्रिटिशांचा प्रचार

६. जपानचा साम्राज्यवाद

११.३.२ छोडो भारत आंदोलनाचा ठराव

११.३.२ ऑगस्ट क्रांती व सरकारची दडपशाही

११.३.४ छोडो भारत चळवळ - विविध गटांची भूमिका

१. भूमिगत संघटनेची भूमिका

२. प्रतिसरकारची भूमिका

३. संस्थानी प्रजेची भूमिका

४. अलिप्त गटाची भूमिका

५. गांधीजीचे उपोषण

११.३.५ भारत छोडो चळवळीचा शेवट.

११.३.६ भारत छोडो चळवळीने काय साध्य केले.

११.४ सारांश

११.५ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

## ११.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासातून आपणास

१. सविनय कायदेभंग चळवळीची पाश्र्वभूमी सांगता येते.

२. सविनय कायदेभंग चळवळीची भारतातील व्याप्ती स्पष्ट करता येते.

३. सविनय कायदेभंग चळवळीची वैशिष्ट्ये विशद करता येतात.

४. सविनय कायदेभंग चळवळीचे फलित किंवा महत्त्व स्पष्ट करता येते.

५. भारत छोडो चळवळीचे वर्णन करता येते.

६. भारत छोडो चळवळीने काय साध्य केले हे स्पष्ट करता येते.

## ११.१ प्रास्ताविक

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात असहकार चळवळ, सविनय कायदेभंग व छोडो भारत चळवळ या आंदोलनांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. म. गांधींनी असहकार चळवळ सुरू केली. परंतु ती एका नव्या वळणावर येत असतानाच मं. गांधीना ही चळवळ स्थगित करावी लागली. गांधीजींच्या या कृत्याबद्दल इतिहासात उलट-सुलट-मतप्रवाह आहेत. परंतु  त्यांनी दीर्घ विश्रांतीनंतर भारतात सविनय कायदे भंग चळवळ सुरू केली. ब्रिटिशांनी भारतीयांवर लादलेल्या अन्यायी कायद्यांचा सर्वांनी एकत्रित येऊन भंग करावयाचा असा या चळवळीचा हेतू होता. ही चळवळ सुरू करताना मात्र गांधीजींनी जनतेला संदेश दिला की जरी या काळात भारतातील प्रमुख नेत्यांना अटक झाली तरी ही चळवळ नेत्यांशिवाय जनतेने पुढे चालू ठेवावी. छोट्या, मोठ्या हिंसेच्या घटना घडल्या तरी ही चळवळ स्थगित केली जाणार नााही. या संदेशातून त्यांनी ही चळवळ राष्ट्रव्यापी बनविण्यासाठी जनतेने प्रयत्न करावेत व कोणत्याही परिस्थितीत ही चळवळ थांबविली जाणार नाही असे अप्रत्यक्षपणे जनतेला आश्वासन दिले. ब्रिटिश सरकारने ही चळवळ अतिशय अन्यायी मार्गाने दडपुन टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामध्ये त्यांना म्हणावे तितके यश आले नाही. या काळात साम्राज्यवादी शासनाला भारतीयांच्या सामर्थ्याची जाणीव झाली. पुढे या चळवळीचा जोर जरी ओसरत गेला असला तरी या चळवळीला भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असेच म्हणावे लागेल.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामधील दुसरा महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे 'भारत छोडो' आंदोलन होय.  हे जनआंदोलन होते ते 'जिंकू अथवा मरू' या भावनेने सुरू केले होते. छोडो भारत आंदोलनानंतर खऱ्या अर्थाने, भारतातील ब्रिटिशांची सत्ता संपुष्टात येण्याच्या व भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. म्हणूनच या आंदोलनाला भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. या दोन्ही चळवळींची सविस्तर माहिती या घटकात आपण घेणार आहोत.

## ११.२ सविनय कायदेभंग चळवळ

असहकार चळवळीच्या स्थगितीनंतर ब्रिटिश सरकारने १० मार्च, १९२२ रोजी, गांधीजींना अटक केली. त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली. राष्ट्रीय चळवळ काहीशी मंदावली. या काळात स्वराज्य पक्षाची स्थापना, सायमन कमिशन, नेहरू रिपोर्ट अशा घटना घडत गेल्या. अटकेनंतर दोन वर्षात त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांची सुटका करण्यात आली. राष्ट्रीय चळवळ पुन्हा गतिमान करणे त्यांना आवश्यक वाटत होते. म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकार विरोधात दुसरी चळवळ सुरू केली. तिच १९३०ची सविनय कायदेभंग चळवळ होय.

### ११.२.१ सविनय कायदेभंग चळवळीची पार्श्वभूमी

#### १. सायमन कमिशन (१९२७)

१९१९च्या मॉटेग्यू - चेम्पफर्ड सुधारणा कायद्याची अंमलबजावणी भारतात कशा पद्धतीने झाली आहे याची पाहणी करण्यासाठी दहा वर्षांनी एक समिती स्थापन करण्यात येणार होती. परंतु ही कालमर्यादा पूर्ण होण्याअगोदर दोन वर्ष ८ नोव्हेंबर, १९२८ साली ब्रिटिश

पंतप्रधान बाल्डविन यांनी एक समिती स्थापन केली तिला सायमन कमिशन असे म्हणतात. परंतु या कमिशनमध्ये एकही हिंदी सदस्य नसल्याने काँग्रेसने या कमिशवर बहिष्कार टाकण्याचा निश्चय केला. ३ फेब्रुवारी, १९२८ रोजी सायमन कमिशन भारतात आले. या कमिशनने एप्रिल, १९२९ पर्यंत भारतातील विविध ठिकाणांना भेटी दिल्या. परंतु कमिशन ज्या ज्या ठिकाणी गेले त्या-त्या ठिकाणी कमिशनवर बहिष्कार टाकण्यात आला. 'सायमन परत जा' अशा घोषणांनी त्यांचे स्वागत करण्यात आले. परिणामी ब्रिटिश सरकारने पोलिसांना निदर्शकांवर गोळीबार करण्याचा आदेश दिला. लाहोर मध्ये तर बहिष्कार टाकणाऱ्या जमावांवर लाठी हल्ला करण्यात आला. त्यामध्ये काँग्रेसचे वयोवृद्ध नेते लाला लजपतराय जखमी झाले. पुढे ते १७ नोव्हेंबर, १९२८ साली मरण पावले. डिसेंबर, १९२८ मध्ये भगतसिंग व त्यांच्या साथीदारांनी सॅंडर्स या पोलिस अधिकाऱ्यास ठार करून लाला लजपतराय यांच्या मृत्युचा सूड घेतला. ब्रिटिश सरकारने दडपशाहीच्या मार्गाने सायमन कमिशनचा दौरा कसाबसा पूर्ण केला. भारतातील काही नेत्यांबरोबर चर्चा करून कमिशनने आपला अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला.

**२. नेहरू अहवाल**

लॉर्ड बर्कनहेड या भारतमंत्र्याने १९२५ मध्ये इंग्लंडमधील लॉर्डच्या सभागृहात बोलताना असे म्हटले होते की, ''सर्व भारतीय लोकांना मान्य होईल अशी राज्यघटना भारतीय लोकानीच तयार करावी म्हणजे ब्रिटिश सरकारला त्याच्यावर विचारविनिमय करता येईल.'' भारतीय लोकांमध्ये मतभेद असल्यामुळे भारतीय लोक अशी राज्यघटना तयार करू शकणार नाहीत असा त्यांचा गैरसमज होता. परंतु भारतीय काँग्रेसने त्याचे आवाहन स्वीकारून राज्यघटेचा मसुदा तयार करण्याचे ठरविले. १९ मे, १९२८ रोजी काँग्रेसने सर्वपक्षीय बैठक घेऊन मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली भारतीय राज्यघटनेचा आराखडा तयार करण्याचे काम सोपविले. या समितीत इतर पक्षाचे प्रतिनिधी म्हणून अली इमाम कुरेशी, बापुजी अणे, बॅ. जयकर, तेजबहादूर सप्रू, मंगलसिंग, सुभाष बोस इ. चा समावेश करण्यात आला. जवाहरलाल नेहरू हे या समितीचे सचिव होते. नेहरू अहवाल म्हणजे संपूर्ण व तपशीलवार राज्यघटना नसून भावी राज्यघटनेचा तो स्थुल आराखडा होता. या अहवालात पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला होता.

१. भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात यावे.
२. जातीय मतदार संघ रद्द करण्यात यावेत.
३. केंद्रीय कायदेमंडळात व ज्या प्रांतांमध्ये मुसलमान अल्पसंख्यांक असतील त्या प्रांतांमध्ये त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात याव्यात. मात्र ज्या प्रांतामध्ये ते बहुसंख्यांक असतील या प्रांतांमध्ये यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात येऊ नयेत.
४. प्रौढ मतदान पद्धती अंमलात आणावी.
५. स्त्रियांना समान हक्क असावेत.
६. कामगार संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य मिळावे.
७. धर्म व राज्य परस्परांपासून अलग असावेत.
८. भारतीयांना मूलभूत हक्क बहाल करण्यात यावेत.
९. भाषावर प्रांतरचनेच्या तत्त्वावर देशातील प्रांतांची पुनर्रचना करावी.
१०. भारतातील संस्थाने संघराज्यात सामील केली जावीत.

### ३. कलकत्ता येथील सर्वपक्षीय परीषद (१९२८)

२२ डिसेंबर, १९२८ रोजी कलकत्ता येथे डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय सदस्यांची एक परिषद नेहरू अहवालास मंजुरी मिळविण्यासाठी भरविण्यात आली. या परिषदेत म. गांधी, जिना, पं. मालविय, ॲनी बेझंट, अली इमाम, मौलाना आझाद इ. सदस्य उपस्थित होते. चार पाच दिवस चर्चा झाल्यानंतर जिनांनी काही उपसुचना सुचविल्या. केंद्रीय कायदेमंडळात मुस्लिमांना १/३ जागा दिल्या जाव्यात. प्रौढ मतदान पद्धतीचा अवलंब न झाल्यास पंजाब व बंगालमध्ये मुस्लिमांना लोकसंस्थेच्या प्रमाणात राखीव जागा दिल्या जाव्यात. या घटनेत बदल करावयाचा झाल्यास केंद्रीय कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीत ४/५ मते मिळाल्यानंतरच बदल केला जावा. अशा जिनांनी काही महत्त्वपूर्ण मागण्या केल्या. परंतु बॅ. जीना व डॉ. मुंजे यांनी मात्र या मागण्यांना विरोध केला. परिणामी जिनांनी आपला पाठिंबा काढून घेतला व मार्च १९२९च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात लीगला नेहरू अहवाल मान्य नसल्याचे जाहीर करून मुस्लिमांच्या अधिकारांच्या दृष्टीने जीनांनी चौदा मुद्दे मांडले. नेहरू अहवालाला जिनांचे जे आक्षेप होते. त्यावरील प्रतिक्रिया या मुद्यांमध्ये उमटली आहे.

### ४. काँग्रेसचे कलकत्ता अधिवेशन (डिसेंबर, १९२८)

मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे कलकत्ता येथे वार्षिक अधिवेशन डिसेंबर, १९२८ साली भरले. या अधिवेशनात नेहरू अहवालावर चर्चा झाली. नेहरू अहवालातील भारताला वसाहतीचे स्वराज्य द्यावे ही तरतूद काँग्रेसमधील सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू, सत्यमूर्ती या तरुण नेत्यांना अमान्य होती. १९२७ साली झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केला असताना आता अशी मागणी करणे बरोबर नाही असे त्यांना वाटत होते. यावेळी गांधीजींनी मध्यस्थी करून असे सुचविले की, नेहरू अहवाल आहे तसा मान्यतेसाठी ब्रिटिश सरकारकडे पाठवावा, आणि एका वर्षाच्या आत हा अहवाल सरकारने फेटाळला तर संपूर्ण स्वातंत्र्याच्या उद्दिष्ट्यपूर्तीसाठी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यात यावी. गांधीजींचा हा प्रस्ताव या अधिवेशनात मान्य करण्यात आला. परंतु लीगने आपल्या अधिवेशनात हा ठराव अमान्य केल्यामुळे ब्रिटिश सरकारने सुद्धा त्यास केराची टोपली दाखविले.

### ५. लॉर्ड आयर्विन यांची घोषणा :

इ.स. १९२९ साली इंग्लंडमध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन मजूर पक्ष सत्तेवर आला. रॅम्से मॅकडोनाल्ड या ब्रिटिश पंतप्रधानाने भारताचा गव्हर्नर जनरल लॉर्ड आयर्विन याच्याबरोबर तब्बल तीन महिने भारताच्या राजकीय भविष्याविषयी चर्चा केली. आयर्विन भारतात परत आल्यानंतर त्याने ३१ ऑक्टोंबर, १९३१ रोजी घटनात्मक प्रगती घडवून भारताला वसाहतीचे स्वराज्य देणे हे ब्रिटिशांचे ध्येय राहील अशी घोषणा केली. परंतु ही घोषणा अतिशय संदिग्ध होती. कारण भारताला वसाहतीचे स्वराज्य नेमके कधी देण्यात येईल हे या घोषणेत स्पष्ट करण्यात आले नव्हते. त्यामुळे भारतीय नेते फार अस्वस्थ झाले. या घोषणेचा निश्चित अर्थ व हेतू काय आहे याचे उत्तर गव्हर्नर जनरलने सांगितले पाहिजे असे नेहरू, गांधी या नेत्यांना वाटले. त्याच प्रमाणे नेहरू अहवालाच्या मान्यतेबाबत काँग्रेसने घातलेली एक वर्षाची मुदत आता संपत आलेली होती. ती मुदत संपताच सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा प्रस्ताव काँग्रेसने पास केला होता. थोडक्यात सायमन कमिशनचा अहवाल पार्लमेंट पुढे आला नव्हता. नेहरू अहवालाला अर्थ उरला नव्हता. अशा परिस्थितीत काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन लाहोर येथे भरले.

### ६. काँग्रेसचे लाहोर अधिवेशन (इ.स.१९२९)

इ.स. १९२९ मध्ये लाहोर या ठिकाणी भरलेले अधिवेशन भारतीय स्वातंत्र्य चळवळीत संस्मरणीय ठरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष पद प. जवाहरलाल नेहरू यांच्याकडे आले होते. या अधिवेशनासाठी भारतातील निरनिराळ्या प्रांतातील जवळजवळ १५००० लोक उपस्थित होते. काँग्रेसच्या सनदशीर मार्गांना केलेल्या मागण्या ब्रिटिश सरकार मान्य करीत नसल्याचे भारतीय नेत्यांच्या लक्षात आले होते. त्यामुळे काँग्रेसने कृतिशील व्हावे असे काँग्रेस मधील तरुण नेतृत्वाला वाटत होते. अधिवेशनाच्या मंडपात जागोजागी तिरंगी ध्वज फडकविण्यात आले होते. सर्व परिसर वंदे मातरम्च्या घोषणांनी दुमदुमला होता. ३० डिसेंबर, १९२९ ला याच अधिवेशनात काँग्रेसने देशाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचे ध्येय घोषित केले तसेच २६ जानेवारी, १९३० हा दिवस सर्व भारतात स्वातंत्र्यदिन म्हणून पाळावा व सर्वांनी सामुदाईकपणे देशसेवेची शपथ घ्यावी असे ठरविण्यात आले. याच अधिवेशनात सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा कार्यक्रम निश्चित करण्याचे अधिकार गांधींना देण्याचा ठराव एकदिलाने पास करण्यात आला. गांधीजींनी शेवटचा पर्याय म्हणून लॉर्ड आयर्विन यांना पत्र पाठवून आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी आग्रह धरला. परंतु आयर्विन यांनी कोणताहीप्रतिसाद न दिल्याने शेवटी साबरमती आश्रमात काँग्रेस कार्यकारीणीची बैठक झाली व त्यामध्ये सविनय कायदेभंगाची चळवळी राष्ट्रीय स्तरावर सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### ११.२.२ सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम - स्वरूप

असहकार चळवळीनंतर म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली १९३० साली सविनय कायदेभंग या दुसऱ्या व्यापक राष्ट्रीय चळवळीला सुरूवात झाली. या चळवळी दरम्यान नेत्यांना अटक झाली तरी सर्वसामान्य जनतेने ही चळवळ पुढे चालू ठेवावी असे ठरविण्यात आले होते. ही चळवळ पूर्णपणे अहिंसक मार्गाने चालू राहणार होती. परंतु चळवळ सुरू असताना जनतेकडून चुकून एखादी हिंसात्मक घटना घडली तरी ही चळवळ मागे घेतली जाणार नाही असे आश्वासन गांधीजींनी दिले. सविनय कायदेभंग याचा अर्थ असा की, कोणत्याही हिंसाचाराचा अवलंब न करता शांततामय मार्गाने सरकारच्या अन्यायी व जुलमी कायद्यांना प्रतिकार करुन तो भंग करणे होय.

### १. सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम

म. गांधीजींनी १९३० साली मिठाचा कायदा मोडून सविनय कायदेभंग चळवळीचा शुभारंभ करण्याचे ठरविले. त्यादृष्टीने त्यांनी हा निर्णय सर्वांना कळविला. मीठ या जीवनावश्यक वस्तूवर सरकारने  कर लादणे गांधीजींना योग्य वाटत नव्हते. मीठ ही वस्तू सर्वसामान्य लोकाच्या जीवनात दररोज उपयोगी पडणारी वस्तू होती. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या जिव्हाळ्याचा तो एक प्रश्न होता. गांधीजींनी मीठाचा सत्याग्रह करण्याची जी योजना मांडली त्या योजनेचे प. जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांनी स्वागत केले. पंडित नेहरूंनी आपल्या चरित्रात असे म्हटले आहे की, ''गांधीजींच्या या निर्णयाने मीठ या शब्दाला अचानक वेगळे सामर्थ्य प्राप्त झाले. दैनंदिन गरजेच्या साध्या वस्तुंचा राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामाशी संबंध जोडणे आम्हाला सोपे वाटत नव्हते. मात्र ही किमया गांधींनी करून दाखविली.'' गांधींनी १२ मार्च, १९३० रोजी मिठाचा कायदा मोडून सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे जाहीर केला होता.

१. मीठाच्या कायद्याचा भंग करणे.
२. शेतसारा व इतर सरकारी कर न भरणे
३. शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार घालणे
४. न्यायालयांवर बहिष्कार टाकणे.
५. निवडणूका, सरकारी समारंभावर बहिष्कार टाकणे.
६. परदेशी मालावर बहिष्कार टाकणे
७. सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार टाकणे
८. जंगल कायद्याचा भंग करणे.
९. दारू व अन्य नशिल्या पदार्थ्यांवर बंदी घालणे इ.

**२. दांडी यात्रा - मीठाचा सत्याग्रह**

म. गांधीजी आपल्या ७८ सहकाऱ्यासह १२ मार्च रोजी साबरमती आश्रमातून दांडीकडे निघाले. गांधीजी २४१ मैलाचे अंतर २४ दिवसांत कापून ५ एप्रिलला दांडी या ठिकाणी पोहचले. दुसऱ्या दिवशी मीठाचा सत्याग्रह करावयाचा होता. यावेळी जर गांधीजींना सरकारने अटक केली तर सत्याग्रहाचे नेतृत्व अब्बास तय्यबजी व त्यांच्यानंतर सरोजिनी नायडू यांनी करावे असे गांधीजींनी सांगितले. ६ एप्रिल रोजी गांधीजींनी आपल्या हजारो सहकाऱ्यांसह समुद्रात उतरून आणि किनाऱ्यावरील मीठ उचलून मीठाचा अन्यायकारक कायदा मोडला. या नंतर लगेचच सर्व देशभर कायदेभंग चळवळीला प्रारंभ झाला. देशातील जवळ-जवळ ५ हजार गावांमध्ये हा कयदा हजारोंच्या संख्येने येऊन सर्वसामान्य लोकांनी मोडला. यावेळी ब्रिटिश सरकारने गांधींना अटक न करता ही चळवळ मोडून काढण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांना अटक केली.

तामिळनाडूमध्ये सी. गोपालचारी यांनी त्रिचन्नापल्ली पासून तंजावरच्या किनाऱ्यावरील वेदरानिय्यमपर्यंत मीठ मोर्चा काढला. त्यावेळी राजगोपालचारी यांना ३० एप्रिलला अटक झाली. मलबार मध्ये के. केलप्पन या वायकोम प्रजासत्ताकाच्या नायकाने कालिकत पासून पायान्नूर पर्यंत पायी चालत जाऊन मीठाच्या कायद्याचा भंग केला. काही सत्याग्रही आसाममधील सिल्हेटपासून बंगालच्या किनाऱ्यावरील नौखाली पर्यंत मीठाचा सत्याग्रह करण्यासाठी पायी चालत गेले आंध्रमधील वेगवेगळ्या जिल्ह्यात मीठाच्या सत्याग्रहाची प्रमुख केंद्रे म्हणून अनेक ठिकाणी शिबीर स्थळे उभारण्यात आली. याच दरम्यान गांधींजींनी लॉर्ड आयर्विन यांना आपण धारासन या ठिकाणी सत्याग्रह करणार आहोत असे कळविले त्यावेळी मात्र सरकारने त्यांना अटक केली. परंतु या घटनेचा चळवळीवर कोणताही परिणाम न होता चळवळीचा जोम आणखीनच वाढला.

**३. धारासना सत्याग्रह :**

सविनय कायदेभंगाच्या चळवळीत धारासना सत्याग्रह हा सुद्धा फार गाजला. गांधीजींना अटक झाल्यानंतर त्यांच्याच सुचनेप्रमाणे धारासना सत्याग्रहाची तयारी अब्बास तय्यबजी करीत असताना त्यांना सरकारने पकडले. त्यामुळे या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले. या सत्याग्रहात ३००० सत्याग्रही सामील झाले होते. २२ मे, १९३० रोजी धारासना येथे सत्याग्रह झाला. पोलिसांनी सत्याग्रहींच्या तुकड्यांवर लाठीहल्ला केला तरी तुकड्यामागून तुकड्या पोलिसांचा मार खाण्यासाठी व स्वत:ला अटक करून घेण्यासाठी मिठागराच्या दिशेने पुढे येत होत्या. या घटनेचे साक्षीदार असलेले मिलर असे लिहतात की, ''१८वर्षाच्या माझ्या पत्रकारितेच्या काळात २२ देशातील जनआंदोलने मी पाहिली परंतु धारासनासारखी हृदयद्रावक व चित्तथरारक घटना कधी पाहिली नाही. तेथील दृश्य इतके

भयानक व लाजिरवाणे होते की, उघड्या डोळ्यांनी ते पाहवत नव्हते. गोरे अधिकारी निशस्त्र सत्याग्रह्यांवर करीत असलेला निघृण हल्ला पाहून शिसारी येत होती. शरमेने मान खाली जात होती.'' शेवटी दुपारी एक वाजता सत्याग्रह यशस्वी झाला. यावेळी सरोजिनी नायडू, अली इमाम आणि मणीलाल गांधी यांना सरकारने अटक केली.

### ४. वायव्य सरहद्द प्रांतातील कायदेभंग चळवळ

भारताच वायव्य सरहद्द प्रांतातील पठाण जमात गांधीजींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीने प्रभावित झाली होती. या प्रांतातील पठाणांचे नेते खान अब्दुल गफारखान यांनी पठाणांची खुदा-ई-खिदमदगार ही संघटना स्थापन केली होती. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत तिला लाल डगलेवाले असे म्हटले जात होते. या संघटनेतील हजारो कार्यकर्ते सविनय कायदेभंग आंदोलनात सहभागी झाले. या चळवळीत सरहद्द गांधी म्हणजे खान अब्दुल गफारखान यांचे बंधु डॉ. खानसाहेब हेही सहभागी झाले होते. या संघटनेने पेशावर या ठिकाणी सत्याग्रह चळवळ सुरू केली यावेळी ब्रिटिश सरकारने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी गढवाल फलटणीला त्यांच्यावर गोळीबार करण्यास सांगितले परंतु निःशस्त्र सत्याग्रहींवर गोळीबार करण्यास या फलटणीने नकार दिला त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत या ठिकाणच्या सत्याग्रहाला आगळे - वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ५. बिहारमधील चौकीदार करबंदी चळवळ

बिहारला समुद्र किनारा नसल्यामुळे त्या ठिकाणी मिठाचा सत्याग्रह हाती घेणे अशक्य होते. त्यामुळे त्या ठिकाणी मे, १९३० साली चौकीदार करबंदी चळवळ सुरू झाली. मोंधीर, सरण आणि भागलपूर या जिल्ह्यातील लोकांनी सरकारला चौकीदार कर देण्यास नकार दिला. बिहारमध्ये पोलिसदल अपुरे असल्यामुळे सरकारने तेथे चौकीदार नेमले होते. त्या चौकीदारांना जे वेतन दिले जात होते ते तेथिल जनतेकडून चौकीदार कर घेऊन भागविले जात होते. या कराविरूद्ध ज्यावेळी त्या ठिकाणी चळवळ सुरू झाली त्यावेळी सत्याग्रहींनी सर्व चौकीदारांचे व त्यांची नेमणूक करणाऱ्या पंचायतीच्या सभासदांचे राजीनामे मागितले. त्यांनी राजीनामे द्यावेत म्हणून त्यांचे मन वळविण्यात आले. ज्यांनी राजीनामे दिले नाहीत त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला. यावेळी सरकारने कर न देणाऱ्या लोकांवर जबरदस्ती करण्यास सुरूवात केली. एवढेच नव्हे तर भागलपूर जिल्ह्यातील कॉंग्रेसचा आश्रम पोलिसांनी ताब्यात घेतला. यावेळी लोकांनी त्या आश्रमासमोर निदर्शने केली. परिस्थितीची पाहणी करण्यासाठी पटण्याहून डॉ. राजेंद्र प्रसाद व अब्दुल बारी आले होते. यावेळी निदर्शकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या लाठी हल्ल्यात डॉ. राजेंद्र प्रसाद जखमी झाले होते. त्यामुळे राष्ट्रवाद्यांची शक्ती आणखीनच वाढली. ग्रामीण भागात प्रवेश करणे सरकारला अशक्य झाले होते.

### ६. गुजरातमधील साराबंदीची चळवळ

सविनय कायदेभंग चळवळीचे लोण सरदार वल्लभभाई पटेल यांच्या गुजरात मध्येही जाऊन पोहचले. भारतातील सर्व भागात या चळवळीचा फैलाव झाला होता. गुजरातमधील सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यात, खेडा जिल्ह्यात, व भरूच जिल्ह्यातील जंबसूर येथील लोकांनी ब्रिटिश सरकारला शेतसारा देण्यास नकार देऊन करबंदीची चळवळ सुरू केली होती. या तीन जिल्ह्यातील खेडेगावातील हजारो लोकांनी आपले कुटुंब, पशुधन व घरगुती सामानासह ब्रिटिश राजवटीचा सिमेबाहेर बडोद्याच्या संस्थानात आश्रय घेतला. यावेळी सरकारने त्यांची घरेदारे मोडून जमीनी आपल्या ताब्यात घेतल्या. तरीसुद्धा हे सत्याग्रही नमले नाहीत.

### ७. आदिवासींचा सविनय कायदेभंग चळवळीतील सहभाग

म. गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत महाराष्ट्र, कर्नाटक व मध्य प्रांतातील ७०,००० आदिवासी सत्याग्रहात सामील झाले होते. ब्रिटिश सरकारने तेथील आदिवाशी लोकावर वनवापरासंर्दभात निर्बंध लादले होते. या निर्बंधा विरोधात तेथील आदिवासींनी वनविषयक कायद्यांना सविनय कायदेभंग करुन आव्हान दिले होते.

### ८. महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग चळवळ

महाराष्ट्रात मुंबई शहर मीठ सत्याग्रहात आघाडीवर होते. मुंबईत वडाळा येथे पंधरा हजार सत्याग्रहींनी मिठाचा कायदा मोडला. त्यांच्यावर तुफानी लाठी हल्ला झाला तरी ते मागे सरले नाहीत. रत्नागिरी जिल्ह्यात शिरोळा येथेही मीठाचा सत्याग्रह झाला. मीठ सत्याग्रहाप्रमाणे सविनय कायदेभंग चळवळीचे इतर कार्यक्रमही झाले परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यात आला. परदेशातून येणाऱ्या कपड्याची ठिकठिकाणी होळी करण्यात आली. मुंबईत बाबू गेणू या कामगाराने परदेशी कापडाच्या ट्रकसमोर आडवे पडून आत्मबलिदान दिले. ५ मे, १९३० रोजी गांधीजींना अटक करण्यात आली. त्यामुळे लोकांच्यात आणखीन असंतोषाचा वाढला. सर्वत्र हरताळ पाळण्यात येऊन कामगारांनी ठिकठिकाणी संप पुकारले. सोलापूर या ठिकाणी ६ मे, १९३० रोजी हरताळ पाळण्यात आला. सोलापूरात लष्करी कायदा पुकारण्यात आला. मलप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे आणि कुर्बान हुसेन या सर्वांना ब्रिटिश सरकारने फासावर लटकविले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. सविनय कायदेभंग चळवळी नंतरच्या घडामोडी

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ११.२.३ गोलमेज परिषद

**१. पहिली गोलमेज परिषद** (१२ नोव्हें., १९३० ते १९ जाने. १९३१)

भारतामध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू असतानाच सायमन कमिशनचा अहवाल जाहीर झाला. या अहवालावर विचार विनिमय करण्यासाठी लंडन येथे नोव्हें., १९३० साली पहिल्या गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले. काँग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकला होता. मात्र भारतातील सर्वसामान्यांचे २०, मुस्लिमांचे १, हिंदू महासभेचे ३, शिखांचे २, ख्रिश्चन १, अब्राम्हणांचे ४, दलितांचे २, जमिनदारांचे ४, युरोपियनांचे ४, ॲग्लो इंडियन्स व भारतीय कारखानदार यांचा प्रत्येकी १ व संस्थांनांचे १६ असे जात, धर्म, वंश व हितसंबंधांच्या आधारे निवड केलेले प्रतिनिधी या परिषदेला हजर राहिले. काँग्रेस या परिषदेत सहभागी नसल्याने परिषदेत घेतलेले निर्णय अर्थहीन ठरतील असे परिषदेत असलेल्या

तेजबहादूर सप्रु, व्ही. एस. शास्त्री, बॅ. एम. आर. जयकर, यांच्यासह सर्व प्रतिनीधींनी मत व्यक्त केले. त्यामुळे परिषदेत फारसे काम होऊ शकले नाही शेवटी ब्रिटिश सरकारने काँग्रेसने परिषदेत सहभागी व्हावे म्हणून प्रयत्न केले व त्यातून गांधी-आयर्विन करार झाला.

## २. गांधी-आयर्विन करार (५ मार्च, १९३१)

म. गांधीजींनी बोलणी करता यावीत म्हणून लॉर्ड आयर्विन यांनी गांधीजींची व इतर काँग्रेस नेत्यांची तुरूंगातून सुटका केली. १६ फेब्रुवारी, १९३१ रोजी गांधीजी व आयर्विन यांची भेट होऊन बऱ्याच वेळ चर्चा घडून आली. त्यातून एक करार घडून आला तोच इतिहास प्रसिद्ध गांधी - आयर्विन करार होय. या करारात पुढील अटी होत्या -

१. गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घ्यावी.
२. राजकीय कैद्यांची सुटका करण्यात यावी.
३. मीठावरील कर काही प्रमाणात रद्द करावा.
४. कायदेभंगांच्या चळवळींसंबंधी सरकारने काढलेले वटहुकूम रद्द करण्यात यावेत.
५. राष्ट्रीय काँग्रेसने गोलमेज परिषदेत भाग घ्यावा.
६. परदेशी दारू व अन्य नशिले पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांवर शांततेने निदर्शने करण्याचा हक्क असावा.
७. ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याचा निर्णय मागे घ्यावा.

## ३. दुसरी गोलमेज परिषद : (७ सप्टेंबर, १९३१ ते १ डिसेंबर, १९३१)

२१ ऑगस्ट, १९३१ रोजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहण्यासाठी गांधीजी समुद्रमार्गे लंडनला रवाना झाले. लंडन येथे इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद भरली होती. या परिषदेला इंग्लंडमधील व भारतातील राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, संस्थानांचे प्रतिनिधी असे सुमारे १०७ प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत नव्या घटनेची रूपरेखा व अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधीत्व या दोन प्रश्नांवर चर्चा घडून आली या परिषदेत बॅ. जीना व म. गांधी यांच्यामध्ये मतभेद झाले. तसेच ख्रिश्चन, दलित, अॅग्लो - इंडियन यांच्या प्रतिनिधिंनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. तर गांधीजींनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. ब्रिटिश सरकारने ही मागणी पूर्णपणे नाकारली त्यामुळे परिषद अयशस्वी ठरली.

## ४. सविनय कायदेभंगांची चळवळ पुन्हा सुरू

गांधीजीं गोलमेज परिषदेवरून २८ डिसेंबर, १९३१ साली भारतात आले व त्यांनी पुन्हा सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. यावेळी आयर्विनच्या जागी नवे व्हाइसरॉय म्हणून विलिग्डंन यांची नेमणूक झाली होती. त्यांनी गांधीजींनी सुरू केलेली चळवळ दडपून टाकण्याचा निर्णय घेतला. गांधी आयर्विन करारानुसार देण्यात आलेल्या आश्वासनांना ब्रिटिश सरकारने पाळल्या नाहीत. व्हाईसरॉयने नवीन चार वटहुकूम काढून अमानुष दडपशाहीचे दर्शन भारतीय जनतेला दाखविण्यास सुरूवात केली. या दडपशाहीला प्रतिउत्तर देण्यासाठी प्रांतिक काँग्रेस समित्यांनी शेतकऱ्यांना करबंदीची चळवळ सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. या चळवळीचे नेतृत्व वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या नेत्यांनी केले. गांधीजींनी सरकारला चार नवे वटहुकूम मागे घेण्याची विनंती केली. या विनंतीकडे दुर्लक्ष

करून सरकारने म. गांधी, पं. नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. अन्सारी इ. नेत्यांना अटक केली. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने पोलिस व न्यायाधिशांना विशेष अधिकार बहाल केले. यावेळी सरकारने जवळ-जवळ ९० हजार लोकांना कैद केले. या कामात सरकारने कोणाच्याही घराची झडती घेणे, संशयावरून कोणालाही अटक करणे, सत्याग्रहींच्या नातेवाईकांचा छळ करणे, दंड बसविणे, खेड्यातील लोकांना मारहाण करणे यासारख्या दहशतवादी मार्गाचा अवलंब केला. त्यामुळे या चळवळीचा जोर हळूहळू ओसरत गेला. नेमकी हिच वेळ साधुन रोजी ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला.

### ५. जातीय निवाडा (१६ ऑगस्ट १९३२) :-

जातीय निवाडा भारतातील अल्पसंख्य गटाचे हितसंबंध बहुसंख्य गटाच्या हितसंबंधापेक्षा वेगळे आहेत हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला या निवाड्यातील महत्त्वपूर्ण तरतुदी पुढील प्रमाणे होता.

१. प्रांतीय कायदेमंडळातील भारतीय प्रतिनिधींची संख्या दुपटीने वाढविण्यात येईल

२. भारतातील निरनिराळ्या जाती - जमातीच्या व हितसंबंधी गटाच्या प्रतिनिधींची प्रांतिक व केंद्रिय कायदेमंडळातील संख्या ठरविण्यात येईल.

३. मुस्लिमांसाठी असलेली विभक्त मतदार संघाची तरतूद तशीच कायम ठेवून याच तत्त्वानुसार दलित व मागासवर्गीयांसाठी विभक्त मतदार संघाची तरतुद करण्यात येईल.

४. विभक्त मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या अधिकाराबरोबरच सामान्य मतदार संघातून निवडणूक लढविण्याचाही अधिकार मुस्लिम, दलित व मागासवर्गीयांना देण्यात येईल.

५. मुस्लिमांना अल्पसंख्याक म्हणून त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधीत्व देण्यात येईल.

६. भारतीय समाजातील मुस्लिम, शीख, ॲग्लो इंडियन्स, युरोपीय जमीनदार, कामगार, दलित व मागासवर्ग, भारतीय ख्रिश्चन, उद्योगपती व भांडवलदार असे अल्पसंख्याक गट कल्पुन त्या सर्वांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात येतील

### ६. पुणे करार (१९३२) :-

इंग्रजांनी ''फोडा, झोडा व राज्य करा'' या नीतीप्रमाणे भारतात दुही निर्माण करून राज्य केले. १९०९ व १९१९ च्या कायद्यानुसार मुस्लिम व इतर अल्पसंख्यांकांना स्वतंत्र मतदार संघ देऊन भारतीय समाजात फूट पाडली जातीय निवाडा प्रसिद्ध झाल्यावर गांधीजींनी अतिशय तिखट शब्दात प्रतिक्रिया व्यक्त करून मॅकडोनाल्ड यांना या जातीय निवाड्यात बदल करण्याची विनंती केली. २० सप्टेंबर, १९३२ पर्यंत सरकारने त्यामध्ये बदल न केल्यास प्राणांतिक उपोषण करण्याचा निर्णय कळविला. ब्रिटिश सरकारने या गोष्टीस नकार दिला. परिणामी २० सप्टेंबर, १९३२ ला गांधीजींनी प्राणांतिक उपोषणास सुरूवात केली. शेवटी गांधीजी व आंबेडकर यांच्यात तडजोड होऊन करार झाला. तोच २४ सष्टेंबर, १९३२ चा पुणे करार किंवा येरवडा करार होय. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदार संघा ऐवजी राखीव मतदार संघास मान्यता दिली. पुणे करारात पुढील अटी होत्या.

१. सर्वसाधारण मतदारसंघातून प्रांतीय कायदेमंडळासाठी अस्पृश्यांना राखीव जागा असाव्यात. त्या पुढीलप्रमाणे - मद्रास ३०, मुंबई-१५, पंजाब ८, बिहार-ओरिसा १८, संयुक्त प्रांत २०, आसाम -७, बंगाल - ३०, मध्य प्रदेश २० अशा एकूण १४८ जागा.

२. या राखीव जागांसाठी प्राथमिक निवड दलितांकडून व अंतिम निवड सर्व साधारण मतदारांकडून असावी.

३. केंद्रीय कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहात दलितांना १८% प्रतिनिधित्व द्यावे.

४. ही तरतूद दहा वर्षासाठी असावी.

५. नोकऱ्यांमध्ये शैक्षणिक पात्रतेनुसार प्राधान्य द्यावे.

६. दलितांच्या शैक्षणिक सुधारणांसाठी अंदाजपत्रकात पुरेशा रकमेची तरतुद असावी.

**७. तिसरी गोलमेज परिषद (७ नोव्हेंबर, १९३२ ते २४ नोव्हेंबर, १९३२)**

पहिल्या दोन्ही गोलमेज परिषदा अयशस्वी झाल्या होत्या. या परिषदांमध्ये संपूर्ण स्वातंत्र्याबद्दल विचार न झाल्याने गांधीजींनी परिषदेचा त्याग करून सविनय कायदेभंगाची चळवळ भारतात पुन्हा सुरू केली. याचवेळी ब्रिटिशांनी तिसरी गोलमेज परिषद बोलावून भारताचा पेचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने परिषदेवर बहिष्कार टाकला. तिन्ही गोलमेज परिषदांना उपस्थित असणारे एकमेव नेते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. या परिषदेत फक्त चर्चा झाली. कोणतेही महत्त्वाचे निर्णय या परिषदेत झाले नाहीत.

### ११.२.४ सविनय कायदेभंग चळवळीची समाप्ती

जातीय निवाडा, म. गांधीजीचे उपोषण, तिसरी गोलमेज परिषद यासारख्या घटना इ.स. १९३२ साली घडत असताना भारतात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरूच होती. ब्रिटिशांनी भारतीय जनतेवर दडपशाही करून ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. अनेक काँग्रेस नेत्यांना अटक करून काँग्रेसला बेकायदेशीर संघटना ठरविली. या काळात ब्रिटिश सरकारने १ लाख २० हजार लोकांना कैदेत डांबले. ब्रिटिश सरकारने फेंब्रु., १९३३ साली कस्तुरबा गांधी यांना अटक करून सहा महिन्यांची तुरूंगवासाची शिक्षा दिली. पुढे गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळीचे स्वरूप बदलून वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. पुढे सविनय कायदेभंग चळवळीतील हवा निघून गेली. शेवटी ६ एप्रिल, १९३४ साली काँग्रेसने सविनय कायदेभंग चळवळ स्थगित केली.

### ११.२.५ सविनय कायदेभंग चळवळीची वैशिष्ट्ये :

१. मुंबई येथील गिरणी मालकांनी, कारखानदारांनी, या चळवळीस आर्थिक मदत केली.

२. या चळवळीत सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, कमला नेहरू, हेम प्रभादास, सुचेता कृपलानी या सुखवस्तू घराण्यातील स्त्रियांपासून सामान्य कुटुंबातील स्त्रियांनी सहभाग घेतला.

३. या चळवळीत मागासलेल्या भागातील आदिवाशी समाजानेही हिरीरीने पुढाकार घेतला.

४. वायव्य सरहद्द प्रांतातील आक्रमक व लढाऊ पठाणांनी अहिंसात्मक व सविनय कायदेभंगाच्या चळवळीत आपला सहभाग नोंदविला हे विशेष आहे.

५. या चळवळीत सामान्य शेतकरी वर्गही सामील झाला होता.

६. अनेक सामान्य स्त्रियांनी आपले दागिने चळवळीसाठी देऊन एक आदर्श घालून दिला होता.

### ११.२.६ सविनय कायदेभंग चळवळीचे परिणाम

**१. ब्रिटिश सरकारचे कराचे उत्पन्न घटले :-**

सविनय कायदेभंग चळवळीचे परिणाम ब्रिटिश सरकारला केवळ दोनच महिन्यात निदर्शनास आले. या चळवळीचा एक कार्यक्रम म्हणजे मद्यपान निषेध. त्यामुळे मद्यविक्रीवर बंदी घालण्यात आली. परिणामी सरकारल मद्य विक्रीच्या माध्यमातून जो कर मिळत होता त्याचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात कमी झाले.

**२. परदेशी मालाची आयात ९०% ने कमी झाली :**

ब्रिटिश मालावरील विशेषतः कापडावरील बहिष्कारामुळे भारतात येणाऱ्या ब्रिटिश मालाची आयात फार कमी झाली. त्यामुळे इंग्लंड मधील कापड कारखानदार त्रस्थ झाले. केवळ लॅंकेशायर मध्ये तीस हजार कामगार बेकार झाले. ब्रिटिश कारखान्यात काम करण्यास भारतीय कामगारांनी नकार दिला. परिणामी भारतीय उत्पादनास मोठ्या प्रमाणात गती मिळाली. मुंबईतील ब्रिटिशांच्या मालकीच्या १६ गिरण्या बंद पडल्या. खादीची विक्री. मोठ्या प्रमाणात वाढली. हजारो विणकर कामाला लागले. केवळ दोन तीन महिन्यातच ब्रिटिश मालाची भारतातील आयात ९०% ने कमी झाली. सुमारे ३० कोटीचा माल एकट्या मुंबईत सत्याग्रहींनी या काळात ताब्यात घेतला होता.

**३. ब्रिटिश सरकारची घोषणा :**

सविनय कायदेभंगाची चळवळ दडपशाहीच्या मार्गाने दडपून टाकता येईल असे ब्रिटिशांना वाटत होते. परंतु या चळवळीने ब्रिटिशांचे सर्व अंदाज चुकीचे ठरविले. आता भारतीय लोकांना राजकीय सुधारणा देण्यासाठी ब्रिटिशांनी नाव्हेंबर, १९३० साली लंडन येथे गोलमेज परिषद घेतली जाईल अशी घोषणा केली. या परिषदेसाठी भारतीय नेते व काँग्रेसने सहकार्य मिळविण्यासाठी ब्रिटिशांनी प्रयत्न सुरू केले एवढेच नव्हे तर त्यांनी तुरूंगात असणाऱ्या देशातील प्रमुख नेत्यांशी सुद्धा भेटून चर्चा केली.

**४. ब्रिटिशांच्या दमणनीतीची भीती राहिली नाही :**

सविनय कायदेभंगाच्या चळवळीत ब्रिटिशांनी दडपशाहीच्या मार्गाने ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. धारासना सारख्या सत्याग्रहाच्या वेळी हजारो सत्याग्रही ब्रिटिश सरकारने केलेल्या लाठी हल्ल्यामुळे जखमी झाले तरी ते माघारी फिरले नाहीत. मुंबईत बाबू गेणू सारख्या कामगारने आपल्या प्राणाची आहुती दिली. अशा असंख्य अत्याचाराच्या घटना संपूर्ण भारतात घडत असताना सुद्धा सत्याग्रही मागे फिरत नव्हते. या आंदोलनात सुमारे १ लक्ष लोकांना अटक झाली होती. स्वातंत्र्यासाठी लाठी हल्ला, जखमी होणे, तुरूंगात जाणे याची आता लोकांना भीती राहिली नाही. उलट त्या गोष्टी राष्ट्रभक्तीचे प्रतिक मानल्या गेल्या.

**५. चळवळीला राष्ट्रव्यापी स्वरूप प्राप्त झाले :**

सविनय कायदेभंग चळवळीमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ ही शहरापुरती मर्यादीत न राहता देशाच्या कानाकोपऱ्यात पसरली. या चळवळीत देशातील सर्व स्तरातील लोक उतरले होते. डॉक्टर, वकिलांपासून शेतकरी आणि स्त्रिया पर्यंतचे सर्वजण या चळवळीत उतरले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. सविनय कायदेभंग चळवळीनंतरच्या घडामोडी थोडक्यात चर्चा करा.

## ‘भारत छोडो ’ आंदोलन :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात ‘भारत छोडो ’ या चळवळीला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या चळवळीनंतरच खऱ्या अर्थाने भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या प्रक्रियेला वेग मिळाला या आंदोलनानंतर ब्रिटिश सत्ता संपुष्ठात येण्याच्या मार्गाला देखील गती मिळाली. या चळवळीचे वैशिष्ट्ये म्हणजे कोणत्याही नेत्याच्या मार्गदर्शना शिवाय जनतेने हे आंदोलन चालू ठेवले होते. म्हणूनच खऱ्या अर्थाने हे एक जनआंदोलन होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी या देशातील जनता या आंदोलनात ‘करू किंवा मरू’ या भावनेने उतरलेली होती.

### ११.३.१ चले जाव चळवळीची पार्श्वभूमी

**१. ऑगस्ट घोषणा:**

इ.स. १९३५ च्या भारत सुधारणा कायद्याने प्रांतांना स्वायतत्ता दिली. १९३७ साली सार्वत्रिक निवडणूका झाल्या. काँग्रेसने ८ प्रांतात मंत्रीमंडळे बनविली. सुमारे २७महिने या मंत्रिमंडळानी कामकाज पाहिले. १ सप्टेंबर, १९३९ रोजी दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. व्हाईसरॉय लिनलिथगो यांनी भारत ब्रिटिशांच्या बाजूने युद्धात उतरत आहे अशी घोषणा केली. ब्रिटिशांच्या या कृत्याचा निषेध म्हणून काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल याने दुसऱ्या महायुद्धातील गंभीर परिस्थती पाहून काँग्रेस व भारतीय जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी लिनलिथगो यास ८ ऑगस्ट, १९४० रोजी एक घोषणा करण्यास सांगितले या घोषणे नुसार भारतीयांना व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात अधिक संख्येने घेण्याचे जाहीर केले. परंतु काँग्रेसने ही घोषणा फेटाळली.

**२. वैयक्तिक सत्याग्रह :**

गांधीजींनी ऑक्टो, १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे ठरविले. या वैयक्तिक सत्याग्रहाचा मुख्य उद्देश ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीच्या वटहुकूमांना शांततेच्या व अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने विरोध करणे हा होता. वैयक्तिक सत्याग्रहासाठी पहिले सत्याग्रही, म्हणून विनोबा भावे यांची निवड करण्यात आली. १७ ऑक्टोबर १९४० रोजी त्यांनी भाषण बंदीचा कायदा मोडला. म्हणून त्यांना सहा महिन्याची शिक्षा झाली. अवघ्या तीन ते चार महिन्यातच ही चळवळ तीव्र झाली. १९४१ च्या अखेरपर्यंत ही चळवळ सुरू होती. यातून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने क्रिप्स मिशन भारतात पाठविले.

**३. क्रिप्स मिशनचे अपयश :**

वैयक्तिक सत्याग्रह करून संपूर्ण भारतात इ.स. १९४२ पर्यंत सुमारे २५ हजार सत्याग्रहींना तुरूंगात जावे लागले त्यामुळे ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नात अडथळे निर्माण होत होते. या कोंडीतून काही तरी मार्ग काढावा म्हणून ब्रिटिश सरकारने क्रिप्स मिशन भारतात पाठविले. क्रिप्स यांनी २५ मार्चला ब्रिटिश सरकारतर्फे आपला प्रस्ताव जाहीर केला. त्यात दुसरे महायुद्ध संपताच भारताची नवीन राज्यघटना तयार करण्याकरिता एकसमिती निर्वाचित करण्यात येईल. त्या समितीने तयार केलेल्या घटनेला मुर्त स्वरूप त्वरीत दिले जाईल मात्र ब्रिटिश वर्चस्वाखालील कोणत्याही प्रांताची ती घटना मान्य करण्याची तयारी नसल्यास व त्यांना सद्याचीच स्थिती हवी असल्यास तसे करण्यास मुभा देण्यात येईल. भविष्यात त्या प्रांतांना ती घटना स्वीकृत करावीसी वाटल्यास तशी तरतुद करण्यात येईल. ती घटना अमान्य करणाऱ्या प्रांतासाठी वेगळी घटना तयार करण्याची ब्रिटिश सरकारची तयारी असेल, असा क्रिप्स योजनेचा सारांश होता. या योजनेत उघडरित्या विभाजन वादाला प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे काँग्रेसने हा प्रस्ताव नाकारला, तर पाकिस्तानची मागणी स्पष्टपणे त्यात मान्य केली नसल्यामुळे मुस्लिम लीगनेही या प्रस्तावाला मान्यता दिली नाही.

**४. जनतेची प्रतिक्रिया :**

क्रिप्स मिशनच्या अपयशानंतर भारतात ब्रिटिश सरकारविरूद्ध असंतोषाची भावना वाढीस लागली. ब्रिटिश सरकार सामोपचाराच्या मार्गाने आपणास स्वातंत्र्य देणार नाही. तेव्हा त्यांच्या बरोबर वाटाघाटी करण्यापेक्षा आता कृती करण्याची वेळ आली आहे असे देशातील सर्वसामान्य जनतेला वाटू लागले. सामोपचाराचा मार्ग सोडून काँग्रेसने सर्वकष लढ्याची तयारी करावी अशी मागणी जनतेकडून होऊ लागली. नेताजी सुभाषचंद्र बोस हे हरिपुरा येथील काँग्रेस अधिवेशनापासूनच या मागणीचा पाठपुरावा करीत होते. भारताबाहेर जर्मनीत राहून ते आपली भूमिका भारतीय जनतेला समजावून सांगत होते.

**५. ब्रिटिशांचा प्रचार :**

भारतीयांचा प्रश्न सोडविण्यासाठी आमची तयारी आहे परंतु राष्ट्रीय काँग्रेसच्या असहकाराच्या धोरणामुळे ते शक्य होत नाही असा ब्रिटिश सरकारने सर्वत्र प्रचार सुरू केला. परिणामी चळवळी शिवाय आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही अशी गांधीजींची पक्की खात्री झाली. म्हणून त्यांनी चलेजाव चळवळ भारतात सुरू केली.

**६. जपानचा साम्राज्यवाद**

दुसऱ्या महायुद्ध काळात पूर्वेकडून जपानने हिंदुस्थानवर आक्रमण करण्याच्या हालचाली सुरू केल्याने गांधीजी अधिकच अस्वस्थ झाले. हिंदुस्थान ही ब्रिटिश व जपान यांच्यातील संघर्षाची भूमी बनेल व या दोन साम्राज्यवादी सत्तांच्या संघर्षात भारताचा बळी जाईल. अशी भीती गांधीजींना वाटू लागली. या युद्धात ब्रिटिशांचा पराभव झाला व भारत जपानच्या ताब्यात गेला. तरीसुद्धा भारताचे मोठे नुकसान होईल. जपानने भारतावर आक्रमण केले तर पर्यायाने ते ब्रिटिश साम्राज्यावरील आक्रमण ठरेल. भारत स्वतंत्र असता तर जपानच्या आक्रमणाचा धोका राहिला नसता. ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य द्यावे. अन्यथा एक नवीन चळवळ उभी करावी लागेल असे धोरण गांधीजींनी जनतेपुढे ठेवले.

वरील सर्व परिस्थितीमुळे 'भारत छोडो' आंदोलनाची पार्श्वभूमी तयार झाली.

### ११.३.२ 'भारत छोडो' आंदोलनाचा ठराव

इ.स. १९४२ साली वर्धा या ठिकाणी काँग्रेस कार्यकारीणीची बैठक झाली. या बैठकित कार्यकारिणीने राष्ट्रीय आंदोलनाचे सर्व अधिकार गांधीजींना दिले. गांधीजींचा 'भारत छोडो' प्रस्ताव १४ जुलै १९४२ रोजी कार्यकारिणीने पास केला. ७ ऑगस्ट, १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले व त्यात काँग्रेस कमिटीने हा ठराव स्वीकारला. व ८ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबई येथे गवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकित 'छोडो भारत'चा ऐतिहासिक ठराव प्रचंड बहुमताने संमत झाला. यावेळी महासमितीचे २५० सदस्य व ८० हजार जनसमुदाय हजर होता. त्यांच्यापुढे गांधीजींनी असे भाषण केले की, "मी स्वातंत्र्यासाठी आता अधिक काळ वाट पाहू शकत नाही. मी आणखी वेळ घालविला तर मला जगाचा अंत होईपर्यंत थांबावे लागणार आहे. त्यासाठी मी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे. हा माझ्या जीवनातील शेवटचा संघर्ष असेल. आम्ही आता अधिक काळ ब्रिटिशांच्या गुलामगिरीत राहू शकत नाही त्यासाठी सर्व शक्तीनिशी ब्रिटिश सरकारशी लढा द्या."

### ११.३.३ ऑगस्ट क्रांती व सरकारची दडपशाही

गांधीजींनी ८ ऑगस्ट, १९४२ रोजी चले जाव चळवळीची घोषणा केली. दुसऱ्या दिवसापासून आंदोलनास सुरूवात होणार होती. ब्रिटिश सरकारने हे आंदोलन दडपून टाकण्याचा निर्णय घेतला. ९ ऑगस्टला म. गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी, मौलाना आझाद, गोविंद वल्लभपंत, असफअली अशा १४८ नेत्यांना अटक केली. गांधीजींना पुणे येथील आगाखान पॅलेसमध्ये तर इतर नेत्यांना अहमदनगर येथील तुरूंगात डांबून ठेवले. काँग्रेसला बेकायदेशीर ठरविण्यात येऊन या संघटनेची बँकेतील खाती सरकार जमा करण्यात आली. काँग्रेसशी संलग्न असणाऱ्या संघटनांवर बंदी घालण्यात आली. यामुळे चळवळ सुरू होणार नाही असा ब्रिटिशांचा गैरसमज होता. परंतु जनतेने उस्फूर्तपणे आंदोलनास सुरूवात केली. गांधीजींच्या 'करा किंवा मरा' या संदेशाने भारावलेल्या जनतेने स्वातंत्र्यासाठीचा हा शेवटचा लढा दिला. सरकारी तिजोऱ्या लुटणे, रेल्वे रूळ उडवून टाकणे, पोस्ट ऑफिसेस सरकारी कार्यालयावर हल्ला करणे. इ. कृत्ये करावयास सुरूवात केली. विद्यार्थीही या चळवळीत मोठ्या संख्येने सामील झाले होते. जमशेदपूर, मुंबई, अहमदाबाद इ. प्रमुख शहरातील कारखान्यातील कामगारांनी संप पुकारले. या चळवळीत स्त्रियांनी सुद्धा उस्फुर्तपणे आपला सहभाग नोंदविला. ब्रिटिश अधिकाऱ्यांवर सुद्धा ठिकठिकाणी हल्ले झाले. पंजाब, बंगाल, आसाम, महाराष्ट्र, गुजरात या प्रांतामध्ये चळवळीला उग्र रूप प्राप्त झाले. दडपशाहीचे वेगवेगळे मार्ग अवलंबूनही चळवळ आटोक्यात येत नाही असे सरकारच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अनेक ठिकाणी लष्कराची मदत घेतली.

### सरकारची दडपशाही

ज्यावेळी ब्रिटिश सरकारने काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना अटक केली. त्यानंतर केवळ एका आठवड्यातच आंदोलकांनी ५०० पोस्ट ऑफिसेस, व १५० पोलिस ठाण्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात ३१ पोलिस व ११ शिपाई ठार झाले. २५० रेल्वे स्टेशनस् उद्ध्वस्त करण्यात आले. कर्नाटकमध्ये १,६०० ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडण्यात आल्या. २६ रेल्वे स्थानकावर व ३२ टपाल कार्यालयावर हल्ले करण्यात आले. ५३८ घटनांमध्ये सरकारने निशस्त्र जमावावर गोळीबार केला. त्यामध्ये ९३० लोक ठार तर १६३० लोक जखमी झाले.

सरकारने दडपशाहीचा एक भाग म्हणून अनेक खेड्यातील लोकांना ओलिस ठेवले. अनेक लोकांकडून सरकारने सामुदाईक दंड वसूल केला. यामध्ये सरकारला ९० लाख रू. मिळाले. सरकारने अनेक गावे जाळून बेचिराख केली. १९४२ च्या शेवटपर्यंत ६० हजार लोकांना अटक करण्यात आले. २६ हजार लोकांना वेगवेगळ्या शिक्षा ठोठावल्या. १८ हजार लोकांना भारत संरक्षण कायद्याअंतर्गत अटक करण्यात आले.

### ११.३.४ छोडो भारत चळवळ विविध गटांची भूमिका

### १. भारत छोडो चळवळीतील भूमिगत संघटनांचे योगदान

छोडो भारत चळवळ दडपून टाकण्यासाठी ९ ऑगस्टला ब्रिटिश सरकारने अनेक लोकांना अटक केली. त्यावेळी काही नेते पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटले. व भूमिगत झाले. त्यामध्ये अच्युत पटवर्धन, अरुणा असफअली, राममनोहर लोहिया, सुचेता कृपलानी, छोटूभाई, पुराणिक, बिजू पटनाईक, आर.पी. गोयंका व पुढे तुरुंगातून सुटून आल्यानंतर जयप्रकाश नारायण या नेत्यांचा समावेश होतो. मुंबई, पुणे, सातारा, वडोदरा, गुजरातमधील अन्य प्रदेश, कर्नाटक, केरळ, आंध्र, उत्तरप्रदेश, बिहार व दिल्ली येथील स्थानिक भूमिगत संघटना फार सक्रीय होत्या. देशातील उद्योगपती व व्यापारी यांनी भूमिगत नेत्यांना उदारहस्ते देणग्या दिल्या. सुमती मोरारजी सारख्या उद्योगपती महिलांनी अच्युतराव पटवर्धन यांना पोलिसांच्या हातावर तुरी देण्यासाठी मोटारगाड्या दिल्या. अनेक लोकांनी भूमिगत नेत्यांना व कार्यकर्त्यांना लपविण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्या. भूमिगत कार्यकर्त्यांनी देशातील महत्त्वाचे पूल उद्‌ध्वस्त केले. टेलिफोनच्या तारा तोडने, रेल्वे गाड्या बंद पाडणे दळणवळण आणि वाहतुक ठप्प करणे हे भूमिगत चळवळीचे कार्याचे प्रमुख सुत्र होते. डॉ. राममोहन लोहिया, सुचेता कृपलानी यांनी भूमिगत आंदोलन चालविण्यासाठी एक मध्यवर्ती समिती स्थापन केली होती. या समितीच्या वतीने ठिकठिकाणी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना गुप्त संदेश पाठविण्यात येऊ लागले. मुंबई हे प्रमुख केंद्र ठरवून या चळवळीचे सुत्रसंचालन केले गेले. मुंबई केंद्रावरून राममोहन लोहिया नियमितपणे भाषण देत असत. या केंद्राचे कार्यक्रम मद्रास सारख्या दुसऱ्या शहरातही ऐकू येत असत. नोव्हें. १९४२ पर्यंत हे केंद्र चालू होते. नंतर पोलिसांनी ते जप्त केले. बिहार, आसाम, गुजरात बंगाल या प्रांतामध्ये पिस्तुले हातबॉम्ब, बंदूका तयार करण्याचे कारखाने उभे राहिले होते. सरकारी आकडेवारीनुसार इ.स. १९४३ च्या अखेरपर्यंत भारतात सुमारे ७०० ठिकाणी बॉम्बस्फोट होऊन शासकीय मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले. कित्येक ठिकाणी तुरूंगावर हल्ले करून कैद्यांची सुटका करण्यात आली.

### २. भारत छोडो चळवळीतील प्रतिसरकारांची भूमिका

भारत छोडो चळवळीचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे या काळात देशाच्या विविध भागात स्थानिक लोकांनी स्थापन केलेली प्रतिसरकारे होय. इंग्रज सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या विशिष्ट प्रदेशात भारतीयांनी स्वतःची शासनयंत्रणा निर्माण केली यांना प्रतिसरकार किंवा समांतर सरकार म्हणतात. पूर्व उत्तर प्रदेशातील बालिया या ठिकाणी ऑगस्ट, १९४२ मध्ये चित्तू पांडे यांनी प्रतिसरकार स्थापन केले. हे सरकार स्थानिक जिल्हाधिकाऱ्याकडून सत्ता सुत्रे आपल्या हाती घेण्यात व काँग्रेसच्या अटक केलेल्या नेत्यांची सुटका करण्यात जरी यशस्वी झाले असले तरी हे सरकार फार काळ चालू शकले नाही. बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील तामलूक येथे १७ डिसें, १९४२ रोजी जातीय सरकार अस्तित्वात आले. सप्टेंबर, १९४४ पर्यंत ते अधिकारावर होते. बिहारमध्ये भागलपूर, ओरिसात बालासुर, आंध्र प्रदेशात भीमावरम येथे स्थापन झालेल्या प्रतिसरकारांचा उल्लेख करावा लागेल. ही प्रतिसरकारे फार काळ टिकू शकली नाहीत.

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले प्रतिसरकार भारताच्या इतिहासात फार मोठ्या प्रमाणात गाजले. भारतातील प्रतिसरकारे अल्पावधीत नष्ट झाली परंतु सातारा येथील प्रतिसरकार १९४५ पर्यंत अस्तित्वात होते. हे विशेष आहे. या सरकारने ब्रिटिशांच्या अन्याय-अत्याचाराला दाद न देता प्रतिकार केला. या सरकारने ब्रिटिश सरकारला गनिमीकावा पध्दतीने हैराण केले. क्रांतिसिंह नाना पाटील हे या सरकारचे प्रमुख सुत्रधार होते. यशवंतराव चव्हाण, किसन वीर व वसंतदादा पाटील या सरकारमध्ये सामील झाले होते. सातारा याठिकाणी स्थापन झालेले प्रतिसरकार 'पत्रीसरकार' म्हणून ओळखले जात होते. नाना पाटील आणि त्यांचे सहकारी जुलमी सावकार, अधिकारी आणि फितुरांना पाय बांधून टाचेवर काठीचे तडाखे मारण्याची कठोर शिक्षा देत असत. या शिक्षेला सामान्य लोक पत्री मारणे म्हणत. त्यावरून या सरकारला पत्रिसरकार म्हणून ओळखले जाऊ लागले. छोडो भारत चळवळीचा सुरूवातीपासूनच साताऱ्याचा प्रदेश विशेष सक्रीय होता. ऑगस्ट, १९४२ मध्ये स्थानिक सरकारी मुख्यालयांवर मोर्चे नेण्यात आले. कराड, तासगाव व इस्लामपूर येथील मोर्चात हजारो गावकरी सामील झाले होते. टपाल कार्यालयावर हल्ले करून बँका लुटण्यात आल्या. टेलिफोनच्या तारा तोडण्यात आल्या साताऱ्याचे पत्रीसरकार म्हणजे स्वायत्त ग्रामसरकारचे संघराज्य होते. गावापासून जिल्हा स्तरापर्यंत या सरकारची सुसूत्र यंत्रणा होती. डिक्टेटर हा या सरकारचा सर्वोच्च अधिकारी होता. त्याच्या मदतीला अकरा सदस्यांची समिती होती. तिच्या हाताखाली पर्यवेक्षक, गटप्रमुख व पंचसमित्या होत्या. या सरकारने आपल्या वर्चस्वाखालील प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले गावकरी पंचायत समित्यांची स्थापना करीत, स्थानिक खटल्यांच्या बाबतीत न्यायनिवाडा करणे, सावकाराने लुबाडलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळवून देणे, अस्पृश्यता निर्मूलन, दारूबंदी, बालविवाह बंदी, ग्राम सफाई, शिक्षण प्रसार या सारखी लोकहिताची सामाजिक कामेही या सरकारने केली. शासनाच्या संरक्षणासाठी 'तुफानसेना' व 'आझाद सेना' ही तरुणांची पथके या सरकारने निर्माण केली. पोलिसांच्या हालाचालीवर बारीक लक्ष देणे इंग्रजांच्या अन्यायी कृतीला विरोध करणे, पंचसमित्यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, भूमिगत नेत्यांचे निरोप पोहचविणे यासारखी कामे ही पथके करीत असत. त्यामुळे ब्रिटिश शासनापेक्षा हे प्रतिसरकार लोकांच्या विश्वासाला पात्र ठरले.

### ३. भारत छोडो चळवळीतील संस्थानी प्रजेची भूमिका

चले जाव आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे संस्थानातील जनतेकडून मिळालेला प्रतिसाद हे होय. खरे तर भारतातील संस्थाने हि ब्रिटिश सत्तेचे बालेकिल्ले होते असे असतानाही तेथील प्रजेने ब्रिटिशांविरूद्ध सुरू केलेल्या चले जाव चळवळीत सक्रीय सहभाग नोंदविला होता. साताऱ्याच्या पत्री सरकारला कोल्हापूर प्रजा परिषदेचे रत्नाप्पा कुंभार यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली. ग्वाल्हेर संस्थानातील उच्च पदस्थ अधिकारी भूमिगत नेत्यांना दारूगोळा पुरवीत असत. धार या ठिकाणी बंदुका व पिस्तुले तयार करण्याचे कारखाने सुरू झाले होते. रेवा संस्थानातील विद्यार्थ्यांनी ब्रिटिश सरकारच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणत नुकसान केले होते. कोचीन, त्रावणकोर व भोपाळ येथील विद्यार्थ्यांनी शिक्षणसंस्थावर बहिष्कार टाकला होता. वकिलांनी न्यायालयावर बहिष्कार टाकला. या सर्व घटनावरून संस्थांनी जनता ब्रिटिशांना नव्हे तर काँग्रेसला अनुकूल होती हे स्पष्ट होते.

### ४. 'भारत छोडो ' आंदोलनापासून अलिप्त राहिलेले गट :

'भारत छोडा' या राष्ट्रीय काँग्रेसच्या आंदोलनास इ.स. १९४२ ते १९४४ या काळात जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले होते. बॅ. जीना यांनी मुस्लिम लोकांना या चळवळीपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. तरीसुद्धा काही मुस्लिम लीगच्या समर्थकांनी भूमिगत कार्यकर्त्यांना आपल्या घरात आश्रय दिला. एवढेच नव्हे तर त्यांनी सरकारी खबऱ्यांची भूमिका बजावली नाही हे विशेष आहे. या चळवळी दरम्यान जातीय दंगली कोठेही घडून आल्या नाहीत. त्याचप्रमाणे इंडियन ख्रिश्चन गट, मवाळमतवादी गट व आंबेडकरवादी या चळवळीपासून अलिप्त राहिले असले तरी या गटातील काही लोक स्वयंप्रेरणेने या चळवळीत सहभागी झाल्याची माहिती मिळते.

### ५. गांधीजींचे उपोषण:

'छोडो भारत' आंदोलन देशव्यापी होते. ते हिंसात्मक मार्गाने चालू नये असे गांधीजींना वाटत होते. तरीसुद्धा काही ठिकाणी या अहिंसक आंदोलनाला हिंसात्मक स्वरूप प्राप्त झाले म्हणून गांधीजींनी ९ फेब्रुवारी, १९४३ रोजी २१ दिवसांचे आमरण उपोषण सुरू केले. या वेळी त्यांचे वय बहात्तर वर्षे एवढे होते. त्यामुळे या उपोषण काळात गांधीजींची प्रकृती चिंताजनक बनली तरीसुद्धा ब्रिटिश सरकारने त्यांना तुरूंगातून सोडले नाही. ब्रिटिश सरकारचा निषेध म्हणून ए.पी. मोदी, एम.एस. अणे, व नलिनी रंजन सरकार यांनी कार्यकारीणीच्या सदस्यत्वाचे राजीनामे दिले. तरीसुद्धा सरकारने दखल घेतली नाही. शेवटी ३ मार्च,१९४३ रोजी गांधीजींनी उपोषण पूर्ण केले. डॉक्टरांच्या मते, गांधीजींचा उपवास शारीरिक दृष्ट्या एक चमत्कारच होता. ज्या उद्देशाने गांधीजींनी उपोषण सुरू केले होते तो उद्देश पूर्ण झाला. या उपोषणामुळे जनतेचे नीतीधैर्य वाढले. ब्रिटिश विरोधी जनतेची भावना अधिक तीव्र झाली. आणि राजकीय कृतीची संधी मिळाली. प्रतिकाराच्या या प्रतिकात्मक कृतीने सर्वत्र व्यापक प्रमाणावर प्रतिकार होऊ लागला. सरकारच्या आततायीपणावर जगभरातून प्रकाश पडला. १९४२च्या निघृण दडपशाहीचे नैतिक समर्थन करण्याचा सरकारचा प्रयत्न सफल झाला नाही. आणि ब्रिटिश सरकारची चूक असल्याचे जगाच्या निदर्शनास आले.

### ११.३.५ 'भारत छोडो' चळवळीचा शेवट

सन १९४२ साली भारताचा व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांच्या जागी लॉर्ड वेव्हेल यांची भारताचा व्हाईसरॉय म्हणून निवड झाली. गांधीजींनी तुरूंगात असताना वेव्हेल यांना पत्र पाठविले की, आपण तुरूंगातील काँग्रेस कार्यकारिणीच्या सदसांची भेट पुढे एप्रिल १९४४ साली गांधीजींची प्रकृती बिघडली म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांची ६ मे, १९४४ रोजी तुरुंगातून सुटका केली. यावेळी गांधीजींनी व्हाईस रॉयशी भारतातील राजकीय परिस्थितीबाबत चर्चा करण्याची तयारी दर्शवली. परंतु जोपर्यंत काँग्रेस 'भारत छोडो 'चा ठराव मागे घेत नाही तोपर्यंत ब्रिटिश सरकारला काँग्रेसशी चर्चा करण्यात रस नाही असे कळविले. पुढे जून, १९४५ साली सरकारने काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांची तुरूंगातून मुक्तता केली. भूमिगत नेत्यांविरूद्ध अटक जारी करण्याचे आदेश १९४६ च्या सुरूवातीला सरकारने मागे घेतले. त्यामुळे चले जाव आंदोलनाचा शेवट होऊन भारताला स्वातंत्र्य देण्याच्या वाटाघाटीला प्रारंभ झाला.

### ११.३.६ 'भारत छोडो' चळवळीने काय साध्य केले?

९ ऑगस्ट, १९४२ साली भारतात सुरू झालेले 'भारत छोडो' आंदोलन ब्रिटिश सरकारने दडपून टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी सन १९४५ च्या अखेरीपर्यंत

भारतातील कोणत्या ना कोणत्या प्रांतात तरी सुद्धा सुरू होते हे या आंदोलनाची वैशिष्ट्ये आहे. इ.स. १८५७ साली ब्रिटिश सरकारविरूद्ध जो पहिला मोठा उठाव झाला त्यानंतर भारतात किती तरी वर्षाने चलेजाव आंदोलनाचा मोठा उठाव झाला असे नेहरुनी म्हणाले आहे. या आंदोलनात जवळजवळ २५,००० लोक ठार झाले. असंख्य लोकांना तुरूंगात डांबण्यात आले. लक्षावधी लोक जखमी झाले. तथापि, लोकांचा उत्साह कमी झाला नाही हे ही या आंदोलनाचे वैशिष्ट्ये होते.

सन १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनामुळे भारतीय जनतेच्या मनात निर्माण झालेली राष्ट्रभक्तीची व स्वातंत्र्यप्रेमाची भावना किती प्रगल्भ व तीव्र आहे याची जाणीव ब्रिटिश सरकारला झाली. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी सत्तेविषयी भारतीय लोकांच्या मनात किती तिरस्कार आहे याची जाणीव सुद्धा सरकारला झाली. आपल्या देशाला स्वांतत्र्य व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी भारतीय जनता कोणताही त्याग करावयास मागे पुढे पाहात नाही याची ब्रिटिश सरकारला कल्पना आली. थोडक्यात चले जाव आंदोलनाला मिळालेल्या सर्वव्यापक प्रतिसादावरून भारतीय लोकांमध्ये निर्माण झालेल्या जागृतीची व काँग्रेसच्या जनाधाराची सरकारला जाणीव झाली.

ब्रिटिशांची शंभरी भरली म्हणून भारतात त्यांच्या विरूद्ध १८५७ चा उठाव झाला होता परंतु तो सरकारने विविध मार्गाने दडपून टाकला. पण सन १९४२च्या चलेजाव चळवळीने भारतातील ब्रिटिश सत्तेचे दिवस कायमचे संपत आहेत. हे जनतेच्या लक्षात आले. इंग्रज सरकारने पाशवी मार्गाने ही चळवळ दडपून टाकण्यात यश मिळविले असले तरी, भारतातील सर्व जनता आपल्या विरोधात गेली आहे. व आपणास जास्त दिवस भारतावर राज्य गाजविता येणार नाही याची खात्रीच त्यांना या आंदोलनामुळे झाली. ब्रिटिश सरकारने आता काँग्रेसबरोबर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काँग्रेसबरोबर वाटाघाटी सुरू केल्या हे या चळवळीची महत्वाची कामगिरी होय.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. भारत छोडो अंदोलनाचा थोडक्यात मागोवा घ्या.

## ११.४ सारांश

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात १९३०-३१ मधील सविनय कायदेभंग चळवळ म्हणजे ब्रिटिश साम्राज्यवादा विरोधातील लढ्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होय. १९२०-२२ मधील असहकार चळवळीत जेवढ्या सत्याग्रहींना तुरूंगवास भोगावा लागला. त्याच्या

तिप्पट सत्याग्रही या आंदोलनात तुरूंगात गेले. या चळवळी दरम्यान सुमारे ९० हजार सत्याग्रहींना तुरूंगवास पत्करावा लागला. या चळवळी दरम्यान इंग्लंडमधून आयात होणाऱ्या कापडाचे प्रमाण निम्म्याने कमी झाले सरकारला जमीन - महसूल व मद्य उत्पादना पासून मिळणारे उत्पन्न घटले. भारतातील सर्व स्तरातील लोकांना या आंदोलनापासून दूर राहण्याचे आवाहन केले असले तरी मुस्लिमांचा या आंदोलनातील सहभाग दृष्टीआड करून चालता येणार नाही. त्याचप्रमाणे शहरी व ग्रामीण भागातील गरिबांनी व अशिक्षितांनी चळवळीला दिलेला पाठींबा लक्षणीय होता. म्हणूनच बंगालचे पोलिस महानिरीक्षक इ.जे. लोमन म्हणतात. ''या अडाणी व असंस्कृत लोकांचा पाठिंबा व सहानुभूती कॉंग्रेस मिळवू शकेल याची मला खात्री नव्हती.''

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याची प्रक्रिया खऱ्या अर्थाने ज्या आंदोलनापासून सुरू झाली ते आंदोलन म्हणजे १९४२ चे भारत छोडो आंदोलन होय. म्हणजे चले जाव आंदोलन हे भारतीय जनतेने ब्रिटिश सत्तेविरूद्ध प्रखरपणे चालविलेले शेवटचे आंदोलन होय. या आंदोलनापूर्वी देशातील प्रमुख नेत्यांना साम्राज्यवादी ब्रिटिश सरकारने आंदोलन सुरू होण्यापूर्वी दडपून टाकण्यासाठी अटक केले, असे असताना सुद्धा जनतेने हे आंदोलन सुरू ठेवून यास जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त करून दिले. या आंदोलन काळात भूमिगत नेते व कार्यकर्त्यांनी ब्रिटिश सरकारला आपल्या गनिमीकावा तंत्राने हैराण करून सोडले होते. त्याचप्रमाणे भारतातील काही प्रमुख भागात लोकांनी ब्रिटिश सरकारचे शासन नामंजुर करून प्रतिसरकार स्थापन केले होते. यामुळे भारताला आतास्वातंत्र्य देण्याशिवाय पर्याय नाही, अशी ब्रिटिश सरकारची खात्री झाली होती. त्यांनी भारताला स्वातंत्र्य देण्याची प्रक्रिया सुरू केली हे या चळवळीचे महत्वाचे यश होते.

## ११.५ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न

१. सविनय कायदेभंग चळवळीची पार्श्वभूमी व व्याप्ती सांगा.
२. सविनय कायदेभंग चळवळीचे परिणाम सांगा.
३. भारत छोडो आंदोलनाची पार्श्वभूमी विशद करा.
४. भारत छोडो चळवळीतील प्रतिसरकार व भूमिगत चळवळीचे योगदान स्पष्ट करा.

## ११.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. जावडेकर आचार्य शं.द. आधुनिक भारत
२. वैद्य, डॉ. सुमन, कोठेकर, डॉ. शांता - आधुनिक भारताचा इतिहास
३. भिडे प्रा. गजानन - आधुनिक भारताचा इतिहास
४. बिपिनचंद्र - इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डस
५. ग्रोव्हर बी. एल. वेलेकर एन. के. - आधुनिक भारताचा इतिहास
६. सरदेसाई डॉ. बी.एन. नलावडे, डॉ. व्ही. एन. - आधुनिक भारताचा इतिहास.

❖❖❖❖

# १२

# घटनात्मक विकास (इ.स.१९१७ ते १९४७)

**अनुक्रमणिका**

१२.१ उद्दिष्टे
१२.२ प्रास्ताविक
१२.३ घटनात्मक विकासाची सुरूवात
१२.४ माँटेग्यूची घोषणा
१२.५ १९१९ चा भारत सरकार कायदा.
१२.६ नेहरु अहवाल
१२.७ गोलमेज परिषदा
१२.८ इ.स. १९३५ चा भारत सरकार कायदा.
१२.९ इ.स. १९३९ ते १९४७ या काळातील स्वातंत्र्य प्राप्ती साठीच्या घडामोडी.
१२.१० स्वतंत्र भारताची राज्यघटना
१२.११ सारांश
१२.१२ घटक

## १२.१ उद्दिष्टे

- इ.स. १८८५ ते १९०५ या काळातील राष्ट्रीय चळवळीची पार्श्वभूमी अभ्यासने
- राष्ट्रीय चळवळीचा इतिहास समजून घेणे.
- २० ऑगस्ट १९१७ मॉटेग्यू घोषणेचे महत्त्व अभ्यासणे.
- इ.स. १८८५ ते १९१७ या काळातील घटनात्मक विकासाचा मागोवा घेणे.
- घटनात्मक विकास आणि भारतीयांची प्रतिक्रीया अभ्यासणे.

## १२.२ प्रास्ताविक :-

मानवी जीवनातील सर्वात प्रभावी म्हणजे राज्य होय. राज्य संस्थेची मूर्त बाजू म्हणजे शासन संस्था. शासन संस्थेचे कार्य ज्या आधारावर चालते त्यास राज्य घटना असे म्हटले जाते. समाजाच्या आजपर्यंतच्या राजकीय विकासाचे राज्यघटना हे एक गमक आणि प्रतिक आहे. भारतातील विविधतेतून दिसणारी एकता, भारतीय संसदीय लोकशाही शासनप्रणाली आणि भारताची राज्यघटना याला जागतिक इतिहासात आणि व्यवहारात प्रतिष्ठा, मानसन्मान आणि अभ्यासकांना तो चिंतनाचा विषय झाला आहे.

बंगालमध्ये इंग्रजी सत्तेची पायाभरणी झाली. प्लासीच्या युध्दानंतर भारतात इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला. हिंदुस्थानाच्या इतिहासाला एक निर्णायक वळण मिळाले. बक्सारच्या लढाईनंतर (१७६४) बंगाल प्रांतावर इंग्रजांचेच नियंत्रण प्रस्थापित झाले. इ.स. १७६५ ते १७७२ या काळात जी राज्यव्यवस्था निर्माण करण्यात आली. त्या व्यवस्थेला दुहेरी राज्यव्यवस्था असे म्हणतात. भारतीयांच्या दृष्टीने एक नाविण्यपूर्ण सत्ता (व्यवस्था) प्रस्थापित झाली. दुहेरी राज्यव्यवस्था ही ब्रिटीशांची धूर्त निती होती. क्लाईव्हने कोणतीही जबाबदारी न स्विकारता आर्थिक आणि राजकीय लाभ पदरात पाडून घेतले. ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य स्थापन झाले. एका व्यापारी कंपनीला राजकीय व्यवहाराबाबत मोकळीक देऊ नये. तिच्या कारभारावर व व्यवहारावर नियंत्रण प्रस्थापित करावे अशी धारणा इंग्लंडमधील जनतेची आणि राज्यकर्त्यांची होती. या धारणेतून १७७३ चा नियामक कायदा करण्यात आला. कंपनीचे भारतीय प्रदेशावर नियंत्रण आणि प्रशासन राहील मात्र तिला ब्रिटीश संसदेच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम करावे लागेल असे निर्बंध रेग्युलेटिंग ॲक्टने लादले. ईस्ट इंडिया कंपनीला पुढील २० वर्षांसाठी राज्यकारभार आणि व्यापार करण्याची सनद देण्यात आली.

इ.स. १७८४ मध्ये ब्रिटीश संसदेत पिटचा भारत विषयक कायदा पास झाला. या कायद्यानुसार जी घटना लागू करण्यात आली, ती १८५८ पर्यंत म्हणजे कंपनीची सत्ता संपेपर्यंत अमलात राहिली. इ.स. १७९३, १८१३, १८३३ आणि १८५३ या वर्षी फेरतपासणी कायदे, सनद आणि नुतनीकरणाचे कायदे पास करण्यात आले. १८१३ च्या कायद्यानुसार टप्प्याटप्प्याने कंपनीकडून व्यापाराची मक्तेदारी काढून घेण्यात आली. १८५३ च्या सनदी कायद्यात २० वर्षाचे बंधन संसदेने स्विकारले नाही. केव्हाही कंपनीची सत्ता काढून घेण्यात येईल असे धोरण स्पष्ट करण्यात आले. कंपनीची मृत्यूघंटा तेव्हाच वाजली होती. इ.स. १८५७ च्या उठावानंतर कंपनीची सत्ता संपुष्टात आली.

१८५७ च्या उठावानंतर ब्रिटीश शासनाने भारतातील राज्यकारभाराबाबत मोठा बदल केला. त्यासाठी संसदेमध्ये दि. २ ऑगस्ट १८५८ रोजी कायदा पास करण्यात आला. या कायद्यामुळे राज्यकारभाराची चौकट निर्माण झाली. भारताच्या राज्यकारभारासाठी इंग्लंडमध्ये यंत्रणा निर्माण करण्यात आली. तिचे विशेष म्हणजे इंग्लंडच्या राज्यसत्तेच्या हाती सत्तेची सूत्रे देण्यात आली. संसदेचे नियंत्रण प्रस्थापित झाले. भारतमंत्री व भारतमंडळ निर्माण करण्यात आले. गव्हर्नर जनरल ला 'व्हाईसरॉय' म्हणजे राज्यसत्तेचा दूत असा किताब देण्यात आला. एक घटनात्मक सुधारणांचे युग सुरू झाले. या कायद्यात दोष होते. मात्र भारतीय बुध्दीजिवी वर्ग राजकीय सुधारणांचा आग्रह करत होते. मात्र व्यवस्था नाकारत नव्हते. एकाला एक जबाबदार अशी शासनव्यवस्था निर्माण करुन त्यात टप्याटप्याने सुधारणा करण्याचे ब्रिटीशांच्या धोरणाविषयी भारतीय जनतेला अप्रूप वाटत होते.

१८५८ चा सुधारणा कायदा, राणीचा जाहिरनामा, घटनात्मक चर्चेचे युग थोडक्यात फक्त संघर्ष करून भारतावर आपली सत्ता दृढ करण्यापेक्षा राजकीय सुधारणा देवून राज्यकारभार करावा असे धोरण ब्रिटीशांचे होते. राणीचा जाहिरनामा हा सुगंधी शब्दांचा शिडकावा असला तरी भारतीयांची दखल घेणे सुरू झाले.

इ.स. १८६१, १८७४, १८९२ आणि १९०९ च्या सुधारणा कायद्याचे विश्लेषण केले तर केंद्रीय कार्यकारी मंडळाचा विकास करण्यात आला. भारतीय प्रतिनिधींना राजकीय

अधिकार देण्यात आले. प्रश्न विचारण्याचा, उपप्रश्न विचारण्याचा, ठराव मांडण्याचा, अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा असे टप्याटप्याने अधिकार मिळाले. १८६१ च्या कायद्यानुसार भारतीय प्रतिनिधी (हिंदी प्रतिनिधी) कायदे मंडळात जाऊन बसला. भारतीयांना संसद, लोकशाही अधिकार आणि व्यक्तीस्वातंत्र्याची जाणीव झाली. लोकशाहीची पायाभरणी अशा पध्दतीने झाली. १९०९ च्या मोर्ले-मिंटो कायद्याने प्रथमच निवडणूकीचे तत्व मान्य केले. राष्ट्रीय सभेच्या कार्याला काही प्रमाणात यश मिळाले. लोक जागृतीचे व्यासपीठ निर्माण झाले. २० व्या शतकाच्या प्रारंभापासून ब्रिटीशांची फोडा आणि राज्य करा ही निती असून एका बाजूला राजकीय सुधारणा करण्याचे धोरण दिसुन आले. स्वराज्य आणि स्वदेशीने भारावून राष्ट्रीय चळवळ प्रभावीपणे स्वराज्याची मागणी करीत होती. अशा काळात १९१७ मध्ये जबाबदार राज्यपध्दती देण्याची घोषणा ब्रिटीश राज्यकर्त्यांनी केली. भारताच्या घटनात्मक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अशी ही घटना होती.

## १२.३ घटनात्मक विकासाची सुरुवात

१) पहिल्या महयुध्दात हिंदुस्थान ब्रिटनची वसाहत असल्याने इंग्लंडच्या बाजूने भारत सहभागी झाला होता. भारतीय सैनिक आणि भारताची साधनसंपत्ती वापरली गेली होती. ब्रिटनला पहिल्या महायुध्दात मदत केल्यामूळे त्याचा मोबदला म्हणून हिंदुस्थानला स्वयं शासन मिळेल या अपेक्षेने नेमस्त नेत्यांनी व काँग्रेसने पाठिंबा दिला मात्र इंग्लंड ने जुजबी सुधारणा देऊन भारतीयांची फसवणुक करण्याचे धोरण स्विकारले होते.

इंग्लंडने पहिल्या महायुध्दात बेल्जीयम सारख्या लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्यासाठी युध्दात उडी घेतली होती. युरोपात बेल्जीयमचे स्वातंत्र्य अबाधित ठेवायचे आणि आशियात भारता बाबत साम्राज्यवादी भूमिका बाळगायची याबाबत भारतातील नेत्यांनी इंग्लंडला विचारणा केली. त्यातच अमेरिकेने जागतिक लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि हुकूम शाहीला रोखण्यासाठी प्रे. विल्सनचे १४ तत्वे आमलात आणले होते. म्हणून स्वयंशासन मिळेल असे काँग्रेस नेत्यांना वाटत होते. मात्र तसे झाले नाही.

२) डॉ. ॲनी बेझंट व लो. टिळक यांनी होमरुल चळवळ सुरू केली होती. नेमस्त काँग्रेसकडून स्वयंशासन मिळण्यासाठी प्रयत्न होत नाहीत यासाठी परिणामकारक व कृतिशिल कार्यक्रम होमरुल (स्वयंशासन) जाहिर करण्यात आला. डॉ. ॲनी बेझंटने दि कॉमनविल (The Commonweal) हे साप्ताहिक २ जानेवारी १९१४ रोजी सुरु करुन धार्मिक स्वातंत्र्य, राष्ट्रीय शिक्षण, सामाजिक व राजकीय सुधारणा केल्यास ब्रिटीश राष्ट्रकूलांतर्गत स्वयंशासन प्राप्त करण्याचा होमरुल लीगचा कार्यक्रम जाहिर केला. होमरुल कार्यक्रमामुळे आणि चळवळीमूळे राष्ट्रीय चळवळ प्रभावीपणे सुरु होती.

३) इ.स. १९१६ च्या लखनौ अधिवेशनात मवाळ, जहाल आणि मुस्लिम लीग यांची युती घडून आली होती. लो. टिळक आणि जहाल मतवाद्यांकडे नेतृत्व आले. मवाळ नेत्यांचा प्रभाव ओसरला होता. याच काळात इ.स. १९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती झाली. याचाही परिणाम भारतीय राष्ट्रीय चळवळीवर झाला.

४) जरी ब्रिटीशांचे राजकीय सुधारणा देण्याचे व चर्चेचे युग निर्माण करण्याचे धोरण मात्र अन्यायी कायदे करुन भारतीयांच्या स्वातंत्र्याचा संकोच करण्याचे धोरण सुरुच होते. यामुळे.

भारतीय जनतेत असंतोष निर्माण होत होता. कायदे मंडळात भारतीय प्रतिनिधी प्रभावीपणे कार्य करत होते. क्रांतिकारकांच्या कार्यामूळे दबाव वाढला होता. एकदरीत २० व्या शतकाच्या प्रारंभापासून राष्ट्रीय चळवळ प्रभावीपणे सुरू झाली होती. त्यामूळे राजकीय सुधारणांचा हप्ता भारतीयांना द्यावा लागेल. या धारणेतून मॉंटेग्यू घोषणा केली गेली होती.

## १२.४ मॉंटेग्यू घोषणा (२० ऑगस्ट, १९१७)

पहिल्या महायुध्दामध्ये मेसोपोटेमियातील मोहीम भारत सरकारकडे होती. या मोहिमेत फार मोठे नुकसान झाले होते. याची कारणे शोधण्यासाठी एका आयोगाची नेमणूक करण्यात आली. आयोगाने मोहिमेतील नुकसानाबाबत भारत सरकारला दोष दिला नाही तर दोष दिला तो भारतातील कालबाह्य आणि सदोष शासन यंत्रणेला. या अहवालावर हाऊस ऑफ कॉमन्समध्ये चर्चा झाली. तेव्हा याबाबत तत्कालीन भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीही याच पध्दतीचे मत व्यक्त केले. सुधारणा करण्याची सूचना केली. भारत सरकारचे अधिकार वाढवुन राज्यकारभारात भारतीयांचा समावेश करण्याची मागणी मॉंटेग्यूनी केली. त्यावेळी उद्देश होता भारतीयांचा विश्वास संपादन करण्याचा ब्रिटीश शासन लोकाभिमूख केले नाही तर आपण भारतावर राज्य करण्याचा हक्क गमावून बसू असा इशारा मॉंटेग्यूने केला होता. या दृष्टीने मेसोपोटोमियन कमिशनचा अहवाल महत्वाचा आहे.

१२ जुलै १९१७ रोजी एडविन मॉंटेग्यू याने इंग्लंडच्या कॉमन्स सभागृहात भारतीय लोकांना राज्यकारभारात अधिक स्थान देण्याबाबतची घोषणा केली, थोड्याच दिवसात मॉंटेग्यूची भारतमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर २० ऑगस्ट १९१७ रोजी कॉमन्स सभेत, भारतीय लोकांना प्रशासनाच्या सर्व विभांगात सहभाग व जबाबदार राज्यपध्दती देण्याबाबतची घोषणा केली. यालाच मॉंटेग्यू घोषणा असे म्हटले जाते. तसेच ही घोषणा ऑगस्ट महिन्यात केली गेली. त्यामुळे तिला ऑगस्ट घोषणा असे म्हणतात. त्यात खाली मुद्दांचा समावेश होतो.

घोषणा :-

१) प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात भारतीयांना जास्तीत जास्त सहभागी करुन घेणे.
२) भारतात वाढती जबाबदार राज्यपध्दती अस्तित्वात आणून त्याद्वारे स्वराज्याचे ध्येय साध्य करणे.
३) या धोरणाचा विकास क्रमाक्रमानेच साध्य करणे.
४) भारतीयांच्या कल्याणाची व प्रगतीची जबाबदारी ब्रिटीश सरकारव भारत सरकार ने स्विकारणे

**भारतातील प्रतिक्रिया :-**

मॉंटेग्यू घोषणेबाबत भारतात संदिग्ध प्रतिक्रिया उमटली, राष्ट्रीय सभेतील मवाळ नेत्यांनी ही घोषणा म्हणजे भारताचा मॅग्ना चार्टा या शब्दात घोषणेचे स्वागत केले. मॉंटेग्यू घोषणेमुळे जहालांचे समाधान झाले नाही. लो. टिळकांनी 'दिल्ली बहोत दूर है," अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. डॉ. ॲनी बेझंट यांनी मॉंटेग्यू घोषणेवर उपहासात्मक टीका करताना केसरीच्या एका अग्रलेखात 'उजाडले पण सूर्य कोठे आहे ?' अशी टीका केली होती. मुस्लिम लीगची प्रतिक्रिया ही गोंधळाची होती. तुर्कस्थानाच्या पराभवाने गोंधळलेल्या मुस्लिम लीगला हा हिंदू राष्ट्रवादाचा विजय व आपला पराभव वाटू लागला होता.

माँटेग्यू घोषणेवर चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय सभेचे विशेष अधिवेशन ऑगस्ट १९१८ मध्ये बोलाविण्यात आले. त्यात घोषणा निराशाजनक व असमाधानकारक आहे असे जाहीर करुन, त्यात काही सुधारणा सुचवण्यात आल्या. त्यानंतर सुरेंद्रनाथ बॅनर्जींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या एका गटाने घोषणेला पाठिंबा दर्शविला. हा गट नेमस्तवादी समजला जात होता. हा गट अधिवेशनातून बाहेर पडला. त्यांनी सरकारला सहकार्य करण्याचे धोरण जाहीर केले. सुरत काँग्रेस (१९०७) नंतरची ही दुसरी फूट असे म्हटले जाते. या नवनेमस्त गटाने 'नॅशनल लिबरल लीग' नावाचा पक्ष काढला. मात्र कालांतराने भारताच्या राजकीय घडामोडीत या पक्षाचे अस्तित्व नगण्य राहिले. पक्षही नामशेष झाला आणि मवाळांची कायमची निवृत्ती झाली.

**माँटेग्यू घोषणेचे महत्त्व :-**

या घोषणेने भारतीय राजकारणात एक नवे युग निर्माण केले. माँटेग्यू घोषणेचे घटनात्मक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. या घोषणेतून ब्रिटीश सरकारने प्रथमच भारताबाबतचे आपले धोरण जाहीर केले होते. भारतात जबाबदार राज्यपध्दती निर्माण करणे म्हणजे लोक प्रतिनिधीच्या तर्फे चालवला जाणारा राज्य कारभार निर्माण करणे. हे ध्येय जाहीर होते जे ध्येय यापूर्वी त्यांनी स्पष्ट शब्दांत नाकारले होते. पूर्वी भारतमंत्री मोर्लेनी भारताबाबत स्वराज्याची शक्यता नाकारली होती. पण या घोषणेमुळे भारतीयांची स्वराज्याची मागणी ब्रिटीश सरकारने तत्वतः मान्य केली. एका अर्थाने हा राष्ट्रीय सभेचा मोठा विजय होता. एका अर्थी हा हिंदू - मुसलमान यांच्या ऐक्याचाही विजय होता. पुढच्या काळात मात्र या घोषणेचा पोकळपणा फोलपणा लक्षात आला. ब्रिटीश नियंत्रण कायम होते. ब्रिटीशांची दडपशाही थांबलेली नव्हती. या घोषणेनुसार माँटेग्यू यांनी नोव्हेंबर १९१७ मध्ये भारताला भेट देऊन सर्व थरातील नेत्यांशी चर्चा केली. या भेटीवर आधारित घटनात्मक सुधारणा देणारा अहवाल जुलै, १९१८ ला प्रकाशित केला हाच अहवाल पुढे १९१९ च्या माँटेग्यू चेम्स फर्ड सुधारणा कायद्याचा, मुख्य आधार होता. घोषणे नंतर घटनात्मक सुधारणांची तयारी सुरू झाली.

## १२.५ १९१९ चा भारत सरकार कायदा

माँटेग्यू घोषणेनंतर घटनात्मक सुधारणा देण्याची तयारी झाली. ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या राज्यकारभारात भारतीयांचा सहभाग व स्वयंशासन देण्यात येईल. जबाबदार राज्यपध्दती देण्यात येईल असे भारतमंत्री एडविन माँटेग्यू याने जाहीर केले होते. त्यावर आधारित ब्रिटीश संसदेने गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट २३ डिसेंबर १९१९ रोजी मंजूर करण्यात आला. या कायद्याचा मसुदा भारतमंत्री मॉंटेग्यू व व्हाईसरॉय चेम्सफर्ड यांनी तयार केला होता. म्हणून या कायद्यास माँटेग्यू - चेम्सपर्ड सुधारणा कायदा असे म्हटले जाते. माँटेग्यूने घोषणा केल्यानंतर भारताचा दौरा केला. भारतातील अनेक व्यक्ती, संघटनांशी चर्चा केली. त्यानंतर अहवाल तयार केला. त्यालाच Report on Indian Constitutional Reforms असे म्हणतात. या अहवाला मध्ये भावी घटनात्मक सुधारणांसाठी चार तत्वे संगितली होती. ती पुढील प्रमाणे आहेत.

१) स्थानिक स्वराज्य संस्थांवर जास्त लोकनियंत्रण असावे.

२) जबाबदार राज्यपध्दतीची सुरूवात प्रांतिक कारभारापासून करण्यासाठी प्रांतात द्विदल शासन पध्दती लागू करावी

३) भारत सरकारवर लोकप्रतिनिधींचा प्रभाव असावा. त्यासाठी जास्तीत जास्त वाव देण्यात यावा. भारत सरकार पार्लमेंटला जबाबदार असावे. त्यासाठी भारतातील कारभारावर भारत सरकारचेच नियंत्रण असावे. भारतातील कायदे मंडळाचा विस्तार करण्यात यावा. हे कायदे मंडळ जास्तीत जास्त प्रातिनिधिक बनवण्यात यावे.

४) हे बदल परिणामकारक व्हावेत यासाठी ब्रिटीश पार्लमेंट व भारतमंत्री यांचे भारत सरकार व प्रांतिक शासन यावरील नियंत्रण सैल करण्यात यावे. प्रांताबाबत भारतमंत्र्याचे नियंत्रण अजिबात नसावे.

या अहवालास जहालमतवाद्यांनी विरोध दर्शविला. लो. टिळक, बिपिनचंद्र पाल, न.चि. केळकर इ. नी इंग्लंडमध्ये जाऊन बदल करण्यासाठी प्रयत्न केला. पण अपयश आले. लो.टिळक यांनी अहवालावर भाष्य करताना म्हटले होते, ''ही योजना कोणत्याही प्रकारे स्वीकारण्यास योग्य नाही.''

### इ.स. १९१९ च्या कायद्यातील तरतुदी

इ.स. १९१९ चा सुधारणाविषयक कायदा डिसेंबर १९१९ मध्ये मंजूर झाला. या कायद्यानुसार भारताच्या राज्यकारभाराबाबत कोणते बदल झाले. नवी राज्यव्यवस्था कशी निर्माण केली होती. त्याचा विचार खालील प्रमाणे आहे.

१) इंग्लंडमधील भारताच्या राजकीय व्यवस्थेबाबत झालेले बदल निर्माण करण्यात आलेली व्यवस्था यालाच विलायत सरकार असे म्हणतात.

२) भारतातील मध्यवर्ती (केंद्रिय) राज्य व्यवस्था यालाच भारत सरकार असे म्हणत.

३) प्रांतिय व्यवस्था.

**विलायत सरकार :-**

**१) भारतमंत्री/भारत सचिव :-** इ.स. १८५८ च्या कायद्यानुसार हे पद निर्माण करण्यात आले होते. कंपनीच्या काळातील संचालक मंडळ व नियामक मंडळाचे अधिकार भारत मंत्र्याला देण्यात आले होते. भारताच्या कारभारावरील विशेष म्हणजे प्रांतिक कारभारावरचे भारतमंत्र्याचे नियंत्रण कमी करण्यात आले. भारतमंत्री हा मंत्रिमंडळाचा सदस्य होता आणि तो भारतीय प्रशासनाबाबत संसदेत जबाबदार असे. त्याचे वेतन व भत्ते भारतीय तिजोरीतून दिले जात असे. यात १९१९ च्या कायद्यानुसार बदल करण्यात आला. भारत मंत्र्याचा पगार ब्रिटिश कोषातून देण्याची तरतूद करण्यात आली. भारत मंत्र्यावर ब्रिटीश पार्लमेंटचे नियंत्रण प्रभावी करण्यात आले. भारताचा गव्हर्नर जनरल व प्रांतातील गव्हर्नर राज्यकारभाराशी संबंधीत सर्व माहिती भारतमंत्र्याला देण्याचे भारतमंत्र्याच्या आदेशाचे पालन करण्याचे बंधन घालण्यात आले. १९१९ च्या कायद्यापूर्वी मध्यवर्ती व प्रांतिक कायदे मंडळात मांडल्या जाणाऱ्या विधेयकास भारत मंत्र्याची पूर्व परवानगी आवश्यक होती. आता काही अपवाद वगळता हे बंधन दूर झाले. प्रांताना या बाबत विशेष स्वातंत्र्य मिळाले. मात्र ते स्वातंत्र्य परराष्ट्र लष्कर, चलन सार्वजनिक कर्ज इ. बाबतीत नव्हते. आर्थिक बाबींवरील नियंत्रण पूर्वी प्रमाणेच होते. भारताचा अर्थ संकल्प भारतमंत्र्याच्या आदेशानुसार तयार करण्यात येत असे. १९१९ च्या कायद्यानुसार भारतमंत्र्याचे अधिकार त्यात ब्रिटीश साम्राज्याचे हिताचे रक्षण करणे, गव्हर्नर जनरल आणि

कार्यकारिणी परिषद आणि प्रांतियकारभारावर देखरेख ठेवणे. मोठ्या पगाराची व महत्त्वाची पदे निर्माण करणे किंवा रद्द करणे हे आंतर्भूत केले गेले. भारतमंत्री आणि ब्रिटीश पार्लमेंटचे संपूर्ण नियंत्रण भारतातील राज्य कारभारावर निर्माण केले होते.

**२) भारत मंडळ :-** भारत मंत्र्याला भारतीय राज्यकारभाराबाबत सल्ला देण्यासाठी १८५८ च्या कायद्यानुसार भारत मंडळाची निर्मिती करण्यात आली होती. भारत मंडळावर भारतमंत्र्याचे वर्चस्व होते. ते कायम राहिले. या मंडळाने भारताच्या राज्यकारभाराबाबत केलेल्या नियमांना पार्लमेंटची संमती आवश्यक होती. १९१९ पूर्वी भारत मंडळातील सदस्य संख्या १५ होती. त्यांचा कार्यकाळ ७ वर्षांचा होता. १९१९ च्या कायद्यानुसार ही संख्या ८ ते १२ च्या दरम्यान ठेवण्यात आली. त्यांचा कार्यकाळ ५ वर्षांचा करण्यात आला. त्यांचे वेतन व इतर खर्च ब्रिटनच्या कोषातून देण्याची तरतुद केली गेली.

**३) हायकमिशनर :-** हे नवीन पद तयार करण्यात आले. भारत मंत्र्यांची काही कामे त्याच्याकडे सोपविण्यात आली. उदा. भारतासाठी खरेदी करणे, भारतीय विद्यार्थी खाते इ. हाय कमिशन ची नियूक्ती गव्हर्नर जनरल कडून करण्यात येत असे. गव्हर्नर जनरलचे काही अधिकार त्याला देण्यात आले. भारतातील केंद्र व प्रांतिय सरकारचा प्रतिनिधी म्हणून तो इंग्लंड मध्ये कार्य करत असे. व्यापारा सबंधी करार करणे. हे महत्त्वाचे काम त्याच्याकडे होते. त्याचा पगार मात्र भारतीय तिजोरीतून दिला जात असे.

भारतासाठी इंग्लंडमध्ये निर्माण करण्यात आलेली व्यवस्था

इंग्लंडचा राजा राणी (गृहशासन)

ब्रिटीश पार्लमेंट, मंत्रिमंडळ

भारत मंत्री आणि भारत मंडळ

हायकमिशनर

**२) भारतातील मध्यवर्ती राज्यव्यवस्था (केंद्रीय) :-**

केंद्र सरकार मध्ये १) केंद्रिय कार्यकारीमंडळ २) गव्हर्नर जनरल (व्हाईसरॉय), ३) द्विगृही कायदे मंडळ

**१) केंद्रीय कार्यकारी मंडळ :-** भारताचा राज्य कारभार गव्हर्नर जनरल आणि कार्यकारिणी परिषद यांचेकडे सोपविण्यात आला होता. गव्हर्नर जनरलच्या सल्यानुसार भारतमंत्र्याकडून कार्यकारिणी सदस्यांची नियूक्ती केली जात होती. १९१९ च्या कायद्यानुसार सभासद संख्या ८ करण्यात आली. त्यात गव्हर्नर जनरल व सरसेनापती असे दोन सदस्य व इतर ६ सभासद असत. ६ पैकी ३ सभासद भारतीय असावेत. त्यांचा कार्य काळ ५ वर्षांचा असावा. कार्यकारिणीमंडळाचे अध्यक्ष गव्हर्नर जनरल असावेत असे नमुद केले. तीन भारतीय सदस्यांकडे जे सरकार नियुक्त होते त्यांना शिक्षण, आरोग्य, कामगार यासारखी दुय्यम दर्जाची खाती सोपविण्यात आली होते. महत्त्वाची खाती ब्रिटीश सदस्यांकडे होती. प्रश्न विचारणे, चर्चा करणे, प्रतिकूल टीका करणे, मत नोंदवणे इ. अधिकार कार्यकारी मंडळास होते.

२) **गव्हर्नर जनरल :-** गव्हर्नर जनरलला व्यापक व अंतिम अधिकार होते. कायदेविषयक कार्यकारी सत्तेबाबतची सर्व सूत्रे त्याच्या हाती होती. ब्रिटीश पंतप्रधानाच्या सल्यानुसार राजा गव्हर्नर जनरलची साधारण ५ वर्ष कार्यकाळासाठी नियुक्ती करत असे. २ लाख ५६ हजार रुपये वार्षिक वेतन आणि १, ७२, ७०० रु. इतर भत्ते त्यास मिळत असे. शासनविषयक, विधिविषयक व अर्थविषयक महत्त्वाचे अधिकार गव्हर्नर जनरलकडे होते. गव्हर्नर जनरल हा ब्रिटीश सम्राटाचा प्रतिनिधी असला तरी तो ब्रिटीश सम्राटाप्रमाणे भारतावर राज्य करीत असे दंडशक्ती, राजनीती व रणनीती अर्थनीतीवर त्याचा प्रभाव व अंमल होता. विधिमंडळाला चर्चा करण्याचा अधिकार होता. मात्र अंतीम निर्णय गव्हर्नर जनरलकडे होता. गव्हर्नर जनरलच्या संमतीशिवाय अर्थसंकल्प मांडता येत नसे.

३) **द्विगृही कायदेमंडळ :-** मॉन्टेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यानुसार मध्यवर्ती द्विगृही कायदेमंडळाची स्थापना केली. राज्यसभा (Council of State) हे वरिष्ठ गृह आणि विधीमंडळ (Legislative Assembly) हे कनिष्ठ गृह या दोन्ही सभागृहांची मिळून कमाल सदस्य संख्या दोनशे असावी असे ठरले.

**राज्यसभा (वरिष्ठगृह) रचना (कमाल सदस्य संख्या ६०)**

- सरकार नियुक्त (२६)
  - सरकारी (२०)
  - बिनसरकारी (६)
- लोक नियुक्त (३४)
  - सर्व सामान्य (१९) मतदार संघातून
  - जातीय व खास मतदारसंघातून (१५) (मुसलमान (११) शीख (१) युरोपीय व्यापारी (३))

स्वतंत्र्य गृह स्थापन करण्याचा उद्देश

१) कनिष्ठ सभागृहाचे नामंजूर केलेली विधेयके मंजूर करुन घेणे

२) या सभागृहातील प्रतिनिधी निवडून देण्यासाठीचे मतदारासाठी संपत्तीची अट होती. ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु १०, ००० पेक्षा जास्त आहे. जो दरवर्षी ७५० रु पेक्षा जास्त शेतसारा भरत असे. ज्यांची शैक्षणिक किंवा सामाजिक कामगिरी उल्लेखणीय आहे. अशा पात्र व्यक्तींनाच मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे फक्त श्रीमंत, जमीनदार व व्यापारी यांनाच सदस्य होण्याची संधी मिळत असे या गृहाची मुदत ५ वर्षाची होती. प्रसंगी मुदत वाढविण्याचे किंवा मुदतपूर्वी राज्यसभा बरखास्त करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल यांना होते. या सभागृहाच्या अध्यक्षाची निवड गव्हर्नर जनरल करीत असे. कामकाज बहुमताने चालत असे. एखाद्या निर्णयासंदर्भात मते समसमान झाल्यास अध्यक्षाला राखीव मत असे.

विधिमंडळ (Legislative Assembly)
सदस्य संख्या (१४०)
पहिले विधिमंडळ सदस्य संख्या (१४३)

सरकार नियुक्त (४०)

लोकनियुक्त (१००)
पहिले विधीमंडळ (१०३)

| **सरकारी (२६)** | **बिनसरकारी (१४)** | **सर्वसामान्य मतदारसंघ (५१)** | **वर्गीय व खास मतदार संघ (५२)** |
|---|---|---|---|
| (गव्हर्नर जनरल कार्यकारी मंडळाचे (३०) सदस्य, राज्यसभेचे सरकारी सदस्य) | (दलित अँग्लो इंडियन भारतीय ख्रिश्चन भारतीय व्यापारी संघटना कामगार इ.) | | यात (मुसलमान शीख (०२) युरोपियन (९) जमीनदार (७) भारतीय व्यापारी (४)) |

केंद्रीय विधीमंडळाचे कनिष्ठ सभागृह.

या सभागृहाची सदस्य संख्या वाढविणे, जागेचे वाटप करणे, जागा भरण्याची पध्दत निश्चित करणे हे सर्व अधिकार गव्हर्नर जनरल आणि भारत मंत्र्याला होते. सरकार नियुक्त जागा सोडून उरलेल्या जागा प्रांतामधून लोकांनी निवडून द्यावयाच्या होत्या. त्यांचा कार्यकाळ ३ वर्षाचा निश्चित करण्यात आला होता. विधानसभा सदस्यांची निवड करण्यासाठीचे निकष मतदारांसाठीचे असे होते की ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. २००० पेक्षा जास्त आहे. जो प्रतिवर्षी ५० रु. पेक्षा जास्त शेतसारा भरतो, जो १५० रु. पेक्षा जास्त म्युनिसिपल टॅक्स भरतो. ज्याला घरभाड्याची मिळकत १८० रु. पेक्षा जास्त आहे.

कायदे मंडळातील सदस्य सभागृहात प्रश्न, उपप्रश्न विचारु शकत होते.स्थगन प्रस्ताव मांडू शकत होते. अंदाजपत्रकातील २५ बाबींवर मतदान करू शकत नव्हते. गव्हर्नर जनरलचे आर्थिक व्यवहारावर पूर्ण नियंत्रन होते. १/२ लोकसंख्येला फक्त मतदानाचा अधिकार होता.

ब्रिटीश साम्राज्याला विघातक विधेयकावर गव्हर्नर जनरल बंदी घालू शकत असे. एवढेच नाहीतर कायदेमंडळाची मान्यता नसलेले सरकारी विधेयक गव्हर्नर जनरल आपल्या अधिकारात संमत करु शकत असे.

इतर तरतुदी :-

१) १९१९ च्या भारत सरकार कायद्याने भारतात लोकसेवा आयोगाची स्थापना केली. या सेवांबाबत नियम करण्याचा अधिकार भारतमंत्र्याला दिला होता.

२) या कायद्याचे मुल्यमापन (आढावा) करण्यासाठी दहा वर्षांनी एक कमिशन नियुक्त करावे अशी तरतूद करण्यात आली.

३) १९१९ च्या कायद्यात प्रत्यक्ष निवडणूकीचे तत्व स्विकारले गेले.

**भारतातील प्रांतिक राज्यव्यवस्था :-** इ.स. १९१९ च्या कायद्याने प्रांतामध्ये काही प्रमाणात जबाबदार शासनपध्दती आणण्याचा प्रयत्न केला.

१)____**प्रांतिक कार्यकारी मंडळ :-** या कायद्यानुसार प्रांतिक कार्यकारी मंडळामध्ये भारतीयांचा समावेश करण्यात आला. गव्हर्नरांच्या अधिकाराखालील प्रांतांमध्ये द्विदल राज्यपध्दती लागू करण्यात आली.

२) **द्विदल राज्यपध्दती :-** या कायद्यानुसार प्रांताच्या अखत्यारीतील विषय निश्चित करण्यात आले. यात स्थानिक स्वराज्य, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, वैद्यकीय व्यवस्था, पाणीपुरवठा, जलसिंचन, महसूल, दुष्काळ निवारण, शेती, जंगले, शिक्षण सार्वजनिक बांधकाम, सहकारी संस्था, कायदा व सुव्यवस्था यात न्याय, पोलिस व तुरुंग हे खाते होते.

यावेळी ब्रिटीशांच्या नियंत्रणाखाली बंगाल, बिहार, ओरिसा, संयुक्त प्रांत पंजाब, उत्तर पश्चिमी प्रांत, मध्यप्रांत, मुंबई, मद्रास, आसाम, बर्मा इ. १० प्रांत होते.

प्रांतीय राज्यकारभारात (प्रांतीय कार्य पालिका) दोन भाग करण्यात आले. १) गव्हर्नर आणि त्याची कार्यकारिणी. २) गव्हर्नर आणि मंत्रिमंडळ या दोन्ही विभागाचे कार्यक्षेत्र स्वतंत्र ठेवण्यात आले. हे दोन्ही विभाग दोन प्रकारच्या संस्थांना जबाबदार ठेवण्यात आल्यामुळे या पध्दतीला द्विदल्या शासन पध्दती (Dyarchy) असे म्हणतात. प्रांतीय सूचीतील विषयाची विभागणी राखीव व सोपीव खाती असे करण्यात आली.

**राखीव खाती :-** अर्थ, महसूल, जलसिंचन, दुष्काळ निवारण, कायदा व सुव्यवस्था, उद्योग, कर्ज, वृत्तपत्र नियंत्रण इ. या खात्यांचा कारभार गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळामार्फत चालविला जाणार होता. त्यांच्यावर सरकारचे नियंत्रण असणार होते. कार्यकारिणीचे सदस्य विधिमंडळाच्या नियंत्रणापासून मुक्त असून ते कार्याबाबत गव्हर्नरला जबाबदार होते. त्यांची नेमणुक गव्हर्नर करीत असे.

**सोपीव खाते :-** स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, वैद्यकीय व्यवस्था, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, शेती, मच्छिमारी मद्य व इतर अंमली पदार्थावरील कर कागदपत्रांच्या नोंदी, धार्मिक दानधर्म व देणग्या, उद्योग विकास, भेसळ, वजने मापे आणि याचा समावेश होता. वाचनालये. दुय्यम खाती या खात्यांचा कारभार गव्हर्नर व मंत्री यांच्याकडे होता. तुलनात्मक दृष्ट्या दुय्यम महत्त्वाच्या अशा या खात्यांचा कारभार लोकप्रतिनिधींकडे सोपवण्यात आला. सोपीव खात्यांच्या मंत्र्याची नेमणूक गव्हर्नर कायदेमंडळाच्या सदस्यांमधून करत असे आणि हे मंत्री कायदेमंडळाला जबाबदार असणार होते.

**प्रांतिय गव्हर्नर :-** प्रांतामध्ये ब्रिटीश सरकारचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर कार्य करत असे. गव्हर्नरची नेमणूक गव्हर्नर जनरल आणि भारतमंत्री यांच्या सल्यानुसार ब्रिटीश सम्राटांकडून

५ वर्षांसाठी करण्यात येत असे. गव्हर्नर प्रांताचा प्रमुख असे. गव्हर्नर हा आपल्या कार्याबाबत ग.ज. व भारतमंत्री यांना जबाबदार होता. प्रांतीय कारभारात गव्हर्नरला विशेष अधिकार होते.

**गव्हर्नरचे अधिकार :-** मंत्र्यांची व सभासदांची नियुक्ती बडतर्फी करण्याचा अधिकार होता. प्रांतीय विधीमंडळाचे अधिवेशन बोलावणे, स्थगित करणे, विसर्जित करणे आणि विधिमंडळाचे विधेयक मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार होता. अर्थ संकल्पातील ८०% भाग स्वतः मंजूर करणे. २०% भागावर विधिमंडळाचा अधिकार असूनही अंतिम निर्णय गव्हर्नरचा होता.

**द्विदल राज्यपध्दती अपयशाची कारणमिमांसा :-** १ एप्रिल १९२१ पासून द्विदल राज्यपध्दतीला सुरूवात झाली. १९२१ ते १९३७ पर्यंत जवळजवळ १६ वर्ष ह्या राज्यकारभाराचा प्रयोग केला गेला. प्रत्यक्ष व्यवहारात खात्यांची विभागणी ही गैरसोयीची होती. उदा. विकासमंत्र्याकडे जंगल खाते नव्हते, कृषीमंत्र्याकडे पाटबंधारे व दुष्काळ निवारण या बाबी नव्हत्या. संयुक्त जबाबदारीच्या तत्वांचा अभाव होता. व्ही. डी. रेड्डी म्हणतात, ''मी शेतीमंत्री असूनही शेती विकासासाठी लागणाऱ्या पाटबंधा-याबाबत मला काही करता येत नाही.''

**अपयशाची काही कारणे सैद्धांतिकदृष्ट्या खालील प्रमाणे:-**

१) राज्यशास्त्रीय विचार करता सैध्दातिक दृष्ट्या ही पध्दती सदोष होती.
२) लोकप्रतिनिधी मंत्र्यांची केविलवाणी परिस्थिती होती.
३) राज्यकारभारात सुसूत्रता नव्हती.
४) अधिकारी वर्ग बेजबाबदार व शिरजोरीचे वर्तन करत होता.
५) आर्थिक अडचणी जास्तीत जास्त होत्या.
६) जनतेचे सहकार्य मिळत नव्हते.
७) राजकीय परिस्थिती अनुकूल नव्हते.
८) सांप्रदायिक तत्वावर प्रतिनिधीत्व अवलंबुन होते.

थोडक्यात मंत्र्यांना धोरण ठरविण्याचे स्वातंत्र्य होते. पण अमंलबजावणी करण्याचे नव्हते प्रो. कुप लँड यांच्या मते, ''ही द्विदल शासन प्रणाली तिच्या निर्मात्याचा हेतू पूर्ण करण्यास असमर्थ ठरली.'' सर एच. बटलर च्या मते, ''द्विदल शासन पध्दत म्हणजे भारताला शिवी देण्याचा एक प्रकार झाला होता.''

**१९१९ च्या भारत सरकार सुधारणा कायद्याचे मूल्यमापन :-** माँटेग्यू घोषणेनुसार माँटेग्यू चेम्पसफोर्ड सुधारणा कायदा लागू करण्यात आला. हा सुधारणा कायदा घटनात्मक व राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. स्वराज्याच्या दिशेने ही एक वाटचाल होती. १९१९ च्या कायद्यापूर्वी धनिक आणि प्रतिष्ठित भारतीयांना कायदेमंडळात प्रवेश होता. कार्यकारी मंडळात नेमणूकीने काही अंशी त्यांचा समावेश होत असे. या कायद्यानुसार लोकनियुक्त प्रतिनिधींचा प्रांतिक कार्यकारी मंडळात प्रवेश झाला. निवडणूकीचे तत्व, जबाबदार शासन पध्दतीचे तत्व त्यामुळे काही अंशी निर्माण करण्यात आले. या कायद्यानुसार भारतीयांचा समावेश संसदीय शासनपध्दतीत झाल्यामुळे त्यांना संसदीय लोकशाहीचे प्रशिक्षण मिळू लागले. कायदेमंडळाचा विस्तार व अधिकार वाढले.

अर्थसंकल्प, खर्च याची चर्चा होवू लागली. मताधिकार वाढले. त्यामुळे एकाधिकारशाहीला काही अंशी आळा बसला आणि चर्चेचे युग सुरू झाले.

द्विदल राज्यपध्दती अपयशी ठरली. कारण राज्य शासनाच्या तत्वात न बसणारी ती पध्दत होती. सरकार हा घटक अविभाज्य आहे. सामूहिकता, एकसूत्रीपणा हे सरकारचे विशेषण असते. जबाबदारीची विभागणी आणि खात्यांची विभागणी यामूळे शासनात अडचणी निर्माण होतात. ब्रिटीशांची 'फोडा आणि राज्य करा' ही निती भारतीयांनी अनुभवली. द्विदल शासनपध्दतीची केलेली रचना त्यातून कर नीती भारतीयांना समजली. लोकशाहीचा मुखवटा तर अंतरंगमात्र एकाधिकार शाहीचे होते. अर्थ खात्यावरील गव्हर्नरचे नियंत्रण ही गोष्ट म्हणजे अर्था शिवाय जीवनाला अर्थ नाही. ही बाब निरर्थक वाटत होती. नोकर वर्गाला मंत्र्यांपेक्षा जास्त महत्त्व व अधिकार प्राप्त झाले होते.

केंद्रीय कायदेमंडळ द्विगृही झाले. स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्यात आले. मात्र मताधिकार १/२% लोकानाच मिळाला. गव्हर्नर जनरल हा पूर्वीसारखाच अनियंत्रित सत्ताधीश राहीला. कार्यकारी मंडळाचा विस्तार झाला. मात्र सत्तेची सूत्रे केंद्रात गव्हर्नर जनरलकडे तर प्रांतात गव्हर्नरकडे कशी राहतील याची पध्दतशीर काळजी घेण्यात आली होती

ब्रिटीश राजनिती व रणनीती अत्यंत धूर्त व चलाखीची होती. याचा प्रत्यय आला. एका बाजूला राजकीय सुधारणा आणि चर्चेचे युग निर्माण करण्याचा आभास तर त्याचवेळेला रौलट कायदा, जालियनवाला बाग हत्याकांडातील क्रुरता, क्रांतीकारकांच्या बाबतीतील दडपशाही, साम्राज्यवादी वृत्ती आणि वंश श्रेष्ठत्त्व हे ही दिसुन आले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १९१९ च्या भारत सरकार कायद्याचा थोडक्यात आढावा घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १२.६ नेहरू अहवाल व गोलमेज परिषदा

इ.स. १९२९ ते १९३५ या काळात घटनात्मक विकासाच्या दृष्टीने ज्या घडामोडी झाल्या त्यात नेहरू अहवाल व गोलमेज परिषदा या दोन घटना महत्त्वपूर्ण आहेत. १९१९ चा सुधारणा कायदा भारतीयांचे समाधान करू शकला नाही. ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी धोरणांविरुध्द म. गांधींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ सुरू करण्यात आली. काँग्रेसमधील दुसरा गट स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून कायदेमंडळ प्रवेश करून सरकारकडे भारतीय जनतेची गाऱ्हाणी मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न करीत होता. प्रांतात गव्हर्नरला व

केंद्रात गव्हर्नर जनरला विशेष अधिकार असल्यामूळे स्वराज्य पक्ष निष्प्रभ ठरला. मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायद्याचे दर दहा वर्षांनी परीक्षण करण्यात येणार होते. मात्र सुधारणा कायद्याचे लवकर परीक्षण करावे अशी भारतीय नेत्यांची मागणी होती. त्यामुळे १९२७ मध्ये सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्यात आला होता. कारण भारतीय राष्ट्रीय सभेला विश्वासात घेतले नव्हते व त्यात एकही भारतीय प्रतिनिधी नव्हता. सायमन परत जा अशा घोषणा सर्वत्र जनतेतील असंतोष वाढत गेल्याने लॉर्ड बर्कनहेड या भारतमंत्र्याने अवाहन केले. भारतीय नेत्यांनी सर्व संमतीने राज्यघटना तयार करावी आणि कॉंग्रेसने ते स्विकारले. कॉंग्रेसच्या कार्यकारी समितीने सर्वपक्षीय परिषद बोलावली. या परिषदेत पं. मोतीलाल नेहरू अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली.या समितीने १० ऑगस्ट १९२८ रोजी आपला अहवाल सादर केला. हाच नेहरू अहवाल म्हणून प्रसिध्दीस आला.

**नेहरू अहवालातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या :-**

१) कॉमनवेल्थ ऑफ इंडिया असे भारताचे स्वरूप असावे थोडक्यात स्वतंत्र वसाहतीचा दर्जा दिला जावा

२) भारत संघराज्यात्मक राज्य असावे.

३) मध्यवर्ती कायदेमंडळ हे द्विगृही असेल सिनेट व हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हाज ही ती दोन गृहे असावित.

४) गव्हर्नर जनरल राष्ट्रप्रमुख राहिल व राजाप्रमाणे त्याला अधिकार राहतील त्याची नेमणूक इंग्लडच्या राजाने करावी.

५) गव्हर्नर जनरलने पंतप्रधान नेमावा आणि इतर मंत्री गव्हर्नर जनरलने पतंप्रधानांच्या सल्ल्याने नेमावेत.

६) भारतीय लोकांना व्यक्तीस्वतंत्र्य, समता, शिक्षण, रोजगार, आरोग्य याची हमी असावी आणि वृध्द, अपंग, माता व मुलांची काळजी घेण्यात यावी.

७) प्रांतिक कायदे मंडळ एकगृही असावे

८) प्रांतासाठी गव्हर्नर हा इंग्लंडच्या राजाकडून नेमला जावा त्याचे वेतन प्रांताच्या तिजोरीतून दिले जावे.

९) भारत धर्मनिरपेक्ष संघराज्य असावे.

१०) जातीय मतदारसंघाची आवश्यकता नाही मात्र ज्या प्रांतात मुसलमानांची संख्या जास्त असेल तिथे राखीव जागा ठेवण्यात याव्यात मात्र स्वतंत्र मतदार संघ असू नयेत.

११) गव्हर्नर जनरलने प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, सरसेनापती यांची संरक्षण समिती नेमावी. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी या समितीवर ठेवावी

१२) गव्हर्नर जनरलला सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशांच्या निवडीचे अधिकार असावेत मात्र त्यांना दूर करण्याचे अधिकार पार्लमेंटला असावेत.

डिसेंबर १९२८ मध्ये कलकत्ता येथे मोतीलाल नेहरू यांच्या अहवालास मान्यता देण्यात आली आणि हा अहवाल ब्रिटीश सरकारने ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत स्विकारावा असा निर्वाणीचा इशारा अधिवेशनात ठराव करून देण्यात आला. या अहवालाचा स्वीकार न केल्यास काँग्रेसने असहकाराचा अहिंसक लढ्याचा मार्ग स्वीकारण्याचे ठरविले.

नेहरू अहवाल काँग्रेसने स्वीकारला. मात्र मुसलमानांची प्रतिक्रिया वेगवेगळी होती. राष्ट्रीय सभेतील मुसलमानांनी नेहरू अहवालास संपूर्ण मान्यता दिली. मुस्लिम लीग मधील बहुसंख्य सदस्यांनी नेहरू अहवाल पूर्णपणे नाकारला. महंमद अली जीनांना मात्र हा अहवाल मान्य अथवा अमान्य नव्हता. हिंदू - मुसलमान एक जुटीची आवश्यकता त्यांना वाटत होती. पण मुसलमानच्या मागण्यावर पाणीही ते सोडायला तयार नव्हते. यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी अनेक मुसलमान नेत्यांशी विविध गटांशी चर्चा करुन काही मुद्दे तयार केले होते. त्यालाच जिनांचे चौदा मुद्दे म्हणले जाते.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. नेहरु अहवालाचा मागोवा घ्या.

## १२.७ गोलमेज परिषदा

इ.स. १९२९ मध्ये इंग्लंडमध्ये निवडणूका होऊन सरकार बदलले मजूर पक्ष सत्तेवर आला. पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड राष्ट्रकुलाच्या मजूर पक्षाच्या परिषदेत बोलताना म्हणाले, काही महिन्यात भारताचा वसाहतीचे स्वातंत्र्य मिळून राष्ट्रकुलात समावेश होईल. १९२९ मध्ये ग.ज. ने इंग्लंडहून आल्याानंतर जाहीर केले की १९१७ च्या घोषणेनुसार भारताला वसाहतीच्या स्वातंत्र्याचा दर्जा देण्यात येईल. राष्ट्रीय सभेला ही तशीच अपेक्षा होती. त्यामुळे काँग्रेसने जाहीरनामा काढला की, संभाव्य गोलमेज परिषदेत स्वराज्याची तारीख व घटना निश्चित करण्यात येईल. मात्र जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांसारख्या तरूण नेत्यांना ही आशा अपेक्षा चुकीची वाटली होती. म्हणुन त्यांनी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीचे राजीनामे दिले. म. गांधी व काँग्रेस नेते गव्हर्नर जनरल च्या भेटीस गेले होते, मात्र कोणतेही ठोस असे आश्वासन त्याना मिळाले नाही. अशा परिस्थितीत १९२९ च्या राष्ट्रीय सभेच्या लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय जाहीर करण्यात आले. १९३० मध्ये म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. या पार्श्वभूमीवर पहिली गोलमेज परिषद भरविण्यात आली.

### १) पहिली गोलमेज परिषद (नोव्हें १९३० ते जाने १९३१) :-

२७ मे १९३० रोजी सायमन कमिशनचा अहवाल प्रसिध्द झाला या अहवालातील शिफारसींवर चर्चा करण्यासाठी नोव्हें १९३० मध्ये लंडन येथे पहिली गोलमेज परिषद भरवण्यात आली. या परिषदेला भारतीय संस्थानांचे १६ प्रतिनिधी संस्थानेतर भारताचे ५७

प्रतिनिधी आणि इंग्लंडमधील पक्षांचे १६ प्रतिनिधी असे ८९ सदस्य परिषदेत उपस्थित होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रसने मात्र या परिषदेवर बहिष्कार टाकला होता. या परिषदेचे अध्यक्ष हे पंतप्रधान मॅकडोनाल्ड हे होते. या परिषदेत सायमन कमिशनवर आधारीत खालील प्रस्ताव मॅकडोनाल्ड यांनी मांडले होते.

१) भारतीय संघराज्य स्थापन करण्यात यावे.
२) केंद्रात द्विदल राज्यपध्दती असावी.
३) प्रांताना संपूर्ण स्वायत्तता देण्यात यावी.
४) अल्पसंख्यांकाचे संरक्षण करण्यासाठी त्यांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व द्यावे.
५) केंद्रात अंशतः जबाबदार शासन पध्दती प्रस्थापित करावी.
६) जातीयता आणि - धर्मवार मतदारसंघ जाहीर होताच यावर वाद निर्माण झाला.

शेवटी अनिर्णित अवस्थेत ही परिषद संपली. काँग्रेसने परिषदेस उपस्थिती राहावे, यासाठी सरकारने काँग्रेसचे मन वळवावे असे परिषदेतील सप्रू - जयकर - शास्त्री या नेत्यांनी, सुचविले होते.

**दुसरी गोलमेज परिषद (१९३१) :-**

७ सप्टेंबर १९३१ रोजी लंडन येथे दुसरी गोलमेज परिषद भरली. कॉग्रेसच्या वतीने म. गांधी हे एकमेव प्रतिनिधी म्हणून परिषदेत सामील झाले होते. काँग्रेसशिवाय मुस्लिम लीगचेही प्रतिनिधी या परिषदेत उपस्थित होते. या परिषदेत रम्से मॅक्डोनाल्ड यांचा प्रभाव जास्त होता. या परिषदेत प्रामुख्याने जबाबदार सरकार देण्याचा निर्णय संमत होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती परंतु मुस्लिम लीगने स्वतंत्र जातीय मतदारसंघाचा मुद्दा उपस्थित केला परंतु या मागणीस म. गांधीनी विरोध दर्शविल्यामुळे चर्चा अधिकच लांबली आणि शेवटी कोणताही निर्णय झाला नाही.

शेवटी रम्से मॅक्डोनाल्ड यांनी एकतर्फी निर्णय जाहीर केले त्यामध्ये वायव्य सरहद्द प्रांत व सिंध हे दोन वेगळे प्रांत आणि जातीय मतदारसंघ हे महत्त्वाचे निर्णय घेतले. हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या मुलभूत मागणीस सरकार प्रतिसाद देत नाहीत म्हणून म. गांधी भारतात २८ डिसेंबर १९३१ रोजी परतले आणि सविनय कायदेभंग चळवळ पून्हा सुरू केली.

**पुणे करार (१९३२) :-**

दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलितांसाठी/अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाचा प्रश्न अनिर्णित राहिल्यामुळे, त्यासंबंधी निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनोल्ड यांच्याकडे देण्यात आले. त्या अनुषंगाने मॅक्डोनोल्ड यांनी १६ ऑगस्ट, १९३२ रोजी ''जातीय निवाडा'' जाहीर केला. त्यामध्ये मुस्लिम, शीख यांना आपले प्रतिनिधी स्वतंत्र मतदार संघातून निवडण्याचा अधिकार देण्यात आला. त्याचप्रमाणे दलितांसाठी/अस्पृश्यांसाठी (शेड्यूल्ड कास्टस्) स्वतंत्र मतदार संघ जाहीर करण्यात आला.

**म. गांधीजींचे आमरण उपोषण :-**

हिंदूंपासून दलितांना अलग करण्याऱ्या जातीय निवाड्याविरूद्ध गांधीजींनी आमरण उपोषण करण्याचा निर्णय जाहीर केला व जातीय निवाडा मागे न घेतल्यास २० सप्टेंबरपासूनच येरवडा तुरूंगात आमरण उपोषणास बसणार असल्याचे त्यांनी पंतप्रधानांला १८ ऑगस्ट रोजी

पत्राने कळविले. म. गांधी यांच्या उपोषणाच्या वृत्ताने सर्वत्र खळबळ उडाली. पं. मदन मोहन मालवीय यांनी दलितांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह सर्व राजकीय पक्ष व अन्य नेत्यांनी एक बैठक तात्काळ पुणे येथे बोलावली. या बैठकीत डॉ. आंबेडकरांचे मन वळविण्यासाठी सर्वच नेत्यांनी प्रयत्न केले. डॉ. आंबेडकर आपल्या भूमिकेवर ठाम होते. राजकीय दबाव वाढत गेला आणि म. गांधीचे प्राणांतिक उपोषण सुरूच असल्यामुळे त्यांची तब्येत खालावत होती. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी २५ सप्टेंबर १९३२ रोजी येरवड्याच्या तुरूंगात गांधीजींची भेट घेऊन चर्चा केली आणि या विषयावर तोडगा काढला. तेव्हा गांधीजींनी आपले उपोषण मागे घेतले. 'पुणे करार' या नावाने त्यास प्रसिद्धी दिली गेली. या करारानुसार ही घटना दलितांसाठी सर्वसाधारण मतदारसंघातून १४८ जागा व केंद्रीय मतदार संघात १८% जागा राखीव असाव्यात असे करारामध्ये नमूद करण्यात आले.

### तिसरी गोलमेज परिषद (१९३२) :-

हिंदुस्थानला घटनात्मक सुधारणा देण्याच्या उद्देशाने तिसरी गोलमेज परिषद दि. १७ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर १९३२ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत एकूण ४६ प्रतिनिधी उपस्थित होते. कॉंग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकला होता. या परिषदेत हिंदुस्थानच्या प्रशासनात सुधारणा घडवून आणण्यासाठी तपशिलावर योजना तयार केली होती. या योजनेच्या आधारावर भारत सरकार कायदा १९३५ च्या नुसार करण्यात आला.(Goverment of India Act 1935).

तीन गोलमेज परिषदा भरविण्यात आल्यात. त्यापैकी दुसऱ्या गोलमेज परिषदेचा अपवाद वगळता दोन गोलमेज परिषदांमध्ये राष्ट्रीय सभेचा सहभाग नव्हता. तीन गोलमेज परिषदांमधील चर्चेवर आधारीत एक श्वेतपत्रिका काढण्यात आली. ब्रिटीश सरकारने जातीय निवाडा जाहीर केला. स्वतंत्र मतदार संघाच्या प्रश्नांवरुन वाद निर्माण झाला. पण पुणे कराराद्वारा तडजोड करण्यात आली. या सर्व घडामोडींवर व चर्चेवर आधारित सन १९३५ चा कायदा समंत करण्यात आला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. गोलमेज परीषदेचे परीक्षण करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १२.८ १९३५ चा कायदा

श्वेतपत्रिकेचा विचार करण्यासाठी व राज्य घटनेची रुपरेषा तयार करण्यासाठी लॉर्ड लिनलिथगोच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या आधारे

१९३४ मध्ये भारतमंत्री सर सॅम्युअल होअर याने ब्रिटीश संसदेसमोर विधेयक मांडले. २४ जुलै १९३४ रोजी पार्लमेंटने त्याला मान्यता दिली. २ ऑगस्ट १९३५ रोजी राजाने मान्यता दिल्यानंतर या कायद्यात ३२१ कलमे १९ परिशिष्टे असलेला हा कायदा ब्रिटीश संसदेने १९३५ चा हिंदुस्थान सरकारचा कायदा -म्हणून अस्तित्वात आणला.

इ.स. १९३५ च्या कायद्याने खालील घटनात्मक बदल घडवुन आणले होते.

१) या कायद्याने भारत मंडळ बरखास्त करण्यात आले. भारत मंत्र्याला सल्ला देण्यासाठी ३ ते ६ सदस्यांचे एक सल्लागार मंडळ नेमण्यात आले. या सल्लागार मंडळाचा पगार इंग्लंडच्या तिजोरीतून देण्यात येणार होता. सल्लागार मंडळाचा सल्ला घेणे अथवा न घेणे हे भारत मंत्र्याच्या मनावर अवलंबून राहणार होते.

२) या कायद्याप्रमाणे भारतीय संस्थाने व संस्थानेतर भारत यांचे एकत्रित संघराज्य स्थापन करण्याची योजना मांडली होती. प्रत्यक्षात मात्र संस्थानिकांनी या संघ राज्यात सामील होण्यास नकार दिला होता. ब्रह्मदेश भारतीय शासनापासून वेगळा काढण्यात आला. सिंध व ओरिसा हे दोन नवे प्रांत तयार करण्यात आले आणि ब्रिटीश भारतातील प्रांताचे संघराज्य तयार करण्यात आले.

३) या कायद्यानुसार राज्यकारभाराच्या खात्यांची सूची तीन गटात विभागली गेली होती.

अ) मध्यवर्ती (केंद्रीय) सरकारची खाती - संरक्षण, परराष्ट्र धोरण, चलन, जकात, रेल्वे, पोस्ट इ.

ब) प्रांतिक सरकारची खाती - जमीन, महसूल, शिक्षण, सुरक्षादल, स्थानिक स्वराज्य इ.

क) संयुक्त अधिकाराची खाती - पाटबंधारे, वीजपुरवठा, मजूर इ.

**केंद्रीय शासनव्यवस्था :- मध्यवर्ती कायदे मंडळ द्विगृही राहणार होते.**

१) राज्यसभा (Council of State) हे वरिष्ठगृह व संघराज्य परिषद (Federal Assembly) हे कनिष्ठ सभागृह. संस्थानांचे प्रतिनिधी व ब्रिटीश भारताचे प्रतिनिधी या दोन्हीचा समावेश दोन्ही गृहांमध्ये होणार होता. दोन्ही सभागृहातील संस्थानांचे प्रतिनीधी हे नेमलेले असणार होते. इतरही काही अल्प संख्याकांचे प्रतिनिधी (उदा. स्त्रिया, कामगार) सरकारने दोन्ही गृहात नेमायचे होते. इतर प्रतिनिधी लोकनियुक्त असणार होते त्यासाठी सर्वसाधारण तसेच वर्गीय व खास मतदारसंघ होते. संघराज्य परिषद या कनिष्ठ सभागृहाचे लोकप्रतिनिधी अप्रत्यक्ष निवडणूकीच्या मार्गाने निवडून दिले जाणार होते. सर्वसाधारण सदस्य हे प्रांताच्या कायदे मंडळातील सदस्यांनी निवडून द्यायचे होते. संपूर्ण देशासाठी व प्रसंगी प्रांतांसाठी कायदे करण्याचा अधिकार मध्यवर्ती कायदेमंडळालाच होता.

केंद्रात (मध्यवर्ती कार्यकारी मंडळ) द्विदल राज्यपध्दती :- १९१९ च्या कायद्यान्वये प्रांतिक सरकारमध्ये असलेली द्विदल राज्यपध्दती रद्द करुन १९३५ च्या कायद्याने द्विदल पध्दती मध्यवर्ती कार्यकारी मंडळाला लागू करण्यात आली. राखीव व सोपीव अशी खाती विभागणी करण्यात आली होती. राखीव खात्यात संरक्षण, परराष्ट्र - व्यवहार, आदिवासी विभाग, अर्थ व धार्मिक बाबी ठेवण्यात आल्या. ३ ते ६ सदस्य असलेल्या कार्यकारी मंडळाकडे या खात्यांचा कारभार राहणार होता. हे कार्यकारी मंडळाचे सदस्य कायदेमंडळाचे पदसिध्द सदस्य होते.

परंतु त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता. तसेच ते कायदेमंडळा ऐवजी गव्हर्नर जनरलला जबाबदार असणार होते. सोपीव खात्यांचा कारभार मंत्रिमंडळाकडे सोपवण्यात येणार होता. या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त दहा सदस्य असावेत असे ठरले होते. गव्हर्नर जनरल हा मंत्रिमंडळाचा अध्यक्ष राहणार होता.

**गव्हर्नर जनरल :-** केंद्रामध्ये ग.ज. चे वर्चस्व राहणार होते. आर्थिक सूत्रेही गव्हर्नर जनरलच्याच  हाती राहणार होती. विधिसत्तेबाबत ही त्यास पूर्वीपासून विशेषाधिकार होते.

**प्रांतिक राज्यव्यवस्था :-** १९३५ च्या कायद्यानुसार प्रांताना स्वायत्तता देण्यात आली. ब्रिटीश सरकारने व मध्यवर्ती सरकारने प्रांताच्या कारभारात हस्तक्षेप करू नये अशी कल्पना होती.

**प्रांतिक कायदेमंडळे :-** या कायद्यानुसार काही प्रांतात आसाम, बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मुंबई व मद्रास येथे द्विगृही कायदेमंडळ स्थापन करण्यात आली. इतर प्रांतामध्ये मात्र कायदेमंडळ एकगृही होती. द्विगृही कायदेमंडळात विधान परिषद (Legistative Council) हे वरिष्ठ सभागृह असणार होते. तर विधानसभा (Legistative Assembly) हे कनिष्ठ सभागृह असणार होते. प्रांतिक कायदेमंडळातील सर्व सदस्य हे प्रत्यक्ष निवडणूकीच्या मार्गाने निवडून आलेले असावेत अशी तरतूद या कायद्यात केली होती. प्रांतातील सर्व मंत्री हे लोकनियुक्त असणार होते. १९३५ च्या कायद्याने प्रांतिक स्वायत्तता निर्माण करण्यात आली तरी प्रांतांबाबत निर्णायक व अंतिम सत्ता गव्हर्नरचीच असणार होती.

**१९३५ च्या कायद्याची वैशिष्ट्ये :-**

१) १९३५ च्या कयद्याने संघराज्य न्यायालयाची तरतूद केली होती मात्र त्याचे १ ऑक्टोबर १९३७ मध्ये संघराज्य न्यायालयाचे कामकाज सुरू झाले. १९५० मध्ये स्वतंत्र भारताची घटना लागू झाल्यानंतर संघराज्य न्यायालयाचे रुपांतर सर्वोच्च न्यायालयात झाले.

२) रेल्वेचा कारभार पाहण्यासाठी सात सदस्यांचे हे मंडळ स्थापन करण्याची तरतूद या कायद्याने केली होती.

३) ग्गव्हर्नर जनरलला मदत करण्यासाठी ॲडव्होकेट जनरल हे पदनिर्माण करण्यात आले.

४) आर्थिक बाबतीत गव्हर्नर जनरल व मध्यवर्ती कायदेमंडळ यांना सल्ला देण्यासाठी अर्थ विषयक सल्लागाराची नेमणूक करण्याची तरतूद केली होती.

५) ग.ज. ला विशेषाधिकार देण्यात आले होते.

६) कायदा दुरुस्तीचा अधिकार ब्रिटीश पार्लमेंटकडे होता.

७) जातीय मतदार संघ आणि स्वतंत्र मतदार संघाचा पुरस्कार करण्यात आला होता

गव्हर्नर व गव्हर्नर जनरलला विशेष अधिकार असल्यामुळे जबाबदार राज्यपध्दती ऐवजी एकाधिकारशाही निर्माण करण्यात आली. भारतीय राज्य घटनेला दिशा-दिग्दर्शन या कायद्याने केले आणि त्यात या कायद्याचे प्रतिबिंब पडलेले दिसुन येते. भारतीय नेत्यांनी मात्र हा कायदा आनंदाने स्वीकारला नाही. विरोधच केला. जवाहरलाल नेहरूंनी या कायद्याबाबत प्रतिक्रिया

''अनेक नियंत्रणे (ब्रेकस) असलेले पण इंजिनच नसलेले यंत्र या शब्दात दिली.'' पं. मदन मोहन मालवीय म्हणाले ''ही पोकळ लोकशाही होती.'' बॅं. जिनांना हा कायदा निरुपयोगी वाटला. १९३७ मध्ये नव्या राज्यव्यवस्थेसाठी प्रांतामध्ये निवडणूका झाल्या. राष्ट्रीय सभेला फार मोठे यश मिळाले. मात्र कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यातील मतभेदांमूळे तसेच १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने बॅ. जिना अधिक आक्रमक झाले आणि या कायद्याच्या आमंलबजावणीत अनेक अडथळे निर्माण झाले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १९३५ च्या भारतसरकार कायद्याचा थोडक्यात खुलासा करा.

## १२.९ इ.स.१९३९ ते १९४७ या काळातील स्वातंत्र्य प्राप्तीसाठीच्या घडामोडी

इ.स. १९३९ ते १९४७ या काळात दुसरे महायुध्द घडुन आले. अमेरिका व रशिया युध्दात इंग्लंडच्या बाजूने होते तरी सुध्दा इंग्लंडला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले होते. १९४२ मध्ये म. गांधीनी चले जाव चळवळ सुरू केली होती. याच सुमारास नेताजी सुभाष बाबूंनी आझाद हिंद सेनेमार्फत जपानच्या सहाय्याने ब्रिटीश सरकार विरुध्द संघर्ष पुकारला होता.

साम्राज्य सांभाळणे ब्रिटीशांना अवघड झाले होते. मात्र भारतासारखी वसाहत सोडण्यास ब्रिटीश तयार नव्हते. चले जाव चळवळ प्रभावीपणे सुरू झाली होती. आणि ब्रिटीश सरकारने चर्चेचे गुऱ्हाळ सुरू केले होते. त्याचाच एकभाग - क्रिप्स मिशन होते.

**क्रिप्स मिशन :-** १९४२ मध्ये सर स्टॅफोर्ड क्रिप्स या मजूर पक्षाच्या नेत्याला ब्रिटीश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी भारताच्या दौऱ्यावर पाठविले. भारतातील परिस्थितीचा अभ्यास करून त्यावर घटनात्मक मार्ग काढण्याचा या मिशनचा हेतू होता. **क्रिप्स मिशनने खालील तरतूदी केल्या होत्या.**

१) युध्द संपताच भारताला स्वातंत्र्य दिले जाईल. घटना तयार करण्यासाठी लोकनियुक्त घटना समितीची स्थापना केली जाईल.
२) घटना समितीमध्ये भारतीय संस्थानिकांचे सहकार्य घेतले जाईल.
३) एखादया प्रांताला घटना मान्य न झाल्यास त्याला स्वतंत्र घटना तयार करण्याचा अधिकार दिला जाईल.

४) घटना तयार झाल्यानंतर घटना समिती व ब्रिटीश सरकार यांच्यात करार होईल.

५) युध्द संपेपर्यंत भारतीयांनी ब्रिटीश सरकारला संपूर्ण सहकार्य करावे, नवीन घटना तयार होईपर्यंत भारताच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटीश सरकारची राहील.

क्रिप्स मिशनची योजना भारतातील कोणत्याही गटाला मान्य झाली नाही. म. गांधी टीका करताना म्हणाले, ''दिवाळखोर बँकेचा पुढील तारखेचा चेक.'' मुस्लिम लीगने् विरोध केला. कारण स्पष्ट शब्दात पाकिस्तानची तरतूद नव्हती. हिंदु महासभेनेही योजना फेटाळली. कारण छोडो भारत चळवळ सुरू होती.

**राजाजी योजना :-** ब्रिटीश सरकारने दडपशाहीने चले जाव चळवळ क्षीण केली. गांधीजीनी स्वातंत्र्याचा प्रश्न मुस्लिम लीगशी समझोता करुन सोडवायचा प्रयत्न केला पण मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी होती. त्यामुळे राष्ट्रीय सभा व लीग यांच्यात समझोता घडवुन आणण्यासाठी सी. राजगोपालचारी यांनी मध्यस्थी केली. १९४४ च्या जून मध्ये राजांजीनी एक योजना मांडली. त्यालाच राजाजी योजना म्हणले जाते. खालील मुद्यांच्या समावेश होता.

१) मुस्लिम लीगने भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीस पाठिंबा द्यावा आणि हंगामी सरकार स्थापन करण्यासाठी राष्ट्रीय सभेशी सहकार्य करावे.

२) युध्दानंतर वायव्येकडील व पुर्वेकडील बहूसंख्य मुसलमान असलेले जिल्हे निश्चित करण्यासाठी समिती नेमण्यात. हिंदुस्थानात रहायचे की स्वतंत्र राज्य बनवायचे हे या जिल्ह्यांनी बहूमताने ठरवावे.

३) वेगळे व्हायचा निर्णय झाल्यास संरक्षण व्यापार व दळणवळण या बाबतीत दोन्ही राज्यांमध्ये समझोता व्हावा.

४) ही सर्व कलमे ब्रिटनने भारताबाबतची पूर्ण सत्ता व जबाबदारी सोडली तरच अंमलात येतील.

राजाजी योजनेचे महत्त्व म्हणजे राष्ट्रीय सभा आणि नेते इतके दिवस द्विराष्ट्रवादास विरोध करत होते. या योजनेद्वारे प्रथमच स्वतंत्र मुसलमान राष्ट्रास त्यांनी मान्यता दिली. परंतु या योजनेने ही मुस्लिम लीगचे समाधान झाले नाही. कोणत्याही अटीशिवाय पाकिस्तान असे आडमूठे धोरण लीगचे होते. गांधीजींनी केलेल्या चर्चेस आणि योजनेला प्रतिसाद मिळाला नाही.

**देसाई - लिआकत अली करार :-** म. गांधींना घटनात्मक पेचप्रसंग सोडविण्यासाठी मुस्लिम लीगचे सहकार्य आवश्यक वाटत होते. मुस्लिम लीगच्या सहकार्याने सरकारवर दबाव आणता येईल असे त्यांना वाटत होते. राष्ट्रीय सभेचे सेंट्रल असेम्बलीमधील नेते भुलभाई देसाई यांनी आपले मित्र मुस्लिम लीगचे नेते नवाबजादा लिआकत अली खान यांच्या पुढे हंगामी सरकारसाठी एक योजना मांडली ती अशी होती.

१) विधीसत्तेबाबत गव्हर्नर जनरलला विशेषाधिकार असू नयेत.

२) कार्यकारी मंडळाचे सदस्य मुस्लिम लीग व राष्ट्रीय सभेने नेमलेले असावेत.

३) दोन्ही पक्षांच्या सदस्यांची संख्या समान असावी.

४) अल्पसंख्याकांच्या विशेषतः शिखांच्या व दलितांच्या प्रतिनिधींचाही समावेश त्यात करावा.
५) लष्कर प्रमुख हा या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या सभासद असावा.

मात्र पाकिस्तान प्रश्नामुळे ही योजना बारगळली.

**वेव्हेल योजना :-** इ.स. १९४४ मध्ये दुसऱ्या महायुध्दात जर्मनीची पिछेहाट सुरू झाली होती. चले जाव चळवळ ओसरली होती. चर्चिल सरकारची लोकप्रियता कमी झाली होती. निवडणूका जवळ येऊन ठेवल्या होत्या. त्यामुळे हुजुरपक्षाने भारताच्या घटनात्मक प्रश्नाकडे लक्ष दयावचे ठरविले होते. त्याचाच एक भाग म्हणुन जून १९४५ मध्ये नवे गव्हर्नर जनरल लॉर्ड वेव्हेल यांनी आपली योजना मांडली होती. तीच्यात खालील तरतुदी होत्या

१) नवी घटना भारतीयांनीच तयार करावी.
२) मध्यवर्ती कार्यकारी मंडळात गव्हर्नर जनरल व लष्करप्रमुख वगळता इतरमंत्री भारतीय असावेत, त्यात हिंदू व मुसलमानांची संख्या समान आसावी.
३) प्रांतांमधील संमिश्र सरकारे प्रस्थापित व्हावीत.
४) जपानबरोबरील युध्दात भारतीयांनी सरकारला सहकार्य करावे.

लॉर्ड वेव्हेल यांनी सिमला येथे विचार विनिमय करण्यासाठी एक परिषद बोलावली. राष्ट्रीय सभेच्या नेत्यांची सुटका करण्यात आली. पण परिषदेत एकवाक्यता झाली नाही. स्वातंत्र्या बरोबर फाळणी, मुस्लिम लीगची भुमिका असल्यामूळे वेव्हेल योजना ही बारगळली.

**कॅबिनेट मिशन व त्रिमंत्री योजना :-** इ.स. १९४५ मध्ये महायुध्द संपले. इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन मजूर पक्ष सत्तेवर आला. बॅ. अॅटली पंतप्रधान झाले. या नव्या सरकारच्या काळात इंग्लंडच्या राजाने भारताला संपूर्ण स्वराज्य देण्याची घोषणा केली. ब्रिटीश पंतप्रधान बॅ. अॅटली यांनी एक मंडळ भारतात पाठविले. १९४६ मध्ये भारताच्या दौऱ्यावर आलेल्या मंडळास कॅबिनेट मिशन म्हटले जाते. या मंडळात लॉर्ड पेथिक लॉरेन्स हे भारतमंत्री, सर स्टॅफोर्ड क्रिप्स व अलेक्झांडर या तीन मंत्र्याचा समावेश होता. म्हणून त्रिमंत्री योजना असे म्हटले जाते. त्यातील तरतूदी खालीलप्रमाणे होत्या.

१) भारतीय संस्थाने व संस्थानेत्तर ब्रिटीश भारत मिळून एक संघराज्य स्थापन व्हावे.
२) संघराज्याच्या कायदेमंडळात व कार्यकारी मंडळात संस्थानांचे व ब्रिटीश भारताचे प्रतिनीधी असावेत.
३) परराष्ट्रीय संबंध संरक्षण व दळणवळण ही खाती संघराज्य सरकारकडे असावीत. इतर विषय मात्र प्रांत व संस्थानच्या अखत्यारीत असावेत.
४) प्रांतांचे तीन गट असावेत

अ) बहुसंख्य हिंदू लोकसंख्या असलेले मुंबई, मद्रास, मध्यप्रदेश, बिहार, ओरीसा, संयुक्त प्रांत.
ब) बहूसंख्य मुसलमान लोकसंख्या असलेले पश्चिमेकडील प्रांत - पंजाब, सिंध, सरहद्द प्रांत यात शिखांना प्रतिनिधीत्व असावे.

क) बहूसंख्य मुसलमान लोकसंख्य असलेले पुर्वेकडील प्रांत - बंगाल व आसाम, आवश्यक वाटल्यास प्रत्येक गटाने स्वतःची स्वतंत्र घटना तयार करावी. कॅबिनेट मिशनने घटना समितीची व हंगामी सरकारची ही सूचना केली होती.

त्रिमंत्री योजनेचा स्विकार भारतीयांनी केला. त्यानुसार घटना समितीच्या निवडणूका झाल्या आणि हंगामी सरकार स्थापन झाले होते.

**माऊंटबॅटन योजना :-**

घटना समितीमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले. त्यामुळे मुस्लिम लीगने घटना समितीवर बहिष्कार टाकला. हंगामी सरकार बाबतही मतभेद झाले होते. लीगने हंगामी सरकारवरही बहिष्कार टाकला. तरीसुध्दा सरकारचे काम सुरळीत चालले होते. त्यामुळे बहिष्कार मागे घेऊन लीगच्या नेत्यांनी मंत्रिमंडळात प्रवेश केला. कारण शांत बसून, एकाकी राहून पाकिस्तान मिळणार नाही असे त्यांना वाटले होते. कामकाजात अडथळे आणले जावू लागले होते. त्यामुळे काँग्रेस व लीग यांच्यातील मतभेद तीव्र झाले. सत्तांतराच्या आधी जातीय प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. असे ग.ज. लॉर्ड वेव्हेल यांना वाटत होते. ते मान्य न झाल्याने वेव्हेलने राजीनामा दिला. ग.ज. पदी लॉर्ड माऊंटबॅटन आले आणि त्यांनी आपली योजना मांडली. ती खालील प्रमाणे होती.

१) भारताची फाळणी होऊन दोन राज्ये स्थापन व्हावीत या राज्यांना जून १९४८ ऐवजी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळावे.

२) मुस्लिम लीगने मागणी केलेल्या पाकिस्तान मधील आसाम, या योजनेने पाकिस्तान मधून पूर्णपणे वगळला, बंगाल व पंजाबची फाळणी सुचवली परंतु निर्णय त्या प्रांतातील हिंदूचे अधिक्य असलेल्या व मुसलमानांचे अधिक्य असलेल्या वेगवेगळ्या कायदेमंडळांनी घ्यावा.

३) आसाममधील सिल्हट जिल्ह्यात व वायव्य सरहद्द प्रांतात सार्वमत घेवून त्यांना पाकिस्तानात जायचे आहे की भारतात राहायचे आहे हे ठरवावे.

फाळणीची तरतूद असलेली योजना लीगने मान्य केली. फाळणी टाळता येणे शक्य नाही असे काँग्रेसला वाटत होते. त्यांनी ही फाळणीला मान्यता दिली.

**१९४७ चा भारतीय स्वातंत्र्य कायदा :-**

माऊंटबॅटन योजनेवर आधारित स्वातंत्र्य कायदा ५ जुलै १९४७ रोजी ब्रिटीश पार्लमेंटमध्ये संमत झाला. या कायद्यातील तरतूदी खालील प्रमाणे होत्या

१) १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राज्य निर्माण होतील.

२) सीमा समितीच्या निवाड्याच्या आधारे या कायद्याने दोन्ही राज्यांच्या सिमा निश्चित केल्या. त्यानुसार आसाम भारतात राहिले. बंगाल व पंजाबची फाळणी झाली आणि सिलहट व वायव्य सरहद्द प्रांत पाकिस्तानला मिळाले.

३) दोन्ही राज्यांना स्वतंत्र वा सामाईक गव्हर्नर जनरल असावा. त्याची नेमणूक इंग्लंडच्या राजाने करावी.

४) दोन्ही राज्यांच्या घटना समित्या घटनानिर्मीतीचे व राष्ट्रकुलात सामील होण्याचे स्वातंत्र्य दिले गेले.

५) नवी घटना अस्तित्वात येईपर्यंत १९३५ च्या कायद्यानुसार कारभार चालवावा.त्यात गव्हर्नर जनरल विशेष अधिकार नसतील.

६) इंग्लंडचा कोणताही अधिकार या राज्यांवर राहणार नाही.

७) भारतमंत्र्यांचे व त्याच्या सल्लागारांची माणसे स्वातंत्र्यानंतरही पूर्ववत सेवेत राहतील.

१९४७ च्या या स्वातंत्र्य कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल
.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १९३९ ते १९४७ पर्यंतच्या घटनात्मक विकासाचा मागोवा घ्या.

---

## १२.१० स्वतंत्र भारताची राज्यघटना

१५ ऑगस्ट, १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर भारत सरकार समोर जे प्रमुख आव्हाने होती, त्यापैकी स्वतंत्र राज्यघटना निर्मिती हे एक होते. यासाठी १९४६ मध्ये घटना समितीच्या निवडणूका होऊन घटना समिती तयार करण्यात आली होती. २९६ सदस्या पैकी सर्वसामान्य २१०, मुस्लिम ७८, शीख ४ व इतर ४ असे प्रतिनिधी होते. घटना समितीचे पहिले अधिवेशन डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली २ डिसेंबर, १९४६ रोजी दिल्ली येथे भरले होते. या अधिवेशनात डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे कायमचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मसुदा समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. या समितीने प्रत्यक्ष राज्यघटना तयार करण्याचे काम करावयाचे होते. के. एम. मुन्शी, गोपाल स्वामी अचंगार, अल्लादी, कृष्णस्वामी अय्यर, सय्यद मोहम्मद सादुल्लाह, बी. एन. मित्तर, डी. पी. खेतान हे मसुदा समितीचे सदस्य होते. या सात सदस्यांपैकी पाच सदस्य मृत्यू, राजीनामा, परदेशगमन, स्थानिक राजकारण या कारणांमुळे मसुदा समितीच्या कामकाजात पुरेसा भाग घेऊ शकले नाहीत, साहजिकच राज्यघटनेची सर्व जबाबदारी मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकरांवर आली आणि त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेऊन जगातील अनेक लोकशाही राष्ट्रांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून भारताची राज्यघटना तयार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नि:संशय व समर्थपणे पूर्ण केले. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' म्हटले जाते.

ही राज्यघटना तयार करण्यासाठी २ वर्षे, ११ महिने १७ दिवस लागले. अखेर डॉ. आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी राज्यघटना तयार करून घटना समितीचे

अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हाती सुपूर्द केली. यावेळी पंतप्रधान पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या राज्यघटनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी २६ जानेवारी, १९५० पासून झाली.

**भारतीय राज्य घटनेची वैशिष्ट्ये :**

भारतीय राज्य घटना लिखित स्वरूपाची असून आपल्या देशाचा राज्यकारभार कसा चालेल, केंद्र व राज्य यांचे अधिकार, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये, तसेच न्यायालयाचे स्वातंत्र्य इत्यादी विषयीची माहिती लिखित स्वरूपात आहे.

**भारतीय राज्यघटना प्रदिर्घ** असून त्यामध्ये ३९५ कलमे असून त्यांची विभागणी २२ भागात केलेली आहे. शेवटी ९ परिशिष्टे जोडण्यात आलेली आहेत. या घटनेच्या प्रास्ताविका मध्ये घटनेचे ध्येय व उद्दिष्ट प्रतिबिंबित झाली आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित अशी ही राज्य घटना आहे.

लोकांचे सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, मुलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, संघराज्यात्मक स्वरूप, एकेरी नागरिकत्व, दृढ व परिवर्तनीय, द्विगृही कायदेमंडळ, आणीबाणीचे अधिकार प्रौढ मताधिकार असे अनेक महत्त्वाचे वैशिष्ट्य या राज्य घटनेत समाविष्ट केलेली आहेत. या घटनेच्या अनेक विध वैशिष्ट्यांमुळे जगातील इतर देशांच्या राज्यघटनांपेक्षा ही राज्यघटना भिन्न आहे. ती आदर्श राज्यघटना करण्याचा प्रयत्न घटनाकर्त्यांनी केलेला असून त्यामध्ये ते बहुतांशी यशस्वी झाले आहेत.

## १२.११ सारांश

जबाबदार राज्यपध्दती घोषणा ऑगस्ट घोषणा किंवा माँटेग्यू घोषणा म्हणून ओळखली जाते. त्या घोषणेवर आधारित माँटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा करण्यात आला. मात्र यामुळे भारतीयांचे समाधान झाले नाही. १९२० मध्ये म. गांधी व राष्ट्रीय सभेच्या झेंड्याखाली असहकार चळवळ सुरू झाली. चौरीचौराच्या हिंसक घटनेमुळे गांधीजी व्यथित झाले. असहकार चळवळ मागे घेतली. काँग्रेस अंतर्गत एक गट (वैचारिक मतभेद असलेला) स्वराज्य पक्षाने कायदे मंडळात प्रभावी कार्य केले. मात्र गव्हर्नर जनरल व गव्हर्नरला विशेष अधिकार असल्यामुळे स्वराज्य पक्ष निष्प्रभ ठरला. सायमन कमिशन आले. सायमन कमिशनला उग्र निदर्शनांना तोंड द्यावे लागले. यानंतर नेहरू अहवाल, बॅ. जीनांचे १४ मुद्दे गोलमेज परिषदा, जातीय निवाडा, पुणे करार, सविनय कायदे भंग आंदोलनाच्या मिठाच्या सत्याग्रहामुळे संपूर्ण हिंदुस्थान पेटल्यामुळे ८४ हजार सत्याग्रही तुरुंगात गेले. सशस्त्र क्रांतीचे कार्य या घडामोडीमूळे १९३५ चा कायदा, १९३७ च्या निवडणूका १९४० नंतर पाकिस्तान निर्मीतीसाठी बॅ. जीना अधिक आग्रही व आक्रमक झाले. १९४२ ची चले जाव चळवळ, १९३९ चे दुसरे महायुध्द १९३९ - १९४५ महायुध्दकालीन घडामोडी राज्यघटना निर्मितीची घोषणा, माऊँटबंटन योजना भारताची फाळणी, घटना निर्मिती. इ. सर्व घडामोडी मुळे भारतीय राज्यघटनेला २० व्या शतकाची ही पार्श्वभूमी लाभली आहे.

## १२.१२ सरावासाठीचे प्रश्न - दिर्घोत्तरी

१) मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यातील तरतुदी लिहा.
२) इ.स. १९३५ च्या सुधारणा कायद्याचे महत्त्व स्पष्ट करा.
३) इ.स. १९३९ ते १९४७ या काळात झालेल्या घटनात्मक घडामोडीचा आढावा घ्या.
४) भारतीय राज्यघटना निर्मीतीची पार्श्वभूमी सांगा.

## १२.१३ वाचकांसाठी पुस्तके


१) गर्गे स. मा. कुलकर्णी अ.रा. भारतीय राज्यघटनेचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९७५.
२) Kapur A C : Constitutional Hestory of India (1765 - 1984), S. Chand & company ltd; New Delhi, 1985, Third revised edition.
३) देशपांडे अरविंद, घटनात्मक विकास १८५७ ते १९५०, य. च. महा. मु. वि. नाशिक प्रथामवृती, १९९१.
४) पवार जयसिंगराव (१९७४), हिंदुस्थानचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
५) कदम य. ना. (२००३), समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
६) तांबोळी एन. एस. (२००५), आधुनिक भारत निराली प्रकाशन पुणे.


❖❖❖❖

# १३

# नव शक्तींचा उदय

## अ) पददलीत वर्ग, ब) महिलांचा वर्ग

**अनुक्रमणिका**

१३.० उद्दिष्ट्ये
अ) पददलित वर्ग
१३.१ प्रास्ताविक
१३.२ पददलितांच्या उध्दारातील समाज सुधारकांचे प्रयत्न
१३.३ महिलांचा वर्ग
१३.४ १८५७ उठावातील महिला.
१३.५ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांची कामगिरी
१३.६ भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री क्रांतीकारक -
१३.७ म. गांधी आणि महिला क्रांतीकारक
१३.८ आझाद हिंद सेनेतील महिला.
१३.९ सरावासाठीचे प्रश्न
१३.१० संदर्भ ग्रंथे.

## १३.० उद्दिष्टे

- पददलित अस्पृश्य, वंचित वर्ग आणि त्यांचा राष्ट्रिय प्रवाहातील सहभाग म. फुले, म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानव मुक्तीच्या लढ्याची ओळख करून देणे.
- पददलितांसाठी कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्था, समाज सुधारक यांच्या कार्याचा आढावा घेणे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग व कार्याचा परिचय करून देणे.
- भारतीय राष्ट्रीय चळवळीत पददलित आणि महिला वर्गाच्या सहभागाची माहिती मिळविणे.

**अ) पददलित वर्ग**

## १३.१ प्रास्ताविक

भारतीय समाज व्यवस्था प्राचीन काळापासून जाती व्यवस्थेने विभागलेली होती. या व्यवस्थेत अस्पृश्य - आदिवासी - भटके हे तळाशी होते. या कनिष्ठ वर्गावर विविध प्रकारांची बंधने लादण्यात आली होती. ती जाचक व अन्यायकारक होती. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे त्रैवर्णिक सन्मानाने जीवन व्यतीत करत होते. तितका सन्मान शुद्रांना कधीच मिळाला नाही. शुद्र / अस्पृश्य यांना कनिष्ठ प्रतीचे जीवन व्यतीत करावे लागत होते. उच्चवर्णीयांना जन्मजात प्रतिष्ठा आणि शुद्रांना कर्मजात हाल अपेष्टा अशी विषम सामाजिक परीस्थिती होती. उत्पादनाची साधने उच्च वर्णीयांकडे असल्यामुळे शुद्रांना उपेक्षे बरोबरच दैन्य, दारिद्र्य, उपासमार गुलामगिरीचे जीवन जगावे लागत असे. या स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे कार्य १९व्या शतकात सुरू झाले. भारतीय इतिहासात १९वे शतक प्रबोधनाचे ठरले. अस्पृश्य, दलित सुधारणांचे कार्य म. जोतीबा फुले, महर्षि वि. रा. शिंदे, छ. राजर्षी शाहू महाराज, वि. दा. सावरकर इ. केले.

भारतात ब्रिटिश सत्ता स्थिर झाली. तिचा विस्तार झाला आणि भारतात ‘व्यक्ति स्वातंत्र्य’ आणि उदारमतवाद ही दोन मूल्ये भारतीय समाज जीवनात प्रसारीत झाली व त्याला अनुसरून सामाजिक सुधारणा चळवळी सुरू झाल्यात.

ब्रिटिश साम्राज्यवादी सत्ता असून, त्यात वंश श्रेष्ठत्व व आर्थिक शोषण करणे हे दोष होते. मात्र सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत ब्रिटिश राज्यकर्ते, अधिकारी आधुनिक विचारांचे होते. पाश्चात्य शिक्षण व प्रशासन शिस्त यामुळे सामाजिक चळवळींना एक संवैधानिक पाठींबा मिळत होता.

**एखाद्या सिद्धान्ताला, परंपरेला धरून पारंपारीक जीवन व्यतीत करण्यापेक्षा व्यापक, व्यावहारिक आणि जनहिताचा विचार करणे, नव विचारांना अभिप्रेत असलेल्या समस्या जाणून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे याला उदारमतवादी विचार म्हणतात. या उदारमतवादी विचार प्रवाहात व्यक्ति स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य ही मुख्ये तत्वे अंतर्भूत आहेत. ब्रिटिश सत्तेचा, सहवास, संपर्क, पाश्चात्य शिक्षण यामुळे तळागाळातील माणसाचा उद्धार करण्यासाठी समाज सुधारकांनी कार्य केले. ब्रिटिश काळातील कायदे याला उपकारक ठरले.**

परंपरेने शुद्र, आधुनिक काळातील अस्पृश्य, अलीकडे दलित म्हणून संबोधले जाणारे वंचित, उपेक्षित असा समाज घटक आणि त्यांचा सामाजिक स्तर उचांवण्यासाठी झालेल्या चळवळींचा अभ्यास या घटकात आपण करणार आहोत.

अस्पृश्यता नष्ट करणे. अस्पृश्यांचा उद्धार करणे हा मानव मुक्तीचा लढा होता. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा पाया प्राचीन काळात गौतम बुद्ध व वर्धमान महावीर यांच्या कार्यामुळे घातला गेला. महान मानवतावादी धर्म संस्थापक व तत्वज्ञ होऊन गेले. मानव मुक्तीचा लढा, सामाजिक आणि धार्मिक जीवनातील स्थित्यतरांचे ते शतक होते. त्या विचारांचा, तत्वांचा जगभर प्रसार झाला. आज ही अनेक अनुयायी कार्य करीत आहेत. मध्ययुगामध्ये भक्ती चळवळीच्या रूपाने संतांनी सामाजिक एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस. रामानुज, रामानंद, चैतन्य, कबीर, नानक, संत तुकाराम या सर्वांनी अस्पृश्योदाराचे कार्य केले. ब्राह्मोसमाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन असे संस्थात्मक कार्य ही वंचितांच्या उद्धारासाठी झाले. अस्पृश्य परंपरा नष्ट करण्यासाठी व वंचित आणि त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी मोठ्या प्रभावीपणे कार्य १९व्या शतकात सुरू झाले. हा कनिष्ठ मानला गेलेला वर्ग लोक संख्येच्या जवळ जवळ २०% होता. हा वर्ग १९३१च्या जनगणनेच्या अहवालानुसार ५ कोटी १ लाख ९२ हजार एवढा होता. लोकसंख्येने मोठा असणाऱ्या या वंचित वर्गाच्या उद्धारासाठी मानव मुक्तीसाठी, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळी घडवुन आल्या

## १३.२ पददलितांच्या उध्दारातील समाज सुधारकांचे कार्य

अस्पृश्यांच्या बंधमुक्तीसाठी १९व्या शतकापासून समाज सुधारकांनी प्रयत्न सुरू केले होते. संस्थात्मक पातळीवरही प्रयत्न झाले. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळातही आर्थिक शोषण व सामाजिक विषमतेच्या प्रश्नासाठी चळवळी सुरू होत्या. स्वातंत्र्य लढ्याचा तो एक महत्त्वपूर्ण भाग होता. १९व्या शतकाच्या प्रारंभापासून शेतकऱ्यांचे, आदिवासींचे लढे आर्थिक शोषणाच्या विरोधात सुरू होते. पुढे शहरांमधून कामगारांच्या चळवळी सुरू झाल्या. २०व्या शतकात रशियन राज्यक्रांती नंतर साम्यवादी विचारधारेचा पाठींबा मिळाल्यानंतर काँग्रेस अंतर्गत समाजवादी विचारांचा वर्ग आर्थिक शोषण व सामाजिक विषमतेच्या विरोधात लढ्याचे नेतृत्त्व करू लागला. सामाजिक एकात्मता व भारतीय जनतेचे संघटन या शिवाय स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणार नाही याची जाणीव काँग्रेसला झाली होती. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप फक्त राजकीय न राहता बऱ्याच अशी सामाजिकही बनले.

आधुनिक भारताचे जनक राजा राममोहन रॉय यांच्या कार्यापासून समाज व धर्म सुधारणा चळवळीचा पाया घातला गेला. त्या चळवळीला कृतीशील, प्रभावी, परिणामकारक व वैचारिक अधिष्ठान म. फुलेंच्या विचारांमुळे मिळाले.

पाश्चात्य शिक्षण आणि ब्रिटिशकालीन शैक्षणिक सुधारणा यामुळे बुद्धीजीवी, नवशिक्षीतांचा वर्ग उदयास आला. उदारमतवादी विचार आणि तत्त्वज्ञानामुळे लोकशाही संस्था, आणि शिक्षणाचा प्रभाव वाढला. पददलित, वंचित आणि महिला राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले. या नविन सामाजिक गटांच्या उदयामुळे स्वातंत्र्य चळवळीला जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, जंगल सत्याग्रह सुरू झाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सामाजिक प्रश्नांकडे लक्ष दिले. कायदे करून संरक्षण देण्याचा प्रयत्न केला. २०व्या शतकात राष्ट्रीय चळवळीत अस्पृश्य, महिला वर्ग या नव्या सामाजिक गटाचा उदय झाला. म्हणजेच काँग्रेसची चळवळ समाजाच्या तळापर्यंत होती हे स्पष्ट आले.

## १३.२.१ महात्मा जोतिबा फुले (१८२७-१८९०)

महाराष्ट्रातील श्रमजीवी, वंचित वर्गाच्या शोषणाची आणि सामाजिक गुलामगिरीची अभ्यासपूर्ण मांडणी करणारे कृतीशील पहिले समाज सुधारक म्हणून त्यांचे ते वंदन केले जातात. थॉमसपेन यांच्या 'राईटस् ऑफ मॅन' या ग्रंथापासून त्यांना समाजसुधारणेची प्रेरणा मिळाली. मानवी समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वांवर आधारित नव समाज रचनेची मागणी ते करतात आणि त्यासाठी त्यानी चळवळी केल्या. जातिभेद खोटा आहे, ब्राह्मण्य, पोथीनिष्ठा, ग्रांथिक प्रामाण्य त्यांनी नाकारले. पारंपारिक हिंदुधर्म संस्था व समाज व्यवस्थेतले दोष त्यांनी परखडपणे मांडले. शुद्रांची गुलामगिरी व दैन्य संपविण्यासाठी त्यांनी लोक शिक्षणाचा आधार घेतला. आणि यासाठी १८४८ साली पुण्यामध्ये त्यांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली. १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी दोन शाळा सुरू केल्या. 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना करून सामाजिक क्रांती घडवून आणली. १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली, 'शेतकऱ्यांचा असूड' आणि सार्वजनिक सत्यधर्म हे समाज परिवर्तनासाठीचे महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिले. दिनबंधू आणि दीनमित्र या सत्यशोधक चळवळीच्या वृत्तपत्रांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. जात, वर्ण, लिंग, पंथ, जन्मस्थळ या बाबींना फुलेंनी महत्त्व दिले नाही. समतेचा पुरस्कार केला. समता प्रधान समाजव्यवस्थेची निर्मिती त्यांना आवश्यक वाटत होती. म. फुलेंनी आपल्या 'गुलामगिरी', अस्पृश्यांची कैफियत, सार्वजनिक सत्यधर्म इ. ग्रंथांतून जातिभेद व अस्पृश्यता या हिंदुधर्माच्या दोषांवर टीका केली.

म. फुलेंनी समताप्रधान समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. अनेक समाज सुधारकांनी त्यांच्यापासुनच प्रेरणा घेतली. गोपाळबाबा वेलंगकर, शिवराम जानबा कांबळे इ. समाज सुधारकांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. शिवराम जानबा कांबळे अस्पृश्यांचा महत्त्वपूर्ण कार्य करणारा नेता होता त्यांनी अस्पृश्यांची पहिली परिषद बोलावली. ते पुणे येथून निघणारे सोमवंशीय मित्र या मासिकाचे संपादक होते. ब्रिटिश सरकारकडे इ.स. १९१० मध्ये त्यांनी अस्पृश्यांच्या जीवनात सुधारणा करावी अशी मागणी केली.

## १३.२.२ छ. राजर्षी शाहु महाराज (१८७६-१९२२)

पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रातील एक राजे राजर्षी शाहू महाराज सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीत सहभागी झाले होते. ही इतिहासातील उल्लेखनीय घटना आहे. अतिशय गाजलेले व परिवर्तनाचा (धार्मिक) मानबिंदु असलेले वेदोक्त प्रकरण, आंतरजातीय विवाहाला प्राधान्य, अस्पृश्योद्धार, ब्राह्मण्याला, जातीभेदाला विरोध, १९०२ मध्ये मागास जातींना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणारा ऐतिहासिक निर्णय, पुनर्विवाह नोंदणी कायदा, जन्माधिष्ठित भेदभाव नाकारणारी समाज सुधारक सत्यशोधक चळवळ प्रभावी पणे राबविण्यासाठी त्यानी उपाय योजना केली होती. कृतीशील समाज सुधारक, कोल्हापूर संस्थान हे मागासलेल्या आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल  विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह आणि माहेर घर होते.

### इतर समाज सुधारक

अस्पृश्यता विरोधी चळवळ दक्षिण भारतात रामास्वामी पेरियार यांनी सुरू केली. त्याचप्रमाणे शुद्र एझवा कुटुंबात जन्माला आलेले नारायण गुरू यांनी १८८८ मध्ये शिवरात्रीच्या दिवशी 'अरवीपूरम चळवळ' सुरू केली. मंदिर प्रवेश नाकारलेल्या एका शुद्राने अरवीपूरम येथे शिव मंदिरात शिवाच्या मूर्तीवर अभिषेक केला. या घटनेच्या स्मृतिप्रीत्यर्थ अस्पृश्यता विरोध दर्शविण्यासाठी संत नारायण गुरू यांनी ही चळवळ सुरू केली होती. नारायण गुरू यांना डॉ. पल्पू व कुमारन आसन यांचे सहकार्य मिळाल्याने ही चळवळ जोमाने सुरू झाली.

महाराष्ट्रातील अस्पृश्यता विरोधी चळवळीत तसेच सामाजिक व धार्मिक सुधारणेत महत्त्वपूर्ण कार्य कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. ते पाश्चत्य शिक्षण घेतलेले बुद्धिनिष्ठ समाज सुधारक होते. विज्ञानवाद आणि मानवतावाद याने ते प्रभावित झाले होते. अस्पृश्योद्धाराचे कार्य प्रभावीपणे करण्यासाठी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'  नावाची संस्था स्थापन केली. त्यांना नारायण गणेश चंदावरकर यांचे विशेष सहाय्य लाभले. त्यासाठी हिंदुधर्मातील दोष, वैगुण्य याचा त्याग केला पाहिजे अशी भावना समाजात निर्माण करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. 'डिप्रेस्ड क्लास मिशन' या संघटनेच्या शाखा भारतातील मोठ्यां शहरांमध्ये सुरू केल्या होत्या.  न्या. म. गो. रानडे यांच्या मृत्युनंतर नारायण गणेश चंदावरकर यांनी राष्ट्रीय सामाजिक परिषद १९२८ मध्ये भरविली आणि त्यात ठराव करण्यात आला. अस्पृश्यता निर्मूलन करणे. अस्पृश्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे. यासाठी चंदावरकरांनी शाळा सुरू  करुन सोयी सवलती निर्माण केल्या होत्या.

## म. गांधी

म. गांधींनी अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न जन जागरणातून आणि चळवळीतून करण्याचा प्रयत्न केला. ते दलितांना 'हरिजन' आणि आदीवासींना 'गिरिजन' या नावाने संबोधत होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य गांधी युगात झाले.

स्त्रीया, पददलित मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले होते. त्यामुळेच गांधीयुगात जन आंदोलन सुरू झाले होते. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ लोकाभिमुख करून तिची पूर्तता स्वातंत्र्य प्राप्तीत करण्यासाठी महान त्यागाची करण्याची क्षमता फक्त म. गांधामध्येच होती त्यांचे धर्म आणि समाज सुधारणा विषयक विचार अत्यंत मौलिक स्वरूपाचे होते.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पाच नैतिक नियमांवर त्यांची विचारसरणी आधारलेली होती. नीतीशास्त्र, राजनीती आणि समाजरचना यांना आधारभूत होईल असा धार्मिक मानवतावाद म. गांधीना अभिप्रेत होता. सत्य आणि अहिंसा या तत्त्वांवर आधारीत रस्कीनच्या ग्रंथांचा आधार घेतलेला 'सर्वोदयवाद' म. गांधींनी स्विकारला. व्यक्तीप्रमाणे समाजाचीही सामाजिक व राजकीय प्रगती होत असते. हे सर्वोदयवादाचे मुख्य सुत्र आहे. दलित आणि पीडित वर्गाची सेवा करून त्यांना समता व न्याय मिळवून दिला पाहिजे. त्यासाठी 'सत्याग्रह' हे तत्त्वज्ञान त्यांनी सांगितले. उच्चनीच भाव आणि अस्पृश्यता नष्ट करणे हे सामाजिक प्रगतीसाठी गरजेचे आहे. असे विचार म. गांधींचे होते.

गांधी युगात सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी म. गांधींनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. त्यांच्या सामाजिक चळवळीला अध्यात्मनिष्ठा आणि मानवतावादाची पार्श्वभूमी होती. 'मानव प्रतिष्ठा' हे त्यांच्या विचारांचे केंद्रस्थान होते. यासाठीच त्यांनी अस्पृश्यांना 'हरिजन' असे नाव दिले. **अस्पृश्यता** हा हिंदु समाजाला लागलेला कलंक आहे. असे विचार म. गांधीचे होते. सामाजिक संबंधांची पूनर्रचना झाली पाहिजे. पारंपारिक व्यवस्था बदलली पाहिजे. लोकशाही समता, बंधुभाव, मानवी हक्क जोपासले गेले पाहिजेत. त्यासाठी म. गांधींनी 'ऑल इंडिया हरिजन सेवक संघाची' स्थापना १९३२ मध्ये केली. या संघाच्या माध्यमातून मानवाची प्रतिष्ठापना व अस्पृश्य वर्गाची उन्नती करण्यासाठी कार्य केले. जनजागरणासाठी व प्रबोधनासाठी 'हरिजन' हे साप्ताहिक सुरू केले. दलित वस्तीत जावून राहणे. हाती झाडू घेवून स्वच्छता करणे. टाकलेली कामे करून लोकांपुढे एक वेगळा आदर्श गांधींनी ठेवला. व्यावहारिक समाज सुधारक म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. म. गांधींनी शाळा सुरू केल्या. शिक्षण, आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. आश्रम, वसतीगृह स्थापन करून तळागाळातील वंचितांच्या उद्धाराचे कार्य केले. ब्रिटिश सरकारने १९३२ मध्ये जातीय निवाडा

जाहीर करून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र्य मतदार संघ निर्माण करण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी म. गांधींनी त्यांना स्पष्टपणे सांगितले कि अस्पृश्य हा हिंदु समाजाचा अविभाज्य घटक आहे. आणि त्यांना आम्ही वेगळे होऊ देणार नाही. हा राजकीय प्रश्न डॉ. आंबेडकर यांच्याशी चर्चा करून पुणे कराराच्या द्वारे त्यानी सोडविला. यावरुन सामाजिक एकात्मता गांधींना अभिप्रेत होती हे स्पष्ट होते.

## १३.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६)

म. फुलेंच्या नंतर भारतीय समाजव्यवस्थेतील पारंपारिक दोषांवर, जातीभेद व अस्पृश्यता यावर कठोर टिका करून अस्पृश्योद्धारासाठी संघर्ष, करणारे एकमेव नेते म्हणजे डॉ. भिमराव उर्फ बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा ही शिकवण दिली. अस्पृश्यांना ताठ मानेने जगता यावे यासाठी जनजागरणासाठी बाबासाहेबांनी ‘मूकनायक’ जनता, समता व प्रबुद्धभारत अशी वृत्तपत्रे सुरू केली. इ.स. १९२४ मध्ये अस्पृश्यांचे संघटन करण्यासाठी आणि त्यांच्या हिताचे रक्षण, त्यांना हक्कांची जाणीव करून देण्यासाठी ‘बहिष्कृत हितकारिणी’ ही संघटना निर्माण केली. १९२६ मध्ये रहिमतपूर (सातारा जिल्हा) येथे भरलेल्या पददलितांच्या परिषदेत त्यांनी त्यांना गावकीचे व वतनदारीचे हक्क सोडून देण्याचा आदेश दिला. हिंदूप्रमाणे दलितांना समतेची वागणूक मिळाली पाहिजे यासाठी इ.स. १९२७ मध्ये महाड येथे ‘चळदार तळ्याचा सत्याग्रह’ केला. नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह तर इतिहास प्रसिद्ध आहे. त्यामुळेच १९३५ मध्ये काळाराम मंदिर दलितांसाठी खुले केले गेले.

१९३७ मध्ये चवदार तळ्याची केस बाबासाहेबांनी उच्च न्यायालयात जिंकली. सामाजिक न्याय आणि समतेसाठी चळवळी, सत्याग्रह, जनजागरण, घटनात्मक व कायदेशीर अधिकाराचा वापर या उच्च विद्याविभूषीत समाज सुधारकाने केला आणि ते संपादन करुन घेतले.

इ.स.१९२९ ते १९३७ या काळात डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळावेत यासाठी चळवळ केली. सायमन कमिशन समोर आपली बाजू मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्लंडमधील दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलितांच्या राजकीय अधिकारांसाठी प्रभावीपणे त्यांची बाजू मांडली. त्या वेळेला डिप्रेस्ड क्लासच्या वतीने राव बहादूर श्रीनिवास प्रतिनिधी म्हणून हजर होते. स्वतंत्र मतदार संघाची मागणी त्यानी केली. १९३२च्या जातीय निवाड्यात ती ब्रिटिश सरकारने मान्यही केली होती. मात्र म. गांधींच्या आग्रहामुळे डॉ. आंबेडकर व म. गांधी यांच्यात तडजोड होवून पुणे कराराच्या माध्यमातून अस्पृश्यांना राखीव जागा मान्य करण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय सुधारणांचे मोठे यश होते.

इ.स.१९४२ मध्ये देशातील अस्पृश्यांना संघटीत करण्यासाठी 'शेड्यूल्ड कास्टफेडरेशन' नावाचा राजकीय पक्ष नागपूर येथे स्थापन केला. त्याचेच नाव पुढे रिपब्लिकन पार्टी असे पडले. शिक्षणाशिवाय अस्पृश्यांच्या जीवनात परिवर्तन अशक्य आहे. त्यासाठी त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली. यासंस्थेद्वारे औरंगाबाद व मुंबई येथे महाविद्यालयांची स्थापना केली गेली, इ. १९४२ ते १९४६ या काळात ते गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचे सभासद बनले होते.

भारतीय समाज व्यवस्थेवरील परंपरांचा, अनिष्ठ चालीरितींचा प्रभाव कमी होत नाही. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होत नाही. जातीभेद, अस्पृश्यते सारखा कलंक पुसला जात नाही. यामुळे व्यथीत होऊन येवला जि. नाशिक येथे बाबासाहेबांनी घोषणा केली होती की 'जरी मी हिंदू म्हणून जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' शेवटी १९५६ मध्ये याच भूमीतला पूर्वीचा वैभवशाली असा बौद्ध धर्म स्विकारून सामाजिक परिवर्तनाचा व स्थित्यंतराचा नवा अध्याय सुरू केला. आपल्या लाखो अनुयायांसह त्यांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला. हे धर्मचक्र परिवर्तन जगाच्या इतिहासात अद्वितीय ठरले आहे. बाबासाहेबांनी Castes in India, The problem of Rupee; Thoughts on Pakistan; who were the shudras असे अनेक नामवंत ग्रंथ लिहिले. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाचे मानबिंदू ठरले.

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांना आजही मानाचे स्थान आहे.**

कामगारपक्ष, कामगारांचे संघटन त्यांचे अधिकार त्यासाठीच्या लढ्याचे नेतृत्व यामुळे शहरातील कामगार संघटीत होऊ लागला. त्यांचा आर्थिक स्तर उंचावू लागला. लष्करामध्ये अस्पृश्यांसाठी नोकऱ्या मिळाव्यात यासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केले.

अस्पृश्यांच्या आर्थिक जीवनात सुधारणा व्हावी यासाठी अस्पृश्यांना सरकारी (शासकीय) नोकऱ्या मिळाव्यात यासाठी डॉ. आंबेडकरांनी विशेष प्रयत्न केले. इ.स. १९४२ मध्ये भारत सरकारने अस्पृश्यांसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये राखीव जागा असाव्यात याला अनुमती दिली. १९४७ मध्ये अनु. जातीसाठी निश्चित टक्के जागा राखीव असाव्यात हे मान्य करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय राज्य घटनेचा मसुदा तयार केला. मसुदा (लेखन) समितीचे ते अध्यक्ष होते. सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय अस्पृश्यांसह सर्व वंचित गटांना मिळावा यावर त्यांचा कटाक्ष होता आणि त्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली, त्यांच्यामुळे ते शक्यही झाले.

आधुनिक भारताच्या इतिहासात सामाजिक न्याय, आर्थिक शोषणा विरूद्धचा आवाज, जातीभेद निर्मूलन, अस्पृश्योद्धार, आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठीची चळवळ, कामगारांचे प्रश्न, राजकीय आणि शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण इ.साठी ऐतिहासिक कार्य डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनी केले. घटनेचा मसुदा तयार करताना व घटनेचा सरनामा पाहिल्यास हे चिरकाल टिकणारे कार्य केवळ बाबासाहेबांमुळे आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे भारतात सामाजिक एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. सर्वच वंचित गटांना आपल्या न्याय हक्कांची जाणीव झाली. नवी मूल्ये, नवी व्यवस्था निर्माण होण्यास मदत झाली. ग्रांथिक प्रामाण्य जावून बुद्धि प्रमाण्याचे युग आले. वर्षानुवर्ष गुलामगिरीत पिचत पडलेल्या वंचित वर्गाला न्याय मिळाला. मानवाची बंधमुक्ती करून मानव्याचा हा लढा यशस्वी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य म्हणजे मानवता आणि मानव मुक्तीची गाथा आहे. हा वर्ग पुढे राष्ट्रीय चळवळीत सक्रिय झाला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. पददलितांच्या उध्दारासाठी समाजसुधारकानी केलेल्या कार्याची चर्चा करा.

## १३.३ ब) महिला वर्ग

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्त्रीला मानव म्हणून जीवन व्यतीत करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. 'चूल आणि मूल', भोगवस्तु, किंवा खाजगीमालमत्ता म्हणून तिच्याकडे बघण्याची मानसिकता समाजाची होती. ब्रिटिश काळात विशेष करून १९व्या शतकापासून स्त्री आणि स्त्री जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू लागला होता. भारतीय समाजामध्ये विज्ञाननिष्ठ, पाश्चात्य शिक्षणामुळे समता हे मुल्य समाजात रुजू लागले होते. स्त्रीला शिक्षण देणे, तिला स्वावलंबी बनविणे, अनिष्ट चालींविरूद्ध लढा देणे. चळवळ करणे यासाठी समाज सुधारकांचे, संस्थात्मक कार्य सुरू झाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांची संवैधानिक, कायदेशीर मदतही या चळवळींना झाली. २०व्या शतकाच्या प्रारंभापासून स्त्री जीवनात परिवर्तन घडुन येऊ लागले होते.

१९व्या शतकाच्या प्रारंभापासून भारतात राष्ट्रवादाचे वारे वाहू लागले होते. भारतातील शेतकरी, आदिवासी यानी आर्थिक शोषणाच्या विरोधात सशस्त्र लढा दिला. यात महिलांचाही सहभाग होता.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिला शक्तीचा (गटाचा) उदय झाला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांनीही मोठे योगदान दिले होते. त्याचा प्रारंभ ठळकपणे झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या कार्यापासून झाला होता. झाशीच्या राणीपासून ते जंगल सत्याग्रहापर्यंत आदिवासी स्त्री, अर्धनग्न, अर्धपोटी, आणि मुलं पाठीशी बांधून मुठभर गवत हातात घेऊन तिने सत्याग्रह केला. ही एक मोठी परंपरा स्त्रीक्रांतीकारकांची आहे. त्याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

झाशींची राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महाल आणि इतर महिलानी ब्रिटिशांशी संघर्ष केला. नाशिकमध्ये येसुवहिनी सावरकर (बाबाराव - सावरकरांच्या पत्नी) यांनी क्रांती कार्यात सहभाग घेतला. स्वदेशी, देशभक्ती, ही काँग्रेसची चळवळ मं. गांधीजींच्या चळवळीपासून राष्ट्रीय चळवळ सामान्यापर्यंत जावून पोहोचली होती. महिलांचा मोठा सहभाग वाढला होता. स्वातंत्र्य लढ्याला जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले होते. एकीकडे स्त्री, समाज व धर्म सुधारणा चळवळ सुरू होती. दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्यासाठी स्त्रीया क्रांती कार्यात पुरुषाबरोबर करत होत्या असे चित्र २०व्या शतकात दिसत होते. स्त्री शिकली, स्त्री बोलू लागली, संघर्ष करू लागल्या. नारीशक्ती अबला न राहता सबला झाली. स्त्री मुक्तीचा नारा सुरू झाला, तीने स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

भारतात ब्रिटिश सत्तेविरूद्ध संघटित उठाव प्रथम १८५७ मध्ये झाला. त्याआधीच्या बंडाचे स्वरूप मात्र स्थानिक होते. ते आर्थिक शोषणाच्या विरोधातले होते. हा उठाव मात्र राजकीय होता. इ.स. १७५७ ते १८५७ या शंभर वर्षाच्या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सत्ता विस्तार करताना वैध-अवैध साधनांचा वापर करुन ते साध्य केले होते. भारतात ब्रिटिश सत्ता दृढ (भक्कम) करणे. यातूनच उत्तर प्रदेशातील झाशी हे संस्थान खालसा करण्याचे धोरण ब्रिटिशांनी राबविले. या देशात प्रथमच एक स्त्री राज्यकर्ती झाशीची राणी ब्रिटिशांविरूद्ध रणागणांत उतरली होती. महिलांच्या क्रांतिकार्याचा हा प्रारंभ ठरला होता. त्यानंतर बेगम हजरत महाल या अयोध्येच्या नबाबाच्या पत्नीने क्रांतीकार्यात सहकार्य केले होते. या महिला क्रांतीकारकांच्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे आहे.

## १३.४ १८५७ च्या उठावातील महिला राज्यकर्त्या

व्यापाराच्या उद्देशाने आलेल्या ब्रिटिशांनी हळूहळू राजकीय सुत्रे ताब्यात घेतली. प्लासीच्या लढाईनंतर बंगाल, बिहार ओरीसा त्यानंतर संपूर्ण भारतभर आपली राजकीय हुकूमशाही प्रस्थापित केले. त्यासाठी त्यांनी तैनाती फौज पद्धत, दत्तक वारसा नामंजूर करून राज्ये खालसा करण्याचे धोरण अवलंबिले गेले. त्यामुळे संस्थानिक इंग्रजावर संतापले. इ.स. १८१८ ते इ.स. १८५६ या काळात सातारा, झाशी, जगदिशपूर, हैद्राबाद, कर्नाटक, तंजावर,

सुरत म्हैसूर, संस्थाने पूर्णपणे हतबल झाली होती. आपली संस्थाने वाचविण्यासाठी झाशीची राणी लक्ष्मीबाई व लखनौच्या बेगम हजरत महाल यांनी शर्थीने प्रयत्न केले होते.

## १) झाशीच्या राणी लक्ष्मीबाई :

उत्तरप्रदेशातील झाशी संस्थानाचे संस्थानिक रघूनाथरावांचे निपूत्रीक निधन झाल्याने त्यांचे धाकटे बंधू गंगाधरराव नेवाळकर यांना संस्थानिक म्हणून गादीवर बसवण्यात आले. इ.स.१८४२ मध्ये गंगाधररावांचा लक्ष्मीबाईंशी विवाह झाला. तेव्हा त्या आठ वर्षांच्या होत्या. इ.स.१८५१ला पुत्रप्राप्ती झाली परंतु अवघ्या तीन महिन्याचा आतच त्याचा मृत्यु झाला. इ.स. १८५३ ला गंगाधररावांचाही मृत्यु झाला. मृत्युपुर्वी संस्थान झाशी करीता पाच वर्षाचा आनंदराव (दामोदर गंगाधर) यास दत्तक घेतले होते - त्यावेळी ‘एलिस’ नावाचा इंग्रज अधिकारी उपस्थित होता. या काळात डलहौसीने ‘खालसा’ धोरणाचा अवलंब केलेला होता. त्यानुसार झाशी संस्थानाचा दत्तक वारस नामंजूर केला हे ऐकताच ‘मेरी झांशी नही दुंगी’ ही घोषणा राणी लक्ष्मीबाईंनी केली होती.

मंगल पांडेच्या फाशिमुळे इ.स. १८५७ला उठावाची सुरूवात झाली. झाशी संस्थानाचा दत्तक वारस नामंजूर केल्यामुळे व राणीच्या मिळणाऱ्या वैयक्तिक तनख्यातून संस्थानाचे पूर्वीचे कर्जाचे हप्ते कापून घेण्यास इंग्रजांनी सुरूवात केल्यामुळे राणी लक्ष्मीबाईंनी १८५७च्या उठावात सहभाग घेतला. ब्रिटिश उठाव दडपत असतांना त्यांचा अधिकारी सर ह्यू रोज याने दक्षिणेकडून औरंगाबाद, उज्जैन, इंदूर, महू जिंकून ताब्यात घेतले होते. आपला मोर्चा झाशीकडे वळवला होता. ५ एप्रिल १८५७ रोजी झाशीच्या राणीचा इंग्रजांशी सामना झाला. राणीला तात्या टोपे मदतीस धावून आले. परंतु राणीचा पाडाव झाला. तेव्हा राणी दत्तक मुलासह निवडक सैन्यानीशी निसटली इंग्रजांनी तिचा पाठलाग केला. उभयतांमध्ये पुन्हा काल्पी येथे संघर्ष झाला, यात राणी जखमी झाली. १७ जून रोजी तिचे निधन झाले ‘मेरी झाशी नही दूंगी’ अशी घोषणा करीत राणीने आपला देह ठेवला पण पारतंत्र्य स्वीकारले नाही.

## २. बेगम हजरत महाल

अवधच्या पदच्युत नबाबाची पत्नी हजरत महाल हीने आपला अकरा वर्षाचा मुलगा कादीर याला नबाब म्हणून घोषित करून कारभार सुरू केला होता. ३० मे १८५७ मध्ये उठावाची सुरूवात लखनौला झाली. बेगम हजरत महाल यात सहभागी झाली, उठाव दडपून टाकण्यासाठी कँपबेल लखनौवर चालून आला. नेपाळच्या जंग बहादूरच्या मदतीने त्याने

लखनौची कोंडी केली. बेगम ने प्रतिकार केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. हजरत महाल इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन निसटली पण कँपबेलने अयोध्या ताब्यात घेतले.

१८५७च्या उठावानंतर ब्रिटिश विरोधी चळवळीचे नेतृत्व सुशिक्षित वर्गाकडे आले. ब्रिटिशांची दडपशाही आणि ब्रुरता उठावात दिसून आली. या साम्राज्यवादी सत्तेशी संघर्ष शस्त्रानेच केला पाहिजे. याची जाणीव भारतीयांना झाली. झाशीची राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महाल यांच्या क्रांतीकार्यामुळे आणि हौतात्म्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा मिळाली.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. १९५७ च्या उठावातीग महिलांच्या कार्याची चर्चा करा.

---

---

---

---

---

## १३.५ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांची कामगिरी

मानवाची सेवा करण्यासाठी भारतीय तत्त्वज्ञानाने भारावलेल्या काही परदेशीय महिलांनी भारतातील स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला होता. यामुळे राष्ट्रीय चळवळीला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यातील काही ठळक महिलांची कामगिरी पुढील प्रमाणे आहे.

**१) भगिनी निवेदिता :** ही मूळची आयर्लंडची कु. मार्गारेट नोबल. स्वामी विवेकानंदांन बरोबर ती भारतात आली. स्त्री वर्गामध्ये सुधारणा व्हावी या चळवळीला भगिनी निवेदिताचे मोठे सहकार्य केले. या स्वामी विवेकानंदांच्या मानस कन्या होत्या. भारतात त्या भगिनी निवेदिता झाल्या. त्यांनी भारतीय स्त्रीयांसाठी भरीव कार्य केले. स्त्रियांसाठी 'शारदा-मंदिर', वस्तीगृह स्थापन केले. भारत, भारताचे स्वातंत्र्यमुल्य, हित, आदर्श त्यांना पूज्य वाटे. त्यातूनच त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला. स्वदेशी चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. रविंद्रनाथ टागोरांनी त्यांना 'लोकमाता' असे संबोधले होते.

**२) मॅडेलीन स्लेड (मीराबेन) :** म. गांधींचीच्या शिष्या होत्या. गांधीजींच्या या शिष्या पुढे मिराबेन नावाने प्रसिध्द झाल्या, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यानी सहभाग घेतला. अनेक वेळा त्यांना तुरुंगवासही सहन केला. मॅडेलीन या मुळच्या इंग्लंडच्या सर तृडमंड स्लेड यांच्या कन्या, म. गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत त्या सक्रिय सहभागी होत्या. १९३१ मध्ये त्या गोलमेज परिषदेला म. गांधीबरोबर इंग्लंडला गेल्या होत्या.

**३. मदर (मेरी पॉल) :** या मूळच्या फ्रान्सच्या होत्या. महर्षी अरविंदांच्या पाँडेचरी आश्रमात त्या व त्यांचे पती रिचर्ड पॉल आले होते. त्या वातावरणाने प्रभावित झाले होते. मदर (माताजी) यांनी भारताला मातृभूमी मानले. आध्यात्मिक क्षेत्रात चांगली कामगिरी केली. महर्षी अरविंदांच्या तत्त्वज्ञानाला वाहिलेल्या 'आर्य' या मासिकाचा अंक काढण्यात त्यांचा मोठा वाटा होता.

**४. मार्गारेट कझिन्स :** या जन्माने आायरिश होत्या. इ.स.१९१५ मध्ये त्या भारतात आल्या. डॉ. ॲनीबेझंट यांच्या होमरूल चळवळीत सहभागी झाल्यात. दलित उद्धारासाठी त्यांनी चांगले काम केले. १९३२ मध्ये स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना एक वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. सन १९२४ मध्ये त्यांनी 'अखिल भारतीय महिला परिषद' आयोजित केली होती.

**४. डॉ. ॲनी बेझंट** : थिऑसॉफीच्या कार्याचा आरंभ भारतात सुरू करण्यासाठी त्या १८९३ मध्ये भारतात आल्या. भारतातील प्राचीन विद्या, तत्त्वज्ञान, धर्म व संस्कृती यांचा त्यांनी अभ्यास केला. १९१४ मध्ये त्यांनी 'न्यू इंडिया' हे इंग्रजी दैनिक सुरू केले. तेव्हापासून त्या राजकारणात सक्रिय झाल्या होत्या. लो. टिळकांच्या बरोबरीने त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला. होमरूल चळवळ, होमरूल लीगची स्थापना आणि विस्तार त्यांनी घडवून आणला. निद्रिस्त भारताला जागे करणे हे आपले कर्तव्य आहे. असे त्या अभिमानाने सांगत. राष्ट्रीय चळवळीत मोठा उत्साह व प्रेरणा डॉ. ॲनीबेझंट यांच्या कार्यामुळे मिळाली. महिलांना पुरूषांप्रमाणेच मताधिकार मिळाला पाहिजे अशी मागणी त्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनात स्वतः अध्यक्ष असताना केली होती.

भारतीय महिलांमध्ये सामाजिक जागृती आणि राजकीय स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्यात या महिलांनी महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

## १३.६ भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री क्रांतीकारक :

इ.स.१८५७ च्या उठावानंतर भारतीयांमध्ये राष्ट्रवादी भावना वाढीस लागली त्यातूनच राष्ट्रीय सभेची स्थापना (१८८५) झाली. सुरूवातीला मवाळ परंतु ब्रिटिशांच्या दडपशाही धोरणामुळे काँग्रेस जहाल बनली. दूष्काळ व प्लेगची साथ व ब्रिटिशांचे आर्थिक धोरण यामुळे अनेक तरुण क्रांतीकारी मार्गाकडे वळले त्यांच्यात प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि देशासाठी प्राणार्पण करण्यासाठी प्रवृत्ती निर्माण झाली होती. पुरूष क्रांतीकारकां बरोबर या स्वातंत्र्य चळवळीत इंग्रजांना विरोध करण्यासाठी महिला क्रांतीकारक देखील सहभागी झाल्या होत्या. त्यात प्रामुख्याने खालील प्रमाणे आहेत.

**१.सौ. येसुबाई गणेश सावरकर :**

'शस्त्राशिवाय स्वातंत्र्य नाही' या विचारसरणीतून वि. दा. सावरकरांनी इ.स. १९०० मध्ये 'मित्रमेळा' संघटनेची स्थापना केली होती. इ.स. १९०४ मध्ये तिचेच 'अभिनव भारत' म्हणून नामकरण करण्यात आले होते. क्रांतीकारकांना पिस्तुले पुरवणे, प्रशिक्षण देणे; काडतूसे पुरवणे या सारखी कामे या संघटनेच्या माध्यमातून केली जात होती. इ.स. १९०६ मध्ये सावरकर इंग्लंडला गेले असता. त्यांचे मोठे बंधु गणेश सावरकर यांनी कामकाज पाहण्यास सुरूवात केली होती. इंग्रजांची नजर या संस्थेवर होतीच परिणामी इ.स.१९०८ मध्ये घराची झडती घेतली. त्यात आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली. त्यातील बरीच कागदपत्रे त्यांची पत्नी सौ. येसुवहीनींनी जाळली होती तरीही गणेशपंतावर खटला भरून त्यांना अंदमानला पाठवले होते. त्यामुळे अनंत कान्हेरे या क्रांतीकारकाने नाशिकचे कलेक्टर जॅक्सनची हत्या केली. या घटनेचे परिणाम सौ. येसूवहीनींना सोसावे लागले. इंग्रजांच्या धाकामुळे त्यांना कोणी मदत करायला धजत नव्हते. अशा परिस्थितीतही नाशिकमध्ये क्रांतीकार्यात भाग घेणाऱ्या कुटूंबातील महिलांमध्ये स्वदेशी व देशभक्तीचा प्रसार करण्यासाठी 'आत्मनिष्ठ युवती समाज'ची स्थापना त्यानी केली होती. ही 'अभिनव भारत' संस्थेची एक शाखा होती. तेथे 'केसरी'तील ब्रिटिशांविरूद्ध असलेल्या लेखांचे वाचन, चर्चा होत असे. त्यात सुमारे १००-१२५ सभासद महिला होत्या. शेवटी इ.स.१९१८ मध्ये असाह्य स्थितीत येसूवहींनींचा अंत झाला.

**२. मादाम कामा :**

मादाम कामा या प्रखर देशभक्त होत्या. प्लेगमधून वाचल्यानंतर श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या बाणेदार वृत्तीच्या प्रभावाने राष्ट्रस्वातंत्र्याच्या कार्यात सामावल्या गेल्या. युरोपात भारतीय वेषातल्या कामाबाईंनी 'वंदे मातरम्' लिहिलेला ध्वज मोठ्या अभिमानाने फडकवला आणि इंग्रजांनी भारतात चालविलेल्या जूलमी राज्यकारभाराचे चित्र स्पष्ट करीत 'तुम्ही न्यायाचाच पक्ष घ्या' आणि भारताच्या स्वातंत्र्याचा विचार करा.' अशा खणखणीत शब्दात इशारा दिला. शेवटी हा ठराव संमत झाला. लंडनमध्ये १८५७चा जो उत्सव झाला. त्यासाठी त्यांनी अध्यक्ष राणाजी बरोबर संदेश, देणगी साहाय्य पाठविले होते. वि.दा. सावरकरांच्या विचारांनी भारवून त्यांना वि. दा. सावरकरांना मदत केली. अंदमानाची शिक्षा ठोठावल्यानंतर त्यांचे धाकटे बंधू नारायणराव सावरकर यांच्या शिक्षणासाठी आणि गणेश सावरकर यांच्या पत्नी सौ. येसूवहीनी यांना आर्थिक मदत मादाम कामा यांनी केली होती.

### ३. श्रीमती दुर्गादेवी बोहरा :

भगतसिंग यांच्या सॉंडर्स वधाच्या खटल्यातील क्रांतीकारक भगवतीचरण यांची पत्नी म्हणजे म्हणजे दुर्गादेवी बोहरा होय. बॉम्ब तयार करीत असतांना स्फोट होऊन क्रांतीकारक भगवतीचरण यांचा मृत्यु झाला. परंतु त्यांचे क्रांतीकार्य त्यांच्या पत्नीने चालू ठेवले. लाहोर कटाच्या खटल्याचा निकाल लागल्यानंतर उत्तरेकडे पोलिसांचे लक्ष होते. या आघाताचे उत्तर देण्यासाठी जमलेल्या सभेमध्ये दक्षिण भारतातून ते द्यावे व मुंबई गव्हर्नरला गोळी घालावी असे ठरले होते. ते काम दूर्गादेवीने स्वतः आपल्याकडे घेतले होते. आपला मुलगा शशी याला बरोबर घेऊन त्या मुंबईला आल्या. कर्जत येथील जनार्दन बाळकृष्ण यांच्या मदतीने गव्हर्नरच्या बंगल्यावर नजर ठेवली. परंतु गव्हर्नर त्यांच्या हाती लागले नाहीत. अशा निराश अवस्थेत परतत असतांना लॅमिग्टन रोडवरील माजदा सिनेमासमोर एका गोऱ्या सार्जंटवर त्यांनी पिस्तूलाने गोळी झाडली आणि मोटारीतून फरार झाल्या. त्यांचा पाठलाग झाला.पण त्या कधीच इंग्रजांच्या हाती लागल्या नाहीत.

### ४. सुहासिनी गांगुली :

बंगाल मधील चितगाव कटातील कल्पना दत्त आणि यांची मैत्रिण सुहासिनी गांगुली. या क्रांतीकारकांनी १७ एप्रिल १९३० रोजी पोलीसांचे शस्त्रागार व दारूगोळा लुटण्यात यश मिळविले. या कटातील क्रांतीकारकांना आश्रय देण्याचे काम सुहासिनी गांगुली यांनी केल्यामुळे त्यांना इंग्रजांनी अटक केले होते.

### ५. वीणा दास :

कोलकत्त्याच्या ग. संस्कृत महाविद्यालयाचे प्राचार्यश्री वेणीमाधव दास यांची ही कन्या होती. तिने वयाच्या २०व्या वर्षी बी.ए. पदवी मिळवली होती. क्रांतीची दिक्षा घेतल्यानंतर ब्रिटिश धोरणाला वचक बसविण्यासाठी हीने पदवीदान समारंभात १९३२ रोजी कोलकत्त्याच्या कॉलेजमध्ये, बंगालचा गव्हर्नर जाताच सहा गोळ्या स्टॅन्ले जॅक्सनवर झाडल्या. परंतु नेम चुकल्यामुळे. तिथेच तिला पकडण्यात आले व ९ वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा ठोठावली.

### ६. प्रीतीलता बड्डेदार :

बंगालमधील डालघाट पटिया येथे गरीब घराण्यात जन्मली होती. बालवयातच सुर्यसेनच्या क्रांतीकार्याने प्रभावित होऊन ती क्रांतीकारकांच्या गटात सहभागी झाली होती. तिने चितगाव कटात मोठे सहकार्य केले. मे १९३२ रोजी सुर्यसेन बरोबर लालघाटाजवळील खेड्यात गेली असता, पोलीसांनी गराडा घातला. मशीनगन्सच्या मारा सुरू झाला तेव्हा दोघांनी ही पिस्तूलाने त्याला उत्तर दिले. त्यात कॅमेरान ठार झाला. त्यानंतर क्रांतीकारक पसार झाले. प्रितीलता भुमिगत झाली. परंतु तिचे क्रांतीकार्य चालुच होते. रामकृष्णची तुरूंगात असताना ४० वेळा भेट घेतली पोलीसांना त्याचा पत्ताही नव्हता.

रेल्वेचे गोरे अधिकारी दर शनिवारी रात्री आपल्या बायकोसह येतात. दारु पिऊन नाचरंग करीत असत. तेथे आपला हेतू पूर्ण करून घ्यावा असे प्रितीला सांगण्यात आले होते. त्यानूसार प्रितीने मुसलमानी वेश धारण करून क्लबमध्ये प्रवेश केला. नाचगाणे सुरू झाल्यावर तिने गोळ्यांचा मारा सुरू केला. गोरे अधिकारी खिडक्यांतून उड्या मारून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. परंतु त्यांना परतावे लागले कारण १३ गोऱ्यांना जबर जखमा झाल्या. मिसेस होत्या सुलीव्हान हिला ठार मारून क्रांतीकारक परतले तरीही प्रीती परतली नाही. आपण शत्रूच्या हाती सापडू नये म्हणून कल्पना दत्त कडून घेतलेले पोटॅशियम सायनाईड खाऊन वाटेतच तिने आत्महत्या केली.

**७) कल्पना दत्त :**

चितगाव कटातील प्रमुख क्रांतीकारकांपैकी कल्पना दत्त ही एक होती. या कटाची तयारी कित्येक महिन्यांपासून सुरू होती. या कटात कल्पना दत्त सोबत प्रितीलता बड्डेदार, सुहासिनी गांगुली, जीवन घोष हे ही होते. यासाठी पोलीसांचे खाकी गणेवश तयार करण्यात आले होते. त्यांच्या कृतीची सुरूवात १७ एप्रिल १९३० रोजी सुरू झाली. पोलीसांचे शस्त्रगार व दारूगोळा ताब्यात घेण्यात यश मिळविले. धाडी घालताना क्रांतीकारकांची इंग्रज सैन्याशी चकमक उडाली. त्यात जीवनघोष ठार झाला. या हल्ल्याचे खरे सूत्रधार सुर्यसेन व मास्टरदा हे होते. या कटामुळे कल्पना दत्तचा चुलत भाऊ झुनकू याला जन्मठेपेची शिक्षा झाली. इ.स. १९३३च्या फेब्रुवारीत सुर्यसेनला पकडण्यात आले. पुढील तीन महिन्यानंतर कल्पना दत्त व तारकेश्वरी दस्तीदार यांनाही पकडले. सुर्यसेन व तारकेश्वरी दास्तीदार यांना फाशी व कल्पना दत्तला जन्मठेप व काळेपाणी अशा शिक्षा दिल्या. इ.स. १९३७ मध्ये रविंद्रनाथ टागोर, अॅड्रयूज व म. गांधी यांच्या प्रयत्नांमुळे कल्पना दत्त तरुंगातून सुटली.

**८. सरलादेवी घोषाल :**

रविंद्रनाथ यांची भाची सरलादेवी. ह्या देखील क्रांतीकारक विचारांनी भारावलेल्या होत्या. त्यांनी आपले विचार ना. गोखले यांना पत्राद्वारे कळविले होते. या क्रांतीकारी विचारांच्या महिलेने शारिरिक शिक्षण देण्यास क्लब सुरू केले त्यांच्या क्रांतीकारी विचाराने प्रभावित होऊन शांती घोष, सुनीती चौधरी या शाळकरी मुलींनी कलेक्टर स्टीव्हन्सनला आपल्या पिस्तुलाने टिपले. दोघींना जन्मठेपेची शिक्षा झाली. क्रांतीकारक विचारांच्या प्रसाराचे काम सरलादेवींनी केल्यामुळे क्रांतीकारक वर्गामध्ये स्त्रीयांची संख्या वाढली.

## म. गांधीच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कार्य करणाऱ्या महिला क्रांतीकारकाच्या कामगिरीचा आढावा :

म. गांधींच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कार्य करणाऱ्या महिला क्रांतीकारकांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी अतिशय उल्लेखनीय आहे. राष्ट्रीय चळवळीत कार्य

करीत असताना तुरूंगवास, पाठीतील काठीचे प्रहार, संसारीक समस्य, लहान मुले, पती, वैयक्तिक समस्या इ.ला तोंड देत, वेळप्रसंगी प्राणाची आहुती देऊनही त्यांनी कार्य केले होते.

**१. सरोजिनी नायडू :**

वयाच्या १८व्या वर्षापासून भारतीय जनसेवेचे व्रत हाती घेतले होते. सन १९११ ते १९४२ पर्यंत स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. त्यासाठी १९३०, १९३२ व १९४२ साली तुरूंगवास भोगावा लागला होता. म. गांधीच्या त्या शिष्या होत्या. होमरूल चळवळीतही महत्त्वाची कामगिरी त्यांनी बजावली होती. इ.स.१९२५ मध्ये त्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षा म्हणून निवडल्या गेल्या. भारतीय महिलांना मताधिकार मिळावा म्हणून १९१९ मध्ये त्या इंग्लंडला गेल्या होत्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उत्तरप्रदेशच्या त्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. स्वातंत्र्य चळवळीत महिलाही नेतृत्त्व करून शकतात. हा आदर्श त्यानी महिलांपुढे ठेवला.

**२. स्वरूपराणी :**

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या मातोश्री म्हणजे स्वरूपराणी यांनी सविनय कायदेभंग चळवळी अनुक्रमे इ.स.१९३० आणि १९३२ मध्ये सहभाग घेऊन महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे त्यांना तुरुंगवासही सोसावा लागला होता.

**३. कमला नेहरू :**

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी व इंदिरा गांधींच्या मातोश्री. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या होत्या त्याबद्दल त्यांना १९३१ मध्ये तुरूंगवासही झाला होता.

**४. कस्तुरबा गांधी**

राष्ट्रपिता म. गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा गांधीनी चंपारण्य सत्याग्रह, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळीत, मिठाचा सत्याग्रहात सहभाग घेतला होता. चळवळींचे मार्गदर्शन केले. म. गांधीना इ.स.१९२२ मध्ये सहा वर्षांची शिक्षा सुनावली तेव्हा त्या काळात चळवळींसाठी मार्गदर्शन केले होते. जनता त्यांना 'बा' या नावाने संबोधली होती. तुरूंगवास भोगल्यामुळे आजारी पडून २२ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांचाही अंत झाला.

**५. कमलादेवी चटोपाध्याय :**

'तेजस्वी महिला' म्हणून ओळख असणाऱ्या कमलादेवी चटोपाध्याय. यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेऊन सविनय कायदेभंग चळवळीत मोठे योगदान दिले होते. परिणाम त्यांना ९ वर्ष कठोर कारावास भोगावा लागला होता. तसेच त्यांना भारतीय रंगमंच व हस्तकलेच्या उद्धारक मानले जात असे. भारताच्या सांस्कृतिक राजदूत म्हणूनही त्या ओळखल्या जात. त्यांना इ.स. १९६५ मध्ये मेगॅसेसे पुरस्कार मिळाला. इ.स.१९८७ मध्ये 'पद्मविभूषण' पदवी देऊन त्याना सन्मानित केले होते.

### ६. अरुणा असफअली :

भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांपैकी अत्यंत महत्त्वाच्या महिला क्रांतीकारक होत्या. जेव्हा नेते मंडळी तुरूंगात होती तेव्हा त्यांनी स्वातंत्र्य चळवळ चालु ठेवली होती. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज सरकारने रू. पाच हजारचे पारितोषिक लावले होते. इ.स. १९४६ पर्यंत त्यांनी स्वातंत्र्य चळवळ चालवली. इ.स. ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे त्यांच्या हस्ते झेंडावंदन केला गेला. अनेक वेळा तुरूंगवास त्यांच्या वाट्याला आला होता.

### ७. सुचेता कृपलानी :

जे. बी. कृपलानी यांच्या पत्नी होत्या. इ.स.१९४२ मध्ये अरुणा असफअली व उषा मेहता यांच्याबरोबर त्या भूमिगत होत्या. त्यांनी भूमिगत राहून स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता

### ८. विजयालक्ष्मी पंडित :

पं. मोतीलाल नेहरूंची कन्या आणि पं. जवाहरलाल नेहरू यांची बहीण होती. यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी परदेशात राहून मोठे योगदान दिले. इ.स.१९४३ ते ४५ या काळात अमेरिकेत ठिकठिकाणी जाऊन कार्य केले होते. इ.स.१९३७ मध्ये उत्तर प्रदेशच्या त्या पहिल्या महिला मंत्री होत्या. संयुक्त राष्ट्र संघाच्या 'पहिल्या महिला अध्यक्षा' म्हणून महत्त्वाची कामगिरी त्यंनी बजावली होती.

### १०. श्रीमती इंदिरा गांधी :

भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान होत्या श्रीमती इंदिरा गांधी. ह्या म. गांधीच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. परिणाम त्यांना इ.स. ११ सप्टेंबर १९४२ ते १३ मे १९४३ या काळात तुरूंगवास भोगावा लागला होता. स्वातंत्र्य चळवळी सहभागी होऊन मोठे योगदान दिले.

या शिवाय दुर्गाबाई देशमुख बिणादास, अनुसयाबाई काळे, शांती घोष, लिला रॉय, राणी गाईडलू इ. महिलांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

### स्वअध्यनासाठी प्रश्न.

१. स्वातंत्र्यचळवळीतील महिलांच्या कार्याचा मागोवा घ्या.

## आझाद हिंद फौजेतील महिला क्रांतीकारकांचे योगदान :

भारताला स्वतंत्र्य मिळवायचे असेल तर आक्रमक भूमिकेचा स्वीकार करणे आवश्यक आहे. या वरून मतभेद झाल्यानंतर सुभाषचंद्र बोस हे कॉंग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी इ.स. १९३९ मध्ये फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केली. भारताचे वीस हजार कैदी जपानच्या ताब्यात होते. त्यांना संघटीत करून रासबिहारी बोस यांनी 'आझाद हिंद सेने'ची स्थापना केली होती. याची जबाबदारी सुरूवातीला कॅ. मोहनसिंग आणि नंतर सुभाष चंद्र बोस यांच्यावर सोपवली होती. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अधिक तिव्रता येण्यासाठी आजाद हिंद सेनेत स्त्री आणि पुरूष यांच्या स्वतंत्र पलटणी तयार करण्यात आल्या होत्या.

### १. कुमारी कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन :

आझाद हिंद सेनेमध्ये स्त्रीयांसाठी स्वतंत्र पलटण तयार करण्यात आली होती तिचे नाव 'झाशीची राणी पलटण' असे होते. त्यांची कमांडर म्हणून इ.स.१४ जुलै १९४३ पासून कॅ. लक्ष्मी स्वामीनाथन ह्या संघटक म्हणूनही काम पाहत होत्या. नेताजींच्या सानीध्यात राहून जीवनातील धकाधकी, असुरक्षितता, मृत्युशी झुंज यांचे पूर्ण अनुभव आले. त्यांना लष्करी शिक्षण देण्यात आले. त्यांची संख्या १५० ते ३०० पर्यंत वाढली. ब्रह्मदेशात मेमियो येथे छावणीत असतांना बॉम्ब वर्षाव सुरू झाला. त्यावेळी लक्ष्मीबाईंना 'मेजर लक्ष्मी' म्हणून व डॉ. लक्ष्मी म्हणून अशा दूहेरी भूमिका कराव्या लागल्या. आझाद हिंद सेनेत झाशी रेजिमेंटने उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## झाशीची राणी पलटणीतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्त्री क्रांतीकारक

### २. मानवती पाण्डेय (आर्या) :

अप्पर बर्माच्या निवासी असलेल्या मानवतीबाईने आझाद हिंद सेनेत परिचारिकेचे प्रशिक्षणाबरोबरच लष्करी शिक्षण घेऊन संघर्षाच्या वेळी मोठे योगदान दिले होते. त्या ब्रह्मदेशातच जन्मल्या व वाढल्या. कृष्णचंद्र आर्या या स्वातंत्र्य सैनिकाशी त्यांनी विवाह केला. त्यानंतर त्या भारतातच स्थायिक झाल्या.

### ३. जानकी दावर :

या मलेशियातील होत्या. उच्च घराण्यातील असतांना देखील त्यांनी आपली बहीण पार्वती हिला घेऊन राणी रेजमेंटमध्ये नाव नोंदले आणी ब्रह्मदेशात ५०० मुलींच्या तुकडीत त्या सहभागी झाल्या. जानवी दावर यांच्याकडे कमांडर म्हणून जबाबदारी एप्रिल १९४४. मोलमिनमध्ये राणी लक्ष्मी रेजिमेंटने आधुनिक शस्त्रास्त्रांनी युक्त असलेल्या सैन्याबरोबर केवळ

लहान बंदूकीच्या सहाय्याने सोळा तास लढा दिला होता. त्यांच्या कामगिरीची स्तूती करताना जपानचे अधिकारी म्हणतात, की 'जानकी एक कर्तबगार अधिकारी आहे.'

**४. बेला दत्त :**

राणी रेजिमेंटमध्ये हिने वयाच्या १७ व्या वर्षी भाग घेतला होता. परिचारिका म्हणून तिने रात्रंदिवस रोग्यांची सेवा केली होती.

श्रीमती शकुंतला गांधी (शहा) : रंगून येथे जन्मलेल्या वयाच्या १७व्या वर्षी आझाद हिंद सेनेत भरती होण्याचा निर्णय त्यानी घेतला. लष्करी इस्पीतळात त्यानी जास्तीत जास्त वेळ काम केले होते.

**५. कुमारी बेला मुकर्जी :**

लीगच्या अधिकारी म्हणून बेलाताईंचा कॅ. लक्ष्मी व नेताजी बरोबर निकटचा संबंध आला होता. आझाद हिंद सेनेत महत्त्वाची भूमिका त्यांनी बजावली. युद्धावरून आलेल्या घायाळ सैनिकांची सेवा करण्याकरीता प्रशिक्षिण परिचारिका कमी पडत असत. त्या वेळी सामान्य स्त्रियांना ते काम करावे लागत असे.

**७. ले. प्रतिमा सेन :**

या ब्रह्मदेशाच्या होत्या. वयाच्या २१व्या वर्षी रेजिमेंटमध्ये भरती झाल्या. त्यांनी पलटणीत भरती करण्यासाठी अनेक मुली मिळविल्या होत्या.

राणी झाशी रेजिमेंटमध्ये केरळाच्या डी. कल्याणी अम्मा, पी नारायणी कुट्टी (पोडुवल), रमा मेहता (खांडवाला) अशा अनेक महिलांनी या रेजिमेंटमध्ये महत्त्वाची कामगिरी केली.

स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग सुरू झाला. विचारांची देवाण-घेवाण वाढत गेली, शिक्षणाचा प्रसार झाला. दळणवळणाची साधने वाढली, प्रसार माध्यमांचा उदय झाला. आधुनिक मुल्ये रूजु लागलीत राज्यघटनेत संवैधानिक प्रयत्न सुरू झाले. स्त्रीने जीवनात केलेल्या महत्वाच्या कार्यामुळे मोठ्या प्रमाणावर परिवर्तन सुरू झाले. ही नवविचारांच्या मुल्यांची देणगी समजली जाते.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. आझाद हिंद फौजेतील महिला या कार्याचा थोडक्यात खुलासा करा.

## १३.९ सरावासाठी प्रश्न

१. अस्पृशता नाहीशी करण्यासाठी  समाज सुधारकांनी केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

२. म. फुले द्रष्टे समाज सुधारक होते. स्पष्ट करा.

३. म. गांधींनी अस्पृश्योद्धारासाठी केलेली कामगिरी स्पष्ट करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी केलेल्या चळवळीची माहिती लिहा.

## १३.१० अधिक अध्ययनासाठीची पुस्तके


१. शं. वा. जावडेकर - आधुनिक भारत

२. धनंजय कीर - म. जोतिबा फुले यांचे चरित्र

३. डॉ. सरोजीनी बाबर - स्त्री शिक्षणाची वाटचाल

४. कुमार केतकर - कथा स्वातंत्र्याची

५. ग. प्र. प्रधान - स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत

६. Tara Chand, History of the freedom moment in India Vols 1-4

७. Ali Aruna Asaf, The Resurgence of Indian women

८. प्रा. डॉ. सौ. सरल धाराण्कर - आधुनिक भारतातील स्त्री जीवन

९. डॉ. मु. ब. शहा व डॉ. रामकृष्ण मेटकर - सामाजिक पुनर्बांधणीची दिशा

१०. डॉ. जयसिंगराव पवार व प्रा. मंजुश्री पवार - आधुनिक भारताचा इतिहास

११. प्राचार्य य. ना. कदम - समग्र भारताचा इतिहास


❖❖❖❖

# १४

# ''भारतीय कामगार संघटना आणि भारतातील डावी चळवळ''

**अनुक्रमणिका**

१४.० उद्दिष्टे

१४.१ प्रास्ताविक

१४.२ सारांश :

११.३ सरावासाठी स्वाध्याय :

१४. ४ भारतातील डावी चळवळ (Left Movements in India)

## १४.० उद्दिष्टे

आधुनिक भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासातील कामगार संघटना आणि डाव्या चळवळीचा विचार आपण या घटकात करणार आहोत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीच्या समग्र अभ्यास करीत असताना नवीन शक्ता या उदयाचा परमार्श घेताना कामगार संघटने बरोबरच भारतातील डाव्या चळवळीचा ही आढावा घेणे आवश्यक आहे. या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१. डावे म्हणजे काय व उजवे म्हणजे काय शब्दांची ओळख होते.
२. भारतात डाव्या विचारसरणीचा उदय व कारणाचा परमार्श घेता येतो.
३. भारतात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील झालेल्या कामगाराच्या उठावाविषयी माहिती मिळते.
४. दुसरे महायुद्ध आणि भारतातील कम्युनिस्टचे धोरण जाणून घेता येते.
५. भारतातील कष्टकरी वर्गामध्ये नव्या जाणिवा कशा जागृत झाल्या हे स्पष्ट करता येते.
६. कामगार - चळवळीची उदय प्रक्रिया व परिणाम विशाद करता येतात.
७. भारतातील कामगार संघटनाच्या (चळवळी) स्थापनेच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करता येतो.
८. कामगार संघटना विषयी सुरूवातीच्या राष्ट्रवाद्यांचा दृष्टिकोन समजून घेता येतो.
९. राष्ट्रीय चळवळीशी कामगार संघटनाचा संबंध अभ्यास करता येतो.
१०. कामगार संघटनावरील राजकीय परिस्थितीचा परिणाम समजून घेता येतो.
११. कामगार चळवळीचा सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील सहभागाचा अभ्यास करता येतो.
१२. कामगार चळवळीना काँग्रेसची कशी चालना मिळाली हे समजून घेता येतो.
१३. चलेजाव चळवळीतील (छोडो भारत आंदोलन) कामगारांच्या सहभागाचा अभ्यास करता येईल.

## १४.१ प्रास्ताविक

आधुनिक भारतामध्ये प्रथम उच्चभ्रू बुद्धिजीवी वर्गामध्ये जागृती सुरू झाली. कष्टकरी वर्गापर्यंत ही जागृती झिरपायला काही काळ जावा लागला. पण एकदा कष्टकऱ्यांमध्ये नव्या जाणिवा जागृत झाल्यावर भारताच्या राष्ट्रीय चळवळीला नवे व अर्थपूर्ण परिमाण प्राप्त झाले. अभिजन वर्गापुरती मर्यादित राष्ट्रीय चळवळ बहुजन समाजापर्यंत पोहोचली. तेव्हा तिला जोम प्राप्त झाला. काळाच्या ओघात राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीला कष्टकऱ्यांच्या समस्यांची दखल घ्यावी लागली. मात्र ही दखल पुरेशी नसल्याने कष्टकऱ्यांच्या चळवळी स्वातंत्र्य आंदोलनाशी पूर्णपणे एकजीव झाल्या नाहीत. कष्टकऱ्यांच्या चळवळींनी स्वातंत्र्य आंदोलनाशी नाते जोडले; पण गरजेनुसार आपले स्वतंत्र अस्तित्वही कायम राखले. 'समाजवाद' हे कष्टकऱ्यांच्या हक्कांचा पुरस्कार करणारे तत्वज्ञाान आहे. भारताच्या आधुनिकतेला आकार देणाऱ्या घटकांपैकी समाजवादाचा उदय हा एक महत्वपूर्ण घटक होता. भारताच्या राष्ट्रीय जागृतीने हे जे जनताभिमुख वळण घेतले त्याचा अभ्यास आपण आता करणार आहोत.

**विषय विवेचन :**

भारतात कामगार चळवळीचा इतिहास साधारणतः कारखान्यांच्या स्थापने पासून सुरू होतो. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आधुनिक उद्योग उभे राहू लागले होते. त्यात रेल्वे, टपाल, तार यासारख्या सेवा-सुविधांचे जाळे विणले जाऊ लागले होते. त्याचबरोबर आधुनिक कामगार वर्गही उदयास येऊ लागला होता. भारतीय राष्ट्रीय आंदोलन आणि भारत एक राष्ट्र म्हणून उभे राहण्याची प्रक्रिया आणि भारतातील कामगार चळवळीचा विकास या बाबी एकमेकांशी इतक्या निगडीत आहेत की भारतातील कामगार वर्गाचा उदय आणि विकास याचा परामर्श घेतल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासाचा अभ्यास पूर्णच होऊ शकत नाही. १९व्या शतकाच्या शेवटी भारतीय राष्ट्रवादी बुद्धिजीवीचा कामगार वर्गाच्या चळवळीशी संबंध येण्या अगोदरच मुंबई. कलकत्ता, सुरत, चेन्नई, कोइमतूर इत्यादी शहरातील सुती कापड गिरण्यातील कामगारांनी रेल्वे व मळ्यातील कामगारांनी संपासह अनेक आंदोलने केली होती. तथापि बहुतेक सर्व आंदोलने तुरळक, उत्स्फूर्त व असंघटित स्वरूपाची आणि आर्थिक प्रश्नांवर आधारित होती. त्यांना कसलाही व्यापक राजकीय पाया नव्हता.

सन १८५४ मध्ये मुंबई येथे पहिली कापडगिरणी व १८५५ मध्ये बंगालमध्ये तागाची गिरणी सुरू झाली. यानंतर पुढील ५० वर्षात भारताच्या विविध भागात कापड, ज्यूट, व कोळसा इ. उद्योग सुरू होऊन त्यात हजारो मजूर काम करू लागले. त्याचबरोबर मजूरविषयक प्रश्नही निर्माण झाले. परंतु उद्योगपती कारखानदार किंवा मील मालक यापैकी कोणीही त्याकडे लक्ष दिले नाही. सरकारही ह्या प्रश्नासंबंधी काही हालचाल करीत नव्हते.

### १) कामगार वर्गाची परिस्थिती सुधारण्यासाठीचे काही तुरळक प्रयत्न :

१९व्या शतकात इ.स. १८५४ मध्ये मुंबई येथे जरी कापडगिरणी सुरू झाली असली तरी त्याच्यापूर्वी चहा व निळच्या मळ्यात मजूर वर्ग राबत होता. इंग्लंड प्रमाणेच भारतातही कमी मजुरी, भरपूर काम, बालमजूर इत्यादी समस्या निर्माण झाल्या होत्या त्यामुळे मजुरांच्या समस्या सोडविण्याची आवश्यकता वाटू लागली बंगालमध्ये शशिपार बॅनर्जी या ब्राह्मो

समाजातील सुधारकाने इ.स. १८७० मध्ये एक 'कामगार मंडळ' स्थापन करून ''भारत श्रमजीवी'' हे मासिक कामगारांना शिक्षण देण्याच्या हेतूने सुरू केले.

भारतीय मजुरांच्या स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून भारतीय मजुरांनी नव्हे तर लॅकेशायरच्या कापड गिरणी मालकांनी इंग्लंडमध्ये सर्वप्रथम मागणी केली होती. इंग्लंडमधील कारखानदारांना भारतीय मजुरांबद्दल एवढा पुळका वाटण्याचे कारण म्हणजे भारतातील भांडवलदारांनी भारतीय मजुरांकडून कमी मोबदल्यात काम करून घेतल्यामुळे त्यांच्या उत्पादनात निश्चितच वाढ होऊन भारतीय कापड उद्योग लँकेशायरच्या कापड उद्योगाला प्रतिस्पर्धी ठरू शकला असता.

वरील कारणामुळे भारतीय मजुरांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक आयोग स्थापन करावा अशी त्यांनी मागणी केली होती. त्याप्रमाणे १८७५ मध्ये एका आयोगाची स्थापना करण्यात आली ही होती.

इ.स. १८७८ मध्ये मुंबई कायदे मंडळात कामगारांच्या कामाचे तास कमी करण्यात यावेत यासंबंधी शोराबजी शापूरजी बंगाली यांनी ठराव मांडण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. मुंबईमध्ये नारायण मेघाची लोखंडे यांनी इ.स.१८८० मध्ये ''दीनबंधु'' या इंग्रजी-मराठी साप्ताहिकाचे प्रकाशन सुरू केले. तर इ.स. १८८१ मध्ये लॉर्ड रिपनच्या काळात पहिला फॅक्टरी ॲक्ट पास करण्यात आला. या कायद्याने (१) सात वर्षाच्या खालील मुलांना कारखान्यामध्ये काम करण्यास बंदी घातली. (२) ७ ते १२ वर्षे वयोगटातील कामगारांना (मुलांना) ९ तासापर्यंतचे काम द्यावे. (३) कामगारांना महिन्यातून चार दिवस सुट्ट्या देण्यात याव्यात. (४) कामाच्या दिवशी मध्ये एक तास विश्रांतीसाठी सुट देण्यात यावी. (५) कारखान्यांच्या पहाणीसाठी इन्स्पेक्टर्स नेमण्यात यावेत. या काचाट्यातून चहा कॉफी; नीळ उत्पादकांना वगळण्यात आले होते.

इ.स. १८८४ मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबई येथे कामगारांची जाहीर सभा घेतली त्यांनी कामगारांच्या वतीने त्याच्या मागण्या सादर करणारा जाहिरनामा फॅक्टरी कमिशनला सादर केला. आणि १८९० मध्ये त्यांनी ''बॉम्बे मिल अँड मिलहॅण्डस् असोसिएशन'' ही संघटना स्थापन केली. ते ''मुंबई मिल असोसिएशन''चे अध्यक्ष होते. तथापि ती कामगार संघटना नव्हती. कारण संघटनेसंबंधीचे नियम त्यांच्या संघटनेत नव्हते तथापि श्री. लोखंडे यांना कामगार कल्याणाविषयी अतिशय कळकळ होती. त्यांच्यामुळेच कामगार वर्गात जागृती झाली होती. त्यांचे हे सारे प्रयत्न लोकहिताच्या स्वरूपाचे होते. त्यास संघटित कामगार चळवळीचा प्रारंभ म्हणता येणार नाही. खरे तर, राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहाने या वेळेपर्यंत कामगारांच्या प्रश्नांकडे पुरेसे लक्ष दिले नव्हते.

## २) सुरुवातीच्या राष्ट्रवाद्यांचा दृष्टिकोन

सुरूवातीच्या राष्ट्रवाद्यांचा कामगारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अगदीच मवाळ होता. साम्राज्यवादाच्या विरोधातील चळवळ त्यावेळी अगदीच बाल्यावस्थेत होती. अशा वेळी भारतीय जनतेमध्ये कोणत्याही कारणास्तव फूट पडून ब्रिटिश राजवटीविरूद्धचा लढा कमजोर पडू देण्याची तत्कालीन राष्ट्रवादी मंडळींची इच्छा नव्हती. ''ज्या प्रश्नात समग्र राष्ट्र सहभागी होऊ शकेल. अशा प्रश्नावरच राष्ट्रीय काँग्रेसने आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे.'' असे स्पष्ट

प्रतिपादन १८८६ मधील राष्ट्रीय कॉंग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनात दादाभाई नौरोजी यांनी केले होते. पुढील काळात राष्ट्रीय चळवळ जसजशी प्रबळ होऊ लागली तसतशी राष्ट्रवाद्यांमधील कामगारांविषयी अधिक सहानुभूती बाळगणारे गट पुढे येऊ लागले साहजिकच राष्ट्रीय कॉंग्रेस कामगारवर्गास अधिकाधिक अनुकूल बनत गेली. कामगारांना संघटित करून त्यांची शक्ती वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले जे अनेक वर्ग वा गट एकत्र येऊन साम्राज्यवादाविरूद्ध संघर्ष करीत होते. त्यांच्यात कामगारवर्ग अधिक प्रबळ कसा होईल. याकडे लक्ष दिले गेले होते.

तथापि या टप्प्यावर राष्ट्रवाद्यांची एतदेशीय मालकांच्या विरोधात कामगार वर्गाचे प्रश्न हाती घेण्याची तयारी नव्हती. खरेतर, बहुतेक सर्व राष्ट्रवादी वृत्तपत्रांनी कामगारांच्या कामाची परिस्थिती नियमित करण्यासाठी सरकारी कायद्याची गरज नसल्याचे प्रतिपादन केले होते. या काळात भारतीयांच्या मालकीच्या कापडगिरण्यांतील कामगारांच्या संपांना सामान्यतः पाठिंबा देण्यात येत नसे. कारण साम्राज्यवादाच्या विरोधात संघर्ष करणाऱ्यामध्येच फूट पडू नये, अशी त्यामागे राष्ट्रवाद्यांची भूमिका होती.

तत्कालीन राष्ट्रवादी नेत्यांनी केवळ कामगार कायद्यांनाच विरोध केला होता. असे नव्हे तर भारतातील दारिद्र्य आणि मागासलेपण दूर करण्यासाठी औद्योगिकीकरण हाच एकमेव उपाय असल्याचे त्यांचे मत होते. या प्रक्रियेत अडथळा आणणारा कोणताही प्रस्ताव उचलून धरण्याची त्यांची तयारी नव्हती. अर्थात त्या वेळेसही गोपाळ गणेश आगरकर यांच्या प्रभावाखाली असलेल्या ‘सुधारक’ या राष्ट्रवादी वृत्तपत्राने कामगारांच्या मागण्यांस पाठिंबा दिला होता. आणि गिरणीमालकांनी त्यांना सवलती द्याव्यात, अशी मागणी केली होती. तथापि तत्कालीन राष्ट्रवादी आंदोलकांमध्ये अशा प्रवृत्तीचे दर्शन अभावानेच घडते. ब्रिटिशांच्या मालकीच्या कारखान्यातील भारतीय कामगारांचा प्रश्न उभा राहताच वातावरणात आमूलाग्र बदल होत असे. या ठिकाणी कामगारांना पूर्ण पाठिंबा देण्यात राष्ट्रवाद्यांना कोणतीच अडचण वाटत नव्हती. कारण येथे मालक व कामगार एकाच राष्ट्राचे अविभाज्य घटक नव्हते, अशा स्वरूपाचे मत १८९१ मधील वार्षिक राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष पी. आनंद चार्लु यांनी व्यक्त केले होते.

### ३) मळे कामगारांना राष्ट्रवाद्यांचा पाठिंबा :

आसामधील चहाच्या मळ्यातील कामगारांवर जवळपास गुलामगिरीचे जिणे लादण्यात आले होते. कामावरून पळून जाणाऱ्या कामगारांना अटक करून शिक्षा देण्याचा कायदेशीर अधिकार युरोपिय मळेवाल्यांना देण्यात आला होता. त्याविरूद्ध भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रीय वृत्तपत्रांनी एक मोहिम आरंभली होती. वसाहतवादी राजवटीच्या मदतीने परकीय भांडवलदारांनी चालविलेल्या कामगारांच्या अमर्याद शोषणाचा निषेध करण्यासाठी राष्ट्रीय अस्मितेला फुंकर घालण्यात व प्रतिष्ठेला आवाहन करण्यात आले होते.

### ४) ब्रिटिश मालकीच्या रेल्वे कंपनीत संप :

ब्रिटिश मालकीच्या आणि व्यवस्थापनाखालील एका रेल्वे कंपनीत कामगारांच्या एका गटाने केलेला संप हा योगायोग नसावा. मे १८९९ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनसुलर रेल्वेतील सिग्नल कामगारांनी आपले वेतन, कामाचे तास आणि सेवाशर्ती या मागण्यासाठी त्यांनी संप केला त्यावेळेस बहुतेक सर्व राष्ट्रवादी वृत्तपत्रांनी या संपाला पाठिंबा दिला. ‘केसरी’ व

'मराठा' या टिळकांच्या वृत्तपत्रांनी त्यासाठी प्रदीर्घ मोहीम चालविली होती. फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा व बनर्जी या प्रतिष्ठित राष्ट्रीय नेत्यांनी मुंबई व बंगाल प्रांतांत सार्वजनिक सभा आयोजित करून संपकरी कामगारांसाठी निधी उभा केला. वरील प्रकरणांमधील शोषक परकीय होते एवढे कारण त्यांच्या विरोधातील आंदोलनाला राष्ट्रीय प्रश्नांचे स्वरूप देण्यासाठी आणि राष्ट्रीय चळवळीचा एक अविभाज्य भाग बनविण्यासाठी पुरेसे होते.

**५) कामगार वर्गाचा विस्तार व कामगार चळवळीस गती :**

१९व्या शतकाच्या शेवटी कामगार वर्गाचा विस्तार होत गेला. त्यावेळी राष्ट्रवादी बुद्धिजीवी वर्गात एक नवी प्रवृत्ती पुढे आली. बिपिनचंद्र पाल व जी. सुब्रमण्यम अय्यर यांच्यासारखे नेते प्रबल भांडवलदारांपासून कमजोर कामगारांचे रक्षण करण्यासाठी कायद्यांची आवश्यकता असल्याचा युक्तिवाद करू लागले. १९०३ मध्ये जी सुब्रमण्यम अय्यर यांनी कामगारांना आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी कामगार - संघटना स्थापन करण्यास सांगितले जनतेने या कामी त्यांना मदत केली पाहिजे असेही त्यांचे मत होते त्यासाठी त्याच्या विस्तारासाठी प्रयत्न केले पाहिजेत म्हणून त्यासाठी कामगार चळवळीस गती देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले.

इ.स. १९०३-०८ या काळातील 'स्वदेशी चळवळ' हा कामगार चळवळीच्या इतिहासातील एक प्रमुख टप्पा होता. 'व्यावसायिक आंदोलक आणि औद्योगिक संपातील 'संघटनेचे सामर्थ्य' ही त्या काळातील दोन वैशिष्ट्ये होती.' हे दोन्ही घटक एकत्र आल्याने अनेक वेळा संप केले जात असत. स्थायी कामगार संघटनांची स्थापना करणे, संप चालविणे, कामगारांना कायद्याची मदत मिळवून देणे आणि कामगारांसाठी निधी उभा करणे यासारखा कार्यात स्वदेशी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी स्वतःस उत्साहाने झोकून दिले होते. बिपिनचंद्र पाल, चित्तरंजन दास, लियाकन हुसेन आदी राष्ट्रीय नेत्यांनी सार्वजनिक सभातून संपकरी कामगारांना पाठिंबा देणारी भाषणे केली. अश्विनीकुमार बॅनर्जी, प्रभात कुमार रॉय चौधरी, प्रेमतोष बोस आणि अपूर्वकुमार घोष या स्वदेशी चळवळीच्या प्रमुख नेत्यांनी स्वतःस कामगारांच्या लढ्यांना वाहून घेतले. सरकारी छापखान्यातील रेल्वे व ताग उद्योगांतील कामगारांचे संघटन करणे आणि या संघटनांना जनतेचा व्यापक पाठिंबा मिळविणे या संदर्भात त्यांनी केलेले कार्य व त्यास मिळालेले यश विशेष महत्त्वाचे आहे मानले जाते.

संपकरी कामगारांना पाठिंबा देण्यासाठी कोलकत्त्याच्या रस्त्यांतून वारंवार मिरवणूका काढण्यात येत होत्या. मिरवणूकीत सामील होणाऱ्या लोकांना अल्पोपाहार दिला जाई. अखिल भारतीय पातळीवरील कामगार संघटना स्थापन करण्याचे प्रयत्न याच काळात झाले असले तरी ते यशस्वी झाले नाहीत. स्वदेशीच्या काळात कामगार चळवळीचे लक्ष फक्त आर्थिक प्रश्नांवरून केलेली आंदोलने आणि चळवळी यांवरून त्या काळच्या अधिक व्यापक प्रश्नांकडे वळले होते. आतापर्यंत कामगार चळवळ आर्थिक प्रश्नांवर तुलनात्मकदृष्ट्या असंघटित स्वरूपाचे व उत्सफूर्त संप करीत असत. ती आता राष्ट्रवाद्यांच्या पाठिंब्याने आर्थिक प्रश्नांवर संघटित संप करू लागली. पुढील काळात कामगार वर्ग अधिक व्यापक राजकीय चळवळीत सहभागी झाला होता.

१६ ऑक्टोबर १९०५ रोजी बंगालची फाळणी अमलात आल्यावर त्याचदिवशी राष्ट्रीय पातळीवर त्याचे पडसाद उठले ते तीव्र आंदोलनाच्या स्वरूपात. त्यामध्ये बंगाल प्रांतातील

कामगारांचा संप व हरताळ यांच्यात समावेश होता. तागाच्या गिरण्या व कारखान्यातील कामगार व रेल्वेतील हमाल असे सर्वजण या हरताळात सहभागी झाले होते. तमिळनाडूमधील तुतीकोरीन येथील परकीय मालकीच्या कापडगिरणीत १९०८ च्या फेब्रुवारी - मार्च मध्ये सुब्रमनीय शिवा यांनी एक संप घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. सुब्रमनीय शिवा व स्वदेशी चळवळीचे प्रख्यात नेते चिदंबरम् पिलाई यांना अटक झाली. तेव्हाही तुतीकोरीन व तिरूनेवेल्ळी येथे व्यापक प्रमाणावर संप व दंगे झाले. १९०७ मध्ये पंजाब मधील चळवळीने उचल खाल्ली चळवळीचा एक भाग म्हणून रावळपिंडी येथील शस्त्रागारातील व रेल्वे अभियांत्रिकी कामगारांनी संप केले. त्यानंतर लाला लजपतराय व अजित सिंग यांना हदपार करण्यात आले टिळकांवर भरण्यात आलेला खटला आणि नंतर त्यांना झालेल्या शिक्षेच्या वेळी कामगारांनी केलेली निदर्शने या काळातील सर्वात मोठे निदर्शने होते.

### ६) कामगार वर्ग आणि राष्ट्रीय चळवळ :

इ.स.१९०८ नंतर राष्ट्रीय चळवळ काहीशी मंदावली होती. त्याच वेळेस कामगार चळवळही संथ झाली होती. परंतु पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात राष्ट्रीय चळवळीने परत उचल खाल्ली तेव्हा कामगार चळवळीने देखील आपली पूर्वीची शान परत मिळविली. १९१६ मधील होमरूल लीग चळवळ ते १९१९ मधील रौलट सत्याग्रह आणि नंतर १९२०-२२ मधील असहकाराची चळवळ व खिलाफत चळवळ या काळात राष्ट्रीय चळवळ सतत प्रबळ होत गेली. कामगारवर्गाच्या हालचालींनाही या काळात पुन्हा गती प्राप्त झाली. कामगार वर्गाने आपल्या वर्गीय हक्काचे रक्षण करण्यासाठी एक अखिल भारतीय संघटना उभी केली. याच काळात कामगारवर्ग राष्ट्रीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहात मोठ्या प्रमाणात सहभागी झाला.

### ७) ''आयटकची स्थापना'' :

'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस'ची (आयटक) स्थापना ही १९२० मधील सर्वाधिक महत्त्वाची घटना होती. इ.स.१९१८ मध्ये भारतात ''मद्रास लेबर युनियन'' स्थापना झाली व येथूनच ट्रेड युनियन्सला प्रारंभ झाला. ही ट्रेड युनियन ॲनी बेझंटचे सहकारी बी.पी.वाडिया यांनी सुरू केली होती. या संघटनेद्वारे देशात प्रथमच औद्योगिक क्षेत्रात मोठ्या संघटना तयार करण्याचा प्रयत्न झाला. ''आतंरराष्ट्रीय मजूर संघटनेपासून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय नेत्यांनी राष्ट्रीय स्तरावर मजूरांची संघटना उभी करण्याचा निर्णय घेतला व ३१ ऑक्टो. १९२० रोजी 'All India Trade Union Congress (AITUC)'ची स्थापना करण्यात आली. आयटकचे पहिले अध्यक्षपद लाला लजपतराय यांना देण्यात आले. तर श्री. जोसेफ बाप्टिस्टा हे उपध्याक्ष आणि दिवाण 'चमनलाल' हे पहिले चिटणीस बनले होते. आयटकच्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना लालालजपतराय म्हणाले होते की, ''भारतीय कामगारांनी अधिक वेळ न दवडता राष्ट्रीय पातळीवर संघटित झाले पाहिजे.''

आयटकच्या दुसऱ्या अधिवेशनात दिवाण चमनलाल यांनी स्वराज्यविषयक ठराव मांडला. त्यावेळी ते म्हणाले, ''भांडवलदारांसाठी नव्हे तर कामगारांसाठी स्वराज्य असले पाहिजे.'' लाल लजपतराय यांच्याशिवाय त्याकाळचे अनेक प्रख्यात नेते आयटकशी संबंधित होते. चितरंजन दास आयटकच्या तिसऱ्या व चवथ्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. सी.ए.अँड्र्यूज, जे. एम. सेनगुप्ता, सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू, आणि सत्यमूर्ती हे कामगार चळवळीशी संबंधित असलेले अन्य नेते होत. १९२२ मधील गया येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात आयटकच्या स्थापनेचे स्वागत केले आणि तिच्या कामात मदत करण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रतिष्ठित सभासदांची एक समिती नियुक्त करण्यात आली

होती. १९२६च्या अधिवेशनाच्या अध्यक्ष श्री. व्ही. व्ही. गिरी होते त्यांनी आपल्या भाषणात मजुरांच्या नैतिकतेवर भर दिला. याशिवाय सरोजिनी नायडू, पंडित जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र बोस इत्यादीनी संघटनेचे अध्यक्षपद भूषविले. १९२७ पर्यंत आयटकची सदस्य संख्या १,५०,५५५ एवढी झाली होती. तर सुमारे ५७ कामगार संघटना तिच्याशी संलग्नित झाल्या होत्या या संघटनेवर इंग्लंड येथील मजूर पक्षाच्या विचारांचा प्रभाव होता. असे असले तरी ह्या संघटनेवर नारायण मल्हार जोशी सारख्या मवाळ नेत्यांचा विशेष प्रभाव होता. त्याचबरोबर महात्मा गांधीजींच्या अहिंसा तत्वज्ञानाचा पगडाही या संघटनेवर होता.

### ८) कामगारांची बदलत्या राजकीय परिस्थितीस प्रतिसाद :

पहिले महायुद्ध संपले त्यावेळी रशियात साम्यवादी क्रांती झाली होती. त्याचा प्रभाव भारतावरही पडला. महायुद्धकाळात वस्तूंचे भाव दुपटीने वाढले असले तरी मालकवर्गाने कामगारांच्या वेतनात मात्र काहीच वाढ केली नव्हती. भांडवलदार वर्ग श्रीमंत बनत गेला तर कामगार गरीब. कामगारांच्या हलाखीच्या काळातच भारतीय राजकारणात महात्मा गांधींना प्रवेश झाला. गांधीजींनी कामगार व शेतकरी वर्गाला आपल्या चळवळीत सामील करून घेतले. १९१८ मध्ये पाहिले महायुद्ध संपल्यावर राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. राष्ट्रसंघाची एक शाखा म्हणून ''आंतरराष्ट्रीय मजूर संघटना'' (International Labour organization) (ILO) निर्माण झाली. त्याबरोबरच मजूर वर्गाला आपल्या मागण्या सादर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले. या बदललेल्या राजकीय परिस्थितीला कामगारांनी उत्तम प्रतिसाद दिला होता. १९२० मध्ये एकूण १२५ कामगार संघटना देशात कार्यरत होत्या. त्यांची सभासद संख्या २,५०,००० एवढी होती. राष्ट्राच्या प्रमुख राजकीय घडामोडीतील कामगारांचा सहभाग लक्षणीय होता. पंजाब मधील दडपशाही व गांधीजींची अटक यांच्या परिणाम म्हणून अहमदाबादमधील व गुजरातच्या अन्य भागातील कामगारांनी संप, आंदोलने व निदर्शने केली. नोव्हेंबर १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स या ब्रिटिश राजपुत्राच्या भेटीवर बहिष्कार टाकण्याच्या आवाहनाला देशभरातील कामगारांनी संप करून प्रतिसाद दिला. मुंबईमध्ये १,४०,००० कामगारांनी हरताळ केला होता.

### ९) ट्रेड युनियन - एक नवे नेतृत्व :

१९२८ पर्यंत कामगार वर्गात अभूतपूर्व राजकीय जागृती झाली होती. कामगार किसान वर्गात राष्ट्रीय भावना निर्माण झाल्यामुळे इंग्रजाच्या दडपशाही विरूद्ध सशस्त्र लढा देण्यासाठी हा वर्ग पुढे आला. ट्रेड युनियन चळवळीत लढाऊपणा दिसून येऊ लागला. आर्थिक व राजकीय क्षेत्रात देशाची शक्ती म्हणून कामगार वर्गाकडे पाहण्यात येऊ लागले. या सर्वांमध्ये मुंबई गिरणी कामगार युनियन (लालबावटा) आघाडीवर होती. तिची संख्या १९२९ मध्ये ६५००० झाली. १९२९ मध्ये जुन्या सुधारणावादी युनियन नेत्यांना बाजूला सारून नवे नेतृत्व पुढे येऊ लागले त्याचा परिणाम ब्रिटिश सरकारवर नक्कीच झाला. जानेवारी १९२९ मध्ये लेजिस्लेटिव्ह असेंब्ली समोर भाषण करताना लॉर्ड आयर्विन म्हणाले होते की, कम्युनिस्ट विचार सरणीच्या प्रचारामुळे आम्हाला खूपच चिंता वाटते आणि ती विचारसरणी अडविण्याचा उपाय सरकार योजिल्याशिवाय राहणार नाही.

### १०) मीरज खटला :

आयर्विन सरकारने कामगार चळवळीतील काही प्रमुख ३२ नेत्यांना मार्च १९२९ मध्ये पकडले त्यांच्यावर खटला भरण्यासाठी त्यांना मीरज येथे आणण्यात आले. भारतातील सर्व औद्योगिक केंद्रापासून दूर असलेल्या मीरज येथे कामगार नेत्यांना आणण्यात आले होते. या

आरोपीमध्ये ३ आरोपी इंग्रज होते तेही कोर्टाच्या पिंजऱ्यात उभे राहिले. हा खटला ३१/२ वर्षे चालला. या खटल्याने संपूर्ण जग हादरले. आईन्स्टाईन, एच.जी. वेल्स, अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलीन डी रूझवेल्ट, रोमारोलाँ, हेरॉल्ड लस्की इत्यादींनी सरकारवर टिका केली. खटल्यातील आरोपींचा बचाव करण्यासाठी डावे उजवे दोन्ही गटांनी अटोकाट प्रयत्न केले. जानेवारी १९३३ मध्ये या खटल्याचा निकाल देण्यात आला. मजुफ्फर अहमद यांना काळे पाण्याची शिक्षा ठोठविण्यात आली. १२ वर्षासाठी काळ्यापाण्याची शिक्षा पुढील व्यक्तींना ठोठावण्यात आली. डांगे, घाटे, जोगळेकर, निबंळकर तर १० वर्षाची काळच्या पाण्याची शिक्षा पुढील व्यक्तींना ठोठावण्यात आली होती. ब्रॅडले, मिरजकर, उस्मानी. ब्रिटिश कामगार चळवळीच्या इतिहासात १०० वर्षापूर्वी डोरचेस्टरच्या कामगारांच्या खटल्याचे जे महत्त्व होते तेच महत्त्व वाढती भारतीय कामगार चळवळ रोखण्यासाठी मिरज खटल्याचे आहे समजले जाते. मिरज येथे खटला भरण्यासाठी आणण्यात आलेल्या नेत्यांची नावे : (१) एस.ए.डांगे (२) किशोरीलाल घोष (३) डी. आर. ठेंगडी (४) एस. व्ही. घाटे (५) के. एन. जोगळेकर (६) एस. एच. झाबवाला (७) शौकत उस्मानी (८) मुजफ्फर अहमद (९) फिलिफस्प्रेट (१०) बी. एफ. बॅडले (११) लक्ष्मणराव कदम (१२) एस. डी. मिरजकर (१३) पी. सी. जोशी (१४) ए. ए. आळवे (१५) जी. आर. कासले (१६) गोपाळ बसक (१७) धर्मवीर सिंह (१८) जी. एम. अधिकारी (१९) एम. ए. मजीद (२०) आर. एस. निबंळकर (२१) विश्वनाथ मुकर्जी (२२) केदारनाथ सहगल (२३) राधारमण मैत्र (२४) धरनी गोस्वामी (२५) गौरीशंकर (२६) शिवनाथ बॅनर्जी (२७) शत्रसुल हुदा (२८) गोपेन्द्र चक्रवर्ती (२९) सोहनसिंह जोश (३०) एम. जी. देसाई (३१) अयोध्या प्रसाद (३२) लेस्टर हर्चिसन ही होती.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. आयटकच्या कार्याची चर्चा करा.

---

---

---

---

---

**११) सविनय कायदेभंग व कामगार चळवळ :**

महात्मा गांधीजीच्या नेतृत्वात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यात आली या काळात कामगार व शेतकरी हे काँग्रेसचे हात आणि पाय आहेत अशा घोषणा दिल्या जात होत्या. ४ फेब्रुवारी १९३० रोजी जी. आय. पी. रेल्वेच्या २०,००० कामगारांनी हरताळ केला. ६ एप्रिल रोजी जी. आय. जी. रेल्वेच्या कामगार संघटनेने एक नव्या प्रकारचा सत्याग्रह केला आयटकचे विभाजन होऊन कम्युनिष्ट बाहेर पडले असे असले तरी देशभरातील कामगार सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाले. सोलापूरचे गिरणी कामगार, कराचीतील गोदी कामगार. कोलकत्यातील वाहतुक व गिरणी कामगार आणि चेन्नई मधील गिरणी कामगारांनी सरकारशी मोठी झुंज दिली. कामगारांनी संप केला. तेव्हा पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अटकसत्र सुरू केले. या अटकसत्राच्या निषेधार्थ अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीने ६ जुलै हा दिवस 'गांधीदिन' म्हणून पाळण्याचे ठरविले. ४९ कारखान्यातील कामगारांनी काम बंद केले. ५०,००० कामगारांनी त्या दिवशी हरताळ पाळला होता. १९३१-

३६ या काळात कामगार चळवळ मंदावली १९३७-३९ या काळात प्रांतिक स्वायत्ततेबरोबरच प्रांतामध्ये लोकनियुक्त कायदेमंडळे अधिकारावर आली त्याबरोबरच कामगार वर्गाच्या हालचालीनाही जोर आला. दरम्यानच्या काळात कम्युनिस्टांनी आपल्या आत्मघातकी पक्षाभिमानी धोरणाचा त्याग केला आणि इ.स. १९३४ मध्ये ते पुनश्च राष्ट्रीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले.

**१२) कामगार - किसान पक्षात कम्युनिस्ट एकत्र :**

इ.स. १९२५ नंतर डाव्या विचार प्रणालीचे विविध प्रवाह एकत्र आले. त्यांचा राष्ट्रीय चळवळीवर लक्षणीय प्रभाव पडू लागला. १९२७च्या सुरूवातीला भारताच्या विविध भागातील कम्युनिस्ट गट कामगार किसान पक्षात (वर्कर्स अँड पिझंटस् पार्टी (W.P.P.) एकत्र आले. श्रीपाद अमृत डांगे, मुझफ्फर अहमद, पी. सी. जोशी, सोहनसिंग जोश इत्यादींचा या पक्षाच्या नेत्यांमध्ये समावेश होता. कामगार - किसान पक्ष राष्ट्रीय काँग्रेस मधील डावागट म्हणून राष्ट्रीय व प्रांतिक पातळीवर अधिकाधिक शाक्तिमान होत गेला.

कामगार - किसान पक्षाच्या व्यापक आघाडीत डाव्या गटाखाली कार्यरत असलेल्या कम्युनिस्टांनी १९२८ पर्यंत कामगार संघटनात चांगलाच जम बसविला. एप्रिल - सप्टेंबर १९२८ या काळात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील गिरणी कामगार युनियनने (GKU) मुंबईत घडवून आणलेल्या गिरणी कामगारांचा सहा महिन्यांना प्रदीर्घ संप कामगार चळवळीच्या इतिहासात महत्त्वपूर्ण गणला जातो. या संपानंतर गिरणी कामगार युनियन झपाट्याने पुढे आली व तिने कामगार चळवळीत अग्रस्थान मिळविले. १९२८ पर्यंत तिच्या सभासदांची संख्या ३२४ वरून ५४,००० पर्यंत वाढली. १९२७-२९ या काळात कम्युनिस्ट व जहाल राष्ट्रवाद्यांच्या प्रभावाखाली देशभरातील कामगारांनी अनेक संपामध्ये व निदर्शनांमध्ये भाग घेतला. नोव्हेंबर १९२७ मध्ये आयटकने सायमन आयोगावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. इ.स. १९२८च्या अखेरीपासून कम्युनिस्टांनी राष्ट्रीय चळवळीशी संलग्न राहून व तिच्या मुख्य प्रवाहाचा एक भाग म्हणून कार्य करण्याचे आपले मूळ धोरण बदलले.

**१३) कम्युनिस्टांची वेगळी भूमिका :**

सप्टें. १९४० मध्ये आयटकने साम्राज्यवाद व फॅस्टिस्टवादा विषयी सहानुभूती दर्शविण्यास नकार देणारा ठराव पास केला. या युद्धामुळे देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही तसेच कामगार वर्गाचाही फायदा होणार नाही. त्यामुळे युद्धात कामगार वर्गाने सामील न होण्याचा निर्णय घेतला होता. महायुद्ध काळात साम्यवादी चळवळीपासून बाहेर पडून मानवेंद्ररॉय यांनी आयटक मधून आपले अंग काढून घेतले त्यांनी (Indian Federation of Labour) नावाची संघटना काढली. ह्या संघटनेने सरकारचे समर्थन केल्यामुळे सरकारनेही त्या संघटनेला १३००० रू. दर महिन्याला अनुदान दिले. पुढे रशियावर हिटलरचे (फॅसिस्ट गटांचे) आक्रमण झाल्यावर म्हणजेच १९४१ मध्ये जर्मनीने रशियावर आक्रमण केल्याने युद्धाचे स्वरूप बदलले असल्याचा कम्युनिस्टांनी दावा केला. आयटक मधील साम्यवादी गटाने सरकारला आपला पाठिंबा जाहीर केला. त्याच वेळेस कम्युनिस्टांनी दोस्त राष्ट्राना युद्धात पाठिंबा देऊन साम्राज्यवादी महायुद्धाचे स्वरूप बदलून ते लोकयुद्ध असल्याचे जाहीर केले. कम्युनिस्ट पितृभूमीवर हल्ला करणाऱ्या फॅसिस्ट शक्तींचा पराभव करण्याच्या प्रयत्नांत दोस्त राष्ट्रांना पाठिंबा देणे कामगारवर्गाचे कर्तव्य आहे असा त्यांचा युक्तिवाद होता. ऑगस्ट १९४२ मध्ये गांधीजींनी सुरू केलेल्या 'छोडोभारत' आंदोलनापासून कम्युनिस्ट बाजूला झाले.

**१४) १९४२चे चलेजाव आंदोलन व कामगार चळवळ :**

१९४२ च्या चलेजाव आंदोलनापासून कम्युनिस्ट बाजूला झाले असले तरी कामगार वर्ग छोडो भारत आंदोलनापासून दूर राहिला नाही. कम्युनिस्टांचा विरोध व बेफिकिरी यांना न जुमानता कामगार वर्ग या आंदोलनात सहभागी झाला. 'भारत छोडो' ठराव मंजूर झाल्यावर ९ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजी व अन्य नेत्यांना अटक झाली तेव्हा ताबडतोब दिल्ली. लखनौ, कानपूर, मुंबई, नागपूर, अहमदाबाद, जमशेदपूर, चेन्नई, इंदोर व बंगळूर येथील कामगारांनी एक आठवड्याचा संप केला तर टाटाचा पोलाद कारखाना १३ दिवस बंद राहिला. कारण राष्ट्रीय सरकार अधिकारावर आल्याशिवाय आम्ही कामावर परतणार नाही. अशी घोषणा तेथील संपकरी कामगारांनी केली होती. अहमदाबाद मधील कापडगिरण्यांतील कामगार साडेतीन महिने संपावर होते. कारण राष्ट्रीय भावनेने भारलेले गिरणी मालकच त्यांना सहकार्य करित होते! कम्युनिस्टांच्या प्रभाव क्षेत्रातील कामगारांचा या आंदोलनातील सहभाग अल्प असला तरी. कम्युनिस्ट पक्षाचे अनेक सभासद पक्षाचा आदेश धुडकावून आंदोलनात सहभागी झाले होते.

इ.स. १९४५ -४७ या काळात कामगार वर्गाच्या हालचालींना अतिशय वेग आला. युद्धोत्तर चळवळीत कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले. आझाद हिंद फौजेच्या सैनिकांवर भरण्यात आलेल्या खटल्यांच्या प्रश्नावरून अनेक गावात व शहरात विशेषतः कोलकत्ता येथे भरविलेल्या अनेक सभा व निदर्शनामध्ये कामगारांनी भाग घेतला १९४५च्या अखेरीस मुंबई व कोलकत्ता येथील गोदी कामगारांनी इंडोनेशियाकडे जाणाऱ्या जहाजांवर आग्नेय आशियातील सैन्यासाठी रसद लादण्यास नकार दिला. कारण हे सैन्य आग्नेय आशियातील स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यासाठी वापरण्यात येणार होते. १९४६ मध्ये मुंबईला नाविकांनी उठाव केला. त्यांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईतील कामगारांनी हरताळ व संप केला. या काळात कामगारांनी पार पाडलेली ही नेत्रदीपक कारवाई होती. २२ फेब्रुवारी १९४६ रोजी समाजवाद्यांच्या पाठिंब्याने कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन दोन-तीन लाख कामगारांनी आपली अवजारे खाली ठेवली होती. रस्त्या- रस्त्यांवर कामगार विरूद्ध पोलीस व सैनिक याच्यांत जणू युद्धच सुरू झाले होते.

वसाहतवादी राजवटीच्या शेवटच्या दिवसांत आर्थिक प्रश्नांवरून कामगारांनी देशात अनेक ठिकाणी संप केले. टपाल व तार खात्याच्या कर्मचाऱ्यांचा अखिल भारतीय संप विशेष गाजला. युद्ध काळात साचत गेलेल्या आर्थिक तक्रारी, युद्धानंतर निर्माण झालेल्या सेवायुक्त सैनिकांचा प्रश्न, वाढती महागाई, अन्नधान्य व जीवनोपयोगी वस्तुंची टंचाई वेतनातील घट. या सर्व गोष्टींमुळे कामगारांची सहनशीलता अगदी तुटेपर्यंत ताणली गेली. लवकरच येऊ घातलेल्या स्वातंत्र्याने सर्वांच्या आशा उंचावल्या होत्या. स्वातंत्र्य मिळताच आपल्या सर्व हाल अपेष्टा संपतील. अशी सर्वाचीच धारणा होती. कामगार वर्गही याला अपवाद नव्हता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जे आपल्याला हक्क म्हणूनच मिळणार आहे. ते मिळविण्यासाठी कामगार आता झगडू लागले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. स्वतंत्र चळवळीतील कामगार चळवळीच्या योगदानाची चर्चा करा.

## १४.२सारांश :

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीत राष्ट्रीय काँग्रेस म. गांधीच्या काळात जनचळवळ बनली होती. त्याच वेळेस स्वातंत्र्य चळवळीस नवीन प्रेरणा व प्रवाह म्हणून कामगार चळवळीने महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. भारतात कामगारांची संघटना हळूहळू विकसित होत जाऊन राष्ट्रीय प्रवाहात सामील झाली. कामगार वर्गाविषयी सुरूवातीच्या राष्ट्रवाद्यांचा दृष्टिकोन मवाळ होता. हळूहळू राष्ट्रवाद्यांचा कामगार वर्गाला पाठिंबा मिळू लागला. १९व्या शतकाच्या शेवटी कामगार वर्गाचा व चळवळीचा विस्तार होत गेला आणि कामगार चळवळीस गती मिळाली त्यानंतर कामगार वर्ग राष्ट्रीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होऊ लागला. त्यानंतर कामगार वर्गांची अखिल भारतीय पातळीवर कामगार संघटनेची आयटक रूपाने स्थापना झाली. कामगार वर्गाची बदलत्या राजकीय परिस्थितीस प्रतिसाद मिळू लागला. ट्रेड युनियनचे नवे नेतृत्व उदयास येऊ लागले. त्यातूनच मीरज खटला गाजला. 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सविनय कायदेभंग चळवळीत सक्रीय सहभाग दिला स्वातंत्र्य लढ्यात यशस्वी करण्यासाठी कामगार वर्गाने महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्याचबरोबर स्वातंत्र्य लढ्यात कम्युनिस्ट तटस्थ राहीले असूनही १९४२ च्या छोडो भारत आंदोलनात कामगारांनी घेतलेला सक्रीय सहभाग, आझाद सेनेला दिलेला पाठिंबा नाविकदलाच्या बंडाला दिलेला पाठिंबा आणि १९४७ साली भारत भूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कामगार वर्गाने महत्त्वपूर्ण कामगिरी भूमिका बजविली होती.

## १४.३ सरावासाठी स्वाध्याय :

१. आधुनिक भारतच्या इतिहासात कामगार संघटनेचे योगदान स्पष्ट करा.
२. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीतील ट्रेड युनियनचा सहभाग याविषयी सविस्तर माहिती द्या.
३. आधुनिक भारताच्या इतिहासातील कामगार चळवळीच्या कार्याचा सविस्तर आढावा घ्या.
४. चळेजाव चळवळीतील कामगारांच्या योगदानाची चर्चा करा.

**संदर्भ**

१. भारताचा स्वातंत्र्य संघर्ष - मूळे लेखक बिपन चंद्र
अनुवार डॉ. एम. व्ही. काळे
के. सागर प्रकाशन
२. आधुनिक भारत - प्राचार्य य. ना. कदम
फडके प्रकाशन
३. आधुनिक भारताचा इतिहास - प्रा. व्ही. के. जाधव
विद्या प्रकाशन नागपूर
४. भारत मे आर्थिक राष्ट्रवाद का उदभव और विकास
(अनामिका पब्लिशर्स एंड डिस्ट्रील्युटर्स - दिल्ली) - बिपन चंद्र

## १४.३ भारतातील डावी चळवळ (Left Movements in India)

### १) प्रस्तावना :

भारतात समाजवादी वा साम्यवादी विचारसरणीचे पडसाद फार उशीरा दिसू लागले. १९व्या शतकाच्या मध्यास इंग्रजी शिक्षणामुळे प्रभावित झालेल्या काही हिंदी तारुणांना राष्ट्रवादाची ओळख होऊन त्यांनी परकीय राजवटी विरोधात राष्ट्रभावनेची जागृती करण्याचे धोरण आरंभल्यामुळे प्रथम त्यांनी भारतीय जनतेत राष्ट्रभावना जागृत करून परकीयांची गुलामगिरी नष्ट करण्यास अग्रकम दिल्याने आर्थिक पिळवणुकीस प्रतिबंध करण्यास समाजवादी व साम्यवादी उपाययोजना करण्याऐवजी प्रथम 'स्वातंत्र्य आणि नंतर समता' अशा कार्यक्रमास प्राधान्य देऊन राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांमध्ये स्वातंत्र्यप्राप्तीसाठी योजावयाच्या उपायांच्या अनुरोधाने मवाळ आणि जहाल असे दोन गट पडले होते.

लो. टिळकांच्या मृत्युपर्यंत (१९२०) राष्ट्रीय चळवळीत मवाळ व जहाल असे राष्ट्रीय नेत्यांमध्ये दोन गट कार्यरत होते. पुढे म. गांधीजीकडे काँग्रेसचे नेतृत्व आल्यानंतर वरील दोन्ही गटांचा प्रभाव कमी होऊन काँग्रेसवर गांधीचा प्रभाव निर्माण झाला. पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान हिंदुस्थानातील राष्ट्रीय नेत्यांना व सुशिक्षित मध्यमवर्गाला जागतिक घडामोडींचा थोडाफार परिचय होऊ लागला होता. याच काळात रशियात लेनिनच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट क्रांती घडून आल्यामुळे समाजवाद - साम्यवाद असे शब्द प्रयोग भारतीय लोकांच्या कानी पडू लागले. विशेषतः क्रांतिकारी मार्गाने स्वातंत्र्य प्राप्ती करण्याचा विडा उचललेल्या सुशिक्षित तरुणवर्गाला रशियातील कम्युनिस्ट क्रांतिकारकांचे आकर्षण वाटू लागले. आणि त्यातून भारतात डाव्या विचारसरणीच्या उदयाची पार्श्वभूमी निर्माण होण्यास अनुकूल वातावरण तयार होऊन समाजवादी विचारांनी भारलेल्या काही नवयुवकांनी हिंदुस्थानच्या स्वांतत्र्यासाठी सशस्त्र सेना उभारण्यासाठी ''हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी'' (Hindustan Socialist Republican Army) ही संघटना सप्टेंबर १९२८ मध्ये दिल्लीत स्थापन केली. आणि भारतात डाव्या विचारसरणीचा उदय झाला. अशा या भारतातील डाव्या चळवळीचा आढावा आपण या उपघटकात घेणार आहोत.

*	राष्ट्रीय काँग्रेसमधील डावा म्हणजेच काँग्रेस समाजवादी पक्षा विषयी अकलन करून घेता

येते.

*	भारतातील इतर डाव्या चळवळीचा परिचय करून घेता येतो.

*	भारतीय समाज आणि भारतातील राजकीय परिस्थिती यावर डाव्या चळवळीचा प्रभाव समजून घेता येतो.

### १४.३.३ विषय विवेचन :

पार्श्वभूमी : भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत राजकीय विचारसरणीच्या संदर्भात 'डावी' आणि 'उजवी' या दोन संज्ञा जागतिक विचारधारेच्या तुलनेत फार उशिरा म्हणजे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात प्रचलित झाल्या. या पूर्वी फ्रेंच राज्यक्रांतीच्या (१७८९) काळात 'डावे' आणि 'उजवे' हा शब्द प्रयोग क्रांतिकारकांचे दोन गट ओळखण्यासाठी प्रथम वापरला गेला होता. प्रत्यक्ष क्रांतीमध्ये भाग घेणारे वा क्रांतीला पाठिंबा देणारे आणि जहाल विचारसरणीच्या गटाला डावे (Leftists) समजले जाऊ लागले. या उलट क्रांतीला विरोध करणारे वा क्रांतीच्या आक्रमक व हिंसक कारवायांना दूषणे देणारे आणि वैचारिक क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या गटाला 'उजवे' (Rightists) संबोधले जाऊ लागले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनांच्या चळवळीतही डावे आणि उजवे गट होते.

### १४.३.३.१ जगातील डाव्या विचारसरणीच्या उदयाची पूर्वापिठीका :

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात समाज वादाचा उदय झाला.

त्यावेळी आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी विषम आर्थिक परिस्थितीने पोळलेल्या शेतकरी, कामगार इत्यादी लोकांचे संघटन करून त्यांना प्रस्थापित राजवटीविरूद्ध सनदशीर मार्गाने लढा देण्यासाठी त्यांच्या मानसिक तयारीचा एक भाग म्हणून त्यांच्यात समाजवादी विचारसरणी सनदशीर मार्गाने रूजविण्यावर भर देणारा एक गट निर्माण झाला. हा गट 'उजवा' या नावाने ओळखला गेला.

त्याचवेळी आर्थिक विषमता नष्ट करून समता निर्माण करण्यासाठी वैचारिक अधिष्ठानावर आधारित आक्रमक चळवळीची हिंसक, रक्तरंजित क्रांती करून प्रस्थापित भांडवल प्रधान जमीनदारी आणि उद्योग प्रधान व्यवस्था उलथवून टाकण्यासाठी एक गट प्रयत्नशील राहिला त्यालाचा डावा गट समजले जाऊ लागले.

थोडक्यात 'उजवा' गट म्हणजे समाजवाद तर 'डावा' गट म्हणजेच साम्यवाद. या नावाने ओळखले जाऊ लागले. १९वे शतक समाजवादाचे शतक म्हणून सर्वपरिचित झाले. समाजवाद विरूद्ध साम्यवाद (Communism) असा उजव्या डाव्या विचारसरणीत काही काळ संघर्ष देखील उद्‌भवला होता. नव्या समाजवादाचे प्रणेते कार्लमार्क्स यांनी डाव्या विचारसरणीस 'कम्युनिझम' अशी सज्ञा दिली. दोन्ही विचार सरणीचे अंतिम उद्दिष्ट आर्थिक समता प्रस्थापित करणे हेच होते. फक्त उद्दिष्ट पूर्तीसाठी दोन वेगळे मार्ग अवलंबवायचे होते. राजसत्ता खाजगी भांडवल प्रधान व्यवस्थेचाच एक भाग असल्याने भांडवलशाही बरोबर राजसत्ता देखील नेस्तनाबूत करून, कामगारांचा राज्यविहीन समाज उभा केला पाहिजे, असे डाव्या विचारसरणीच्या प्रणेत्यांचे स्वप्न होते. युरोपात अशा डाव्या-उजव्या (साम्यवादी -

समाजवादी) चळवळींनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जोर धरला होता. आणि डाव्या विचारसरणीच्या कम्युनिस्ट नेत्यांनी रशियात १९१७ साली क्रांतीही घडवून आणली या रशियन क्रांतीनंतर भारतातही डाव्या विचारसरणीच्या उदयास अनुकूल वातावरण निर्माण झाले.

**भारतात डाव्या विचारसरणीचा उदय :**

हिंदुस्थानात समाजवादी वा साम्यवादी विचारसरणीचे पडसाद एकोणिसाव्या शतकात उमटले नव्हते. मात्र पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान हिंदुस्थानातील राष्ट्रीय नेत्यांना व सुशिक्षित मध्यमवर्गाला जागतिक घडामोडीचा थोडाफार परिचय झाल्यानंतर आणि रशियन राज्यक्रांती घडून आल्यानंतर समाजवाद - साम्यवाद असे शब्द प्रयोग कानी पडू लागले आणि त्यातूनच क्रांतिकारी मार्गाने स्वातंत्र्यप्राप्तीचे स्वप्न पाहणाऱ्या सुशिक्षित तरुणांना रशियातील कम्युनिस्ट क्रांतिकारांचे आकर्षण वाटू लागले होते. अशा समाजवादी विचारांनी भारलेल्या काही तरुणांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र सेना उभारली गेली पाहिजे असे त्याना वाटु लागले. आणि त्यातूनच ''हिंदुस्थान सोशॉलिस्ट रिपब्लिकन आर्मी'' ही संघटना सप्टेंबर १९२८ मध्ये दिल्लीत स्थापन केली आणि भारतात डाव्या विचारसरणीचा उदय झाला ही संघटना स्थापन करणाऱ्यांमध्ये उदय झाला ही संघटना स्थापन करणाऱ्यांमध्ये भगतसिंग (पंजाब) जतींद्रनाथ व अजयघोष (उत्तरप्रदेश) आणि फणींद्रनाथ घोष (बिहार) ही मंडळी अग्रभागी होती.

हिंदुस्थान सोशॉलिस्ट रिपब्लिक आर्मीचा संस्थापक भगतसिंग साम्यवादाने इतका प्रभावित झाला होता की स्वतःला कट्टर कम्युनिस्ट म्हणून घेत असे 'हिंसोरिआ'ने डिसेंबर १९२८ मध्ये लाला लजपतराय यांच्यावरील हल्ल्याचा बदला म्हणून सँडर्सचा खून केला. ८ एप्रिल १९२९ रोजी असेंब्ली हॉलमध्ये बॉम्ब फेकला. डिसेंबर १९२९ मध्ये व्हॉईसरॉय आयर्विनची ट्रेन उडवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे १९३० मध्ये पंजाब - उत्तर प्रदेशात २६ पेक्षा जास्त क्रांतिकारी घटना घडवून आणल्या या क्रांतिकारक घटनांमध्ये भगतसिंग आणि त्याचे सहकारी यांनी प्रत्यक्ष भाग घेतल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर खटला दाखल केला. त्यावेळी भगतसिंगाने आपल्या बचावाच्या भाषणात रोखठोकपणे कोर्टाला सांगितले होते की, ''केवळ बॉम्ब आणि पिस्तुल एवढ्या पुरतीच माझी क्रांती मर्यादित नाही, तर परकीय भांडवलशाही उलथून टाकून 'कामगारांची हुकूमशाही' मला अभिप्रेत आहे. क्रांती हा मानव जातीचा अंगभूत हक्क आहे.'' भगतसिंगाने मार्क्सवादाचा सखोल अभ्यास केला होता. भगतसिंगाचा एक सहकारी अजय घोष भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा जनरल सेक्रेटरीही झाला होता.

भगतसिंग डाव्या विचार सरणीच्या मार्क्सवादाकडे वळल्यामुळे १९२८-१९२९ साली रेल्वे, कापडागिरण्या आणि ज्युट उद्योग यातील कामगारांचा मोठा उद्रेक घडून आला होता. आणि कामगार संघटनामध्ये (Trade Unions) कम्युनिस्टांचा शिरकाव झाला होता.

**१४.३.३.२ भारतातील डाव्या विचार सरणीच्या उदयाची कारणे :**

भारतात डाव्या विचारसरणीचा उदय होण्यासाठी विशिष्ट परिस्थिती कारणीभूत ठरली त्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**१. कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाचा प्रभाव :** कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाने युरोप भारावून गेला होता. त्याचा परिणाम म्हणून रशियन राज्यक्रांती घडून आली. या क्रांतीच्या यशामुळे हिंदुस्थानातील बुद्धिवादी राजकीय विचारवंत, नेते, क्रांतिकारी आणि कामगार वर्गही दिपून गेला. अशा विचार सरणीचा स्वीकार केल्यास हिंदुस्थानच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अमूलाग्र घडून येईल असे सर्वांना वाटू लागले.

**२. पहिल्या महायुद्धाचा दुरगामी परिणाम :** पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेली बेकारी, महागाई, चलनवाढ, आर्थिक दुरवस्था टाळण्यासाठी डावी विचारसरणी हाच एकमेव उपाय आहे. असा एक समज सर्वत्र पसरला.

**३. डाव्या विचारसरणीचे आकर्षण :** म. गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीस जे एक सामूहिक रूप दिले. त्यामुळे स्वराज्य, स्वदेशी अशा काही राजकीय कल्पनांना मूर्त स्वरूप मिळण्याची चिन्हे दिसू लागली होती. कामगार व शेतकरी यानांही यात आर्थिक उत्थानाचे आशादायक किरण दिसत होते. अशा परिस्थितीत आर्थिक विषमतेवर उपाय सुचविणारी डावी समाजवादी विचारसरणी आकर्षक वाटणार यात शंकाच नव्हती.

**४. शिक्षणाचा प्रसार उदारमतवादाचे अपयश :** शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर व एकोणिसाव्या शतकातील उदारमतवाद नवोदित मध्यम वर्गाचे रोजगाराचे प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरली होती. नवा क्रांतिकारी समाजवाद या परिस्थितीतून आपल्याला बाहेर काढू शकेल असे या नव्या मध्यमवर्गीयांना वाटले. त्यामुळे ते डाव्या विचारसरणीकडे वळले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. भारतातील डाव्याचळवळीचा उदय आणि विकास स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**५. म. गांधीजींच्या अहिंसात्मक चळवळीवर तरुण क्रांतिकारी वर्गाचा अविश्वास :** गांधींजींची अहिंसात्मक चळवळ अगदीच दुबळी व शीघ्र बदल घडवून आणण्यास निरूपयोगी आहे. असे भारतीय समाजातील तरुण क्रांतिकारी वर्गाला वाटत होते. जुनी, पारंपारिक, प्रस्थापित समाजव्यवस्था बदलण्यासाठी साम्यवादासारखी आक्रमक डावी विचारधारा आवश्यक आहे. असे या वर्गाला वाटत होते. त्यामुळे हा वर्ग डाव्या विचारसरणीकडे आपोआप ओढला गेला. डाव्या चळवळीचा विकास मुख्यत्वे दोन कारणांनी झाला. पहिले कारण (१) रशियन राज्यक्रांतीच्या प्रभावाखाली कार्ल मार्क्सचा साम्यवाद उराशी धरून हिंदुस्थानातील साम्यवादी नेते कामगार चळवळीत उतरले व त्यांनी हिंदुस्थानातील औद्योगिक बदलामुळे निर्माण झालेल्या कामगारवर्गाचे संघटन करण्यास सुरूवात केली. ही कम्युनिस्टांची चळवळ,

आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा एक भाग म्हणून कार्यरत होती व तिचे नियंत्रण व मार्गदर्शन 'कॉमिन्टर्न' (Commintern) या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेकडून होत होते. (२) दुसरे कारण भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्येच समाजवादी विचारसरणीच्या आकर्षणामुळे, एक डावा गट तयार झाला होता. या गटाला लोकशाही समाजवादाचे फार मोठे आकर्षण वाटत होते; त्यासाठी या गटाने काँग्रेसमध्येच राहून डावी चळवळ चालवून आर्थिक समता स्थापन करण्याची बांधिलकी पत्करली होती. अशा दोन कारणांनी विकसित होत गेलेल्या डाव्या चळवळींना साम्राज्यवाद विरोधी लोकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला होता.

### १४.३.३.३ भारतात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली झालेले कामगारांचे उठाव :

गोपेन चक्रवती, धरणी गोस्वामी (दोघेही कम्युनिस्ट) यांनी किरण मित्रा आणि शिवनाथ बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली ख्वरगपूर संप (१९२७) आणि लिलू रेल्वे वर्कशॉप येथे जानेवारी ते जुलै १९२८ मध्ये कामगारांचा कंपनीशी दीर्घकाळ संघर्ष चालू होता. या संघर्षातून कलकत्यात निदर्शने करीत मोर्चा काढणाऱ्या कामगारांवर गोळीबारही झाला. इ.स. १९२८ साली कम्युनिस्टांच्या प्रेरणेने प्रभावती दासगुप्ता व काँग्रेसच्या काही नेत्यांनी कलकत्ता कार्पोरेशनच्या झाडूवाल्यांचा संप आणि चेंगेल व बौरिया येथील ज्यूट कामगारांचा संप घडवून आणले होते. या काळात बंकिम मुखर्जी व राधारमण मिश्रा हे कामगार जगतात प्रभावशाली कम्युनिस्ट नेते होते.

डाव्या नेत्यांच्या प्रभावामुळे डिसेंबर १९२८ मध्ये कलकत्त्यातील हजारो कामगारांनी कलकत्त्याच्या अधिवेशनावर मोर्चा नेऊन, काँग्रसच्या अधिवेशनाच्या मंडपात दोन तास ठाण मांडून 'पूर्ण स्वराज्या'ची मागणी करणारा ठराव मांडला होता. काँग्रेसच्या नेत्यांना कम्युनिस्टांची आगळीक आवडली नव्हती. जुलै १९२८ मध्ये सिंगरवेल व मुकुंद सरकार यांनी रेल्वेच्या कामगारांचा एक जोरदार संप घडवून आणला पण सरकारने तो निर्दयपणे मोडून काढला आणि नेत्यांना तुरूगात टाकले तर एका कामगाराला अंदमानच्या काळ्या पाण्याच्या शिक्षेवर धाडले, असाच एक दीर्घकाळ चाललेला मुंबईतील कापडगिरणी कामगारांचा संप एप्रिल ते ऑक्टोबर १९२८ या काळात घडून आला होता. मिरजकर, जोगळेकर, डांगे या कम्युनिस्ट नेत्यांनी १९२६-१९२७ सालापासून मुंबईतील गिरणी कामगारांना आपल्या हक्कांसाठी जागृत करण्याची मोहिम सुरू केली होती. त्यांनी त्यावेळी ४२ कापड गिरण्यांतील कामगारांच्या 'गिरणी समित्यांची' स्थापना करून मुंबईतील सर्व गिरणी कामगारांवर आपली पकड बसविली होती. गिरणी कामगारांवरील कम्युनिस्ट नेत्यांच्या हुकमी वर्चस्वामुळे मुंबईचा तत्कालीन गव्हर्नर हबकून गेला होता.

हा संप कामगारांच्या सर्व मागण्या मान्य झाल्यानंतरच मागे घेण्यात आला. या काळात कम्युनिस्ट नेतृत्वाखालील कामगार संघटनेचे सर्वात जास्त ६० हजार सभासद होते. तर ना. म. जोशी (काँग्रेस) यांच्या नेतृत्वाखालील संघटनेत फक्त ९८०० सभासद होते. गिरणी कामगारांच्या बरोबरच, जी. आय. पी. रेल्वे कामगारांमध्ये कम्युनिस्टांचा प्रभाव वेगाने पसरत होता. गिरणी कामगारांच्या जबरदस्त संघटना आणि गिरणी मालक व सरकार यांची युती. यामुळे परिस्थितीला गंभीर वळण लागले. हिंदुस्थानातील सर्व उद्योगपती व भांडवलदार यांनी सरकार व गिरणी मालक यांना गिरणी कामगारांविरूद्ध चालवलेल्या कारवयांना बिनशर्त पाठिंबा दिला. फिलिप स्प्रॅट, बेन ब्रॅडले हचिन्सन हे ब्रिटिश कम्युनिस्ट मुंबई आणि बंगाल येथील कामगार चळवळीत काम करीत होते. त्यांना देशा बाहेर देण्यासाठी सरकारने सार्वजनिक

सुरक्षा कायदा 'मंजूर' केला होता. या कायद्याचा उपयोग करून सरकारने सर्व कामगारांना २० मार्च १९२९ रोजी अटक करून त्यांच्यावर मिरज येथे खटला चालू केला. हा खटला मिरत येथे सुरू झाल्याने तो मिरत खटला. या नावाने भारताच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. हा खटला चारवर्षे चालला आणि आरोपींना ४ वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. कम्युनिस्ट नेत्यांनी तुरुंगवासाच्या या शिक्षेचा उपयोग कम्युनिस्ट विचार, संघटन, इत्यादी विषयावर सखोल चर्चा करण्यात घालवून या शिक्षेचा त्यांनी कायदाच करून घेतला होता. मीरत खटल्यातील नेत्यांना सरकारने तुरूंात टाकले असले तरी कामगार चळवळीची आक्रमकता कमी झाली नव्हती. रोझा देशपांडे बी. टी. रणदिवे या कम्युनिस्ट नेत्यांच्या पुढाकाराने एप्रिल ते ऑगस्ट १९२९ या काळात कामगारांचा दुसरा संप घडवून आणला. परंतु संप बराच काळ लांबल्यामुळे कामगारांत फुटीची लागण होऊन संप मागे घ्यावा लागला होता. गिरणी कामगारयुनियन दुबळी झाली होती. यावेळी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) (आयटक) मधील मवाळ गटाचे कामगार नेते मुंबईचे ना. म. जोशी यांच्यापेक्षा कम्युनिस्टांचा बराच प्रभाव राहिला. त्यामुळे पं. नेहरूच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या 'आयटक' अधिवेशनातून ना. म. जोशी यांना बाहेर पडावे लागले तरीही कामगारांच्या ट्रेड युनियनमध्ये सुभाषचंद्र बोस भूलाभाई देसाई या काँग्रेस नेत्यांनी बराच रस घेतला होता. १९३० नंतर कामगार संघटनेतील कम्युनिस्टांचे महत्त्व कमी होत असल्याचे दिसून येते. कारण कम्युनिस्टांची आक्रमक भूमिका दुबळी होऊ लागली होती. आणि कम्युनिस्टांनी राष्ट्रीय चळवळीबाबत आपल्या भूमिकेत बदल केला होता.

### १४.३.३.४ दुसरे महायुद्ध आणि भारतातील कम्युनिस्ट

राष्ट्रीय काँग्रेसने १९३७ साली निवडणूकीत भाग घेऊन आठ प्रांतात काँग्रेसची सरकारे स्थापन झाली. थोड्याच दिवसांत (सप्टेंबर १९३९) दुसरे महायुद्ध पेटले आणि ब्रिटिशांनी काँग्रेसला न विचारता हिंदुस्थानला दुसऱ्या महायुद्धात ओढले. या ब्रिटिश धोरणाचा निषेध म्हणून काँग्रेसच्या प्रांतिक सरकारांनी तात्काल राजीनामा दिला. साम्राज्यवादी ब्रिटिश धोरणाविरूद्ध स्वातंत्र्यचळवळ नव्या जोमाने उभारण्याचा संकल्प सोडला. या काळापर्यंत भारतीय कम्युनिस्ट देशात चाललेल्या घडामोडीबद्दल उदासीन होते. परंतु दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या विरोधात ब्रिटिश दोस्त राष्ट्रांत रशिया सामील होताच हिंदी कम्युनिस्टांनी रशियाच्या इशाऱ्यानुसार ब्रिटिशांचे समर्थन करण्यास सुरूवात केली. हिटरलविरूद्धचे युद्ध हे 'लोकयुद्ध' (People's War) आहे. अशी त्यांनी घोषणा केली व भारतीय कम्युनिस्टांनी दोस्त राष्ट्रांना सर्वतोपरी पाठिंबा जाहीर केला. हिंदुस्थान सरकारने एके काळी भारतीय कम्युनिस्ट पक्ष जुलै (१९३४) बेकायदेशीर ठरवला होता. परंतु दुसऱ्या महायुद्धा प्रसंगी या पक्षांचा ब्रिटिशांना पाठिंबा मिळताच सरकारने १९४२ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षास कायदेशीर पक्ष म्हणून मान्यता दिली. या कम्युनिस्टांनी राष्ट्रीय चळवळीविरूद्ध 'हेरगिरी' सारखी देशद्रोही कृत्येही केली. त्यामुळे देशभरात कम्युनिस्टांच्या परोपजीवी कृत्याबद्दल निषेधाची लाट उसळली. असे असले तरी भारतीय कम्युनिस्ट पक्षात असाही एक गट होता की, त्यांना राष्ट्रीय चळवळीत काम करण्यासाठी काँग्रेसमध्ये सामील व्हावे असे वाटत होते. १९३८ मध्ये या गटाने अशी जाहीर भूमिका घेतली की, ''भारतीय जनतेने साम्राज्यवादाविरोधी चालवलेल्या संघर्षात काँग्रेस ही एक जनतेचा केंद्रबिंदू असलेली राजकीय संघटना आहे.'' आणि कम्युनिस्ट नेते पी. सी. जोशी यांनी कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र असलेल्या 'नॅशनलफ्रंट' या वृत्तपत्रातून काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीचे समर्थन केले होते.

अशा प्रकारे या गटाने काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत मनापासून भाग घेतला आणि १९३६ - १९४२ या काळात या गटातील नेत्यांनी केरळ, आंध्र बंगाल आणि पंजाब या प्रांतात शेतकऱ्यांच्या चळवळी प्रभावीपणे चालवल्या त्यामुळे कम्युनिस्टांनी आपली कलंकित होत चाललेली प्रतिभा बऱ्याच अंशी सुधारली.

### १४.३.३.५ स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची कम्युनिस्ट पक्षाची भूमिका :

हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यासंबंधीच्या अनेक योजना ब्रिटिशांकडून पुढे येत होत्या. त्यावेळी कम्युनिस्टांनी लीगची बाजू घेऊन काँग्रेस व मुस्लिमलीग यांच्यातील मतभेदाची दरी कशी वाढेल. हेच त्यांनी पाहिले. हिंदुस्थानची अनेक शकले होऊन नवी सार्वभौम राष्ट्रे व्हावीत व त्यापैकी एखादे तरी राष्ट्र कम्युनिस्टांच्या ताब्यात असावे. असा उद्देश कम्युनिस्टांच्या डावपेचामागे होता असे म्हटले जाते. त्यासाठी त्यांनी मुस्लिम लिगशी समझोता कण्याचेही पाऊल उचलले होते. परंतु त्यांच्या दुदैवाने मुस्लिम लीगनेच त्यांची सूचना फेटाळली. साहजिकच भारतीय कम्युनिस्ट पक्ष 'एक बदनाम पक्ष' म्हणूनच जनतेसमोर आला. १९४२ साली या पक्षाने १६ भारतीय राष्ट्रांचे एक बहुराष्ट्रीय राज्य करावे, अशी सूचना केली होती. १९४६ साली, युरोपातील बाल्कन राष्ट्राप्रमाणे किंवा सोव्हिएट संघराज्याप्रमाणे (USSR) १७ स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रे करावीत. अशी 'कॅबिनेट मिशन' समोर कम्युनिस्ट पक्षाने सूचना केली होती. भारतीय कम्युनिस्टांच्या अशा प्रकारच्या विक्षिप्त देशविरोधी धोरणामुळे त्यांनी लोकमताचा विश्वास गमावला व त्या पक्षाची काहीशी वाताहत झाली व स्वातंत्र्योत्तर काळात हा पक्ष सत्ते पासून दूर राहिला.

### १४.३.३.६ राष्ट्रीय काँग्रेस मधील डावा गट - काँग्रेस समाजवादी पक्ष :

युरोपातील समाजवादी विचारसरणीशी आपले नाते जोडावे. असे म्हणणारा तरुण नेत्यांचा एक गट राष्ट्रीय काँग्रेसमध्येही होता. त्यादृष्टीने या तरुण नेत्यांनी काँग्रेसमध्ये १९३०-१९३१ व १९३२-१९३४ या काळात समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. या तरुणांपैकी काहीजण १९२० नंतरच्या राष्ट्रीय चळवळीत सक्रीय होते. तरुंगवासात असताना या नेत्यांनी समाजवाद मार्क्सवाद या विचारधारेचा सखोल अभ्यास, चिंतन चर्चा केल्या होत्या. मात्र तत्कालीन भारतीय कम्युनिस्टांनी रशियातील कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली राहण्याचे घेतलेले धोरण काँग्रेसमधील डाव्यांना पसंत नव्हते. म्हणून त्यांनी काँग्रेसमध्ये राहूनच समाजवादी विचारसरणीशी बांधीलकी पत्करणारा नवा पर्याय शोधला आणि त्यांनी ऑक्टोबर १९३४ साली मुंबईत जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्रदेव व मिनूम सानी यांच्या नेतृत्वाखाली 'काँग्रेस समाजवादी पक्ष' स्थापना केला. या नवोदित पक्षाचे चार प्रमुख दृष्टिकोण होते -

(१) स्वातंत्र्य प्राप्ती हे राष्ट्रीय चळवळीचे पहिले उद्दिष्ट आहे. त्यासाठी राष्ट्रीयत्व ही समाजवादाकडे जाण्याची पहिली पायरी आहे.
(२) समाजवाद्यांनी काँग्रेसमध्ये राहूनच राष्ट्रकार्य केले पाहिजे, कारण राष्ट्रीय चळवळीचा पुरस्कार करणारी काँग्रेस ही पहिली संघटना आहे.
(३) समाजवादी नेत्यांनी काँग्रेसला आणि राष्ट्रीय चळवळीला समाजवादाकडे जाण्यासाठी दिशादर्शन केले पाहिजे.

(४) समाजवादाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी कामगार व शेतकरी यांचे संघटन केले पाहिजे. आर्थिक मागण्यांच्या पूर्तीसाठी वेतनवाढीचे संघर्ष करावेत आणि राष्ट्रीय चळवळीचा पाया विस्तृत करावा.

काँग्रेस समाजवादी पक्षाने काँग्रेस पक्षात तात्विक बदल घडवून आणावेत व त्यांना स्वतंत्र भारत समाजवादी व्हावा. तसेच आर्थिक प्रश्नांवर कामगार आणि शेतकऱ्यांच्या हितांचे निर्णय घेण्यासाठी काँग्रेसला उद्युक्त करावे अशी भूमिका घेतली होती, जयप्रकाश नारायण यांनी १९३४ साली काँग्रेस नेत्यांना व कार्यकर्त्यांना कळकळीचे आवाहन केले होते की, ''आम्ही काँग्रेससमोर एक कार्यक्रम ठेवला आहे, त्यांनी तो स्वीकारावा अशी आमची इच्छा आहे. जर काँग्रेसने हा कार्यक्रम स्वीकारला नाही. तर आम्ही काँग्रेसबाहेर पडू असे नाही. जरी या प्रयत्नात आज आम्हाला यश आले नाही. तरी उद्या आम्ही प्रयत्न करू. पुनःपुन्हा असा प्रयत्न करू.'' काँग्रेस समाजवादी पक्षाच्या गटाला काँग्रेसच्या नेतृत्वात बदल करून समाजवादी नेत्यालाच काँग्रेसचे नेतृत्व मिळावे. अशी अपेक्षा होती. काँग्रेसचे सध्याचे मध्यमवर्गीय नेतृत्व हटवून त्याची जागा क्रांतिकारी समाजवाद्याने घ्यावी असे काँग्रेस समाजवादी गटाला वाटत होते. नेतृत्व बदलाची कल्पना काँग्रेसला अवास्तव वाटल्याने दोन्ही गटांना मान्य होणारे 'समन्वयी' नेतृत्व असावे असा विचार मूळ धरू लागला. काँग्रेसच्या १९३९ च्या (त्रिपुरी) व १९४० च्या (रामगड) अधिवेशनामध्ये समन्वयी नेतृत्वाचा प्रयत्न झाला. पण काँग्रेस संघटना व स्वातंत्र्य चळवळ दुबळी होईल. अशी भीती व्यक्त करण्यात आल्याने हा प्रयत्न सोडून देण्यात आला. आणि गांधीजींच्या नेतृत्वाला सध्यातरी पर्याय नाही. असे त्यावेळी म्हटले जाऊ लागले. साहजिकच काँग्रेस समाजवादी पक्षाच्या गटाने आपला आग्रह सोडून देऊन काँग्रेसमध्ये राहून तात्विक पातळीवर डावी विचारसरणी प्रसूत करण्याचीभूमिका घेतली.

काँग्रेस समाजवादी पक्षात पहिल्यापासून मार्क्सवादी, फेबियनवादी आणि गांधीवादी असे तीन गट होते. असे गट असले तरी पक्षाच्या सामर्थ्यात कमकुवतता येण्याची अजिबात शक्यता नव्हती कारण सर्वसाधारणपणे विस्तृत पाया असलेला हा पक्ष बनला होता. आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण आणि अन्य गटातील नेत्यांची वैयक्तिक मित्रभावना इतकी प्रबळ होती की, स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत पक्षाचे नेते राष्ट्रीय काँग्रेस मध्ये राहूनच स्वातंत्र्य चळवळीची धुरा वाहत होते. राष्ट्रवाद आणि समाजवाद या दोन तत्वांशी त्यांनी स्वतःला बांधून घेतले होते. काँग्रेस समाजवादी पक्षात असे अनेक तात्विक मतभेद असले तरी पक्षाने मार्क्सवादासहित समाजवाद स्वीकारला होता. पुढील काळात गांधीजींच्या विचारसरणीचा ही फार मोठा प्रभाव होता. पुढील काळात गांधींजींच्या विचारसरणीचा फार मोठा प्रभाव काँग्रेसवर राहिला व काँग्रेस समाजवादी पक्षातील नेत्यांमध्ये वैचारिक चलबिचलता निर्माण झाली आणि काँग्रेस समाजवादी पक्षास गांधीवादाशी सतत संघर्षाची भूमिका घेण्याची पाळी आली. त्याचा परिणाम म्हणून जुलै, १९३१ मध्ये जयप्रकाश नारायण, फुलन प्रसाद वर्मा, आणि इतर यांनी 'बिहार समाजवादी पक्ष स्थापन केला. सप्टेंबर १९३३ मध्ये पंजाब समाजवादी पक्ष स्थापन झाला आणि १९३४ मध्ये ऑल इंडिया काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापना केली. काँग्रेसमध्ये राहूनच काँग्रेस-समाजवादी पक्ष कार्यरत राहण्याचा डाव्या काँग्रेसला 'नकली समाजवादी म्हणून भारतीय कम्युनिस्टांनी हिणवले याउलट काँग्रेस समाजवाद्यांनीही भारतीय कम्युनिस्टांना 'सोव्हिएत रशियाचे उपग्रह असा प्रतिआहेर केला.''

१९३५च्या हिंदुस्थान सरकारचा कायदा काँग्रेसने एक प्रयोग म्हणून स्वीकारून १९३५ साली निवडणुका घेण्याचा निर्णय काँग्रेस समाजवादी पक्षाला पसंत पडला नाही. हा कायदा साम्राज्यवादाचेच जनहितविरोधी रूप आहे कठोर टीका काँग्रेस समाजवादी पक्षाने केली होती. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिशांना युद्धात कोणत्याही प्रकारची मदत न करता त्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन स्वातंत्र्य चळवळ तीव्र करावी अशी काँग्रेस-समाजवादी पक्षाने मागणी केली होती. एवढेच नव्हे तर १९४२च्या चलेजाव चळवळीत सक्रीय सहभाग घेऊन काँग्रेस-समाजवादी पक्षाने महत्त्वपूर्ण भूमिका निभावली होती. आपल्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी म्हणजेच साम्राज्यवाद, सरंजामशाही व जातीयवाद मुळापासून उखडून टाकण्यासाठी क्रांतिकारी मार्ग अवलंबावा असे काँग्रेस समाजवादी पक्षाचे म्हणणे होते.

**१४.३.३.७ भारतातील इतर डाव्या चळवळी :**

मार्क्सवादाचे बोट धरून भारतीय कम्युनिस्टांनी चळवळी उभ्या केल्या. त्याच दरम्यान इतर काही नेत्यांनीही डाव्या विचारसरणीची कास धरून १९३० ते १९४० च्या दरम्यान डाप्या चळवळी उभ्या केल्या त्यां थोडक्यात पुढील प्रमाणे आहेत.

**१) मानवेंद्रनाथ रॉय :** १९३० साली रशियातून मानवेंद्रनाथ रॉय हिंदुस्थानात आले. वास्तविक रॉय हेच हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्षाचे प्रवर्तक होते. परंतु येथील कम्युनिस्टांशी मतभेद झाल्यानंतर १९४० साली त्यांनी ''रॅडिकल डेमॉक्रटिक पार्टी'' या राजकीय पक्षाची स्थापना केली. या पक्षाचे अनुयार्यी ''रॉयिस्ट'' म्हणून ओळखले जात होते. हिंदुस्थानात क्रांती करावयाची झाल्यास फक्त कामगारांना हाताशी धरून चालणार नाही. तर शेतकऱ्यांसहित बहुवर्गीय लोकांनाही त्यात सामील करून घ्यावे लागेल असे रॉय यांचे प्रतिपादन होते.

**२. सुभाषचंद्र बोस यांचा फॉरवर्ड ब्लॉक :** काँग्रेस नेत्यांशी अध्यक्षपदाच्या प्रश्नावरून मतभेद झाल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांनी मार्च १९३९ मध्ये 'फॉरवर्ड ब्लॉक' हा क्रांतिकारी डावा पक्ष स्थापन केला. या पक्षाने काँग्रेसचीच धोरणे व कार्यक्रम थोडाफार बदल करून स्वीकारली. फक्त नेतृत्वाबद्दल त्यांचा मुख्य आक्षेप होता. या पक्षाने डाव्या विचारसरणीच्या नेत्यांना एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाने स्वातंत्र्य चळवळीत अत्यंत गौरवास्पद कामगिरी केली. ब्रिटिशांशी सहकार्याचे धोरण न स्वीकारता शस्त्रसामर्थ्यानेच त्यांच्याशी लढा दिला पाहिजे हे धोरण स्वीकारून 'आझाद हिंद फौज' उभी केली व आपल्यापरीने ब्रिटिश साम्राज्य वादाविरोधी प्रखर संघर्ष केला.

**३. क्रांतिकारी समाजवादी पक्ष :** या डाव्या पक्षाची स्थापना १९४० मध्ये झाली. या पक्षाची भूमिका काँग्रेस समाजवादी पक्षाशी मिळती-जुळती होती. गांधीजी - बोस मतभेदात या पक्षाने सुभाषचंद्रबोस यांना पाठिंबा दिला होता. पक्षाच्या नावात क्रांती असा शब्द प्रयोग असल्याने तो कम्युनिस्टांशी जवळीक असलेला वाटत होता. परंतु दुसऱ्या महायुद्ध प्रसंगी सोव्हिएट रशिया दोस्त राष्ट्रांत सामील झाला तरी कम्युनिस्टांप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यवादी युद्धास क्रांतिकारी पक्षाने पाठींबा न देता त्यास विरोधच केला. हिंदुस्थानातील सत्तांतर व फाळणी हा काँग्रेसमधील भांडवलवादी नेते व साम्राज्यवाद यांच्याशी मागील दाराने केलेला समझोता होय. असे या पक्षाचे मत होते.

**४. बोलशेव्हिक पार्टी ऑफ इंडिया :** १९३९ मध्ये एन दत्त मुजुमदार यांनी बोल्शेव्हिक पार्टी ऑफ इंडिया हा डाव्या विचारसरणीचा पक्ष स्थापन केला तर १९४१ साली रशियन नेता ट्रॉटस्की यांच्या मताशी बांधिलकी असलेला इंद्रसेन व अजित रॉय यांनी बोल्शेव्हिक - लेनिनिस्ट पार्टी ची स्थापना केली. तर १९४२ साली सौम्येंद्रनाथ टागोर यांनी 'रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' हा पक्ष स्थापन केला थोडक्यात बोलशेव्हिक पार्टी ऑफ इंडिया, बोलशेव्हिक-लेनिनिस्ट पार्टी, आणि रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया इत्यादी डावे पक्ष स्थापन झाले होते. हे पक्ष मुळ कम्युनिस्ट पक्षातील विविध गटाचे होते. आणि त्यांना रशिया प्रमाणे क्रांती घडवून आणायची होती. हे पक्ष मुळ कम्युनिस्ट पक्षातील विविध गटच होते. आणि त्यांना रशिया प्रमाणे क्रांती घडवून आणायची होती.

### १४.३.३.८ डाव्या चळवळीचा प्रभाव :

भारतीय समाज आणि भारतातील राजकीय परिस्थिती यावर डाव्या चळवळींनी बराच प्रभाव गाजविला. कामगार आणि शेतकरी यांच्या संघटना बांधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डाव्या चळवळीने केले. काँग्रेस पक्षावर डाव्या चळवळींचा इतका प्रभाव होता की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीतील (AICC) डाव्या विचारसरणीकडे झुकलेले एक तृतीयांश सभासद काँग्रेसच्या निर्णय प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावित होते. यामुळेच १९३६ ते १९३९ या अधिवेशनात नेहरू व सुभाषचंद्र बोस हे काँग्रेसचे अध्यक्ष बनले तर आचार्य नरेंद्रदेव, जयप्रकाश नारायण आणि अच्युतराव पटवर्धन या कट्टर समाजवाद्यांना काँग्रेसच्या कार्यकारी समितीत समाविष्ट केले गेले होते. १९३१ सालच्या काँग्रेसच्या कराची अधिवेशात काँग्रेसने मूलभूत हक्क आणि आर्थिक धोरणे यासंबंधी केलेल्या ठरावावर डाव्या चळवळीचा स्पष्ट प्रभाव दिसतो. १९३९ च्या फैजपूर अधिवेशनातील आर्थिक धोरणासंबंधीचा ठराव. १९३९ चा काँग्रेसचा जाहीरनामा हे सर्व डाव्या विचारसरणीतून निर्माण झालेल्या डाव्या चळवळीचे फलित मानले पाहिजे. ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशन, प्रोगोसिव्ह रायटर्स् असोसिएशन, पहिली ऑल इंडिया स्टेटस् पीपल्स कॉन्फरन्स ही आणखी काही उदाहरणे डाव्या चळवळींची प्रभाव निदर्शके आहेत. 'ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स' या संघटनेत डाव्या गटाचा लक्षणीय प्रभाव होता. थोडक्यात डाव्या चळवळीने हिंदुस्थानातील सामान्य जनतेस राष्ट्रीय प्रवाहात आणून सोडले व आपल्या राजकीय व आर्थिक हक्कासाठी संघर्ष करण्याचे सामर्थ्य त्यांना मिळवून दिले.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. राष्ट्रीय चळवळीत डाव्या चळवळीच्या योगदानाची चर्चा करा.

**१४.३.४ सारांश :**

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात राजकीय विचार सरणीच्या संदर्भात डावी आणि उजवी या दोन संज्ञा जागतिक विचारधारेच्या तुलनेत फार उशीरा म्हणजेच २०व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात प्रचलित झाल्या. फ्रेंच राज्यक्रांती नंतर युरोपात समाजवादाचा उदय झाला १९१७च्या रशियन क्रांतीने युरोपात डावी विचारसरणी व डावी चळवळ उदयास आली तर भारतात पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान समाजवाद आणि साम्यवाद हे शब्द कानी पडू लागले. आणि १९२८च्या दरम्यान म्हणजेच १९व्या शतकात डाव्या चळवळीचा उदय झाला. हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीची १९२८ मध्ये दिलीत. स्थापन झाली आणि भारतात डाव्या विचारसरणीचा उदय झाला. ही संघटना स्थापन करणाऱ्यांमध्ये भगतसिंग, जतींद्रनाथ अजयघोष आणि फणींद्रनाथ घोष ही मंडळी अग्रभागी होती. भारतात डाव्या विचारसरणीचा उदय होण्यासाठी विशिष्ट परिस्थिती कारणीभूत ठरली. भारतात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली कामगाराचे वेगवेगळे उठाव घडून आले. रेल्वे कामगारांचा संप ज्युट कामगारांचा संप मुंबईतील गिरणी कामगारांचे संप घडून आणले ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या माध्यमातून कामगारासाठी कार्य करीत होती. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान भारतातील कम्युनिस्ट पक्षाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने धरसोडी वृत्तीचे अनुकरण केल्यामुळे हा पक्ष भारतातील जनतेची मनेजिंकू शकलो नाही. व स्वातंत्र्योत्तर काळात कम्युनिस्ट पक्ष सत्ताकेंद्रापासून दूरच राहिला तो केवळ त्यांच्या धरसोड वृत्तीमुळे राष्ट्रीय काँग्रेसमध्ये डावा गट म्हणून काँग्रेस समाजवादी पक्ष उदयास आला या पक्षाचे नेतृत्व जयप्रकाश नारायण आचार्य नरेंद्रदेव व मिनू मसानी यांनी केले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेस समाजवादी पक्षाने सक्रीय सहभाग घेऊन महत्त्वपूर्ण भूमिका निभावली होती. भारतात इतर डाव्या चळवळी काही नेत्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करत होत्या. मानवेंद्रनाथ रॉय, सुभाषचंद्र बोस, क्रांतीकारी समाजवादी पक्ष, बोल्शेव्हिक पार्टी, बोल्शेव्हिक लेनिन पार्टी रिन्होलयुशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया इत्यादी डावे पक्ष स्थापन झाले होते. हे डावे पक्ष मूळ कम्युनिस्ट पक्षातील विविध गटच होते. थोडक्यात भारतीय समाज आणि भारतातील राजकीय परिस्थिती यावर डाव्या चळवळींनी आपला प्रभाव गाजविला. थोडक्यात डाव्या चळवळीने हिंदुस्थानातील सामान्य जनतेस राष्ट्रीय प्रवाहात आणून सोडले आणि आपल्या राजकीय व आर्थिक हक्कासाठी संघर्ष करण्याचे सामार्थ्य मिळवून दिले होते.

**- सरावासाठी स्वाध्याय :**

१. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कामगार चळवळीतील भूमिका स्पष्ट करा.
२. भारतातील डाव्या चळवळी विषयी सविस्तर माहिती विशद करा.
३. भारतात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील कामगारांच्या उठावाचा मागोवा घ्या.
४. भारतीय समाजावरील डाव्या चळवळीच्या प्रभावाचे विश्लेषण करा.

**संदर्भ :**

१. भारत ते आर्थिक राष्ट्रवाद का उद्‌भव और विकास - बिपनचंद्र
२. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. विभा आठल्ये, अशुंल पब्लिकेशन
३. आधुनिक भारत प्राचार्य य. ना. कदम, फडके प्रकाशन.
४. इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स (भारताचा स्वातंत्र्य संघर्ष बिपनचंद्र - मराठी अनुवादक - डॉ. एम. व्ही. काळे)

❖❖❖❖

# १५

# स्वातंत्र्याकडे वाटचाल
# (TOWARDS INDEPENDENCE)

**अनुक्रमणिका**

१५.० उद्दिष्टे :

१५.१ प्रस्ताविक :

१५.२.१ आझाद हिंद सेना

१५.२.१.१. काँग्रेस व सुभाषचंद्र बोस :

१५.२.१.२. नेताजी जर्मनीकडे :

१५.२.१.३. नेताजी सुभाषचंद्र बोसांचे जर्मनीतील वास्तव्य :

१५.२.१.४ नेताजी सुभाषचंद्र बाबूंचे जपानमध्ये आगमनः

१५.२.१.४ दक्षिण आशियातील राष्ट्रवादी भारतीयांचे कार्य :

१५.२.१.६ रासबिहारी बोस व आझाद हिंद फौज :

१५.२.१.७ नेताजी आझाद हिंद सेनेचे सर सेनापती :

१५.२.१.८ हंगामी सरकारची स्थापना :

१५.२.१.९ आझाद हिंद फौजेची कामगिरी :

१५.२.१.१० सुभाष ब्रिगेडची कामगिरी :

१५.२.१.११ आझाद हिंद फौजेचे शेवटचे पर्व :

१५.२.१.१२ आझाद हिंद सेनेचे महत्त्व :

१५.२.१.१३ आझाद हिंद फौजेतील अधिकाऱ्यांवरील खटला :

१५.२.१.१४ आझाद हिंद फौजेच्या माघारीची कारणे :

१५.२.१.१५ आझाद हिंद फौजेच्या कार्याचे परीक्षण :

१५.२.१.१६ १९४६ चे नौदलाचे बंड (नाविकांचे बंड)

१५.२.१.१७ १९४६च्या नाविकांच्या बंडाची कारणे :

१५.२.२.१८ नौदलातील बंडाची सुरूवात :

१५.२ विषय विवेचन :

१५.३ स्वातंत्र्य आणि फाळणी (FREEDOM AND PARTITION)

१५.३.१ १९४६ सालच्या अखेर देशाची राजकीय परिस्थिती

१५.३.२ लॉर्ड माऊंटबॅटन यांची नियुक्ती :

१५.३.३ सत्तातंराच्या वाटाघाटी :

१५.३.४ भारतीय पुढाऱ्यांशी चर्चा :
१५.३.५ भारताच्या फाळणीचा पहिला मसुदा :
१५.३.६ फाळणीचा दुसरा मसुदा :
१५.३.७ माऊंटबॅटन योजना :
१५.३.८ भारतीय स्वातंत्र्याचा कायदा - १९४७
१५.३.९ पाकिस्तानची निर्मिती :
१५.३.१० भारत स्वतंत्र झाला :
१५.४ सारांश :
१५.५ सरावासाठी स्वाध्याय (प्रश्न)

## १५.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला

**आझाद हिंद सेना आणि नाविकांचे १९४६चे बंड**

१. सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली 'आझाद हिंद सेनेने देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याची माहिती सांगता येते.
२. नाविकांच्या बंडामुळे स्वातंत्र्य मिळण्याच्या दृष्टीने निर्माण झालेल्या अनुकूल परिस्थितीचे आकलन स्पष्ट करता येते.
३ देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी कोणकोणते विविध घटक कारणीभूत झाले ते सांगता येते.
४. भारतीय राष्ट्रीय चळवळीला मिळालेला आंतरराष्ट्रीय प्रतिसाद या विषयी माहिती सांगता येते.
५. हिंदुस्थानची फाळणी आणि भारताला मिळालेले स्वातंत्र्य या विषयी माहिती करून घेता येते.

## १५.१ प्रस्ताविक :

१९४२ ते १९४७ हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे अंतिम पर्व असल्याने ते अनेक महत्त्वाच्या घडामोडींनी भरलेले होते. या पर्वात 'भारत छोडो आंदोलन, आझाद हिंद-सेनेचा लढा, आणि भारतीय नौदलातील १९४६ चे नाविकांचे बंड या प्रमुख घडामोडी झाल्या. त्याचबरोबर भारतीय राष्ट्रीय चळवळीला मिळलेला आंतरराष्ट्रीय प्रतिसाद आणि त्यातून हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे जगाच्या नकाशावर आशिया खंडात नव्याने उदयास आली. १९४२ ते १९४७ या काळात भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा झाला. 'छोडो भारत' आझाद हिंद सेना आंदोलनातून भारतीय जनतेच्या प्रखर ब्रिटिशविरोध व्यक्त झाला. लष्कर (पायदल), नौदल (नाविकदल) व विमानदल (हवाईदल) हे ब्रिटिश सत्तेचे आधारस्तंभ होते. ते ही आता ब्रिटिशविरोधी बनल्याने भारतावर आपली सत्ता या पुढे फार काळ टिकवता येणार नाही याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली. आणि

ब्रिटिश साम्राज्याचा शेवट डोळ्यांपुढे दिसू लागला तो केवळ भारत छोडो आंदोलन, आझाद हिंद सेनेचा लढा आणि १९४६ मधील नौदलातील नाविकांचे बंडामुळे. प्रस्तुत घटकात या सर्व घडामोडींचा आढावा घेण्यात देशाला स्वातंत्र्य मिळण्यास कारणीभूत ठरलेल्या विविध घटकांचा परामर्शही घेतला आहे.

## १५.२ विषय विवेचन :

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाने आग्नेय आशियातील भारतीय जनतेत अपूर्व उत्साह निर्माण केला होता. भारतात ते आंदोलन सुरू असतानाच आग्नेय आशियात भारताच्या स्वातंत्र्यासाठी एक आघाडी उघण्यात आली होती. भारतीय लष्कराचे जे हजारो सैनिक व अधिकारी जपानला शरण गेले होते त्यांना संघटित करून सुभाषचंद्र बोस यांनी 'आझाद हिंद सेने'ची पुनर्बांधणी केली होती. आझाद हिंद सेनेने भारताला ब्रिटिश साम्राज्यवादाच्या जोखंडातून मुक्त करण्यासाठी ब्रिटिश फौजांविरूद्ध भारतीय सीमेवर तीव्र संघर्ष केला. त्या संघर्षात आझाद हिंद सेनेला अपयश आले होते. तरी तिचा झुंजार लढा व्यर्थ ठरला नाही.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील आझाद हिंद सेनेचा लढा एक तेजस्वी पृष्ठ आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आपल्या विलक्षण प्रभावी उपायाने भारतीय जनतेत जी एक शौर्याची, पराक्रमाची परंपरा निर्माण केली. त्या आझाद हिंद सेनेच्या कामगिरीचा प्रभाव ब्रिटिशांच्या सेवेतील नौसैनिकांवर व वैमानिकांवरही झाला होता. त्यातून १९४६ साली नाविकदलात भारतीय नौसैनिकानी उठाव घडवून आणले. आणि भारतातील ब्रिटिश सत्ता खिळखिळी केली त्याचा पुढे स्वातंत्र्यासाठी फायदा झाला. 'आझाद सेना' आणि भारतीय नौदलातील नाविकांचे बंड या विषयी माहिति खालील प्रमाणे आहे.

### (अ) १५.२.१ आझाद हिंद सेना

थोर बंगाली क्रांतिकारक व हिंदुस्थानचे महान देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस आय.सी.एस. (ICS) परीक्षा पास झाले होते व अधिकारी म्हणून ते रूजू ही झाले होते. पण जेव्हा इंग्लंडच्या राजसिंहासनशी एकनिष्ठ राहण्यासाठी शपथ घेण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी ती घेण्यास नकार दिला व उच्च अधिकाराच्या जागेकडे पाठ फिरवून ते स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. म. गांधीच्या अहिंसा व सत्याग्रह या तत्वज्ञानाशी नेताजींचे विचार जुळणारे नव्हते त्यांनी चित्तरंजन दासबाबूंचे शिष्यत्व पत्करून स्वराज्य पक्षाच्या उभारणीस वाहून घेतले. भारतीय इतिहासातील राणा प्रताप व छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे प्रेरणा स्थानी होते. १९२७ साली सायमन कमिशन विरोधी नेताजींनी बंगालमध्ये वातावरण निर्माण करून सोडले होते. तसेच ब्रिटिश सत्तेच्या विरोधात असंतोष निर्माण केला होता.

### १५.२.१.१. काँग्रेस व सुभाषचंद्र बोस :

१९३८ मध्ये दुसऱ्या महायुद्धाचे ढग युरोप झाकोळून टाकत होते. त्यावेळी काँग्रेसचे एक प्रभावी नेते सुभाषचंद्र बोस ब्रिटिश साम्राज्यशाही विरूद्ध संघर्ष करण्याच्या तयारीत होते. काँग्रेस मधील तरुण कार्यकर्त्यांचा एक गट जहाल प्रागतिक विचारांनी भारलेला होता. त्या गटाचे नेतृत्व सुभाषचंद्र बोसकडे आले होते. १९३८ सालच्या काँग्रेसच्या हरिपुरा येथील वार्षिक अधिवेशात सुभाषचंद्र बोस यांची एकमताने अध्यक्षपदी निवड झाली. पुढील १९३९

सालीही त्रिपुरी अधिवेशनात त्यांची पुन्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी सहा महिन्यांच्या आत ब्रिटिशांनी हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यावे. असा निर्वाणीचा इशारा काँग्रेसने ब्रिटिश सरकारला द्यावा असा प्रस्ताव मांडला परंतु गांधीजींनी त्यांचा हा प्रस्ताव स्वीकारला नाही. त्यामुळे महात्मा गांधी व राष्ट्रीय सभेच्या अन्य नेत्यांशी त्यांचे मतभेद झाले व त्यांनी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. १९३९च्या मे मध्ये 'फारॅवर्ड ब्लॉक' नावाच्या पुरोगामी गटाची स्थापना केली. महायुद्ध सुरू होताच सुभाषचंद्र बाबुंनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ब्रिटिश विरोधी लढ्याचा पवित्रा घेतला. त्यांनी सत्याग्रहाची मोहिम सुरू केली. ब्रिटिश सरकारने त्यांना तुरूंगात टाकले. तुरूंगात त्यांनी प्राणांतिक उपोषण केले. उपोषणामुळे त्यांची प्रकृती बिघडली तेव्हा सरकारने १९३९ च्या डिसेंबर मध्ये त्यांची तुरूंगातून मुक्तता केली. व त्यांच्या घरीच त्यांना नजरकैदेत ठेवले.

### १५.२.१.२. नेताजी जर्मनीकडे :

या कडक नजर कैदेतून नेताजी १५ जानेवारी १९४१ रोजी निसटले. ते निसटल्याचे सरकारच्या लक्षात १० दिवसांनी आले. विविध नावे व वेष परिधान करून नेताजींनी हिंदुस्थानची सरहद्द ओलांडली. झियाउद्दीन हे नाव धारण करून पठाणाच्या वेशात असलेले सुभाषचंद्र बोस १९ जानेवारीला पेशावरला पोहचले तेथे भगतराम तलवार ह्या विश्वासू सहाय्यकाने त्यांना काबूलला पोचविण्याची व्यवस्था केली. अनेक अडचणीवर मात करून ते काबूल येथे पोहचले. तेथून ते रशियात दाखल झाले होते. मास्कोहून विमानाने ते बर्लिनला येऊन पोहचले. हिटलरचा उजवाहात रिबेन ट्रॉप याने नेताजींचे बर्लिन मध्ये स्वागत केले. जर्मनीमधील हिंदी लोकांची सेना उभारण्याचे कार्य हाती घेऊन नेताजींनी ३ हजाराचे लष्करही (Free India Army) उभारले युद्धात इंग्रज फौजेतील भारतीय सैनिक जर्मनीकडून कैद झाले होते. त्यांचे मन वळवून नेतजींनी दुसरी एक फौज (Liberation Army) तयार केली होती.

### १५.२.१.३. नेताजी सुभाषचंद्र बोसांचे जर्मनीतील वास्तव्य :

जर्मनीतील वास्तव्यात रिबेन ट्रॉपच्या सहकार्याने व जर्मनीतील काही स्वातंत्र्य प्रेमी भारतीयांच्या मदतीने नोव्हेंबर १९४१ मध्ये फ्री इंडिया सेंटर स्थापन केले गेले. जयहिंद ही घोषणा व 'जनगणमन' हे राष्ट्रगीत म्हणण्याचे ठरविण्यात आले. तसेच भारताचा ध्वज म्हणून तिरंगा फडविण्यात आला. त्यानंतर आझाद हिंद रेडियोचे स्वतंत्र प्रक्षेपण केंद्रही त्यांनी सुरू केले. या आझाद हिंद रेडियोवर नेताजी भारतीय जनतेशी संवाद साधु लागले. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादातून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वाटेल तो त्याग करण्यासाठी ते भारतीय जनतेला आवाहन करू लागले होते. परंतु जर्मन सरकारची व्हावी तितकी मदत आपल्याला होत नव्हती. भारतापासून हजारो मैल अंतरावर असलेल्या जर्मनीत बसून भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपण ठोस कार्यवाही करू शकणार नाही याची तीव्र खंत त्यांना वाटत होती.

### १५.२.१.४ नेताजी सुभाषचंद्र बाबूंचे जपानमध्ये आगमन:

दरम्यान याच वेळेस जपानने ६ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेच्या पर्लहर्बर या नाविक तळावर हल्ला करून जपान दुसऱ्या महायुद्धात उतरले होते. जपान - अमेरिका युद्ध सुरू होताच अतिशय वेगाने अतिपूर्वेतील इंग्लिश-फ्रेंच डच वसाहतींवर कब्जा मिळवून जपान मलायात येऊन पोहचले होते. जपानी सैन्य ब्रह्मदेशात उतरून भारताच्या सीमेनजीक येऊन

ठेपले आग्नेय आशियातील ह्या परिस्थितीने सुभाषचंद्र बाबूंचे लक्ष वेधून घेतले जपानच्या मदतीने भारतीय स्वातंत्र्याचा मार्ग लवकर गाठता येईल असे त्यांचे पक्के मत बनले त्याच वेळी योगायोगाने आग्नेय आशियात येऊन ब्रिटिश विरोधी लढ्याचे नेतृत्व त्यांनी स्वीकारावे असे इंडियन इंडिपेन्डन्स लीगने दिलेले आमंत्रण त्यांना मिळाले. सुभाष बाबूंना ही सुवर्णसंधीच वाटली. त्यांनी लागलीच हे आमंत्रण स्वीकारले. जर्मनीच्या कील बंदरातून एका खास जर्मन यू बोटीतून प्रवास करीत ब्रिटिश युद्ध नौकांचा मारामदागास्कर नजीक उभ्या असलेल्या जपानी पाणबुडीत ते चढले आणि तीन महिन्यांचा अत्यंत धोक्याचा प्रवास संपवून १६ मे १९४३ रोजी ते टोकिओला पोचले. अनपेक्षितपणे टोकिओ आकाशवाणीवरून नेताजींनी २१ जून रोजी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याचे  भारतीयांना पुन्हा अवाहन करून साम्राज्यवादी ब्रिटिशांविरूद्ध युद्धात सक्रीय सहभाग घेण्यास प्रोत्साहित केले.

### १५.२.१.४ दक्षिण आशियातील राष्ट्रवादी भारतीयांचे कार्य :

सुभाष बाबूं टोकिओला येऊन पोहचले त्यापूर्वी आग्नेय आशियाच्या काही भागात भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याच्या विचाराला मुर्त रूप आले होते. परंतु सर्वमान्य नेत्याच्या अभावामुळे त्या कार्याला गती येत नव्हती. सयाम, मलाय, ब्रह्मदेश इत्यादी देशांमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांची संख्या बरीच होती. त्यात भारताच्या स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित असलेल्या काही व्यक्ती होत्या. इंग्लंड दुसऱ्या महायुद्धात गुंतले असल्याने त्या संधीचा फायदा घेऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी आग्नेय आशियात हालचाली कराव्यात असे काहींना वाटू लागले. अशा मंडळीमध्ये स्वामी सत्यानंद ग्यानी, प्रतिमसिंग  आणि अमरसिंग व जपानमध्ये वास्तव्य करीत असलेले पूर्वाश्रमींचे भारतीय क्रांतिकारक रासबिहारी बोस हे आघाडीला होते. स्वामी सत्यानंद यांनी सयाममध्ये वास्तव्य करण्याऱ्या भारतीयांना संघटित करण्यासाठी भारत-थाई सांस्कृतिक संघाची स्थापना केली होती. तर अमरसिंग व प्रतिमसिंग यांनी 'इंडियन इंडिपेन्डन्स लीग' प्रस्थापित करून पर्ल हर्बरवरील जपानच्या हल्यापूर्वीचे ब्रिटिशांविरोधी प्रचाराचा नारळ फोडला होता. ह्या सुमारास मलाया मध्येही तेथील काही भारतीयांनी पुढाकार घेऊन 'इंडियन इंडिपेडन्स लीग ऑफ मलायाची स्थापना केली होती.' यामागेही जपानी अधिकाऱ्यांची प्रेरणा होती. अशातच मलायामधील जपानच्या मोहिमेत ब्रिटिशांची पीछेहाट होऊ लागली आणि सुमारे पंचेचाळीस हजार भारतीय सैनिक जपानच्या हाती पडले. त्यात कॅप्टन मोहनसिंग होते. जपानच्या ताब्यातील भारतीय सैनिकांचे स्वतंत्र लष्करीदल संघटित करावे असे त्यांना सूचविले गेले. आणि त्यांना युद्धबंदी न मानता स्वतंत्रपणे कार्य करण्याची मुभा देण्यात येईल असे अभिवचन जपानी अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर त्यांनी ते काम स्वीकारले. ले. कर्नल निरंजसिंग गिल, ले. कर्नल जगन्नाथराव भोसले इत्यादी अधिकारी त्यांच्या मदतीसाठी पुढे आली. अशा प्रकारे मोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद फौजेचे प्रथम गठन झाले.

### १५.२.१.६ रासबिहारी बोस व आझाद हिंद फौज :

व्हॉइसरॉयवरील बॉम्ब हल्ल्याच्या खटल्यात हवे असणारे रासबिहारी बोस इग्रंज सरकारच्या हातावर तुरी देऊन इ.स.१९१५ साली हिंदुस्थानातून जपानमध्ये आले होते. त्यांनी जपानी महिलेशी विवाह केला होता व जपानचे नागरिकत्व स्वीकारले होते. त्यामुळे जपानच्या सरकारशी त्यांचा संबंध होता. ह्या वयोवृद्ध क्रांतिकारकाबद्दल भारतीयांच्या मनात असलेला आदर लक्षात घेऊन जपानव्याप्त आग्नेय आशियातील सर्व भारतीयांना संघटित करण्याची जबाबदारी जपानच्या सरकारने त्यांच्यावर सोपवली. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी

कार्य करण्याची ही उत्तम संधी आहे असे वाटून त्यांनी जपान सरकारच्या सूचना स्वीकारल्या जपानने जिंकलेल्या प्रदेशात लक्षावधी भारतीय लोक राहत होते या भारतीय लोकांची संघटना बांधून रासबिहारी बोस यांनी 'हिंदी स्वातंत्र्य संघ' (Indian Independence League) स्थापन केली होती. लवकरच त्यांनी पूर्वेकडील देशात राहणाऱ्या हिंदी लोकांच्या प्रतिनिधिंची बैठक टोकिओ या ठिकाणी घेऊन 'आझाद भारतीय सेना' (Indian National Army) स्थापन करण्याचा निर्णय घेतला (मार्च १९४२) थोडक्यात रासबिहारी बोस यांनी 'इंडियन इंडिपेडन्स लीग' जपानमध्ये स्थापन केली होती तर कॉ. मोहनसिंग यांच्याकडे सर्व युद्ध कैदी सोपवून त्यातून 'इंडियन नॅशनल आर्मी' हे सेनादल स्थापन केले. भारतीय जनेतत ही सेना 'आझाद हिंद सेना' वा 'आझाद हिंद फौज' या नावाने परिचित झाली. कमांडर-इन चीफ पदी कॅ. मोहनसिंगाची नियुक्ती करण्यात आली. परंतु पुढे कॅ. सिग व जपानी सेना अधिकारी तसेच रासबिहारी बोस यांच्यात मतभेद झाल्यामुळे आझाद सेनेची धुरा सांभाळण्यासाठी सुभाष बाबूंना आमंत्रित करावे असाही एकमुखी निर्णय येथे घेण्यात आला.

### १५.२.१.७ नेताजी आझाद हिंद सेनेचे सर सेनापती :

सुभाष बाबूंनी टोकिओत जपानच्या पंतप्रधानांची भेट घेऊन कॅ. मोहन सिंगांना काढून टाकण्यावरून जे मतभेद निर्माण झाले होते. ते संपुष्टांत आणले. त्यामुळे हिंदुस्थानातून ब्रिटिशांची हकालपट्टी करून हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सुभाष बाबूंनी चालविलेल्या प्रयत्नात जपानने सर्व प्रकारचे साहाय्य देण्याचे कबूल केले. टोकिओतून ते सिंगापूरला गेले व तेथे ४ जुलै १९४३ रोजी संस्थापक रासबिहारी बोस यांनी विनंती केल्यावरून सुभाष बाबूंनी हिंदी स्वातंत्र्य संघ व इंडियन इंडिपेंडन्स लीग चे अध्यक्षपद स्वीकारले आणि नेताजी हे हिंदी स्वातंत्र्य संघाचे अध्यक्ष व आझाद हिंद फौजेचे (इंडियन इंडिपेडन्स लीगचे) सरसेनापती बनले याचवेळी त्यांनी आझाद हिंद फौजेस 'चलो दिल्ली'ची घोषणा दिली.

### १५.२.१.८ हंगामी सरकारची स्थापना :

लोकांनी मोठ्या प्रेमाने त्यांना 'नेताजी' ही पदवी बहाल केली. पुढे याच नावाने ते हिंदुस्थानच्या इतिहासात अजरामर झाले. आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्वीकारल्याबरोबर तिची पुनर्रचना करण्याच्या कार्यास त्यांनी सुरूवात केली. प्रशिक्षण केंद्रांत कार्यक्षमता आणली गेली. स्त्रियांचीही लष्करी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी 'हंगामी सरकारची' स्थापना केली आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आपण इंग्लंड व अमेरिका यांच्या विरूद्ध युद्ध पुकारत आहोत असे जाहीर केले. या घटनेचे पडसाद सर्व जगभर उमटले. जपान, जर्मनी, इटाली, ब्रह्मदेश, चीन, मांचुरिया इत्यादी अनेक राष्ट्रांनी नेताजींच्या या हंगामी सरकारास मान्यता दिली. लवकरच जपानी फौजांनी जिंकून घेतलेले अंदमान व निकोबार हे भारतीय प्रदेश या हंगामी सरकारकडे सूपूर्त करण्यात आले. त्याचप्रमाणे पूर्वेकडील देशात राहणाऱ्या भारतीय जनतेतील अनेक उत्साही तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले होते. खास स्त्रियांचीही एक बटालियन 'झाशीची राणी' या नावाने कॅ. लक्ष्मी स्वामिनाथन यांच्या नेतृत्वाखाली उघडण्यात आली होती. सुभाषबाबूंनी आझाद हिंद सेनेस जर्मनीची मान्यता घेतली होती. सिंगापूर रेडिओ स्टेशन सुरू करून त्यांनी देशवासियांना स्वातंत्र्य लढ्यात सामील होऊन दिल्लीवर स्वारी करण्यासाठी 'चलो दिल्ली' असा रेडिओ वरून संदेश दिला होता. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानचा ध्वज

फडकावण्याचा त्यांचा निर्धार होता. आपल्या स्वतंत्र सरकारला जगातील १३ देशांनी राजनैतिक मान्यता त्यांनी घेतली होती. हंगामी स्वतंत्र हिंदुस्थानचे सरकार जपानच्या हातातील बाहुले नव्हते. ते रितसर स्थापन झालेले सरकार होते. एप्रिल १९४४ मध्ये रंगनूला 'नॅशनल बँक ऑफ आझाद हिंद' ही सरकारची राष्ट्रीय बँक स्थापन केली होती. आझाद हिंद सेनेमध्ये कर्नल जगन्नाथराव भोसले कॅ. शहानवाझखान, कॅप्टन प्रेम सेहगल, कॅ. गुरूदयालसिंग चिलन आदी वरिष्ठ सेनाधिकारी सामील झाले होते.

**१५.२.१.९ आझाद हिंद फौजेची कामगिरी :**

**१. नेताजींने तेरॉचीला तेजस्वी उत्तर :**

जपानी फौजा व आझाद हिंद फौजा निश्चित केले यांनी संयुक्तपणे मोहिम काढून हिंदुस्थानची भूमी मुक्त करावयाची असे धोरण होते. परंतु या धोरणास आग्नेय आशियातील जपानी फौजांचा सेनापती फिलद मार्शल काऊंट तेराँची याने विरोध केला. त्याच्यामते आझाद हिंद फौजेतील सैनिक शरण आलेल्या फौजेतील असल्यामुळे त्यांचे नितीधैर्य खचले असल्यामुळे ते जपानी सैनिकाप्रमाणे संकटात कसोटीस उत्तरू शकणार नाहीत. तेव्हा भारतीय भूमी जपानी फौज मुक्त करतील आणि आझाद हिंद फौजेने हेरगिरी व प्रचार एवढेच काम करावे. नेताजींनी तेरॉचीच्या उत्तरला तेजस्वी उत्तर दिले ते म्हणाले जपानी सैनिकांच्या पराक्रमाने मिळणारे हिंदुस्थानचे स्वातंत्र्य आम्ही स्वीकारणार नाही. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी भारतीय सैनिक रक्त व प्राण खर्ची करण्यास कधीही तयार आहेत. त्यामुळे आझाद हिंद फौजेच्या एका तुकडीने आघाडीचे बाजू स्वीकारली होती.

**१५.२.१.१० सुभाष ब्रिगेडची कामगिरी :**

आझाद हिंद फौजेच्या गांधी ब्रिग्रेड, आझाद ब्रिग्रेड व नेहरू अशा तीन ब्रिगेड होत्या. नेताजींनी या ब्रिगेडना दिलेल्या नेत्यांच्या या नावाने त्या नेत्याबद्दल नेताजीस किती आदर होता, हे स्पष्ट होते. या तीन ब्रिगेड मधून शूर जवान निवडून चौथी ब्रिगेड तयार केली. या चौथ्या ब्रिगेडमधील सैनिकांनीच आपल्या ब्रिगेडचे नाव 'सुभाष ब्रिगेड' असे ठेवले होते. जनरल शहानवाज खान या ब्रिगेडचे कमांडर होते. ही ब्रिगेड ब्रह्मदेशातील जपानी फौजांबरोबर राहणार होती. सुभाष ब्रिगेड ब्रह्मदेशात जाऊन छावणी करून राहिली लवकरच्या या ब्रिगेडच्या १ क्रमांच्या बटालियनला पश्चिम ब्रह्मदेशातील आराकान प्रदेशातील ब्रिटिश ठाणी जिंकण्याचा हुकूम देण्यात आला. सुभाषब्रिगेडने कलादन खोऱ्यात यशस्वी प्रवेश करून तेथील ब्रिटिश फौजांचा पराभव करून तेथील ब्रिटिश सैनिकांची छावणी काबीज केली. त्यानंतर सुभाष ब्रिगेडने जपानी लष्कराच्या मदतीने हिंदुस्थानच्या सरहद्दीतील माऊडॉक हे ठाणे जिंकून घेतले. हिंदुस्थानच्या भूमीवर आझाद हिंद फौजेने मिळविलेला हा पहिला विजय होता. त्यामुळे भारतीय सैनिक आनंदाने बेहोष होऊन व आपल्या भूमीचे चुंबन घेऊ लागले होते. हिंदुस्थानचा तिरंगा तेथे डौलाने फडकवला गेला होता. परंतु साधन सामुग्री अभावी आणि ब्रिटिशांच्या संभाव्य हल्ले होण्याची शक्यता असल्यामुळे जपानी सैनिकांनी माघार घेण्याचे ठरविले. तेव्हा आझाद हिंद फौजेच्या सैनिकांनी जपानी अधिकाऱ्यांना सांगितले की आम्ही येथून माघार घेऊ शकत नाही. आमची दिल्ली पुढे आहे. कॅप्टन सुरजमल याच्या नेतृत्वाखाली भारतीय सैनिक तेथेच राहिले तेथे राहणे म्हणजेच मृत्युच्या जबड्यात राहण्यासारखेच होते. पण हे असामान्य धाडस भारतीय सैनिकांनी दाखविले. सुरजमलच्या नेतृत्वाखाली भारतीय फौज तेथे मे १९४४ ते सप्टेंबर १९४४ पर्यंत होती. तिने अनेक वेळा ब्रिटिशांचे हल्ले परतवून लावून महान पराक्रम करून दाखविला होता. सुभाष ब्रिगेडच्या दुसऱ्या दोन बटालियन्सनी अशाच प्रकारचे शौर्य अनेक लढ्यात दाखविले गेले. लवकरच

जपानी फौजेबरोबर सुभाष ब्रिगेडने नागा प्रदेशातील कोहिमा शहराकडे कूच केले व ते शहर जिंकून तेथे तिरंगा फडकविला.

### १५.२.१.११ आझाद हिंद फौजेचे शेवटचे पर्व :

आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराबरोबरच भारतीय सरहद्दीकडे कूच केली होती. तिने अंदमान निकोबार ही बेटे प्रथम जिंकली नेताजींनी त्यांची नावे अनुक्रमे 'शहीद' व 'स्वराज्य' अशी ठेवली. त्यानंतर तिने आसाम मधील मोराई, कोहिमा, मणिपूर, विष्णूपूर ही ठिकाणे जिंकून जपान्यांच्या बरोबर इंफाळला वेढा घातला आझाद हिंद सेनेच्या इतिहासात भारतीय सीमेवरील इंफाळचा लढा चिरस्मरणीय ठरला. आझाद हिंद सेनेची लष्करी शक्ती मर्यादित होती. तिच्याजवळचा शस्त्रास्त्र साठा व अन्न धान्याचा पुरवठा अपुरा होता. आझाद हिंद सेनेच्या जवानांना हालअपेष्टा व उपासमार यांना तोंड द्यावे लागले तरीसुद्धा ते ब्रिटिश फौजांशी प्राणपणाने लढत होते. १९४४ च्या अखेरीस दुसऱ्या महायुद्धाचे पारडे पालटू लागले इंग्लंड - अमेरिकेची सरशी होऊ लागली जपानची पीछेहाट होऊ लागली. जपानच्या सक्रिय मदतीविना आझाद हिंद सेनेचा ब्रिटिश फौजांविरूद्ध टिकाव लागेनासा झाला. १९४५ मध्ये ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट या दिवशी अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकी या दोन जपानी शहरांवर अणुबाम्ब टाकले. त्या भयंकर संहारानंतर जपानने शरणागती पत्करली. ब्रिटिश फौजांनी आता आक्रमक पवित्रा घेऊन हिंदुस्थानच्या भूमीवरून आणि ब्रह्म देशातून जपानी व आझाद भारतीय फौजा मागे हटविण्यास सुरूवात केली व त्यात ते यशस्वी झाले. शेवटी ब्रिटिश फौजांनी रंगून काबीज केले व तेथील आझाद हिंद फौज कैद करून टाकली.

जपानच्या पराभवामुळे नेताजीचे स्वप्न भंगले. आझाद हिंद फौजेने असामान्य पराक्रम करून देखील जागतिक परिस्थिती प्रतिकूल बनल्याने त्यांना अपयश आले होते १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी बँकॉकहून टोकिओकडे विमानाने निघाले असता मार्गातच चीनजवळच्या फार्मोस बेटामधील ताय पै विमान तळावर त्यांच्या विमानास अपघात झाला व त्यात ते जबर जखमी होऊ त्याच रात्री ते मृत्युमुखी पडले. अर्थात हा जपानी सरकारचा वृत्तांत होता. हिंदुस्थानातील जनतेला हा वृत्तांत खरा वाटत नाही. स्वतंत्र भरताने नेताजींच्या मृत्युसंबंधी दोन चौकशी समित्या नेमल्या पण त्यांच्याकडूनही नेताजींच्या मृत्युचे गूढ पूर्णपणे उकलले नाही.

### १५.२.१.१२ आझाद हिंद सेनेचे महत्त्व :

आझाद हिंदसेना भारतीय स्वातंत्र्य लढा जिंकू शकली नाही. हे जरी खरे असले तरी आपल्या मायभूमीसाठी प्राणपणाने लढा देऊन देशवासिंया समोर त्यागाचा एक नवा आदर्श उभा केला. सुभाष बाबुंनी देशाबरोबर स्वतंत्र हिंदुस्थानचे हंगामी सरकार स्थापन करून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले. आझाद हिंद सेनेतील विविध जाती जमातींच्या सैनिकांनी जातिधर्म विसरून देशासाठी एक व्हावे आणि देशासाठी लढा द्यावा. हे उदाहरण भारतीय जनतेसमोर ठेवले होते आझाद हिंद सेनेने देशासाठी दिलेल्या सशस्त्र लढ्याचा ब्रिटिशांवर इतका जबरदस्त परिणाम झाला की, त्यांना आपले राज्य हिंदुस्थानावर फार काळ चालणार नाही. याची धास्ती वाटू लागली. आझाद हिंद सेनेला ब्रिटिशांविरूद्धच्या युद्धात रणांगणात पराभव पत्करावा लागला असला, तरी ब्रिटिश सत्तेचे धैर्य खच्ची करणारा सेनेचा हा नैतिक विजयच होता. आझाद हिंद सेना शरण आल्यानंतर ब्रिटिश सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली सेनेवर खटला दाखल केला.

थोडक्यात उद्दिष्ट सिद्धित अपयश येऊनही भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या प्रक्रियेला सुभाष बाबूंनी व त्याच्या आझाद हिंद सेनेने वेग दिला. याबद्दल दुमत वाटत नाही. सुभाष बाबूंनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले अपूर्व बलिदान व्यर्थ ठरले नाही. भारतीय स्वातंत्र्यसंग्रमातील हे एक अविस्मरणीय प्रकरण होय.

### १५.२.१.१३ आझाद हिंद फौजेतील अधिकाऱ्यांवरील खटला :

आझाद हिंद फौजेतील सुमारे पंधराशे सैनिकांना व अधिकाऱ्यांना ब्रिटिश सैन्याने १९४५च्या मध्यात कैद केले. युद्ध समाप्तीनंतर त्यांना युद्ध कैदी म्हणून भारतात आणले गेले. त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप लावून दिल्लीच्या ऐतिहासिक लालकिल्ल्यात खास लष्करी न्यायालयापुढे १९४५ च्या उत्तरार्धात त्यांच्यावरील खटल्याची सुनावणी करण्यात आली. मे. ज. शहानवाझ खान, मेजर जगन्नाथराव भोसले, कर्नल धिल्लन, कॅ. सहगल, कॅ. लक्ष्मी स्वामीनाथन इत्यादी अधिकाऱ्यांवर राजद्रोहाचा खटला सुरू होण्याची वार्ता ऐकताच त्यांच्या बचावासाठी शक्य ती सर्व मदत करण्याचा निर्णय कॉंग्रेसने घेतला.

स्वातंत्र्यासाठी लढणे हा गुन्हा नाही. आझाद हिंद फौजेच्या धाडसी कार्याबद्दल भारताला अभिमान वाटतो. आझाद हिंद सेनेने केलेले अग्निदिव्य व सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यासाठी केलेला भव्य व उदात्त प्रयत्न यामुळे भारतीयांची छाती आदराने भरून आले आहे. अशा आशयाचे पत्रक कॉंग्रेसच्या सरचिटणीसांनी काढले. मुस्लिम लिंग आणि हिंदुमहासभा यासारखे इतर भारतीय पक्षही आझाद हिंद फौजेतील अधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ पुढे सरसावले. देशाच्या राजकीय जीवनात पुन्हा एकदा ऐक्याची आणि नवचैतन्याची लाट उसळली. हिंदु, मुस्लिम, शीख, दलित भारतीय आपआपले पूर्वीचे मतभेद विसरून आरोपींच्या मदतीसाठी निधी गोळा करू लागले. कॉंग्रेसने तर आरोपींच्या बचावासाठी कायदे पंडिताची एक समिती स्थापन केली. भूलाभाई देसाई, कैलासनाथ कटाजू, तेजबहादुर सप्रु हे प्रसिद्ध कायदेपंडित ह्या समितीचे काम करीत होते. जवाहरलाल नेहरूंनी कित्येक वर्षानंतर वकिलाचा काळा डगला चढवून आरोपींचे वकीलपत्र घेतले.

बचावाचे काम करीत असताना भूलाभाई देसाई यांनी आरोपी निर्दोष असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला त्याचबरोबर मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढणे हा प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे असेही जाहीर केले. मातृभूमीसाठी प्राणार्पणाची तयारी ठेवून नेटाने लढलेल्या अधिकाऱ्यांना गुन्हेगार ठरविता येणार नाही. सुभाषचंद्र बोसांनी प्रस्थापित केलेले हंगामी सरकार आंतरराष्ट्रीय नियमांच्या निकषावर उतरणारे होते आणि अशा सरकारचे अधिकारी आंतरराष्ट्रीय नियमांच्या निकषावर उतरणारे होते आणि अशा सरकारचे अधिकारी म्हणून कर्तव्यपालन केलेल्या अधिकाऱ्यांवर राजद्रोहाचा आरोप लावणे कायदेशीर दृष्ट्या चूक आहे म्हणून त्यांना कोणतीही शिक्षा करणे समर्थणीय ठरणार नाही अशी आग्रही व आक्रमक भूमिका त्यांनी घेतली आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्यांनीही दयेची भीक मागण्याचे साफ नाकारले.

लष्करी कोर्टाने बचाव समितीचा युक्तिवाद फेटाळून लावला. शहानवाज, सहगल, धिलॉं यांना दोषी ठरवून दीर्घ मुदतीच्या शिक्षा फर्माविल्या. त्याविरूद्ध जनतेने देशभर संतप्त प्रतिक्रीया व्यक्त केली. लोकमताच्या दडपणाखाली ह्या कडक शिक्षा सरकारला रद्द कराव्या लागल्या. भारतीय सैनिकांतही आपल्या बांधवांनी केलेल्या साहसी उपक्रमाच्या बातमीने नवा आत्मविश्वास निर्माण झाला. ब्रिटिश सत्तेविषयीची भीती नष्ट झाली. त्यामुळे भारतीय सैनिकांच्या व अधिकाऱ्यांच्या ब्रिटिश निष्ठेला तडा जाऊ लागला. याची जाणीव ब्रिटिश

राज्यकर्त्यांना झाल्या खेरीज राहिली नाही. तसेच आझाद हिंद फौजेमध्ये सर्व जातीचे, धर्माचे, भारतीय लोक खांद्याला खांदा लावून एकजुटीने देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढले. ह्या गोष्टीचा नैतिक परिणाम भारतीयांवर झाल्याखेरीज राहिला नाही. संरक्षक दलावर ह्या खटल्याची झालेली प्रतिक्रिया लवकरच राज्यकर्त्यांच्या व भारतीयांच्या अनुभवाला आली.

### १५.२.१.१४ आझाद हिंद फौजेच्या माघारीची कारणे :

### १) प्रतिकूल परिस्थिती :

आझाद हिंद फौजा व जपानी फौजा जसजशा आराकानाच्या जंगलातून भारतीय हद्दीकडे येत तसतशी त्यांची पिछाडी कमकुवत होई जंगलातून शस्त्रास्त्रे अन्नपाणी, वस्त्रे, औषधे यांची रसद पुरविणे अवघड होत असे इफाळला वेढा दिला, त्याचवेळी पावसाळा सुरू झाल्यामुळे आझाद हिंद सेनेला ब्रह्मदेशाकडून होणारा पुरवठा बंद पडला. दारूगोळ्याची कमतरता अन्न-धान्याचे दुर्भिक्ष, रोगराई यामुळे सैनिक पटापट मरू लागले त्यामुळे मातृभूमीवर पाय ठेवलेला असतानाही आझाद हिंद सेनेला नाईलाजाने माघारी फिरावे लागले.

### २) अमेरिकेची चढाई व जपानचा पाडाव :

आझाद हिंद फौज माघार घेत असतानाच ऑक्टोबर १९४४ मध्ये अमेरिकेने टोकिओवर चाल केली जपानला नमविण्यासाठी अमेरिकेने पॅसिफिक महासागरात आपले सामर्थ्य एकवटले. यावेळी जपान स्वसंरक्षणासाठी ब्रह्मदेशातील जपानी लष्कर माघारी बोलावले जपानच्या पाठिंबा नाहीसा झाल्यामुळे ब्रिटिशांनी आझाद हिंद फौजेविरूद्ध चढाईचे धोरण स्वीकारून त्यांच्याकडून मंडाले आणि रंगून परत घेतले. ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी शहरावर अणुबॉम्ब टाकून ही शहरे उद्ध्वस्त केली. तेव्हा जपानने शरणांगती पत्करली. त्यामुळे आझाद हिंद फौजेचा आधारच नष्ट झाला. परिणामी त्यांना माघार घ्यावी लागली.

### ३) आझाद हिंद फौजेला काँग्रेसच्या नेत्यांचा पाठिंबा नव्हता :

काँग्रेसचे नेते म. गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद इत्यादी नेत्यांचा सशस्त्र क्रांतीवर विश्वास नव्हता. त्यांचा सत्य, अहिंसा या तत्त्वांवर दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेला पाठिंबा दिला नाही. त्यामुळेच नेताजी परदेशात जाऊन बाहेरची मदत घेऊन स्वातंत्र्यासाठी इंग्राजांशी लढत होते. परंतु देशातील काँग्रेस नेत्यांचा पाठिंबा नसल्यामुळे नेताजींचा पक्ष एकाकी ठरला हिंदुस्तानच्या भूमीवर नेताजी फौजेसह आले. तेव्हा त्यांना अपेक्षित असलेली जनक्रांती हिंदुस्थानात घडू शकली नाही. कारण काँग्रेसने स्वीकारलेली अहिंसा व सत्य ही तत्त्वे यामुळे नेताजींना काँग्रेसवाल्यांनी मदत केली नाही.

### ४) नेताजी सुभाषबाबूंचे निधन :

१५ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी सिंगापूर पडल्यावर सायगावला गेले. सायगावहून जपानी विमानातून टोकियोस निघाले वाटेत विमान अपघात होऊन त्यातच १८ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांचा अंत झाला. त्यामुळे आझाद हिंद सेनेच्या पुनरूज्जीवनाची आशा नष्ट झाली.

**५) आझाद हिंद फौजेतील दोष :**

आझाद हिंद फौजेत अनेक दोष असल्यामुळे या फौजेला अपयश पत्करावे लागले. १) रासबिहारी बोसच्या वेळची गटबाजी नेताजींच्या आमगनानंतर नष्ट होऊ शकली नाही. २) फौजेतील सर्वच सैनिक देशभक्तीने प्रेरित होऊन सामील झालेले नव्हते. त्यांच्यात स्वार्थत्याग, निष्ठा या गुणांचा अभाव होता.

**१५.२.१.१५ आझाद हिंद फौजेच्या कार्याचे परीक्षण :**

१) आझाद हिंद फौज पराक्रमात व शौर्यात यत्किंचितही कमी पडली नाही. जपानी लष्करी अधिकाऱ्यांनी तिच्या पराक्रमाबद्दल प्रथम शंका व्यक्त केली होती पण त्यांनीच पुन्हा तिच्या शौर्याची व देशभक्तीची स्तुती केली जगातील कोणत्याही राष्ट्रीय फौजेस शोभेल अशीच कामगिरी तिने केली होती.

२) आझाद हिंद फौजेच्या सुभाष ब्रिगेडचे कमांडर शहानवाज खान म्हणतात की, अपुरी साधनासामग्री व शस्त्रास्त्रे असूनही आम्ही ब्रह्मदेशाची सरहद्द ओलांडून हिंदुस्थानच्या अंतर्गत भागात १५० मैलांपर्यंत धडक मारली होती. आम्ही जेव्हा आक्रमक पवित्रा घेऊन पुढे येत होते. तेव्हा ब्रिटिशांना आमचा एकदाही पराभव करता आला नाही. अथवा आम्ही जिंकून घेतलेले एकही ठाणे त्यांना परत घेता आले नाही. सुभाष ब्रिगेडच्या या मोहिमेत आमचे एकूण ४००० सैनिक कामी आले होते.

३) आझाद हिंद फौजेतील सैनिक व अधिकारी कैद झाल्यावर त्यांच्यावर ब्रिटिश सत्तेविरूद्ध राजद्रोह केल्याचा व युद्ध केल्याचा आरोप ठेवून दिल्लीतील लालकिल्ल्यात त्यांच्यावर खटला भरण्यात आला. हा खटला सर्व देशभर गाजला आझाद हिंद फौजेतील सैनिक व अधिकारी यांची लोकप्रियता पराकोटीस पोहोचली होती. राष्ट्रासाठी प्राणार्पण करणारे वीर म्हणून हिंदी जनता त्यांच्याकडे पाहू लागली. आझाद हिंद फौजेतील सैनिक म्हणजे पूर्वीचे ब्रिटिश फौजेतीलच सैनिक; पण देशभक्त दाखविण्याची संधी जेव्हा त्यांना मिळाली तेव्हा त्यांचे देशप्रेम उफाळून वर आले. ज्यांच्या जोरावर आपण हिंदुस्थानात राज्य करायचे त्या भारतीय सैनिकांच्या मनात हिंदुस्थानबद्दल प्रेम व ब्रिटिश सत्तेबद्दल द्वेष असेल तर आपणास येथे फार काळ राज्य करता येणार नाही. हे सत्य इ.स. १९४४-४५ सालानंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांना प्रकर्षाने उमजले; आणि त्यांनी हिंदुस्थान सोडून जाण्याचा निर्णय पक्का केला. अशा प्रकारे हिंदुस्थान सोडून जाण्याच्या ब्रिटिशांच्या निर्णयास नेताजी सुभाषचंद्र बोस व त्यांची आझाद हिंद फौज यांचा पराक्रम व देशभक्ती बऱ्याच प्रमाणावर कारणीभूत झालेली होती.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. आझादहिंद फौजेवर थोडक्यात टिप लिहा.

**१५.२.१.१६**

### ब) १९४६ चे नौदलाचे बंड (नाविकांचे बंड)

दुसऱ्या महायुद्धाची रण धुमाळी चालु असता १९४२ साली अतिपूर्वेकडे रासबिहारी बोस आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेना स्थापन करून भारतीय स्वातंत्र्यासाठी जो लष्करी संघर्ष केला. त्याचे इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणावर व भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर दूरगामी परिणाम झाले होते. आझाद भारतीय सेनेतील अधिकाऱ्यांवर व सैनिकांवर सरकारने चालविलेल्या खटल्यांमुळे तर हिंदी लोकांच्या राष्ट्रप्रेमास उधाण आले होते. एकूण आझाद हिंद सेनेच्या तेजस्वी कामगिरीचा परिणाम इंग्रजांच्या हिंदुस्थानातील लष्करावरही झाला होता. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी भारतीय सैनिकांनी इंग्रजांविरूद्ध जो संघर्ष केला तो न्याय्यच होता. अशीच भावना भारतीय लष्करात जोराने फैलावू लागली. त्याचा परिणाम म्हणजेच इंग्रजांच्या 'रॉयल इंडियन नेव्ही' मध्ये बंड घडून आले. प्रांतातून नवी सरकारे सत्तारूढ होऊन काहीसे स्थिरस्थावर होते न होते तोच ब्रिटिश राज्यकर्त्यांना एका नव्या आपत्तीला तोंड द्यावे लागले. १८ फेब्रुवारी १९४६ रोजी मुंबई बंदरात उभ्या असलेल्या जहाजांवरील भारतीय नौसैनिकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांविरूद्ध व पर्यायाने ब्रिटिश सत्तेविरूद्ध सशस्त्र उठाव केला. चांगले अन्न व चांगली वागणूक मिळण्यासाठी भारतीय नौसैनिकांनी केलेला संप असे याचे वर्णन ब्रिटिश अधिकारी करीत असले तरी, तो संप नसून उठाव विद्रोह होता हे भारतीयांप्रमाणे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ही मनोमन ओळखले आणि म्हणूनच ह्या घटनेमुळे राज्यकर्ते अतिशय अस्वस्थ झाले होते. मुंबईतील भारतीय नौसैनिकाच्या ह्या उठावामागे अनेक कारणे होती त्यांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

### १५.२.१.१७ १९४६च्या नाविकांच्या बंडाची कारणे :

याचवेळी राष्ट्रीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन मौ. आझाद यांच्या अध्यक्षतेखाली कराची येथे भरले असता रॉयल इंडियन नेव्हीमधील काही अधिकारी त्यांच्या भेटीस आले होते. या अधिकाऱ्यांनी मौ. आझाद यांना या भेटीत सांगितले की, ब्रिटिश सरकार व काँग्रेस यांच्यामध्ये संघर्ष उभा राहिल्यास आम्ही काँग्रेसची बाजू घेऊन प्राणपणाने लढू. १८ फेब्रुवारी १९४६ रोजी ब्रिटिशाच्या रॉयल इंडियन नेव्हीच्या बंडाची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

#### १) राष्ट्रसभेची खंबीर स्वातंत्र्यवादी भूमिका :

१८ फेब्रु. १९४६ रोजी नौदलात झालेल्या बंडास हिंदुस्थानात राष्ट्रीय सभेने चालवलेली स्वातंत्र्याची चळवळ व त्यांची साम्राज्यवाद विरोधी भूमिका कारणीभूत होती. ''जे युद्ध साम्राज्यवादी हेतूंनी प्रेरित आहे व जे भारतातील आणि अन्य ठिकाणची साम्राज्यशाही बळकट करण्यासाठी लढले जात आहे. त्या युद्धात आपण ब्रिटिशांशी कोणतेही सहकार्य करणार नाही अशी खंबीर भूमिका राष्ट्रीय सभेने घेतल्यामुळेच नौदलतील सैनिकात असंतोष निर्माण होण्यास अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली होती

#### २) आझाद हिंद सेनेच्या कामगिरीचा प्रभाव :

आझाद हिंद सेनेची कामगिरी म्हणजे इंग्रजी सत्तेविरूद्धच एक मोठे बंडच होते. ते नुकतेच घडून येऊन त्याचे उदाहरण नौदलातील सैनिकांसमोर त्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा देत उभे होते. आपल्या देश बांधवांना गुलामीत जखडून साम्राज्यवादी सरकारविरूद्ध बंड पुकारणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. अशा भावना नौदलातील सैनिकांच्या मनामध्ये निर्माण झाली होती.

**३) सर्वसामान्य जनतेच्या मनातील देश प्रेमाच्या भावनेचा प्रभाव :**

संपूर्ण हिंदुस्थान देशातील हजारो लोक देशभक्तीने प्रेरित होऊन इंग्रजांच्या दडपशाहीविरूद्ध सामना करून लढ्यांचा काठ्यांचा मार बंदुकीच्या गोळ्या झेलून देशासाठी तुरूंगात जात होते. प्रसंगी हौतात्म्य पत्करत होते. आणि आपण साम्राज्यवादी सरकारच्या आज्ञा पाळून नौदलातील गणवेश परिधान करून मिरवणे भूषणास्पद नाही असे नौदलातील सैनिकांना वाटू लागल्यानेच त्यांच्यात बंडाची भावना निर्माण झाली होती.

**४) वंश श्रेष्ठत्वाचा इंग्रजांचा भारतीय सैनिकांना आलेला अनुभव :**

पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिश लष्करातील भारतीय सैनिकांना इंग्रजांच्या वंशभेदाचे व साम्राज्यवादी धोरणाचे चटके नेहमीच बसत पण आता दुसरे महायुद्ध संपल्यावर हे चटके अधिक जाणवू लागले होते. वास्तविक नौदलातील भारतीय सैनिकांना ब्रिटिश नौदलातील सैनिकांइतकाच पराक्रम दाखवून महायुद्धाच्या समाप्तीनंतर नौदलातील हिंदी सैनिकांच्या वाट्याला साम्राज्यवादी सरकारकडून उपेक्षाच आली. आपण गाजविलेल्या शौर्याचे साम्राज्यवादी सरकारने चीज केले नाही. अशी भावना नौदलातील भारतीय सैनिकांत सर्वत्र पसरली होती.

**५) आझाद हिंद सैनिक व ४२च्या चलेजाव चळवळीतील क्रांतिकारकांशी त्यांचा आलेला संबंध**

अशा असंतोषाच्या काळातच नौदलातील सैनिकांचा आझाद हिंद सेनेमधील क्रांतिकारी सैनिक व चलेजाव चळवळीतील क्रांतिकारक देशभक्त यांच्याशी संबंध प्रस्थापित झाले हे क्रांतिकारक त्यांना साम्राज्यवादी सत्तेचे जोखड फेकून देण्याविषयी आग्रह करू लागले होते. अशा प्रकारे नौदलातील सामान्य सैनिकांच्या मनात असंतोष खदखदत होता आणि मग त्याचा स्फोट १८ फेब्रुवारी १९४६ या दिवशी बंडाच्या रूपाने घडून आला.

**१५.२.२.१८ नौदलातील बंडाची सुरूवात :**

प्रत्यक्ष बंडाची ठिणगी पडण्यापूर्वी नौदलात स्वातंत्र्यप्रेमाचे वारे वाहू लागले होते. मुंबई बंदरात रॉयल इंडियन नेव्हीच्या अनेक नौका नांगरून उभ्या होत्या 'तलवार' ही त्यापैकीच एक प्रसिद्ध लढाऊ नौका. या नौकेवरील सैनिकांच्या एक गटाने 'आझाद हिंद चळवळ' नावाची एक गुप्त संघटनाही स्थापन केली होती. संघटनेच्या नावावरून त्यांनी सुभाषचंद्र बाबूंच्या आझाद हिंद सेने पासून प्रेरणा घेतली होती, हे स्पष्ट होते.

१ डिसेंबर १९४५ हा 'नौदलदिन' म्हणून साजरा होणार होता त्या दिवशी 'तलवार' या नौकेस भेट देण्याचे निमंत्रण मुंबईतील अनेक प्रतिष्ठित नागरिकांना दिलेले होते. अशा प्रसंगी आपल्या मनातील इंग्रजांविषयी द्वेष उघड करण्याचे 'तलवार' वरील नौदल सैनिकांनी ठरवले होते त्यांनी अत्यंत गुप्तपणे नौकेच्या भिंतीवर मोठमोठ्या अक्षरात पुढील घोषणा रंगवल्या 'भारत छोडो', 'साम्राज्यवाद्यांचा धिक्कार असो', 'आताच बंड करा', 'ब्रिटिशांना ठार करा', या घोषणा पाहताच गोऱ्या नौदल अधिकाऱ्यांना धक्काच बसला. चौकशी सुरू झाली. दुसऱ्या दिवशी 'तलवार'ला लष्कर प्रमुखांच्या भेठी होत्या. त्याही दिवशी या घोषणा नव्याने लिहिलेल्या आढळल्या परिणामी गोऱ्या अधिकाऱ्यांनी नौकेवरील पहारा कडक करून खास गुप्तहेरांकडून चौकशी सुरू केली. बी.सी.दत्त या नौदल सैनिकांच्या नेतृत्वाखाली हे सर्व घडून आल्याचे स्पष्ट झाले. दत्त यांना अटक करण्यात आली पण हा प्रकार बाहेर येऊ

शकला नाही. या प्रक्षोभक घटनेविषयी अत्यंत गुप्तता पाळली गेली होती. पण नौदल सैनिक स्वस्थ बसलेले नव्हते. १८ फेब्रुवारी १९४६ हा दिवस त्यांनी उठावासाठी निश्चित केला होता.

त्या दिवशी 'तलवार' वरील नौदल सैनिकांनी 'भूक हरताळ' संप सुरू केला. (१८ फेब्रुवारी) रॉयल इंडियन नेव्हीत असा प्रकार कधीच घडला नव्हता. त्यामुळे गोरे अधिकारी चक्रावून गेले होते. त्यांची धावपळ सुरू झाली. नौदलातील ध्वजाधिकारी रिअर ॲडमिरल नौकेवर तातडीने आले. त्यांनी संपवाल्यांशी चर्चा केली. आणि त्यांच्या लक्षात आले की हा संप राजकीय दृष्टीकोनातून घडून आला आहे. सायंकाळी नौदल सैनिकांनी एक संप समितीची स्थापना केली. समितीने तयार केलेल्या मागणी पत्रकात सुधारित सेवाशर्ती व चांगला अन्नपुरवठा या मागण्यांबरोबर आझाद हिंद सेनेतील सैनिकांसह हिंदुस्थानातील सर्व राजबंधांची सुटका करावी आणि इंग्रजांनी हिंदुस्थान सोडून जावे अशा क्रांतिकारी मागण्याही केल्या होत्या. मुंबईतील या बंडखोर नौदल सैनिकांचे नेतृत्व एम.एस.खान, मदन आणि दत्त हे नौदलातील, तीन सैनिक करीत होते. त्यांनी 'तलवार' वरील बिनतारी यंत्रणेच्या साहाय्याने अन्य युद्ध नौकांवरील आपल्या नौका सोडून 'तलवार'च्या दिशेने कूच केले.

**नौदलातील बंड**

''तलवार'' या नौकेवर उघड उघड बंड पुकारून नौदल सैनिक मुंबईच्या रस्त्यावर आले. त्यांना पाहून लोकांमध्ये अभूतपूर्व उत्साह संचारला. हजारो देशप्रेमी लोक त्यांच्या मिरवणुकीत सहभागी झाले. त्यामध्ये कापडगिरण्या, कारखाने, रेल्वे वर्कशॉपमधील शेकडो कामगार सहभागी झाले होते त्यांच्या 'इन्किलाब झिंदाबाद' आणि 'हिंदू-मुस्लिम एक है' या नाऱ्यांनी मुंबईचे मुख्य रस्ते गजबजून गेले होते.

नौदल सैनिकांनी अचानक पुकारलेला संप म्हणजे एकप्रकारे ब्रिटिश साम्राज्याविरूद्ध बंडखोरीच होती. हा उठाव पाहून इंग्रज सरकार हादरून गेले. कोणत्याही परिस्थितीत हा उठाव चिरडून टाकण्याचा इंग्रज सरकारने निश्चिय केला. पोलिस दल सशस्त्र सैन्यदल यांना पाचारण केले गेले. सतत चार दिवस मुंबईच्या रस्त्यांवर पोलिसांच्या गाड्या आणि रणगाडे फिरत होते. उठावात सामील झालेले लोक व सैन्यदल यांची धुमश्चक्री चालू राहिली. अनेक वेळा गोळीबार झाले. लोक रणगाड्यांवर व सशस्त्र सैनिकांवर दगडविटांचा मारा करून आपला प्रतिकार करीत होते. सरकारजवळ प्रभावी शस्त्रे व साधने होती तर उठावात सहभागी झालेले लोकनिशस्त्र होते. त्यांनी सरकारच्या गोळीबारास दाद न देता संघर्ष चालूच ठेवला. चार दिवसातील गोळीबारात २२८ जण मृत्युमुखी पडले. तरीही लोक मागे हटले नाहीत.

नौदल सैनिकांनी मात्र या वेळी आपल्या शस्त्रांनी प्रतिकार केला. भूदलाच्या सशस्त्र दलाने जेव्हा नौदलाच्या 'कॅसल' या बराकीस वेढा दिला तेव्हा उभयदलात गोळीबार घडून आला.

उठावात सहभागी झालेल्या नौकांना आणि त्यांच्या बराकींना वेढून त्यांची रसद बंद करण्याचा सरकारने निर्णय घेतला आणि सशस्त्र दलातील सैनिकांचे पहारे बसवण्यात आले. हे जेव्हा मुंबईतील लोकांना समजले की सरकार नौदल सैनिकांची कोंडी करून त्यांना शरण आणू पाहत आहे. तेव्हा मुंबईतील शेकडो देश प्रेमी नागरिकांनी खाद्य पदार्थांची पुडकी घेऊन गेट वे ऑफ इंडियाकडे कूच केले. आणि ही पुडकी नौदल सैनिकांना यशस्वीरित्या

पोहचवली. नौदल उठावातील एक प्रमुख नेते बी. सी. दत्त यांनी या प्रसंगावर 'म्युटिनी ऑफ द इंनोसंट' नावाचे पुस्तक लिहिले आहे.

इतिहासकार रजनी पामदत्त यांनी या उठावाचे वर्णन आपल्या 'इंडिया टुडे' या ग्रंथात केले आहे.

उठाव चालू राहिला असता तर त्यातून भीषण रक्तपात घडून आला असता आणि राष्ट्रीय सभेच्या ध्येयधोरणात न बसणारी ही घटना असल्याने कोणीतरी मधस्थी करून नौदल सैनिकांचा हा उद्रेक शमवण्यासाठी मदत करण्याची आवश्यकता होती. असे जाणकाराना वाटले त्यामुळे राष्ट्रसेभेचे नेते सरदार पटेल व मुस्लिम लिगचे नेते बॅ जिना यावेळी मुंबईस धावून आले आणि त्यांनी नौदल सैनिक व सरकार यांच्यात वाटाघाटी करून कोणात्याही नौदल सैनिकास शिक्षा होणार नाही व बंड करून उठल्याबद्दल कोणताही सूड उगवला जाणार नाही. असे सरकारच्या वतीने आश्वासन दिले गेले. हे आश्वासन मिळाल्यावर रॉयल इंडियन नेव्हीमधील बंडखोर सैनिकांनी २३ फेब्रुवारी १९४६ रोजी सकाळी सरकार पुढे शरणागती स्वीकारली. अशा प्रकारे नौदलातील हा अभूतपूर्व उठाव शांत झाला.

**१५.२.१.१९ नौदलातील उठावाचे राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्व : स्वातंत्र्य चळवळीतील याउठावाचे महत्व खालील प्रमाणे सांगता येते.**

**१) इंग्रजाचा लष्करावरील विश्वास उडाला :**

१८५७ साली सैनिकांनी इंग्रज सत्तेविरूद्ध उठाव केला होता. इंग्रज सरकारने तो ९० वर्षापूर्वी मोडून काढल्यानंतर भारतीय लष्कराची त्यांनी पुनर्रचना केली होती की हिंदी सैनिकांमध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणाच निर्माण होऊ नये. म्हणून भारतीय सैनिकांच्या फलटणी जातीच्या पायावर उभारून त्यांच्यात कधीच एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होणार नाही याची काळजी घेतली होती. पण सरकारच्या विश्वासाला पहिला तडाखा आझाद  हिंद सेनेच्या निर्मितीने बसला तर दुसरा तडाखा नौदलातील सैनिकांच्या उठावाने बसला. त्यामुळे इग्रंज सरकारचा लष्कारावरील विश्वासच उडला आणि भारतात आपल्याला लष्करी शक्तीच्या जोरावर राज्य करता येणार नाही याची त्यांना जाणीव झाली.

**२) आझाद हिंद सेनेच्या कृतीचे हे पूढचे पाऊल:** आझाद हिंद सेनेने जेव्हा हिंदुस्थानच्या भूमीवर प्रवेश केला त्यावेळी भारतीय लोक स्वातंत्र्य प्रेमाने भारावून जाऊन आपल्या आंदोलनात सहभागी होतील अशी नेताजींची अपेक्षा होती. ४२च्या चळवळीतील भूमिगत कार्यकर्त्यांचे असे काही 'आझाद दस्ते' निर्माण झाले होते. हिंदुस्थानच्या भूमीवर आझाद हिंद फौज येताच हे ''आझाद दस्ते'' तिला जाऊन मिळणार होते. पण भूमिगतांची चळवळ लवकरच संपुष्टात आल्याने नेताजींचे हे स्वप्न साकार झाले नाही. १९४६ च्या नौदलाच्या या उठावात मात्र बंड करून उठलेल्या सैनिकांशी लोकांनी मोठ्या देशभक्तीने व निर्भीड वृत्तीने सहकार्य केल्याचे दिसून येते. प्रा. ग. प्र. प्रधान हे आपल्या 'स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत' या ग्रंथात म्हणतात. 'नाविकबंडाचे खरे महत्त्व हे की या बंडामध्ये लोकशक्ती आणि बंडखोर नाविकांनी शक्ती यांचा संगम होऊन त्यांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध दंड थोपटले होते. सुभाषचंद्र बोस यांनी सुरू केलेल्या लढ्याचेच हे पुढचे पाऊल होते.'

**३) अंतिम स्वातंत्र्यसंग्रामाचे तिसरे पर्व :** हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीतील अंतिमपर्व १९४२च्या 'चलेजाव' संग्रमाने सुरू झाले. या अंतिम पर्वाचेही तीन भाग होते. सन १९४६ चा

नौदलाचा उठाव हा या पर्वाचा शेवटचा भाग होता. त्या भागाचे महत्त्व सांगताना प्रा. ग. प्र. प्रधान लिहितात, ‘१९४२ मधील चलेजाव चळवळ हे पहिले पर्व एकावेळी ब्रिटिशांच्या बाजूने लढणाऱ्या सैनिकांनी व अधिकाऱ्यांनी सुभाष बाबूंच्या नेतृत्वाखाली भारताच्या स्वातंत्र्यासाठी केलेला पराक्रमी संग्राम हे दुसरे पर्व. तिसऱ्या पर्वामध्ये नाविकांनी बंड केले असताना सर्वसामान्य जनतेने त्यांच्याशी हात मिळवणी केली आणि दोघांनी मिळून संयुक्तपणे ब्रिटिशसत्तेला आव्हान दिले. या तिसऱ्या पर्वात जे घडले त्यावरून भविष्य काळात काय घडेल याची ब्रिटिशांना कल्पना आली आणि त्यांनी साम्राज्याचा गाशा गुंडाळून भारत सोडून जाण्याचा निर्णय घेतला.’

**४) ॲटलीची घोषणा:** नौदलाचे बंड फेब्रुवारी १९४६ मध्ये झाले आणि १९ मार्च १९४६ रोजी इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये जाहीर केले की हिंदुस्थानातील राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी म्हणजे हिंदुस्थानला लवकरात लवकर स्वातंत्र्य देण्यासाठी आपल्या मंत्रिमंडळातील तीन सदस्यांचे एक शिष्ट मंडळ (कॅबिनेट मिशन) पाठवले जाईल ही घोषणा करण्यास जी परिस्थिती निर्माण झाली. त्यामध्ये नौदलातील सैनिकांचे बंड ही एक अतिशय महत्त्वपूर्ण घटना होती असे म्हणाले जाते.

अशाप्रकारे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्याच्या अंतिम पर्वात आझाद हिंद सेनेची तेजस्वी कामगिरी व नौदलातील सैनिकांचा स्वयंस्फूर्त उद्रेक या महत्त्वाच्या घटना मानल्या जातात. हे दोन्हीही उठाव वरवर अयशस्वी झाल्याचे दिसत असले तरी शेवटी त्यांच्या परिणामाच्या दृष्टीने विचार करता ते यशस्वी झाले हेच स्पष्ट होते. या दोन्ही उठावांमुळे हिंदुस्थानावर आता सैन्य बळाच्या जोरावर राज्य करता येणार नाही. ही राज्यकर्त्यांची भावना बळावत गेली. परिणामी हिंदुस्थान शक्य तितक्या लवकर सोडून जाण्याचा ब्रिटिशांनी निर्णय घेतला. आणि पुढच्या साली म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. नौदलातील १९४६ च्या नाविक बंडा विषयी सविस्तर माहिती विशद करा.

---

---

---

---

---

### क) १५.२.२ भारतीय राष्ट्रीय चळवळीला मिळालेला आंतरराष्ट्रीय प्रतिसाद :

राष्ट्र सभेच्या स्थापनेपासून ती भारतीय लोकांच्या न्याय हक्कांसाठी झगडत होती जसजसा काळ जाऊ लागला तसतसे तिने वेगळे स्वरूप धारण केले. लोकमान्य टिळक व म. गांधीच्या नेतृत्वाखाली तिने तीव्र प्रतिकाराची चळवळ सुरू केली तर दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर हिंदुस्थानातील जनतेतील विश्वासात न घेता हिंदुस्थानला दुसऱ्या महायुद्धात ओढले असताना काँग्रेसमधील अनेक क्रांतिकारक नेत्यांना स्वातंत्र्य मिळविण्याची दुसरे महायुद्ध एक सुवर्णसंधी आहे असे वाटले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला आंतरराष्ट्रीय

प्रतिसाद ही अनुकूल मिळू लागला होता. अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया या राष्ट्रांनी इंग्लंडवर दबाब आणून हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यासाठी प्रोत्साहित केले तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या आझाद हिंद सेनेला सहकार्य करून जर्मनी आणि जपान यांनी महत्त्वाचे योगदान दिले. भारतीय राष्ट्रीय चळवळीला मिळालेल्या आंतरराष्ट्रीय प्रतिसादाचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

### १) अमेरिका :

अमेरिका हे लोकशाहावादी राष्ट्र असल्याने व पहिल्या युद्धात सहभागी होत असताना अमेरिकेने आपण लोकशाहीच्या सरंक्षणासाठी दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उतरत आहोत असे जाहीर करून लोकशाही मुल्यांचे रक्षण करण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला होता. तेव्हापासून अमेरिकेला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीबद्दल आस्था वाटत होती. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर इंग्लंड-अमेरिका पुन्हा एकाच बाजूने युद्धात उतरले होते. या युद्धात इंग्लंड-अमेरिका युती होऊन अॅटलॅन्टिक सनदेनुसार स्वातंत्र्य, लोकशाही, स्वयंनिर्णय इ. तत्त्वांचा उद्‌घोष करण्यात आला. प्रत्येक राष्ट्रास त्याचे भवितव्य ठरविण्याचा अधिकार मान्य करण्यात आला पण १९४१ मध्ये चर्चिलने जाहीर केले की, अॅटलॅन्टिक सनद हिंदुस्थानला लागू राहणार नाही. इंग्लंडचा हा कट्टर साम्राज्यवाद अमेरिकेला पसंत पडला नाही. युद्ध संपल्यानंतर साम्राज्यतंर्गत स्वराज्य देण्यास चर्चिलचा विरोध होता हीच गोष्ट हिंदी लोकांच्या असंतोषाचे व त्याच्या असहकाराचे कारण होते. पूर्वेकडील जपानविरूद्ध युद्ध जिंकण्यासाठी हिंदुस्थानाचे सहकार्य आवश्यक आहे असे अमेरिकन राष्ट्राध्याक्ष रूझवेल्ट यांचे मत होते. परिणाम प्रे. रूझवेल्टनी चर्चिलवर दबाव आणून हिंदुस्थानला स्वराज्य देण्यासाठी योजना तयार करण्यास भाग पाडले या मागे अमेरिकेचा स्वार्थी दृष्टीकोन वरवर दिसत असला तरी लोकशाहीचा प्रसार करणे हा मुळ हेतु असल्यामुळे अमेरिकेचे भारतीय राष्ट्रीय चळवळीला अनुकूल प्रतिसाद देवून हिंदुस्थानला लवकरात लवकर स्वातंत्र्य कसे मिळेल या दृष्टीने प्रयत्न केले होते.

### २) चीन :

१९४९ च्या चीनी क्रांतीनंतर कम्युनिस्ट चीन आणि भारत यांचे संबंध फारसे सलोख्याचे राहिले नसले तरी, दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान भारताच्या स्वातंत्र्य चळवळीस चीनचा अनुकूल प्रतिसाद होता कारण १९११च्या क्रांतीने चीनने अनियंत्रित राजसत्तेचा शेवट करून लोकशाही शासन व्यवस्थेची निर्मिती केली. थोडक्यात १९४९ पूर्वी चीनही लोकशाहीचा पुरस्कारर्ता होता. दुसऱ्या महायुद्धात चीन दोस्तांच्या गटात होता. चीनचे सरसेनापती चँग-काय-शेकने १९४२ साली हिंदुस्थानला भेट दिली. त्यावेळी त्यांनी हिंदी लोकांच्या न्याय मागण्या सरकारने लवकर पुऱ्या कराव्यात अशा प्रकारचे आवाहन त्यांनी ब्रिटिश सरकारला केले होते. थोडक्यात अमेरिकेप्रमाणेच आशिया खंडातील आणि हिंदुस्थानचे शेजारी राष्ट्र चीनचाही भारतीय राष्ट्रीय चळवळीला सकारात्मक प्रतिसाद मिळल्यानेच दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर इंग्लंडला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी वेव्हेल योजना (१९४५) कॅबिनेट मिशन म्हणजेच त्रिमंत्री शिष्ट मंडळ (१९४६), लंडन परिषद अॅटलीची घोषणा आणि लॉर्ड माऊंटबॅटन यांची फाळणीची योजना या सारख्या योजना राबवून स्वातंत्र्याच्या दृष्टीने अनुकूल वातावरण तयार केले.

**३) ऑस्ट्रेलिया :** भारतीय राष्ट्रीय चळवळीला अमेरिका चीन राष्ट्राप्रमाणेच एकेकाळी ब्रिटनची वसाहत असलेल्या ऑस्ट्रेलियाने अनुकूल प्रतिसाद देवून इंग्लंड लवकरात लवकर हिंदुस्थानाची साम्राज्यवादातून मुक्तता करून स्वातंत्र्य दयावे यासाठी इंग्लंडवर दबाव आणण्यास सुरूवात केली होती. ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रमंत्री डॉ. इव्हॅट यांनीही हिंदी प्रश्नाची लवकर सोडवणूक करण्याची सूचना ऑस्ट्रियन पार्लमेंट मध्ये ब्रिटिशांना केली होती. त्यामुळेच भारतीय राष्ट्रीय चळवळीला सर्व स्तरातून आणि देश विदेशातून अनुकूल प्रतिसाद मिळू लागल्यामुळेच ब्रिटिशांना हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यावे लागले.

**४) इंग्लंडची संसद :** इंग्लंड राष्ट्र स्वतःच्या देशात लोकशाहीचा पुरस्कार करते एवढेच नव्हेतर जागतील लोकशाहीचा प्रथम पुरस्कर्ता म्हणून म्हणवून घेते आणि आपल्या वसाहतीवर मात्र साम्राज्यवादी राज्य करते हे खुद्द ब्रिटिश संसदेतील अनेक सभासदांना पटत नव्हते. संसदेने ब्रिटिश भारताच्या अनेक प्रश्नांकडे विलायत सरकारचे लक्ष वेधले होते. व भारतीयाच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष द्यावे म्हणून आपली मते स्पष्ट पणे मांडावयास सुरूवात केली होती. व भारतीयांच्या राष्ट्रीय चळवळीस एक प्रकारे प्रोत्साहन दिले होते.

**५) जर्मनी :** भारतीय राष्ट्रीय चळवळ काँग्रेसची गांधीजीच्या नेतृत्वाखाली लढ्या बरोबरच अनेक डाव्या विचारसरणीच्या क्रांतिकारांच्या चळवळीचे योगदान होते. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याची सुभाषचंद्र बोस यांची तयारी होती. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिशांना अडचणीत आणण्यासाठी आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हिच सुवर्णसंधी आहे. आणि या संधीचे आपण सोने केले पाहिजे आणि त्यासाठी कोणताही मार्गाचा अवलंब करण्यास नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या सारखे नेते तयार होते म्हणून इंग्लंडच्या विरूद्ध दुसऱ्या महायुद्धात जर्मनी व जपान या हूकूमशाह्यांची पाठिंबा घेण्याची तयारी केली त्यासाठी ते २७ जानेवारी १९४१ रोजी ब्रिटिश सरकारच्या नजरकैदेतून सुटका करुन काबूल - रशिया - इटालीच्या मदतीने जर्मनीत जाऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. हिटलर व मुसोलिनी या नेत्यांच्या भेटी घेतल्या हिटलरचा उजवा हात रिबेन ट्रॉप याच्या मदतीने बर्लिन रेडिओवरून ब्रिटिशाविरूद्ध भारतीय जनतेला स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याचे आव्हान करून ब्रिटिशाविरूद्ध जर्मनीला पाठिंबा दिला तर जर्मनीने भारतीय राष्ट्रीय चळवळीला अनुकूल प्रतिसाद दिला. त्यामुळे ब्रिटिशांना लवकरात लवकर भारताला स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने पाऊल टाकावे लागले.

**६) जपान :** जपानने अमेरिकेच्या पर्लहर्बरवर हल्ला केला आणि दुसऱ्या महायुद्धात जपान-अमेरिका युद्ध भडकले आणि जागतिक युद्धाला वेगळे वळण लागले. अतिपूर्वेकडील युद्धात जपानने दोस्त राष्ट्राविरूद्ध आघाडी उभारली दक्षिण आशियातील युद्धात भारताचे सहकार्य मिळविण्यासाठी भारताच्या राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा देवून जपानच्या ताब्यात ब्रिटिशांच्या लष्करातील जे भारतीय सैनिक युद्ध कैदी म्हणून जपानच्या ताब्यात होते त्या सैनिकांनी आझाद हिंद सेना रासबिहारी बोस यांच्या अध्यक्षतेखाली उभारली होती. या आझाद हिंद सेनेचे नेतृत्व सुभाष बाबूंकडे आले सुभाषचंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या आझाद हिंदच्या हंगामी सरकारला जगातील जपान, जर्मनी, इटाली, ब्रह्मदेश, चीन, मांचुरिया, यासारख्या अनेक देशांनी पाठिंबा देऊन एक प्रकारे भारतीय राष्ट्रीय चळवळीला आपला पाठिंबा जाहीर केला होता.

भारतीय राष्ट्रीय चळवळ २८ डिसेंबर १८८५ रोजी स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेपासून सुरू झाली तेव्हापासून मवाळ काँग्रेस, जहाल काँग्रेस, गांधीवादी काँग्रेस, क्रांतिकारी चळवळी डाव्या विचारसरणीच्या चळवळी नेताजींच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद

सेनेचा लढा तर गांधीच्या नेतृत्वाखालील चलेजाव चळवळ असा विचित्र टप्प्यातून राष्ट्रीय चळवळ तावून सुलाखुन निघाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान तर भारतीय राष्ट्रीय चळवळ जोमात आली. या भारतीय राष्ट्रीय चळवळीला अमेरिका, जपान, चीन, ऑस्ट्रेलिया, इटाली, जर्मनी, ब्रह्मदेश, मांचुरिया या देशाचा सकारात्मक पाठिंबा मिळून आंतरराष्ट्रीय प्रतिसाद मिळाला.

**स्वअध्यनासाठी प्रश्न.**

१. भारतीय राष्ट्रीय चळवळीला मिळालेला आंतरराष्ट्रीय प्रतिसाद या विषयी सविस्तर माहिती विशद करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १५.३ स्वातंत्र्य आणि फाळणी (FREEDOM AND PARTITION)

**१५.३.१** १९४६ सालच्या अखेर देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती. काँग्रेस आणि मुस्लिम लिग या प्रमुख राजकीय पक्षात तडजोड होण्याची शक्यता दिसत नव्हती. त्यामुळे हंगामी सरकारने कामकाज चालणे अशक्य झाले होते. देशातील अनेक भागात जातीय दंगलीचे सत्र सुरू होते. आणि त्याला आवर घालण्यात हंगामी सरकार असमर्थ ठरत होते. कायदा आणि सुव्यवस्था कायम टिकविण्यात शासकीय यंत्रणा असमर्थ ठरत होती. लॉर्ड वेव्हेल हे उत्तम लष्करी अधिकारी असले तरी गुंतागुंतीचा राजकीय पेच सोडविण्यास लागणारी मुत्सुद्देगिरी त्यांच्याकडे नव्हती. भारतातील परिस्थिती हाताळण्यात लॉर्ड वेव्हेल यांना यश न आल्यामुळेच त्यांच्या जागी लॉर्ड मॉऊन्ट बॅटन याची नियुक्ती करण्याचे ब्रिटिश सरकारने ठरविले होते. कारण भारतीयांना शस्त्रबळाच्या सहाय्याने यापुढे दडपून ठेवण्याइतकी शक्ती महायुद्धामुळे दुबळ्या झालेल्या इंग्लंडमध्ये महायुद्धानंतर उरलेली नाही. हे सर्व ध्यानात घेऊन ब्रिटिश मंत्रिमंडळाने भारताबाबत एक तातडीचा निर्णय घेतला. हा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय पंतप्रधान ॲटली यांनी २० फेब्रुवारी १९४७ रोजी कॉमन्स सभेत घोषित केला की, कॅबिनेट योजनेनुसार प्रस्थापित झालेल्या व सर्व भारतीय राजकीय पक्षाचे समर्थन असलेल्या सरकारच्या हाती भारताच्या शासनाची सुत्रे सोपविण्याची ब्रिटिश सरकारची इच्छा आहे. परंतु सध्याची स्थिती असे सरकार अस्तित्वात येण्याची लक्षणे दिसत नाहीत. देशातील स्थिती अत्यंत स्फोटक बनलेली आहे ती फार काळ तशीच राहू देणे धोक्याचे व हानीकारक आहे; म्हणून जबाबदार भारतीयांच्या हाती देशाच्या शासनाची सुत्रे जून १९४८ पूर्वी सोपविण्याचा निर्णय ब्रिटिश सरकारने घेतला आहे. ह्या घोषणेबरोबरच ब्रिटिश सरकारच्या नव्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी व्हिस्काऊंट लुई माऊंटबॅटन यांची नवे गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचेही ॲटली यांनी घोषित केले.

### १५.३.२ लॉर्ड माऊंटबॅटन यांची नियुक्ती :

२४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन यांचा भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून शपथविधी झाला ते भारतातील अखेरचे ब्रिटिश गव्हर्नर जनरल होते. हे पद स्वीकारण्यापूर्वी माऊंटबॅटन यांनी दोन अटी घातल्या होत्या त्या म्हणजे

१) ब्रिटिशांनी भारत सोडण्यासाठी निश्चित कालमर्यादा निर्धारित केली जावी.
२) भारतातील आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेता त्यांना निर्णय स्वातंत्र्य व कार्य स्वातंत्र्य दिले जावे.

या दोन्ही अटी ब्रिटिश मंत्रिमंडळाने मान्य केल्यानंतर माऊंटबॅटन भारतात गव्हर्नर जनरलच्या पदाची जबाबदारी स्वीकारण्यास तयार झाले. लॉर्ड माऊंटबॅटन यांना ॲटलींनी बरेच निर्णय स्वातंत्र्य व कार्य स्वातंत्र्य दिले असले तरी ब्रिटिश सरकार च्या मूलभूत धोरणाबाबत स्थूलमानाने मार्गदर्शनपर असे एक सूचनापत्रही त्यांना भारतात येण्याच्या वेळी दिले होते. ते म्हणजे १६ मे १९४६च्या कॅबिनेट मिशन योजनेनुसार भारतात नवी शासन व्यवस्था प्रस्थापित करण्याची शक्यतो प्रयत्न करावा; परंतु हे उद्दिष्टे १ ऑक्टोंबर पर्यंत साध्य न झाल्यास भारतातील विद्यमान परिस्थितीत कोणती पावले उचलणे आवश्यक आहे याबद्दलचे आपले मत ब्रिटिश सरकारला कळवावे. हंगामी सरकारला दैनंदिन शासनाबाबत जास्तीत जास्त स्वातंत्र्य द्यावे. सत्तांतर सुरळीत होण्यासाठी भारतीय नेत्यांशी चांगले संबंध ठेवावेत. लॉर्ड माऊंटबॅटन यांना त्यांच्या अधिकार ग्रहणाच्या वेळी भारतातील वाढत्या तणावपूर्ण परिस्थितीचीपूर्ण जाणीव होती. जिना पाकिस्तानच्या मागणीवर अडून बसले तर सत्तांतराची कमाल कालमर्यादा ब्रिटिश सरकारने जाहीर केल्याचा आनंद एकीकडे काँग्रेस वर्तुळात होता. तर दुसरीकडे त्या घोषणेने ध्वनित होणाऱ्या देशाच्या विभाजनाच्या विरूद्ध पुन्हा एकदा जनआंदोलन उभे करावे असे गांधीजींना वाटत होते.

अशा स्थितीत भारतातील दोन्ही महत्त्वाच्या पक्षांशी सलोखा ठेऊन सत्तांतराच्या योजनेला त्यांची लवकरात लवकर संमती मिळवावयाची व सत्तांतर शक्य तितक्या सुरळीतपणे घडवून आणावयाचे ही लॉर्ड माऊंट बॅटन त्यांच्या समोरील उद्दिष्टे होते.

### १५.३.३ सत्तातंराच्या वाटाघाटी :

सत्तातंराची कोणती योजना सर्वमान्य ठरेल याचा अंदाज घेण्यासाठी लॉर्ड माऊंट बॅटन यांनी ताबडतोब भारतीय नेत्यांशी बोलणी सुरू केली सर्व नेत्यांची एकत्र बैठक बैठक बोलविण्या ऐवजी त्यांनी प्रत्येक आघाडीच्या नेत्याशी वैयक्तिक रित्या बोलणी करण्याचा मार्ग स्वीकारला. स्वतः काही नवे मुद्दे त्यांच्या पुढे मांडण्या ऐवजी स्वतः फारसे न बोलता भारतीय नेत्यांना त्यांनी मोकळेपणे बोलू दिले. त्यांची भूमिका समाजावून घेतली.

३१ मार्च ते ४ एप्रिल या ४-५ दिवसात लॉर्ड माऊंटबॅटन ह्यांनी म. गांधीची भेट घेतली. भारतीय पेचप्रसंग सोडविण्यासंबंधी म. गांधीनी लॉर्ड माऊंटबॅटन यांना पुढील सल्ला दिला. जिनांना मंत्रिमंडळ बनविण्यासाठी संधी द्या त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली तर काँग्रेस त्यांना सहकार्य देईल. फक्त अट एकच ती म्हणजे जीना यांनी संपूर्ण हिंदुस्थानात शांतता प्रस्थापित करावी सत्तांतर होण्यापूर्वी जिनांनी पाकिस्तानची योजना बळाचा वापर न करता सर्वाकडून मान्य करून घ्यावी. तसे झाले म्हणजे एखाद्या प्रातांवर किंवा प्रांताच्या भागावर कुठल्याही प्रकारची सक्ती राहणार नाही. जर जिना ह्या गोष्टीला मान्यता देत नसतील तर ती संधी काँग्रेसला देण्यात यावी.

म. गांधीच्या वरील प्रकारच्या सल्ल्यामुळे माऊंट बॅटन क्षणभर हादरलेच त्यानंतर ते जिनांना ५ एप्रिल १९४७ रोजी भेटले त्यावेळी जीनांची ताठर भूमिका त्यांना दिसून आली. ७ एप्रिल रोजी माऊंटबॅटन व जिना याची दुसरी बैठक झाली. तेव्हा मुसलमान हे हिंदुपेक्षा कसे वेगळे आहे. स्वातंत्र राष्ट्राची मुसलमानांना का आवश्यकता आहे; हे त्यांनी समजावून

सांगितले. १० एप्रिल रोजी दोघांमध्ये तिसरी भेट झाली तेव्हा पाकिस्तानच्या मागणी पासून जिना तसूभर ही ढळत नाही हे त्यांना दिसून आले.

### १५.३.४ भारतीय पुढाऱ्यांशी चर्चा :

भारतीय पुढाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर माऊंटबॅटन यांनी प्रातांच्या गव्हर्नरांनी भेट घेऊन त्यांचेही मनोगत जाणून घेतले असता त्यांच्या लक्षात आले की, पाकिस्थानात जाण्याला पंजाबमधील शिखांना विरोध आहे तसे पूर्व पंजाबमधील गैर मुस्लिमांनाही पाकिस्तानला विरोध आहे. तर बंगालचे गव्हर्नर सुऱ्हावर्दी व शरदचंद्र बोस यांनी स्वतंत्र बंगालची मागणी केली. तर वायव्य सरहद्द प्रांतांतील खुदाई खिदमतगार संघटनेने पाकिस्तानच्या निर्मितीला विरोध केला होता. भौगोलिक दृष्ट्या हा प्रांत संकल्पित पाकिस्तानाच्या प्रदेशाला लागून होता. त्यामुळे येथील ८० टक्के मुस्लिम जनतेचे  मत अजमावणे आवश्यक आहे असे माऊंट बॅटन यांचे मत बनले. १९ एप्रिल पर्यंत म्हणजे भारतात आल्यापासून एक महिन्याच्या आतच भारताचे विभाजन अटल असल्याचा निष्कर्ष माऊंटबॅटन यांनी काढला होता. त्यानंतर लगेच माऊंटबॅटन व त्यांचे प्रमुख सल्लागार इस्मे; सर एरिक मेव्हिल व सर जॉर्ज ॲबेल यांनी मिळून देशाच्या फाळणीचा कच्चा मसुदा तयार केला. तो घेऊन इस्मे व ॲबेल २ मे रोजी इंग्लंडला गेले. ब्रिटिश मंत्रिमंडळाने ब्रिटिश हिताच्या दृष्टीने त्यात थोडे फेरबदल केल्यानंतर तो मसुदा घेऊन ते १० मे रोजी भारतात परत आले त्यानुसार तो मसुदा मान्यतेकरीता भारतीय नेत्यांच्या पुढे ठेवण्यासाठी माऊंटबॅटन यांनी १७ मे रोजी त्यांना भेटीसाठी बोलविले.

### १५.३.५ भारताच्या फाळणीचा पहिला मसुदा :

ज्या दिवशी नव्या योजनेचा मसुदा घेऊन इस्मे व ॲबेल भारतात परत आले त्यादिवशी लॉर्ड माऊंटबॅटन सिमला येथे होते पंडीत नेहरू आणि कृष्णन मेनन हे ही त्यांचे अतिथी म्हणून सिमल्यात होते. योजनेचा मसुदा सर्वांपुढे मांडण्यापूर्वी नेहरूना दाखवून त्यांची पूर्व संमती मिळवून घेता येईल असे बॅटन यांना वाटल्यामुळे त्यांनी नेहरूंना हा मसुदा दाखविला होता. नेहरूंनी त्यावर तीव्र प्रतिक्रिया देऊन या मसुद्याला विरोध केला. कारण त्या योजनेनुसार त्यावेळी कार्यरत असलेली केंद्रीय शासनयंत्रणा बरखास्त होत होती. सर्व प्रातांना व संस्थानांना स्वायतत्तेचे अधिकार मिळणार होते. भारताची प्रादेशिक अखंडता संपुष्टात येऊन हा खंडप्राय देश लहान-लहान स्वतंत्र राज्यात विभागला जाणार होता. अशा प्रकारचे सत्तांतर नेहरूंना व काँग्रेसला कदापिही मान्य होणे शक्य नव्हते. देशाच्या स्वातंत्र्या इतकीच देशाची अखंडता कायम राहणे ह्या काँग्रेसच्या तात्विक भूमिकेचा मूलाधार होता. तर गांधीना देशाच्या फाळणीची कल्पना मुळात मान्य नव्हती. स्वातंत्र्यासाठी व शांततेसाठी देशाच्या अखंडत्वाची जबर किंमत देणे त्यांना मान्य नव्हते. फाळणीपेक्षा यादवी परवडेल असे त्यांचे मत होते. काँग्रेसच्या कार्यकारिणीला गांधीजीची भूमिका पटत नव्हती. देशात शांतता नांदण्यासाठी एक अपरिहार्य आपत्ती म्हणून फाळणी मान्य करावी असे काँग्रेसमध्ये अनेकांना वाटत होते. परंतु अशा स्थितीत सत्तांतर व्हावयाचे ते प्रबळ केंद्रशासनाच्या हाती व्हावे. प्रांतिक शासकांच्या हाती नाही. अशी त्यांनी ठाम भूमिका होती म्हणूनच नेहरूंनी या मसुद्याला विरोध केला म्हणूनच 'माऊंटबॅटन' यांनी ती योजना मागे घेतली.

### १५.३.६ फाळणीचा दुसरा मसुदा :

फाळणी विषयी नेहरूंची अत्यंत प्रतिकूल प्रतिक्रिया लक्षात घेऊन माऊंट बॅटन यांनी फाळणीसंबंधी दुसरा मसुदा तयार केला. त्यात मुस्लिम लिग व काँग्रेस यांना एक संघ राज्य

मंजूर नसेल तर भारताची फाळणी करून भारत व पाकिस्तान अशी दोन सार्वभौम राज्ये तयार करण्यात येतील. प्रादेशिक तत्त्वावर लष्कराची विभागणी करण्यात येईल. ती राज्ये घटनासमितीला जबाबदार राहतील. प्रादेशिक तत्त्वावर लष्कराची विभागणी करण्यात येईल. असे नमूद करण्यात आले. पं. नेहरूंना फाळणीचा हा मसुदा दाखविल्यावर त्यांनी तिला मंजुरी दिली. परंतु जिनांनी मात्र पुन्हा आडमुठ्ठी भूमिका घेतली. मुस्लिम लिगने फाळणीला नकार दिला. एवढेच नव्हेतर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानला जोडण्यासाठी भारतातील ८०० मैलांची भूपट्टी मुस्लिम लिगने मागितली होती. पण यावेळी काँग्रेसचे नेते जागरूक होते व त्यांनी तसे होऊ दिले नाही.

३ जून १९४७ रोजी सायं. ७ वाजता व्हाईसरॉय माऊंटबॅटन यांनी आकाशवाणी वरून पंतप्रधान ॲटली यांच्यावतीने फाळणीची योजना घोषित केली. ती योजना माऊंट बॅटन योजना म्हणून ओळखली जाते. त्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी सत्तांतर करण्याचे घोषित करण्यात आले. पंजाब व बंगाल प्रांतांची फाळणी करण्यात येणार होती. बलुचिस्तान वायव्यसरहद प्रांत व आसाममधील सिलहट जिल्ह्यात सार्वमत घेण्यात येणार होते. त्यानंतर पं. नेहरू, बॅ. जिना सरदार बलखेसिंग यांनी देशातील जनतेला केलेल्या आवाहनाचे प्रक्षेपण झाले. पं. नेहरूनी 'जयहिंद' म्हणून भाषणाची समाप्ती केली. तर जिनांनी 'पाकिस्तान जिंदाबाद' म्हणून आपले भाषण संपादिले.

**१५.३.७ माऊंटबॅटन योजना :**

मुस्लिम लिगने आडमुठे धोरण अवलंबिल्यामुळे त्रिमंत्री योजना असफल झाल्यानंतर मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रदेशांच्या पाकिस्तान निर्मितीची पंजाब व बंगाल यांच्या फाळणीची योजना होती. तसेच भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राज्यांचा समावेश होता. लॉर्ड माऊंट बॅटन यांनाही योजना पसंत पडल्यामुळे आणि सर्वांना ती मान्य असल्यामुळे त्यांनी ती योजना ३ जून १९४७ रोजी प्रसिद्ध केली. तिलाच माऊंट बॅटन योजना म्हणून ओळखले जाते. या मांऊटबॅटन योजनेत एकूण २० कलमे होती. त्यातील ठळक मुद्दे पुढील प्रमाणे -

१) अस्तित्वात असलेल्या भारतीय घटना समितीचे कामकाज चालू राहिल परंतु घटनासमिती तयार करीत असलेली घटना ज्यांना मान्य नसेल त्यांच्यावरती ती लादली जाणार नाही. ज्यांना घटना समितीचे निर्णय मान्य नसतील त्यांनी आपली स्वतंत्र घटनासमिती बनवून आपल्या घटनेबाबत निर्णय घ्यावा.

२) पंजाब व बंगाल प्रांतांच्या कायदेमंडळातील सदस्यांची दोन गटात विभागणी केली जाईल. एक गट मुस्लिम बहुसंख्य प्रदेशाच्या प्रतिनिधींचा व दुसरा गैर मुस्लिम बहुसंख्य जिल्ह्याच्या प्रतिनिधींचा त्यांच्या वेगवेगळ्या बैठका होतील व तेथे प्रांतांच्या विभाजनाचा निर्णय बहुमताने घेतला जाईल. त्यांनी बहुमताने विभाजनाचा निर्णय घेतल्यास त्या दोन गटांनी कोणत्या घटना समितीत सामील व्हावयाचे ते ठरविण्याची मुभा त्यांना राहील.

३) सिंधने कोणत्या घटनासमितीत सामील व्हावयाचे ते तेथील विधि मंडळातील सदस्य साधारण बहुमताने ठरवतील.

४) वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान यांच्या राजकीय भवितव्याबद्दल निर्णय तेथे सार्वमताने घेतला जाईल.

५) आसाम प्रांतातील सिलहट जिल्ह्याच्या राजकीय भवितव्याबद्दलचा निर्णय सार्वमताद्वारा घेण्यात येईल. सिलहट शिवाय आसमचा उर्वरित प्रदेश कार्यान्वित असलेल्या घटनासमितीच्या कक्षेत राहील.

६) संस्थानांवरील ब्रिटिश सार्वभौमत्व संपल्यानंतर त्यांना त्यांच्या भवितव्याबद्दल निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य राहील.

७) भारताची दोन स्वतंत्र स्थायत्त राज्ये प्रस्थापित होण्याचा निर्णय झाल्यास त्या दोन स्वायत सरकारांनी फाळणीशी संलग्न असलेल्या समस्यांवर वाटाघाटी करून निर्णय घ्यावा.

८) भारतात प्रस्थापित होणाऱ्या दोन स्वायत्त राज्यांनी सत्तेच्या हस्तांतरणातून उद्‌भवणाऱ्या बाबी संबंधी इंग्लंडच्या सरकारशी करार करावेत.

९) ब्रिटिश सरकार १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थानची सत्ता सोडून देईल.

१०) भारत व पाकिस्तान या दोन राज्यांच्या सीमा ठरविण्यासाठी एक सीमा कमिशन नियुक्त केले जाईल.

राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटीने माऊंट बॅटन योजनेला त्याच दिवशी मान्यता दिली. बॅ. जिनांना सर्व बंगाल व पंजाब पाहिजे होता. त्यांनी योजना स्वीकारावयास थोडी खळबळ केली. पण शेवटी त्यांनाही मान्यता द्यावी लागली. महात्मा गांधी सर्वांत अधिक दुःखी होते. पं. नेहरू व सरदार पटेल यांनी युक्तिवाद करून त्यांचे मत परिवर्तन केले खरे परंतु त्यांच्या ह्रदयातील दुःख नाहीसे झाले नाही. ‘फाळणीमुळे देशाची हानीच होणार आहे १५० वर्षाची गुलामगिरी जाईल हे खरे पण आपले स्वातंत्र्य फार काळ टिकणार नाही. फाळणीच्या योजनेमागील दूष्टपणा दिसत आहे. या विचाराने मला वेदना होतात.’ असे उद्‌गार ते काढू लागले.

हिंदू महासभेने फाळणीस आपला कडवा विरोध दर्शविला समाजवादी पक्षाने आपली नापसंती जाहीर केली. शिखांनी लाहोर येथे परिषद घेऊन आपल्याला भारताची फाळणी मंजूर नसल्याचे जोरदार मत व्यक्त केले. तथापि राष्ट्रसभा व लीग या दोन प्रमुख राजकीय पक्षांनी फाळणी मंजूर केल्यावर ब्रिटिश सरकारने इतर पक्षांच्या मतांकडे फारसे लक्ष दिले नाही. प्रदेशांची फाळणी करून सीमा ठरविण्यासाठी रॅडक्लिफ कमिशन नियुक्त केले. बॅ. जिनांना हिंदी नोकरशाहीचीही फाळणी पाहिजे होती. त्यांना मुसलमानेत्तर अधिकारी पाकिस्तानात राहवयास नको होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे नोकरशाहीची एवढेच नव्हेतर लष्कराची, लष्करी साधनसामग्रीचीही फाळणी करण्यात आली.

### १५.३.८ भारतीय स्वातंत्र्याचा कायदा - १९४७

लॉर्ड माऊंट बॅटन यांनी हिंदुस्थानच्या फाळणीची योजना मांडली. हिंदुस्थानातील सर्व पक्षांनी व नेत्यांनी फाळणीस मान्यता दिली. भारताला स्वातंत्र्य देणारे बील १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंट मध्ये ॲटली सरकारने मांडले. अवघ्या चौदा दिवसात ते दोन्ही सभागृहांनी मंजूर करून इंग्लंडच्या राजाने त्याला संमत्ती देताच त्याचे कायद्यात रूपांतर झाले. यानंतर भारत व पाकिस्तान ही दोन नवी स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रे निर्माण झाली. या

कायद्याला भारतीय स्वातंत्र्याचा कायदा असे म्हणतात. या कायद्यातील तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

१) ब्रिटिश पार्लमेंटकडे व हिंदुस्थान सरकारकडे हिंदुस्थानातील असलेली सर्व सत्ता १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत सरकार व पाकिस्तान सरकार यांच्याकडे देण्यात येईल. १५ ऑगस्ट रोजी भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण होतील.

२) घटना निर्माण होईपर्यंत व त्या घटनांची अंमलबजावणी होईपर्यंत दोन्ही राज्यांच्या घटना-परिषदा त्या-त्या राज्यांच्या कायदेमंडळाचे कार्य करतील.

३) राज्यांचे कायदेमंडळ तयार होईपर्यंत सध्याचे सर्व कायदे त्या स्वरूपात अस्तित्वात असतील.

४) १५ ऑगस्ट १९४७ नंतर हिंदुस्थानातील कोणत्याही प्रदेशावर इंग्लंडच्या सरकारचा हक्क राहणार नाही.

५) दोन्ही देशांना स्वतंत्र कायदेमंडळ असतील, त्यांना आपल्या देशासाठी कायदे बनवण्याचा अधिकार राहील.

६) घटना परिषदांनी आपापल्या देशांसाठी घटना निर्माण कराव्यात. घटना निर्माण होऊन त्यांनी अंमलबजावणी सुरू होईपर्यंत १९३५च्या कायद्याप्रमाणे राज्यकारभार व्हावा. अर्थात त्यात बदल करण्याचा अधिकार कायदेमंडळांना राहिल.

७) भारत मंत्री व त्याचे कार्यालय बंद करण्यात येईल.

८) ब्रिटिश राष्ट्रकुटुंबात (राष्ट्रकुल परिषदेत) राहवयाचे किंवा नाही याचा निर्णय उभय राष्ट्रांनी स्वतंत्रपणे घ्यायचा आहे.

९) ब्रिटिश सरकारचे संस्थांनांशी झालेले सर्व करारमदार रद्द करण्यात येत आहेत. संस्थांनांनी भारत किंवा पाकिस्तान यांच्यात सामिल व्हावे अगर स्वतंत्र राहावे.

१०) वायव्य सरहद्दीवरील रानटी टोळ्यांशी इंग्रजांनी केलेले करार १५ ऑगस्ट पासून रद्द होतील.

११) ब्रिटनच्या राजाचे 'हिंदुस्थानचा सम्राट' हे पद या कायद्याने रद्द करण्यात येत आहे.

### १५.३.९ पाकिस्तानची निर्मिती :

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापर्यंत शासकीय अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची विभागणी झाली. ७ ऑगस्ट रोजी जिना स्वतः कराचीला रवाना झाले. ११ ऑगस्टच्या पाकिस्तानच्या घटना समितीच्या बैठकीत त्यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली व कायदे आझम अशी उपाधीही त्यांना प्रदान करण्यात आली. १२ ऑगस्ट रोजी ह्या घटना समितीपुढे जिनांनी केलेल्या भाषणाचा सूर आतापर्यंतच्या भाषणाहून बराच वेगळा होता. पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राज्य राहणार ह्या अनेकांच्या अपेक्षेला जीनांनी आपल्या भाषणाने धक्का दिला. पाकिस्तानमधील सर्व नागरिकांना वंश अगर धर्मभेद न मानता समान अधिकार दिले जातील. धर्माच्या आधारे कोणावरही पक्षपात केला जाणार नाही. धर्मही खाजगी बाब आहे. ती राजकीय अधिकाराच्या आड येणार नाही असे निसंग्धिपणे प्रतिपादित केले. १३ ऑगस्ट रोजी लॉर्ड माऊंट बॅटन कराचीला गेले. १४ ऑगस्टच्या सकाळी ब्रिटिश सम्राट सहावे जार्ज यांचा संदेश पाकिस्तानच्या घटना समितीपुढे ब्रिटिश सत्तेचा प्रतिनिधी या

नात्याने वाचून दाखविला त्यांनी पाकिस्तानाच्या नवोदित राज्याला शुभेच्छा दिल्या आणि जिनाची नियुक्ती पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल म्हणून झाल्याची घोषणा केली. आणि १४च्या ऑगस्ट मध्यरात्री म्हणजे १२ नंतर पाकिस्तान हे स्वतंत्र राज्य बनले. लियाकत अली हे पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान बनले आणि बॅ. जीना हे पहिले गव्हर्नर जनरल.

### १५.३.१० भारत स्वतंत्र झाला :

भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा १४ ऑगस्टच्या मध्यरात्री म्हणजेच रात्री १२ नंतर १५ ऑगस्ट रोजी दिल्ली येथील संसद सदनाच्या मुख्य सभागृहात भरलेल्या भारताच्या घटना समितीच्या बैठकीत केली गेली. सभागृह गच्च भरले होते. संसद सदना बाहेर हजारोंचा जमाव ही ऐतिहासिक घोषणा ऐकायला आणि भारताच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या प्रसंगी त्यात सहभागी होण्यासाठी उभा होता. १४ ऑगस्ट १९४७च्या रात्री बरोबर १२ वाजता हिंदुस्थानाचे १८० वर्षाचे पारतंत्र्य नष्ट झाले. भारत स्वतंत्र झाला. असंख्य हुतात्म्यांनी क्रांतिकारकांनी व स्वातंत्र्यवीरांनी उरी बाळगलेले कित्येक वर्षाचे स्वातंत्र्याचे स्वप्न पुरे झाले. रात्री १२-४५ वाजता घटना परिषदेची बैठक सुरू झाली. सर्वांच्या अंगात आवेश व जोम संचारला होता. यावेळी पं. जवाहरलाल नेहरू आपल्या भाषणात आत्मविश्‍वासाने म्हणाले.

''आम्ही नियतीबरोबर अनेक वर्षापूर्वी एक करार केला होता. ती प्रतिज्ञा पुरी करण्याची वेळ आता आली आहे. पूर्णांशाने नव्हे पण बऱ्याच मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचा क्षण आला आहे. मध्यरात्रीचा १२ वाजण्याचा टोल पडताच सारे जग ज्यावेळी निद्रिस्त झाले असेल त्यावेळी स्वतंत्र आणि सचेतन भारत जन्माला आला असेल इतिहासात क्वचित असा क्षण येतो जेव्हा आपण जुन्यातून नव्यात पदार्पण करतो. जेव्हा एका युगाचा अंत होतो आणि दीर्घ दडपलेल्या राष्ट्राचा आत्मा बोलका होतो.'' अशा ह्या पवित्र व गंभीर प्रसंगी भारतीयांच्या आणि अखिल मानवजातीच्या सेवेला वाहून घेण्याची शपथ सर्वांनी घ्यावी असे कळकळीचे आवाहन केले. त्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड माऊंट बॅटन यांनी केलेल्या भाषणात, ''आजपासून मी तुमचा घटनात्मक प्रमुख आहे. भारताच्या हितसंबंधांची जोपासना करण्यास मी कटिबद्ध आहे.'' असे त्यांनी आश्वासन दिले. त्यानंतर घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ''भारतावरील ब्रिटिश प्रभुत्वाचा अंत आज झालेला असून यापुढे इंग्लंडशी आमचे संबंध समानतेच्या सद्‌भावनेच्या व परस्पर हिताच्या आधारावर निर्धारीत होतील'' असे घोषित केले. सर्व भाषणे आटोपल्यानंतर स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज संसद सदनावर फडकविण्यात आला. स्वातंत्र्याचा उषःकाल झाल्याच्या मंगल प्रसंगाची साक्ष म्हणून एकवीस तोफांची सलामी देण्यात आली. १५ ऑगस्टला नेहरूंच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र भारताच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला भारताच्या स्वातंत्र्य सोहळ्याचा प्रसंग स्वतः डोळ्यांनी पाहिलेले कॅम्पबेल जॉन्सन यांनी 'मिशन विथ माऊंट बॅटन' या आपल्या पुस्तकात ह्या घटनेचे रेखाटलेले शब्दचित्र मोठे बोलके आहे. ''ह्या प्रसंगाच्या वेळी जनतेचा हर्षउल्हास पाहून अगदी स्थितप्रज्ञ वृत्तीची व्यक्तीही प्रभावित झाल्याखेरीज राहिली नसती.'' असे या ग्रंथात त्यांनी लिहिले आहे.

अशा प्रकारे १४ ऑगस्ट १९४७च्या मध्यरात्री १२ वाजता ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य देऊन १८० वर्षाहून जास्त काळ असलेल्या राजवटीचा शेवट झाला. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू तर गर्व्हनर जनरल लॉर्ड माऊंट बॅटन बनले. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले ही घटना जगाच्या इतिहासात अनन्य साधारण आहे. हिंदी जनतेने महात्माजींच्या नेतृत्वाखाली दिलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. स्वातंत्र्य लढ्यात सशस्त्र क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाची किंमत खचितच कमी नाही तथापि मुख्य संघर्ष महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक नेतृत्वाखालीच दिला गेला. त्यामुळे हिंदी स्वातंत्र्याचे फार मोठे श्रेय महात्मा गांधीजी व राष्ट्रसभा यांच्याकडे जाते, हे एक ऐतिहासिक सत्य होय.

## १५.४ सारांश :

१९४६ नंतर देशाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक झाल्याने ब्रिटिशांना हिंदुस्थान सोडून जाण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. त्यातून हिंदुस्थानची फाळणी करून भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांची निर्मिती केली. लॉर्ड माऊंट बॅटन यांनी फाळणीची योजना तयार करून ती ब्रिटिश पार्लमेंट समोर मंजूर करून घेतली त्यानंतर ३ जून १९४७ रोजी माऊंट बॅटन योजना यानावाने ओळखली गेली. काँग्रेस व मुस्लिम लिग या दोघांना ती योजना मान्य झाल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने मंजुर केल्यानंतर त्याचे भारतीय स्वातंत्र्य कायद्यात रूपांतर झाले आणि १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हे देश जगाच्या नकाशावर स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू बनले तर पहिले गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड माऊंट बॅटन यांची तर बॅ. जीना यांची पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल म्हणून आणि लियाकत अली यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली गेली.

## १५.५ सरावासाठी स्वाध्याय (प्रश्न)

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतीय स्वातंत्र्य कायदा आणि हिंदुस्थानच्या फाळणीचा सविस्तर वृत्तांत लिहा?

२) भारतीय सत्तांतराचा सविस्तर वृत्तांत विशद करा?

३) हिंदुस्थानच्या फाळणीविषयी लॉर्ड माऊंट बॅटन यांची गव्हर्नर जनरल म्हणून भूमिका विशद करा.

४) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा आणि पाकिस्तानची निर्मिती याविषयी सविस्तर माहिती लिहा?

## संदर्भ :

१) आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. सुमन वैद्य - डॉ. शांता कोठेकर
साईनाथ प्रकाशन, नागपूर

२) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास - डॉ. जयसिंगराव पवार - फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३) भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास - डॉ. बाबुराव पवार - सचिन पब्लिशर्स्, नाशिक.

४) आधुनिक भारताचा इतिहास, पुस्तक-२
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

❖❖❖❖